बेलापूरचे केळकर यांचे घराण्यांत हें औषध पिढीजाद सुरू होतें. दोनशें रुपये देऊन धन्वंतरी बापूसाहेब मेहेंदळे यांनीं त्यांजकडून ऐकीलें तेंच हें औषध

औषधी बाड

॥ श्रीशंकर ॥

औषधी बाड

[भाग १ ते ३ एकत्र]

यस्य देशस्य यो जन्तुस्तज्जातस्यौषधं हितम् ।
देशादन्यत्र वसतस्तत्तुल्यं गुणमौषधम् ॥

कै. आयुर्वेदमहोपाध्याय शंकर दाजीशास्त्री पदे

कै. वैद्य परशराम बाजी पाटील

कै. आयुर्वेदाचार्य दामोदर विष्णु गद्रे

श्री. वैद्यराज अच्युत बाळकृष्ण पाध्ये. गुर्जर

SHRI GAJANAN

श्रीगजानन बुक डेपो प्रकाशन, दादर, मुंबई २८

प्रकाशक :

रमेश विठ्ठल रघुवंशी
श्रीगजानन बुक डेपो,
कबुतरखाना, भवानी शंकर रोड,
दादर, मुंबई २८

प्रसिद्धि-दिनांक :

श्रीगणेश चतुर्थी, शके १८९६
१९ सप्टेंबर १९७४

किंमत २५ रुपये

मुखपृष्ठ : चित्रकार बांदोडकर, मुंबई

मुद्रक :

शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ, पुणे ३०

औषधी बाडाच्या निमित्तानें—

" विषमोगरीचें मूळ पाण्यांत उगाळून चिंचोक्याइतकें घेतलें तर घूस, उंदीर, पिसवा, पिसाळलेलें कुत्रें यांचे विषावर अप्रतिम गुणकारी आहे. कुत्र्याचें विष हटकून बरें होतें. रोज पैसाभार उगाळून थंड पाण्यांत प्यावयाचें. पथ्य : भाकरी तांदुळाची व गूळ खाण्यास देणें. ७ दिवस पथ्य ठेवायचें. पाणी दिल्यास चालेल. या औषधानें अनेक रोगी बरे झाले आहेत. बेलापूरचे केळकर यांचे घराण्यांत हें औषध पिढीजात सुरू होतें. दोनशें रुपये देऊन मेहेंदळे यांनीं त्यांजकडून ऐकिलें तेंच हें औषध आहे."

आयुर्वेदाचार्य दामोदर विष्णु गद्रे यांच्या बाडातील हे औषध. गद्रे वैद्यांच्या मुलाकडे जुनी औषधी बाडं आहेत असे माझे मित्र श्री. बापट यांजकडून मला कळले. एके दिवशी बापटांबरोबर मी गद्रे यांच्याकडे गेलो. ती बाडं चाळत असता वरील औषध मी वाचले व त्याच क्षणी ही बाडं छापावयाचा निर्णय मी घेतला. या औषधासारखीच आणखीही काही अप्रतिम गुणकारी औषधं या बाडांत आहेत.

ही बाडं वाचत असताना काही काही वेळा मी आश्चर्याने थक्क होत असे; व त्याच वेळी माझ्या डोक्यात विचारांचेही काहूर माजे. अनेक प्रश्न मनात उभे राहात. त्यांपैकी एक विचार असा : हे सारे लोकांपासून, समाजापासून लपवून का ठेवले गेले? ही औषधे गुप्त ठेवण्याचा हेतू काय? आजदेखील अनेक घराण्यांपाशी अशीच किती तरी अप्रतिम गुणकारी औषधे आहेत. ती ते साऱ्या समाजाला का बरं सांगून टाकत नाहीत? माझ्या लहानपणची एक घटना मला आठवते : आमच्या घरी एक नोकर होता. त्याला काविळीवर औषध माहीत होते. त्याने गुण पण त्वरित येई. माझ्या वडिलांनी त्याच्याकडून ते औषध मिळविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण त्याने अखेरपर्यंत दाद लागू दिली नाही. मुंबईसारख्या अत्याधुनिक शहरातील नामवंत डॉक्टरसुद्धा काविळीचा रोगी गावठी औषधवाल्याकडे पाठवितात, व रोगी बरा होतो. आपल्यापैकी प्रत्येकाकडे औषधी लपवून ठेवण्याच्या अशा आठवणी असतीलच. औषधं गुप्त ठेवण्याची पूर्वीपासूनच लोकांची प्रवृत्ती का होती? गुरूची आज्ञा नाही ही सबब अनेकजण सांगतात. औषध दुसऱ्याला सांगितलं तर त्याचा प्रभाव नष्ट होईल, ही भीती त्यांना असते. आपले महत्त्व कमी होईल ही भीती पण त्यामागे असू शकेल. हे शेवटले कारणच जास्त सयुक्तिक आहे असे मला वाटते.

दुसरा याहून महत्त्वाचा विचार म्हणजे बापूसाहेब मेहेंदळेसारखा धन्वंतरी दोनशे रुपये देऊन वर दिलेले औषध विकत घेतो. त्या औषधाच्या साहाय्याने अनेक

रोगी वर्षानुवर्षे बरा करतो. पण एकदाही त्यांच्या मनात असा विचार येत नाही की, या विषमोगरीच्या मुळांमध्ये असा काय गुणधर्म आहे, असे कोणते घटक आहेत– की ज्यामुळे पिसाळलेल्या कुत्र्याच्या विषावर ते अप्रतिम गुणकारी ठरले ? हे घटक काय आहेत ते शोधून काढावे, त्यांचे पृथक्करण करावे; कुत्र्याचे विष आणि विषमोगरीचे मूळ यांत काय संबंध असावा की ज्यामुळे हे घडते याचा शोध घ्यावा, असे विचार बापूसाहेबांच्या मनात का बरं येत नाहीत ?

धन्वंतरी बापूसाहेब मेहेंदळे कोणी लुंगेसुंगे वैद्य नव्हते. साऱ्या देशभर त्यांची कीर्ती होती. बापूंच्या यशाचा प्रसाद घेण्याकरिता शेकडो कोसांवरून आलेल्या रोग्यांचे थवेच्या थवे त्यांच्या येथे जमत. बापूंची अशी प्रतिज्ञा असे की, जर कोणी गीर्वाण भाषेत आणि आर्यवैद्यकात माझा हात धरील तर त्यास मी साष्टांग प्रणिपात घालून त्याचा शिष्य होऊन राहीन, आणि पुन: वैद्यक्रिया करणार नाही.

येथे डॉक्टर आनंदीबाई जोशींची आठवण सांगण्यासारखी आहे. अमेरिकेत जाऊन वैद्यकीय शिक्षण घेणारी ही पहिली भारतीय स्त्री. तेथील सर्वोच्च परीक्षेत त्या सर्व अमेरिकन विद्यार्थ्यांना मागे सारून पहिला क्रमांक मिळवितात. तेथे त्यांना क्षयाचा विकार जडतो. सारे पाश्चिमात्य उपचार निष्फळ ठरतात. बाई ध्यास घेतात बापूसाहेबांचा. बापूसाहेबच आपणास बरे करतील, या आशेने त्या पुण्यास परततात. बापूसाहेब काही केल्या औषधोपचार करण्यास तयार होत नाहीत. पुण्यातील थोर थोर गृहस्थांनी मध्यस्थी केली, परंतु बापूसाहेबांपुढे कोणाचे काहीच चालले नाही. कोणी फारच भीड खर्च केली तर ते म्हणत की, ती बाई माझ्यापेक्षा किती शहाणी ! तिने तर प्रत्यक्ष पाताळ लोकांची विद्या संपादन केली आहे. तिला मजसारख्याने काय औषध द्यावे ? या प्रकारे आणखी पुष्कळ बोलून त्यांनी दुसऱ्यास निरुत्तर करण्याचा निश्चय केला होता. शेवटी शेवटी तर आनंदीबाई अनेक निरोप पाठवितात. दयेची भीक मागतात. पण सर्व व्यर्थ. बापूसाहेबांच्या हृदयाला पाझर फुटत नाही. आनंदीबाईंना याचे अत्यंत वाईट वाटले. एका मित्राजवळ त्यांनी असे बोलून दाखविले आहे की, " सर्व हिंदुस्थानला माझी दया येत आहे, परंतु बापूसाहेबांना मात्र ती येत नाही ! हे माझं दुर्दैव म्हणायचं, दुसरं काय ! "

बापूसाहेबांची आणखीही एक आठवण देण्यासारखी आहे : एके दिवशी सकाळी बापूसाहेब सज्जात उभे असतात. त्यांच्या घरावरून विश्रामबागेकडे माणसांची ये-जा चालू होती. बापूंना काय वाटले कोणास ठाऊक, त्यांनी आपल्या एका साहाय्यकाला बोलाविले व रस्त्यावरून जाणाऱ्या माणसाकडे बोट दाखवून म्हणाले की, " त्या माणसाच्या मागे जा बघू. तो मनुष्य विश्रामबागेजवळ जाऊन मरणार. त्याच्या नातेवाइकांचा तपास करून त्याच्या प्रेताची व्यवस्था कर. " साहाय्यक धावतच त्या माणसामागे गेला. पाहतो तो काय, खरंच विश्रामबागे-

जवळ तो मनुष्य कोसळला व पाहता पाहता त्याचे प्राणोत्क्रमण झाले ! त्या माणसाची योग्य ती व्यवस्था करून आश्चर्याने थक्क झालेला साहाय्यक बापूंकडे परत आला व त्यांना विचारू लागला, ' बापूसाहेब, तो मनुष्य मरणार हे आपल्याला एवढ्या दुरून कसं कळलं ? ' बापूसाहेब उत्तरले, ' अरे त्याची नाडी बरोबर चालत नव्हती ! '

गोव्याच्या दादा वैद्यांची आठवण मोठी आश्चर्यकारक आहे : दादा वैद्य रोग्याची मूत्रचिकित्सा करून रोगनिदान करीत. ही वार्ता त्या वेळच्या गोव्याच्या गव्हर्नरला कळली. दादांची परीक्षा घ्यावी या हेतूनं त्याने आपल्या घोड्याचं मूत्र बाटलीत भरून नोकराकरवी त्यांच्याकडे पाठविले. दादांनी बाटलीतील मूत्राकडे क्षण-दोन क्षण पाहिले व ते मूत्र घेऊन येणाऱ्या नोकराला म्हणाले, " ज्याचे हे मूत्र आहे त्याला पोटभर खायला मिळत नाही. तो अनेक दिवस अर्धपोटी आहे. त्याला पोटभर हरबरे घाल म्हणजे तो बरा होईल." दादांची ही अपूर्व परीक्षापद्धत पाहून गव्हर्नर दादांचा भक्त बनला. रोज सकाळी दादांना सलाम करूनच तो पुढे जाई. दादा वारले तेव्हा त्यांच्या शवाला मानाचा पहिला हार गव्हर्नरकडला होता ! दादांची कायम स्मृती म्हणून उभारलेला त्यांचा पुतळा आज पण फोंड्याला त्यांची कीर्ती सांगत उभा आहे.

वैद्यकशास्त्रातील ही पहाडाएवढी मोठी माणसं ! जगातील कोठल्याही बुद्धिमंताला या क्षेत्रात वरचढ ठरणारी. आपण देत असलेल्या औषधांचं शास्त्रीय पृथक्करण करावं असं त्यांना का वाटलं नाही ? परंपरेने आलेली औषधं, अन्तःस्फूर्तीने सुचलेली औषधी योजना यापलीकडे ही माणसं का बरे गेली नाहीत ? शास्त्रीय पृथक्करण झालं असतं तर वैद्यकशास्त्रात किती मोठी क्रांती घडली असती ! शास्त्र खूप पुढे रेटता आलं असतं. केवढाली परंपरा निर्माण झाली असती. परशराम बाजी पाटलांकडे नागविषावर अतिशय गुणकारी काठी होती ! त्यांनी तिच्या बळा-वर अनेकांना मृत्यूच्या दाढेतून ओढून काढले. पण काठी कोणत्या झाडाची आहे ? तिच्यात असा कोणता घटक आहे की नागविष तिच्यापुढे फिके पडते ? हा विचार त्यांना कधीच का बरं सुचला नाही ? भारतीय मनाचा हा कप्पा कायमचाच बंद आहे की काय ? ही माणसं वस्तू वापरीत, त्याचा उघड लाभ त्यांना दिसे. मग नेमके हेच विचार त्यांना का बरं सुचत नसत ? विशाल नदीच्या पात्रात अचानक भोवरे निर्माण व्हावेत, काही काळ तेवढ्या वर्तुळात खळबळ माजावी व पुन्हा नदीचा प्रवाह शांतपणे वाहू लागावा असाच नाही का हा सारा प्रकार ?

सर ऐझॅक न्यूटन हा एकदा बागेत बसला असता झाडावरून पिकलेले फळ खाली पडताना पाहतो व ते खालीच का पडले, वर का गेले नाही, या प्रश्नाचा ध्यास घेतो. व त्यातूनच गुरुत्वाकर्षणाचा शोध लागतो. पाश्चिमात्य माणसांच्या मेंदूचा हा कप्पा उघडा असावा व भारतीयांचा तो कायमचा बंद राहावा, हे असं का ?

वैद्यकशास्त्रच नव्हे, हिंदुस्थानातील जीवनाची सर्वच अंगे परंपरागत होती. जीवनातील कोणत्याच क्षेत्रात आम्ही का व कसे ? हे प्रश्न विचारले नाहीत ! अलेक्झांडर-

पुढे पौरसचा लाजिरवाणा पराभव होतो. गजनीचा महंमद पुजाऱ्यांच्या तथाकथित मंत्रांना भीक न घालता सोमनाथाची मूर्ती छिन्नभिन्न करतो. बाबरापुढे हेमूला पळता भुई थोडी होते. मूठभर इंग्रज पेशव्यांना दीनवाणे लाचार करून ब्रह्मवर्तीला हरी हरी करावयास पाठवितात. प्रत्येक आक्रमक आम्हांला नमवतो. आमची शस्त्रे त्यांच्या शस्त्रांपुढे थिटी पडतात. आम्ही आमची शस्त्रे अद्ययावत का केली नाहीत ? गरजेपोटी सायन्स निर्माण होते म्हणे ! इथे तर प्रत्येक क्षणाला आमच्या स्त्रियांची अब्रू धोक्यात होती. मग आम्ही वरचढ शस्त्रे का निर्माण केली नाहीत ? आम्ही लढाईची शस्त्रेही परक्यांपासून विकत घेत होतो. पण स्वतःचा शस्त्रास्त्रांचा कारखाना काढीत नव्हतो हे असे का ? इथली जनता जुलमी राजाचा अनाचार पिढ्यान् पिढ्या सहन करीत होती. इथे राजाला फाशी दिल्याचे एकही उदाहरण का सापडत नाही ? दुष्काळात अन्न अन्न करून हजारो लाखो माणसं हातपाय झाडीत निमुटपणे मरत, पण उघड्या डोळ्यांना दिसणारी धान्याची कोठारं कधीच लुटली जात नसत. एखाद्या साथीच्या रोगात गावच्या गाव उजाड होई पण त्या रोगाचं कायमचं निर्मूलन करणारं शास्त्र इथं निर्माणच होत नसे.

ग्रीक कथेतील इडिपस दुर्दैववशात् स्वतःच्याच मातेशी रममाण झाला व पित्याच्या मृत्यूला कारणीभूत झाला. या खंतेपायी स्वतःच स्वतःचे डोळे फोडून राज्यातून परागंदा होतो. उर्वरित आयुष्य पश्चात्तापदग्ध अंतःकरणाने काढतो. पण एकदाही देवाची क्षमा मागत नाही. देवाची क्षमा मागावी असे त्याला वाटतच नाही. त्याला अपराधी वाटतं; पण ते स्वतःच्या सदसद्‌विवेकबुद्धीच्या संबंधात, मातेसंबंधीच्या स्वतःच्या कर्तव्यात वाटते. जिने मला जन्म दिला तिला मी ओळखू शकलो नाही याची खंत तो करतो. आपण देवाचे काही चुकलो असे त्याला वाटतच नाही. आपण मातेच्या बाबतीतले स्वतःचे पुत्रकर्तव्य चुकलो याचं दुःख त्याला फार होतं. आणि ही खंत करता करता त्याचे अंतःचक्षू उघडतात. आता त्याला भूत-भविष्य-वर्तमान एखाद्या स्पष्ट लिहिलेल्या पुस्तकागत दिसू लागते. तो त्रिकाळज्ञानी होतो. देवही त्याच्याकडे स्वतःचे भविष्य जाणावयास येतात.— इडिपस देवाला शरण जात नाही. देवाकडे पश्चात्तापाची भीक मागत नाही. आणि हे चित्र पाहा......

राज्य मिळवायचे असेल तर वडिलधाऱ्या नातेवाइकांना, गुरूला ठार मारावे लागेल— राज्य सोडावे का गुरूला मारावे या संभ्रमात पडलेला अर्जुन सत्य नेमके कुठे आहे याचा शोध घेण्याच्या भानगडीत न पडता शेवटी—

सर्वधर्मान्परित्यज मामेकं शरणं व्रज ।
अहं त्वां सर्व पापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥

‘सर्व धर्म सोडून तू मला एकट्यालाच शरण ये, मी तुला सर्व पातकांपासून मुक्त करीन, तू भिऊ नको.’ या श्रीकृष्णाच्या उपदेशाला निमूटपणे मान तुकवतो. आणि

तीच परंपरा आम्ही आजही चालवीत आहोत. हा भेद नेहमीच आपणात व पाश्चिमात्यात का राहावा ? असे का ? का ?—— का ? . . हा प्रश्नच आम्ही कधी स्वतःला विचारला नाही. आम्ही फक्त शरण जातो;– कधी भगवंताला, कधी राजाला, दैवाला नेहमीच. ‘ ठेविलें अनंते तैसेची राहावे ’ हा आमचा बाणा. कोठलीही घटना– नवी वा जुनी– आमचे कुतूहल जागृत करीत नाही. आम्हांला आव्हान ठरत नाही. आम्ही ती एक अपरिहार्य आणि नित्य बाब मानतो आणि सोडून देतो !

शेकडो वेळा लाजिरवाणा पराभव झाला तो का झाला ? कसा झाला ? असं पुन्हा घडू नये म्हणून काय केलं पाहिजे ? याचा जसा इथे कधीच विचार झाला नाही तसाच दुष्काळात, साथीत, कुत्र्याच्या मौतीने हातपाय झाडीत माणसं मरतात ती का ? हा दुष्काळ पडतो तो का ? त्याचे मूळच नाहीसं करता येईल काय ?– याचाही विचार येथे कोणी केला नाही.

सायन्स, विज्ञान येथे का जन्माला आलं नाही ? पश्चिमेतच ते का जन्माला यावं ? Test everything हे गॅलिलिओचे सूत्र आम्हांला का सुचू नये ? पश्चिमेत विज्ञान आहे, पूर्वेत नाही, याचाही शोध आमच्यापेक्षा परक्यांनीच अधिक करावा ही गोष्ट कानाला कशी तरीच वाटली तरी ती खरी आहे. कोणी म्हणतात की, पौर्वात्य पुनर्जन्मावर विश्वास ठेवतात त्यामुळे अशा शोधांची त्यांना घाई नाही आणि आस्थाही नाही. त्यांचा एकमेव मुख्य हेतू आत्मोद्धाराचा. जन्मांतराचं रहाटगाडगं थांबविण्याचा. पण शोध गरजेपोटी लागतात असं म्हटलं जातं. काय येथील लोकांना अशा गरजा कधी वाटल्याच नाहीत ? कोणी म्हणतात– भारत अतिविशाल, सुजल, सुफल देश. तेथे स्पर्धा नव्हती. सगळं स्वास्थ्य होतं. पण किती लोकांना ? दुष्काळापाठोपाठ दुष्काळ येथे पडत. उपनिषदांतही दुष्काळ पडल्याचा आणि विश्वामित्रांनी आपद्‌धर्म म्हणून कुत्र्याच्या तोंडातील हाड ओढून खाल्ल्याचा उल्लेख आहे. आमचे भारतीय विद्वान (?) तर म्हणतात : आम्हांला फक्त अध्यात्मात रस आहे. भौतिकाचा आम्हांला तिटकारा आहे. खरंच ? (जणू हे सगळे महाप्रतापी आत्मे हवा खाऊन आणि पाणी पिऊन जगत असतात !)

वर शोधलेली कारणं आपल्याला तर मुळीच पटत नाहीत. येथल्याही माणसाला जगण्याची ओढ होती. माणसं जगत होती. मजेत खात-पीत होती. संपत्ती, कीर्ती मिळविण्यासाठी जिवापाड झटत होती. मुलांची संख्या वाढवीत होती. मरणाच्या वेळी हे जग सोडून जावे लागते म्हणून धाय मोकलून रडत होती. वेगळं असं इथं काहीही नव्हतं. इथं पण निकड होती. दुष्काळामुळे माणसं परागंदा होत. गावेच्या गावे ओस पडत. साथीच्या रोगात कुटुंबेच्या कुटुंबे नामशेष होत. आक्रमकापुढे नेहमीच नांगी टाकत. धर्म टाकत. स्त्रियांची अब्रू गमवीत. जीवन येथे संघर्षमयच होतं.

विसावं शतक संपत आलं आहे. आज तरी आम्ही जीवनात शास्त्रीय दृष्टिकोण स्वीकारला आहे काय ? आमच्या पूर्वजांपेक्षा किती तरी जास्त सुखसोयी (पाश्चिमात्यां-

करून उसनवारीनं का होईना) आज आम्ही मिळवून आहोत. स्वातंत्र्य मिळून अठ्ठावीस वर्षे लोटली आहेत. वर वर्णिल्याहून वेगळी परिस्थिती आज तरी येथे आढळते आहे काय ? स्वातंत्र्यानंतर येथे कोणती राज्यव्यवस्था उपयोगी ठरेल हे येथल्या समाजाची एकूण धारणा, येथलं दारिद्र्य, हजारो जाती, त्यांचे एकमेकां-बरोबरचे संबंध, भाषा, प्रांताभिमान यांपैकी कशाचाच विचार न करता आठ-दहा देशांतील (त्याही पाश्चिमात्यच) घटनेची बाडे आणून त्यांतील आदर्श कलमांची ठाकठोक करून घडवलेली घटना आज किती निरुपयोगी ठरली आहे हे तुमचं तुम्हांला पाहता येईल. घटना घडविण्यात प्रमुख हात होता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा. या राजसंस्थेत दलितांना बाहुल्यांसारखे नाचविले जाईल याचे भान त्या द्रष्ट्याला होऊ नये याचे राहून राहून आश्चर्य वाटते.

इतिहासात कधीच नव्हती इतकी प्रचंड लोकसंख्या इथं वाढली आहे. करोडो लोक दारिद्र्याच्या खाईत केवळ मरण येत नाही म्हणून पिचत पडले आहेत. देशाची अर्थव्यवस्था पार कोसळून पडली आहे. हे नेमकं का घडलं आहे, ते टाळण्यासाठी नेमके काय केलं पाहिजे हे शोधण्याच्या भानगडीत न पडता स्वतःला आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थतज्ज्ञ समजणारे धनंजयराव गाडगीळ विनोबांच्या भोंगळ पदयात्रेत मिरवीत. होते. महाभारतापासून हा समाज भ्रष्टाचाराने का बरं किडला आहे ? नैतिक मूल्ये येथे स्वार्थापोटी नेहमीच पायदळी का तुडवली गेली आहेत ? याची कारणं कोणती ? हा स्वार्थ कमी करण्यासाठी काय केलं पाहिजे ? हे प्रश्न अर्थशास्त्राचे प्रकाण्डपंडित वि. म. दांडेकर यांनाही कधीच भेडसावीत नाहीत. पुण्याच्या गल्लीबोळांतून भ्रष्टाचार-विरोधी मिरवणुका काढण्यात त्यांना अपार धन्यता वाटते !

मित्रहो ! किती तरी प्रश्नांची उत्तरं आपणांला आजसुद्धा गवसली नाहीत. किती प्रश्न आजसुद्धा आपणांला आव्हान देत आहेत. प्रचंड वाढती लोकसंख्या, भयानक दारिद्र्य, भ्रष्ट राज्यसंस्था, अराष्ट्रीयत्वाची वाढती भावना, या साऱ्याच प्रश्नांची उत्तरं शास्त्रीय दृष्टिकोण स्वीकारूनच आपणांस सोडवायची आहेत. कसले तरी थातुरमातूर उपाय योजून हे प्रश्न कायमपणासाठी सुटणार नाहीत. जीवनातील प्रत्येक क्षेत्राला शास्त्रकाट्याची कसोटी लावली तरच काही तरी मार्ग दिसणार आहे.

या बाडांच्या वैद्यांना त्या काळी काहीच सोयी नव्हत्या. आज किती तरी पटीने शास्त्रीय उपकरणे आपल्या हातात आहेत. मेहेंदळे, दादा वैद्य, पाटील वगैरे वैद्यांना जे शक्य नव्हते ते आज आपणाला निश्चितच शक्य आहे. Test every-thing हे गॅलिलिओचे वचन आपलं ब्रीदवाक्य झालं पाहिजे. या बाडातील औषधं आपल्या पूर्वजांचा अपूर्व ठेवा आहे. त्यांनी जे मागे ठेवले ते नुसते उपयोगात आणून उपयोगाचे नाही. तज्ज्ञांनी त्याचं पृथक्करण करावं, त्याचे घटक शोधून काढावे, कोणी त्याची पेटंट औषधं बनवली तरच हे शास्त्र पुढे जाणार आहे.

प्रश्न आहे आम्ही आमच्या आयुष्याला टाकलेला प्रश्न बदलण्याचा. जर आम्ही आमचा प्रश्न बदलला तर कदाचित उत्तरही नवं येईल. निदान नव्या उत्तरासाठी आम्ही प्रयत्न तरी करू लागू.

भारतीयांना काय बुद्धी कमी होती ? आमच्यात अपार बुद्धी होती, याला साक्ष आमची उपनिषदे आहेत. आमचे धर्म आहेत. सगळे धर्म पूर्वेकडे जन्मले आहेत. आमच्याकडे एकापेक्षा एक मोठ्या संस्कृती घडून गेल्या. आमच्या कला आणि आमचे धर्म यांची बरोबरी प्राचीन काळी पाश्चात्य पण करू शकले नाहीत. मग त्यांच्यात आणि आमच्यात भेद कोठला ? भेद फक्त एकच. पाश्चात्य शास्त्राकडे, विज्ञानाकडे, घटनांच्या पृथक्करण विश्लेषणाकडे वळले; आम्ही तसे वळलो नाही. शास्त्र आणि विज्ञान फक्त पश्चिमेतच निर्माण झालं. चीन व भारत या देशांनी अनेक अलौकिक गोष्टींना जन्म दिला; पण ज्याला खऱ्या दृष्टीनं शास्त्र म्हणता येईल त्या शास्त्राला जन्म दिला नाही. ग्रीकांनी तो जन्म दिला. ग्रीक आमच्यापेक्षा जास्त बुद्धिमान होते हे उत्तर पटण्यासारखं नाही. इतर क्षेत्रांत आमच्या पूर्वजांनी जे कर्तृत्व गाजविलं आहे त्याच्याकडे केवळ एक जरी दृष्टिक्षेप टाकला तरी वरील विधानाचा फोलपणा तेव्हाच ध्यानात येईल. ग्रीक शास्त्राला जन्म देऊ शकले, कारण त्यांच्या तत्त्वज्ञानातील संकल्पनांनी त्यांना ते करावयास भाग पाडले होते.

ग्रीकांनी जेव्हा तत्त्वविवेचनाला प्रारंभ केला तेव्हा त्यांचाही शोध हे जे काही समोर दिसतं त्यातील सत्य किती आणि असत्य किती हाच होता. हे झाड आहे, ही नदी आहे, हे पशुपक्षी— जलचर आहेत, ही माणसे आहेत. या सर्वांच्या ठिकाणी हा जो असतेपणाचा गुणधर्म आहे तो काय आहे ? सर्व विश्वाच्या ठिकाणी असणारा हा असतेपणा त्यांना पकडावयाचा होता. पण विचाराच्या एका विशिष्ट क्षणी त्यांच्या तर्कांने त्यांना आमच्यापेक्षा वेगळ्या दिशेला नेले. त्यांनी पृथक पृथक अस्तित्वाने अस्तित्वात असणाऱ्या वस्तूंना खऱ्या अर्थाने खरे ठरविले, आणि या सर्व वस्तूंना आवरण घालून असणाऱ्या असतेपणाच्या पसाऱ्यातून पृथक् स्थिर आणि आकलनीय वस्तूंना त्या पसाऱ्यातून बाहेर काढले. त्याच्या उलट आम्ही बाह्य वस्तूंना आभास ठरवून त्यामागील असतेपणाला खऱ्या अर्थाने खरे मानले. परिणामी आम्ही ध्यास घेतला तो वस्तुनिष्ठ जगापाठल्या अदृश्य ब्रह्माचा.

यदा भूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति ।
तत एवच विस्तारं ब्रह्म संपद्यते तदा ॥

जेव्हा सर्व भूतांचा भिन्नाभिन्नपणा एका आत्म्यामध्येच स्थित आहे आणि आत्म्यापासून हा सर्व विस्तार झाला आहे असे दिसू लागेल तेव्हाच ब्रह्माची प्राप्ती होते.

दुसऱ्या श्लोकात कृष्ण म्हणतो,

अन्तवन्त इमे देहा नित्यस्योक्ता शरीरिणः ।
अनाशिनो ऽ प्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ॥

नित्य अविनाशी व अतर्क्य असा जो शरीरधारी आत्मा त्याने धारण केलेले हे देह नाशवंत आहेत.

आत्मा अविनाशी आहे, अमर आहे हे एकदा कायमचं ठरविलं गेलं की मग पुढचा सर्वच विचार खाड्कन थांबतो. कुत्र्याचा देह विनाशी आहे पण त्याचा आत्मा अमर आहे. मग त्याच्या देहाची चिरफाड का करा ? त्याच्या शरीराचे घटक का शोधीत बसा ? त्याच्या शरीरात विष निर्माण होते ते का ? याचा डोक्याला त्रास करून घेण्याची आवश्यकता आहे कुठे ? विषमोगरीचं मूळ कुत्र्याच्या विषावर गुणकारी आहे ना ? मग ते देत चला. विषमोगरीच्या मुळीचे गुणधर्म शोधण्याची जरूरच काय ? कारण कुत्र्याचा आत्मा अमर आहे इकडे विषमोगरीचा आत्मा पण अमरच आहे. आम्हांला निकड होती आत्म्याचा शोध घेण्याची. कृष्णाचा गीतेतील शापच पाहा ना,—

पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं नानाभावान् पृथग्विधान ।
वेत्ति सर्वेषु भूतेषु तज्ज्ञानं विद्धि राजसम् ॥

परंतु ज्या ज्ञानाने सर्व भूतांत नाना भाव भिन्नत्वाने आहेत असा समज होतो ते ज्ञान राजस होय.

एवढा प्रचंड शाप दिल्यावर कोणा हिंदूची ताकद आहे— का व कसं विचारायची. हिंदूंचे लाजिरवाणे पराभव, मूळापर्यंत न जाता थातुर मातुर उपायांनी समोर टाकलेला प्रश्न सोडवायची प्रवृत्ती, भ्रष्टाकार, अर्जुन समोर असता कृष्णाच्या स्त्रियांची झालेली विटंबना, व पाकिस्तानच्या जन्मावेळी आमच्या समोर झालेली हिंदू स्त्रियांची विटंबना— याचे मूळ कारण आमचे तत्त्वज्ञान आहे.

ग्रीकांनी शोध घेतला तो समोरच्या घन, घट्ट इंद्रियगोचर वस्तूंचा, आणि येथेच त्यांच्या शास्त्राचा पाया घातला गेला. त्यांच्या तंत्रविज्ञानाचा पाया घातला गेला. ग्रीक तत्त्ववेत्ते असतेपणाचा विचार एका वेगळ्या दृष्टीतून करू लागल्यामुळे सारे ग्रीक शास्त्र आणि विज्ञान शक्य झाले. शास्त्र आणि तंत्रविज्ञान ही नेहमी हातात हात घालून प्रगती करतात.

अस्तित्वाला— जीवनाला टाकलेला आपलाही प्रश्न आपण आता उलटा फिरवू या. जीवनाच्या समस्येवरची नवी उत्तरं आपणांस निश्चितच यातून मिळू शकतील.

—रमेश रघुवंशी

औषधी बाडांबद्दल काही विचार

औषधी बाड म्हणजे निरनिराळ्या काळी निरनिराळ्या व्यक्तींनी आपणांस समजलेल्या व आपण अनुभवलेल्या औषधांचा संग्रह होय. प्रायः वैद्यघराण्यात अशा अनुभाविक औषधांच्या त्या त्या वैद्यांनी लिहिलेल्या वह्या असतातच. व चिकित्सेचे कार्य त्यावरून करणारे काही वैद्य व वाचनप्रिय गृहस्थ त्यांचा उपयोग करून प्रसिद्ध होतात. पूर्वीच्या काळी मुद्रणकलेचा प्रसार नसल्याने पाठ्यग्रंथही हस्तलिखिततच असत. त्यामुळे गुरुगृही असताना व नंतरही अनुभवलेल्या औषधांचे प्रयोगसुद्धा हस्तलिखित करण्याचा प्रघात होता, व त्यामुळे **प्रत्येक घराण्यातील औषधी संग्रहास** फार महत्त्व होते. आता यातील बरीच औषधे अनेक ग्रंथांत आढळतात. तथापि ग्रंथोक्त सर्वच औषधांचे प्रयोग करून अनुभव घेणे ही फार श्रमसाध्य व दीर्घ कालावधीची गोष्ट असल्याने तज्ज्ञांनी अनुभव घेऊन लिहिलेल्या औषधप्रयोगाविषयीची जिज्ञासा कोणालाही असते. या दृष्टीने **औषधी बाडाचा उपयोग विशेष महत्त्वाचा होय**. तथापि, या कामातही पुढील सूचनांकडे लक्ष देणे जरूर आहे :

१. औषधाचे प्रमाण व किती दिवस द्यावे यांचा नियम प्रत्यक्ष सांगितला आहे. त्याप्रमाणे औषध घेणे आवश्यक आहे.

२. काही ठिकाणी पथ्य सांगितले आहे, ते त्याप्रमाणेच केले पाहिजे.

३. पथ्यापथ्याचा विचार रोगानुरूप व औषधानुरूप असतो. औषधानुरूप पथ्य तेथे सांगितल्याप्रमाणे करावे लागते.

४. सामान्यतः देश, काल, बल, प्रकृती, वय, सात्म्य यांचा विचार करून इतरांप्रमाणे येथेही औषधाचे प्रमाण वगैरे ठरविण्यास हरकत नाही.

५. काही तीक्ष्ण विषारी औषधे त्याचेसाठी सांगितल्या शुद्धी प्रकाराने सौम्य करून वापरणे जास्त चांगले.

६. या औषधी बाडांचे एकूण स्वरूप, रोग व त्यावर औषधी योजना असे आहे. अनेक रोगांवर वनस्पती सुचविल्या आहेत. पण त्या ओळखाव्या कशा, निरनिराळ्या भागात, भाषेत त्यांची नावे कोणती हे कळण्यासाठी वाचकांनी वनौषधि गुणादर्श (भाग १ ते ७ एकत्र) हा ग्रंथ अवश्य संग्रही ठेवावा. या ग्रंथात महाराष्ट्रातील एकूण ७०० वनस्पतींची संगतवार माहिती दिली आहे. या वनस्पती ओळखाव्या कशा, त्यांचे गुणधर्म काय व कोणत्या रोगावर त्या गुणकारी ठरतात याचे संपूर्ण विवेचन आयुर्वेद महोपाध्याय शंकर दाजीशास्त्री पदे यांनी केले आहे. वाचकांना औषधी बाडातील

वनस्पतिजन्य औषधे शोधण्यास हा ग्रंथ फार उपयुक्त ठरेल. तसेच प्रत्येक रोगाची लक्षणे काय, रोगनिदान कसे करावे, नाडीपरीक्षा कशी करावी,– तांबे, पारा, वंग, लोह, सोने, रुपे आदी रसायनांची संपूर्ण माहिती व पाक, लेह, सरबत कसे तयार करावे, गुटिका, वटी, रस, तैल, चूर्ण वगैरे घरच्या घरी तयार कसे करावे, यासाठी कै. पदेशास्त्री यांचेच श्री गजानन बुक डेपोने प्रसिद्ध केलेले **आर्यभिषक अर्थात हिंदुस्थानचा वैद्यराज** (१ ते ८ भाग एकत्र) हा ग्रंथ पण संग्रही ठेवावा. हे तीन ग्रंथ संग्रही असले म्हणजे संपूर्ण आयुर्वेदाचे सार तुम्ही मिळविल्यासारखे होईल.

मु. पो. राजापूर
जि. रत्नागिरी
१५–९–१९७४

वैद्यराज अच्युत बाळकृष्ण पाध्ये गुर्जर

या बाडातील अनेक औषधे बनविण्यास अवघड आहेत.
ती जर बनविण्यास काही अडचणी आल्या तर
खालील वैद्यांशी संपर्क साधावा.

१. वैद्यराज **अच्युत बाळकृष्ण पाध्ये गुर्जर**
मु. पो. राजापूर, जि. रत्नागिरी.

२. वैद्य **नीळकंठ दामोदर गद्रे**
झावबाची वाडी, ठाकुरद्वार, मुंबई २.

३. वैद्य **कानिटकर**
भिमराव वाडी, ठाकुरद्वार, मुंबई २.

कृतज्ञता

वैद्यकशास्त्रावर कै. आयुर्वेदमहोपाध्याय शंकर दाजीशास्त्री पदे यांचे वनौषधी गुणादर्श (१ ते ७ भाग एकत्र), व आर्यभिषक अर्थात हिंदुस्थानचा वैद्यराज (१ ते ७ भाग एकत्र), हे दोन ग्रंथ मी गेल्या वर्षी प्रसिद्ध केले. औषधी बाड हा तिसरा ग्रंथ. वरील दोन ग्रंथ प्रसिद्ध करताना एवढ्या अडचणी आल्या नव्हत्या. औषधी बाड प्रसिद्ध करताना माझी पुरी दमछाक झाली.

कै. पदे यांनी १८८० साली त्या काळातील अनेक वैद्यांकडील ३००–४०० वर्षांपासून चालत आलेली बाडं एकत्र करून औषधी बाड नावाचा एक ग्रंथ प्रसिद्ध केला होता. तो ग्रंथ मिळविण्यास मला फार त्रास झाला. नागपूर-बडोद्याची फेरी फुकट गेली. महाराष्ट्रातील सर्व मोठी ग्रंथालये पालथी घातली तरी ग्रंथ मिळेना. मी आशा सोडली होती. एके दिवशी दुकानावर काम करीत बसलो असता एक गृहस्थ आले व म्हणू लागले, 'तुम्ही कै. पदे यांचे दोन ग्रंथ छापून फारच मोठे लोकसेवेचे कार्य केले आहे. त्यांचा औषधी बाड हा ग्रंथ तुम्ही का छापत नाही?' मी माझी अडचण सांगितली. ते म्हणाले, 'माझ्या मित्राकडे तो ग्रंथ आहे. मी पाठवतो. तुम्ही छापा.' श्री. दत्तात्रेय गंगाराम कारेकर हे त्या गृहस्थांचे नाव. त्यांनी बेळगावहून श्री. बाळकृष्ण महादेव तुडवेकर व त्यांचे चिरंजीव महादेव बाळकृष्ण तुडवेकर यांच्याकडील ग्रंथ पाठविला. या तिघांचा मी अत्यंत आभारी आहे.

हा ग्रंथ १२८ पानांचा होता. एवढा लहान ग्रंथ छापण्याऐवजी आणखी काही वैद्यांकडची बाडं मिळवावी व सर्व बाडं एकत्र करून छापावी असं मी ठरविलं.

कै. आयुर्वेदाचार्य दामोदर विष्णू गद्रे यांनी लिहून ठेवलेली बाडं त्यांचे चिरंजीव वैद्य नीळकंठ दामोदर गद्रे यांनी मोठ्या आनंदाने माझ्या स्वाधीन केली. या कामी मुंबईतील विख्यात ग्रंथविक्रेते माझे मित्र श्री. वा. दा. बापट यांची मला फारच मदत झाली.

कै. वैद्य परशराम बाजी पाटील यांचे बाड माझे स्नेही श्री विश्वास पाटील यांनी मिळवून दिले. श्री. रामराव गोविंद श्रीधनकरांनी आपल्या आजोबांच्या अतिशय मोलाच्या आठवणी लिहून दिल्या. त्याबद्दल त्यांचे व त्यांचे बंधू श्री. वसंत गोविंद श्रीधनकर यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

कै. शंकर दाजीशास्त्री पदे यांचा ज्यांना सहवास घडला होता व त्यांच्याकडून स्फूर्ती घेऊन ज्यांनी आपले सारे आयुष्य आयुर्वेदाला वाहून घेतले ते आजचे महाराष्ट्राचे आयुर्वेदमहर्षी श्री. अच्युत बाळकृष्ण पाध्ये गुर्जर यांनी मला वैद्यकीय ग्रंथ प्रसिद्ध करण्यास सतत प्रोत्साहन दिले. त्यांचे आशीर्वाद मी फार फार मोलाचे

समजतो. आज त्यांचे वय ८४ वर्षांचे आहे. आजही त्यांचा उत्साह तरुणांना लाजविणारा आहे. त्यांनी औषधी बाडासाठी आपले अनुभव लिहून पाठविले. स्वतः अनुभवलेली औषधी योजना लिहून दिली. ती मी या ग्रंथाच्या शेवटी परिशिष्ट म्हणून दिलेली आहे. कै. पदेशास्त्रींचे चरित्र लिहून पाठविले. गेली ६२ वर्षे राजापूर, जिल्हा रत्नागिरी, या गावी ते अत्यंत निष्ठेने आयुर्वेदाचे अध्ययन, अध्यापन व संशोधन करीत असतात. आयुर्वेदावर महाराष्ट्रात काय साऱ्या देशात त्यांच्याइतक्या अधिकारवाणीने बोलणारा वा लिहिणारा दुसरा कोणी वैद्य आज नाही. त्यांचा अधिकार एवढा मोठा आहे की, त्यांच्या हाताखाली शिकलेल्या विद्यार्थ्याला देशात कुठेही वैद्यकी करण्यास सरकारने परवानगी दिलेली आहे. त्यांचे गेल्या ६५–७० वर्षांचे अनुभव त्यांनी लिहून काढावे. महाराष्ट्राला त्याचा फार उपयोग होईल. मी त्यांना अनेकदा विनंती केली आहे. आज पुन्हा महाराष्ट्रातील आयुर्वेदप्रेमी वाचकांतर्फे जाहीर विनंती करीत आहे. वाचकांनी पण त्यांना पत्र पाठवून विनंती करावी. त्यांचा पत्ता असा : वैद्यराज अच्युत बाळकृष्ण पाध्ये गुर्जर, मु. पो. राजापूर, जि. रत्नागिरी.

या ग्रंथातील अप्रतिम गुणकारी औषधे वाचून मी आश्चर्याने थक्क झालो; व जेव्हा मी या ग्रंथाच्या सात हजार प्रती काढण्याचे ठरविले तेव्हा लोकांनी मला वेड्यात काढले ! महाराष्ट्रात ग्रंथाची पहिलीच आवृत्ती ७००० प्रतींची काढण्याचे धाडस आजपर्यंत कोणी केलेलं नाही. मला स्वतःला माझ्या वाचकमित्रांच्या प्रेमाची पुरेपूर कल्पना होती. मी योजना जाहीर करताच नोंदणीचा लोंढा वाहू लागला. महाराष्ट्रातील एक गाव असं नव्हतं की जिथल्या चौकात वाचकांनी आपण होऊन माझे पोस्टर्स डकवले नाहीत. पोस्टर्स संपली पण मागणी संपत नव्हती. पणजीपासून नागपूरपर्यंत, भुसावळपासून नांदेडपर्यंत, प्रत्येक गावातील चौका-चौकातून औषधी बाडाची पोस्टर्स सिनेमाच्या पोस्टर्सच्या ऐटीत झळकत होती. यांचे सर्वच्या सर्व श्रेय माझ्या वाचकमित्रांना आहे. असा गाव नव्हता की जिथून ऑर्डर्स येत नव्हत्या. पुण्या-मुंबईत तर नोंदणीने उच्चांक गाठला होता. आज या तुफान प्रेमाच्या वर्षावाने मी भारावून गेलो आहे. तसेच गोंधळून पण गेलो आहे. इतक्या निष्ठेने वाचकांनी माझ्यावर प्रेम केले, त्यांना मी पुरेपूर मोबदला देत आहे की नाही ? या शंकेने मी नेहमीच अस्वस्थ असतो. त्यामुळे माझा प्रत्येक ग्रंथ मला असमाधानकारक वाटतो. याहून चांगले आपण दिले पाहिजे ही टोचणी मला लागून राहते.

मित्रहो ! आजपर्यंत हे जे काही ग्रंथ मी आपणांस दिले त्यात मी खरंच समाधानी नाही. दिले त्याहून काही चांगले देता यावे ही माझी अंतःकरणपूर्वक इच्छा आहे.

या देशातील माणसं बुद्धीने जगातील कोणत्याही देशातील माणसांपेक्षा कमी नाहीत. मग आम्ही इतरांपेक्षा मागे का ?– हा प्रश्न मला नेहमीच अस्वस्थ करतो. या देशातील भयानक दारिद्र्य, आत्यंतिक भाषिक द्वेष, भ्रष्ट राज्यसंस्था, घसरती

नैतिक मूल्ये व वैज्ञानिक दृष्टिकोणाचा संपूर्ण अभाव ग्रंथरूपी विचाराने मला थोडासा का होईना कमी करता आला, या देशातील माणसाची मान जगात कुठेही वावरताना ताठ राहील एवढा स्वाभिमान जागृत करता आला तर त्यातून मिळणारा आनंद मला पुरेसा आहे.

या ग्रंथाचे मुद्रित-शोधनाचे काम अतिशय किचकट व वेळखाऊ होते. ते न कंटाळता अतिशय नेटकेपणाने श्री. निमकर यांनी पुरे केले. माझे स्नेही श्री. बापूसाहेब देव यांनी या ग्रंथाची छपाई वेळेवर व जीव ओतून केली. सुलभ मुद्रणालयातील कामगार बंधू व मला या ग्रंथाच्या प्रकाशनाला मदत करणाऱ्या माझ्या सर्व मित्रांचा मी अंतःकरणपूर्वक आभारी आहे.

श्री गजानन बुक डेपो,
दादर, मुंबई २८

रमेश रघुवंशी

औषधी बाड या ग्रंथात दिलेली तोलण्याची जुनी पद्धत

१२ मासे	=	१ तोळा
९६ गुंजा	=	१ तोळा
५ तोळे	=	१ छटाक
१६ छटाक	=	१ शेर
८० तोळे	=	१ शेर

□ □

तोलण्यासाठी जुनी व नवी परिमाणे

१ मासा	=	१ ग्रॅम
१ तोळा	=	११·६६ ग्रॅम
१ ग्रॅम	=	०·९ तोळा
१०० ग्रॅम	=	१·७ छटाक
१ किलोग्रॅम	=	१·७ शेर
१ किलोग्रॅम	=	२·२ रत्तल
१ शेर	=	·९३ किलोग्रॅम
१ रत्तल	=	४५ किलोग्रॅम
१ पावशेर	=	१॥ कप
१ शेर	=	६ कप

□ □

आयुर्वेदीय औषधांसाठी लागणाऱ्या सर्व वस्तू पुरविणारी मुंबईतील दुकाने

१. जादवजी लल्लूभाई कंपनी, काळबादेवी रोड, मुंबई २
(हे बाहेरगावच्या ऑर्डर्स पण स्वीकारतात)

२. ऑल इंडिया किराणा स्टोअर्स, पायधुणी, मुंबई ३

३. आर्यौषधी भांडार, ठाकुरद्वार रोड, मुंबई २

४. डॉ देव्हारे यांचा दवाखाना, मारुती देवालयासमोर, दादर, मुंबई २८

५. विद्वांस बदर्स, ठाणे.

आमचे वैद्यक शास्त्रावरील अप्रतिम ग्रंथ

१. • वनौषधी गुणादर्श

(१ ते ७ भाग एकत्र)

लेखक : कै. आयुर्वेद महोपाध्याय **शंकर दाजीशास्त्री पदे**

या ग्रंथात एकूण ७०० नित्य परिचयाच्या औषधी वनस्पती दिल्या आहेत. त्यांचे गुण-दोष, औषधी उपयोग, वनस्पती ओळखण्याचे परिपूर्ण ज्ञान सांगून त्यांची सांगड रोगाच्या लक्षणांशी जुळती केली आहे. लक्षात असू द्या, गेल्या पिढी-तील शेकडो वाचकांनी हा ग्रंथ संग्रही ठेवून घरच्या घरी वैद्यकी सुरू केली व स्वार्थ व परमार्थ साधला. तुम्ही पण हा ग्रंथ संग्रही ठेवा व आपले जीवन सुखी करा.

पृष्ठसंख्या ६५०, किंमत २५ रु.

□ □

२. • आर्यभिषक अर्थात हिंदुस्थानचा वैद्यराज

(१ ते ८ भाग एकत्र)

लेखक : आयुर्वेद महोपाध्याय **शंकर दाजीशास्त्री पदे**

या ग्रंथात जवळ जवळ शंभर रोग, ते होण्याची कारणे, त्यांचे पूर्वरूप, विशेष लक्षणे देऊन त्यांवर भरपूर उपचार सांगितले आहेत. त्या रोगावर पथ्य— अपथ्य सांगितले आहे. याशिवाय या ग्रंथातील गोवैद्यक या विभागात गाईची परीक्षा, दूध, तूप, दही, वगैरेचा औषधी उपयोग सांगितला आहे. रसवैद्यक विभागात सोने, रुपे, तांबे, लोह, नाग, पारा, वगैरेची क्रिया, रोगोक्त अनुपाने, पथ्यापथ्य सांगितले आहे. पाकसंग्रह विभागात औषधी पाक, मुरंबे, अवलेह, वगैरे तयार करण्याची माहिती दिली आहे. प्राणिज औषधी या विभागात प्राण्यांच्या हाडांचे औषधी उपयोग कसे करावे हे दिले आहेत. औषधी क्रिया या विभागात औषधालय सुरू करण्यात साधारण जी औषधे पाहिजेत ती कशी तयार करावीत ही माहिती दिली आहे.

पृष्ठसंख्या : ५००, किंमत २५ रुपये

□ □

३. • **अनुभविक औषधांचा संग्रह**

साधुसंत, फकीर, अवलिये, गोसावी, ठाकूर
यांच्याकडून मिळविलेला, गुरुमुखी, प्रासादिक

या ग्रंथात हिंदुस्थानातील साधुसंत, फकीर, अवलिये, गोसावी, ठाकूर, वारली वगैरे लोकांना भेटून त्यांच्याकडून हजारो अनुभविक औषधे मिळविली आहेत. ही औषधे गुरुमुखाने प्राप्त झाली असल्यामुळे त्याला फार महत्त्व प्राप्त झाले आहे.

किंमत ४ रुपये.

□ □

४. • **प्रमुख रोग व त्यावर प्रभावी इलाज**

आयुर्वेदाचार्य **दा. द. जोशी**

महाराष्ट्रातील वयोवृद्ध वैद्य आयुर्वेदाचार्य दा. द. जोशी यांनी आयुर्वेदाच्या साहाय्याने मधुमेह, हृदयविकार, फ्लू, मूतखडा, भगंदर, कॉलरा, जलोदर, मूळव्याध या रोगांवर गेली कित्येक वर्षे सांगली येथे यशस्वी औषधोपचार केलेत; व त्यामुळे शेकडो रोग्यांना गुण आला. ते औषधोपचार सविस्तरपणे या ग्रंथात एकत्र केले आहेत.

किंमत ४ रुपये.

□ □

५. • **आयुर्वेदातील पंचकर्मे**

या ग्रंथात विरेचनाविधी, स्नेह बस्ती, निरुह बस्ती, उत्तर बस्ती, वगैरे बस्तीचा संपूर्ण प्रकार, नस्य विधी, धूम्रपानविधी, गंडूष व कवलविधी (गुळण्या), लेपाचा विधी, रक्तमोक्षणविधी, शिरोवेध प्रकरण, दाहविधी (डागविधी), पोतविधी, क्षारविधी, स्नेहविधी, स्वेदविधी (घाम काढण्याचे प्रकार), या सर्व विधींचे संपूर्ण विवेचन देण्यात आले आहे. ही संपूर्ण माहिती कुठल्याही ग्रंथात आजपर्यंत एकत्र करण्यात आलेली नाही. घरच्या घरी करण्याजोगी ही अपूर्व रोगनिवारणपद्धती तुम्हांला एक वरदानच आहे. (लवकरच प्रसिद्ध होत आहे.)

(आमच्या इतर विषयांच्या ग्रंथांवरील माहितीसाठी
कृपया २५ पैशांची तिकिटे पाठवावी.)

प्रकाशक : **श्रीगजानन बुक डेपो**
कबुतरखाना, दादर, मुंबई २८

अनुक्रमणिका

शंकर दाजीशास्त्री पदे

[आकडे क्रमांकाचे आहेत]

प्रासादिक सिद्ध औषधें (१११)

भाग २ रा

कै. वैद्य परशुराम बाजी पाटील

[आकडे औषध-क्रमांकाचे आहेत.]

ओ

क

ध

न

भ

म

श

ष

स

ह

क्ष

श्री. अच्युत बाळकृष्ण पाध्ये गुर्जर यांचे बाड

[आकडे औषध क्रमांकाचे आहेत.]

कुपिस्थ रसायनसंग्रह

रसायनें

कै. आयुर्वेदमहोपाध्याय शंकर दाजीशास्त्री पदे



जन्म ३० मार्च १८६७]

[मृत्यू ३० मार्च १९०९

यद् यद् विभूति मत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेववा ।
तत्तदेवावगच्छत्वं मम तेजोंश संभवम् ॥
भवोहि लोकाभ्युदयाय तादृशां ॥

निखिल भारतीय आयुर्वेद महामंडळ, वैद्य संमेलन व आयुर्वेद विद्यापीठ या संस्थांचे आद्य संस्थापक व प्रवर्तक वनौषधि गुणादर्श (भाग १ ते ७ एकत्र), आर्यभिषक् अर्थात हिंदुस्थानचा वैद्यराज (भाग १ ते ८ एकत्र) या ग्रंथांचे लेखक, चरक, सुश्रुत वगैरे प्राचीन ग्रंथांचे भाषांतरकार, व आयुर्वेदाचे अध्यापक, स्वनामधन्य प्रातःस्मरणीय स्वर्गीय आयुर्वेद महोपाध्याय शंकर दाजीशास्त्री पदे यांस दिवंगत होऊन पाच तपांहून जास्त काळ लोटला आहे. त्यामुळे आजच्या तरुण पिढीला त्यांच्यासंबंधाने फारशी माहिती असणे शक्य नाही. शास्त्रीबोवांबरोबर काम केलेली, किंबहुना त्यांचा प्रत्यक्ष परिचय असलेली मंडळीही बहुतेक निघून गेली आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या सर्वांगीण कार्याचे महत्त्व पटवून देणारे एखादे चरित्र अवश्य पाहिजे. ही जाणीव असूनही तत्कालीन साहित्यादी सामग्री मिळणे कठीण झाले आहे. त्यामुळे ते कार्य अपुरेच राहिले आहे. शास्त्रीबोवांच्या अंतिम क्षणी त्यांच्याजवळ राहून त्यांच्या कार्याचा भार वाहण्याचे आश्वासन देऊन यथाशक्ती यावज्जीव ते कार्य चालविणारे पंडित जगन्नाथप्रसाद शुक्ल यांस दिवंगत होऊन पाच वर्षांचा काळ लोटला आहे. शास्त्रीबोवांचे सविस्तर चरित्र लिहिण्यास तेच समर्थ होते व कार्य करण्याचे त्यांच्या मनात होते. पण ते घडले नाही, हे आम्हांस माहीत आहे. अशा परिस्थितीत आयुर्वेदाच्या उपेक्षित काळात त्याचे महत्त्व स्वतः जाणून इतरांस पटवून देण्याचे महनीय कार्य करणाऱ्या आयुर्वेदोद्धारक पदे शास्त्र्यांची शक्य ती माहिती नवीन पिढीस मिळणे अवश्य आहे. या जाणिवेने शास्त्रीबोवांच्या ग्रंथांचे प्रकाशक श्री. रमेश रघुवंशी यांनी विनंती केल्यावरून शास्त्रीबोवांशी आमचा प्रत्यक्ष संबंध असण्याचा दीर्घकाळ निघून गेला असताही आपल्या या वयात स्वतःस माहीत व स्मरत असलेली माहिती इतरांसाठी लिहावी या हेतूने चरित्रविषयक चार शब्द लिहिण्याचे योजिले आहे.

पंडित शंकरशास्त्री पदे यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील नारायणगाव नावाच्या गावी एका वेदशास्त्रसंपन्न पदे उपनामक घराण्यात झाला. पेशव्यांच्या दरबारात या घराण्यातील वैदिक पुरुषाकडे ‘ पदपाठ ’ पारायणाचा वंशपरंपरागत अधिकार होता व त्याबद्दल त्यांस राजाश्रय होता. या त्यांच्या व्यवसायामुळे त्यांस, ‘ पदे ’ हे उपनाव प्राप्त झाले. या घराण्यात अनेक वैदिक, शास्त्री, याज्ञिक व ज्योतिष-विद्या-पारंगत पुरुष झाले. शास्त्रीबुवांचे चुलते हे महान वैदिक होते, व वडील तर ज्योतिषाचे प्रकांड पंडित होते. पदे हे महाराष्ट्रीय शुक्ल यजुर्वेदीय देशस्थ ब्राह्मण होते. पुढे मुंबईच्या वाढत्या विकासाबरोबरच आपल्या कर्तृत्वासही योग्य स्थान

मिळेल या हेतूने जी अनेक ब्राह्मण घराणी मुंबईत येऊन स्थायिक झाली त्यांत पदे यांचे घराणेही होते.

शास्त्रीबुवांच्या निरनिराळ्या क्षेत्रांतील अनेकविध कार्यांचे वर्णन करण्याचे हे स्थळ नव्हे, ही सर्व कार्ये त्यांची आनुषंगिकच मानावी लागतील. ईश्वरी संकेता-प्रमाणे त्यांचे जन्मसिद्ध कार्य आयुर्वेदोद्धार हे होय. त्यांचा वैद्य-व्यवसायाकडे कल वळण्यात त्यांच्या परमपूज्य मातोश्रींचे परंपरागत वैद्यकीचे ज्ञानच कारणीभूत झाले. शास्त्रीबुवांच्या मातोश्रींच्या माहेरी आयुर्वेदाचे अध्ययन, अध्यापन व चिकित्सा-व्यवसाय सुरू होता, व तेथील सहवासाने बाळपणापासूनच त्यांस औषधोपचारांबद्दल उत्कृष्ट अनुभवजन्य ज्ञान होते. यामुळे मुंबईतील वास्तव्यात शेजारपाजारच्या लोकांचे व विशेषतः लहान मुले व स्त्रिया यांच्या विशेष रोगांत अगदी स्वल्प खर्चात परोपकार वृत्तीने त्या चिकित्सा करीत. यामुळे समाजात त्यांच्याविषयी अत्यंत पूज्यभाव उत्पन्न होत असे. त्यांच्या या व्यवसायात शास्त्रीबुवा स्वतः मदत करीत असत. तेव्हाच त्या व्यवसायात स्वार्थाबरोबर परोपकारही साधतो, समाजात मान्यता मिळते ही गोष्ट कुशाग्र बुद्धीच्या शास्त्रीबुवांच्या लक्षात येऊन, त्यांनी यापुढे आपण वैद्यक विषयाचा अभ्यास करण्याचे निश्चित केले.

त्यांच्या घराजवळ भानुपंत कुलकर्णी नावाचे एक वैद्य राहात असत. त्यांच्या-कडून वैद्यशास्त्राचे प्राथमिक ज्ञान शास्त्रीबुवांनी आत्मसात केले. भानुपंत कुलकर्णी हे जरी फार मोठे विद्वान नव्हते तरी रोगनिदान, चिकित्सा व प्रत्यक्ष औषधी निर्माण करणे या विषयांतील त्यांचे ज्ञान उत्कृष्ट होते. त्याचा फायदा शास्त्रीबुवांना मिळाला. आपल्या मुलाची वैद्यक शिकण्याची तीव्र इच्छा पाहून वडिलांनी शास्त्री-बुवांच्या आयुर्वेदाध्ययनास परवानगी दिली. कालांतराने गुरुसहवास व संहिताग्रंथाचे खोल अध्ययन व मननामुळे शास्त्रीबोवांचे या विषयातील अध्ययन पूर्ण झाले. या-प्रमाणे अध्ययन व नंतर अध्यापनाचे कार्य सुरू असताच तत्कालीन वैद्यवर्गाच्या परिस्थितीचे सूक्ष्म अवलोकन करून ते काही कार्यांची मनोमन योजना करू लागले.

शास्त्रीबुवांनी वयाच्या सोळाव्या वर्षीच 'आर्यभिषक्' व 'राजवैद्य' ही मासिके सुरू केली व त्यांच्याद्वारा वैद्यवर्गात जागृती उत्पन्न करण्याचा संकल्प सोडला. या मासिकांतून आयुर्वेदाचे भूतकाळचे उज्ज्वल स्वरूप आणि वर्तमानकाळात दयनीय अवस्था यांचे यथार्थ स्वरूप दाखवून यातूनच प्राचीन काळचे वैभव प्राप्त होण्यासाठी वैद्यवर्गाने काय केले पाहिजे याचे सप्रमाण सर्वांगीण विवेचन सुरू केले.

वैद्य प्रभूराम जीवनराम यांनी एक आपले आयुर्वेद विद्यालय व हॉस्पिटल १८९८ साली स्थापन केले. या विद्यालयातही शास्त्रीबुवा व त्यांचे सहकारी शिकविण्याचे काम करीत असत.

१९०६ साली नाशिक येथे त्यांनी आयुर्वेद महामंडळाची स्थापना केली, व तेथेच १९०७ साली निखिल भारतीय आयुर्वेद संमेलन भरविले. आयुर्वेद संमे-

लनाचे दुसरे संमेलन पनवेल येथे भरले व तिसरे वैद्य महासंमेलन काशी येथे भरविण्याचे ठरविले. यापुढे केवळ निरीक्षक व प्रचारक म्हणून कार्य करावे आणि संमेलनाचे कार्य येथूनच सर्वव्यापी होऊन आयुर्वेदाचे उज्ज्वल स्वरूप जगापुढे यावे अशी इच्छा धरून शास्त्रीबुवांचे प्रयत्न सुरू झाले. यापुढे आणखी १०–१५ वर्षे शास्त्री-बुवांस आयुष्य लाभते तर त्यांच्या इच्छेप्रमाणे आयुर्वेदाचे अपूर्व वैभव जगास दिसले असते. पण ईश्वरी संकेत तसा नव्हता. त्यामुळे प्रयाग येथेच शास्त्रीबुवांस सन्निपात ज्वराची भावना उत्पन्न झाली. अनेक उपाय करूनही उपयोग न होता १८३१ चैत्र शुद्ध श्रीरामनवमीचे पवित्र दिवशी ३०-३-१९०९ प्रयागच्या पुण्य क्षेत्रात शास्त्री-बुवांस देवाज्ञा झाली. आयुर्वेदाच्या कार्याशी शास्त्रीबुवा इतके समरस झाले होते की, शेवटच्या सान्निपातिक भ्रमावस्थेमध्येसुद्धा ते जे काही बोलत ते संमेलन, विद्यापीठ, राष्ट्रैक्यता, व हिंदी भाषेचा पुरस्कार यांविषयींचे होते. अशा रीतीने आपले ४२ वर्षांचे अवघे आयुष्य राष्ट्रसेवा व आयुर्वेदोद्धार यांस समर्पून शास्त्रीबुवा धन्य झाले !

त्यांचे खाजगी वर्तन अत्यंत निष्कलंक व शुद्ध होते हे सर्वश्रुत होते. शास्त्रीबुवा आपल्या कुटुंबातील सर्व मंडळींची ज्या तत्परतेने काळजी घेत त्याप्रमाणेच स्नेहीसोबती, विद्यार्थी यांचीही घेत. स्वकीय म्हटलेल्या कोणत्याही व्यक्तीला कसलीही न्यूनता भासू नये यासाठी शास्त्रीबोवा नेहमीच प्रयत्नशील असत. थोडक्यात सांगावयाचे तर त्यांचे संपूर्ण आयुष्यच प्राचीन धर्मशास्त्र व आयुर्वेदशास्त्रात वर्णन केलेल्या आदर्श गृहस्थाप्रमाणे होते; आणि त्याप्रमाणेच आपल्या अनुयायांनी वागावे, विशेषत: वैद्यांनी वागावे, असे ते नेहमी म्हणत असत. आता या लेखाची पूर्णता त्यांच्या नेहमीच्या आवडत्या श्लोकाने करीत आहोत :

भिषजां साधु वृत्तानां भद्रमागमशालिनां ।
अभ्यस्त कर्मणां भद्रं भद्रं भद्राभिलाषिणां ॥

मु. पो. राजापूर,
जि. रत्नागिरी
१५-९-१९७४

अच्युत बाळकृष्णशास्त्री पाध्ये गुर्जर

औषधी बाड

भाग १ ला

॥ श्री ॥

औषधी बाड

परिभाषा

१. **औषधीयुक्तायुक्तविचार :** सर्व कार्यांत नूतन औषधांचीच योजना करावी. परंतु वावडिंग, गूळ, धने, मध, तूप, हे पदार्थ पुराणे (एका वर्षानंतरचे) असावे. गुळवेल, कुड्याची साल, अडुळसा, कोहळा, शतावरी, आसंध, कोरांटा, बडीशेप, चांदवेल हीं नऊ औषधें सर्वकाळ ओलींच घ्यावीं. ओलीं म्हणून दुप्पट घेऊं नयेत. इतर औषधें सुकीं असून नवीं घ्यावीं. व ओलीं असतां दुप्पट घ्यावीं. ज्या प्रयोगांत काळ सांगितला नाहीं तेथें प्रातःकाळ घ्यावा. ज्या औषधींचें अंग सांगितलें नाहीं, तिचें मूळ घ्यावें व ज्या प्रयोगीं भाग सांगितला नाहीं तेथें समभाग घ्यावें. ज्या प्रयोगांत एक औषध दोन वेळ सांगितलें असेल तेथें दुप्पट घ्यावें. चूर्णें, तेल, तूप आदिकरून स्नेहपदार्थ व अवलेह यांमध्यें बहुधा श्वेतचंदन योजावा. काढे व लेप यांत रक्तचंदन योजावा. एक वर्षानंतर औषधाचें तेज व गुण कमी होतात, त्यांत चूर्ण दोन महिन्यांनीं हीनवीर्य होतें. तूप-तेलादिक हीं चार महिन्यांनीं हीनवीर्य होतात. आसवें आणि सोनें आदिकरून सर्व धातूंचीं भस्में, रसायनें हीं जितकीं जुनीं होतात तितका गुण विशेष होतो. तूप व मध हीं समान घेऊं नयेत; घेतलीं तर विषतुल्य होतात. शाका, जांभळें व मद्य यांशीं दूध प्यालें असतां तें सर्पासारखें मनुष्यास मारतें. फणसाचे गरे खाऊन त्याजवर तांबूल भक्षिलें असतां तें विषवत् होतें. दूध काढल्यापासून दहा घटिका झाल्या असतां तें विरस होतें व तेंच दूध वीस घटकांनंतर विषासारखें होऊन प्राशन करणारास फार उपद्रव करितें. तापविलेलें दूध वीस घटकांपर्यंत हितावह होतें. रात्रीचें दूध दिवसास पिऊं नये.

२. **औषधी आणावयाचा प्रकार :** औषधी आणावयास प्रातःकाळीं जावें. उत्तम जाग्यावरील वनस्पती पाहून तिचें मूळ अथवा साल जें घेणें असेल तें घ्यावें. वारुळावरील, वाईट जाग्यावरील, जलमय जाग्याच्या आश्रयेंकरून असते ती, स्मशानांत होणारी, ज्या जागेवर तृण होत नाहीं त्या जाग्यावरची, चव्हाट्यावरची, कीड लागलेली, अग्नीनें जळालेली, थंडीनें करपलेली, अशा प्रकारची वनस्पति आणूं नये. आश्विन, कार्तिक या महिन्यांत सर्व औषधी रसभरित होतात, यास्तव सर्व कार्यांकरितां त्या दोन महिन्यांत वनस्पति आणून ठेवाव्या. रेच होण्याविषयीं व वांति

होण्याविषयीं औषधी वैशाख व ज्येष्ठ या दोन महिन्यांत आणाव्या, ज्या वृक्षाचें मूळ मोठें आहे त्या वृक्षाच्या मुळाची साल घ्यावी. ज्या वनस्पतीचें मूळ लहान आहे तिचें मूळच घ्यावें.

३. **स्वरसादि पांच प्रकारचे काढे** : स्वरस म्हणजे अंगरस.— चांगली ओली वनस्पति आणून त्याच वेळेस कुटून फडक्यांत घालून पिळून जो रस निघतो तो. दुसरा प्रकार.— सुकलेलें औषध सोळा तोळे आणून चूर्ण करून त्याचे दुप्पट पाणी मडक्यांत घालून त्यांत तें चूर्ण आठ प्रहर भिजत घालावें, नंतर दुसरे दिवशीं कुसकरून तें पाणी घ्यावें. तिसरा प्रकार.— सुकलेली वनस्पति आणून त्यांत आठपट पाणी घालून चवथा हिस्सा पाणी राहीतोंपावेतों काढा करून घ्यावा. तो अंगरस जड आहे म्हणून घेणें तर दोन तोळे घ्यावा. व रात्रीस भिजत घालून त्याचा सकाळीं काढा केला असतां तो ४ तोळे घ्यावा. मध, साखर, गूळ, सर्व क्षार, जिरें, तूप, तेल व चूर्णादिक हे अंगरसांत घालणें तर अर्धतोळा घालावें.

४. **काढ्याचा प्रकार** : काढ्यांतील सर्व औषधें मिळून नित्य ४ तोळे घेऊन कुटावीं; त्यांत ६४ तोळे पाणी घालून मंदाग्नीनें मडक्यांत अगर भांड्यांत शिजवावीं. नंतर अष्टमांश म्हणजे ८ तोळे उरवून कोमट आहे तोंच काढा घ्यावा. लहान मुलास काढा तीन माशांपासून एक तोळ्यापर्यंत पाजावा. काढ्यांत दूध, तूप, गूळ, तेल, चूर्ण हे पदार्थ घालणें झाल्यास १० मासे घालावे.

५. **चूर्ण** : शुष्क म्हणजे वाळलेलें द्रव्य घेऊन कुटून गाळावें. त्यास चूर्ण म्हणतात. तें मोठ्या मनुष्यास ६ माशांपासून १ तोळ्यापर्यंत व लहान मुलास १ माशापासून ३ माशांपर्यंत द्यावें. चूर्णांत गूळ समभाग घालावा. साखर दुप्पट घालावी. घृतादिक द्रव्याशीं चूर्ण चाटणें झाल्यास चूर्णाच्या दुप्पट घृतादिक असावें. एखाद्या चूर्णास निंबाच्या रसाची वगैरे भावना (पुट) देणें झाल्यास जितक्या द्रव्यानें तें सर्व चूर्ण भिजेल इतकें असावें.

६. **वटिका (गोळ्या)** : साखरेंत करणें तर चूर्णाच्या चौपट साखरेचा पाक करून त्यांत चूर्ण टाकून कराव्या. गुळांत करणें तर दुप्पट गूळ घ्यावा. मध व गुग्गुळ यांत करणें तर ते समभाग घेऊन कराव्या. त्यांचें प्रमाण १ तोळा जाणावें.

७. **फांट करावयाचा प्रकार** : ४ तोळे औषध आणून चांगलें कुटून ठेवावें एका मडक्यांत १६ तोळे पाणी घालून चांगलें उष्ण झाल्यावर त्यांत तें औषध टाकून चांगलें कढवून गाळून घ्यावें. हा फांट घेणें असेल तर ८ तोळे घ्यावा.

८. **हिम करावयाचा प्रकार** : ४ तोळे औषध आणून कुटून मडक्यात २४ तोळे पाणी घालून त्यांत तें औषध मिळवून रात्रीस भिजत घालावें व सकाळीं गाळून घ्यावें. याला हिम व शीतकषाय म्हणतात. त्याचें प्यावयाचें मान फांटासारखेंच जाणावें.

९. **कल्काचा प्रकार :** ओलें औषध आणून चटणीसारखें बारीक वांटावें व सुकें असल्यास पाणी घालून वांटावें. त्याचें घ्यावयाचें मान १० मासे. कल्कांत मध, तूप, तेल हीं घालणें तर कल्काचे दुप्पट घालावीं. साखर समान घालावी. दूध, पाणी इत्यादि पातळ पदार्थ चौपट घालावे.

१०. **औषधीसेवनकाळ :** काढे, अंगरस चूर्णें वगैरे प्रातःकाळीं, अरुचि व अग्निमांद्य असतां भोजनाबरोबर, स्वरभंगास रात्रीं भोजनांत, धातुपुष्टीस प्रातःकाळीं व अस्तमानीं भोजनानंतर, कर्णांत तैलादिक घालावें तें रात्रौ निजतेवेळीं; काढे, चूर्णें, रसायनें वगैरे औषधें देण्याचीं तें ३, ७, १४, २१, किंवा ४२ दिवसपर्यंत. एक अथवा दोही सांज काढा अथवा निकाढा देणें. त्याचा चांगला विचार करून व रोगाचे मान चांगलें ध्यानांत आणून त्याप्रमाणें चालू करावें.

परीक्षा प्रकरण

नाडीपरीक्षा : प्रातःकाळीं उठून घटकाभर जो स्वस्थ बसलेला त्याची नाडी पहावी, म्हणजे चांगली समजते. पुरुषाचा उजवा हात व स्त्रीचा डावा हात लांब सरळ करून, आंगठ्याच्या मुळाजवळ तर्जनी, मध्यमा, अनामिका हीं बोटें ठेवून वात पित्त, कफ हे दोष अनुक्रमानें जाणावे.

बांकडी व सर्प आणि जळू यांचे चालीप्रमाणें जी चालते ती वातनाडी. बेडूक कावळा व चिमणी यांच्यासारखी त्वरेनें चालते ती पित्तनाडी. हंस, पारवे व मोर यांच्यासारखी मंद मंद चालते ती कफनाडी. लावा व तित्तिर पक्ष्याचे चालीप्रमाणें चालते ती सन्निपातनाडी. हळू व फिरून झरझर चालूं लागते ती द्विदोषांची. जी स्वस्थानांतून सुटली ती, राहून राहून चालते ती, फार क्षीण, व फार थंड अशा चार प्रकारच्या नाड्या प्राणनाश करितात.

सामान्य ज्वराचा कोप झाला असतां नाडी उष्ण असून मोठ्या वेगानें चालते. चिंतेनें व भयानें क्षीण चालते. रक्ताचा कोप झाला असतां थोडी उष्ण असून पाषाणासारखी जड होते व आमयुक्त असतां फार जड होते. गर्भिणीची नाडी गंभीर, पुष्ट व हलकी चालते. मंदाग्नि, क्षीणधातु, निजलेला, आळशी, सुखी, व निजून उठलेला यांची स्थिर चालते. भूक लागली म्हणजे नाडी हलकी व वेगानें चालते. मळमूत्रानें व्याप्त असतां ज्वराप्रमाणें चालते. तुटक तुटक, अति त्वरेनें, काष्ठाप्रमाणें कठीण, स्थिर, वांकडी, क्षणांत हळू क्षणांत जलद, अति उष्ण, मोठा वेग असून ज्वरानें व्याप्त, गुंतत चालून स्वस्थळ सोडिते, क्षणांत स्थानावर येते व अकस्मात् कोपरापर्यंत जाते. या सर्व नाड्या प्राणान्तींच्या जाणाव्या.

२. **मूत्रपरीक्षा :** कांचेच्या अथवा कांशाच्या पात्रांत पहांटेस रोग्याचें मूत्र पहिली व शेवटली धार टाकून मधलेंच धरावें. त्यांत तेलाचा बिंदु गवताच्या काडीनें टाकावा. बिंदु टाकतांच पसरला तर साध्य, बिंदु तसाच राहिला तर कष्टसाध्य, तसाच तळास जाऊन वर आला व छिद्र दिसलें, किंवा मूत्र काळें, तांबुस, अथवा बिंदु तळास जाऊन बसला, किंवा बिंदु पसरून मूत्राबरोबर मिळून गेला तर रोगी असाध्य जाणावा. वाताधिक्यांत बिंदु टाकतांच पसरतो, व मूत्र रक्तवर्ण असतें. पित्ताधिक्यांत तैलबिंदु टाकतांच बुडबुडे येतात, व मूत्र पीतवर्ण व उष्ण असतें. कफाधिक्यांत मूत्र पांढरें दिसतें. सन्निपाताचें मिश्रवर्ण. धातु व इंद्रियरोग यांचें तेलासारखें. त्रिदोषाचें काळसर व मिश्रवर्ण असतें. तैलबिंदु टाकतांच मनुष्य, सर्प, वानर, विंचू व मांजर यांच्यासारखी आकृति झाली किंवा दाक्षिण, आग्नेय, नैर्ऋत्य, वायव्य व ईशान्य या दिशांकडे बिंदु वाढल्यास रोगी असाध्य जाणावा. पूर्व पाश्चिम, व उत्तर या दिशांस बिंदु वाढला तर रोगी वांचेल. पश्चिम दिशेस बिंदु वाढून सर्पाकृति झाली तर उदर रोग जाणावा. मूत्र, तुपाच्या कण्यासारखें झालें असतां जलोदर जाणावें.

३. **मलपरीक्षा :** वायूचा कोप झाला असतां मल फेनयुक्त, रूक्ष व धूम्रवर्ण व ज्याच्या शिंतड्या म्हणजे चोथापाणी असा असतो. पित्ताचा कोप झाला असतां हिरवट पिंवळा, गंधियुक्त, शिथिल, उष्ण असा असतो. कफाचा कोप झाला असतां श्वेतवर्ण व कांहीं शुष्क आणि कांहीं आर्द्र व स्निग्ध असा असतो. वातकफाचा आर्द्र व श्यामवर्ण, बुळबुळीत शिंतड्यांनीं युक्त असा असतो. वातपित्ताचा पिंवळट काळसर आर्द्र व आंत गुठळ्या असा असतो. पित्तकफाचा पिंवळट पांडुरवर्ण असा असतो. त्रिदोषाचा श्वेत, पिंवळा, काळसर, शिथिल व आंत गुठळ्या असा असतो. अजीर्णाचा दुर्गंधियुक्त असून शिथिल असतो. जीर्णज्वराचा शिंतड्यांयुक्त, जलोदराचा मोठा दुर्गंधी व श्वेतवर्ण, क्षयाचा श्यामवर्ण, रक्तकोपाचा पातळ व रक्तवर्ण, प्राणान्तींचा दुर्गंधी व तांबूस असून किंचित् श्वेतवर्ण व मांसासारिखा आणि श्यामवर्ण असा असतो.

४. **जिव्हापरीक्षा :** वायूचा कोप असतां जिव्हा खरखरीत, फुटलेली व पिंवळट असते. पित्ताची आरक्त असून त्यांतच किंचित् श्यामता असते. कफाची श्वेतवर्ण, आर्द्र व बुळबुळीत असते. त्रिदोषाची काळी, कांटे आलेली शुष्क असते. अरुचि व अतिसाराची मधुरवर्ण. प्रमेह व संग्रहणी यांची धूम्रवर्ण, उष्ण व कपिशवर्ण. विस्फोट रोगाची खरखरीत कांट्यासारखी असून आंतून पाणी गळतें. मरणकाळची खरखरीत असून आंत ओढलेली, फेसयुक्त, कठीण, लांकडासारखी, चलनवलनरहित अशी असते.

५. **नेत्रपरीक्षा :** वायूचा कोप असतां डोळे निस्तेज, धूम्रवर्ण, दाहयुक्त, चंचल व उग्र असतात. पित्ताचे पिंवळे, तांबूसवर्ण, दाहयुक्त व दिवा पाहण्यास असमर्थ. कफाचे पांढरे, निस्तेज, स्रावयुक्त व चिकट. त्रिदोषाचे लाल असून किंचित् काळे व थिजल्याप्रमाणें दिसतात. ज्याचा एक डोळा थिजल्यासारखा असून वटारलेला उघडा

असतो व दुसरा मिटलेला असतो, तो रोगी एक प्रहरांत मरेल. डोळ्यांतील बाहुली भ्रमिष्ट होऊन नेत्र थिजल्यासारखे दिसतात तो रोगी एक दिवसांत मरेल.

६. **रूपपरीक्षा :** प्रातःकाळीं रोग्याजवळ जाऊन त्याचें रूप पहावें, तें तेजोहीन, विचित्र व श्यामवर्ण असलें तर तो व्याधि वातजन्य जाणावा. पीतवर्ण, कलाहीन मुख व किंचित् सुजीर असलें तर पित्तप्रकोप जाणावा, कलाहीन मुख असून तेलस दिसतें व डोळे विलक्षण चिकटलेले अशा लक्षणानें कफप्रकोप जाणावा; व डोळ्यानें पाहिलें असतां जसे रोग स्पष्ट दिसतील तशीं नांवें ठेवावीं. प्याहा, काबीळ, ग्रंथि, नळवायु, वायगोळा, डबा-जंतु व कठोरगुल्म हे रोग हातानें दाबून पाहून अमुक रोग आहे असा निश्चय करावा.

७. **शब्दपरीक्षा :** वायूचा कोप असतां कंठांतून शब्द निघतो तो सौम्य म्हणजे हलका निघतो. पित्ताचा कोप असतां शब्द स्पष्ट निघतो. कफाचा कोप असतां शब्द जड व घर्वरयुक्त निघतो. द्विदोषांचा व त्रिदोषांचा कोप असतां शब्द द्विदोषांचे व त्रिदोषांचे लक्षणांनीं युक्त असतो असें जाणावें.

८. **स्पर्शपरीक्षा :** वायूचा कोप असतां शरीराचा स्पर्श, साग व पळस यांच्या पानासारखा खरखरीत असून शीतल असतो. पित्ताचा कोप असतां स्पर्श उष्ण असतो. कफाचा कोप असतां शीतल असून आर्द्र असतो. द्विदोषांचा व त्रिदोषांचा कोप असतां द्विदोषांच्या व त्रिदोषांच्या लक्षणेंकरून युक्त असतो. ज्याच्या शरीराचा स्पर्श क्षणांत शीत व क्षणांत अतितप्त व रोगेंकरून व्याप्त असा आहे तो रोगी असाध्य जाणावा.

९. **साध्यलक्षण :** मुख तेजस्वी, नाडी सम, स्वर चांगला, मस्तकास कंडू, चिंतारहित मन, अग्नि प्रदीप्त, सुगंधी पदार्थांची इच्छा, शिंका येणें, हीं लक्षणें असतां रोगी निःसंशय वांचेल.

१०. **असाध्यलक्षण :** तीक्ष्णज्वर, बडबड करणें, डोळे व नखें लाल, अथवा पांढरीं, हात पाय थंड, मुख निस्तेज, कंठावरोध, उचकी, शरीर भयंकर, मूर्च्छा व भ्रम हीं लक्षणें असतां रोगी असाध्य जाणावा. ज्याचें नाक वांकडें झालें व नाकाचे सूर बंद होऊन तोंडांतून पाणी चालतें तर तो एक दिवसानें मरेल. ज्याच्या डाव्या हाताची नाडी चालतां चालतां तुटते, व डावा सूर अगदींच बंद होतो तो तात्काल मरेल.

|| श्रीशंकर ||

औषधी प्रकरण

१. **संग्रहणीस :** गाईचें निरसें दूध एक शेर घेऊन, त्यांत एका निंबाचा रस पिळून द्यावें आणि वेग बहुत होऊं लागला, तर त्यांतच दोन पैसेभार पिठीसाखर घालावी. असें तीन दिवस द्यावें. **उतार**– दहींभात.

२. **हगवणीस :** दाळिंबाच्या गोळ्या. – पक्कें दाळिंब घेऊन त्यास भोंक पाडावें व त्यांत भांग १ तोळा व अफू मासे ६ भरावी. व तें कणकीनें लेपित करून अग्नींत घालून उकडून काढावें. नंतर कणीक काढून टाकावी, व दाळिंबाचा खल करून चण्यायेवढाल्या गोळ्या कराव्या. एक गोळी प्रातःकाळीं ताजूक पाण्याबरोबर घ्यावी. दाह होऊं लागल्यास **उतार**– दहींभात. अथवा तांदुळांचें धुवण, किंवा शिरगोळा पाण्यांत उगाळून घेणें.

३. **हागवणीस :** तेलिया सुहागी (सवागी) मासे ३, कापूर मासे ३, अफू १ मासा. सुहागीची लाही करून तिन्ही औषधें एकत्र खलावीं. व त्याच्या पाण्यांत सात गोळ्या बांधाव्या. एक प्रातःकाळीं व एक सायंकाळीं. घ्यावी. तीन दिवसांत गुण.

४. **ज्वरशांति** होण्यास खालील श्लोक जपावा:—

" कुबेरं ते मुखं रौद्रं, नंदिनं नंदिमावह ॥
ज्वरं मृत्युभयं घोरं, ज्वरं नाशयते ज्वरम् ॥ १ ॥ "

५. **प्रमेहास :** बिबवे १ तोळा, खुरासनी ओंवा १ तोळा, तिवर्षी (तीन वर्षांचा) गूळ १ तोळा, यांच्या सात गोळ्या बांधून, प्रति दिवशीं एक घेणें. **उतार**– सातवे दिवशीं चांगली मुगांची दाळ करून व तींत घालावयाचा तो मसाला घालून, तिची वाफ अंगावर घ्यावी. व झांकून ठेवून सायंकाळीं भक्षावी. गुण येईल.

६. **श्वास, खोकला, कफ** यांस : कायफळ, भद्रमोथा, धने, भारंगी, काकडशिंगी, पित्तपापडा, सुंठ, वेखंड, हरीतकी, देवदार, रोहिशाचीं फुलें, हीं प्रत्येक दोन पैसे भार घेऊन, त्याचे सात भाग करणें. **प्रति** भागाचा दररोज काढा करून घेणें. काढ्याची कृतिः– पक्कें शेर पाणी ठेवून चार पैसे भार उरल्यावर घेणें. असाच रात्रीं निकाढा घेणें. **पथ्य**– ऊन पाणी पिणें. वावडें, आंबट, तिखट, तेल, तूप, गूळ खाऊं नये.

७. **कान दुखत असल्यास :** (१) निवडुंगाचा रस कानांत घालावा. कानशूळ जाईल. (२) मेंढीचें मूत्र, सैंधव, निंबाचीं पानें, हीं तिळाच्या तेलांत कढवून कानांत घालावें. कानशूळ बंद होईल. **सू०** चीक उतला तर लोणी किंवा तूप लावावें. अगर निवडुंग फुपाट्यांत भाजून त्याचा रस घालावा म्हणजे उतण्याची भीति नाहीं.

८. **कानांतून पू वाहात असल्यास :** (१) भुईनेत, समुद्रफेण, मोराचा पंख, अर्कचिंच, समभाग घेऊन खलावें. निंबाचे रसांत उष्ण करून ठेवणें. निंबाचा रस व उष्णोदकानें कान शोधून तें औषध कानांत घालावें. कोरडा होईल. (२) गाईचें लोणी तीन पैसेभार घेऊन अग्नीवर ठेवावें. व त्यांत कचोरा पैभार, व कापूर तोळा १ वांटून घालणें, व तीन घटका शिजूं द्यावें. मग उतरून वस्त्रगाळ करून कानांत घालावें आणि वर पिकले निंबाचा रस पिळावा.

९. **खोकल्यास :** समग्र कफ पडण्यास. (१) लसूण भाग एक, पोटिया, आकुल भाग १, मोहरी भाग १, समभाग चूर्ण करून गोळ्या कराव्या. व तिवर्षा गूळ ३ तोळे, व गाईचें दूध १ शेर घेऊन त्यांत गोळी द्यावी. व वर विड्यांचीं पानें पंचवीस खावीं. चार घटका वाट पहावी. मग दुसरी गोळी याच प्रकारानें द्यावी व तशींच वर पानें द्यावीं. कफाची पिशवी पडेल. न पडली तर कांहीं वाट पाहून तिसरी गोळी त्याच प्रकारानें देऊन पानें खावीं. पिशवी पडून रोगी रोगमुक्त होईल. **पथ्य**— तूपभात देणें. (२) पिंपळी, हिरडा, सुंठ, नागरमोथा, मिरें, हीं समभाग घेणें, व ओंवा तोळे ४, तिवर्षा गूळ तोळे १२, मिरें व ओंवा सांवरीच्या रसांत रांधावा. नंतर सर्व एकत्र खलून पांच टांकांची एक एक गोळी बांधावी. व सकाळीं एक गोळी शिळ्या पाण्याबरोबर घ्यावी. **पथ्य**— तूपभात खाणें. (३) रुचिक तोळे १२, ओंवा तोळे १२, सैंदेलोण तोळे १२, मिरीं तोळे ६, सर्व मडक्यांत भरून व तोंड कपड्यानें चांगलें बांधून १५ दिवस उकरड्यांत पुरून ठेवणें. नंतर काढल्यावर सर्व सकत्र करून गोळ्या बांधणें व शक्तीप्रमाणें देणें. **पथ्य**— तूपभात खाणें.

१०. **नळास :** वडाचीं पिकलीं पानें आणून तुकडे तुकडे करून, त्यांत पक्कें शेर पाणी घालून काढा करावा. अदपाव पाणी राहिलें म्हणजे उतरून व कढतेवेळीं अदपाव गूळ टाकून, तो काढा घेणें. याप्रमाणें काढा तीन दिवस घेणें. **पथ्य**— आंबट, तिखट, तेलकट खाऊं नये.

११. भूत, प्रेत, पिशाचादि पीडेवर खालील मंत्र म्हणून विभूति द्यावी——

" नमोआदेशगुरूकूचेतघोडेचेतपलाणजीसकुचय्यामेहमदा परिछ्डकरकाहागयेराग्याकेपिडेगयेहाडहाडमेसोकाढुनसनसमेसो काढुरुमरुममशोकाढुमेराकल्यातोनहींकल्यानरसींघवीरहाणमंतजी काल्यायोपिंडनहींछोडेतोचितोडमाराकोपापहेशबदरसाचापिंडका चाचलोमंत्रईश्वरीवाचा ॥ १ ॥ "

१२. **दाढ दुखत असल्यास :** वावडिंगें हुक्क्यांत किंवा चिलमींत ओढावीं.

१३. **गर्मीस :** खारका २ भाग, पारा (शुद्ध करून) १ भाग, गूळ ६ भाग, एकंदर खल करून मुगाप्रमाणें गोळ्या बांधाव्या. व एकेक गोळी तुपाबरोबर ७

दिवस घेणें. **पथ्य–** तेलकट, आंबट, तिखट, उष्ण, वावडें, इत्यादि वर्ज्य. **उतार–** दहीभात.

१४. **पोटांत दिनाईचा रोग होतो त्यास :** बाळहिरडे, एरंडेल तलांत तीन वेळा तळून, त्यांचे चूर्ण करावें. व ते शक्तीप्रमाणें साजूक पाण्याबरोबर तीन दिवस द्यावें. **पथ्य–** राळ्याचा भात व मध हीं खावीं, किंवा कुलित्थ. **उतार–** बासाचा कीस उकडून पाणी काढावें व त्यांत तीन वर्षांचा गूळ घालून शक्तीप्रमाणें पाजावें.

१५. **सन्निपातांत नेत्ररोगावर व त्या सन्निपातावर :** पांढऱ्या वसूची मुळी, शिसें, सिंगरूप व पिंपळी, या चार जिनसा, निंबाच्या रसात उगाळून डोळ्यांत अंजन करावें. व वर निंबाचीं पानें उकडून बांधावीं.

१६. **डोळ्यांत वडस अथवा फूल पडल्यास :** घारीचें अथवा कोंबडीचें अंडें आणून, त्याचें वरील थोडें टवक काढून आंत लवंगा ३ मासे, मिरें ३ मासे, पिंपळी ३ मासे, यांचें चूर्ण घालून, टवक मिळवून द्यावें. व तें अंडें मडक्यांत घालून सात दिवस टांगून ठेवावें. नंतर तें औषध काढून बारीक खल करावा. आणि लोण्यांत डोळ्यांत अंजन करावें. वडस, फूल हीं झडतील.

१७. **हरताळेचें भस्म :** (१) तुरटीची बारीक पूड करून, तींतील निमी पूड, एका पंतींत घालून वर पिंवळ्या हरताळीचा खडा ठेवावा. व बाकी राहिलेली अर्धी पूड वरती घालून दुसरी एक पंती झांकण घालावी. व त्या पंत्यांवरून मातकापड करून, रानशेणीच्या झगरांत अग्नि द्यावा. म्हणजे शुद्ध भस्म होतें. (२) गुलबासीचा कांदा आणून उभा कोरावा व त्यांत पिंवळ्या हरताळीचा खडा घालून, मातकापड करून अग्नि द्यावा. (३) जुन्या तीन वर्षांचा कांदा किसून, बोळक्यांत वरखालीं घालून, व मध्यें हरताळीचा खडा घालून, बोळक्यांस मातकापड करून अग्नि द्यावा. हे तीन प्रकारहि हरताळभस्मास सुसाध्य आहेत.

१८. **गंधकभस्म :** निंबू थोडें चिरावें. त्यांत गंधक घालावा. दोन्ही फांका मिळवून अग्नि द्यावा, भस्म शुद्ध होतें.

१९. **मोरचूत भस्म :** चिवळाची भाजी वाटून गोळा करून मध्यें मोरचूत ठेवावा, व त्यास अग्नि द्यावा. भस्म शुद्ध होतें.

२०. **पारदभस्म :** (१) गंधक तोळा १, पारा तोळा १, तांब्याचा चूर तोळा १, तिन्ही एकत्र खल करून गोळी करून, निंबाचा रस घालून, पुन्हा खल करून, बोळक्यांत घालून, मातकापड करून अग्नि द्यावा. नंतर बोळक्यांतून काढून पुन्हा निंबाच्या रसांत खलून अग्नि द्यावा. असा तीन वेळ अग्नि दिल्यानें भस्म शुद्ध होतें. **अनुपान–** खव्यांत देऊन वर दूध द्यावें. पुरुषत्व येईल. **उतार– निंबू.** (२) रिठ्याचा पाला व पारा एकत्र खलून, गोळी करून अग्नि द्यावा; त्या योगानें गोळी

होईल; नंतर रानतुळशीचा पाला वांटून त्यांत गोळी ठेवावी, आणि बोळक्यांत घालून मातकापड करून अग्नि द्यावा. शुद्ध भस्म होतें. (३) गुंजेच्या पाल्यांत पारा खलून गोळा करावा आणि अग्नि द्यावा. गोळी होईल ती दुधीचे किंवा माक्याचे पाल्यांत बोळक्यांत पुन्हा अग्नि द्यावा. शुद्ध भस्म होईल.

२१. **शिसें भस्म** : वांगें एक मोठें घेऊन, त्याचा देठ काढून, व वरील चकती थोडीशी काढून, आंत शिसें भरण्यास जागा करावी. नंतर त्यांत तें भरून पुन्हा चकती बसवावी व मातकापड करून अग्नि द्यावा. भस्म होईल.

२२. **गर्मीवर औषध** : (१) पांढरा कात तोळा १, गाठी पिंपळमूळ १ तोळा, पिंपळी तोळे २, अशीं वांटून पाण्यांत भिजत घालावीं. पाणी गाळून त्यांत तिन्ही औषधें बारीक कुटून, मग त्या पाण्यांत खल करावा. नंतर विड्याचीं पिकलीं पानें आणून त्यांचा रस काढून त्यांत घालावा. व गोळ्या बारीक बोरा-एवढाल्या बांधाव्या. दररोज दोन गोळ्या सकाळीं व सायंकाळीं एक अशा द्याव्या. **पथ्य**—अळणी, तूप, पांढरी पोळी खावी. तूप थोडें खावें. (२) जेपाळाच्या बिया १ तोळा आणून पाण्यांत उकळाव्या. आणि पाणी टाकून द्यावें. बियांमध्यें, दोन्ही दाळिंब्यांचे मध्यें जें बीं असतें, तें काढून टाकावें. नंतर बाळहिरडे ४ तोळे, सोनें मासा १ व वर सांगितल्याप्रमाणें शुद्ध केलेल्या बियांचा निंबाचे रसांत खल करून, तुरीएवढाल्या गोळ्या बांधाव्या. **पथ्य**— आळणी.

२३. **धातुक्षीणतेस** : तज, नाकेश्वर, जायफळ, तमालपत्र, अक्कलकाला, जायपत्री, हीं औषधें समभाग घेऊन वस्त्रगाळ चूर्ण करावें. व सकाळ संध्याकाळ, पाव तोळा चूर्ण मधाबरोबर द्यावें. **पथ्य**— तेलकट, आंबट, तिखट हे वर्ज. औषधावर मिठाई खावी.

२४. **क्षयरोग व अतिसारास** : आंवळकठी, बाळहिरडे, पिंपळी, चित्रक, जिरें, सैंधव, खडीसाखर, सर्व औषधें समभाग कुटून, प्रतिदिवशीं सकाळ, संध्याकाळीं दोन दोन मासे चूर्ण मधांत घ्यावें. **पथ्य**— तेलकट, आंबट, तिखट खाऊं नये.

२५. **पोटशूळास** : पुष्करमूळ, सुंठ, हिंग, यांचें सममाग चूर्ण मध किंवा आल्याचा अथवा निंबाचा रस, यांत दोन तीन मासे द्यावें.

२६. **जखम भरून येण्यास** : (१) धावड्याची साल कुटून वस्त्रगाळ करून, घोड्याच्या मूत्रांत कालवून जखमेवर लावावी. (२) कोंबडीचें अंडें एक व तिळाचें तेल एकत्र करून, तीन पदरी वस्त्र करून गाळावें. व गाळून फडक्यांत जो भाग राहील तो, गाईचें तूप १ शेर तापवून, तें निवाल्यावर त्यांत टाकावा. व त्यांत आणखी मेण दोन टांक, टाकणखार दोन टांक, हरताळ दोन टांक, शेंदूर दोन टांक हीं औषधें टाकून, नंतर लोणी दोन टांक व किंकणेल दोन टांक, हीं टाकावीं; म्हणजे मलम तयार झाला. हा मलम जखमेस लावला असतां फार गुणावह होईल.

२७. **कोडास उपाय** : वडबीज, हळद, आंवळकाठी, चित्रक, दारुहळद, हीं औषधें समभाग घेऊन गोमूत्रांत खलून कोडावर लेप करावा. असा लेप सात दिवस केला असतां कोड जाईल.

२८. **रक्तप्रदरास** : आघाड्याच्या पानांचा रस नऊ टांक, तनबीज तीन वाल, खडीसाखर तीन वाल, हीं तांदुळाचे धुवणांत द्यावीं. तीन दिवसांत गुण येईल.

२९. **गर्भस्थान शुद्ध होण्यास उपाय** : तांदुळज्याचें बीज १ टांक, तांदुळाच्या धुवणांत उगाळून प्यावयास द्यावें. सात दिवस.

३०. **कांच खाल्ल्यास** : काळीं द्राक्षें १ टांक घेऊन, शेर पाण्यांत त्यांचा काढा करावा. काढा उकळून अच्छेर राहिल्यावर तो पिण्यास द्यावा. जुलाब होऊन कांच पोटांतून पडेल.

३१. **मोडशीस** : मनशीळ व मिरीं दोन्ही एकत्र पाण्यांत उगाळून अंजन करावें.

३२. **नेत्रास तेज येण्यास** : हिरमुजी हिरडे, सोनगेरू व साबू एकत्र करून अंजन करावें.

३३. **ढाळ मुरडा व अतिसार** : मोचरस, लवंग, जायफळ, हिंगूळ, खडीसाखर, मिसरी अफू हीं औषधें समभाग घेऊन वस्त्रगाळ चूर्ण करावें. व तें प्रकृतिमानाप्रमाणें पावपासून एक तोळ्यापर्यंत पाण्यामध्यें सकाळ संध्याकाळीं सात दिवस द्यावें.

३४. **अर्धशिशीस उपाय** : साबूचे अंजन करावें.

३५. **पोटांत प्याहा रोग होतो त्यावर** : शेराचीं पंचवीस पानें पंचवीस वेळ पाण्यानें धुऊन कोऱ्या मडक्यांत घालावीं. व त्यांचा रस काढून त्यांत हिंग पाव टांक व संचळ १ टांक घालून, हें औषध दररोज सकाळीं एक टांक घेत जाणें. सात दिवसांत गुण येईल.

३६. **कफवायूस** : वांग्याच्या फोडीस मोहऱ्या वाटून लावून रात्रीं थोड्या पाण्यांत ठेवावें व सकाळीं एक फोड खावी. तीन किंवा चार दिवसांत गुण.

३७. **पांथरीस** : दररोज सकाळीं, नदींत पावसाळ्यांत वाहून आलेली माती (तीस केवटा म्हणतात) असते ती मूठभर खात जावी. व माती खाल्ल्यावर शक्तीप्रमाणें, वाढवीत वाढवीत असा व्यायाम करावा. दहा बारा दिवसांत चांगला गुण येतो.

३८. **घाटसर्पास** : पिकलेलें पडवळ चिलमींत ओढावें. तीन किंवा सात दिवसांत पुरा गुण.

३९. **सूज, गोळा,** इत्यादिकांस मलम : मेण पांच टांक, गाईचें तूप दहा टांक, हिंगुळ एक टांक, राळ पांच टांक, मोरचूत एक टांक, टांकणखार एक टांक, यांचा मलम तयार करावा. व तें मलम लावावें.

४०. **डोळ्यांतील पडळ दूर होण्यास :** पडवळाचें अंजन करावें.

४१. **रक्तपितीस :** माणसाच्या करटींत लोणी ऊन करावें व तें लोणी लावावें. रक्तपिती दूर होईल.

४२. **केंस काळे होण्यास :** तांब्याचा चुरा चार पैसेभार, बाळहिरडे तीन पैसेभार, बेहेडे दोन पैसेभार, आंवळे दोन पैसेभार, मायफळ एक पैसाभार, हिराकस दोन पैसेभार, लोहचूर दोन पैसेभार, रुमीमस्तकी दोन पैसेभार, फटकी पाव मासा, येणेंप्रमाणें औषधांपैकीं प्रथमतः बाळहिरड्याची खळ करून, त्यांत बाकीचीं औषधें वस्त्रगाळ करून टाकावीं; व केंसांस लेप करावा.

४३. **गुलकंद करण्याची कृती :** खडीसाखर अर्धा शेर, गुलाबाच्या फुलाच्या पांकळ्या नऊ टांक व वेलची चार टांक, हीं एकत्र करून तीन महिने कोऱ्या मडक्यांत तोंड बांधून ठेवावें.

✓४४. **तोंड आल्यास मंजन :** (१) कापूरचिनीचें बोंड बारीक वांटून दिवसांतून तीन वेळ लावावें. तीन दिवसांत गुण. (२) भीमसेनी कापूर एक मासा, पावशेर पाण्यांत घालून दिवसांतून दोन वेळ गुळण्या कराव्या.

४५. **विंचवाचे दंशावर :** कडू इंद्रावणीचें मूळ पाण्यांत उगाळून दंशावर लावावें. व लावतांक्षणींच दंश झालेल्या मनुष्याच्या एक तोंडांत द्यावी.

✓४६. **ऋतु गेला असल्यास :** कोंवळ्या केवड्याच्या कणीसाचा शेंडा हात न लावतां गिळावा. सात दिवसांत ऋतु प्राप्त होईल. व फारच होऊं लागल्यास गाईचें लोणी लिंबाइतकें खावें.

४७. **नारूस :** कडू जिरें सात दिवस शिळ्या पाण्याबरोबर सूर्योदयाबरोबर घ्यावें. नारू मरतो.

४८. **हातांपायांच्या कळांवर :** कांगुण्याची भाजी तुपांत तळून, मसाला न लावतां, अळणी वरण व अळणी गव्हांची पोळी, असें चवदा दिवस खावें. रोग जाईल.

४९. **तोंड आल्यास :** रान ओंव्याची राख लावावी.

५०. **घाव पडल्यास :** मुरदाड तेलांत रानशेणी गवऱ्यांची राख खलून लावावी.

५१. **गर्भास औषध :** वंशलोचन, दाळिंबाचा रस, खडीसाखर, गुंजेच्या पाल्याचा रस, विड्याच्या पानांचा रस, हीं औषधें समभाग आणि पापडखार व रसकापूर हीं औषधें समभाग, वरील औषधांच्यापेक्षां आठ भागांनीं कमी घेऊन, तीनतीन माशांच्या गोळ्या कराव्या. एकेक गोळी सकाळ संध्याकाळीं द्यावी. सात दिवसांत गुण. **पथ्य**— अळणी.

५२. **प्रमेहास :** कावळीची मुळी गाईच्या दुधांत उगाळून सात दिवस प्यावी. **पथ्य**— तिखट, आंबट खाऊं नये.

५३. **टांकी परम्यास** : तरटीच्या पाल्याचा रस शिळ्या पाण्यांत सात दिवस प्यावा. पथ्य नाहीं.

५४. **तिडकी परम्यास** : पारिजातकाचे ढेशांचा रस, पांढऱ्या कांद्याचा रस, जिरें, खडीसाखर, वेलची हीं समभाग घेत जाणें. सात दिवसांत गुण. **पथ्य** नाहीं.

५५. **हिंवास** : उतरली वेलीचीं २॥ पानें विड्यांत खावीं.

५६. **धायरूवर व आगपैणीस** : उतरंडीच्या पानांचा रस लावावा.

५७. **तापास** : पाण्यांत आस्कंदाच्या मुळ्यांचा रस घालून व सात खापरें लाल करून, त्या पाण्यांत विझवून, तें पाणी पिण्यास द्यावें. तीन दिवसांत गुण.

५८. **घांटसर्पास** : आस्कंदाची मुळी पाण्यांत उगाळून वर लेप करावा व मुळी चिलमींत ओढावी.

५९. **कामिणीस** : बिलायताची मुळी विड्यांत शनिवारीं किंवा रविवारीं खावी.

६०. **खोकल्यावर** : भुईरिंगणीचीं फुलें विड्यांत खावीं.

६१. **पोट फुगल्यास** : चांभारी तरवडाची शेंग पाण्यांत वांटून प्यावी. म्हणजे उलटी किंवा शौचास होऊन पोट साफ होतें.

६२. **पोटशूळास** : चांभारी तरवडाची शेंग कुटून गुळामध्यें गोळी करून घ्यावी.

६३. **गर्मीस उपाय** : कलहीचा पाला पाण्यांत वांटून तीन किंवा चार दिवस घ्यावा. **पथ्य**—अळणी, पोळी, वरण खावें. **उतार**— हरभऱ्याची डाळ.

६४. **मूळव्याधीस** : मेढशिंगाच्या पाल्याचा रस व गाईचें तूप हें बरोबरीनें घेऊन प्यावें. तीन दिवसांत गुण.

६५. **प्रमेहास** : मोगली बेदाणा व खडीसाखर एकत्र पाण्यांत भिजत घालून सात दिवस प्यावें.

६६. **धुपणीस** : (१) तांबड्या जास्वंदीचीं फुलें, फुलण्याच्या पूर्वींच खावीं. (२) कापशीचीं फुलें तुपांत तळून खावीं.

६७. **खांडूक व गंडमाळेवर** : सज्जीखार, साबण, मिठाचा खडा, यांचा लेप करावा.

६८. **अगदीं जुनाट खांडूक, लासरू व हाड्याव्रण** यांस व इतर **साधारण जखमेसहि वस्ताद मलम** : (१) कोंबड्याचे पाय एकशें एकवीस पाण्यानें धुवून व जाळून पावशेर तुपांत मलम करावें. व तें कोणत्याहि जखमेस लावावें. त्या मलमावर एक भुकटी टाकण्याकरितां अशी करावी—शेवग्याचा डिंक ठिकरींत जाळून त्याची भुकणी करावी. व तें मलम लावून वर ही भुकणी सोडीत जावी. **पथ्य**— तेलकट, आंबट, तिखट वर्ज्य. (२) एरंडेल तेल पावशेर, अदपाव राळ व एक मासा रसकापूर. प्रथमतः तेल तापल्यावर या दोन्ही जिनसा टाकाव्या. नंतर

त्याचा थेंब काश्यांच्या पितळींत टाकून पहावा. थेंब मोत्यासारखा दिसला म्हणजे अग्नीवरून उतरावें. हा मलम, कपड्याची पट्टी करून जखमेस लावावा.

६९. **गर्मीचें औषध** : काळ्या टाकळीचा पाला, गुंजेचा पाला, निळुंबीचा पाला, पांढऱ्या जास्वंदीचा पाला, दाळिंबाचा पाला, हे प्रत्येक अदमासें मूठमूठभर घेऊन त्यांत पापडखार १ तोळा, बांगडखार १ तोळा या सर्वांचा एक-जीव करून, त्यांत सुमारें पंचवीस विड्यांच्या पानांचा रस टाकून, अदमासें बोरा-एवढाल्या गोळ्या बनवून सकाळ-संध्याकाळीं द्याव्या. गर्मी, परमा यांस सात दिवसांत गुण. **पथ्य**— दूध-भात खाऊं नये. तूप फार खावें. गव्हांची पोळी खावी. **उतार**— तोंड आल्यास बाभळीच्या सालीच्या गुळण्या कराव्या. औषध घेईपर्यंत ८ दिवस स्नान करूं नये.

७०. **रक्तप्रदरास** : मुलतानी माती ६ मासे व साखर सहा मासे असें दररोज प्रातःकाळीं घेत जावें. पण शीतापासून असेल, तर त्यांत मध घालून घेणें. **पथ्य**— उष्ण पदार्थ अगदीं खाऊं नये.

७१. **स्वर पडते त्यावर** : तवकीर पाण्यांत कढवावी व त्यांत थोडी खडी-साखर आणि गाईचें तूप घालून घेणें. त्यांत गुळवेलीचें सत्त्व घातल्यास फारच उत्तम. **पथ्य**— उष्ण पदार्थ अगदीं वर्ज्य.

७२. **पोटशूळास** : समुद्रफेण म्हशीच्या दुधांत तीन मासे उगाळून द्यावा.

७३. **प्रमेहास** : रात्रीं तालीमखाना तीन तोळे पाण्यांत भिजत घालून सकाळीं वाटावा. व त्यांत जिरें अर्धा तोळा व खडीसाखर दीड तोळा घालून याप्रमाणें सात दिवस द्यावें. **पथ्य**— उष्ण पदार्थ वर्ज्य.

७४. **मूत्र कोंडतें त्यास** : दहीं, दूध, व अर्धें पाणी एकत्र करून त्यांत प्रकृतिमान पाहून अदमासें मासाभर रेवाचिनीची पूड घालून घेणें.

७५. **डोळ्यांतील फुलास** : नागरमोथा, अंगावरील दुधांत उगाळून अंजन करावें.

७६. **मूतखड्यास उपाय** : (१) रानतुळशीच्या मुळ्यांचा रस तोळा तोळा तीन दिवस घेणें. (२) सागाची बी व पाण्यांतील शिरगोळा; हीं दोन्ही शिळ्या पाण्यांत उगाळून १ तोळा घेणें.

७७. **गर्मीस औषध** : (१) दररोज चांभारी हिरड्यांचें एक तोळा चूर्ण गाईचे पावशेर दुधांत सात दिवस घेणें. हा उपाय सौम्य आहे. तेव्हां करण्यास कांहीं हरकत नाहीं. (२) तुरटी नऊ टांक घेऊन त्याचें चूर्ण करावें. व त्याच्या चौदा पुड्या करून दररोज एक पुडी सकाळीं टाकळीचे रसांत घेणें. **पथ्य**— तेलकट, आंबट वर्ज्य. (३) सौंदडीच्या पाल्याचा रस दह्यांत, प्रकृतिमानाप्रमाणें १४ दिवस घेणें. **पथ्य**— तिखट, तेलकट, आंबट, वर्ज्य.

७८. **प्रमेहास :** तुळशीच्या पाल्याचा रस एक तोळा व मध एक तोळा घेणें. दिवस सात. **पथ्य—** गव्हाची पोळी व तुरीचें वरण खावें. (१) पिंपळाची लाख तीन तोळे, त्याचीं फळें ३ तोळे व खडीसाखर ३ तोळे, यांचें चूर्ण करून सात पुड्या कराव्या. पैकीं एक पुडी दररोज सकाळीं केळीच्या गाभ्यांतील सालीचा रस व दहीं समान घेऊन, त्यांत घेत जावी. सात दिवस. **पथ्य—** तूप-भात खाणें. (२) कुंभार मडकें वगैरे घडतो, तेव्हां त्याच्या हातास लागलेली व सुकलेली माती २ तोळे, मध १ तोळा व शेळीचें दूध पावशेर, असें एकत्र करून तीन किंवा सात दिवस एकसांज घेणें. **पथ्य—** तेलकट, तिखट, आंबट, वातुळ वर्ज्य.

७९. **गर्मीपासून उद्भवणाऱ्या चट्ट्यांस व फोडांस मलम :** बाघांटीच्या पाल्याच्या रसांत १ तोळा रसकापूर उगाळून त्यांत ४ तोळे तूप मिश्रण करावें, म्हणजे मलम तयार झालें, तें लावावें.

८०. **सदरप्रमाणें रोगास गोळी :** रसकापूर, मुर्दाडसिंग, पिवळा कपडा जाळून त्याची राख, गोपीचंदन, हीं समभाग घेऊन, त्यांच्या पाण्यांत गोळ्या बांधाव्या. व गर्मीपासून उद्भवणाऱ्या चट्ट्यांस किंवा फोडांस ही गोळी तुपांत उगाळून लावावी.

८१. **खरजेस मलम :** तूप अदपाव कढवून लाल करावें. त्यांत दोन विंचे कातरून व शेंदूर टाकावा. आणखी कढ देऊन, त्यास काळा रंग आला म्हणजे मलम तयार झालें. तें लावावें.

८२. **गंडमाळेस उपाय :** (१) देवडांगराचें बीं वांटून त्याचा एक थेंब व माणसाचे मूत्राचे ४ थेंब एकत्र करून कानांत घालावें. **पथ्य—** वावडें वर्ज्य. (२) मांजराचें हाड उगाळून लावावें. (३) बिबा व हिरडा रुईचे चिकांत लावावा. (४) शेवग्याचा डिंक, पांढऱ्या गुलवसीचा कांदा व मिरें, एकत्र थंड पाण्यांत उगाळून लावावें.

८३. **धायरूस :** सोनगेरू पाण्यांत उगाळून लावावा.

८४. **गर्मीस औषध :** पांढऱ्या जास्वंदीची मुळी, पांढरा कांदा, खडीसाखर, वेलची, आळणाचे जिरे, कोरफडाचा गीर एकंदर समभाग जिन्नसांचा खल करून तीन तीन माशांच्या गोळ्या कराव्या. व तीन दिवस सकाळीं-संध्याकाळीं एक एक गोळी घेऊन चौथे दिवशीं चण्यांची आमटी, सर्व मसाला घालून करून खावी.

८५. **प्रमेहास :** कोळसा, सबजाचें बीं, जिरें, गोपीचंदन, गोखरूं, हीं औषधें सारखीं घेऊन चूर्ण करावें व दररोज तीन मासे चूर्ण, गाईचें दूध व खडीसाखरेशीं मिश्र करून घ्यावें.

८६. **रक्तप्रमेहास :** (१) सराट्याचें चूर्ण व साखर समभाग घेणें. (२) गोखरूंचें मूळ व भुईआवळीचें चूर्ण करून पाण्यांत घ्यावें. (३) गुळवेल, भुईआवळी, गोखरूंमूळ, तिन्ही मिळून चार तोळे पाण्यांत वांटून व त्यांत एक तोळा साखर घालून घ्यावें.

८७. **खोकला, दमा, गुल्म, यांवर :** आल्याचा रस, मध, पिंपळी व जवखार असें एकत्र करून घ्यावें.

८८. **डोक्यास चाई लागते त्यास :** पारव्याची व उंदराची विष्ठा एकत्र करून लेप करावा.

८९. **धातुक्षयास :** (१) मनुका, खडीसाखर, मध, व पिंपळी हीं एकत्र करून घ्यावीं. (२) आस्कंद, साखर, तूप, मध, व पिंपळी हीं एकत्र करून घ्यावीं. **पथ्य–** दोन्ही उपायांवर तूप, भात खाणें.

९०. **दाहशांतीस :** खर्पूरमिश्रित चंदनाची उटी लावावी.

९१. **सर्वसाधारण सुजेवर :** सागरगोटा, रुई व एरंड, यांचीं पानें वांटून ऊन करून लेप करावा.

९२. **शक्तिवृद्धीस :** (१) कांद्याचा रस व मध एकत्र करून घेणें. (२) आस्कंधाचें चूर्ण तूप व मध यांत घ्यावें. (३) गुंजेचें मूळ दुधांत शिजवून साखरेशीं घ्यावें. (४) आवळ्यांचा रस व तूप एकत्र करून घेणें. (५) तूप व मध विषम भागानें एकत्र करून घ्यावें.

९३. **मूत्रकृच्छ्रास :** (१) कांटेसांवरीच्या सालीचें चूर्ण साखरेशीं घ्यावें. (२) गुळवेलीचे रसांत मध घालून घेणें.

९४. **वांति बंद होण्यास :** (१) आंवळकठीचें चूर्ण मधांत कालवून घेणें. (२) वेलचीचीं टरफलें जाळून मधाशीं चाटणें. (३) कावळीची मुळी आणि हिंग मधांत देणें.

९५. **झोंप येत नसल्यास किंवा फार तहान लागल्यास :** प्रकृतिमाना-प्रमाणें जायफळ देणें.

९६. **विंचवाचे दंशास :** साकरकंदांच्या पानांचा रस लावावा.

९७. **सोमलविषास उतार :** कापूर खाण्यास देऊन नंतर तूप पाजावें.

९८. **अफूस उतार :** हिंगमिश्रित ताक पाजावें. फार उत्तम आहे.

९९. **सर्पदंशास उतार :** एकदोन ओकाऱ्या होईपर्यंत रिठ्याचें पाणी पिण्यास द्यावें व रिठ्याचें अंजन करून, दंशावरहि रिठा पाण्यांत उगाळून लावावा.

१००. **उंदराचे विषावर उतार :** (१) खवट खोबरें मुळ्याच्या रसांत उगाळून लेप करावा. (२) दंशावर अफू लावावी. (३) उदेल तेल लावावें.

१०१. **गंडमाळांस :** हिराकस आणि बिबे, रुईचे चिकांत उगाळून लावावे.

१०२. **खरजेवर मलम :** जिरें, काळें जिरें, हळद, आंबेहळद, मिरें, शेंदूर, गंधक, मनशीळ, पारा, हीं औषधें समभाग एकत्र गाईचे तुपांत खलून लावावीं.

१०३. **आम्लपित्तास :** काडेचिराईत व माका, यांचा काढा करून त्यांत मध घालून घेणें. गुण उत्तम.

१०४. **कृमीवर** : सुंठ, मिरें, पिंपळी, इंद्रजव, खैराची लाल यांचा काढा करून प्रकृतिमानाप्रमाणें शेळीचे मूत्रांत द्यावा.

१०५. **दुग्धोत्पादनास** : गुळवेलीच्या मुळ्यांचा काढा करून त्यांत दूध घालून देणें.

१०६. **तापास** : काळ्या कांडलीच्या मुळ्या भिजवून व नंतर वाळवून चूर्ण करावें, व तें शक्तीप्रमाणें द्यावें.

१०७. **दंश ओळखण्यास** : ज्यास दंश होईल, त्यास काळी माती खावयास द्यावी. ती त्यास आंबट लागली तर महांडूळ डसलें म्हणून समजावें व त्याप्रमाणें उपचार करावा.

१०८. **विंचवाचे दंशास** : काळ्या धोतऱ्याचें बोंड, गोमूत्रांत उगाळून लावावें. (२) कांद्याचा रस व मध चोळावा.

१०९. **सर्पदंश झाल्यास** : गूळ व तीळ रुईच्या चिकांत मर्दून खावयास देणें.

११०. **दांत खिळखिळे झाले असल्यास** : वावडिंग एक भाग व मुर्दाड-सिंग अर्धा भाग घेऊन, त्यांचें चूर्ण करावें. व तें निजते वेळीं दांतांत धरून निजावें. सात दिवस.

१११. **सुजेवर उपचार** : म्हशीचें शेण पिळून त्याचा रस पिण्यास देऊन कांहीं सुजेवर चोळणें.

११२. **मूतखड्यास** : कोहळ्याच्या मुळाचा रस, दंवाचें पाणी व मध एकत्र करून एकवीस दिवस घेणें.

११३. **कानांत गोमाशी किंवा साधी माशी गेल्यास** : (१) कडू इंद्रावणीचें मूळ तेलांत कढवून, तें तेल कानांत घालणें. (२) उतरंडीच्या पाल्याचा रस कानांत घालणें.

११४. **वाघाचा केंस पोटांत गेल्यास** : काफरकासंदीच्या पाल्याचा रस प्यावयास देणें.

११५. **विषमज्वरास** : त्रिफळा मधांत घेणें.

११६. **भूक लागत नसल्यास** : सुंठ, हिरडा, संचळ, टेंभुरणी साल, यांचें समभाग चूर्ण करून घेणें.

११७. **गजकर्णास** : (१) निर्गुंडीचें तेल मधांत लावणें. (२) शंख्या सोमल व चंदन उगाळून लावणें. (३) संचळ निंबाचे रसांत लावणें.

११८. **पांथरीस** : महाळुंगाची मुळी पाण्यांत वांटून पिण्यास देणें.

११९. **मूळव्याधीस** : (१) तवकीर व पांढऱ्या कांद्याचा रस सात दिवस घेणें. वावडे पदार्थ खाऊं नयेत. (२) गाईच्या तुपाशीं मेंदीचा पाला खाणें. सात

दिवस. (३) वटवाघुळीच्या विष्ठेची, बोरीच्या कोळशाच्या विस्तवावर धुरी घेणें. सात दिवस किंवा चौदा दिवस.

१२०. **धातुपुष्टीस** : रानभेंडीचा रस, पिठी साखर घालून पिणें. सात किंवा चौदा दिवस. **पथ्य**– तिखट, आंबट वर्ज्य. स्त्रीसंग वर्ज्य.

१२१. **नपुंसकत्व दूर होण्यास** : जायफळ कोरून, त्यांत उंची अफू भरावी, व त्याचे तोंडावर जायफळाची पूड बसवावी. नंतर तें जायफळ, रुईच्या झाडाचें खोड कोरून त्यांत सात दिवस ठेवावें. आठवे रोज एक एक भाग देणें. **उतार**– निंबू व मिठाचा खडा.

१२२. **गर्भारपणांत रक्तप्रदर उत्पन्न झाल्यास** : (१) पारव्याची विष्ठा तांदुळाच्या धुवणांत द्यावी. रक्तप्रदर बंद होऊन गर्भ वाढेल. (२) कुंभाराच्या हाताची माती, व शेळीचें दूध एकत्र घेणें.

१२३. **स्त्री बाळंत होण्यास कष्ट होत असल्यास** : महाळुंगाची मुळी कमरेस बांधावी. म्हणजे स्त्री बाळंत होईल.

१२४. **तिडकी प्रमेहास** : गुळवेल वांटून, गूळ व गाईचे दुधांत सात दिवस घेणें.

१२५. **पांडुरोग प्रमेहास** : (१) म्हशीचें शेण व मूत्र एकत्र करून सात दिवस घेणें. (२) जावळी हळद, वाळा व आल्याचा रस सात दिवस घेणें.

१२६. **ऋतु प्राप्त होण्यास** : (१) माका व रिंगणी उशाशीं घालून निद्रा करणें. सात किंवा चौदा दिवस. (२) पिंपळाचीं पानें सात दिवस खाण्यास देणें.

१२७. **ऋतु फार झाल्यास** : फण्यानिवडुंगाचा चीक माथ्यावर घालणें. ऋतु बंद होईल.

१२८. **गजकर्णास** : निर्गुडीचें तेल व मध एकत्र करून लावणें.

१२९. **डोळ्यांतील फूल झडण्यास** : कुत्र्याचा दांत उगाळून अंजन करावें.

१३०. **महा बाळंतरोगास औषध** : काळ्या शेळीच्या मूत्रांत ७ तोळे कडू जिरें वांटून, दररोज सकाळीं देणें. सात दिवस. **पथ्य**– तेलकट, आंबट, वर्ज्य, पिण्यास पाणी गार.

१३१ : **महाश्वास, खोकल्यावर वस्ताद औषध** : कातणीचें घर,– जें भिंतीवरील असून आंत जंतु नसतील असें घेऊन, तें दररोज थोडेंसें गुळांत सकाळीं, दुपारीं व रात्रीं जेवण झाल्यावर असें तीनदां द्यावें. पांच दिवसांत पूर्ण गुण. **पथ्य**– तेलकट, आंबट, तिखट, वर्ज्य. तूप, दूध, साखर, गहूं, हें खावें. हें औषध श्वासावर जबरदस्त औषध आहे.

१३२. **खोकल्यास** : गोमूत्र १० शेर घेऊन, त्यांत बारीक बारीक बाळहिरडे १० शेर, एका मोठ्या व कोऱ्या मडक्यांत भिजत घालावे. व त्या मडक्यास मातकापड करून, तें भुईंत खणून पुरून ठेवावें. तें इतकें, कीं त्यावरती चार-सहा बोटें माती पाडावी. नंतर त्या पुरलेल्या जागेवर चूल करून किंवा कोणत्याहि प्रकारानें, त्या जागेवर ४० दिवसपर्यंत अग्नि पेटवीत असावा. हा प्रकार रोजच्या वापरत्या चुलीखालीं केल्यास फार उत्तम. पुढें तें मडकें एकेचाळिसावे दिवशीं काढून, त्यांतील बाळहिरड्यांची बारीक वस्त्रगाळ भुकणी करून, ती लहान मुलास चवलीभार सकाळ संध्याकाळीं व मोठ्या मनुष्यास पावलीभार साखरेंत द्यावी. या भुकणीच्या बाभळीच्या डिंकाच्या पाण्यांत, सदर वजनाच्या गोळ्या करून दिल्या तरी चालतील. **पथ्य**—तेलकट, तिखट, वर्ज्य. तूप, दूध, साखर, गहूं, हें खावें.

१३३. **सर्व प्रमेहांस** : तिळवळीची भाजी रात्रीं पाण्यांत भिजत घालून सकाळीं तिचा रस घेणें. तीन किंवा पांच दिवसांत गुण. **पथ्य**—वरच्या औषधास आहे तेंच.

१३४. **मुतखडा व मूत्रकृच्छ्रास उपाय** : तांदूळाज्याच्या भाजीचें बीं व कांकडीचें बीं दोन दोन तोळे घेऊन रात्रीं पावशेर पाण्यांत भिजत घालावें. व दुसऱ्या दिवशीं सकाळीं तें पाण्यांत वांटून, सकाळीं, दुपारीं व रात्रीं जेवण झाल्यावर, असें तीनदां घ्यावें. व औषध घेतेवेळीं दर खेपेस त्यांत दीड दीड मासा चंदनाचा अर्क (तेल नव्हे) टाकून औषध घेत जावें. पांच किंवा सात दिवसांत गुण. **पथ्य**—१३२ व्या औषधास आहे तेंच.

१३५. **रक्त पडत असून मोड नाहींत, अशा चुंबळीच्या मूळव्याधीस औषध** : रसवंती ३ भाग व कापूर १ भाग, हीं दोन्ही मिश्र करून, व्याधीस बोटानें लावावीं. आग व्हावयाची नाहीं. **पथ्य**—१३२ व्या औषधास आहे तेंच.

१३६. **मोडाच्या मूळव्याधीस औषध** : कळीचा चुना विरघळून, त्यांत तितकाच पापडखार घालावा. आणि तें तांब्याच्या भांड्यांत पुष्कळ घोटावें. नंतर त्यांत मोलामा[1] दोन भाग घालून तें एकत्र करावें. व फक्त मोडाच्या मधोमध या औषधाचा ठिपका द्यावा. हें औषध मोडाशिवाय दुसरीकडे कोठें लागूं देऊं नये. लागल्यास फोड येतील. कदाचित् फोड आल्यास त्यास खोबरेल तेल लावावें. या औषधानें आग मनस्वी होईल. परंतु हें दिवसांतून एक वेळ, असें एक दिवसाआड तीन दिवस लावतांच जन्माची मूळव्याधी जाईल. **पथ्य**—१३२ व्या औषधास आहे तेंच.

---

१. मोलामा करण्याची कृती—अर्धा शेर तेलांत २ शेर मेण चांगलें कढवून त्यांत १ शेर शेंदूर घालावा. म्हणजे मोलामा झाला. ह्याची पट्टी बदासही उपयोगी आहे.

१३७. **कोणत्याहि प्रकारच्या धुपणीस** : पांढऱ्या जास्वंदीची एक व तांबड्या जास्वंदीची एक अशा दोन लहान लहान मुळ्या वांटून, गाईच्या पावशेर दुधांत पिण्यास द्याव्या. चार दिवसांत गुण. **पथ्य**–१३२ व्या औषधास आहे तेंच.

१३८. **नारूवर** : लोहबंदी उदाची वस्त्रगाळ भुकणी करून, ती सकाळीं १ तोळा, शेरभर दह्यांत द्यावी. तीन दिवसांत गुण.

१३९. **मोडाच्या मूळव्याधीस** : मुरदाडसिंग, पांढरा कात, पाषाणभेद, संगजिरा, हे सर्व जिन्नस समभाग कुटून, त्याचें वस्त्रगाळ चूर्ण, गाईच्या तुपांत मूळव्याधीस दिवस व रात्र मिळून ६-७ वेळ लावावें. आग बिलकूल होणार नाहीं.

१४०. **गर्मीपासून उत्पन्न होणाऱ्या चट्ट्यांवर** : पांढरी, पांढरा कात व मुरदाडसिंग, हीं औषधें एकत्र वस्त्रगाळ चूर्ण करून लोण्यांत लावावीं.

१४१. **धातुक्षयावर** : हरणखुरीच्या शेंगा व पाल्यासुद्धां वस्त्रगाळ चूर्ण करून, तें पाव तोळा, पावशेर दूध व दोन तोळे खडीसाखर एकत्र करून दररोज सकाळीं घेणें. दिवस सात. **पथ्य**–१३२ व्या औषधास आहे तें, व ब्रह्मचर्यव्रतानें राहणें.

१४२. **घांटसर्प किंवा नरडें सुजलें असल्यास अथवा मूतखड्यास** : चवळीच्या भाजीचा १ तोळा रस देणें.

१४३. **घांटा धरला असल्यास** : कौंडळाची भुकी ओढावी.

१४४. **पोटांत डबा झाला असल्यास** : चवळीच्या भाजीचें पाणी किंवा काढा करून पिण्यास द्यावा.

१४५. **सर्पदंशावर** : (१) कारंब्याची साल कुटून पाण्यांत प्यावयास द्यावी. (२) महारगुंजेची मुळी पाण्यांत उगाळून जिभेस व आंखांस चोळावी व डोळ्यांत घालावी.

१४६. **मोडाच्या मूळव्याधीस** : मोरचूत दह्यांत पुष्कळ खलून, त्याची बारीक पट्टी, फक्त मोडाचे शेंड्यास पुरेइतकी लावावी. दुसरीकडे लावूं नये. यानें आग फार होते.

१४७. **डोकें दुखत असल्यास** : काळ्या टाकळीचा पाला व बारीक लांकडें एका मडक्यांत घालून, अग्नीनें दुसऱ्यांत त्याचें तेल काढून डोक्यास चोळावें.

१४८. **प्रमेह, प्रदर, धातुस्राव यांवर** : पांढऱ्या सावरीची साल गाईचे दुधांत द्यावी.

१४९. **रक्तप्रदरास** : पांढऱ्या सावरीचीं फुलें २ तोळे, धणे १ तोळा, जिरें अर्धा तोळा यांचा काढा करून घेणें.

१५०. **वायूपासून किंवा इतर कारणानें उत्पन्न झालेल्या गोळ्यावर** : रामाळ्याची साल पाण्यांत उगाळून लावावी. ही फार विषारी आहे. करितां पोटांत

जाऊं देऊं नये. किंवा दांतांस लावूं नये. दांतांस लाविली असतां दांत खिळखिळे होतात किंवा पडतात.

१५१. **भगेंद्र फारा दिवसांचें असल्यासहि** : त्यांत दांतवण बसवावें. १०–१२ दिवसांत गुण.

१५२. **लासरूवर** : चिंचेच्या बियांचें वस्त्रगाळ चूर्ण पाण्यांत किंवा लोण्यांत लावावें.

१५३. **डोक्यास खिळ्यानें किंवा दुसरे कशानें खोंच पडल्यास** : दांतवण बसवावें.

१५४. **खांडूक किंवा स्तनावर छिद्र** : पडलें असल्यास दांतवण बसवावें.

१५५. **हात किंवा पाय वगैरे कापल्यास** : तुरटीची भुकटी बसवावी.

१५६. **घोडाचोळी मात्रा** : पारा, गंधक, हरताळ, बचनाग हीं शुद्ध करून, अफू, सुंठ, पिंपळी, मिरें, हिरडा, बेहेडा, आंवळकठी, टांकणखार, हीं औषधें २१ दिवस खलावीं. ही कृति इतर ग्रंथांतून असल्यामुळें येथें सविस्तर दिली नाहीं. ही मात्रा येथें लिहिण्याचें कारण कीं, ही घेण्याचीं निरनिराळीं अनुपानें लिहावयाचीं आहेत, तेव्हां ही दिग्दर्शक माहिती वर दिली आहे. **घेण्याचीं अनुपानें**– अति तापास जिऱ्याचे पाण्यांत देणें. पित्तज्वरास जिरें व साखरेंत देणें. पित्तज्वर, वातज्वर व उष्णज्वरास जिऱ्याचें पाणी, आल्याचा रस व साखरेंत देणें. उष्णवातास किराईत व बाळहिरड्यांत देणें. पोटशूळ व मुर्ड्यास हिरड्यांत देणें. वात, संधिवात, धनुर्वात व त्रिदोषांस आल्याचा रस, चित्रक, लवंग, पिंपळी, मध हीं एकत्र करून त्यांत देणें. खोकल्यास मध, पिंपळी, पिंपळमूळ, अडुळशाचा रस, भारंगमूळ एकत्र करून त्यांत देणें. मोडशी झाल्यास शेवग्याच्या रसांत देणें. डोळ्यांत फूल पडल्यास कारल्याच्या पाल्याच्या रसांत देणें. मोडशीस वर्यांळी मिरें व गरोळकांद्याच्या रसांत देणें. वातज्वरास चिंचवणींत देणें. अतिसारास डाळिंबाच्या पाल्याचा रस, तांदुळाचें धुवण, यांस ठिकरी देऊन, त्यांत देणें. रक्तआंवेस किराइतींत व पोटशूळास जिऱ्यांत देणें. धातुस्रावास दूर्वांचे रसांत देणें किंवा तुळशीचा रस व मध एकत्र करून त्यांत देणें. सर्व प्रमेहांस भुईकोहळ्याचा रस व साखरेंत देणें. धातुस्रावास मुसळीकंद व साखरेंत देणें. धातुस्राव, प्रमेह, उष्णता इत्यादिकांस पुनर्नवामुळाचा रस, दूर्वांचा रस व गोपीचंदनांत देणें. किंवा पाषाणभेद, ज्येष्ठमध व पाणी यांत देणें. किंवा साखर व उंबराच्या सालींत देणें. नळवायु कुपित होऊन पोट फुगल्यास एरंडतेलांत देणें. धातुस्राव व दाह शमन होण्यास पद्मकाष्ठाच्या काढ्यांत देणें. ओकारी शमन होण्यास आंवळकठी, आंब्याची कोय व मधांत देणें. वायुशमनास अजमोदाचे पाण्यांत देणें. किंवा ओंव्याचे पाण्यांत देणें अथवा विड्याचे पानांत देणें. सन्निपात, त्रिदोष यांस समुद्रफळांत देणें.

१५७. **विषमज्वराचा काढा :** सुंठ ५ टांक, वाळा १ टांक, नागरमोथा ५ टांक, धणे ५ टांक, पिंपळी १ टांक, तांबडा चंदन ५ टांक, एकत्र करून काढा द्यावा. खोकला असल्यास मध घालून किंवा नसल्यास साखर घालून देणें.

१५८. **विषमज्वरास तेल :** गाईचें दूध, तिळाचें तेल, तूप, भुइकोहळा हीं औषधें एकत्र करून अग्नीवर चांगलें उकळून तयार झाल्यावर लावावें, विषमज्वर जाईल.

१५९. **उष्ण विकारास :** मुरदाडसिंग २ भाग, शंखजिरें १ भाग, काळा वाळा २ भाग, कात २ भाग, श्रीवर्धनी सुपारी २ भाग, इंद्रावणी बीज २ भाग, हीं सारीं औषधें वस्त्रगाळ चूर्ण करून, चूर्णाचे मानानें दसपट गाईचें तूप एका भांड्यांत ऊन करावें. व त्यांत हें चूर्ण टाकावें, थोडें शिजलें म्हणजे उतरून ठेवावें. तान्ह्या मुलास उष्णता उद्भवल्यास त्यास सकाळीं संध्याकाळीं एक एक बोट चाटण्यास द्यावें, व त्याच्या मातोश्रीस देऊन, त्यावर तीस विडा खाण्यास द्यावा. ज्यांस गर्मीचा आजार झाला असेल, त्यांस सकाळसंध्याकाळीं दोन दोन बोटें चाटण्यास द्यावीं, व त्यावर दिवसांतून तीन चार विडे खावे. तसेंच हें औषध त्वचेवरहि चोळावें. रसविकारापासून झालेल्या रोगावरही याचा उपयोग होतो. सात दिवसांत गुण. पथ्य केलें किंवा न केलें तरी चालेल. उत्तम गुणकारी.

१६०. **श्वासास :** भारंगमूळ, सुंठ, यांचें चूर्ण मधांत द्यावें.

१६१. **वायू, पोटशूळ यांवर :** (१) काकडशिंगी, हिंग, चित्रक, चवक, सैंधव, संचळ व वडांगळीखार यांचें एकत्र समभाग चूर्ण करून ऊन पाण्याबरोबर पिण्यास द्यावें. (२) आम्लवेत, सज्जीखार, जवखार, सुंठ, मिरें, पिंपळी, डाळिंबाची साल, तीवणी, पिंपळमूळ यांचें चूर्ण करून ऊन पाण्याशीं द्यावें. (३) अजमोदा, पट्कचोरा, रोहिणी-साल, वेखंड, पहाडमूळ, हरीतकी, गहुला, जिरेसाल, यांचें चूर्ण करून ऊन पाण्यांत द्यावें. (४) पुष्करमूळ, वेखंड, धणे, कायफळ एकत्र करून ऊन पाण्याशीं द्यावें. यानें संग्रहणी, गुल्म हींहि शमतील. (५) रुईमूळ, शेवगामळ, रिंगणी, मोथरिंगणी, वेलफळ, बिबे, कोरंटा, पळसपापडी, कायफळ, अघाडा, चित्रक, अडुळसा, पुष्करमूळ, सैंधव, बीडलवण, काचलवण (बांगडखार), व डांगळीखार, संचळ, हिंग हीं सर्व औषधें एकत्र करून वस्त्रगाळ चूर्ण करावें, व तें ऊन पाण्याशीं द्यावें. यानें भ्रम, पित्त, ताप, गुल्म व सर्व वायु, यांचें निर्दालन होतें. (६) 'मोरवेलीचूर्ण.'— आम्लवेत, चित्रक, वेखंड हीं एकत्र वस्त्रगाळ कुटून गाईचे ताकांत द्यावें. यानें संग्रहणी अष्टगुल्म, वायु, भगेंद्र यांचा नाश होऊन जठराग्नि प्रदीप्त होतो. (७) 'वडवानलचूर्ण.'— सुंट, पिंपळी, चित्रक, विडंग, करंजपान, हरीतकी हीं सर्व एकत्र कुटून वस्त्रगाळ चूर्ण करावें, व त्यांत थोडी साखर टाकून ह्यांच्या गोळ्या करून वायूवर द्याव्या.

१६२. **जुलाब :** रुईवार, गुलाबाचीं फुलें, शीतळचिनी, हीं एक एक टांक, वेलची अर्धा टांक, इंद्रजव पाव टांक. सूर्यखार ३ टांक, अशीं औषधें एकत्र कुटून

वस्त्रगाळ चूर्ण करावें. व पावशेर पाणी व पावशेर दुधांत हें चूर्ण प्रकृतिमानाप्रमाणें टाकून प्यावयास द्यावें. यानें फार मूत्र होऊन मुतखडा निघेल; धातुस्त्रावहि बंद होईल व उष्णता निघेल.

१६३. **गर्मीच्या ज्वरास** : दिवसांतून तीन वेळ प्रकृतिमानाप्रमाणें सूर्यखार पाण्यांत द्यावा. यानें शौचास पांढरें व पातळ होऊन ज्वर बंद होईल.

१६४. **शौचाचे वेळेस रक्त पडेल त्यास** : गरोळीचे बोखे (कोंवळे शेंडे) व मुस्ता एकत्र उकळून साखर घालून पिण्यास द्यावें.

१६५. **धातुस्त्रावास** : (१) गरोळीचें सत्त्व व दूर्वांच्या मुळ्यांचा रस, गाईचे दुधांत साखर घालून घेणें. (२) मुसळकंद व पाषाणभेद, दुधांत साखर घालून घेणें.

१६६. **गर्भाची वाढ खुंटलेली (सल) वाढीस लागण्याचा उपाय** : (१) दाळिंब पिकलेलें एक, अच्छेर ताकांत वांटून गाळून प्यावें. (२) विटाळशी झाल्यावर दुसरे दिवसापासून ७ दिवस ओंवा खात जावा. असें दोन तीन ऋतुकाळीं घ्यावें. **पथ्य**— तेल, तिखट, आंबट व वांगें वर्ज्य.

१६७. **पांडु, गुल्म, पित्तशूळ, क्षयादिकांवर मेघनादरसायनक्रिया** : गंधक, हिंग, हिंगूळ, टांकणखार, मिरें, दंत्याखार, सुंठ, सैंधव, पिंपळी, हिरडेदळ, ब्याहाडेदळ, ओंवा, किरमाणी ओंवा, आंवळकाठी, वेखंड, वावडिंगें ह्या औषधांचें समभाग चूर्ण करून, शेळीच्या अथवा गाईच्या दुधांत एकत्र गोळा करून, त्यांत जेपाळमगज घालून ४ प्रहर निंबाचे रसांत खल करावा, व त्याच्या गुंजाप्रमाण गोळ्या बांधून, शक्ति पाहून घेणें. **पथ्य**— गहूं, जोंधळे, तांदूळ, मीठ, डाळ हें खावें. वरकड वर्ज्य. तीन दिवसांत गुण.

१६८. **रातांधळ्यास** : तुंब्याचा रस काढून वाळत ठेवावा. वाळल्यावर आपल्या थुंकयांत उगाळून अंजन करावें.

१६९. **अहिऱ्यास उपाय** : बाभळीचें फूल व रक्तचंदन उगाळून अंजन करणें.

१७०. **अंत्रवृद्धीस** : टाकळीचा पाला कांजींत ऊन करून बांधावा.

१७१. **नेत्ररोगांवर औषध** : आंबेहळद निंबाच्या रसांत ४० दिवस भिजत घालावी. व नेत्रावाटें पाणी येत असेल किंवा केश आले असतील तर मधांत, त्या हळदीचें अंजन करावें. डोळे तांबडे पांढरे झाले असल्यास गाईचे दुधांत अंजन करावें. डोळे खुपतील, किंवा लाल होतील तर भांगेऱ्याचे रसांत अंजन करावें. डोळे तिडकतील तर पारोशा थंड पाण्यांत अंजन करावें. डोळे धुंद झाले तर स्त्रियांचे दुधांत अंजन करावें. दिसत नसल्यास वेळूच्या पानाच्या रसांत अंजन करावें.

१७२. **खवड्यास** : कण्हेरीचीं पानें जाळून तुपांत ताटामध्यें तांब्यानें खलून लावावें.

१७३. **दम्यास** : सातूचें पीठ वजन पक्कें शेरभर, त्यांत ओंवा आठ पैसेभार, सैंधव ६ भार, कुटून घालून रुईच्या दुधांत कालवून रोटगे दोन तीन करावे. व ते रानशेणींत भाजून, व भाजतेवेळीं खालवर रुईचीं पानें घालून, भाजल्यावर त्याचें चूर्ण करावें व तें सकाळीं दोन तीन मासे उष्ण पाण्याशीं २१ दिवस घेणें. बेचाळीस दिवस, एकंदर वावडे पदार्थ वर्ज्य.

१७४. **जीर्णज्वर, अरुचि, अग्निमांद्यास** : आंवळकठी ५ भाग, बाळहिरडे ५ भाग, सैंधव ३ भाग, चित्रक ५ भाग, पिंपळी ५ भाग, सुंठ ४ भाग, डिकेमाली ३ भाग, हिंग तोळ्यास गुंजभार, हीं औषधें वस्त्रगाळ कुटून निंबाचे रसांत घोटून, अधेला अधेलाभार गोळ्या बनवाव्या. एकेक गोळी सकाळ संध्याकाळीं ऊन पाण्याशीं घेणें. दिवस ३ किंवा ७. **सूचना**– हें औषध उत्तम आहे.

१७५. **नारूस औषध** : मोगली एरंडाच्या आंकऱ्या, पाण्यांत वांटून ऊन करून नारूवर बांधणें.

१७६. **खांडूक, व जखमेस मलम** : बाभळीची अंतरसाल व निंबाच्या काड्या, समभाग कुटून, मेण व तुपांत एकत्र करून मलम तयार करावा.

१७७. **लासरू, नारू, व्रण जाण्यास उपाय** : केस जाळून राख करावी. व ती राख मोरचूत, अफू, एकत्र करून गाईचे लोण्यांत कांशाच्या ताटांत खलून जखमेस लावावी.

१७८. **लासरूवर** : चिंचेच्या बियांचें वस्त्रगाळ चूर्ण करून लोण्यांत लावावें.

१७९. **डब्यास औषध** : कोहळ्याचा रस एक तोळा पोटांत देणें. वाळले कोहाळे असल्यास तांदुळांच्या धुवणांत उगाळून देणें.

१८०. **अगस्तिरसायन** : पारा, गंधक, हिंगूळ, बचनाग, अफू, हीं औषधें समभाग, व काळ्या धोतऱ्याचें बी २ भाग, असें एकत्र माक्याचे रसांत व तुळशीचे रसांत ४ दिवस खलून गुंजप्रमाण गोळ्या बांधाव्या. यास अनुपानें—(१) मध, पिंपळी. (२) आल्याचा रस, सैंधव. (३) तोंडलीं, मीठ. (४) दालचिनी, लोणी. (५) हिंग, तूप, सुंठ. (६) तुळशीचा रस, रानतुळशीचा रस. (७) डोरली, रिंगणी व विष्णुक्रांत यांच्या काढ्यांत. (८) हिरड्यांत डोळ्यांत अंजन केलें तरी चालेल. वर अनुपानें दिलीं आहेत त्यांचें अनुमान व प्रकृतिमान पाहून सर्व रोगांवर याची योजना करावी. **सूचना**— कदाचित् गुंगी आल्यास **उतार**– दहींभात.

१८१. **नळगुदास** : बाहव्याच्या मुळीचा रस, शिळें पाणी घालून काढावा. व तो ६ तोळे, आणि गाईचें तूप ३ तोळे, एकत्र करून घेणें व चोथा सर्वांगास लावावा.

१८२. **पुष्टतेस** : तमालपत्र, शहामुसळी, सफेतमुसळी, कवचबीज, उटंगणीबीज, अक्कलकारा, अजमोदा, बळबीज, गोखरूं, मोचरस, कचोरा, तेजबळ, कांटे-

रायी, लवंग, जायफळ, जायपत्री, कलमीदालचिनी, केशर, हीं समभाग चूर्ण करून, तीन तीन माशांच्या मधांत गोळ्या बांधाव्या. दोहींसांज घेणें. **पथ्य—** स्त्री वर्ज्य. वावडें वर्ज्य, एकवीस दिवस.

१८३. **पोटांत खापरी व कवलूस उपाय :** बांगडखार ३ मासे, बाळहिरडे १ तोळा, आंबेहळद १ तोळा, काळाबोळ ३ मासे एकत्र करून वस्त्रगाळ चूर्ण करावें. व मोरवेलीच्या पानांचा रस, दूध शिंपून, काढून, शक्तिमानाप्रमाणें चूर्ण घालून द्यावा. मोठ्या मनुष्यास २१ दिवस व मुलास ४२ दिवस.

१८४. **पोटांतील खापरी व कवलूस उपाय :** केशर २ मासे, जायपत्री १ मासा, टांकणखार ३ मासे, टांकणखाराची लाही करून सर्वांची एकंदर पूड करावी. व दूध शिंपून काढलेला विड्याच्या पानांचा रस किंवा दूध शिंपून काढलेला मोरवेलीच्या पानांचा रस व म्हशीचें मूत्र या दोन अनुपानांपैकीं प्रकृतिमानाप्रमाणें अनुपान योजून द्यावें. **पथ्य—** दोडका, शेवगा, यांची भाजी, उष्ण पाणी, तूप, दूध गहूं, तांदूळ यांचें सेवन करावें. वरकड वर्ज्य.

१८५. **जखमेस मलम :** राळ, मेण, शंखजिरें, कात, यांचें समभाग चूर्ण करून तुपांत कढवून गाळून ठेवणें व घायास लावणें, घाय भरून येईल.

१८६. **नासुरास औषध :** गुळशीच्या बीजांतील मगज मधांत वांटून, त्याची वात नासुरास द्यावी.

१८७. **वातापासून उत्पन्न झालेल्या सुजेस, गोळ्यास व ठणका होत असेल त्यास :** गुजर, राळ, बोळ, एलया, बाभळीचा डिंक, गुगुळ, कवड्या ऊद, हीं सर्व दोन दोन भाग; व सरस चार भाग; आणि अफू व रिंठे एक एक भाग, पाण्यांत वांटून एकजीव होईपर्यंत ऊन करावीं व लावावीं.

१८८. **जळवातास चोळण्याचें औषध :** शंखजिरें, मुरदाडसिंग, कात, हिरादखन, कपिला, हीं औषधें दोनदोन तोळे घेऊन चूर्ण करणें. व ओलें शेवाळें चाळीस तोळे घेऊन, त्यांत हें चूर्ण खलणें. व दररोज दिवसांतून २–३ वेळ सदर औषध, चोळण्याचे वेळीं त्यांत थोडी दह्यावरची साय घालून चोळीत जावें, हटकून गुण सात दिवसांत.

१८९. **वायूनें सुजलेल्या किंवा इतर गांठीवर लावण्यास मलम :** गुजर, रक्त्याबोळ, गुगुळ, रेवाचिनीचा शिरा, समभाग चूर्ण करून पाण्यांत किंवा कोंबडीच्या अंड्यांतील पांढऱ्या बिलगमांत लावावा.

१९०. **शीर गुळंबली असल्यास :** तूप, मध व हळद हीं एकत्र करून चोळावीं.

१९१. **पोट दुखत असल्यास :** कृष्णतुळशीचें बीं २ तोळे व जुना गूळ २ तोळे घेऊन १८ गोळ्या कराव्या. व एकेक गोळी सांज-सकाळ द्यावी.

१९२. **पुष्टतेस** : सालंमिश्री अच्छेर, लवंगा २ तोळे, वेला १ तोळा, केशर पाव तोळा, उटकटारीमुळाची साल १ तोळा, साखर अच्छेर, दूध अच्छेर, एकत्र पाक करून २१ दिवस घ्यावा.

१९३. **सर्व रोगहारक मात्रा** : माकामूळ, गुळवेलीची साल, निर्गुडीची साल, अश्वगंधमुळाची साल, रातांबीची साल, जायपत्री, जायफळ, सुरवरी हिरडेदळ, आवळकठी, खुरासनी ओंवा, अजमोदा, तिळवणीच्या मुळाची साल, कवचबीज, हीं प्रत्येक तीन तीन तोळे; व भुईडोरलीमुळाची साल, तरवडबीज, तरवडाची साल हीं प्रत्येक चार चार तोळे; व दालचिनी १० तोळे; आणि करडकांगोणीबीज व ब्याहाडेदळ आठ आठ तोळे; जुना गूळ ६ तोळे, हीं सर्व औषधें वस्त्रगाळ चूर्ण करून गुळामध्यें तीन तीन माशांच्या गोळ्या बांधाव्या. व सांज-सकाळ एक एक गोळी घेत जावी. **पथ्य**— नाहीं. दहा महिने औषध घ्यावें. याचे गुण महिनेवार येणेंप्रमाणें— प्रथम महिन्यांत सर्व रोग जातील. दुसरे महिन्यांत कोमल काया होईल, तिसऱ्यांत तेजी व पुष्टि, चवथ्यांत कुष्ठ जाईल, पांचव्यांत दुःख जाईल, साहाव्यांत प्रमेह, सातव्यांत स्त्रीप्राप्ति, पुष्टि, आठव्यांत सिद्धि होईल, नवव्यांत अधिकार व दहाव्यांत सर्व सिद्धि होईल.

१९४. **ताम्रभस्म** : तांबडा आघाडा समूळ कुटून पक्का अच्छेर वजन गोळा करावा. व त्यांत तांब्याचा तुकडा शोधन करून घालावा, व वरून सात मात-कापडे करावीं. गजपूट द्यावें, भस्म तयार होतें.

१९५. **ताम्रभस्म** : कांटे माठ मुळासुद्धां कुटून गोळा पावशेर करून, तांब्याचा तुकडा शोधून त्यांत घालून सात मातकापडें करावीं. व गजपूट द्यावें.

१९६. **ताम्रभस्म** : तांब्याच्या पत्र्यास सात शोधनें द्यावीं. मग रुईच्या चिकांत सात दिवस खलावें. आणि व्याघ्रीच्या पाल्याचा गोळा करून, त्यामध्यें घालून तीन मातकापडें करावीं व तीं वाळवून, एका मडक्यांत अर्धी वाळू घालून त्यावर तो गोळा ठेवावा. आणि त्यावर मडक्याच्या तोंडापर्यंत उभी काडी ठेवून वरती वाळू घालावी. काडी दिसावी. नंतर त्या मडक्यास पळसाच्या लाकडांचा अग्नि द्यावा. व ती काडी जळल्यावर अग्नि विझवून तयार झालेलें भस्म काढून घ्यावें.

१९७. **पित्तास औषध** : चिंचेच्या वाळलेल्या ढलप्या आणून जाळून भस्म करावें. व तें भस्म सुपारीभार खावें.

१९८. **आल्याचा पाक** : आल्याचे बारीक बारीक तुकडे करून तुपांत तळून चूर्ण करावें व चार शेर चूर्णास सुंठ तोळे ३, मिरें, पिंपळी, चंदन, तवकीर, लवंग, जायपत्री, चित्रकमूळ, चवक हीं प्रत्येक एक एक तोळा व साखर कच्चे शेर ५, हीं औषधें, आलें तळलेल्या तुपांतच तळून चूर्ण करावें. व हीं दोन्ही चूर्णें एकत्र करून, चांचणी येऊं द्यावी व औषधें टाकून त्यांच्या एक एक तोळा वजनाच्या

गोळ्या करून घेणें. त्यापासून आम्लपित्त, वात, शैत्य, कफ, यांचा नाश होऊन क्षुधा लागेल व पचन होईल.

१९९. **जायपत्रीपाक** : दुधांत जायपत्री घालून खवा करावा. व त्यांत तज, तमालपत्र, नाकेशर, वेलची, मुसळीकंद, कापूर, तगर, सुंठ, पिंपळी, खुरासनी ओंवा, बळबीज, मिरें, खसखस, अक्कलकारा, पुष्करमूळ यांचें समभाग चूर्ण घालून व त्यांत तोळ्यास गुंजप्रमाण अफू, औषधाचे पाऊण हिस्सा साखर घालून घेणें. यामुळें बल व पुष्टि प्राप्त होऊन, कास, श्वास हीं दूर होतील व भूक लागेल.

२००. **आस्कंदपाक** : दुधाचा खवा करून, त्यांत आस्कंद, सुंठ, मिरें, पिंपळी, तज, तमालपत्र, नाकेशर, बेल, शहाजिरें, वेलची, जायफळ, लवंग, मुसळीकंद, गोखरूं, शेपा, धणे, अजमोदा, विडंग, जायपत्री, पिंपळमूळ, चित्रक, अक्कलकारा, हळद, आंवळा हीं औषधें एकत्र कुटून वस्त्रगाळ चूर्ण करून घालावीं. व निम्मे भाग साखर घालून, दोन वेळा दोन दोन तोळे घेणें. यानें वातिकरोग, श्लेष्मरोग, सूज, कंबरेचा वायु, संग्रहणी इत्यादि रोग दूर होऊन, जठराग्नि प्रदीप्त होईल व बल, याची पुष्टि होईल. उत्तम गुणकारी आहे.

२०१. **विजयापाक** : भांग, तज, तमालपत्र, नाकेशर, वेलची, सुंठ, मिरें, पिंपळी, जायफळ, लवंग, जायपत्री, अर्जुनसादड्याची साल, बळबीज, वीखरबीज, आस्कंद, काकडसिंगी, दारुहळद, वाळा, पुनर्नवा, देवदार, भारंगमूळ, विडंग, खुरासनी ओंवा, पडवास, ज्येष्ठमध, मुसळीकंद, कवच, मायफळ हीं सर्व औषधें दोन दोन टांक, व अफू एक टांक, गोखरूं ५ टांक, अतिविष अर्धा टांक या सर्व औषधांचें वस्त्रगाळ चूर्ण करावें व अडीच शेर साखरेचा पाक करून त्यांत हें चूर्ण टाकून, गोळ्या बांधाव्या. व त्या सांज-सकाळ दुधाशीं घेत जाव्या. पुष्टि होईल, संग्रहणी जाईल, पचन होईल, श्वास, क्षयरोग हरेल; स्त्रियांस रजोदर्शनकाळी शूळ उत्पन्न होत असल्यास तो बंद होईल. पथ्य नाहीं. **उतार**— आंबट.

२०२. **शुंठीपाक** : सुंठ, तज, तमालपत्र, लवंग, केशर, पिंपळी, आम्लवेतस, शहाजिरें, जिरें यांचें समभाग चूर्ण करून तुपांत तळून सांज-सकाळ खावें. गुल्म, वायु, अरुचि, शूळ, अतिसार हीं दूर होतील.

२०३. **लघु शुंठीपाक** : सुंठ, लवंग, तज, तमालपत्र, नाकेशर, वेलची यांचें एकत्र चूर्ण करून तुपांत तळून सांज-सकाळ घ्यावें. मस्तकव्यथा, पित्त, संग्रहणी हीं शमतील.

२०४. **गोखरूंपाक** : पांच शेर दुधाचा खवा करून व त्यांत थोडें तूप घालून, त्यांत गोखरूं १ शेर, साखर ५ शेर, जायपत्री १ टांक, लोहभस्म, मिरें, कापूर, लवंग, अक्कलकारा, समुद्रफळ, बळबीज, आंवळा, पिंपळी, केशर, जायफळ, चित्रक, खुरासनीओंवा हीं दोन दोन टांक; या सर्वांचें वस्त्रगाळ चूर्ण करून टाकावें.

तसेच तीन मासे अफू खलून घालावी. हा पाक सेवन केला असतां पुष्टि व शक्ती प्राप्त होते.

२०५. **कवचपाक** : कवच १ शेर फोडून तुपांत तळून त्याचें वस्त्रगाळ चूर्ण करावें. व तें दुधांत घालून त्याचा खवा करावा. त्यांत जायपत्री, जायफळ, सुंठ, लवंग, अक्कलकारा, पिंपळी, जिरें, तज, तमालपत्र, नाकेशर, केशर, कापूर, कंकोळ, मिरें, समुद्रशोक, धणे, अतिविष, खुरासनी ओंवा, चित्रक, वाळा, गोखरू, विखरबीज, मुसळीकंद, मुसळीकंद काळा, पिंपळमूळ, हीं समभाग घेऊन, व अफू पाव तोळा घेऊन त्यांचें वस्त्रगाळ चूर्ण करून टाकावें. आणि पाऊण हिस्सा साखर टाकून घेत जावें. यापासून अतिशय शक्ति प्राप्त होईल.

२०६. **शिसेंशोधन** : अडूळशाचे रसांत शिशाचा रस खलावा. म्हणजे शुद्ध होईल.

२०७. **ताम्रभस्म** : ठिकरींत गंधक, पांच तोळे खालवर घालून, १ तोळा तांबें मध्यें घालावें. व धूर जाऊं न देतां मोठा अग्नि द्यावा.

२०८. **ताम्रभस्म** : तांब्याचा पत्रा तापवून निंबाचे रसांत विझवावा. वरप्रमाणेंच कृतीनें मोठा अग्नि द्यावा.

२०९. **ताम्रभस्म** : चोहिऱ्याचे चिकांत तांब्याचा पत्रा मुशींत घालून अग्नि द्यावा. भस्म होईल.

२१० **ताम्रभस्म** : मुशींत खालीं-वर पत्र्या हर्तोळीची भुकी घालून मध्यें तांब्याचा पत्रा ठेवावा व त्यांत रुईचा चीक घालून अग्नि द्यावा. भस्म होईल खरें, पण काळें होईल.

२११. **सुरवारी हिरड्याचा योग** : बारा महिने सुरवारी हिरडा अनुपानें बदलून घेत जाणें. त्यापासून सर्व रोग नाश पावून शारीरिक सर्व सिद्धता उत्तम राहते. **अनुपानें**– ज्येष्ठ, आषाढ, हे दोन महिने सुरवारी हिरडा गुळांत समभाग चूर्ण करून घ्यावा. श्रावण, भाद्रपद, सैंधवांत. आश्विन, कार्तिक, पिंपळींत. मार्गशीर्ष, पौष सुंठींत. माघ, फाल्गुन साखरेंत. चैत्र वैशाख मधांत. **पथ्य**– नाहीं.

२१२. **पित्तवायूस** : सुंठ, मिरें, जिरें, सोनामुखी, संचळ एकत्र समभाग चूर्ण करून घेणें.

२१३. **दांतखीळ बसल्यास** : कागदाच्या विडीचा धूर, दांतखीळ बसलेल्याच्या नाकांत फुंकावा. दांतखीळ उघडील.

२१४. **श्वासास** : भारंगमूळ व सुंठ कुटून वस्त्रगाळ चूर्ण मधाशीं घ्यावें.

२१५. **वायुशूळास** : कांकडसिंगी, हिंग, चित्रक, चवक, सैंधव, संचळ, वडांगळीखार एकत्र चूर्ण करून ऊन पाण्याबरोबर घ्यावें.

२१६. **वायुशूळास** : आम्लवेतस, साजीखार, जवखार, सुंठ, मिरें, पिंपळी, डाळिंबाची साल, तीतणी, पिंपळीमूळ एकत्र चूर्ण करून ऊन पाण्याशीं द्यावें.

२१७. **वायुशूळास** : अजमोदा, षड्कचोरा, रोहिणीशाळ, वेखंड पहाड, हरीतकी, गहुला, जिरें एकत्र चूर्ण करून ऊन पाण्याशीं घेणें.

२१८. **वायुशूळास** : पुष्करमूळ, वेखंड, धणे, कायफळ एकत्र चूर्ण करून ऊन पाण्याशीं घ्यावें. संग्रहणी, शूळ, गुल्म, वायु हीं शमतील.

२१९. **वायुशूळास** : 'हिंग्वादि चूर्ण'—कडू रुईमूळ, सेगटमूळ, रिंगणी, मोतरिंगणी, बेल, बिबे, कोरेटा, पळसपापडी, कायफळ, आघाडा, चित्रक, अडुळसा, पुष्करमूळ, सैंधव, बीडलवण, काच-लवण, वडांगळीखार, संचळ, हिंग एकत्र चूर्ण करून घ्यावें. भ्रम, वायु, पित्त, शूल, ताप, गुल्म इत्यादिकांचा उपशम होईल.

२२०. **मूत्र सुटावयास** : पळसाचीं फुलें वाफून पोटावर बांधावीं. व त्या पाण्यांत सूर्याखार व साखर घालून पोटांत घ्यावें. मूत्र सुटेल.

२२१. **धातुस्राव बंद होण्यास** : दूर्वांच्या मुळ्यांचा रस, तुळशीच्या पाल्याचा रस व मध अथवा साखर एकत्र घालून द्यावें.

२२२. **गर्भ वाढीस लागण्यास उपाय** : (१) उंबराची साल व पाषाणभेद पाण्यांत परतून, मध घालून घेणें. (२) ज्येष्ठमध, पाषाणभेद, उंबराची साल, यांचें चूर्ण पाण्यांत खडीसाखर घालून घेणें.

२२३. **रक्तस्राव व धातुस्राव बंद होण्यास** : गरोळीचें सत्त्व, कांचन-बीज, कांकडीबीज, चिबूडाचें बीज, कलांगडेबीज, दुधणीबीज, खसखस, बदाम, पिस्ते हीं औषधें एकत्र चूर्ण करून गाईचे दुधांत खडीसाखर घालून सांज-सकाळ घेत जाणें. हें औषध स्त्रियांच्या रक्तप्रदरासही गुणावह आहे.

२२४. **रक्तस्राव व धातुस्राव बंद होण्यास** : पुनर्नवा, ज्येष्ठमध, दूर्वांच्या मुळ्यांचा रस, गोपीचंदन, कमळाक्ष, पाण्यांत वांटून अथवा गाईचे दुधांत खडीसाखर घालून त्यांत घेणें.

२२५. **मुखांतूत रक्त पडत असल्यास** : कडवे बोरीची साल उकळून खडीसाखर घालून देणें.

२२६. **(अवलेह प्रकरण) पहिला** : चांगलें पक्कें जाहलेलें कोहळें वरील साल व आंतील बीं काढून साधारण फोडी कराव्यात. त्या पक्के पांचशेर घेणें. आणि त्यांस वाफ देऊन उकडाव्यात. नंतर त्या थोडथोड्या फडक्यांत घालून, कल्हई केलेल्या भांड्यांत अथवा चिनईच्या भांड्यांत पिळून जें पाणी निघेल तें एके बाजूला ठेवून मग त्या फोडी उघड्या हवेंत चांगल्या कोरड्या करून, अर्धा शेर उत्तम तुपांत तळाव्या. तसेंच सुंठ, मिरीं, पिंपळी, दालचिनी, तमालपत्र, वेलची, धणे, नागकेशर हीं सर्वच औषधें प्रत्येक तोळा तोळा घेऊन त्यांचें चूर्ण करून ठेवावें. नंतर पक्के पांच शेर खडीसाखरेमध्यें वरील कोहळ्याचें पिळून काढलेलें पाणी घालून पाक करावा. त्या पाकांत त्या फोडी घालाव्या. कांहीं वेळानें तें तयार केलेलें चूर्ण, मिळवून उलथण्यानें खालवर करून उतरावें. व तो पाक थंड झाला म्हणजे त्यांत अस्सल

मध अर्धा शेर घालून मग चांगला घोटावा. घोटल्यानंतर तो बरणींत किंवा लाखलोट्यांत भरून ठेवावा. ह्याचा कास, श्वास, उरःक्षत, रक्तपित्त, वांति, नेत्ररोग, तृष्णा, ज्वर यांवर उपयोग करावा. म्हणजे अवश्य गुण येतो. तसेंच या अवलेहाचें सेवन करून, गळा स्वच्छ होतो. धातूची वृद्धि होऊन अंगांत शक्ति येते. आणि शरीर तेजस्वी होतें, हें अगदीं खात्रीचें आहे.

२२७. **अडुळशाचा अवलेह** : अडुळशाचे पानांचा रस दहा शेर, खडीसाखर पांच शेर, बाळहिरड्याचें चूर्ण चार शेर, हीं एकत्र करून अवलेह करावा. नंतर त्यांत मध पावशेर, पिंपळीचें चूर्ण दोन तोळे, वंशलोचन पावशेर, दालचिनी एक तोळा, पत्रज एक तोळा, नाकेशर एक तोळा, हीं घालून आटवून बरणींत भरून ठेवावा. त्याचें सेवन केलें असतां गुल्म, उदर रोग, खोकला, श्वास, हृद्रोग, पीनस, गळवें, रक्तपिती, या रोगांचें मारण होतें. **पथ्य—** तेलकट, तिखट, आंबट, हीं वर्ज्य असावींत. **सूचना—** हा अवलेह लहान मुलांस देऊं नये.

२२८. **अवलेह कुड्याचा** : पांच शेर कुड्याची साल, सोळा शेर पाण्यांत घालून, अष्टमांश काढा करून घेऊन, तो वस्त्रगाळ करून, नंतर पुन्हा दुसरे भांड्यांत तो काढा आटत ठेवून दाट झाला म्हणजे त्यांत पहाडमूळ, कांटेसावरीचा डिंक अथवा सालीचा रस, धायटीचीं फुलें, अतिविष, लाजाळू बाळबेल ह्या औषधाचें चूर्ण चार तोळे घालून तो अवलेह तयार करावा. हा अवलेह गाईचें दूध, शेळीचें दूध, भाताची पेज, यांतून एखाद्या अनुपानाशीं घेणें. अतिसार, संग्रहणी, रक्तप्रदर, रक्तपिती, मूळव्याधीचें रक्त, तिडीक परमा, हातापायांचा दाह, तोंड, नाक, गुदद्वार, यांजवाटे ज्या मनुष्यास रक्त पडतें त्यास या अवलेहानें हटकून तीन दिवसांत गुण येतो. याखेरीज सात किंवा चौदा दिवस घेतला असतां, अतिशयित पडणारें रक्त निःसंशय बंद होतें. **पथ्य—** वातुळ, फार गरम, तेलकट, तिखट, आंबट, जागरण, मैथुन, हीं वर्ज्य असावींत.

२२९. **आंवळ्यांचा अवलेह** : ओल्या आंवळ्यांचा रस तीन शेर, गूळ अडीच शेर, निशोत्तराचें चूर्ण पावशेर, तिळाचें तेल अर्धा शेर, सैंधव, संचळ, बिडलोण, सांबरलोण, समुद्रलोण, ओंवा, अजमोदा, खडीशेरणी, जिरे, त्रिफळा, त्रिकटु, चवक, चित्रक, पिंपळमूळ, पहाडमूळ, धणे, पिंपळी, वावडिंग, हीं प्रत्येक औषधें तोळा एक एक प्रमाणें घेऊन, त्या रसांत टाकून, रीतीप्रमाणें अवलेह करावा. नंतर दालचिनी, तमालपत्र, वेलचीदाणे, यांजबरोबर सेवन केलें असतां, वर्ण, कुष्ठरोग, उदरभेद, संग्रहणी, पंडुरोग, यांचें मारण होतें.

२३०. **गुटिका पहिली** : तीन भाग बोरफळ, दोन भाग त्रिकटु (सुंठ, मिरें, पिंपळी) पाव भाग कापूर, बारा भाग साळीच्या लाह्या, जायफळ, जायपत्री, वेलची, हीं एक एक भाग, वंशलोचन आठ भाग, चिंच चार भाग, खडीसाखर साठ भाग हीं सर्वत्र कुटून एकत्र झालें म्हणजे हरभऱ्याएवढाल्या गोळ्या करून, प्रत्येक दिवशीं एक गोळी सेवन केली असतां, खोकला, ज्वर, रक्तपिती, हीं जातात.

२३१. **गुटिका दुसरी :** पिंपळी दोन तोळे, खडीसाखर चार तोळे, मनुका चार तोळे, खारीक चार तोळे, मोहाचीं फुलें अर्धा तोळा, तमालपत्र अर्धा तोळा, दालचिनी अर्धा तोळा, वेलची अर्धा तोळा, सर्वांचें चूर्ण करून मधेंत खलून लहान बोराप्रमाणें गोळ्या कराव्यात. प्रतिदिवशीं सकाळीं–संध्याकाळीं मिळून गोळ्या दोन खात गेलें असतां, धातुवृद्धि होते, व गुचकी, कास, श्वास, ज्वर, वांति, अग्निमांद्य, कफाचा बेडका पडणें, उरःक्षत, रक्ताचा बेडका पडणें, रक्तपिती, वात, तृष्णा, अरुचि, प्लीहोदर, बरगड्याचा शूळ आणि राजयक्ष्मा, इत्यादि रोगांवर उत्तम प्रकारें गुण येतो. तसेंच आम्लपित्त व रक्तशुद्धि यांसहि या गोळ्यांनीं उत्तम गुण येतो.

२३२. **गुटिका तिसरी :** आंवळकठी तोळा एक, वावडिंग तोळा एक, हरितकी तोळा एक, तेड तोळे तीन, गूळ तोळे सहा,— प्रथम गुळाचा पाक करून, त्यांत बाकीचे औषधांचें चूर्ण मिळवून, तीन मासे प्रमाणें गोळ्या कराव्यात. यानें श्वेतकुष्ठ, मूळव्याधी, गुल्म, उदररोग, जंतविकार, व्रण, श्वास, कास, यांजवर योजिला असतां तात्कालिक गुण येतो.

२३३. **व्रणावर उपाय :** (१) जाईचा पाला, कडूनिंबाचा पाला, पडवळाचा पाला, ह्यांचे रस पाव पाव शेर घेऊन, कुटकी, मोरचुताची लाही, हळद, दारुहळद, मंजिष्ठ, कावळी, मोहोळाचें मेण, करंजबीज, ज्येष्ठमध, वाळा, हीं औषधें प्रत्येक एक एक तोळा घेऊन, त्यांचा काढा करून, त्या सर्वांचे दिढीनें तूप घालून, मंदाग्नीनें तूप सिद्ध करणें व तें व्रणावर लावावें. म्हणजे तात्कालिक गुण येतो.

२३४. **बिब्याचा पाक :** बिबे पावशेर, गाईचें तूप पावशेर, गाईचें दूध पावशेर, सुंठ, मिरें, पिंपळी, आस्कंद, दालचिनी, तालीसपत्र, यांचें चूर्ण एकेक तोळा, साखर पांच तोळे, याप्रमाणें वजनवार घेऊन, प्रथम बिबे तीन-चार वेळां पाण्यांत धुऊन, पावशेर पाण्यांत ते बिबे, पितळेच्या कल्हई केलेल्या भांड्यांत शिजवावे. नंतर सर्व पाणी आटलें म्हणजे त्यांत दूध टाकावें. आणि मावा होईपर्यंत घोटीत असावें. नंतर वर झांकण ठेवून, अम्मळ स्वस्थ बसावें. आंत ते बिबे फुटूं लागतात. व तें फुटणें बंद झाल्यावर गाळून घ्यावें. आणि वरील तयार केलेलें चूर्ण व साखर त्यांत टाकून चांगलें घोटून, एकजीव झाला म्हणजे बरणींत किंवा दगडी भांड्यांत भरून वर झांकण बसवून, एकवीस दिवसपर्यंत धान्याचे राशींत पुरून ठेविलें असतां, अमृततुल्य गुण करितो. हा पाक कंबर, सर्वांगाची फूट, किंवा सांधे, उदररोग, गुल्मरोग, आमवायु, मूढवायु, अर्धमानवायु, बहुमूत्रता, बद्धकोष्ठ, सर्वांगवायु, पोटशूळ, अनंतवात, शिरोरोग, अर्धशिशी, वातजन्य, कफजन्य, आणि ज्वर इत्यादि रोगांवर हा सेवन केला असतां, खात्रीपूर्वक हटकून रामबाण गुण येतो. ह्याचें प्रमाण– प्रतिदिवशीं अर्धा एक तोळा गाईच्या तुपांत मिश्रित करून घेणें. **पथ्य–** तूप, साखर, मिष्टान्न, गाईचें दूध व भात, पोळी खाणें. बाकी वर्ज्य.

२३५. **स्त्रियोपयोगी पौष्टिक पाक :** सोळा तोळे जटामांसी, गाईच्या सोळा तोळे तुपांत तळून, नंतर दोनशें बावन तोळे गाईच्या दुधांत शिजवून, त्या तुपासहित दुधाचा मावा करावा. त्या माव्यावर जें तूप येईल, त्यामध्यें बाभळीचा डिंक आठ तोळे तळून काढावा, त्याचें चूर्ण करून नंतर एकशें पंचवीस तोळे धुवा साखरेचा पाक करून, त्या पाकांत नागरमोथे, त्रिकटू, पाषाणभेद, लोध्र, जायपत्री, शतावरी, मंजिष्ठ, धायटीचीं फुलें, मायफळ, बेलफळ हीं प्रत्येक एकेक तोळा, मोचरस चार तोळे, यांचें चूर्ण करून त्या पाकांत वरील एकंदर औषधें मिळवून, त्याचे अडीच तोळे प्रमाणाचे लाडू बांधून दररोज एक लाडू प्रातःकाळीं घेणें म्हणजे ज्या स्त्रीस दुर्धट प्रदराचा विकार होऊन, शरीर क्षयाप्रत पावलें आहे, तिलाहि दिला असतां, सर्व प्रकारचे प्रदराचा समूळ नाश होऊन, रक्तशुद्धि होते. व बळ, तेज, कांति आणि पुष्टता हीं दिवसानुदिवस वाढत जातात यांत संशय नाहीं.

२३६. **रोचक चूर्ण :** त्रिकटू, त्रिफळा, हळद, हीं समभाग घेऊन, वस्त्रगाळ चूर्ण करून, तें प्रत्येक वेळीं मधाबरोबर दोन टांक प्रमाणें चाटावें, या योगानें तोंडाची अरुचि जाऊन चांगली रुचि येते.

२३७. **शक्तिवर्धक औषध :** जायफळ, जायपत्री, लवंग, वेलची, तमालपत्र, बळबीज, धणे, त्रिकटू, मोचरस, चिकणी सुपारी, वावडिंग, नाकेशर, कंकोळ, तेजबळ, केशर, रसकापूर हीं सर्व समभाग घेऊन चूर्ण करावें. तसेंच चांगली शुद्ध केलेली अफू एक तोळा, मध एक तोळा, चिनी खडीसाखर दीड तोळा, शिलाजित तीन तोळे, यांचे चूर्णामध्यें वरील केलेलें चूर्ण मिळवून, मधेंत हरभऱ्याप्रमाणें गोळ्या बांधाव्या. एक गोळी रात्रीं निजतेवेळीं विड्यांत खात गेलें असतां, शरीरास पुष्टता आणि पुरुषत्व प्राप्त होतें. ही गोळी दीपन, पाचन करते.

२३८. **व्रणावर मलम :** (१) गाईचें लोणी अडीच तोळे, कल्हई सफेता एक तोळा, कापूर मासे तीन, हीं औषधें दगडी खलबत्त्यांत घोटून मलम तयार करावा. तो गरमीचे चट्टे, दाहजन्य, रक्तजन्य चट्टे, कोष्ठ, खरूज, विस्फोटक, रक्तीमोडाची मूळव्याधीचे व्रण, इत्यादि अनेक व्रणांवर लाविला असतां बरे होतात. (२) बाभळीची अंतरसाल पांच शेर आणून कुटावी, त्यांत पक्का शेर पाणी घालून मातीच्या मडक्यामध्यें काढा करावा. तो काढा अष्टमांश राहिला म्हणजे गाळून घेणें. नंतर त्यांत कडूनिंबाच्या ओल्या सालीचा अथवा थोडें पाणी घालून घट्ट रस काढावा. तो सुमारें अडीच किंवा तीन तोळे घालून, मैदालकडी आणि मध, हीं एक एक तोळा घालून सर्वत्र एकत्र खलून, घट्ट मलमाप्रमाणें झालें तर बरें, नाहींपेक्षां दीड तोळा खडीसाखर मिळवून घट्ट मलमाप्रमाणें होईपर्यंत कढवावें. तें मलम, नासूर, भगेंद्र, मूळव्याधीचे मोड, तसेंच ठोकर लागून पडलेल्या व्रणावर लाविलें असतां हटकून गुण येतो. (३) गाजराचा आंगरस, मध, तोटीगंधक, खडीसाखर, हीं समभाग घेऊन एकत्र करून वांटावें. मग मलमाप्रमाणें घट्ट करावें. तें मलम, गजकर्ण, इसब,

नायटे, हाडीव्रण, नाडीव्रण, पाय फुटणें, ह्या सर्वांवर अनुभाविलें असतां हटकून गुण येतो. (४) चांगलें खोबरें किसून किंचित् उन्हांत तापवून, नंतर त्याचें हातानें मसळून तेल काढावें. तें तेल चुलीवर अमळ गरम करावें. नंतर त्यांत मोहोळाचें मेण घालावें. व तें वितळलें म्हणजे त्यांत मुरदाडसिंग व राळ, यांचें चूर्ण टाकून खालीं उतरावें. नंतर त्यांत शेंदूर, कंकोळ, तेजबळ, त्रिफळा, (हिरडा, बेहेडा, आंवळकठी) व तिळाचें तेल, हीं प्रत्येक अर्धा अर्धा तोळा घेणें, व त्यांचें चूर्ण करून त्यांत घालावें. आणि पुन्हा तें सर्व मिश्रण एका दगडी खलबत्त्यांत घालून चांगला दाट चिकटा होईपर्यंत घोटावें. म्हणजे तें मलम लावण्यास उपयोगीं पडतें. त्याचे गुण—सर्व प्रकारच्या गांठी, विद्रधि, गंडमाळा, बद, कुष्ठ, व्रण, (दुर्गंधीयुक्त भयंकर वायुव्रण) खांच पडलेल्या जखमा, यांजवर या मलमाची वस्त्रावर लावून पट्टी लावीत गेलें असतां, हीं लवकर भरून येतात. असा या मलमाचा अनुभविक गुण येतो.

२३९. **आंव अतिसारास** : (१) अजमोदा, धायटीचीं फुलें, काकडसिंगी, सुंठ, मुरदाडसिंग, पडवास, अतिविष, मोथ, बेलकाचरी, डाळिंबाची साल, मोचरस, भांग, मायफळ, विडंग, कुंभील (कायफळ), समभाग चूर्ण करून, व त्यांत अफू, प्रत्येक औषधाच्या वजनाचे पाव हिस्सा घालून, आंव अतिसारास द्यावें. (२) जायफळ, जायपत्री, अतिविष, भांग, मायफळ, वाळा, विडंग, सोनगेरू, डाळिंबाची साल, हीं समभाग व अफू पाव भाग, एकत्र कुटून गोळ्या बांधाव्या व त्या घ्याव्या.

२४०. **अतिसारज्वरास** : कडूगरोळ, सुंठ, बेल, यांचा काढा द्यावा.

२४१. : **धातुस्राव बंद होण्यास** : सावरीचे सालीचा रस, जवांचें सत्त्व, गोखरूंचूर्ण हीं औषधें समभाग चूर्ण करून साखर घालून घेणें.

२४२ : **मूत्राचे वेळीं तिडीक लागते, ती दूर होण्यास** : (१) किरायत, नागरमोथा, गरोळ, यांचा काढा करून साखर घालून देणें. (२) सूर्यखार, व पळसाचीं फुलें साखरेशीं घेणें.

२४३. **वायूमुळें कानानें ऐकूं येत नसल्यास** : चमेली पानाचा रस, गोमूत्र, कापूर, एकत्र कढवून कानांत घालावें.

२४४. **कान तिडकून पू रक्त निघाल्यास** : जाईचे पानाचा रस, बोकडाचें मूत्र, सैंधव, एकत्र ऊन करून कानांत घालावें.

२४५. **मूत्र सुटावयास** : वेलची, पाषाणभेद, पिंपळी, शिलाजित, एकत्र करून तांदुळाचे धुवणांत देणें.

२४६. **वायूस उतार** : पिंपळी, लवंग, आल्याचा रस, सेंगट सालाचा रस, नागवेलीचा रस, कस्तुरी (४ गुंजा), चित्रक (एक तोळा), हीं औषधें मधांत खलून देणें. महावायु उतरेल. दांतखीळ उघडेल.

२४७. **दाढ दुखत असल्यास :** वाघोटीचें पान, तोंडलीचें पान, वारव्याचें पान, यांचा रस काढून, उजवी दाढ दुखत असेल तर डाव्या कानांत घालावा, व डावी दुखत असल्यास उजव्यांत घालावा, व त्याची पेंड वर बांधावी. कानांवाटे किडे पडतील.

२४८. **कान फुटल्यास :** निंबाचा रस कानांत घालावा. कान उतरेल. मग तीन दिवस मध कानांत घालावा. हेंदर बाहेर काढील. मग तीन दिवस माकळीची कंवटी बारीक करून घालावी. नंतर काडीस कापूस लावून औषध बाहेर काढावें. असें पाच दिवस करावें. मळ फार निघेल व कान बरा होईल. (२) जस्ताचें भस्म कानांत घालावें. (३) अभ्रकभस्म कानांत घालावें. (४) वणईच्या पाल्याचा रस काढून तुपांत कढवून रस शोषून घ्यावा, व तें तूप कानांत घालावें. कान बरा होईल. ठणकाही राहील. (५) समुद्रफळ तेलांत उगाळून कानांत घालावें. रुईचें पान ऊन करून त्याचा रस कानांत घालावा. यानें ऐकायला चांगलें येईल. तिडीक राहील.

२४९. **डोळे आरक्त झाले असल्यास :** जस्ताचें भस्म डोळयांत घालावें.

२५०. **नाकांतून रक्त पडणें** (बोळणा फुटणें) **बंद होण्यास :** पाच सात वर्षांच्या जुन्या कापसाची धुरी नाकास द्यावी. मस्तकांतील किडे पडतील. (२) रुईच्या काठीची नळी करून व त्यांत जुना कापूस भरून नाकास धुरी द्यावी.

२५१. **अर्धशिशीस :** जुन्या कापसाची धुरी द्यावी. किंवा रुईचे लांकडाच्या नळींत जुना कापूस भरून त्याची धुरी द्यावी. तीन दिवसांत किडे मरतील.

२५२. **किरीमास† काढा :** धणे, नागरमोथा, उंदीरकानी, त्रिफळा, देवदार, पिंपळी, विडंग, इंद्रजव, दारुहळद, निंबपत्र, महाळुंगबीज यांचा काढा करून देणें.

२५३. **प्याहास उपाय :** वाळलेला आघाडा जाळून भस्म करावें, व तें गुळांत द्यावें. रात्रीं मिठाचें पाणी उशाशीं ठेवावें व मध्यरात्रीं न उठतां पाणी प्यावें आणि सकाळीं तोंडांत मिठाचा खडा करून धांव मारून, एका दमांत पुन्हा त्याच ठिकाणीं यावें. येणेंप्रमाणें सात दिवस केलें असतां प्याहा जाईल.

२५४. **नारूस उपाय :** (१) भेंडीचें भेंड वाटून मुलाचे मुत्रांत खदखदून तो पेंड नारूस बांधावा. नारू बाहेर येईल. (२) नागवेलीच्या पानास तूप लावून तें शेकून बांधणें. बांधणें. दोरा निघेल. (३) रुईचे पानास तूप लावून तें शेकून बांधणें.

२५५. **ज्वरास उपाय :** दह्यांतील पाणी वस्त्रानें गाळून टाकावें, व त्या सुक्या दह्यांत शंखजिरें द्यावें. उष्णज्वर निघेल.

---

† **किरीम :** म्हणजे पोटांत एका जातीचे सूक्ष्म जंतु उत्पन्न होऊन, ते जंताप्रमाणें पीडा करतात.

२५६. **धातुस्राव, प्रमेह, हे बरे होण्यास** : शंखजिरें, जिरें, ऊद, पांढरा, गोखरू, यांचें वस्त्रगाळ चूर्ण करून, गाईच्या दुधाचा खवा करून त्यांत चूर्ण व साखर घालून घेणें.

२५७. **पुरुषास प्रमेह व स्त्रीस प्रदरावर** : शंखजिरें, तवकीर, कापूर, एकत्र चूर्ण करून दुधांत घेणें. त्यांत सूर्याखार घालून घेतल्यास उष्णज्वर शमेल. केवड्याचें मूळ, माडाचें मूळ, वडाच्या पारंब्या यांचे रसांत तवकीर, जिरें, शहाजिरें, गाईचें दूध व साखर एकत्र करून घेणें. सर्व प्रमेह व प्रदर दूर होतील.

२५८. **पक्षवायु व संधिवायूस उपाय** : शोधलेला रसकापूर एक टांक, कस्तुरी १ गुंज, मिरे ४ टांक, लवंग १ टांक, एकत्र वाटून पाण्यांत चार गोळ्या बांधाव्या व त्या एकच वेळ घ्याव्या, व वर उष्णोदक प्यावें. **पथ्य**— मीठ, गारगार पाणी, तूप, साखर, हे वर्ज्य. पांच दिवस औषध घेणें. **सूचना**— उष्ण प्रकृतीस एकच गोळी घेणें.

२५९ **गजकर्णास** : मुरदाडसिंग, तुरटी, पळसपापडी, मनशील, मायफळ हीं एकत्र वाटून निंबाचे रसात लावावें.

२६०. **मस्तकशूलास** : (१) जाईचीं पानें, एरंडाचीं पानें, कोष्ठ, तांदूळ, हीं एकत्र पाण्यांत वाटून मस्तकास लेप करावा. (२) कोष्ठ, रसांजन, अफू, पांढऱ्या भोपळ्याची कंवटी, समुद्रफळ, हीं सर्व औषधें निंबाचे रसांत वाटून ऊन करून लावावें.

२६१. **क्रव्यादिरस** : नवसागरखार, सूर्यखार, जवखार, संचळ, गंधक, व पारा शुद्ध केलेला, काचेलोण, टांकणखार, बीडलवण, रुईखार, हीं प्रत्येक नऊ नऊ टांक, व सुंठ, पिंपळी, मिरें, जिरें, हिरडे, ब्याहाडे, आंवळकठी, चवक, हीं प्रत्येक १२ तोळे, यांचें चूर्ण लिंबाच्या रसांत खलून ४ टांकाची मात्रा बांधून, प्रकृतिमानाप्रमाणें देणें. यानें गुल्मवायु, पोटदुखी, ओकारी, कास, श्वास, आंव, संधिवात, मस्तकव्यथा, ऊर दुखल्यास उपशम होईल.

२६२. **मुसळीकंदाचीं अनुपानें** : जांबुरसांत देणें, नेत्रवायु जाईल. पळसाच्या सालीच्या रसांत देणें, आतिसार जाईल. शेळीचे दुधांत देणें, सर्व वायु शमतील. आघाड्याच्या मुळाचा रस, जिरें, सुंठ, तांदुळजाचा रस, गोघृत, यांत देणें, वांझेसहि पुत्र होईल व क्षयरोग जाईल. नारळ, मुस्ता, कोथिंबीर यांत देणें, सर्व प्रमेह शमतील. मेंढीचे दुधांत देणें, स्तंभन होईल.

२६३. **घावावर** : वांग्याचीं पानें वाटून लेप करणें. सात दिवसांत बरा होईल.

२६४. **ढाळ, मुरडा, बंद होण्यास** : सुंठ, आतिविष, तुरेसाकूड, जायफळ, हीं औषधें भाजून कुटून गोळी करून घेणें. किंवा ताकांत ठिकरी विझवून घेणें.

२६५. **पक्षघातास** : रसकापूर व कस्तुरी दीड दीड वाल, मिरें दहा टांक, लवंग १ टाक, एकत्र खलून, दिवसांतून तीनदां, असें २१ दिवस देणें.

२६६. **अजीर्णास** : लसूण, जिरें, गंधक, सैंधव, सुंठ, मिरें, पिंपळी, हिंग, यांचें चूर्ण करून निंबाच्या रसांत गोळ्या करून घेणें.

२६७. **दमा, खोकला व कफ यांस** : कंकोळ ४ तोळे, वेलची ६ तोळे, लवंग ८ तोळे, पिंपळी १२ तोळे, ज्येष्ठमध १२ तोळे, मिरें १६ तोळे, सुंठ १६ तोळे, तज १६ तोळे, भारंगसाल १८ तोळे, एकत्र चूर्ण करून तें अर्धा तोळा पिठीसाखर घालून घेणें. **पथ्य**—तेलकट वर्ज्य, चौदा दिवस.

२६८. **काविळीस उपाय** : डवचिनीचा पाला तोळे दोन, दररोज खावा. सात दिवस. **पथ्य**— अळणी, व भाकर मात्र खावी.

२६९. **दांतांत कीड उत्पन्न झाल्यास** : उत्तर दिशेचें गुंजेचें मूळ घेऊन, कुटून, रात्रीं निजतेवेळीं दाढेंत धरावें. सकाळीं काढून टाकावें, किडे निघतील.

२७०. **गाईस किंवा म्हशीस दूध सुटावयास** : कुयलीच्या मुळ्या ५ तोळे, चाऱ्याबरोबर खाण्यास देणें. तीन दिवस.

२७१. **संग्रहणी व मुर्ड्यास** : तुरेसाखड, आतिविष, सुंठ, जायफळ, मुरुडशेंग, हीं औषधें समभाग भाजून तुपांत गोळी करून घेणें.

२७२. **पित्तज्वरास काढा** : सुंठ, वर्योळी, ज्येष्ठमध, वावडिंग, किराईत, तज, काळीं द्राक्षें, गुलाबफूल, पिंपळमूळ, एकत्र समभाग घेऊन काढा घेणें. हाडीतापहि निघेल.

२७३. **वायूस चूर्ण** : सुंठ, मिरें, पिंपळी, अजमोदा, सैंधव, शहाजिरें, हिंग, एकत्र चूर्ण २ टांक, ऊन पाण्याबरोबर घेणें.

२७४. **वातपित्तास औषध** : टाकळीचें बीज, हळद, दही, यांपैकीं दोन घटका टाकळीचें बीं पाण्यांत भिजत टाकून दही व हळद टाकून वाटावें व तें वातपित्तास चोळीत जावें.

श्रीसिद्ध गोरक्षनाथांचीं औषधें

यांपैकीं बरींच औषधें, निघंटू, शाङ्‌र्गधरादि ग्रंथांत आहेत. परंतु पुष्कळ ठिकाणीं यांत त्यांत भेद आहे. कोठें औषधें घेण्यांत, कोठें कृतींत. अनुपानांत तर फार भेद आहेत; म्हणून त्यांचीं तीं सिद्धौषधें याखालीं देतों.

२७५. **श्वासकुठाररस** : पारा १ तोळा, गंधक १ तोळा, भरगुले टांकणखार १ तोळा, मनशीळ कणेरी १ तोळा, बचनाग १ तोळा, हीं शुद्ध करून व सुंठ २ तोळे, पिंपळी २ तोळे, मिरें १० तोळे, हीं सर्व औषधें, नागवेलीच्या रसांत खलणें, ३ पुटें देणें. गुंजभार गोळी बांधणें. विड्याच्या रसांत देणें. श्वास, कास, क्षयरोग, उरःक्षत, अपस्मार, शैत्य, वात, हीं सर्व नाश पावतील.

२७६. **विघ्नगणेश रस** : ताम्रभस्म, लोहभस्म, रससिंदूर, गंधकभस्म, नागभस्म, रुपेंभस्म, सुंठ, मिरें, पिंपळी, हीं सर्व औषधें प्रत्येकीं एक एक तोळा घेऊन, भुईकोहळ्याचे रसांत त्यास ३ भावना द्याव्या. गुंजप्रमाण गोळी करावी. हा आतिसार, संग्रहणी, वांती, शैत्य, उदरशूळ इत्यादिकांवर चालतो.

२७७. **घोडाचोळी रस** : पारा, गंधक, हरताळ, हीं औषधें शुद्ध करून, व नागभस्म, टांकणखार, भुरगुले, अमळमिसरी, पिंपळी, मिरें, सुंठ, हिरडे, बेहडे, आंवळकठी, हीं औषधें शुद्ध करून समभाग घेऊन माक्याचे रसांत खलणें व दोन गुंजप्रमाण गोळ्या बनविणें. **अनुपानें**—आतिसारास गाईचे ताकांत किंवा जायफळांत देणें; यानें संग्रहणीहि शमेल. सेंगटरसांत पोटशूलास देणें. यानें ढाळ, मोडशी, हींहि शमतील. एरंडेल तेलांत देणें, ढाळ होतील. लिंबाच्या रसांत विंचवाचे दंशावर लावणें, विंचू उतरेल. निर्गुंडीच्या रसांत अजीर्ण मोडेल. शेळीचे दुधांत देणें, थंड प्रमेह बंद होईल. भुईकोहळ्याच्या रसांत देणें, तिडकी प्रमेह बंद होईल. निर्गुंडीच्या रसांत अंजन करणें, भूतसंचार जाईल. गुळांत देणें, बद्धकोष्ठ मोडेल. साखरेंत देणें, ताप शमेल. त्रिफळ्याच्या चूर्णांत देणें, ऊर्ध्वश्वास राहील. जिऱ्यांत देणें, उन्हाळें शमेल. विड्यांत देणें, शरीरावर उत्तम कळा येईल. पाण्यांत देणें, पालीचें विष उतरेल. मुरुडशेंगेशीं देणें, मुरडा बंद होईल. पुत्रजीवनरसांत देणें, वांझेस पुत्र होईल. तांदुळज्याचे रसांत देणें, घोणसाचें विष उतरेल. साखरेंत सर्व तापांवर देणें. साखर व जिऱ्यांत देणें, जाळताप शमेल. गोपीचंदनाशीं देणें, रक्तप्रदर बंद होईल. द्राक्षाच्या रसांत अंजन करणें, डोळे आलेले बरे होतील. अक्कलकाऱ्यांत देणें, श्लेष्मा बंद होईल. आल्याच्या रसांत देणें, ताप जाईल. चित्रकाचा रस, आल्याचा रस, सेंगटरस, मध व लवंग यांत देणें, सर्व वातसंधि, धनुर्वात, पक्षवात, हीं हरतील. काशिवद्याच्या रसांत देणें, भूक लागेल. वाळ्याचा काढा व साखरेंत देणें, सर्व प्रमेह शमतील. निर्गुंडीच्या रसांत देणें, शहारे राहतील. मनुष्याचे मूत्रांत देणें, जलोदर व प्याहा यांचा नाश होईल. चिंचेच्या रसांत देणें, कंठवात हरेल. निंबाच्या रसांत अंजन करणें, मोडशी उतरेल. कारल्याच्या रसांत अंजन करणें, रातांधळें जाईल. अडुळशाच्या रसांत देणें, नाकातोंडांतून रक्त पडत असल्यास शमेल. (कपाळीं टिळा लावणें, सर्व जन वश होतील.)

२७८. **मदनकामेश्वर रस** : अभ्रकभस्म अर्धा तोळा, धोतऱ्याचें बीं अर्धा तोळा, सोनें २ मासे, रुपेंभस्म अर्धा तोळा, उंची चंदन ४ मासे, वंग अर्धा तोळा, ताम्रभस्म अर्धा तोळा, मोती २ मासे, कस्तुरी ३ मासे, अंबर ३ मासे, केशर ४ मासे, रसभस्म ३ मासे, हीं सर्व औषधें नागवेलीच्या रसांत खलणें, ३ पुटें देणें; नंतर जायफळ, जायपत्री, लवंग, अक्कलकारा, हीं औषधें प्रत्येक तीन तीन टांक घेऊन, त्यांचा काढा करून त्याचीं तीन पुटें द्यावीं. नंतर सुंठ, मिरें, पिंपळी, वाळा, चंदन, मुस्ता, वेलची, हीं औषधें प्रत्येक पांच पांच टांक घेऊन, त्यांचा काढा करून, त्याचीं ३ पुटें द्यावीं. नंतर दालचिनी ५ टांक, तमालपत्र ५ टांक, गोखरूं ९ टांक,

मुसळीकंद ९ टांक, यांचा काढा करून त्याचीं ३ पुटें द्यावीं. मग वालप्रमाण गोळ्या बांधून घेणें. या गोळ्या घेण्यास एक चूर्णाचें अनुपान असें तयार करावें.—सुंठ, पिंपळी, मिरें, लवंग, जायफळ, जायपत्री, तज, तमालपत्र, नागकेशर, गोखरूं, मरकटबीज, मुसळीकंद, वीखरबीज, बळबीज, पाषाणभेद, अक्कलकारा, वेलची, हीं औषधें सम-भाग घेऊन चूर्ण करणें; व हें चूर्ण २ टांक, एक गोळी, तूप १ टांक, मध २ टांक, व साखर रायपुरी २॥ टांक, असें एकत्र करून दररोज घेत जाणें व त्यावर प्रकृति-मानाप्रमाणें दूध घेत जाणें. वरतीं अनुपान दिलें आहे, त्यापैकीं साखर न घालतां शैत्य असल्यास देणें, व पित्तास मध न घालतां देणें. **पथ्य**— आंबट, तिखट, तेलकट वर्ज्य. यानें भूक लागेल, धातुस्तंभन होईल, धातुवृद्धि होऊन अत्यंत बल प्राप्त होईल.

२७९. **कामेश्वरविजय** : सुंठ, गोखरूं, शतावरी, मरकटबीज, पिंपळी, बोळ, बेलाचा गीर, तीळ, जायपत्री, लवंग, कबाबचिनी, जायफळ, कोळिंजन, खुरासनी ओंवा, हीं प्रत्येक औषधें एक एक टांक घेणें, व एक तोळा अभ्रकरस भस्म घालून एकंदर खलून एक एक टांकाच्या गोळ्या बांधून घेणें. **अनुपान**— तूप २॥ टांक, साखर २॥ टांक घेऊन त्यांत एक गोळी, रोग्यास प्रातःकाळीं व निरोग्यास सायंकाळीं देणें. बलवृद्धी होईल. नपुंसकत्व जाईल. काम द्विगुण होईल.

२८० **बृहद्वातविध्वंस** : पारा, गंधक, हीं शुद्ध करून, शिसेंभस्म, वंग, ताम्रभस्म, लोहभस्म, अभ्रकभस्म, त्रिकटू, टांकणखार, सुरगुले, हीं औषधें २–२ तोळे व वचनाग शुद्ध केलेला ६ तोळे घेऊन, त्रिकटूच्या काढ्यांत दोन भावना देणें. नंतर निर्गुडीच्या रसाचीं दोन पुटें देणें. त्यावर त्रिफळाच्या काढ्याच्या दोन भावना देणें, नंतर चित्रकमूळाचा काढा करून त्याच्या दोन भावना देणें, त्यावर कोष्ठ याच्या काढ्याची एक, अक्कलकाऱ्याच्या दोन, भुईआंवळीच्या रसाच्या दोन, निंबाच्या रसाच्या दोन, माक्याच्या रसाच्या दोन, धोतऱ्याच्या रसाच्या दोन, आल्याच्या रसाच्या दोन, अशा भावना देऊन, २–२ गुंजांच्या गोळ्या बांधणे व त्रिदोष, सन्निपातास मध, पिंपळी, आल्याचा रस, व लवंग, यांत गोळी देणें. प्रकृतिमान पाहून अनुपान योजून देणें. तेरा सन्निपात, चौऱ्याऐंशी संधिवायु, श्वास, कफ, शूळ ज्वर, इत्यादि रोग शमतील.

२८१. **बृहल्लक्ष्मीविलास रस** : लोहभस्म, अभ्रकभस्म, गंधकभस्म, रस-भस्म, मोती, पोवळें, लवंग, ताम्रभस्म, सोनें, रुपें, हीं औषधें समभाग घेऊन कोर-कंडरसांत खलावें. आणि खललेला गोळा समुद्रयंत्रांत घालून अग्नि द्यावा. चार प्रहरांनीं सिद्ध होईल. १–१ वालाची गोळी करावी. **अनुपान**— जिरें, गूळ, पिंपळी, मध, यांत प्रकृतिमान पाहून योजून द्यावें. यानें जीर्णज्वर, कफज्वर, पीनस, क्षय, खोकला, अरुचि, मस्तकव्यथा हे रोग बरे होतील व तेज वाढून वीर्यवृद्धि होईल.

२८२. **ग्रहणीकपाट रस** : मोती, रसभस्म, गंधक शुद्ध करून, टांकण-खार, अभ्रक, कवडीचें भस्म, अतिविष, शंखभस्म, यांचें समभाग चूर्ण करून,

त्यास अतिविषाच्या काढ्याची भावना द्यावी. मग एका कुपींत घालून, ती कुपी सामुद्र-यंत्रात घालून अग्नि द्यावा. मग धोतऱ्याच्या रसाच्या ७ भावना द्याव्या. नंतर चित्रक-रसाच्या ७ भावना व मुसळीकंदाच्या ७ भावना देऊन, एक एक गुंजेच्या गोळ्या कराव्या. वातास मिरें—तुपांत देणें. पित्तास मध व पिंपळींत देणें. खोकल्यास व श्लेष्म्यास विजयाकाढ्यांत व आल्याच्या रसांत देणें. संग्रहणीस गाईचे दह्यांत देणें.

२८३. **वसंतकुसुमाकर** : सोनेंभस्म ३ टांक, रसभस्म ४ टांक, ताम्रभस्म ५ टांक, लोहभस्म ३ टांक, वंग ३ टांक, पोंवळेंभस्म ४ टांक, मोती ४ टांक, हीं औषधें एकत्र कुटून गाईच्या दुधाच्या सात भावना देणें. नंतर केळीच्या गर्भाच्या रसाच्या ७ भावना व गाईचें दूध व केळीच्या गर्भाचा रस एकत्र करून ७ भावना, जाईच्या रसाच्या ७ भावना, कस्तुरी ३ टांक, बरास कापूर ३ टांक, हीं दोन औषधें गाईच्या दुधांत खलून त्याची भावना एक, कापूर २॥ टांक याची भावना एक, केशर २॥ टांक याची भावना एक, इतक्या भावना दिल्यावर, एक गुंजप्रमाण गोळ्या बांधाव्या. प्रकृतिमान पाहून मध, पिंपळी, रक्तचंदन अथवा श्रीखंड यांतील अनुपान योजून देणें. यानें क्षय, श्वास, कास, त्रिदोष, प्रमेह, रक्तपिती, पंडु, ग्रहणी, मलमूत्रदोष, धातुगत ज्वर, इत्यादि रोगांचा नाश होऊन वीर्य व पुष्टि यांची वृद्धि होते.

२८४. **ऊर्ध्व लक्ष्मीविलास** : पारा शोधून, सुवर्ण, कांतलोह, गंधक शुद्ध करून, मोती, नागभस्म, वंग, अभ्रकभस्म, हीं औषधें समभाग घेऊन, एकत्र करून, येणेंप्रमाणें अनुक्रमें भावना द्याव्या.—केळीच्या कांद्याच्या रसाची १ भावना, मुसळीकंदाची १, शेवंती रसाची १, येणेंप्रमाणें भावना देऊन एक एक गुंजभार गोळ्या बांधाव्या व रोगपरीक्षा करून साखर किंवा मधांत देणें. यानें प्रमेह, कृशत्व, दाह, क्षय, कावीळ, पंडु, यांचा नाश होऊन, बल व पुष्टि यांची वृद्धि होते.

२८५. **आनंदभैरव रस** : हिंगूळ, टांकणखार, बचनाग, पिंपळी, सुंठ, हीं औषधें समभाग घेऊन, त्यास येणेंप्रमाणें भावना द्याव्या.— आल्याच्या रसांत ७, निंबाच्या रसाच्या ७, या भावना देऊन गुंजप्रमाण गोळ्या बांधाव्या. रोग पाहून मध, पिंपळींत देणें. सर्व रोगांवर अनुपानपरत्वें चालतो.

२८६. **बृहद्वसंतकुसुमाकर** : रुपें, ताम्रभस्म, नागभस्म, सुवर्ण, वंग, लोहभस्म, मोती, पोवळी, मिरें, लवंग, पिंपळी, अभ्रकभस्म, रसशेंदूर, बचनाग, हीं औषधें समभाग घेऊन येणेंप्रमाणेंच भावना द्याव्या.— आंवळकठी, शेवंती, चांपा, केवडा, जाई, मालती, नीलकमल, नागचांपा, बकुळी दोन्ही, ह्या प्रत्येकाच्या रसाच्या तीनं तीन भावना द्याव्या, व गुंजप्रमाण गोळी बांधावी. प्रकृतिमानाप्रमाणें मध, पिंपळी, आल्याचा रस, लवंग, विजयाचा काढा, या अनुपानांत देणें. यानें नवज्वर, क्षय, वातशूळ, श्लेष्मा, संग्रहणी, सन्निपात, मूकत्व, अपस्मार, मंदाग्नि, पित्तवायु, प्याहा, उदरविकार, कुष्ठ, मस्तकव्यथा, इत्यादि रोग नाश पावतील.

२८७. **उदयभास्कर रस** : नागभस्म १ तोळा, हिंगूळ २ तोळा, एकत्र करून मीनपित्ताच्या ७ भावना देणें, व गुंजप्रमाण गोळ्या करणें. सर्व तापांवर उत्कृष्ट आहे. **अनुपान**— साखर, मध अगर दाळिंबाचें सरबत.

२८८. **त्रैलोक्यतापहारक रस** : पारा, गंधक, हरताळ, जेपाळ, हीं शुद्ध करून व ताम्रभस्म, तुत्थ, पिंपळी, हीं औषधें समभाग घेऊन निर्गुंडीचे रसांत सात पुटें देऊन, त्याच्या वालप्रमाण गोळ्या बांधाव्या व पित्तास साखरेंत, वातास मधपिंपळींत देणें. नवज्वर, दुसरे ज्वर वगैरेंवर प्रकृतिमानाप्रमाणें अनुपान योजून देणें. **पथ्य**— मुगाचें वरण, भात, पडवळ व तोंडलीं यांची भाजी हें खावें.

२८९. **मृत्युंजयरस** : पारा, गंधक, हीं शोधून व नागभस्म, हीं औषधें समभाग घेऊन त्रिकटूच्या काढ्याच्या तीन भावना द्याव्या. नंतर आंवळ्याच्या रसाच्या ३, त्रिफळ्याच्या काढ्याच्या ३, समुद्रफेणाच्या ३, दशमूलाच्या काढ्याच्या ५, निर्गुंडीच्या रसाच्या ३, आल्याच्या रसाच्या ३, बोकडपित्ताच्या ३, अशा भावना देऊन, गुंजप्रमाण गोळ्या करून सावलींत वाळवाव्या व प्रकृतिमान पाहून आल्याचा रस, मध, पिंपळी किंवा साखरेंत घेणें. यानें नवज्वर, सर्व ज्वर, वातशूळ, कफ, क्षयरोग, संधिवात, बधिरत्व, मूकत्व यांचा नाश होईल. औषधानें आग होऊं लागल्यास वारा घालणें, उसाचा रस पिणें, डाळिंब खाणें, दहींभात, तुरीचें कढण, इत्यादि खाणें, शमेल.

२९०. **अग्निकुमार रस** : शंखभस्म, जिरें व कवडीचें भस्म, चार चार टांक, पारा शुद्ध करून १ टांक, गंधक शुद्ध करून २ टांक, नागभस्म ३ टांक, हीं औषधें घेऊन, त्यास अशा भावना देणें.— चित्रक भावना ३, कोरकंड भावना ३, अतिविष भावना ४, अशा भावना देऊन, संपुटांत घालून गजपुट देणें. मग खलून गुंजप्रमाण गोळ्या करणें. प्रकृतिमान पाहून गाईचें तूप, मध, पिंपळी, साखर, हीं अनुपानें योजावीं. सर्व रोगांवर चालतो. पण वातावर विशेष गुणकारी आहे.

२९१. **रसचूडामणी** : नागभस्म १ तोळा, सोललेलीं मिरें ४॥ तोळे, शंखभस्म ४ तोळे, एकंदर चूर्ण करून, गुंजभर चूर्ण निंबाचे रसांत देणें. फार दिवसांचा ज्वर जाईल. घाम निघेल.

२९२. **शंखवटिका** : शंखभस्म, सुंठ, मिरें, जिरें, व गंधक, बचनाग शुद्ध करून, व पंचखार हीं औषधें समभाग घेऊन निंबाचे रसांत ७ पुटें देणें. नंतर गुंजप्रमाण गोळी करून ती प्रकृतिमान पाहून, शूळ, प्याहा, गुल्म, अग्निमांद्य, कास, श्वास, यांवर देणें.

२९३. **बालार्कगोविंद** : प्रवाळभस्म पावशेर, खापरसोधले पावशेर, मिरें पावशेर, पिंपळी १० टांक, टांकणखार ५ टांक, केशर ५ टांक, कचरी ५ टांक, गव्हला ५ टांक, हिंगूळ ५ टांक, गोखरूं ५ टांक, हीं सर्व औषधें निंबाच्या रसांत ४ दिवस खलणें. सर्व रोगांवर अनुपान योजून देणें.

२९४. **बालार्कअर्जुन :** खापरशोधले पावशेर, प्रवाळभस्म पावशेर, मिरें पावशेर, पिंपळी १० टांक, टांकणखार ५ टांक, काचरी ५ टांक, गव्हला ५ टांक, केशर ५ टांक, हीं सर्व औषधें निंबाच्या रसांत ५ दिवस खलणें. सर्व रोगांवर प्रकृतिमानाप्रमाणें अनुपान योजून देणें.

२९५. **कनकसुंदर :** पारा, बचनाग, गंधक, हीं औषधें शुद्ध करून टांकण-खार, सुंठ, मिरें, पिंपळी, जायफळ, हीं सर्व औषधें समभाग घेऊन, त्यास माक्याच्या रसाचीं २१ पुटें द्यावीं. मग मुगाप्रमाणें गोळ्या बांधाव्या. **अनुपानें**— साखरेंत देणें, संग्रहणी जाईल. शेळीचे दुधांत देणें, प्रमेह जाईल. निंबाच्या रसांत देणें, भूतप्रेत-पीडा जाईल. आल्याच्या रसांत देणें, पित्तज्वर जाईल. साखरेंत अथवा गुळांत देणें, बद्धकोष्ठ जाईल. भुईतरवडांत देणें, अजीर्ण जाईल. चिंचेंत देणें, उन्हाळें शमेल. दुधणीचे रसांत देणें, वलिपलित जाईल. निंबाच्या रसांत अंजन करणें, सर्व विषें उतरतील. मोचरस व बिब्याच्या मूळाच्या रसांत देणें, वीर्यस्तंभन होईल. वेळाच्या रसांत देणें, शरीरावर उत्तम कळा येईल. मधांत देणें, शरीर पुष्ट होईल. ताम्रभस्मांत देणें, पित्त जाईल. त्रिकटूच्या रसांत देणें, मस्तकव्यथा दूर होईल. शेवग्याचे रसांत तूप घालून त्यांत घेणें, पोटशूळ शमेल. निंबाच्या रसांत विंचवाच्या दंशास लावणें, विंचू उतरेल. जवळ ठेवल्यास पिशाच्याचा संचार होणार नाहीं. धोत-ऱ्याच्या रसांत अंगास लावणें, शीतज्वर जाईल. रात्रीं विड्यांत खाणें, अजीर्ण व पोट फुगत असल्यास बंद होईल. जायफळ भाजून ठिकरी विझवून देणें, संग्रहणी जाईल. विजयांत देणें, पुत्र होईल. तांदुळाचे धुवणांत देणें, धूम्रवायु शमेल. गाईचे तूप व दह्यांत देणें, विष उतरेल. ओंवा, साखर व वेखंड, तीन तीन टांक, चूर्ण करून त्यांत घेणें, ज्वर शमेल. जिऱ्यांत घेणें, श्वास राहील. म्हशीच्या शेणाच्या रसांत घेणें, हगवण पुष्कळ दिवसांची असली तरी राहील. पांढरी, उन्हाळी व सागरगोट्यांत बांधणें. वज्रशरीर होईल, (आपल्या मूत्रांत मीठ घालून त्यांत देणें, स्त्री अगर पुरुष वश.) तांदुळाच्या धुवणींत वेखंड व हें घालून लेप करणें, कंडुवायु जाईल. लेप सात दिवस करणें. गोपीचंदनांत देणें, विटाळ जाईल. खैराचे रसांत घेणें, बहुमूत्ररोग जाईल. घोटीसुपारींत घेणें, तिडकी प्रमेह जाईल. (गोरोचनांत टिळा लावणें, सर्व वश.) तळहातास लेप करणें, फुटत असल्यास बरा होईल. अक्कलकाऱ्यांत देणें, शैत्य जाईल. त्रिकटु व त्रिफळ्यांत देणें, वर्षाची हगवण जाईल. गुंजवेलीच्या रसांत देणें, वातश्वास जाईल. निंबाच्या रसांत घेणें व लावणें,— थंडी, कांटा जाईल. मोचरसांत घेणें, चौऱ्यांशी वायु जातील. गुलाबाच्या फुलाचा रस व निंबाच्या रसांत लावणें मस्तकव्यथा दूर होईल. (इति श्रीसिद्धौषधानि).

२९६. **मोठा ढाळ :** बाहव्याची शेंग ८ टांक, वाळा २ टांक, गहुले २ टांक, काचरी २ टांक, अमेस १२ टांक, ज्येष्ठमध २ टांक, रक्तचंदन २ टांक, चंदन २ टांक, हिरडेदळ ५ टांक, सेत ४ टांक, द्राक्ष ५ टांक, सेवतीचीं लाल फुलें

गोमूत्रांत उगाळून डोळ्यांत घातली असतां, तिमिर, रातांधळें, फूल, पडळ हे रोग दूर होतील.

३०८. **नेत्रशूलास उपचार :** जुन्या निंबाचीं पानें, पिंपळी, वायविडंग; भद्रमुस्ता, सुंठ, हीं औषधें समभाग, मधांत उगाळून अंजन करणें, म्हणजे स्त्रियांचा नेत्रशूळ राहील. स्तनांतील दुधांत अंजन केल्यास फूल जाईल. तुळशीच्या रसांत अंजन करणें, रातांधळें जाईल. गोमूत्रांत लेप करणें, खाज मोडेल. उदकांत अंजन करणें, तिमिर जाईल. कांजींत अंजन करणें, चिपड्या येणार नाहींत.

३०९. **नेत्ररोगावर औषधें :** (१) गुंजेचा रस व सैंधव मधांत खलून लेप करणें; तिमिर, खाज, पाणी गळणें, निळे डोळे, पडळ हीं सर्व जातील. (२) मिरें व रुईचीं फुलें वांटून गोळी करणें व ती पाण्यांत वांटून डोळ्यांत घालणें. डोळे निर्मळ होतील. (३) पिंपळी, नागचांफा, नागरमोथा, मिरें, सैंधव, हीं गाईचे दुधांत वांटून लावणें, नेत्रांची आग शमेल. (४) आंबाड्याचा रस व सैंधव, तांब्याच्या भांड्यांत खलून, मधांत लावणें; वडस व पडळ यांचा नाश होईल. (५) सुंठ व निंब पाण्यांत वांटून, डोळ्यांचे पातीवर घालणें; तिडका शमतील; (६) वेहळ्याच्या आंतील गोळा घेऊन मधांत उगाळून डोळ्यांत घालणें; भूरी व तिमिर जाईल.

३१०. **स्त्री प्रसूत होण्यास उपाय :** (१) सैंधव, कांजींत वांटून देणें. (२) नीळकमळ मद्य व साखरेंत देणें. (३) सुंठीचें चूर्ण देणें. (४) कनकमूळ, मणगटास बांधणें. (५) पुष्यार्कीं सिरसाचें मूळ आणून मनगटास बांधणें. (६) सर्पाच्या कांतीचें डोळ्यांत अंजन करणें. (७) नीनगाचें दूध डोक्यास लावावें. (८) उतरणीचें मूळ उजवे पायास बांधणें. पोटांत मूल मेलें असेल तरी तें बाहेर येईल. (९) एरंडाची साल उरफाटी काढून स्त्रीचे जांघेस बांधणें. ती फार ठेवूं नये, नाहीं पेक्षां आंतडीं बाहेर येतील. (१०) गुंजेचें मूळ मस्तकांत खोवावें.

३११. **नाकातोंडांतून रक्त पडत असल्यास :** गुंजा, कोष्ठाच्या रसांत किंवा हरळीच्या रसांत वांटून, तुपांत कालवून पिण्यास द्यावें.

३१२. **पोटशूळास उपाय :** (१) त्रिफळा व लोध्र, यांचें चूर्ण मधांत देणें. (२) पिकलेलें राजेळें केळें भाजून, त्यांत मिऱ्याचें चूर्ण घालून, निवाल्यावर खाणें. शूळ शमतील. (३) पुष्करमूळ दुधांत घेणें. (४) माक्याचा रस व तिळाचें तेल एकत्र करून, तें केळीचे पानास लावणें व साळीचा भात करून, त्या पानावर घेणें, आणि हिंगाचें चूर्ण वर टाकून तो भात खाणें. (५) कोरकांडाचे पाळाचें चूर्ण करून, दुधांत अथवा तुपांत घेणें. (६) गंधक आंवळसरा, बीडलवण, सैंधव, चित्रक, मिरें, आस्कंद, हीं औषधें दोन दोन टांक; व कोष्ठ ४ टांक, आणि गूळ ४॥ टांक, एकत्र चूर्ण करून २ टांक, ऊन पाण्याशीं घेणें.

३१३. **जंतू (किरीम)—पासून उद्भवणाऱ्या शूळास :** वावडिंग वांटून गाईचे दुधांत देणें. (२) पांढऱ्या सुपलीचें मूळ, तांदुळाच्या धुवणांत वांटून देणें.

३१४. **वर उपाय करून ज्वर काढण्यास औषध** : कोहळ्याचें मूळ, निंबाचीं पानें, भद्रमुस्ता, हीं औषधें वांटून डोळ्यांवर पेंड बांधणें व अंजन करणें, ज्वर शमेल. (२) चिंचेचीं फुलें व ज्येष्ठमध वांटून लेप करणें. बालकाचा ज्वर जाईल.

३१५. **कर्णशूलास उपाय** : (१) आंकोलीचें बीज, सुंठ, हिंग, तिळाचें तेल, हीं एकत्र करून कानांत घालणें. (२) आंकोलीचें मूळ, वेखंड, हिंग, तिळाचें तेल कढवून कानांत घालणें. (३) सैंधव, शेळीचे मूत्रांत उगाळून कानांत घालणें. (४) रुईचे फुलाचा रस व भुईआंवळीचा रस एकत्र करून कानांत घालणें. (५) वचा, देवदार, सैंधव यांचें चूर्ण, शतावरीचा रस, व तिळाचें तेल कढवून कानांत घालणें. (६) लसूण व रुईच्या पानांचा रस एकत्र करून कानांत घालणें. (७) देवदार, कोष्ठ, वचा, सैंधव, सुंठ, हीं बैलाचे मूत्रांत कढवून कानांत घालणें.

३१६. **खोकल्यास उपाय** : (१) हिरडा, मधांत देणें. बालकाचा खोकला राहील. (२) सेवग्याचें मूळ, तुपांत उगाळून देणें. (३) काळ्या कुड्याची साल, कोरकंडाचे रसांत वांटून, मधांत कालवून देणें. (४) रुईमुळाची साल गाईच्या दुधांत उगाळून देणें. (५) हळद मधांत व रुईच्या मुळाचें एकत्र चूर्ण करून, देणें. **पथ्य**— तूप-भात खाणें. (६) काळ्या कुड्याची साल, कुमारीरसांत वांटून देणें. **पथ्य**— वरणभात खाणें. (७) रुईच्या मुळाची साल व बोरीची साल यांचें एकत्र चूर्ण करून, गाईचे ताकांत किंवा दुधांत देणें. (८) आघाड्याचें बीं, गाईचे दुधांत देणें व त्याचाच गळ्यास लेप करणें. तीन दिवस ठसका लागेल, तथापि भय नाही.

३१७. **कफज्वरास** : पिंपळमूळ, चित्रकमूळ, अडुळसा, सुंठ, पांढरें जिरें, हिंग, रेणूक, मयूरशिखा, ओंवा, केदार कुटकी, हीं समभाग घेऊन; त्याचा अष्टमांश काढा उरवून व पिंपळी एक प्रत्येक काढ्यांत टाकून घेणें. (२) गुळवेल, सुंठ, कोष्ठ, एरंडमूळ, यांचा काढा वरप्रमाणेंच घेणें.

३१८. **संग्रहणीस उपाय** : इंद्रजव पावशेर, अजमोदा पावशेर, हीं दोन औषधें, दोन शेर दुधांत रांधून, सरबरीत झालें म्हणजे साखर नऊ टांक घालणें व दररोज सांज-सकाळ एकेक टांक घेणें. यानें अतिसार, संग्रहणी, अरुचि, अग्निमांद्य, हीं दूर होऊन बळ व पुष्टि प्राप्त होईल.

३१९. **तृष्णाज्वरास** : पुष्करमूळ, सुंठ, गुळवेल, यांचा काढा करून देणें.

३२०. **कफज्वरास** : (१) पिंपळमूळ, चित्रकमूळ, अडुळसा, सुंठ, जिरें पांढरें, हिंग, रेणुक, मयूरशिखा, ओंवा, केदारकुंडी, हीं औषधें समभाग घेऊन काढा करणें. पिंपळी प्रत्येक वेळ एक घालून देणें. (२) बेलाचीं पानें, चित्रक, एरंडमूळ, हीं एकत्र करून काढा करणें व त्यामध्यें चांगला हिंग व सैंधव घालून देणें.

३२१. **पित्तज्वरास** : (१) भोंपळीची मुळी घेऊन काढा करून देणें. (२) वानमूळ, गुळवेलीमूळ, कणीया, दोन्ही जिरें यांचा अष्टमांश काढा करणें व

साखर घालून घेणें. (३) डाळिंबाची साल, कंठीची साल, हरळीचें मूळ, मिरें, यांचें चूर्ण करणें व यांचाच काढा करून घेणें.

३२२. **वातज्वरास** : (१) सुंठ १ टांक, पिंपळी २ टांक, कात ३ टांक, हीं एकत्र चूर्ण करून देणें. (२) पुष्करमूळ, सहमूळ, सुंठ यांचा काढा अष्टमांश उरल्यावर घेणें, व काढ्यांत पिंपळी प्रत्येक वेळ एक देणें. (३) उदक वाट्या ७, गाईचें दूध वाटी १, सुंठ रवे २ घालून, दूध उरेपर्यंत कढविणें. पिंपळी प्रत्येक वेळ एक घालून देणें. (४) डोरली रिंगणी, सिवणी, पाडळी, चीटवणी, सराटी, टेंटु, बेल या औषधांचा काढा करून अष्टमांश उरल्यावर घालून देणें.

३२३. **सन्निपातास** : पुष्करमूळ, अडुळसा, काचोरा, देवदार, चिकणा मुस्ता, सराटे, अतिविष, हिरडे, बाहवा, हळद, कोथिंबीर, वेंटुळी, आस्कंद, गुळवेल, पिंपळी, शतावरी, वेखंड, कोरांटा, चवीक, रिंगणी, किराईत, केदारकुंडी, डोरली, सेंगटमूळ व साल, टेंटु, सिवण, पहाडमूळ, हीं समभाग औषधें एकत्र कुटून भांड्यांत घालणें व त्यांत पाणी ७॥ शेर घालून काढा अष्टमांश उरल्यावर रोग्यास ५ दिवस देणें. (२) देवदार, निंब, त्रिफळा, कुटकी, घेटुळी (पुनर्नवा) मोथा प्रत्येक वेळेस पिंपळी घालून देणें. (३) दारुण सन्निपातास— देवगडांगचें चूर्ण, कडू दोडका, रिठेसाल, समुद्रफळ, किन्हईसाल, हीं औषधें तुपांत परतून गोळ्या करणें व उदकांत चूर्ण व गोळी देणें.

३२४. **कुष्ठ, दाद, खाज यांजवर** : कोष्ठ, तरवड, हळद, बिबे, बाहव्याची साल, हीं समभाग घेऊन वाटून सर्वांगास लेप देणें. दात, कुष्ठ, मंडळ, खाज, सिरीस यांस १५ दिवस लेप करणें. गुण येईल. **सूचना**— बिबा सोसत नाहीं त्यानें बिबा सोडून बाकी औषधें घ्यावीं.

३२५. **हगवणीस** : (१) करंजाची साल व वावळ्याची साल वांटून ताकांत देणें. (२) बेलाची काचरी, आंब्याची कोय, म्हशीचे ताकांत देणें. (३) मिरें भाग १, सुंठ २, कुड्याची साल ६ हीं वांटून गुळांत देणें. चार दिवसांत ढाळ बंद होतील. (४) फमोराचोखट, अफू, लासोरीचोखट, लिंबाचे फोडीमध्यें कढवून तें लिंबू चोखणें, हगवण राहील. (५) जायफळ, विवळे, हिंग, खोबरें, सुंठ, खसखस, लसूण, खडीसाखर, जायपत्री हीं औषधें नऊ टांक घेऊन, सुमारें एक प्रहर खलणें, व ७ गोळ्या बांधणें. अफू मुगाएवढी व राळ वाटींत घालून उकडून घेणें;—आधीं विजया, दुधांत गाळून दह्यांत घेणें. मग वरील औषध घेणें, **पथ्य**— ७ दिवस दहींभात खाणें. हगवण शमेल.

३२६. **ढाळ बंद होण्यास** : (१) जायपत्री, अतिविष, कुड्याचा मगज, हीं एक एक टांक घेऊन, ·॥· टांक अफू, ३ गुंजा कातबोळ, ·॥· टांक कुड्याची साल, अर्धा टांक मरकटबीज, मेथी २ टांक, डाळिंबाची साल २ टांक, ही औषधें एकत्र कुटून गोळी १ वालप्रमाण देणें. दिवसास फार ढाळ होत असल्यास

आल्याचे रसांत, व रात्रीचे होत असल्यास मधांत देणें. आलें न मिळाल्यास मेथीचे रसांत देणें. कृमीव्यथा असली तर सदर औषधांत लोध्र टांक १, काळें जिरें टांक १ घालून देणें. (२) मेथी टांक १०, आंवळकठी टांक १०, कुड्याची साल दोन शेर, तांदुळाचे धुवण १२ शेर घालून कढविणें, आणि दोन शेर उरवून प्रकृतिमानाप्रमाणें ताकांत किंवा दह्यांत घेणें.

३२७. **अतिसारास** : पिकलें वेखंड व कारल्याचा रस एकत्र करून लोण्यांत घालून देणें. (२) धायटीचीं फुलें, कवड्या लोद, कायफळ, प्रत्येकीं दोन टांक प्रमाणें तांबड्या तांदुळाचे धुवणांत देणें. (३) धायटीचीं फुलें टांक १, जायफळ, जिरें, मेथी, आंवळकठी, कुड्याचीं फुलें, कुंभीचीं फुलें, दाळिंबसाल, कांकडासिंग, मुरडासिंग, पत्रज एकत्र चूर्ण करून एक टांकप्रमाणें पाण्यांत देणें. ढाळ, रक्त, आव शमेल. (४) अजमोदा, मोचरस, सुंठ, धायटीफुलें हीं औषधें समभाग घेऊन चूर्ण करून गाईचे ताकांत ठिकरी देऊन घेणें. (५) डाळिंबाची साल अधेलाभार, सुंठ टांक ४, जिरें टांक ४, मेथी टांक ४, अतिविष टांक ४, कडूजिरें टांक ४, जायफळ टांक ·॥·, आवळकठी तीन टांक, एकत्र चूर्ण करून मध घालून मंदाग्नीवर ठेवणें, शुद्ध करणें; मग चार भाग करून ताकांत अथवा लिंबाच्या रसांत देणें. ऊर्ध्वरक्त, अतिसार शमेल.

३२८. **कुपथ्यास चूर्ण** : ओंवा, पिंपळमूळ, लवंग, संचळ, त्रिकटू, जायफळ, पिंपळी, बेल, दालिंब, अजमोदा हीं औषधें समभाग घेऊन चूर्ण करून, साखर २ भाग घालून विषमपद प्रमाणानें देणें, नष्ट इंद्रियें चांगलीं होतील.

३२९. **क्षारचूर्ण** : सैंधव, जवखार, साजीखार, पापडखार, टांकणखार, लोणारखार, काचलवण, लवणखार, बीडखार, नवसागर, फटकी हिराकस, वडांगरमीठ हीं प्रत्येकी ९ टांक प्रमाणें घेऊन एकत्र करून वाटावीं. मग बकरीचें मूत्र १२ शेर घेऊन, एका डेऱ्यांत खार व मूत्र घालून आणि कोरकंडरस घालून खैराचीं किंवा सागाचीं लांकडें भुईचुलींत घालून अग्नि तयार करून त्यावर तो प्रहरभर ठेवणें, व डेरा फुटेल म्हणून त्याची बळकटी करणें. औषधास पांढरेपणा येईपर्यंत रांधणें. मग खलांत घालून बारीक करणें. प्रतिदिवशीं टांक १ प्रमाणें लिंबाचे रसांत देणें. भूक लागेल, उदरव्यथा जाईल, अंग बळकट होईल, व तेंच गोमूत्रांत दिल्यास उदर, डबा, प्याहा हीं जातील.

३३०. **लसुणपंचखारादि चूर्ण** : लसुण टांक ५, निर्गुंडी व मिरें टांक ९, वावडिंग ·॥· सुंठ टांक ९, वाळलें लिंबू व पिंपळी टाक ९, गंधक आवळसारा ·॥· पंचखार टांक ४, हीं सर्व लसुणासुद्धां उखळींत कांडणें; मग वाटणें. वाटते वेळेस घोड्याचें मूत्र टांक १ घालणें. मग स्वच्छ मडक्यांत घालून तोंड बांधून भुईत खांच खणून मडकें खांचेंत ठेवून, वर माती टाकणें. खांचेंत मडकें ८ दिवस ठेवणें. मग

उत्तम मुहूर्त पाहून काढणें. मात्रा टांक ४, प्रतिदिवशीं घेणें, व वर पाणी पिणें. यानें चौऱ्यांशीं वायू, पंचवीस पित्तें, चौसष्ट प्रमेह, पंच गुल्म, हीं जातील.

३३१. **पयचूर्ण** : सुंठ, पिंपळी, जिरें, अजमोदा, सैंधव, हिंग, व भुर्गुलें हीं औषधें समभाग घेऊन वस्त्रगाळ चूर्ण करणें व सांजसकाळ एक टांकप्रमाणें घेणें. तूपभाताचे पांच ग्रास घेऊन नंतर भोजन करणें. हिरडे, पिंपळी, सैंधव, चित्रक यांचें एकत्र चूर्ण करून, वस्त्रगाळ करून, उष्णोदकांत घेणें, व मग पयचूर्ण खाणें. मंदाग्नि, जीर्णज्वर, ऊर्ध्ववायू, मलनिरोध, अजीर्ण, हे रोग शमतील.

३३२. **धातुप्रमेहास उपाय** : एरंडमूळ, गरोळ, व अडुळशाचा पाला, प्रत्येक ९ टांकप्रमाणें घेऊन सात भाग करून, दर भाग शेरभर पाण्यांत टाकून काढा करून पावशेर ठेवणें, त्यांत एरंडेल तेल तीन टांक घालून घेणें.

३३३. **गर्भवती स्त्रीचा रक्तस्राव व प्रदर यांवर** : केतकीमूळरस टांक ९, गाईचें दूध पावशेर, साखर टांक याप्रमाणें तीन दिवस घेणें, गुणावह होईल. (२) जाईच्चे पाल्याचा रस टांक ९, गाईचें दूध पावशेर, चांगली साखर टांक २ एकत्र करून देणें.

३३४. **डोळ्यांस उपाय** : निंबाचे रसांत तुरटी उगाळून डोळ्यांवर घालणें. डोळ्यांतील जाळें जाईल. (२) पांढरे घेटुळीची मुळी पाण्यांत उगाळून लावणें, सुजलेलें फूल झडेल. (३) निंबाचीं व चिंचेचीं पानें वांटून डोळ्यांवर पिंडी ठेवणें. जाळें जाईल. (४) कासलीचे मुळाची साल, निंबाचे रसांत उगाळून नेत्रावर लेप करणें, नेत्रशूळ शमेल. (५) उंटाचें हाड पाण्यांत उगाळून डोळ्यास लावणें, नवी दृष्टि होईल. (६) कोंबडीचे कवटाचे कोशे घेऊन, जाळून भस्म करून, वस्त्रगाळ करून, गाईचे लोण्याबरोबर कांशाचे ताटांत, त्याच प्रकारचे दुसरे ताटानें खलणें व नेत्रांस लावणें, ७ दिवसांत कवडे फूल जाईल. (७) निर्गुंडीचीं फुलें दिव्याचें ज्योतीवर जाळून, जुनी अफू घालून दुधांत खलून डोळ्यांत घालणें, रातांधळें जाईल. (८) देवदार, अजामूत्रांत परतून डोळ्यांत घालणें. फूल जाईल. (९) रिठा, पाण्यांत फेंसून डोळा धुणें, फूल जाईल. (१०) हिरडा निंबाचे रसांत उगाळून डोळ्यांत घालणें, भुरी जाईल.

३३५. **पौष्टिक चूर्ण** : मुसळीकंद, करंदीमूळ, गोखरू, हळद, समभाग घेऊन वस्त्रगाळ करणें, मग आवळ्याएवढें, दुधांत कालवून अनुपान पाहून देणें. पित्तास शर्करा घालून देणें. बल पुष्टि करील. (२) चोपडीहळद, चाहीवळी, गाठा हीं औषधें समभाग घेऊन चूर्ण करणें व दोन्ही सांज दुधांत घालून देणें.

३३६. **बाळंत चूर्ण** : लवंग, पिंपळी, जायफळ, सुंठ, अतिविष, अक्कलकारा, हिरडे, पिंपळमूळ, कोळिंजन, रक्तबोळ, तुरेसाकूड, सुपारी, कोष्ठ, ओंवा, आस्कंद, किराईत, वावडिंग, हिंग, मिरें, पाषाणभेद, समुद्रशोक, शेपा, वेखंड, ज्येष्ठमध, हीं सर्व टांक ५ प्रमाणें घेऊन चूर्ण करून गुळांत किंवा मधांत किंवा तुपांत घेणें.

३३७. **कुष्ठावर** : श्वेतघेंटुळीचें मूळ, व तरवडाचें मूळ, तांदुळाचे धुवणांत वांटून तुपांत देणें. सर्व कुष्ठें जातील. तेंच औषध एकसारखें घेणें. सर्व व्याधी जातील. (२) गुंजेचें चूर्ण करून ताम्रपात्रांत खलणें. तसेंच बाकुचीचें चूर्ण करून गाईचें दुधांत खलणें, आणि गोमूत्र विरजून, दहीं करून, त्याचे लोण्याचें तूप करणें, आणि मध व त्याच तुपाबरोबर तीं दोन्ही चूर्णें प्रकृतिमानाप्रमाणें घेऊन लेप करणें. श्वेत-कुष्ठ जाईल, तेलकट व आंबट वर्ज्य. (३) बांवच्या, गाईचे दुधांत वांटून एक मासा घेणें. **पथ्य**— भात खाणें. कुष्ठ जाईल. (४) चिंचुके वांटून चूर्ण करणें व निंबाचे पानाचें चूर्ण करून, गाईचें दूध ४ टांक घालून एक मासा देणें. श्वेतकुष्ठ जाईल. (५) बिबवे १ पायली, रानतीळ १ पायली, सैंधव पावशेर, जुना गूळ २ शेर, एकत्र करणें, त्यास माक्याच्या रसाचीं पुटें ७ देणें. आणि सुपारीएवढें खाणें. ४७ दिवस. **पथ्य**— अळणी खाणें.

३३८. **चौऱ्यांशीं वायूंवर** : बेलतराचें मूळ, एरंडेल, सैंधव, सुंठ, गुळ-वेल, देवदार, रासना, यांचें समभाग चूर्ण करून प्रकृतिमानाप्रमाणें घेणें. चौऱ्यांशी वात, पित्त, गुल्म हीं शमतील. (२) सैंधव, मिरें, संचळ, वावडिंगें, हिरडा, चित्रक, वडांगर, मीठ, सुंठ, पिंपळी, हिंग, अजमोदा, हीं औषधें समभाग घेऊन, खापरांत भाजून चूर्ण करून लिंबाचे रसांत खलून, दोन्ही सांज १ टांक घेणें. येणें-प्रमाणें रक्तीआंव, हगवण, चौऱ्यांशीं वात शमतील.

३३९. **संग्रहणीस** : काताचें वस्त्रगाळ चूर्ण करून, उंबराचे चिकांत भिजवून पारठे म्हशीचे दह्याशीं देणें. **पथ्य**— दहींभात. (२) चवक टांक ४॥, पिंपळी ४॥, दालचिनी ४॥, हरीतकी ४॥, बेहडे ४॥, आंवळे ४॥, सेगटमूळसाल ४॥, नाकेसर ४॥, कुड्याचा मगज ४॥, रुईचे मुळांची साल ४॥, किरमाणी ओंवा ४॥, लवंग ४॥, पुनर्नवामूळ ४॥, निळवा ४॥, आम्लवेतस ४॥, मोचरस ४॥, जिरेंकाळें ४॥, पंचखार ४॥, बावली ४॥, वेलची ४॥, एकत्र कुटून वस्त्रगाळ चूर्ण करून, मधांत गोळ्या बोरायेवढ्या बांधून खाणें. **पथ्य**— शेळीचे अथवा गाईचें दूध देणें.

३४०. **मेहावर चूर्ण** : बाभळीचा डिंक व गोघृत एकत्र करून घेणें.

३४१. **कर्णरोगावर तेल** : निर्गुंडीरस, लसूणरस, शेवगारस, आल्याचा रस, तिळांचें तेल एकत्र करून कढवावें. कानांत घालावें.

३४२. **लघुलाक्षादि तेल** : तिळांचें तेल, कोष्ठ, देवदार, नागरमोथे, कुटकी, पिंपळी, रास्ना, ज्येष्ठमध, हळद, बडीशोप, चंदन, केशर, लाक्ष, दह्याची निवळी, हीं औषधें एकत्र करून कढवावें. तेल राहिलें म्हणजे उतरून तें, सर्व वात-रोगांवर चोळावें.

३४३. **बाळंतरोगावर** : नागरमोथे, डाळिंबमूळ, डाळिंबबीज, यांचा काढा अथवा चूर्ण करून घेणें.

३४४. **पाऱ्याची औषधी वाटी करण्याची युक्ति :** एक पक्का पावशेर वजनाची जस्ताची वाटी, तितकेंच वजन तूप मावेल येवढी असावी. मग पक्का अर्धापाव पारा गुळांत टाकावा, व पुढें तो बाहेर काढून त्यास कोरफडाचे रसांत एक दिवस खलावा. तसाच एक दिवस तुळशीचे रसांत खलावा. मग तो त्या वाटींत घालून एक दिवस ठेवावा; म्हणजे तो त्या वाटींत चढून जाईल. मग मोठें खापर भट्टीवर चढवायाजोगें घेऊन, मीठ व माती एक ठिकाणी खलून त्या खापराचे बुडास लेप करावा व आंचेनें न फुटेल असें करावें; नंतर दीडशेर मीठ घेऊन लोण्याप्रमाणें बारीक करावें, व निंबाचे रसांत कालवावें. मग खापरांत भरावें व वाटीच्या कांठाबरोबर बसवावें. वाटींत निंबाचा रस भरावा. चूल भट्टीसारखी करावी; धूर जावयास मागें लहान भोंक ठेवावें. वरती खापर ठेवून खालीं अग्नि लावावा. अग्नि एकसारखा प्रदीप्त लावावा. खापर ठेवल्यावर भोंवतालीं माती लिंपून द्यावी. अग्नि लावल्यावर वाटींत वरचेवर रस घालीत जावा. वाटी रिकामी पडूं देऊं नये. विटाळचंडाळ करूं नये. छाया न पडावी. सोळा प्रहर झाल्यावर वाटीच्या कांठाचा तुकडा किंचित तोडून घ्यावा. तो पाटावर वाटून पहावा. पीठ झालें म्हणजे पक्कें जाणावें. अग्नि एकंदर ३२ प्रहर द्यावा. मग वाटीवर उत्तम प्रकारें झांकण ठेवावें. व निवाल्यावर वाटी काढून घ्यावी.

३४५. **ताम्रभस्मक्रिया :** कृष्ण-तुळशीच्या रसांचीं पुटें १२१ देऊन, तो चोंथा लोटींत घालून वर कापडानें वेष्टून गजपुट द्यावें. अथवा एरंडाच्या मुळ्या ठेंचून त्याचा चोंथा लोटींत घालून, वर मातकापडानें वेष्टून गजपुट द्यावें. यास शुद्धता येण्याकरितां प्रथम तेल, मग ताक, आणि नंतर गोमूत्रांत, तापवून विझवावें.

३४६. **शंख्या सोमलाची क्रिया :** कोरफड मधोमध चिरून, त्याचे गिरांत शंख्या सोमल घालून, मातकापडानें वेष्टून कुक्कुटपुटें १२१ द्यावीं. सावली न पडावी. मेणाप्रमाणें घट्ट होतें. तयार झाल्यावर तांदुळाएवढा तांब्याच्या रसांत घालावा.

३४७. **हरताळभस्म :** चिंचेची व पिंपळाच्या सालीची रक्षा करावी. ती रक्षा वेळणींत दडपून, आंत हरताळ ठेवून, व दुसऱ्या वेळणींत राख भरून, ती वर ठेवावी. वेळणीचें तोंड मातकापडानें वेष्टून, चुलीवर ठेवून, खालीं बोरीचे लाकडांचा जाळ चार प्रहर लावावा. भस्म होईल. क्षयरोगास मधांत द्यावें. **पथ्य**— वरण, पोळी खाणें. चिंचेच्या पाल्याचा रस पावशेर, त्यांत तूप चार पैसेभार घालून द्यावें. हरएक प्रमेह जातील. गूळ, वांगें, आंबट वर्ज्य.

३४८. **हरताळक्रिया :** पत्री हरताळ पावशेर, व पारा २॥ तोळे आणून खलांत घालावा. कोरफडाच्या रसांत सात दिवस खल अहोरात्र करावा. गोळ्या गुंजप्रमाण करून सावलींत वाळवाव्या. व शिशा दोन पक्क्या, तांबें घालून केलेल्या आणून, त्यामध्यें गोळ्या घालाव्या. तोंड बंद करून मातीची सात कापडें द्यावीं. वालुकायंत्रांत घालून चौसष्ट प्रहर प्रखर अग्नि द्यावा. शिशीची नळी चार बोटें मोकळी ठेवावी.

३४९. **पोटांत डबा होतो त्यास औषध** : सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, ब्याहाडा, आंवळकठी, हरताळ, पारा, गंधक, जेपाळ, हीं तीन मासेप्रमाणें औषधें आणून खल करावा. लिंबाच्या रसांत गोळी उडदाप्रमाणें व मुगाप्रमाणें बांधावी. अनुपान पाहून द्यावी. **पथ्य**— पोळी, भाकर, भात खावा.

३५०. **ज्वरास चूर्ण** : बाभळीचें बीज, रास्ना, गुळवेल, शतावरी, सुंठ, बाडिशेप, शेवरीची साल, तेड, ओंवा, अजमोदा, यांचें चूर्ण करून द्यावें.

३५१. **हरताळभस्म** : केळीचा जुना कंद, त्यांत नारळाबरोबर हरताळ घालून, मातीच्या कापडानें वेष्टण करून गजपुट द्यावें; सिद्ध होईल.

३५२. **ताम्रभस्म** : तिधारी निवडुंगाचें दूध पक्कें शेर आणून, लहान मडक्यांत दूध घालून, त्यांत पैसा टाकावा. मातकापड करून गजपुट द्यावें.

३५३. **पारदभस्म** : आंबोतीचा रस तोळे ४, व त्यांत पारा १ तोळा घालून घोंटावा. गोळी करावी. मातीचे दिवे लावावे, त्यांत लुगदी ठेवावी व मातकापड करून अल्प आंच द्यावी. सिद्ध होईल.

३५४. **हिंगूळ शुद्ध करण्याचा विधी** : हिंगूळ, वांगीं चिरून त्यांत घालावा व मातकापड करून अग्नि द्यावा. याप्रमाणें चवदा पुटें द्यावीं. सिद्ध होईल.

३५५. **क्षारशुद्धी करण्याचा विधि** : निवडुंगाचा रस व रुईचा रस, यांत तीन दिवसपर्यंत क्षार भिजत ठेवावा. नंतर अग्नि द्यावा. क्षार मात्र व्यवस्थेनें ठेवावा. सिद्ध होईल.

३५६. **ज्वरावर** : सुंठ, विष्णुक्रांत, गुळवेल, चिराईत, धमासा, डोरलीमूळ, रिंगणीमूळ ह्यांचा काढा करून द्यावा.

३५७. **चंद्रोदय अंजन** : बेहडाबीज, हिरडाबीज, मनशीळ, मिरे, पिंपळी, वेखंड, कोष्ठ, शंखभस्म, हीं औषधें, मेंढीचे दुधांत खलून डोळ्यांत अंजन करावें. यानें डोळ्यांस उत्तम तेज येईल.

३५८. **हिंगाष्टक** : सुंठ, मिरें, पिंपळी, जिरें, शहाजिरें, अजमोदा, हिंग, सैंधव, यांचें चूर्ण करून लिंबाचे रसात खलावें.

३५९. **मदनप्रतापरस** : दगडफूल, जायफळ, धोतऱ्याचें बीज, काकडशिंगी, चंदन, नागरमोथे, बाळवेल, कस्तुरी, भृंगपुष्प, पोस्त, ओंवा, हीं औषधें नागवेलीच्या रसांत खलून, गोळी चार गुंजाप्रमाण करून, दूध, मध, पिंपळी यांपैकी प्रकृतिमानाप्रमाणें अनुपान योजून देणें.

३६०. **ज्वर व अरुचीवर** : सुंठ, पिंपळी, यांचें चूर्ण साखरेंत द्यावें.

३६१. **पोट दुखत असल्यास** : सैंधव, चित्रक, हळद, यांचें चूर्ण एकत्र करावें व तें ऊन पाण्याशीं द्यावें.

३६२. **कामनाशकचूर्ण** : कर्पूर, नवनीत, बाळंतनिंब, यांचें चूर्ण करून घेणें.

३६३. **कामकर चूर्ण :** मिरें, हळद, गूळ, यांचें चूर्ण करून मधाशीं द्यावें.

३६४. **त्रयोदशगुणी गुग्गुळ :** चोपाचिनी, अश्वगंध, कांटेशेवरी, गुळवेल, शतावरी, सराटे, रास्ना, कचोरा, ओंवा, सुंठ, पिंपळी, गुग्गुळ, गोघृत, हीं औषधें एकत्र करून मोटळी बांधून, त्रिफळ्याचे काढ्यांत सुपारीएवढी गोळी करावी.

३६५. **रसशुद्धविधि :** पारा चांगला आणून महिनाभर लसुणाच्या रसांत दररोज दोन प्रहरपर्यंत खलावा. मग ३० दिवस कांजीच्या पाण्यांत खलावा. म्हणजे शुद्ध होईल.

३६६. **गंधक :** दुधांत सात दिवस शोधावा. शुद्ध होईल.

३६७. **ज्वरावर काढा :** भारंगमूळ, पित्तपापडा, सुंठ, पिंपळी, कडूनिंबाची साल, चिराईत, गुळवेल, नागरमोथे, धणे, अडुळशाचा पाला, यांचा काढा करून घेणें.

३६८. **अतिसारावर काढा :** बाळवेल, वाळा, सुंठ, नागरमोथे, धणे, यांचा काढा करून घेणें.

३६९. **ज्वरावर :** कडू पडवळ, सुंठ, नागरमोथे, ज्येष्ठमध, कुटकी, हिरडा, यांचा काढा करून घेणें.

३७०. **वायूवर काढा :** बिब्याचें टरफल वजन दीड मासा, याचा काढा करून, नंतर आंत निर्गुंडीचा रस ·|· मासा, शेवगारस ·|· मासा, एकत्र करून द्यावें.

३७१. **कफावर :** सुंठ, चित्रक, पिंपळमूळ, पिंपळी, चवक, यांचा काढा करून द्यावा.

३७२. **आनंदभैरव रस :** बचनाग, कवडीचें भस्म, हिंगूळ, सुंठ, टाकणखार, मिरें, पिंपळी, सैंधव, धोतऱ्याचें बीज, जायफळ, हीं औषधें निंबाच्या रसांत तीन दिवसपर्यंत खलून गोळ्या कराव्या, व त्या प्रकृतिमान पाहून घेत जाव्या. ताप, खोकला, मोडशी, यांवर वस्ताद.

३७३. **अनिद्रेवर चूर्ण :** धणे, लवंगा, सुंठ, पिंपळी, ह्यांचें समभाग चूर्ण करून घ्यावें.

३७४. **व्रणावर रामबाण मलम :** कडू जिरें व पांढरा कांदा तुपांत जाळून, तुपांतच खलून लावावा.

३७५. **दाढ दुखत असल्यास :** तुरीच्या डाळीचें पीठ दांतांत धरावें.

३७६. **ग्रहणीकपाट रस :** पोस्त, जिरें, आंब्याची कोय, चिंचेचा मगज, लोध्रसाल, जायफळ, जायपत्री, मोचरस, बाळवेल, सुंठ, मिरें, पिंपळी, धायटीचीं फुलें, अफू, मुस्ता, ओंवा, अजमोदा, टांकणखार, इंद्रजव, धोत्राफळ, व धोत्रा बीज, हीं एकत्र करून, केळफुलाचे रसांत दोन दिवस खल करून, दोन गुंजाभार गुटिका करावी. व अनुपानें योजून द्यावी. हा रस विशेषतः प्रदरावर उपयोगी आहे.

३७७. **मंदज्वरावर :** लाह्या आणून उष्णोदकांत कोळून तो काढा घेणें.

३७८. **प्लीहावर चूर्ण** : सैंधव, चित्रक, पिंपळी, शेवगामूळ, जिरें यांचें चूर्ण करून घेणें.

३७९. **पंचनिंब चूर्ण कुष्ठावर** : कडूनिंबाची साल, पानें, पुष्पें, फळ, मूळ या सर्वांचें चूर्ण करून घेणें.

३८०. **मेहावर** : गाईचें दूध १८ भाग, शीतोदक ५ भाग, शर्करा २ भाग, वंशलोचन २ भाग, रेवाचिनी २ भाग, रक्तचंदन २ भाग, भुईतरवडाचा पाला २ भाग, हीं औषधें एकत्र करून घेणें.

३८१. **वृषणवृद्धि झाली असलयास** : धूप, गुग्गुळ, शेवरीचा डिंक, खैराचा डिंक, ह्या औषधांचा तमाखूच्या पत्रास लेप देऊन, तें पत्र वृषणावर बांधावें; उलटी होईल.

३८२. **श्वासावर** : कुलिथ्थ, रिंगणमूळ, भारंगमूळ, सुंठ, तुळशीचा रस, यांचा काढा अथवा चूर्ण करून घेणें.

३८३. **अर्शावर** : तीळ, बिबे, हिरडा, गूळ यांच्या गोळया करून घेणें.

३८४. **बहुमूत्ररोगास** : ओंवा, अजमोदा, तीळ, मेथ्या, खसखस, हीं एकत्र करून, चूर्ण करावें, व तें प्रकृतिमानाप्रमाणें घ्यावें.

३८५. **वातावर गोळया** : पारा, गंधक, कात, अभ्रकभस्म, ताम्रभस्म, हीं औषधें एकत्र करून, त्यांस पांढऱ्या वसूचा रस, गुळवेलीचा रस, रुईच्या पानांचा रस, सुंठ, मिरें, पिंपळी, यांचा काढा करुन, त्यांचीं पुटें तीन तीन द्यावीं. आणि नंतर खलून गुंजमात्र गोळी बांधावी.

३८६. **क्षयावर चूर्ण** : अश्वगंध, पिंपळी, मिरें, भारंगमूळ, तालिसपत्र, सुंठ, दालचिनी, वेलदोडे, नागकेशर, त्रिफळा, कचोरा, रास्ना, जिरें, कोष्ठ, गुळवेल साखर, कुटकी, ह्या औषधांचें चूर्ण करून, अनुपानपरत्वें घेत जावें.

३८७. **वायूवर निर्गुडीचें तेल** : दारूहळद, पिंपळमूळ, समुद्रफेस, कवच, चित्रकमूळ, हुलगे, लाक्षा, देवदार, यांचा काढा करून, त्यांत निर्गुंडीचा रस व तिळाचें तेल एकत्र करून, पुन्हा कढवून, तेल मात्र राहिलें म्हणजे उतरावें व तें चोळावें.

३८८. **परिणामशूलावर** : हिरडा, बेहडा, आंवळकठी, बाहवामगज, यांचा काढा करून त्यांत साखर व मध घालून घेणें.

३८९. **दोषत्रयावर** : कचोरा, गुळवेल, कुटकी, धमासा, काकडसिंगी, सुंठ, भारंगमूळ, एरंडमूळ, चिराईत यांचा काढा करून घेणें.

३९०. **वायूवर दशमुळें** : गांजामूळ, भारंगमूळ, डोरलीमूळ, बेलमूळ, टांकळीमूळ, टेंटूमूळ, पाडळमूळ, शिवणीमूळ, सराटेमूळ, (गोखरूं) यांचा काढा करुन घेणें.

३९१. **शूलास** : सैंधव, पिंपळी, हिरडा, सुंठ, चित्रक, यांचें चूर्ण करून घेणें.

३९२. **सूर्यशेखर रस** : पारद, टांकणखार, गंधक, जेपाळ, सैंधव, मिरें, सितशर्करा, हीं जंबीर फळाच्या रसांत भिजवून, चार प्रहर ठेवून, दोन गुंजाएवढी गुटिका करावी, व ती अनुपानपरत्वें वायूवर द्यावी.

३९३. **भीमसेनी चूर्ण** : सैंधव, पिंपळमूळ, चवक, चित्रक, आंवळकठी, सुंठ, यांचें चूर्ण करून आल्याच्या रसांत द्यावें.

३९४. **सन्निपातावर उपाय** : रुईमूळ, पिंपळमूळ, देवदार, शेवगामूळ, चवक, निर्गुडीमूळ, पिंपळी, रास्ना, माका, वसुमूळ, चित्रक, वेखंड, चिराईत, सुंठ यांचा काढा करून द्यावा.

३९५. **ज्वरपचनावर काढा** : सुंठ, डोरलीमूळ, रिंगणीमूळ, देवदार, मुस्ता यांचा काढा घेणें.

३९६. **वज्रक्षार, उदरावर** : समुद्रमीठ, सज्जीक्षार, लवण, सैंधव, गंधबीड, साबरमीठ, टांकणक्षार, यवक्षार, बांगडलोण, त्रिकटु, त्रिफळा, समभाग हळद, चित्रक, यांचें चूर्ण करून उष्णोदकाबरोबर द्यावें.

३९७. **नृसिंहचूर्ण, उदरावर** : बडिशेप, वेखंड. कोष्ठ, शहाजिरें, धणे, सज्जीक्षार, यवक्षार, पिंपळमूळ, ओंवा, कडू जिरें, निवडुंग, तिळवण, कडूवृंदावन, चित्रक, दंतीमूळ, निशोत्तर, शिककायी, यांचें चूर्ण करून घेणें.

३९८. **ज्वरावर चूर्ण** : गुळवेल, पिंपळमूळ, कुटकी, हिरडा, सुंठ, लवंग, निंबसाल, चंदन, चिराईत, पिंपळी, ओवा, मिरें, चवक, चित्रक, काळा वाळा, जिरें, धणे, सांवरलोण, आम्लवेतस, धायटीचीं फुलें, बाळबेल, हीं औषधें तीन तीन भाग, अजमोदा, कवठाचा मगज, एकत्र करून चूर्ण करावें, व साखर घालून घेणें.

३९०. **ज्वरावर** : द्राक्ष, गुळवेल, सुंठ, पिंपळी, ह्या औषधांचा काढा करून घेणें.

४००. **कामिणीवर कषाय** : हिरडा, बेहडा, आंवळकठी, ह्यांचा कषाय करून घेणें.

४०१. **शंखवटी रस** : पारद, गंधक, शंखभस्म, चिंचेचा क्षार, सैंधव, साबरमीठ, मीठ, टांकणखार त्रिकटु, हिंग, निंबाचा रस तीन दिवस भिजवून नंतर दोन गुंजाभार गुटिका करावी.

४०२. **वातारि रस** : पादर, पिंपळमूळ, सुंठ, वेलदोडे, दालचिनी, लवंगा, जायपत्री, जायफळ, केशर नवें, कस्तुरी, पारदगंधक, हिंगूळ, बचनाग, मिरें, आल्याचे रसांत ४ प्रहर खलावें, गोळी गुंजमात्र बांधावी.

४०३. **आम्लपित्तावर** : सातू, पिंपळी, कडू पडवळ, ह्यांचा काढा करून व त्यांत मध, पिंपळी, घालून घेणें. गुण उत्तम.

४०४. **विषादि गुटिका श्वासकासावर :** बचनाग, श्वेतकात, टांकणखार, त्रिकट्ठ, अफू, ताम्रभस्म, आल्याच्या रसांत एकवीस भावना देऊन, दोन गुंजाभार गुटिका करावी.

४०५. **मेघनादरस, उदरावर :** बाळहिरडे, जेपाळ, पिंपळी, सुरवरी हिरडा, आल्याच्या रसांत एकवीस दिवसपर्यंत खल करावा. गुटिका दोन गुंजाभार करून उष्णोदकाबरोबर द्यावी.

४०६. **मूत्रकृच्छ्रावर :** चिंचोक्याचा मगज, कापसाच्या सरक्या, कंवठीचा डिंक, निवळीचें बीज, हळद, गुंजामूळ, भुईतरवडबीज, यांचें चूर्ण करून ताकाशीं द्यावें.

४०७. **मेहावर चूर्ण :** वटसाल, उंबरसाल, पिंपळसाल, टेंटूसाल, बाहावा साल, असाणासाल, कपित्थमगज, जांभूळसाल, चारसाल, कुंभासाल, अर्जुनवृक्षसाल, मोहासाल, ज्येष्ठमध, लोध्रसाल, भाठवणीसाल, कडूनिंबसाल, कडू पडवळ, गोवल्ला, दंतीमूळ, चित्रकमूळ, धान्यातुरी, करंजसाल, इंद्रवज, गोडंब्या, त्रिफळा, यांचें चूर्ण करून घेणें.

४०८. **प्लीहोदरावर :** त्रिकटू, कोष्ठ, यवक्षार, सैंधव, हिंग, यांचें चूर्ण करून उष्णोदकांत घेणें.

४०९. **पाचक चूर्ण :** त्रिकट्ठ, त्रिफळा, सैंधव, चवक, चित्रक, जिरें, हिंग यास निंबाच्या रसाच्या ७ भावना देऊन घेणें.

४१०. **ज्वरावर चूर्ण :** धणे, सुंठ, लवंगा, यांचें चूर्ण करून घेणें.

४११. **डाळिंबपाक :** सुंठ, मोचरस, पोस्त, अजमोदा, अफू, जायफळ, जायपत्री, सैंधव, आम्रकोय, डाळिंबसाल, भृंग, कात, वंशलोचन, लवंग, ह्या औषधांचें चूर्ण करून, नंतर तें चूर्ण, एक डाळिंब कोरून, त्यांत घालावें. नंतर मग वरून मातकापड करून गजपुट द्यावें. नंतर डाळिंब तसेंच वाटून, दोन गुंजाभार गुटिका करावी.

४१२. **पाचक चूर्ण :** शर्करा, जिरें, शहाजिरें, मिरें, सुंठ, पिंपळी, सैंधव, हिरडा, हीं औषधें दोन प्रहर भिजत ठेवावीं. नंतर एक खारीक चिरून त्यांत ह्या औषधांचें चूर्ण भरावें आणि सगळी खारीक भक्षावी.

४१३. **मंडूरक्रिया :** प्रथम जुनें कीट आणावें, वर्षपर्यंत ताक चार तऱ्हेचें व गोमूत्र, त्यांत भिजवून पुरून ठेवावें. नंतर काढून बेहड्याच्या कोळशाच्या निखाऱ्यांत भाजावें. पुन्हां ताक व गोमूत्रांत विझवावें. याप्रमाणें ४ दिवसपर्यंत करावें. तें विरालें म्हणजे, लोह कढईत घालून गोमूत्राचीं २१ दिवस, त्रिफळाच्या काढ्याचीं २१ दिवस, कोरफडाच्या रसाचीं २१ दिवस, अशीं पृथक् पुटें द्यावीं. दोन प्रहर खलावें. दोन प्रहरपर्यंत वाळवावें. याप्रमाणें करून अनुपानपरत्वें द्यावें.

४१४. **ज्वरांकुश रस :** पारा, गंधक, बचनाग, धत्तुरबीज, त्रिकटु, हीं औषधें एकत्र करून चूर्ण करावें व त्यांस विलायती निवडुंगरसाच्या भावना ३ दिवस देऊन नंतर त्रिकटूच्या काढ्याच्या भावना ३ दिवस द्याव्या. गोळी मात्रमात्र करावी.

४१५. **रक्तविकारावर :** अडुळशाचा पाला, गुळवेल, एरंडमूळ यांचा काढा करून घेणें.

४१६. **सोमलशुद्धि :** (पांढऱ्या व पिंवळ्या सोमलाच्या शुद्धीची क्रिया एकच जाणावी.) शंख्या सोमल तोळे २, पारा तोळे २, कडू दोडक्याचे रसांत घोंटून गोळी करणें. शेळीच्या लेंड्यांचा अग्नि तीन दिवस देणें. मुखमुद्रा करून श्वास जाऊं देऊं नये. तरच उत्तम शुद्धि होते.

४१७. **डाळिंब्या सोमलाची शुद्धि :** डाळिंब्या सोमल कमळाच्या चोथ्यांत घालून अग्नि देणें.

४१८. **अजीर्णावर :** चित्रक, सैंधव, मिरें, यांचें चूर्ण ताकांत घेणें.

४१९. **अर्शावर उपाय :** चित्रकमूळ, कासाळूकंद, खंबरासुरण, एकत्र लुगदी करून, मडक्यास आंतून लेप द्यावा, व त्यात दहीं विरजून त्यांतच घुसळून, ताक करून प्रात:काळीं उठतांच तें अगोदर १ तोळा प्यावें.

४२०. **महासुदर्शन चूर्ण :** हिरडा, दारूहळद, कचोरा, पिंपळमूळ, धमासा, नागरमोथा, बाळंतनिंबाची साल, देवदार, कडूपडवळ, कमळबीज, जायफळ, ज्येष्ठमध, भारंगमूळ, दालचिनी, श्वेतचंदन, गांजामूळ, तगर, बेहेडा, आंवळकठी, हिरडा, डोरलीमूळ, रिंगणमूळ, त्रिकटु, मोरवेली, गुळवेल, कुटकी, पित्तपापडा, त्रायमाण, वाळा, चित्रकमूळ, चवक, तमालपत्र, लवंग, वंशलोचन, श्वेतकावळी, जायपत्री, तालीसपत्र, चिराईत, कुड्याची साल, इंद्रजव, शेवगाबीज, वेखंड, पद्मकाष्ठ, काळा वाळा, अतिविष, चिकणा, बाभळीमूळ, वावडिंग सर्व एकत्र करून चूर्ण उदकांत घेणें.

४२१. **अश्वगंधपाक :** अश्वगंध ३२ भाग, दालचिनी, वेलदोडे, नागकेशर, तमालपत्र, जायफळ, जायपत्री, नवें केशर, वंशलोचन, जटामांसी, मोचरस, चंदन, श्रीकृष्णागर, पिंपळी, पिंपळमूळ, लवंग, तालीमखाना, सागरगोटेमगज, अक्रोड, शिंगाडे, सराटे, रससिंदूर, अभ्रकभस्म, नागभस्म, वंगभस्म, लोहभस्म, खडीसाखरेचा पाक, हीं औषधें एक एक भाग. यांपैकीं प्रथम अश्वगंध शिजवावा, तो वाळवून नंतर चूर्ण करून सर्वांचें चूर्ण करावें आणि गाईचे दोन शेर दुधांत मग साखरेच्या पाकांत तें चूर्ण घालून, एक तोळाप्रमाणें वडी करावी. यानें पुष्टि प्राप्त होऊन शक्ति कमी करणाऱ्या सर्व रोगांचा नाश होईल.

४२२. **कूष्मांडपाक :** कोहळ्याचा मगज २ भाग, गाईचें दूध १ भाग, तूप १ भाग, धूवा साखर १ भाग, व केशर, लवंग, कस्तुरी, वेलदोडे, जायफळ, जायपत्री, दालचिनी, सुंठ, पिंपळी, मिरें, पिंपळमूळ, काळा वाळा, कमलकंद, कोहाळ्याचें बीज, बेहडेदळ, सुरवरी हिरडा, आंवळकठी, सराटे, तालीसपत्र, तमाल-

पत्र, नागकेशर, चंदन, धणे, ज्येष्ठमध, नागरमोथे, वाळा, चवक, चित्रक, अश्वगंध, येणेंप्रमाणें औषधें एक एक भाग. प्रथम कोहळ्याच्या मगजाचें चूर्ण हातानें होईल असें गाईचे तुपांत तळून गाईचे दुधाचा खवा करावा व साखरेचा पाक करून त्यांत खवा व सर्व जिन्नसांची पूड व मगज घालून वड्या कराव्या. हा पाक सदरहूप्रमाणें बल व पुष्टि देणारा व रोगहारक आहे.

४२३ **कफावर** : (१) ओवा मासे ३, सैंधव व मीठ मासे २ व त्यावर भल्लातकाच्या तेलाचे थेंब ७ टाकून द्यावें. (२) चित्रक, नागरमोथे, त्रिकटू, बेहडा, आंवळकठी, यांचें चूर्ण करून त्यांत लोहभस्म घालून घेणें.

४२४. **ज्वरातिसारावर** : गुळवेल, अतिविष, इंद्रजव, नागरमोथे, चिराईत, सुंठ यांचा काढा करून घेणें.

४२५. **नळावर** : साखर, बडीशेप, पाणी, निंबाचा रस, एकत्र करून घेणें.

४२६. **आमांशावर विश्वपुट पाक** : सुंठ, एरंडमुळाच्या रसांत वांटून तीन पुटें देऊन, शर्करा टाकून घेणें. प्रथम रसांत शिजवावीं. नंतर वाळवून पुटें द्यावीं.

४२७. **जखमेवर मलम** : तिळाचें तेल १ भाग, मेण २ भाग, सेंदूर २ भाग, शंखजिरें २ भाग, मुरदाडसिंग ७ भाग, कांद्याचा रस २ भाग, लसुणीचा रस ६ भाग, घोंसाळीच्या पानांचा रस १ भाग, रक्तबोळ ६ भाग, गुग्गुळ २ भाग, मुरडशेंग ८ भाग, हीं सर्व औषधें एकत्र कुटून, कढवून, गाळून ठेवणें व जखमेवर पट्टी देत जाणें.

४२८. **सूज, गोळा किंवा वातानें होणाऱ्या गांठीवर** : वेखंड, बाभूळ, डिंक, म्हशागुग्गुळ, गुग्गुळ, बोळ, रक्तबोळ, शिलारस, अक्कलकारा, दारूहळद, मिरें, हिंगूळ, मनशीळ, इसबगोल, अहाळीव, पिंपळी, रेवाचिनी, मोगली एरंडाचा डिंक, सेंदूर, हीं सर्व औषधें समभाग घेऊन एकत्र करून गुटिका करावी. नंतर शैत्यजनित असला तर निंबाच्या रसांत उगाळून लेप द्यावा.

४२९. **महा अतिसारावर** : जायफळ, जायपत्री, अफू, हिंगूळ, हीं औषधें एक एक भाग व टांकणखार १० भाग, निंबाचा रस ६ भाग, यांचें चूर्ण करून त्यास मधाचीं दोन पुटें देऊन दोन प्रहर खल करून दोन गुंजाभार गुटिका करावी.

४३०. **संग्रहणीस अजमोदा चूर्ण** : हिंग, पाडळमूळ, हिरडा, धणे, डाळिंबसाल, अतिविष, तेड, चित्रक, सराटे, अजमोदा, सुंठ, मिरें, पिंपळी, जिरें, चवक, मीठ, सैंधव, साबरमीठ, गंधबीड, टांकणखार, सज्जीखार, ओंवा, एरंडमूळ, आम्लवेतस, तिळवण, हीं औषधें चूर्ण करून घेणें.

४३१. **ज्वरातिसारावर** : पाहाडमूळ, सुंठ, नागरमोथा, कुड्याची साल, यांचा काढा घेणें.

४३२. **ज्वरावर मुख्यत्वें संग्रहणीवर** : त्रिकटू, त्रिफळा, भारंगीमूळ, वसुमूळ, गुळवेल, रिंगणमूळ, डोरलीमूळ, लाजाळूकंद, चित्रक, चवक, बाळवेल, अजमोदा, बेलमूळ, जिरें, हीं औषधें समभाग घेऊन काढा करून घेणें.

४३३. **पांडू व उदरावर** : श्वेतवसुमूळ, दारूहळद, नागरमोथे, हळद, सुंठ, गुळवेल, हिरडा, रिंगणमूळ, यांचा काढा करून घेणें.

४३४. **पाचक चूर्ण** : त्रिकटू, त्रिफळा, तेड, जिरें, हिंग, सैंधव मीठ, बाळहिरडा, गंधबीड, जायपत्री, हळद, साखर, अजमोदा, साजीखार, डाळिंबसाल, अफू, शहाजिरें, ओंवा, हीं औषधें घेऊन, चूर्ण करून घेणें.

४३५. **चहाचा काढा** : पाणी तापवत ठेवावें, कढल्यावर गवती चहा टाकावा, चहा कढल्यावर औषधें घालावीं, तीं येणेंप्रमाणें:— खडीसाखर २ गुंजा, केशर २, वेलदोडे १, जायपत्री १, कस्तुरी १ गुंज, लवंग मासा १, दालचिनी १ मासा, हीं औषधें एकत्र करून प्रत्येक मनुष्यानें दहा तोळे घ्यावें. यानें कसलेंहि शैत्य असलें तरी तें जाऊन अजीर्ण व श्रमापासून उत्पन्न होणारा ताप वगैरे सर्व शमतील.

४३६. **नारायण चूर्ण** : ओंवा, शेरणी, धणे, शेपा, पिंपळमूळ, कचोरा, सुंठ, जिरें, पिंपळी, मिरें, कोळिंजन, चित्रकमूळ, सज्जीखार, जवखार, एरंडमूळ, कडु कोष्ठ, सैंधव, स्वच्छ लवण, गंधबीड, कांचेलवण, मीठ, वडांगर, वावडिंग, काळें जिरें, इंद्रजव, हिरडेदळ, ब्याहाडेदळ, आंवळकठी, दांतीचें मूळ, तेड, इंद्रायणमूळ, रिंगणी, यांचें चूर्ण करणें व तें वातरोगावर, प्रकृतिमानाप्रमाणें देणें.

४३७. **द्राक्षादि चूर्ण** : द्राक्षें, भातलाह्या, साखर, कमळबीज, ज्येष्ठमध, खारीक, केवडीमूळ, तवकीर, वाळा, आंवळकठी, नागरमोथे, पांढरा चंदन, नागकेशर, कापूरकाचरी, जायफळ, एळा, लवंग, केशर, पिंपळी, धणे, हीं औषधें आणून चूर्ण करावें, व वातपित्तरोगावर, प्रकृतिमानाप्रमाणें देणें.

४३८. **शीतज्वरास** : मोरचूत, टांकणखार, पारा, बचनाग, गंधक, कलखापरी, हरताळ, हीं औषधें शुद्ध करून समभाग कारलीच्या रसांत खल करून, वाटाण्याऐवढी गोळी करावी. सुंठ-साखरेबरोबर घ्यावी.

४३९. **भुईतरवड प्रकरण** : भुईतरवड प्रतिदिवशीं घेत जावा. त्याचीं अनुपानें येणेंप्रमाणें:—(१) २१ दिवस मधाशीं खाल्ला तर इंद्रियें बळकट होतील. (२) साखरेशीं घेतल्यास पित्त शमेल. (३) नाबद साखरेशीं घेतल्यास बल व पुष्टि प्राप्त होईल. (४) लोण्याशीं घेतल्यास अंगांतील दाह शमेल. (५) खजुराशीं घेतल्यास भूक लागेल. (६) द्राक्षाशीं घेतल्यास दृष्टि शुद्ध होईल. (७) माक्याच्या रसाशीं घेतल्यास वृद्ध पुरुषहि तरुण होईल. (८) रान आंवळीच्या रसाशीं घेतल्यास दमा जाईल. (९) सारफळाचे रसाशीं घेतल्यास डोळ्यांतील कीड मरेल. (१०) निरगुडीच्या रसाशीं घेतल्यास वायूच्या तिडका शमतील. (११) निंबाच्या रसाशीं घेतल्यास पोटदुखी जाईल. (१२) ओंव्याच्या रसाशीं घेतल्यास सर्दी जाईल.

(१३) पिंपळीच्या रसाशीं घेतल्यास अर्धशिशी जाईल. (१४) लवंगेशीं घेतल्यास कामोद्भव होईल. (१५) शेळीच्या दुधाशीं घेतल्यास स्त्रीस प्रिय होईल. (१६) तिळाच्या तेलाशीं घेतल्यास सर्प उतरेल. (१७) हरणीच्या दुधाशीं घेतल्यास चपलता प्राप्त होईल. (१८) डाळिंबाच्या रसाशीं घेतल्यास उरांतील दुःख जाईल. (१९) भुईतरवडाची मुळी मधांत उगाळून शिश्नास लेप केला तर वीर्यस्तंभन होईल. पथ्य नाहीं. (२०) हरभऱ्याचे आंबीबरोबर घेतल्यास अंगातील दाह जाईल. (२१) बिब्याशीं घेतल्यास डोळ्यांतील कीड जाईल. (२२) सराड्याच्या रसाशीं घेतल्यास वांझहि गर्भिणी होईल. (२३) गाईच्या दुधाशीं घेतल्यास बोवडा नीट बोलेल. (२४) उंटिणीच्या दुधाशीं घेतल्यास रोडका माणूसहि धष्टपुष्ट होईल. (२५) भुईतरवड सव्वादोन टांक, त्याच्या २१ पुड्या कराव्या. व येणेंप्रमाणें अनुपान योजून घेणें.—मधाशीं घेतल्यास विशेष शक्ती येऊन, पोटदुखी राहील. (२६) साखरेशीं घेतल्यास शरीरांतील उष्णता, दाह व सुस्ती नाहींशी होईल. (२७) गुलकंदाशीं घेतल्यास सर्दी जाईल. (२८) गुळाशीं घेतल्यास हरतऱ्हेची उष्णता दूर होईल. (२९) गाईचे तुपाशीं व साखरेशीं घेतल्यास वीर्यस्तंभन होईल, व पुष्टि प्राप्त होईल. (३०) मेंढीचे दुधाशीं घेतला असतां शक्ति येऊन धातु विशेषच पुष्ट होईल. (३१) स्त्रियांनीं उंटाचे दुधांत घेतल्यास शरीर बळकट होईल. (३२) आलें-साखरेशीं घेतला तर भूक व तहान यांचा फार त्रास होणार नाहीं. शक्ति येते. (३३) डाळिंबाच्या रसाशीं घेतला तर छाती साफ होईल. (३४) उंबराचे सालीशीं घेतला तर भूक लागते. (३५) माक्याच्या रसाशीं घेतला तर वृद्धपणापावेतों केंस पांढरे होत नाहींत. (३६) आंवळ्याच्या रसाशीं घेतला तर मस्तकरोग दूर होतो. (३७) आल्याशीं घेतला तर जीर्णज्वर दूर होतो. (३८) निंबोळ्याशीं घेतला तर पोटांतील उष्णता झडून बाहेर पडेल. (३९) डाळिंबाच्या सालीशीं घेतला तर रक्त शुद्ध होऊन आराम होतो.

४४०. **तमाखू प्रकरण :** (१) तमाखूला अफूचीं सात पुटें द्यावीं. ती सात दिवस ओढली असतां वायू दूर होईल. वावडें संभाळावें. (२) हरभऱ्याच्या आंबीचीं पुटें सात दिवस देऊन, एकवीस दिवस ओढावी; वायु हरेल. पथ्य संभाळावें. (३) कडू कान्हळीचीं पुटें ७ देऊन एकवीस दिवस ओढली असतां ज्वर जाईल. (४) मिऱ्याचीं सात पुटें देऊन, एकूणपन्नास दिवस ओढल्यास दमा जाईल व वातज्वर जाईल. (५) हळदीचीं सात पुटें देऊन २५ दिवस ओढली असतां कंबर बळकट होईल व २१ दिवस ओढली असतां मुखाची घाण जाईल. (६) धोत-ऱ्याच्या रसाचीं सात पुटें देऊन २५ दिवस ओढली असतां अफू उतरेल. (७) बाभळीच्या अंतरसालीचीं ७ पुटें देऊन २५ दिवस ओढली असतां पंडुरोग जाईल. (८) कागदी लिंबाच्या रसाचीं ७ पुटें देऊन, २१ दिवस ओढली असतां विष उतरेल. (९) महाळुंगीच्या रसाचीं ८ पुटें देऊन ४९ दिवस ओढल्यास गेलेलें

वीर्य येईल. **सूचना**— हें तमाखू ओढण्याचें काम उगीच कोणी एकदम करूं नये. पचेल किंवा नाहीं याचा विचार पाहूनच करावें.

४४१. **समुद्रफळ घेण्याचीं अनुपानें :** (१) अळ्ळकान्याशीं घेतल्यास कृमी नाहींसे होतील. (२) डिंकाशीं घेतल्यास उष्णता नाहींशी होईल. (३) आवळ्याच्या रसाशीं घेतल्यास विखार शमेल. (४) आघाड्याच्या रसाशीं घेतल्यास नपुंसकपणा जाईल. (५) निळ्या धोतऱ्याच्या रसांत लाविलें असतां मूळव्याध जाईल. (६) गोमूत्रांत खाल्लें तर सर्व प्रमेह जातील. (७) शिळ्या पाण्याशीं खाल्लें तर मोडशी जाईल. (८) म्हशीच्या दुधांत डोळ्यांत घातलें तर चिपडें जातील. (९) पाण्याशीं घेतल्यास मधुमेह जाईल. (१०) हळदीशीं खाल्लें तर खोकला जाईल. (११) मधाशीं खाल्लें तर अंगाची दुर्गंधी जाईल. (१२) साखरेशीं घेतल्यास शरीर पुष्ट होईल.

४४२. **वातव्रण रोगास उपाय :** (१) सोमल शुद्ध करून भाग १, वावडिंग भाग २, कात भाग २, हीं औषधें नागवेलीच्या पानाच्या रसांत खलून मुगाएवढी गोळी करून द्यावी. प्रातःकाळीं गोळी १, व संध्याकाळीं २ गोळ्या देणें. गोळी गाईच्या तुपांत देणें. अळणी खावयास देणें. मीठ व तेलकट बंद करणें, औषध एकंदर तीन महिने घेणें, रोग निखालस जाईल. (२) डाळिंबसाल १ तोळा, पांढरा कात ९ टांक, आल्याचा रस पाव तोळा, खलून गोळ्या वालप्रमाण कराव्या. व दररोज तुपाशीं अथवा शिळ्या पाण्याशीं १४ दिवस घेणें. ऊन पाणी प्यावयास देणें. **दोहोंस पथ्य**— जोंधळ्याची भाकर व तुरीचें वरण खावें. तेल वर्ज्य. तेलाचा वास आला असतां रोगी मरेल, म्हणून संभाळावें. आग झाल्यास तूप पाजावें. मीठ चाखावयास देणें. बहुत आग झाली असतां तांदुळाच्या धुवणाशीं सोनामुखी देणें. उतार पडेल.

४४३. **गर्मीस औषध :** (१) उन्हाळीच्या मुळ्याची राख तोळे ३, हिंग तोळा १, तांब्याच्या परातींत एक प्रहर खलून, मग त्याच्या १४ पुड्या कराव्या व पिंपळाचे सालीचे कोळसे करून, त्याजवर एक पुडी टाकून धुरी घ्यावी. **उतार**— हरभऱ्याची आमटी, गरम मसाला घालून वाफारा घेणें, व दडपून निजणें. मग भात, आमटी खाणें. गर्मी जाईल. (२) रुईची मुळी, हिंगूळ, वेखंड, दारुहळद, याची गुडगुडी ओढिली असतां गरमी जाईल.

४४४. सुरवारी हिरडे व सुंठ यांच्या तीन वर्षांच्या गुळांत गोळ्या आंवळ्याएवढ्या बांधून, मधांत १४ दिवस घेणें. व देवडांगराचा रस, मेंदराचें मांदें, एरंडाचा रस, हीं तीन एकत्र करून लेप करणें. हीं औषधें चांगलीं आहेत.

४४५. **नजर मंद झाली असल्यास :** पिंपळाची अंतर्साल व पांढरे तीळ, एके ठिकाणीं वांटून, तांब्याच्या ताम्हनांत एकत्र करून त्यांत पारव्याची विष्ठा घालून, डोळ्यांत घालणें. तीन दिवसांत गुण येईल.

४४६. **भुईतरवडाचीं आणखी अनुपानें** : भुईतरवड पुष्य नक्षत्रीं घेऊन, चूर्ण करावें. व हें पाण्याशीं एक महिना घेणें. यानें महा प्रमेह जाईल. मधाशीं एक महिना घेतल्यास क्षयरोग जाईल. साखरेशीं घेतल्यास वज्रकाया होईल. दह्याशीं घेतल्यास हगवण जाईल.

४४७. **समुद्रफळाचीं अनुपानें** : (१) शेळीच्या मूत्राचीं पुटें ७ देऊन घेणें, अर्धशिशी राहील. (२) व तेंच पुटें दिलेलें औषध शेळीच्या दुधांत उगाळून डोळ्यांत घालावें; डोळ्यांतील फूल झडेल. (३) ओंव्याच्या कोंड्याशीं खाल्लें तर किंवा हिंगाशीं खाल्लें तर कृमी जातील. (४) म्हशीच्या ताकांत घेतल्यास उष्णवात शमेल. (५) तुळशीच्या रसाशीं खाल्लें तर ताप जाईल. (६) नागवेलीच्या रसाशीं खाल्लें तर कळा राहतील. (७) आघाड्याच्या रसाशीं खाल्लें तर रक्तपित्त जाईल. (८) मधाशीं खाल्लें तर प्रमेह जाईल. (९) गुळाशीं खाल्लें तर सुस्ती जाईल.

४४८. **उतरणीच्या मुळाचीं अनुपानें** : (१) तांदुळाच्या धुवणाशीं देणें. (२) महाळुंगाच्या बीजांत अथवा गायीच्या दुधाशीं देणें. (३) महाळुंगाच्या बीजांत अथवा गायीच्या दुधाशीं देणें. अगर ऋतुकाळीं देणें, गर्भ राहील. (४) पांढरे जास्वंदीचे मुळाशीं देणें; ऋतु जातील. (५) पौर्णिमा, दशमी, पंचमी असा मुहूर्त पाहून मूळ आणावें, व चूर्ण करून मधाशीं ३ टांक खावें; सर्व रोग जातील व देह पुष्ट होईल.

४४९. **अक्षर उडण्यास औषध** : आंवळ्याचा रस, गंधक, निंबाचा रस अथवा डिंकाचें पाणी करून अक्षरांस लावावें; उडून जातील.

४५०. **शार्दूलगुटिका** : हिंग एक टांक, वेखंड २ टांक, सेंदेलोण ३ टांक, जिरें ४ टांक, सुंठ ५ टांक, वाळा ६ टांक, मिरें ७ टांक, कोष्ठ ८ टांक, पिंपळी ९ टांक, हिरड्याची साल १० टांक, चित्रक ११ टांक, अजमोदा १२ टांक, ह्या औषधांचें चूर्ण करून तीन वर्षांचा जुना गूळ १ शेर घालून, गोळ्या पैसाभार बांधाव्या, व रोज एक गोळी खावी. ह्याचे **गुण**– मूळव्याध, प्रमेह, पोटशूळ वगैरे सर्व रोग व रक्तप्रदर, गंडमाळा, पंडुरोग, इतके रोग जातील. **पथ्य**– तेलकट, आंबट, वांगें, मोहऱ्या, कांदा, वाळूक व स्त्री इतकें वर्ज्य.

४५१. **पानथरीस औषध** : खुरासनी ओंवा अर्धा शेर, आंबेहळद अर्धा-शेर, लसूण शेरभर, ओंव्याचीं फुलें पावशेर, काळे हरभरे अर्धाशेर, हीं औषधें म्हशीच्या तुपांत २१ दिवस देणें. पोळी, वरण, मेथीची भाजी खावी. बाकी सर्व वर्ज्य.

४५२. **प्याहास औषध** : खुरासनी ओंवा अर्धाशेर, आंबेहळद ९ टांक, वेखंड ९ टांक, लसूण पावशेर, तीन वर्षांचा गूळ ह्यांचें चूर्ण करून म्हशीच्या मूत्रांत १४ दिवस ठेवावें. नंतर त्याच्या गोळ्या २१ बांधाव्या. गव्हाची भाकर, तुरीची डाळ, मेथीची भाजी, मंद अळणी असें खावें. वरकड सर्व वर्ज्य.

४५३. **खोकल्यास औषध :** गोड्या लिंबाच्या पाल्याचा रस १ टांक व मिरें १ टांक, एकत्र करून दिलें असतां खोकला राहील.

४५४. **डोळयांस औषध :** घुल्याइंद्रायणाची मुळी आणावी, व तिचा रस काढून कांशाच्या वाटींत दिव्यावर धरावा व तें काजळ आणि रस एकत्र करून डोळ्यांत १४ दिवस घालावा.

४५५. **हगवणीस औषध :** बाभळीच्या डिंकांत आंब्याची अंतरसाल व चुना हीं एकत्र वांटून, पारोशा पाण्यांत कालवून ३ दिवस घेतलें असतां हगवण राहील.

४५६. **विष पाडण्याचें औषध :** मूठभर मीठ गाईच्या मूत्राशीं देणें. व वरून कांटेइंद्रायण पाण्याशीं देणें. ऊन पाणी प्यावें. विष पडेल. उतार—साळीचा भात व दहीं खावें.

४५७. **सिरीमास औषध :** वासणीची मुळी गोमूत्रांत उगाळून अंगास उटी लाविली असतां सिरीम जाईल.

४५८. **तरळ्यास औषध :** आंवळ्याचा रस, गंधक, धोत्र्याचें बीं, हीं तिळाचे तेलांत उगाळून डोळ्यांत घालावीं.

४५९ : **रातांधळ्यास औषध :** कानांतील मळ व मध दोन्ही मिळून डोळ्यांत घालावें.

४६०. **इसबास औषध :** पळसाचीं पानें जाळून, गाईच्या दुधांत खलावीं. व गोरखचिंचेची राख गाईच्या तुपांत खलावी. तसेंच सात विंचू मारून गाईच्या तुपांत खलावे व हीं तिन्ही एकत्र करून मलम करून लावावा म्हणजे बरें होईल.

४६१. **बदास औषध :** पैसाभार मुरदाडशिंग, पैसाभार गूळ, दीड पैसा सेंदूर, एक कोंबडीचें अंडें व चुना खलून बदास लावावें.

४६२. **मूळव्याधीस :** डुकराचें लेंडूक आणून ७ दिवस धुरी घेणें.

४६३. **गोमाशी कानांत गेली तर :** मीठ उगाळून त्याचें पाणी कानांत घालावें, म्हणजे मरेल किंवा निघेल.

४६४. **वायूमुळें सुजलेल्यास औषध :** वेखंड व आंबेहळद, लिंबाचे रसांत उगाळून लेप करावा.

४६५. **धातुक्षीणतेस उपाय :** तज, नागकेशर, जायफळ, तमालपत्र, अक्कलकारा, जायपत्री, हीं सर्व एकत्र करून, एक एक टांक घेऊन वस्त्रगाळ चूर्ण करावें व मधांत गोळ्या करून सात दिवस द्याव्या. **पथ्य**—आंबट, तिखट, तेलकट, हीं वर्ज्य. औषधावर मिठाई दररोज खावी.

४६६. **क्षयरोग व अतिसार यांस उपाय :** आंवळकठी, हिरडे, पिंपळी, चित्रक, जिरें, सैंधव, खडीसाखर, हीं सर्व पांच पांच टांक घेऊन बारीक कुटून १४ दिवस २–२ टांक घेणें. **पथ्य**—२८ दिवस. तेलकट, आंबट, तिखट, वर्ज्य.

४६७. **पोटशूळास** : पुष्करमूळ १ टांक, सुंठ १ टांक, संचळ १ टांक, हिंग १ टांक, हीं औषधें एकत्र करून तीन दिवस घेणें.

४६८. **जखमेस औषध** : (१) घोड्याचें मूत्र घेऊन, त्यांत धावड्याची साल कुटून जखमेस लावावी, म्हणजे बरी होईल. (२) कोंबडीचें अंडें तिघडी करून लावावें. (३) गायीचें तूप, मेण, हरताळ, शेंदूर, हीं औषधें व त्यांत अर्धाशेर तूप तापवून टाकून मलम करावा.

४६९. **कोडास औषध** : वडबीज, हळद, आंवळकठी, चित्रक, दारूहळद हीं एकत्र करून, एक एक टांक घेऊन गोमूत्रांत खलून ७ दिवस लेप करावा. कोड जाईल.

४७०. **रक्त पडत असेल त्यास उपाय** : आघाड्याच्या पानांचा रस ९ टांक, सुरमा ३ टांक, साखर ३ टांक, तांदुळांचे धुवणाशीं देणें. बरें होईल.

४७१. **व्याधिहारक वटिका** : अतिविष, टांकणखार, हरताळ शुद्ध करून,
पिंपळी, हिरडा, आंवळकठी, चित्रक, गंधक, जेपाळ शुद्ध करून, अक्कलकारा,
समुद्रफळ, एरंडमूळ, ज्येष्ठमध, वावडिंग, पिंपळमूळ, दारूहळद, बचनाग, खुरासणी
ओवा, वेळा, जायपत्री, जायफळ, अफू, सेंदेलोण, कोष्ट, हिंग, लसूण, सर्व औषधें घेऊन,
माक्याच्या रसांत तीन दिवस खल करावा. गोळ्या गुंजेएवढ्या कराव्या. दुधाशीं मंडल
(४८ दिवस) देणें. अनुपानें येणेंप्रमाणें:—(१) मधाशीं घेतलें असतां वात जाईल. (२)
कासवाचे रसाशीं अंजन केलें तर अंधत्व जाईल. (३) लिंबाच्या रसांत घेतलें
असतां मोडशी जाईल. (४) गूळ—पिंपळीशीं घेतलें तर क्षयरोग जाईल. (५)
गोळी उगाळून डोळ्यांत अंजन घातलें असतां व दंशावर लाविलें असतां सर्पदंश
उतरेल अथवा विंचू उतरेल. (६) वावडिंग व गुळाशीं दाढेंत धरिलें असतां
कीड मरेल. (७) मधाशीं गोळी खाल्ली तर तोंडाची दुर्गंधी जाईल. (८) २१
दिवस साखरेशीं घेतल्यास जंत पडतील. (९) निर्गुडीचे रसाशीं घेतल्यास धातुस्राव
बंद होईल. (१०) गोमूत्रांत गोळी घेतल्यास हाडें फुटतात तीं राहतील. (११)
कुमारीच्या रसांत घेतल्यास वायुगोळा दबेल. (१२) म्हशीचे दुधांत गोळी घेत-
ल्यास चैतन्य शुद्ध होईल. (१३) दह्याशीं गोळी घेतल्यास खरूज जाईल. (१४)
अडुळशाचे रसांत व मधांत घेतल्यास रक्तपिती जाईल. (१५) जिरें व वेखंड,
यांत घेतल्यास वज्रकाया होईल. (१६) पाषाणभेदाशीं लाविल्यास गोफणीचें विष
उतरेल. (१७) अक्कलकाऱ्यांत अंगास मर्दन केल्यास घाम जाईल. (१८)
धोतऱ्याच्या रसांत घेतल्यास मुरडा जाईल. (१९) बाभळीच्या रसांत घेतल्यास
जंत पडतील. (२०) पाण्याशीं नाकांत घातल्यास अर्धशिशी जाईल. (२१)
नागार्जुनरसांत घेतल्यास, डोळ्यांतील फूल जाईल. (२२) निर्गुडीच्या रसांत
घेतल्यास धातुस्राव व जीर्णज्वर जाईल. (२३) गुलाबाशीं घेतल्यास कुष्ठ जाईल.
(२४) जायफळाशीं घेतल्यास मूळव्याधि जाईल. (२५) तोंडलीच्या रसांत

घेतल्यास सर्व विषें उतरतील. (२६) जुन्या गुळांत देणें; प्रमेह जाईल. (२७) अडुळशाचे रसांत घेतल्यास खोकला जाईल. (२८) शेळीचे दुधांत घेतल्यास सर्व रोग जातील. (२९) साखरेशीं घेतल्यास ज्वर हरेल. (३०) चंदनांत अंगास लाविल्यास किरीम पडतील. (३१) निंबाचा रस व नवसागर यांत आंगास लावल्यास आंगांतील दाह शमेल. (३२) निंबाच्या रसांत उगाळून पांढऱ्या डिंकाशीं आंगास लाविल्यास आंगावर पडलेले पांढरे टिपके जातील. औषध घेऊन वर गार पाणी प्यावें. तेलकट, तिखट, आंबट, वर्ज्य.

४७२. **सर्व रोगांवर गोळ्या :** पारा, तेल्या बचनाग, हरताळ, आलें, आंवळ्यागंधक, सुपारी, हिरडा, हीं औषधें एक एक टांक, व आंवळकठी ·॥· टांक, कोष्ठ १ टांक, सेनामुखी १ टांक, जमालगोटा १ टांक, पिंपळी एक टांक, हीं एकंदर औषधें बारीक कुटून, माक्याच्या रसांत तीन दिवस खल करून उडदाप्रमाणें गोळ्या कराव्या व वाळवून ठेवाव्या. ह्या गोळ्या सर्व रोगांवर उपयोगी पडतील. **अनुपानें**—(१) एक गोळी सहा मासे ताकांत ३ दिवस घेणें. संग्रहणी दूर होईल. (२) पोटांत अथवा छातींत अथवा मूत्रद्वारा तिडीक असली तर एक गोळी तुपाशीं खाल्ल्यास गुण पडेल. (३) सर्पदंश झाला तर एक गोळी पाण्यांत उगाळून लाविली असतां सर्प उतरेल. (४) उष्णता झाली असल्यास आल्याच्या रसांत गोळी घेणें, गरमी निघेल. (५) विंचू डसला तर गोळी आल्याच्या रसांत लावावी, विष उतरेल. (६) जीर्णज्वर असला तर, कुटकी ३ मासे व एक गोळी येणेंप्रमाणें ३ दिवस देणें, (७) ताप येत असला तर जिरें दोन मासे, व चिनी खडीसाखर २ मासे, व गोळी एक, येणेंप्रमाणें ७ दिवस प्रातःकाळीं देणें. (८) परमा असला तर निर्गुडीच्या पानाचा रस व गोळी, ७ दिवस देणें. (९) भूतबाधा झाली तर निंबाच्या रसांत गोळी उगाळून डोळ्यांत घालावी. (१०) मुखास दुर्गंधी असल्यास, गुळांत गोळी ३ दिवस द्यावी, व त्यावर उत्तम त्रयोदशगुणी विडा खावा. (११) अजीर्ण, पित्त व आळस असल्यास तोरट्याचे रसांत ३ दिवस गोळी घेणें. (१२) सर्वांगांत दाह होत असल्यास आंवळीच्या रसांत गोळी उगाळून डोळ्यांत घातली असतां दाह दूर होईल. (१३) पोट दुखत असेल तर तांदुळांत गोळी खावी. (१४) दोन मासे मध घेऊन त्यांत सायंकाळीं गोळी घेणें; म्हणजे शक्तिवृद्धि होईल. (१५) स्त्रीचें आंग दुखत असेल तर, आलें, मध, पिंपळी, हीं दोन मासे घेऊन त्यांत गोळी देणें; आंग राहील. (१६) मस्तकशूळ झाला वर पांच मासे ताक घेऊन, त्यांत गोळी उगाळून लेप करावा; म्हणजे बरें होईल. (१७) दमा असला तर ६ तोळे खडीसाखर घेऊन, त्याजबरोबर गोळी देणें. दमा दूर होईल. (१८) केंस उडाले असले तर २ मासे गुंज व गोळी उगाळून लेप करावा; केंस येतील. (१९) पोटशूळास ६ मासे ओंवा व गोळी घेणें आणि वर पाणी प्यावें. (२०) रक्त पडत असेल तर गूळ २ मासे, मोचरस १ मासा, व

गोळी एक, येणेंप्रमाणें सात दिवस देणें. बरें होईल. (२१) दांत दुखत असेल तर उटकटारीची मुळी तोळा १ व गोळी पाण्यांत वाटून दाढेंत धरावी. (२२) रातांधळें असेल तर गोळी पारुशा थुंक्यांत प्रातःकाळीं उगाळून ३ दिवस अंजन करावें. (२३) किरीमास चिराईत १ तोळा व एक गोळी, २१ दिवस देणें, आणि वर विडा खाणें. (२४) नपुंसकत्वास कोंवश्याच्या अंड्यांतील सुफेदी व गोळी एक, येणेंप्रमाणें चाळीस दिवस घेणें. आंबट, तिखट व स्त्रीसंग वर्ज्य. (२५) पोटांत वायु होऊन क्षणोक्षणीं क्षुधा होत असल्यास एक गोळी उष्णोदकांत तीन दिवस द्यावी, वर हिंग भाजून खावा व उम्यानें पाणी प्यावें. (२६) कोड जुना असेल तर गुंजा व धोत्रा समभाग व गोळी २ मासे २१ दिवस द्यावी. (२७) रक्त फारच पडत असल्यास ८ मासे जुना गूळ व एक गोळी, येणेंप्रमाणें ७ दिवस दिलें म्हणजे गूण येईल. (२८) डोळे लाल झाले तर गोळी पाण्यांत उगाळून अंजन करावें.

४७३. **ढेकूण जाण्यास उपाय :** कुंजाची मुळी शनिवारीं किंवा आदितवारीं घरीं आणून घराच्या आढ्यास बांधावी. ढेकूण जातील.

४७४ **बधिरत्वास औषध :** समुद्रफळ माक्याच्या रसांत उगाळून कानांत घालावें.

४७५. **वायूस औषध :** शेळीच्या मूत्रांत समुद्रफळ उगाळून अंजन करावें.

४७६. **अर्धशिशीस औषध :** शेळीच्या मूत्रांत समुद्रफळ उगाळून नाकांत घालावें. अर्धशिशी राहील.

४७७. **शक्तिवृद्धीस :** ओंव्याचें फूल व जुना गूळ एकत्र करून घेणें. सात दिवस. **उतार—** निंबू चोखावें.

४७८. **डोळ्याच्या पडळास उपाय :** घेटोळीचें मूळ, मुलाचे आईचे दुधांत उगाळून अंजन करणें. पडळ जाईल.

४७९. **वडसास औषध :** बाभळीचे फुलाचा रस व घोडीचें मूत्र एकत्र करून डोळ्यांत अंजन करावें.

४८०. **गुडघ्यांचे पोटऱ्यांचे सांधे दुखतात त्यांस :** रुईचे पानांचा रस, निर्गुडीच्या पानांचा रस, शेवग्याचे पानांचा रस, काळ्या धोतऱ्याचे पानांचा रस, हीं औषधें समभाग १ शेर, व तिळाचें तेल अर्धा शेर एकत्र करून आळणासारखें घट्ट करून शिजवावें, व अंगास ४१ दिवस मर्दन केलें असतां गेलेले हातपाय येतील. उष्णवात किंवा अत्यंत उष्णता शरीरांत मुरून सांधे व हाडें हीं दुखतात, हातापायांची व डोळ्यांची आग होते, उष्ण व थंड हे दोन्हीही पदार्थ सहन होत नाहींत, अशा प्रकृतीस याचा खरा उपयोग होणार नाहीं. तर शैत्य किंवा वातापासून उद्भवणाऱ्या रोगावर याचा उत्कृष्ट उपयोग होईल.

४८१. **मुखांतून रक्त पडतें त्यास काढा** : नागरमोथे, पित्तपापडा, पद्माक्ष, मलयागर, शतावरी, जायपत्री, ज्येष्ठमध, जांबसाल, काळा वाळा, रक्तचंदन, समान घेऊन काढा मधांत किंवा साखरेंत देणें.

४८२. **क्षुधार्थ वटिका** : सुंठ, मिरें, पिंपळी, चित्रकमूळ, शुद्ध बचनाग, जिरें, हिंग भाजून, समभाग घेऊन निंबूरसांत खलणें. वालप्रमाण गोळी करणें. क्षुधा प्रदीत होईल.

४८३. **मूत्रातिसारावर औषध** : वारोळ्या, खारीक, ज्येष्ठमध, श्वेत-कावळीमूळ, काळे तीळ, समभाग घेऊन उंबरफळाएवढा मोदक करून खाणें. अति-मूत्र शमेल. **पथ्य**—तेलकट, आंबट, तिखट वर्ज्य. दोन वेळ औषध घेणें.

४८४. **अभ्रकभस्म** : श्वेततांदुळजाचें बीज, टांकणखार, अभ्रक, हीं एकत्र खलून मुसेंत आटवून, मग अंजीराच्या सालीचें चूर्ण व अभ्रक, समान मिळवून त्या सालीच्या रसांत १ दिवस मर्दणें, वड्या करून पुट देणें, भस्म होईल.

४८५. **रसकापूर क्रिया** : गंधक, फटकी, सैंधव, सोमल पारा, एकत्र करून खलून कुपी भरावी. अग्नि द्यावा. रसकर्पूर होईल.

४८६. **मळसूत्र निरोधावर उपाय** : पुरुषाचें मूत्र शेर १, मीठ टांक ५, तेल टांक १०, गूळ टांक १० एकत्र खापरांत शिजवून ९ मासेभार एकेक गोळी बांधावी. उदकांत द्यावी. निरोध खडा जाईल.

४८७. **कृमींस उपाय** : समुद्रशोक शेर १, मध टांक ५, मीठ टांक ५, तेल टांक ५, खापरांत कढवून गोळी ६ मासे बांधावी. एक गोळी भक्षावी. खडा, कुक्षिशूळ, व काळिजशूळ जातील.

४८८. **ज्वरामध्यें मुखास कोरड पडते त्यास** : बळबिजांची पोतडी बांधून शीतोदकांत फिरवीत जाणें. जिव्हेवर तीच पोटली सरबतांत भिजवून फिरवणें; शोष जाईल.

४८९. **शिरोरोग, कर्णरोग, मुखरोग, दंतरोग, यांस उपाय** : सुहागी भाजून, अभ्रकभस्म, पिंपळी, शुद्ध हिंगूळ, खारक्या बचनाग, एकत्र आलेरसांत खलणें. २१ दिवस मध व आलेरस यांत देणें. **पथ्य**—डाळरोटी, मीठ, उष्णोदक पिणें.

४९०. **विषमज्वरास उपाय** : पारा, गंधक, समान, त्रिकटु तोळे ३ समान आलेरसांत खलणें १ दिवस. गोमूत्रांत खलणें एक दिवस. बोरीच्या बींप्रमाणें गोळी आलेरसांत देणें. विषमज्वर, शीतज्वर जातील.

४९१. **अंत्रवृद्धीस** : घोरपडीचें डोकें आणून वाळवून त्याचा धूर देणें. सांजसंध्याकाळ ७ दिवस. **पथ्य**— करणें.

४९२. **पोटफुगीवर व क्षुधेस औषध** : चित्रक, पाहाडमूळ, सुंठ, धणे, जिरें, मिरें, पिंपळी, पंचलोण, चवक, अजमोदा, पिंपळमूळ, कचोरा, हिंग, समभाग चूर्ण करून निंबाच्या रसात खलणें. गोळ्या बोराप्रमाणें करून घेणें.

४९३. **क्षुधार्थ औषध** : पिंपळी, द्राक्षें, डाळिंबसाल वांटून उदकांत देणें. क्षुधा लागेल.

४९४. **नाळगुदास** : अश्वगंध, मनशीळ, सराटे, समभाग चूर्ण करून मधांत देणें. सूज जाईल.

४९५. **हगवणीस चूर्ण** : मायफळ, अफू, गूळ, हीं औषधें समभाग घेऊन, दीड मासाप्रमाण गोळी करून देणें. हगवण राहील.

४९६. **गर्भधारणा होण्यास** : पळसबीं जाळून भस्म उदकांत देणें. गर्भधारणा होईल.

४९७. **रक्तस्रावास** : मध, गूळ, वेखंड, उदकांत दिलें असतां, रक्तस्राव राहील.

४९८. **पारा अंगीं तिडकतो त्यास** : (१) बिबे दुफोड करून शेर १, हरभरे शेर ५, एकत्र करून उकडणें. नित्य तुपाशीं पावशेर खाणें. उष्णोदक पिणें. तिडका शमतील. (२) रानघेवडा समूळ, तुळस, बोर, माक्याचा पाला, चहूंचा रस आंगांत जिरविणें. तिसरे दिवशीं धुणें. डोस्क्यांतून पारा निघेल.

४९९. **प्याहास** : हिंग, चित्रक, सैंधव, समभाग चूर्ण करून, सुरणकंद कोरून त्यांत भरून, मातकापडें करावीं. पुटपाकांत अग्नि देणें. मग सुरणासुद्धां खलून गोळी वालप्रमाण तुपाशीं खाणें. दिवस ४२. यानें प्याहा, गुल्म, उदर हरतील. **पथ्य**— आंबट, तेलकट, वातूळ वर्ज्य.

५००. **रक्तपित्तास चूर्ण** : सुंठ, मिरें, कुड्याची साल, यांचें चूर्ण करून ताक गुळाशीं देणें. रक्तपित्त जाईल.

५०१. **मूळव्याधीस चूर्ण** : सुरणकंद, मुसळी, कुड्याची साल, चूर्ण करून ताकाशीं देणें.

५०२. **अर्शावर लेप** : देवडांगरी बीज, सैंधव, गोमूत्रांत वांटून गुदस्थानीं लेप द्यावा. अर्श शमेल.

५०३. **पित्तास औषध** : सैंधव व साखर म्हशीच्या दुधांत घेणें. पित्त जाईल.

५०४. **अजीर्ण, शूळ, श्वास यांवर चूर्ण** : त्रिकटु, भारंग, हिरडा, वावडिंग, चित्रक, जिरें, हिंग, पंचलोण हीं औषधें समभाग चूर्ण करून, उष्णोदकांत घेणें.

५०५. **शूळास औषध** : सुंठ, संचळ, ऐरंडमूळ, हिंग, समभाग चूर्ण आल्याच्या व शेवग्याचे रसांत देणें.

५०६. **मूत्ररेच** : रेवाचिनीचें चूर्ण टांक ३, गाईचे दुधांत देणें. मूत्र सुटेल. **उतार**—निंबू, साखर, दहीं पाजणें.

५०७. **मळशुद्धि** : त्रिकटु, पिंपळमूळ, अश्वगंध, हिरडा, यांचें समभाग चूर्ण करून २ टांक गुळांत देणें.

५०८. **अग्निमुखचूर्ण** : वेखंड, पिंपळी, सुंठ, ओंवा, हिरडा, चित्रक, कोष्ठ, हिंग, समचूर्ण उष्णोदकांत घेणें. मंदाग्नि, शूल, उन्माद, वात, अरोचक, हीं जातील.

५०९. **आम्लपित्तास चूर्ण** : वेळा, तमालपत्र, मुस्ता, पिंपळी, पिंपळमूळ, देवदार, आंवळकठी, ज्येष्ठमध, समभाग चूर्ण करून तत्समान साखर मिळवून, सांज-सकाळ घेणें, दिवस ७ किंवा १४. **पथ्य**– मीठ, आम्ल वर्ज्य. गुणावह आहे.

५१०. **भैरवरसायन** : बचनाग, कापूर, अक्कलकारा, लवंग, जायफळ, जायपत्री, वावडिंग, त्रिकटु, हीं औषधें माक्याच्या रसांत आणि नंतर निर्गुडीच्या रसांत खलणें. गोळी वालप्रमाण करून दुधांत किंवा विड्यांत देणें. सर्व रोग जातील.

५११. **सुजेस औषध** : त्रिकटु, लोहभस्म उष्णोदकांत घेणें.

५१२. **डोळ्यांत फूल, वडस झाल्यास** : बाभळीवरील न्हावी (हा एक जंतु आहे.) आणून त्याचा मेंदु चिरगुटांत पिळून २१ दिवस डोळ्यांत घालावा. डोळे बरे होतील.

५१३. **मूळव्याधीस लेप** : (१) लोखंड, गजपिंपळी, शिलाजित, मनशीळ, पारा, शिळ्या पाण्यांत उगाळून लावावें. (२) म्हैसवेल, सैंधव, लवण, कांजी हीं उगाळून लेप करावा. कोंब गळतील. (३) मिरें १ तोळा, पिंपळी २ तो., कोष्ठ ३ तो., हिरडा ४ तोळे, वेखंड ५ तो., सुंठ ६ तो., चित्रक ७ तो., हीं वस्त्रगाळ करणें. पारोशा पाण्याशीं घेणें. (४) वडाच्या पारंब्यांस भेंढीच्या दुधांत २१ भावना देऊन घेणें.

५१४. **समुद्रफळाचीं अनुपानें** : महाळुंगीच्या शेंगांत उगाळून कानांत घालणें, बहिरेपणा जाईल. (२) शेळीच्या मूत्रांत उगाळून डोळ्यांत घालणें, डोळ्यांतील फूल जाईल. (३) शेळीच्या मूत्रांत उगळून नाकांत घालणें. अर्धशिशी उतरेल. (४) लसुणाच्या रसांत उगाळून डोळ्यांत घालणें. सर्प उतरेल. (५) काळ्या जिऱ्यांत खाणें. वातप्रमेह जाईल. (६) निंबरसांत घेणें. वात जाईल. (७) लसुणाच्या रसांत घेणें. फेंफरें जाईल. (८) आवाळ्याचे रसाशीं घेणें. रक्तपिती जाईल. (९) निंबरसाशीं घेणें. पोटशूळ जाईल. (१०) मिऱ्यांत अंजन करणें, नेत्र बरे होतील. (११) हिंगाशीं घेणें; पोटांतील कृमि जातील. (१२) तुळशीचे रसांत घेणें, कुष्ठ जाईल. (१३) गुळांत घेणें, प्रमेह जाईल. (१४) निर्गुंडीचे रसांत घेणें. शिरव्यथा जाईल. (१५) साखरेंत घेणें, ताप जाईल.

५१५. **विजयादि चूर्ण** : दालचिनी, जायपत्री, वेळा, वेखंड, हिंग, बेलफळ, बाळंतनिंबाची साल, इंद्रजव, पिंपळी, अजमोदा, जंवखार, अतिविष, कुटकी, चवीक, सैंधव, पिंपळमूळ, पाहाडमूळ, चवकमूळ, सदर्हू समभाग घेऊन वस्त्रगाळ चूर्ण करून एरंडेल तेलांत कालवून गोळ्या सागरगोट्याप्रमाणें कराव्या. उष्णोदकाशीं रात्रीं एक गोळी व्यावी व प्रातःकाळीं एक व्यावी. याप्रमाणें २१ दिवस. **पथ्य**– तूप, तुरीची

डाळ, गव्हांची रोटी, हें खावें. यानें अष्टगुल्म, पंचगुल्म, मूळव्याध, वायुगोळा, पांथरी, प्लीहा, जलोदर, संग्रहणी, शैत्यपित्त, वायु, सूज, पोटातिडकी, ज्वर, अंडवृद्धि, भगेंद्र, इत्यादि २० रोग बरे होतात; व स्त्रीस संतति, पुरुषास धातुवृद्धि इत्यादि प्राप्त होतात.

५१६. **मलम** : मोर्चुत मासे ४, राळ तोळा १, हीं बारीक करून तेल घालून बारीक खलावें. तीन पट्ट्या द्याव्या. जखम भरेल. जखम धुऊन पट्टी लावणें.

५१७. **शक्तिवृद्धीस** : अजमोदा २ मासे, जायपत्री, जायफळ, अफू, खुरासनी प्रत्येकी ३ मासे, तीन वर्षांचा जुना गूळ तोळा १, एकत्र करून कुटून, गोंदणाप्रमाणें गुळांत गोळ्या कराव्या. सांजसकाळ घेणें. व त्यावर दूध अर्धा शेर पिणें. मग विडा खाणें. दिवस १४. **पथ्य—** तूप, रोटी, खिचडी, वरण खावें. इतर वर्ज्य. औषध खरें आहे, हटकून गुण.

५१८. **दम्यास व धापेस औषध** : रुईचे फुलांच्या कळ्या, रिंगणीफुलाच्या कळ्या, कारळीं, रानतुळशीच्या मंजिऱ्या, मीठ, देवकापूस-फुलें, पारोशापिंपळाचीं फुलें, हीं औषधें समभाग घेऊन चूर्ण करून, आल्याच्या रसांत त्याच्या बोराप्रमाणें गोळ्या करणें. एकेक गोळी सांज-सकाळ घेणें. ७ दिवस. **पथ्य—** शेळीचें दूध व भात खाणें.

५१९. **शिसें भस्म** : शिसें नवे खापरांत घालून वर कलमीसोरा घालीत जावा. बाभळीचे ओल्या लांकडाने हालवीत असावें. खालीं अग्नि लावावा. भस्म पिवळें होतें.

५२०. **धातुस्राव बंद होण्यास** : मैदालकडी, सफेतमुसळी, शाहामुसळी, तालीमखाना, बीजबंद, रुमामस्तकी, गोखरूं, सालंमिश्री, दालचिनी, समभाग चूर्ण करून १४ पुड्या कराव्या. दूधसाखरेशीं एक पुडी घ्यावी, १४ दिवस. **पथ्य—** आंबट, तिखट, तेलकट, वर्ज्य.

५२१. **मधुऱ्यास औषध** : जिरें तोळे १, पुदाणा ४ पैसे भार, धणे ४१, वाळा २ पैसे भार, खडीसाखर ३ पैसे भार, कापुरमधुरी ३, हीं औषधें मडक्यांत पाणी अच्छेर घालून भिजत घालावीं. सकाळीं वस्त्रगाळ करून घेणें. **पथ्य—** तूपभात, भाकर खाणें.

५२२. **उदर, गुल्म, हाड्यावण, प्याहा, पांथरी, जलोदर, कास यांस औषध** : त्रिकटु, चित्रक, सैंधव, समभाग चूर्ण करून निवडुंगाच्या चिकांत कालवून, सुरणाचा कंद आणून तो कोरून त्यांत चूर्ण भरणें. त्या कंदास मातकापड करून भुईमध्यें पुरून ठेवावें. ७ दिवस झाल्यावर बाहेर काढून दररोज आठ गुंजाभार तुपाशीं खाणें. १४ दिवसांत हटकून गुण येईल.

५२३. **पांथरी, प्याहा, जलोदर व वायुगोळा यांस :** घुलेइंद्रायण, गंधबीड, आलें, मिरें, समभाग चूर्ण करून तुपामध्यें घ्यावें. ७ दिवस, **पथ्य–** तूप, खिचडी, मीठ, आलें, मेथी, शेवगा, या जिनसा खाणें.

५२४. **बधिरपणास :** तिळवणीचा रस, तिळाचें तेल, समभाग कढविणें. त्यांत सैंधव पाव हिस्सा घालणें. नित्य कानांत घालणें. बहिरेपणा जाईल.

५२५. **सोमलभस्म :** किंजळीच्या रसांत ३ दिवस सोमल खलावा. मग हळदीच्या फडांत हळदीप्रमाणें कंद असतो, तो कोरून त्यांत भरावा. तोंडी कपी देऊन मातकापडें ३ द्यावीं. रानशेणींची आंच द्यावी. ४ प्रहरांत भस्म होतें.

५२६. **प्याहास उपाय :** हिंग, वेखंड, सुंठ, पिंपळी, मिरें, अजवान, हिरडेदळ, चित्रकमूळ, एकत्र समभाग चूर्ण करून ७ दिवस मध शिंपून नंतर पाण्याशीं घ्यावें. प्याहा जाईल.

५२७. **वायुगोळयास उपाय :** सैंधव, त्रिकटु, ओंवा, कारळे, हिंग भाजून चित्रकमूळ, एकत्र करून चूर्ण करणें, व कोरफडाचा गीर ३ पैसे भार घालून घेणें. प्याहा व वायुगोळा जाईल. (२) पळसाच्या पानांची राख, व पिंपळी समभाग एकत्र करून दीड पानाच्या विड्यांत ७ दिवस द्यावें. प्याहा व वायुगोळा जाईल.

५२८. **अतिरिक्त, रक्तपित्ती, रक्तजनित रोग यांस :** पिकलीं उंबरें तुपांत तळून साखरेशीं, व मधांत देणें.

५२९. **दांत बळकट होण्यास :** (१) तुरटीच्या पाण्यानें दांत घासून वर दांतवण लावून विडा खावा. दांत बळकट होतील. (२) बाभळीची साल, शिरसाची साल, जाईचा पाला, व झेंडूचा पाला, यांचा काढा करून पाणी २ शेर घालून निमे उरलें म्हणजे गुळण्या टाकणें. दांत बळकट होतील. (३) पांढरा कात, जाईचा पाला, लवंग, कापूर, आंब्याचीं पिकलेलीं पानें, एकत्र करून दांतांस घासणें. (४) रिंगणीबीजाचा धूर तोंडास घेणें, दंतपीडा जाईल. (५) नागवेलीचा व जाईचा पाला चावणें. दांत बळकट होतील. (६) हिरडे, पिंपळी, संचळ, दह्याचे वरील पाण्याशीं लावणें, अथवा ऊन पाण्याशीं लावणें. दांतांतील वायु जाईल. (७) वावडिंगें पेजेशीं देणें. दंतशूळ जाईल. (८) कोकंबाचीं पानें कुटून दाढेंत धरून उन्हाकडे डोकें करून निजावें. सकाळी दाढेंतील किडे मरतील. (९) रुईचा चीक दातांस लावणें. मग मिठानें दांत घासणें. ऊन पाण्याच्या गुळण्या सकाळीं सात वेळ व संध्याकाळीं ७ वेळ कराव्या. रक्तरोग जाईल.

५३०. **श्वासकासावर :** पांढरी मुसळी माक्याच्या रसाशीं घेणें.

५३१. **हगवणीस औषध :** तिवसाचे सालीचें चूर्ण तोळा १, दररोज ताकांत किंवा शिळ्या पाण्यांत घेणें. तूपभात खाणें, हगवण बंद होईल.

५३२. **सडल्यास मलम** : (१) सोमल तुपांत खलून मलम करावा. (२) हरताळ तुपांत खलून मलम करावा. (३) मोर्चूत भाजून तूपामध्यें खलून मलम करावा.

५३३. **नळवायूवर औषध** : चिराईत, जंगली हिरडे, वेखंड, आंबेहळद, जिरें, हळद, कुटकी, कंकोळ, लवंग, पिंपळी, कोष्ठ, सुंठ, इसबगोल, इंद्रजव, सैंधव बाळहिरडे, तालीमखाना, ब्याहाडे, सागरगोटे, खुरासनी ओंवा, अजमोदा, कुड्याची साल, भुईनिंब, काळी खजूर, ज्येष्ठमध, अक्कलकारा, साबरमीठ, पिंपळमूळ, गंधबीड, ओंवा, बडीशेप, शोप, वावडिंगें, काळें जिरें, काळी मुसळी, रेवाचिनी, पांढरी मुसळी, पळसपापडी, एकत्र समभाग चूर्ण करून घेणें. नळवायु जाईल.

५३४. **पोटांतील कृमींस** : वावडिंग, पळसबीज, खुरासनी ओंवा, कपिला, गूळ, समभाग चूर्ण करून ताकांत घालून घेणें.

५३५. **वातज्वरास** : सुंठ, भू-निंब, गुळवेल, एरंडमूळ यांचा काढा करून देणें.

५३६. **द्वंद्वज त्रिदोष पाचन करण्यास** : मुस्ता, कुटकी, इंद्रजव, बेल, टेंटू, टाकळी, शेवंती, पाडळी यांचा काढा करून मध पिंपळींत देणें.

५३७. **वात, श्लेष्मा, कास, श्वास, कफ, तंद्रा, मलावरोध, यांस** : देवदार, दशमूळ, भू-निंब, सुंठ, मुस्ता, इंद्रजव, कुटकी, धने, गजपिंपळी यांचा काढा अष्टमांश देणें. १३ दिवस.

५३८. **विविध उदरदोष संयुक्त सन्निपातास** : काकडशिंगी, भारंगी, इंद्रजव,एरंडमूळ,कुटकी, धायटीफूल, पिंपळी, दशमूळ, यांचा काढा करून अष्टमांश देणें.

५३९. **अभिन्यास सन्निपातास** : कचोरा, दशमूळ, पटोली, कुटकी, पाहाडमूळ, चिराईत, चित्रक, पिंपळी, गजपिंपळी, याचा काढा देणें. गुणावह आहे.

५४०. **कफाचे वेडके येत असल्यास** : (१) रेणुका व पिंपळीचा समभाग काढा करून घेणें. किंवा त्यांचा मधामध्यें जिभेस लेह करणें, (२) बोरांच्या बियांचें चूर्ण मधांत देणें. (३) भारंगी, सुंठ, उष्णोदकांत देणें.

५४१. **ओकारीवर** : (१) साखर व गुळवेलीचा रस मधाबरोबर घेणें. (२) साखर, जायफळ देणें. ओकारी शमेल. (३) शिरगोळा व गेरू मधाबरोबर घेणें.

५४२. **अमृतसंजीवन अंजन** : धुवारा टांक १, पारद १, चुना टांक १, जेपाळबीज १००, मिरें ४००, एरंडबीज ६०, निंबाच्या रसांत ३ दिवस खलणें. धोत्र्याच्या रसांत ३ दिवस खलणें. ३ दिवस विजयारसांत खलणें. नंतर वड्या करणें, व पाण्यांत मोहरीइतकें उगाळून अंजन करणें. भूतादि सर्व वायू शमेल.

५४३. **विषमज्वरावर** : भारंगी, भद्रमोथा, पित्तपापडा, धणे, अडुळसा, कोष्ठ, पिंपळी, गुळवेल, सुंठ, रिंगणी, चिराईत, यांचा काढा करून ४ दिवस घेणें.

कांद्याचा रस, हीं एकत्र करून लाविल्यासहि गुण येतो. (३) पांढऱ्या कण्हेरीची मुळी, चित्रक, चंदन, हीं गोमूत्रांत अथवा लिंबाचे रसांत उगाळून त्याचा लेप, वांग मुरंबा, नायटे, यांजवर केला असतां हटकून गुण येतो.

५६४. **जेपाळाच्या बियांची शुद्धि करण्याचा उपाय** : (१) जेपाळाच्या बियांतील गोळे घेऊन त्याची फडक्यांत पुरचुंडी बांधून, तीन दिवस म्हशीच्या शेणांत पुरून ठेवावें, चौथे दिवशीं ऊन पाण्यानें धुऊन टाकून, आंतील मगज काढून बारीक वाटून कोऱ्या मडक्याचे बुडास लेप करावा. म्हणजे स्नेह होतो. नंतर काढून चूर्ण करून त्यास लिंबाच्या रसाच्या पांच-सात भावना देणें. शुद्ध होईल. (२) तांदुळजाचे भाजीमध्यें जेपाळाची बीं उकडून, नंतर आंतील मगज काढून टाकावा, आणि सात पाण्यानें धुवून वाळवून ठेवणें शुद्ध होईल.

५६५. **बचनागाची शुद्धि** : बचनागाचे तुकडे करून पोटोळी बांधून गोमूत्रांत घालून तीन दिवस उन्हांत ठेवणें, गोमूत्र नित्य नवें घालावें, अथवा गाईचें दुधामध्यें दोलायंत्रानें शिजवावें, अगर गोमूत्रांत शिजविणें, म्हणजे शुद्ध होईल.

५६६. **सोनचांफ्याच्या फुलांचा पाक करण्याची कृति** : पिंवळ्या चाफ्याचीं फुलें एकवीस घेणें, थोड्या ऊन पाण्यांत टाकून, नंतर बाहेर काढावीं. तीं बारीक वाटावीं. गाईच्या दोन शेर दुधांत घालून त्या दुधाचा रवेदार मावा करावा. तसेंच कवचबीज, बदाम व चारोळी, काजू, खिसमिस, पिस्तेमग हीं समभाग दोन दोन तोळे, तमालपत्र, पिंपळी, कबाबचिनी, जायपत्री, वेलची, मोटे गोखरूं, रुमोमस्तकी, लवंग, हीं प्रत्येक एक एक तोळा घेऊन, त्यांचें चूर्ण करावें. तें चूर्ण वरील माव्यामध्यें चांगलें मिळवून ठेवावें. कस्तुरी मासे तीन, भीमसेनी कापूर मासा एक, देवकेशर अर्धा तोळा, पंजाबी सालममिश्री पांच तोळे यांचेंही चूर्ण करून ठेवावें. नंतर ऐंशी तोळे खडीसाखरेचा पाक करून, त्या पाकाची चाचणी थोडी कच्ची आहे तोंच त्यांत एक तोळा अफू आणि वरील तयार केलेली औषधें मिश्रित करून मावा व गाईचें तूप नऊ टांक टाकून घोटावें. नंतर पाक तयार होत आल्यावर कस्तुरीचें चूर्ण त्यांत टाकून, पैसाभाराच्या गोळ्या किंवा लाडू बांधावे. तो प्रतिदिवशीं सकाळीं व संध्याकाळीं जसा प्रकृतीस सोसेल तसा खात जाणें. म्हणजे त्वरित शक्तिवृद्धि होऊन शरीर पुष्ट होतें. कांति आणि बळ हीं वाढूं लागतात. तसेंच कितीहि परिश्रम केले तरी मनुष्य शक्तिहीन न होतां हुषारी राहते. या पाकाच्या आंगीं स्त्री—पुरुषांस मन प्रसन्नता व आनंद उत्पन्न करणारे गुण आहेत. पाक करते वेळेस पाकाची खुबी लक्षांत ठेवावी. आणि यथाविधीनें केला असतां, वर दर्शविलेल्या गुणांत फरक पडणार नाहीं.

५६७. **कुचलीच्या बियांची शुद्धि** : या बियांस किंचित् तूप लावून किंचित् विस्तवावर भाजाव्यात. शुद्ध होतात.

५६८. **मदनादि चूर्ण** : चंदन, वाळा, कोष्ठ, मुस्ता, आवळकठी, कचोरा, कमलफूल, उंची द्राक्षें, समभाग चूर्ण करून साखर घालून टांक ४ प्रमाण गोळी

करून शीतोदकांत घेणें. रक्तपित्त, श्वासपित्त, गुल्म, अंगदाह, शिरोभ्रमण, शीत दाह प्रमेह, पित्तज्वर हे शमतील.

५६९. **केतकी तेल :** केतकीमूळाचा रस भाग ४, चिकणामूळाचा रस ४, हळदीचा रस ४, हे रस आणि कांजी भाग ८, तैल भाग ४, एकत्र करून लावणें. अस्थिगत वायु जाईल.

५७०. **लक्ष्मीनारायण तेल :** शेराच्या मुळ्या, एरंडमूळ, चित्रक, झिंझटी, पिकला चिकणा, बेल, टेंटु, टांकळी, सालवण, पिठवण, कावळी, रिंगणी, डोरली, सेवगामूळ, जिवंती, पाहाड, कोष्ठ, अर्कमूळ, अक्कलकारा, दालचिनी, रास्ना, गुळवेल, अंकोलसाल, कांटेशेवरीमूळ, काळी वेल, अडुळसा, बाहवा, तुळशी, धमासा, हिरडा, आंवळकठी, बेहडा, विषमोगरा, आघाडा, आस्कंद, रुद्रजटा, श्वेतसुपली, मुंडी, कवासमूळ, भारंगी, रिंगणी, फणसमूळ, पांगारा, कंबलमूळ, खदिर, वाळा, बेहडा, निर्गुंडी, कापूसमूळ, कांग, इंद्रवारुणी, कोळूसरा, देवदार, दारुहळद, हळद, कचोरा, कोळंजन, सराटे, तुंबी, दोन्ही चिराईत, पृथक पृथक एकेक भाग घेणें. अष्टगुण पाणी घालणें. पाण्याच्या चतुर्थांश एरंडेल घालणें. अथवा तेल–तूप मिश्रित घालणे. मग कल्क करावा. नंतर उडीदाचें मूळ, कुलित्थ, जव, मूग, तीळ यांचा कल्क करून, तेलांचे चतुर्थांशांत मिळविणें. नंतर शतावरीचा रस घालणें. मग सुगंधी भुईआंवळी, मंजिष्ठ, कंकोळ, पद्मकाष्ठ, वाळा, तज, जायपत्री, नागकेशर, त्रिकटु, त्रिफळा, चंदन, रातांजन, जिरें, किर्माणी जिरें, जायफळ, शेपा, कावळी, सिरस दोनी, जटामांसी, ओंवा, शहाजिरें, सैंधव, सौवर्चल, जंवखार, गंधबीड, बांगडखार, वावडिंग, गजपिंपळी, मेद, महामेद पहाड, रेणुक, शेवगाफूल, करंजबीज, कोष्ठ, तगर, तूबर, वेतस, ज्येष्ठमध, खोबरें, चांदवेल, कुंकुम, केशर, कस्तुरी, इतकीं औषधें तेलाच्या चतुर्थांश घेऊन मंदाग्नीवर कषाय करून, मग सुगंध पुष्पें घालणें. याच्या मर्दनानें व सेवनानें सर्व रोग जातील. मात्र प्रकृतिमान व अनुपान पाहून योजना करावी.

५७१. **नीलकंठरस :** रसभस्म, गंधकभस्म, लोहभस्म, विष, चित्रक, पत्रक, विडंग, रेणुका, मुस्ता, वेळा, पिंपळमूळ, पिंपळी, सुंठ, मिरें, नागकेशर, हिरडा, बेहडा, आंवळकठी, जेपाळ, ताम्रभस्म, सर्व समभाग, मिळवून चूर्ण कज्जलासारखें करून; चूर्णांचे दुप्पट गूळ घालून हरभऱ्याएवढी वटिका करणें. अनुपानपरत्वें सर्व रोगांवर देणें.

५७२. **गंडमालेवर तेल :** गोमूत्र शेर ५, भांगेचा रस ५, प्रथम शेळीचे मूत्रांत बिब्बे शेर ५, तीन दिवस भिजत घालणें. नंतर भांगेचा रस, गोमूत्र, तेल घालून पचविणे. मग त्या तेलांत बिब्बे ठेंचून घालणें. मंदाग्नि, लावणें. ४ टांक पोटांत देणें. गंडमाळाग्रंथी फुटतील. ललितव्रण शमेल.

५७३. **गंडमाळेवर :** लांगुलीमूळाचा कल्क भाग १, तेल भाग ४, निर्गुंडी भाग ८, एकत्र पचन करून देणें.

५७४. **श्वेतकुष्ठास :** अप्रसूतगायीचें मूत्र शेर ५, माक्याचा रस शेर ५, बिब्बे १००, चूर्ण करून तेल घालून मंदाग्नीवर पचविणें. मग १ टांक घेणें. आंगास लेप करणें. **पथ्य**– आंबट, तेलकट, क्षार वर्ज्य.

५७५. **अनेक रोगांवर चूर्ण :** चिराईत, कुटकी, मिरें, गुळवेल, हिरडा, मुस्ता, त्रायमाण, डोरली, रिंगणी, सुंठ, पापडखार, पळसबीज, पिंपळमूळ, पुष्कर-मूळ, पिंपळी, कचोरी, हें चूर्ण घेतां सर्व ज्वर, त्रिदोष, सन्निपात, अग्निमांद्य, अरुचि, कुपित्त हे रोग शमतील.

५७६. **समुद्रादि चूर्ण :** मीठ, सैंधव, सौवर्चल, जंवखार, अजमोदा, हिंग, वावडिंग, हिरडा, मिरें, चित्रक, पिंपळी, समभाग चूर्ण करून तूपभात ५ दिवस घेणें. अजीर्णवात, अर्शवात, वातप्रमेह, विषमवात, अरुचि, अग्निमांद्य, विषूचिका, हे रोग नाश पावतील.

५७७. **पुनर्नवा वटिका :** घेंटोळीमूळ, नागबला, आस्कंद, शतावरी, गोखरूं, मुसळी, रसभस्म. सर्व समभाग मिळविणें. मधांत १ वालप्रमाण वटिका करून घेणें. एक प्रहर वीर्यस्तंभन होईल.

५७८. **कंदर्पशेखर वटिका :** शतावरी, भुईकोहळा, वाराही, गोखरू, ज्येष्ठमध, अश्वगंध, उडीद, मोचरस, चारोळी, उतती, खोबरें, समभाग घेऊन विजया घालणें. सर्वसम साखर घालणें. टांक २, सांज सकाळ घेत जाणें. रात्रीं मधांत व सकाळीं दुधांत, वर दूध घेणें. ७ दिवस. **पथ्य**– करणें. नष्ट पुरुषाची वीर्यवृद्धि होईल.

५७९. **इच्छाभेदी रस :** पारद, गंधक, त्रिफळा, सुंठ, हिरडा, जेपाळ, मात्रा वालप्रमाण, आल्याच्या रसांत, साखरेंत देणें. ढाळ होतील. **पथ्य**– दहींभात खावा.

५८०. **प्रज्ञासारस्वत चूर्ण :** आंवळकठी, हिरडेदळ, विडंग (वावडिंग), चित्रकमूळाची साल, शतावरी, सराटे, गुळवेल, ज्येष्ठमध, पिंपळी हीं औषधें समभाग चूर्ण करून गोघृतामध्यें गोळी दोन तोळे वजनाची करावी. रात्रीं निजतेसमयीं घ्यावी. शरीर पुष्ट होईल. आरोग्य व वीर्यवृद्धि होईल.

५८१. **दांतांस औषध :** कोष्ठ, दारुहळद, लोध्र, नागरमोथे, लाजाळू, कुटकी, पाहाडमूळ, माळशेणी, ही आठ औषधें समान वजन आणून बारीक वस्त्रगाळ करून दांतांस लावावीं. कंडू व रक्त दूर होईल; दांत बळकट होतील.

५८२. **खोकल्यावर औषध :** लवंग, मिरें, बेहडेदळ, कात, बाभळीची अंतर्साल, यांचा काढा करून व हींच औषधें वस्त्रगाळ पूड करून पुनः टाकून खल करावा. गोळ्या बोराप्रमाणें कराव्या, एक गोळी दाढेंत धरून रस गिळावा. खोकला बरा होईल.

५८३. **गुचकीस औषध** : मिरें, लवंग, नाबदसाखर, बोराचे आटोळींतील बीज, वस्त्रगाळ करून मधांत चाटावयास द्यावें.

५८४. **जखमेस अगर खांड्क वाहतें त्यास मलम** : जोंधळ्याची भाकर जाळून त्याची राख, मुरदाडसिंग, शंखजिरें, कात, मोर्चूत, कांगाच्या झाडाची राख, तुपामध्यें खलून मलम करावा.

५८५. **धातुपुष्टतेस औषध** : लोणी, बदामबीज, खारीक, नाबदसाखर, चार औषधें समभाग व लवंग तोळा १, जायपत्री १, जायफळ १, पिंपळी १, पिंपळमूळ १, सालंमिश्री १, अक्कलकारा १ तोळा याप्रमाणें, दूधखवा अच्छेर, सर्व औषधें साजुक तुपांत घालून तोंड बांधून ७ दिवस ठेवावें. मग नित्य दोन पैसे भार घ्यावें.

५८६. **गजकर्णास औषध** : मायफळ, आंवळ्यागंधक, तेलियासुहागी, हीं तिन्ही औषधें समान आणून निंबाच्या रसांत चार प्रहर खल करावा, व गोळी करून निंबाच्या रसांत घालावी.

५८७. **जखमेवर मलम** : कुचलीची बी, निंबाची साल, शंखजिरें पाव तोळा, खवट खोबरें तीन तोळे, उंबराच्या मुळाचा रस, एकत्र करून खलावें.

५८८. **शीतज्वरास औषध** : सोमल तोळा १, हिंगूळ १, कात २, एकत्र करून, विड्याचीं पानें २००; यांचा रस काढून खल करावा. मोहरीप्रमाणें गोळी बांधावी. ओंव्याची पूड मासे दोन, व बत्तासा १, यामध्यें घ्यावें. **पथ्य**— उत्तम करावें.

५८९. **प्रमेहास** : जायपत्री, कस्तुरी, केशर, नागकेशर, वेळा, जायफळ हीं औषधें समभाग घेऊन चूर्ण करून, समान खारका व लवंगा घालून गोळ्या १४ कराव्या. नित्य १ घ्यावी. (२) खारकेच्या बीजाची वस्त्रगाळ पूड करून, खारका कढवून त्यांत चूर्ण घालावें. गोळी तीन मासेप्रमाण करावी. सांज-सकाळ घेणें. ७ दिवस. **पथ्य**— तूप, रोटी, वरण. (३) साळयीच्या सालीचा रस, पाणी घालून चार पैसेभार काढून चार पैसेभार साखर एकत्र करून घेणें. ७ किंवा १५ दिवस.

५९०. **वायुवर्णास औषध पोटांत घ्यावयास** : ढोरगुंजा पावशेर, खजूर पावशेर, सराटे पावशेर, उतरणीचीं पानें ९ पैसेभार, एकत्र कुटून गोळ्या २८ करणें. दररोज गोळी एक घेणें. **पथ्य**— तूप-रोटी, डाळ, व पिण्यास उष्णोदक.

५९१. **नेत्रांस अंजन** : कलखापरी तोळे २।।।, पिंपळी तोळा १, हळद तोळे २।।, सुंठ तोळा १।, हिरडेदळ तोळा १।, कथल्या डिंक तोळा १।, शेंदेलोण मासे ३, रसवंति मासे ३, खाटी द्राक्षाच्या रसांत १ दिवस खलावें. तसेंच खिऱ्याच्या रसांत १ दिवस, सबज्याच्या रसांत १ दिवस, बडिशेपेच्या रसांत एक दिवस, येणेंप्रमाणें खल करावा. अंजन सिद्ध होतें.

५९२. **जखमेस मलम** : धोतऱ्याचा रस अच्छेर, पारा तोळा १, केळीच्या दांड्यानें तीन प्रहर खलावें. मग तूप घालून एक प्रहर खलावें. तयार झाल्यावर लावणें. कोणतीही जखम बरी होईल.

५९३. **मूळव्याधीस** : हिरडेदळ व बिबे नऊ नऊटांक, गूळ अर्धा शेर एकत्र कुटून १४ गोळ्या करणें, रोज दोन खाणें. **पथ्य**— जोंधळ्याची भाकर, तुरीचें वरण, उष्णोदक, अळणी १४ दिवस.

५९४. **गर्भ राहण्यास** : निंबोणीच्या पानाचा रस व गाईचें तूप, ऋतुकाळीं चार दिवस घेणें.

५९५. **धुपणीस** : मूग भाजून, उडीद भाजून, गहू भाजून, विलायती गोखरूं, तालिमखाना, सालंमिश्री, सफेतमुसळी, जुनी वीट अर्धा भाग, खडी-साखर ·॥·, तूप ४ भाग, वस्त्रगाळ करून तुपांत हलवा करून, एक सांज खाणें. **पथ्य**— तूप-रोटी, सांजा, अळणी, ऊन पाणी.

५९६. **उष्णतेस औषध** : तेल, गूळ, शेराच्या कांभ्या, बिबे, खोबरें, ओंवा, लसूण, समभाग प्रत्येकीं तोळा १ प्रमाणें घेऊन, गोळ्या १४ बांधाव्या. सांज-सकाळ एकेक घ्यावी. **पथ्य**— तूप-रोटी, अळणी ७ दिवस. उपरान्त अळणी वरण, भाकर, भात, याप्रमाणें खात खावें.

५९७. **मोतीबिंदूस उपाय** : काळे शेळीचें मूत्र खापरांत ठेवून आटवावें. त्यांत काजळ धरून डोळ्यांत घालावें.

५९८. **पांथरीस** : (१) कणीक व मीठ समभाग, रुईच्या चिकांत गोळा करावा. रानगवऱ्यांत जाळून राख करावी. खलून वस्त्रगाळ करावी. शिळ्या पाण्यांत १ मासा प्रकृतीप्रमाणें घ्यावी. **पथ्य**— भात, गहूं, तुरीची डाळ, तूप, मीठ, उष्णो-दक. इतर वर्ज्य. (२) चित्रकमूळ, सुंठ, पिंपळी, मिरें, सुखरीहिरडे, आंवळकठी, बेहेडेदळ, वावडिंग, ओंवा, शेंदेलोण, पादेलोण, हळद, शहाजिरें, अजमोदा, हिंग भाजून, वस्त्रगाळ करून ३ मासे, गोमूत्रांत घेणें. (गोमूत्र दोन पैसे भार) **पथ्य**— वरण, भात, भाकर, तूप, मीठ, मिरे. इतर वर्ज्य. (३) शंख १ तोळा, शेराच्या चिकांत रात्रीं भिजत घालावा. दुसरे दिवशीं गोवरी करून, त्यांत ठेवावा व दुसरी गोवरी वर ठेवून अग्नि द्यावा. भस्म होईल. २ तांदुळभार भस्म उष्णोदकांत घेणें. २८ दिवस. **पथ्य**— गहूं, गाईचें तूप, ताक, कढी-भात खाणें. तेलकट, तिखट, आंबट वर्ज्य.

५९९. **गर्भधारणास** : निंबोणीच्या पाल्याचा रस पावशेर, गाईचे तुपांत ऋतुकाळांत चार दिवस देणें.

६००. **पांथरीस** : हिंगणबेट ४, ओंवा ४, खुरासनी ओंवा ४, गाईचें लोणी १२, सागरगोटे ४, चार वर्षांचा जुना गूळ ८, समुद्रफळ १, हीं सर्व एकत्र

करून गोळ्या सागरगोट्याप्रमाणें कराव्या. नित्य सकाळ एक गोळी खावी. १४ दिवस. **पथ्य–** वरण, भात, तूप, साखर.

६०१. **धातुपुष्टतेस औषध :** बचनाग, अफू, नागवेलीच्या पानाच्या रसांत २ प्रहर खल करून त्यांत सुगंधी वस्तु मिळवावी, गोळी १ टांक, सायंकाळीं दुधांत द्यावी.

६०२. **धातुहीन झाल्यास :** गाईचें दूध पक्का शेर १, कांटेगहूं २ पैसेभार, कोऱ्या मडक्यांत ८ प्रहर भिजूं घालावे. नंतर ते गहूं कुटून त्याचा चीक दुधांत मिळविणें. सफेत मुसळी टांक ५, बदाम ६ पैसेभार, खोबरें (पाठ सोलून) १ पैसाभार, खारीक १, शुभ्र खसखस १, द्राक्षें पैसाभार, एकूण ७ जिनसा, द्राक्षें निराळीं करून सर्व एकत्र कुटून दुधांत घालाव्या. तसेंच कणीक आठ पैसेभार, तिन्ही एकत्र करून मडक्याचें तोंड बुजवावें, व त्यास अग्नि द्यावा. तीव्र अग्नि देऊं नये. औषध सिद्ध होईल.

६०३. **रक्तपित्तीस औषध :** (१) जिरें १ तोळा, कडू इंद्रावण १ तोळा, तालक दोन मासे, ही तिन्ही औषधें बारीक करून, पाणी घालून गोळी बोराप्रमाणें बांधावी. आणि ढाळ द्यावा. रोगी पाहून गोळी द्यावी. **पथ्य–** भात, तूप, वरण खावें. **उतार–** जिरें बारीक वांटून पाणी करून द्यावें. (२) कोहाळा कोरून त्यांत हरताळ १ तोळा घालावी. मुख बंद करावें. मातकापड करून गजपुट द्यावें. भस्म होईल. त्या भस्मांत लवंग तोळा १, जायपत्री, जायफळ तोळा १, कस्तुरी ६ मासे, एकत्र बारीक करून ओंव्याच्या पाण्यांत तीन दिवस खल करावा. हरभऱ्याप्रमाणें गोळी बांधावी. तुपामध्ये द्यावी. पथ्य– तूप, सांजा, खावा. (३) मंजिष्ठ, कोष्ठ, वेखंड, हिरडा, नागरमोथा, सुंठ, वाळंतनिंबाची साल, ब्याहाडे, दारूहळद, कडू पडवळ, कुटकी, मोरवेल, वावडिंग, चित्रकमूळ, आसवलीमूळ, त्रायमाण, पिंपळाची साल, अडुळसा, माका, हळद, पाहाडमूळ, खैरसाल, श्वेतचंदन, तेड, देवदार, काडेचिराईत, बाहाव्याचा मगज, पित्तपापडा, समभाग औषधांचा काढा, पाणी शेर घालून आठ पैसेभार काढा उरवून द्यावा. **पथ्य–** करावें.

६०४. **प्लीहा, पांडुज्वरास :** (१) काळे तीळ, बिबे, सुरवारी हिरडे, यांचें चूर्ण, ७ वर्षांच्या जुन्या गुळांत गोळी करून घेणें. (२) पादेलोण, ओंवा, टेंटू, चित्रकमूळ, इंद्रजव, करंजमूळ, बेलमूळ, सैंधव, सुंठ, यांचें चूर्ण करून ७ वर्षांच्या जुन्या गुळांत गोळी करून घेणें.

६०५. **मूळव्याधीस :** (१) मिऱ्याच्या पाल्याचा रस व गोतकपत्रें एकत्र करून प्राशन करणें. २१ दिवस. **पथ्य–** दहीं-भात, सुरणाची भाजी. (२) पांढऱ्या गुलबसेचीं फुलें गाईचे तुपांत उदकावांचून शिजवून प्रातःकाळीं भक्षणें. **पथ्य–** गव्हाची पोळी, तूप, तुरीचें वरण अळणी. औषध ७ दिवस घेणें. **पथ्य–** १४ दिवस करणें.

६०६. **कामलेस उपाय :** रक्तबोळ मासे ३, बारीक करून ३ दिवस केळांत खाणें. **पथ्य–** वरणभात.

६०७. **कर्णरोगास उपाय :** पांढरा कात, मुरदाडसिंग, शंखजिरें, चिकणी सुपारी, मायफळ, धायटीचीं फुलें, लवंग, मिरें, मासे ३, अफू मासे ९, टांकणखाराची लाही तोळा १, येणेंप्रमाणें बारीक पूड करून शेळीचें मूत्र शेरभर आणून, त्यामध्यें औषध घालून कढवावें. पावशेर उरवावें व कानांत घालीत असावें. कर्णरोग बरा होईल.

६०८. **रक्तशुद्धि व रक्तवृद्धि यांजवर उपाय :** (१) चोपचिनी, लोध्र, त्रिकटू, त्रिफळा, ज्येष्ठमध, कंकोळ, शतावरी, अजमोदा, चित्रक, बडीशेप, जिरें, शहाजिरें, तेजबळ, धमासा, वावडिंग, नागकेशर, ओंवा, खुरासनी ओंवा, सफेत-मुसळी, काळी वेलची, जायफळ, लवंग, दालचिनी, गोखरूं, तालीसपत्र, वंशलोचन, अतिविष, शिलाजित, हीं सर्व औषधें समभाग घेऊन, त्यांच्याबरोबर खडीसाखर मिळवावी. आणि प्रतिदिवशीं सकाळीं व संध्याकाळीं मिळून दोन तोळे चूर्ण, साखरे-बरोबर घेत जावें, म्हणजे रक्त शुद्ध होऊन मलमूत्र साफ होतें. शरीरांत शक्ति येते. (२) गुळवेल, रासना, पांढरें मिरें, ओंवा, धणे, तेजबळ, लोध्र, शतावरी, मंजिष्ठ, त्रिफळा, चित्रक, ज्येष्ठमध, विलायती धोत्र्याचें मूळ, कुलित्थ, जव, बाहाव्याचे शेंगे-तील मगज, नागकेशर, वावडिंग, गोखरूं, पित्तपापडा, कंकोळ, गोडा सुरण, पिंपळाची साल, व आस्कंद, हीं समभाग घेऊन, त्यांचें चूर्ण करून, तें प्रतिदिवशीं सहा मासे किंवा एक तोळा, खडीसाखर अर्धा तोळा, व तूप यांत मिळवून खात जावें. म्हणजे अनेक प्रकारें दूषित झालेलें रक्त आणि त्यापासून होणारे रक्तविकार नाहींसे होऊन नवीन रक्त वाढतें, अंगांत शक्ति येते, आणि शरीर कांतिदार होतें. **पथ्य–** अळणी खाणें, तेंहि जुनें धान्य खाणें. (३) दारूहळद, लकडी रेवाचिनी, मंजिष्ठ, त्रिफळा, वेखंड, त्रिकटू, गुळवेल, शोप, पिंपळाची साल, वेलची, धमासा, गोखरूं, नागरमोथे, वावडिंग, ज्येष्ठमध, कांटेसावरीची साल, पळसाचा डीक, रक्तरोडा, हीं औषधें समान घेऊन आणि या सर्वांचे दुप्पट धुवा साखर घालून, या सर्वांचें मिश्रण करून ठेवणें. तें चूर्ण रात्रीं निजते वेळेस एक तोळ्याप्रमाणें गाईच्या पावशेर दुधांत घेणें. म्हणजे याचेपासून वातरक्त, रक्तदोष, तसेंच उन्हाळी, राजयक्ष्मा, हाडी ज्वर, विषमज्वर, इत्यादि दोष जाऊन अग्नि प्रदीप्त होतो. त्या योगानें अन्नाचें पचन होऊन, मळमूत्र साफ होतें. आणि नवीन रक्त दिवसानुदिवस वाढत जातें. (४) गुळवेल, कुड्याची साल, चित्रक, मंजिष्ठ, देवदार, सालवण, पिठवण, एरंडमूळ, गजपिंपळी, शतावरी, दारूहळद, सुपारीचें फूल, चोपचिनी, वावडिंग, धमासा, लाजाळू, वेखंड, तालीसपत्र, तेजाना, कंकोळ, कुलित्थ, जव, वाळा, बेलफळ, उन्हाळीच्या मुळ्यांची साल, हीं समभाग घेऊन एकत्र कुटून वस्त्रगाळ चूर्ण करून, तें प्रतिदिवशीं तीन मासेप्रमाणें मध व पिंपळीचें चूर्ण करून त्यांत घालून घेणें. आणि वर गाईचें दूध ऊन करून

पिणें. म्हणजे रक्तशुद्धि होऊन नवीन रक्ताची वृद्धि होते. (५) गाईच्या दुधांत तीन मासेप्रमाणें शुद्ध गंधक प्रतिदिवशीं घेतला असतां रक्तशुद्धि होते. तसेंच सहा मासे त्रिफळाचें चूर्ण, गाईच्या तुपांत रात्रीं निजते वेळीं घेतलें असतां रक्त शुद्ध होतें. नुसतें एक मासा कुटकीचें चूर्ण, गरम पाण्यांत घेतलें असतांहि रक्तशुद्धि होते.

६०९. **केशवृद्धीवर अनुभविक उपाय :** (१) पावशेर तिळाचे तेलांत नवे सात बिबवे घेऊन, त्याचे कुटके करून त्या तेलांत टाकावे. तसेंच माक्याचा रस छटाक, लिंबाचा रस छटाक, मिळून पावशेर रस व वरील पदार्थ असे एकत्र करून चुलीवर ठेवून सिद्ध करावें. तें तेल दररोज उन्हांत ठेवीत जाणें. आणि दररोज केसांस लावीत जाणें. म्हणजे केंस कृष्णवर्ण होऊन वृद्धि होते. एकवीस दिवस लावावें, म्हणजे केंस काळे होतील. (२) तिळाचें तेल, माक्याचा रस, लिंबाचा रस, नारळाचें दूध, मेंढीचें दूध, प्रत्येक पावशेर घेऊन, त्यांत वाळ्याचें चूर्ण एक तोळा, कपूरकाचरीचें चूर्ण एक तोळा, मध १ तोळा मिळवून चुलीवर मंदाग्नीनें तेल सिद्ध करून लावावें. (३) वडाचे पारंब्यांचा रस, तिळाचें तेल, निळीच्या पाल्याचा रस, गाईचें दूध, हीं सर्व समान एकत्र करून अग्नीवर तेल सिद्ध करून लावावें. (४) गाईचें तूप, तिळांचें तेल, बदामाचें तेल, कापसाच्या सरक्याचें तेल, आवळ्याचा रस, हीं सर्व एकत्र करून अग्नीवर तेल सिद्ध करून केंसांस लावावें. (५) रानशेणीचें तेल, तिळाचें तेल, गाईचें दूध, हीं एकत्र करून अग्नीवर तेल सिद्ध करून मग केंसांस लाविलें असतां केंस काळे होतील.

६१०. **मगज थंड होऊन दिव्य दृष्टि होण्यास उपाय :** (१) एक तोळा बदामाचे गोळे रात्रीं पाण्यांत भिजत घालून, सकाळचे प्रहरीं वरील सालपटें काढून टाकून, नंतर त्यांत वेलचीदाणे मासे तीन, खडीसाखर तोळा एक हीं एकत्र बारीक वाटून आणि त्यांत गाईचें तूप अडीच तोळे मिश्रित करून, कल्हई केलेल्या भांड्यांत एक रात्र चांदण्यांत ठेवणें. सकाळीं व संध्याकाळीं असें सात दिवस खाणें, म्हणजे डोक्यांतील गरमी जाऊन मगज थंड होतो. तसेंच डोळ्यांची लाली, खुपऱ्या वगैरे सर्वत्र साफ होऊन नवी दृष्टि येते. **पथ्य**– आंबट, तिखट, तेलकट, मैथुन, जागरण, उन्हांत फिरणें, अति ओरडणें, हीं बंद असावींत. (२) बदामांचा मगज पावशेर, वेलचीदाणे नऊटांक, पिस्तेमगज नऊटांक, चारोळी नऊटांक, खसखस नऊटांक, खिसमिस नऊटांक हीं सर्व औषधें गाईचे दुधांत एकत्र करून, बारीक वाटून गोळा करावा. त्यांत गाईच्या दुधाचा खवा एक शेर व खडीसाखर एक शेर मिळवून, तो प्रतिदिवशीं सकाळीं व संध्याकाळीं जेवण झाल्यावर नऊ नऊ टांक खाणें. म्हणजे मस्तकांतील ठणक, शूळ, डोळ्याची लाली, कंडु, धुंदी, डोळ्यांतून पाणी गळणें, निद्रा न येणें, इत्यादि विकार दूर होऊन मगजास थंडपणा येतो. व मगज भरून नवी दृष्टि येते. **पथ्य**– दही, तेल, तिखट, आंबट, मैथुन, अति व्यायाम हीं सर्व वर्ज्य असावींत. हें औषध १४ किंवा २१ दिवस घेतलें असतां उत्तम

गुण येतो. (३) गाईचें ताजें तूप दीड तोळा, त्यांत गाईचें लोणी अथवा दुधाचा खवा एक तोळा मिळवून, त्यांत खडीसाखर, बदाम, मगज, कंकोळ, मध, वेलची-दाणे हीं प्रत्येक पाव पाव तोळा, प्रत्येक दिवशीं नवीन मिश्रित करून, तें मिश्रित प्रति-दिवशीं व सकाळीं रात्रीं याप्रमाणें ७ दिवस खाणें. म्हणजे डोळ्यांस व हातांपायांस होणारी साधारण आग,उन्हांत फिरल्यामुळें डोळ्यांस येणारी अंधारी, झांपड, हीं बरीं होतात. (४) गाईचें ताजें लोणी दीड तोळा, खडीसाखर एक तोळा, वेलचीदाणे एक मासा, अशीं एकत्र करून प्रतिदिवशीं सूर्योदयीं चवदा दिवस खात गेलें असतां,वातपित्त-विकार दूर होऊन डोळ्यांस थंडावा येतो. (५) जवांचें पीठ एक शेर, बदामाचा मगज अर्धा शेर, नवीन गोड्या एरंड्यांचा मगज नऊ टांक, त्या एरंड्याच्या आंतील मगज काढून टाकावा, खिसमिस नऊ टांक, सालंमिश्री नऊ टांक, चारोळी नऊ टांक, वंशलोचन नऊ टांक, जंगली वेलचीदाणे नऊ टांक, या सर्वांचें एकत्र चूर्ण करून, त्यांत मध नऊ टांक, त्या सर्वांबरोबर खडीसाखरेची पूड, तसेंच गाईचें तूप तोळे चाळीस, अशीं एकत्र मिळवून, त्याची नऊटांकप्रमाणें वडी अथवा लाडू बांधावे. ते प्रति दिवशीं प्रातःकाळीं व संध्याकाळीं निजण्याचे वेळेस खाऊन, वर पावशेरपासून १ शेरपर्यंत जसजसें पचन होईल, त्याप्रमाणें गाईचें गरम केलेलें दूध पीत जाणें. याप्रमाणें चौदा दिवस अथवा एकवीस दिवस केलें असतां, सर्व प्रकारें मस्तकांतील रक्तांत गरमीचे विकार असल्यास निघून जातात. तसेंच मूत्रकृच्छ्र, इंद्रियविकार इत्यादि रोगांचें निवारण होऊन, मस्तकास थंडपणा, दिव्यदृष्टि, मुख तेजस्वी, आणि शरीरास पुष्टि, शक्ति, जठराग्नीची पचनशक्ति, मलमूत्राची शुद्धता, इत्यादी अनेक गुण याजपासून प्राप्त होतात.

६११. दम्यावर उपचार : भोयदुधी आणि तांबडा माका, मीठ, साखर हीं एकत्र वाटून गोळी करून घेणें.

६१२. हाडीज्वर बारा महिने येत असल्यास त्यास : कांटेऐनीचा पाला शेरभर पाण्यांत उगाळून पावशेर करून घेणें. दिवस सात. दिवसांतून तीन वेळां. प्रत्येक वेळेस एक चमचाभर घेणें.

६१३. रक्तपितीवर : मुळा पाल्यासुद्धां वांटून, सकाळीं व संध्याकाळीं (एकेका मुळ्याचा रस) पिण्यास देणें. आंब्यावरचा बाणगूळ आंगास दिवसांतून तीन वेळां लावणें.

६१४. संधिवातावर उपचार : दोन तोळे पाण्यांत पाव तोळा किराईत भिजत घालून, सकाळीं गाळून घेणें. त्यांत दोन गुंजा शिलाजित, दोन गुंजा कापूर, अर्धा तोळा मध, हीं एकत्र करून सात दिवस घेणें. पथ्य– वातुळ वर्ज्य.

६१५. दांतांस मंजन : केळीच्या कमळाच्या चिकांत बकरीचा मेंदू शिजविणें. तो त्या चिकांत सबंध जाळावा. आणि मग चूर्ण करून दांतांस लावावें.

६१६ : **अंड्याचे तेल काढण्याची कृति** : त्यांतील पिंवळा बिल घेऊन तव्यावर टाकावा. त्यांत थोडा कांद्याचा रस घालावा. खालीं कोळशाचा जाळ लावून, वर हालवीत जाणें. तेल निघेल तें कान फुटल्यास, जखमेस, शक्तिहीन झाल्यास, उपयोगी पडतें.

६१७. **परम्यास उपचार** : (१) केवड्याचे मुळाचें पाणी तोळे दोन साखर घालून घेणें. दिवस सात. (२) खैराचा डिंक केळाबरोबर खाणें, दहा दिवस. कंबर दुखते त्यास हेंच औषध घेणें. (३) गव्हाचा चीक दोन तोळे, चिनी साखर एक तोळा, एकत्र करून खाणें. दिवस सात. (४) कोथिंबिरीच्या मुळ्या तांदुळाचे धुवणांत देणें. दिवस तीन. (५) उतरणीची मुळी शेळीच्या दुधांत वांटून पिणें. दिवस तीन. (६) गोखरूं पांच टांक, पखानभेद तीन टांक, शोधलेला गंधक चार टांक, कापडांत गाळून गोळी करून घेणें. सकाळीं दोन गोळ्या, संध्याकाळीं दोन गोळ्या. दिवस तीन. (७) हिरडे टांक तीन, आंवळे टांक तीन, लवंग टांक तीन, पारा शुद्ध टांक दोन, कापडांत गाळून गोळ्या सकाळीं दोन व संध्याकाळीं दोन, अशा तीन दिवस घेणें. (८) कल्हईचें भस्म वाल दोन, साखर वाल आठ, यांच्या पुड्या आठ कराव्यात. सकाळीं दोन व संध्याकाळीं दोन. दिवस तीन. (९) **टांकी परम्यावर** : भुई कोहळ्याची मुळी, बारीक चूर्ण करून, गाईचें पावशेर तूप व पांच टांक चूर्ण एकत्र करून घेणें. दिवस पांच.

६१८. **कापराचें तेल काढण्याची कृति** : आळशीचें तेल तोळे सहा, कापूर तोळा दीड. कापूर बारीक करून मग तेल टाकावें. खल करावा. बाटलींत भरून ठेवावें. तें वाऱ्यावर अथवा उसण भरल्यास लावावें.

६१९. **चुना शुद्ध काढण्याची कृति** : चुना सात वेळा पाणी टाकून मग सुकवून बारीक करून तेलांत खलून लावावा. म्हणजे भाजलेल्यास गुण येतो.

६२०. **जखमेस** : जुनी सुपारी एक, मोरचूत भाजलेला पैभार, कवडी एक, खजुराच्या बिया दोन, कात पैभार, मिरें चार, या सर्वांची जाळून राख करावी. त्याची भुकटी कोणत्याहि जखमेवर टाकावी. म्हणजे जखम सुकून जाईल.

६२१. **रक्तपित्तावर** : समुद्रफेंस व उंसाचा सरका एकत्र करून आंगास लावावें. **पोटांत घेण्यास**– बकरीची तीळी आणून चिरून तींत काळ्या मिऱ्यांची भुकटी चवलीभार घालून चांगली भाजून खाणें.

६२२. **पुष्टतेस** : सफेत मुसळी, काळी मुसळी, मुंडी, गोखरूं, मोगली बेदाणा, एकंदर सात तोळेप्रमाणे घेऊन, एकत्र भुकटी करून दुधांत खाणें. दिवस सात किंवा एकवीस.

६२३. **सिरीम व नायटे यांजवर** : निंबाच्या रसांत पळसपापडी व चंदन हीं उगाळून लावावींत.

६२४ : **पिसाळलेलें कुत्रें डसल्यास** : वाळलेला कडू दोडका पाण्यांत उगाळून पिणें. ओकारी होऊन विष उतरेल.

६२५. **गंडमाळेस** : पांढरे सावरीची साल आणून कुटून, गार पाण्यांत वांटून मलम करून, त्याची सात दिवस पट्टी मारावी.

६२६. : **पक्षवायूस** : कस्तुरी मासा एक, अंबर मासा एक, सोन्याचा वर्ख एक मासा, चांदीचा वर्ख एक मासा, ह्या चार जिनसा एकत्र करून त्यांत तोळाभर मध घालून, दोहीसांज चाटीत जाणें. **पथ्य**— ऊन पाणी पीत जाणें. एक कळशीभर पाणी घेऊन, त्यांत लोखंड तापवून विझविणें. व तेंच पाणी पिण्यास देणें. खावयास उष्ण व बलकर पदार्थ देत जाणें. मिरची, तेल, तूप, आंबट पदार्थ वर्ज्य असावेत. गव्हाची भाकर व गरम दूध देणें.

६२७. **आम्लपित्तावर उपाय** : काडेचिराईत, वाळंत साल, कडूनिंब, पडवळ, अडुळसा, गुळवेल, पित्तपापडा, माका, या ७ औषधांचा काढा करून मध घालून घेणें.

६२८. **अतिसारावर (हगवणीस) उपाय** : इंद्रजव, नागरमोथे, धायटी-फूल, वाळवेल, लोध्र, सुंठ, शेंवरीडिक (मोचरस) यांचें चूर्ण वस्त्रगाळ करून, तक्र व गूळ एकत्र करून चूर्ण घालून घेणें.

६२९. **दुःश्वास ताजा उपाय** : मोर्चूत, मिरें; मोर्चुताचे मिऱ्याप्रमाणें तुकडे करून तपेल्यांत घालावें. लोणी निंबाएवढें घालावें. तूप व्हावयाच्या सुमारास आंत घालून जाळणें. निर्धूम झाल्यावर परातींत घालून तव्यानें खलावें. गोळ्या १४ बांधाव्या. **पथ्य**— तूप, पोळी, वरण तुरीचें, आलवण, थंड पाणी पिणें. गांजाचा वास घेऊं नये.

६३०. **अग्नीनें भाजल्यास** : (१) जिरें, मेण, राळाज्य एकत्र लावा ॥ निवारील वेगें महा अग्नि लावा ॥ सदा सर्वदा तो मनीं राम गावा ॥ निवारील तापत्रयालागिं भावा ॥ १ ॥ (२) आंब्यांचीं गळलेलीं पिकलीं पानें जाळून ती राख लोण्यांत अगर तेलांत खलून लावावी.

६३१. **तरळ मोडशीस** : (१) चुन्यावरील निवळ घेऊन, त्यांत सणकाडी पेटवून तीन वेळां आंत विझवावी व ती गाळून द्यावी. (२) एरंडमूळ वांटून रस काढून त्यांत हिंग टाकून तें द्यावें. (३) आंब २–३ तोळे घेऊन तींत व हिंगण-बेटाचा मगज टाकून तें पोटांत द्यावें. डोळ्यांत लवंगांचें अंजन करावें.

६३२. **नाळगुदास व हातापायांचे सुजेस** : (१) पारोशा दोडक्याच्या (घोसाळीच्या) पाल्याचा रस पैसेभार व गाईचें तूप चार पैसेभार देणें. (२) पुंगळवेलीचा पाला, गाईचें तूप व मिरें हीं एकत्र करून घ्यावीं. **पथ्य**— अळणी.

६३३. **रक्तप्रमेहास** : उंबराची अंतर्साल साखरेशीं घ्यावी.

६३४. **अतिसारावर** : (१) सुंठ, अतिविष, ओंवा, भांग, जायफळ, अफू पडवास, समभाग चूर्ण करून सुंठीचे काढ्यांत बोराप्रमाणें गोळ्या करून त्या तुपाशीं द्याव्या. (२) बाभळीच्या डिऱ्या थंड पाण्यांत वांटून ३ दिवस घ्याव्या. (३) घेंटुळीच्या (पुनर्नवा) मुळ्या मध-साखरेशीं वांटून घ्याव्या. बहुत दिवसांचा अतिसार दूर होईल. (४) वाळहिरडे १ तोळा, सुंठ १ तोळा, शोपा १ तोळा तुपांत परतून चूर्ण करून समान साखरेशीं दुवक्त घ्यावें. आंव मुरडा बंद होईल.

६३५. **मिरगीस** : (फेपरें) (१) रानदोडकीची मुळी शनिवारीं आंवतून आदित्यवारीं आणून, निंबरसांत उगाळून अंजन करावें- (२) टाळवेवर फांसण्या घालून रानदोडकीच्या मुळीचें चूर्ण मर्दन करावें, व नस्य द्यावें. मग दडपून निजावें. तो थुंकेल, खोकेल, तें एके ठिकाणीं ठेवणें. त्यांत किडे दोनचार पडले म्हणजे बरी झाली.

६३६. **दम्यास** : जंवखार, सैंधव, सुंठ, वांगडखार, संचळ, मीठ, येणें-प्रमाणें वस्त्रगाळ करून रुईचे चिकांत गोळा करून, तो कणकीनें लिंपून अग्नि देऊन रक्षा करावी. ती दररोज १ गुंज मधाशीं घ्यावी.

६३७ **बुद्धिवर्धन** : अक्कलकारा ३ टांक, ज्येष्ठमध १ टांक, खुरासनी ओंवा ९ टांक, भांग ६ टांक, एकत्र करून वेखंडाशीं ७ दिवस सेविजे. बृहस्पतितुल्य बुद्धिमान होय.

६३८ **गोम कानांत गेल्यास** : नवसागर कानांत घालून वरतीं निंबू पिळावें. गोमेचे तुकडे होतील.

६३९. **विष पडावयास** : करवंदीच्या मुळ्या पावशेर, त्यांची साल काढिजे. शेळीचें दूध पावशेर त्यांत टाकून दीजे. चारदा करून दीजे. उन्हाकडे, पाठ करून बसणें. उलट्या होऊन बहुत दिवसांचें विष असलें तरी पडेल, तूपभात खावा.

६४०. **नासूरास** : हरणाचें शिंग जाळून राख करून व मैदालकडी तुपांत खलून लावणें.

६४१. **कर्णशूलास** : मखमालीच्या पाल्याचा रस कानांत घालावा.

६४२. **घाटसर्पास** : (१) केवड्याचें कणीस (आंतील भाग) पाण्यांत कुसकरून पाजावें. (२) जंवखार, पिंपळी, डाळिंबाचे दाणे वांटून गोळी करून ती दाढेखालीं धरावी, रस गिळीत जावा. घाटी मोकळी होईल.

६४३. **ओकारीस** : (१) लवंग, जायपत्री द्यावी. (२) कमळाक्ष वांटून दह्याशीं द्यावें. (३) जुन्या तरटाची राख मधांत द्यावी.

६४४. **गजकर्णास** : कात पांढरा ५ तोळे, गंधक ५ तोळे व पारा २ तोळे खलून गाईचें तूप पावशेर घेऊन त्यास २१ वेळां पाण्यानें धुऊन मग कांशाचे ताटांत कांशाचे वाटीनें खलून तें मलम दिवसांतून दोन तीन वेळ लावावें. म्हणजे ७ दिवसांत जुनाट गजकर्ण दूर होतें.

६४५. **गर्मीस** : (१) हिंगूळ तोळा ·॥·, तुपांत तळून मग बारीक वांटावा. पिंपळाचे सालीची भुकटी आंत मिळवून तीन दिवस दुवेळेस गुडगुडींत घालून ओढावें. तीन दिवस अळणी खावें. तोंड येईल त्यास बाभळीची साल उकडून गुळण्या कराव्या. (२) रसकापूर १ तोळा तुपांत तांबडा होईपर्यंत तळावा. कंकोळ २८ दाणे, वेलदोडे १४, आंबेमोहोराचे तांदूळ १ तोळा, धुऊन सर्वांचा खल ४ घटका करून तांदुळाचे धुवणांत गोळया मुगाप्रमाणें कराव्या. अनुपान—तुपाशीं वेणें. **पथ्य**— नाहीं.

६४६. **गर्भधारणेस** : कांटे शेवरीचीं फुलें ऋतुकाळीं गाईचे दुधांत देणें.

६४७. **अर्शावर** (मुळव्याधीवर) **सुरणमोदक** : सुरण ४ भाग, तेड (निशोत्तर) नळीचें ४ भाग, सुर्वारी हिरडा दळ १ भाग, व्याहाडे १ भाग, आंवळकटी १ भाग, वावडिंगें, सुंठ, पिंपळी, बिबे, पिंपळमूळ, तालीसपत्र, दालचिनी ·।· मिरें, ·॥·, जुना गूळ सर्व औषधांच्या द्विगुणित वेलदोडे, ·॥·, सुरण छायेंत वाळवून वस्त्रगाळ करून सर्व औषधें मिळवून दोन तोळयांचा मोदक करून भक्षावा. **पथ्य**— तूप-पोळी, वरण, साखर, आले, भात.

६४८. **पोटशूळास** : हिरडा, हिंग, शेंदेलोण, हीं घ्यावीं.

६४९. **कुळिकेस** (मोडशीस) **उपाय** : लसूण, जिरें, सैंधव, गंधक, त्रिकटू, हिंग भाजून, निंबाच्या रसांत खलून वेणें.

६५०. **गजकर्णास** : तुरटी, गंधक, सावण शिळ्या पाण्यांत खलून लावणें.

६५१. **अर्धशिशीस उपाय** : रुईचीं पिकलीं पानें आणून भाजून दोन्ही नाकपुड्यांत रस पिळावा. म्हणजे शिंका घेऊन बरी होईल.

६५२. **पारदभस्म** : तांब्याच्या वाटींत पारा घालून, लोखंडाच्या पात्रांत वाटी ठेवावी. काळ्या नागवेलीचा रस शेर १।, कढई चुलीवर ठेवून मोठा अग्नि लावावा. कापसाच्या बोळ्यानें रस पाऱ्यांत थोडाथोडा सोडीत जावा. मध्यें विराम करूं नये. भस्म होतें. तोळयास गुंज देणें.

६५३. **जीर्णज्वरास उपाय** : सोमल, हिंगूळ, समभाग, ३ दिवस तांदुळजाच्या रसांत खलून, गोळी बाजरीप्रमाणें मधांत वेणें. एकसांज. **पथ्य**— तूप, खिचडी,उष्णोदक. ३ दिवस औषध वेणें.

६५४. **रक्तप्रदरास** : पोंवळीं बारीक कुटून वस्त्रगाळ करून चूर्ण करावें. ६ मासे साखर, लोणी पैसाभार, दोन्ही घेऊन त्यांत दोन गुंजा पूड घ्यावी. ७ दिवस **पथ्य**— वरण, भात, तूप, पोळी, मीट.

६५५. **शक्तिवृद्धीस औषध** : ज्येष्ठमध ७ तोळे. खडीसाखर ७ तोळे, पिंपळी ३॥ तोळे एकत्र करून कुटून किंचित् गोघृताचा हात पुसून, त्यांत मध घालून सुमारें १ तोळा गोळी करून, प्रातःकाळीं गोळी नित्य १ घ्यावी. गोदूध पावशेर प्यावें. धातुवृद्धि होईल.

६५६. **डोकींतल्या खवड्यास :** येरंड्यांचा मगज, मोर्चूत, हरभऱ्याइतका दह्यांत तांब्याच्या बुडानें ताम्रपरातींत घालून खलावें, व तो मलम लावणें. खवडे जातात.

६५७. **सोमरोगास :** (पांढऱ्या धुपणीसारखा) **उपाय :** सालंमिश्री, कवच (कुहिरीबीज), पळसाचा डिंक, रुमामस्तकी, तालिमखाना, वेलदोडा, वंशलोचन, वडाचीं कोंवळीं पानें, खडीसाखर, सर्व एकत्र खल करून एक तोळा गाईच्या दुधांत घेणें.

६५८. **भगेंद्र व रक्तपितीस :** (१) सोनामुखी तांदुळाच्या धुवणांत धुऊन देणें. तेलकट, वावडें वर्ज्य. सर्व रोग जातील. (२) नऊ टांक मोर्चूत वेऊन अर्धामुर्धा भाजून, व मुरदाडशिंग, शंखजिरें १ तोळा, कच्चें पक्कें एकत्र करून, बारीक वांटून निंबाच्या रसांत भिजत घालणें. ४२ दिवस. मग गोळ्या बोराप्रमाणें करणें. ४२ दिवस घेणें. दुःख वरें होईल. **पथ्य–** ज्वारीची भाकर, तुरीचें वरण.

६५९. **व्याहास :** खुरासनी आजवान पावशेर, आंबेहळद ९ टांक, वेखंड ९ टांक, लसूण पावशेर, म्हशीच्या मूत्रांत घालणें. ७ दिवस देणें. अळणी खाणें.

६६०. **दम्यास :** (१) रिंगणीचीं फळें पक्कें पांच शेर, ओंवा पक्का अच्छेर, लवंगा ८, त्याचें तेल काढावें. १४ दिवस देणें. दमा जाईल. आंबट, वावडें वर्ज्य. (२) निरगुडीच्या मुळ्यांची फकी करावी. दोन बोट चिमूट खालवर तूप घालून घ्यावी. **पथ्य–** दूधभात १० दिवस घेणें. दमा जाईल.

६६१. **खोकल्यावर :** तिळाच्या मुळ्यांचा काढा करणें; दूध–तुपांत घेणें. ७ दिवस खोकला राहील.

६६२. **श्वासास :** (१) व्याहाड्याचें चूर्ण मधांत घेणें. (२) मोराच्या पिसाची राख करून मध पिंपळींत घेणें.

६६३. **खोकल्यास :** (१) आघाड्याचें बीज १ टांक वांटून मिरें ७ घालून देणें. खोकला जाईल. (२) निंबाच्या पाल्याचा रस ३ टांक, मिरें ७ घालून देणें. खोकला जाईल.

६६४. **नाकाच्या रोगास :** कडू चिंचा व कांद्याचा रस देणें. नाकाचा रोग बरा होईल.

६६५. **पीनसास :** निंबाचा रस मडक्यांत घेऊन आटविणें. आटून खार होईल तो देणें. पीनस जाईल.

६६६. **कृमीस उपचार :** (१) निंबोळीबीज, अजमोदा, हिंग हें देणें. ३ दिवस. कृमि पडतील. (२) सुंठ व हिंग, वाटून देणें. कृमि पडतील. (३) वेंडुळीचें चूर्ण करून तांदुळांच्या धुवणांत घेणें. जंत पडतील.

६६७. **हगवणीस :** आंब्याचे सालीचा रस, त्यांत चुना घालून देणें. ७ दिवस. हगवण राहील.

६६८. **मूळव्याधीस** : (१) इंद्रायणीचे मुळीचें चूर्ण ३ टांक, तूप ३ टांक, बिबे, तूप साखर एकत्र करून ३० दिवस घेणें. मुळव्याधी जाईल. (२) लवंगा १ भाग, पिंपळी १ भाग, जायफळ १ भाग, सुंठ १ भाग, हें एकत्र चूर्ण करून घेणें. ॥·॥

६६९. **खर पडते त्यास** : कोहळ्याचा खार दुधांत देणें.

६७०. **शूळप्रमेह** : आंवळीचा रस साखरेंत ८ दिवस देणें. शूळप्रमेह जाईल. तीळ, ओवा, साखरेंत देणें. ९ दिवस. शूळप्रमेह जाईल.

६७१. **तिर्डीक प्रमेहास** : गुळवेलीचा रस, वाळा, साखर ११ दिवस देणें.

६७२. **खर पडते त्यास** : अजमोदा ३ टांक, साखर ३ टांक, १४ दिवस घेणें.

६७३. **कपाळशूळास** : गुंजेचें पीठ कपाळावर घालणें.

६७४. **अर्धशिशीस** : माक्याची मुळी कांजींत वांटून देणें.

६७५. **कपाळशूळास** : (१) एरंडमूळ कांजींत वांटून लावणें. (२) गुळाच्या पाण्यांत सुंठ उगाळून लेप देणें. कपाळशूळ जाईल.

६७६. **दंतरोगास** : चिंचेचीं टकोरें, तरवडाचीं लांकडें, सिरसाचीं लांकडें, बोरीचीं लांकडें, बाभळीचीं लांकडें, करंजाचीं लांकडें, बाभळीच्या शेंगा, हिरडे, कात, नारळाचीं टकोरें, बिबवे हे एकत्र करून पातेल्यांत तेल काढणें. दांतांस लावून घेणें. दांत बळकट होतील.

६७७. **कर्णरोगास** : (१) काळ्या सोनवेलीच्या मुळ्यांचा रस; कांद्याचा रस, तिळाचें तेल, कढवून कानांत घालणें. कानांतील सुतें पडतील. (२) जांभुळीचा पाला, अंतर्साल व फुलांचा रस काढून कानांत घालणें. किडे पडतील. (३) गाटयोना (?) निंबाच्या रसांत उगाळून कानांत घालणें. वातशूळ, बहिरेपणा जाईल. (४) जायपत्रीं गोमूत्रांत कढविणें व उष्णोदकांत उगाळून कानांत घालणें. बरा होईल.

६७८. **कान फुटले तर** : (१) समुद्रफेंस कानांत घालणें. कान कोरडा होईल. सर्व कर्णरोग जातील. (२) कुत्र्याचें मूत्र कानांत घालणें. फुटलेला कान बरा होईल.

३७९. **गंडमाळेस** : (१) पांढरे सुपलीचें (गोकर्णीचें) मूळ, रान-आंवळीचें मूळ, वेखंड, एकत्र करून गोमूत्रांत वांटून लेप करणें. (२) मनशीळ १ टांक, भुईआंवळी १ टांक, पंच लवणें प्रत्येकी १ टांक हीं एकत्र करून निंबाच्या रसांत गोळ्या करणें, पहिल्यानें गंडमाळेस फांसणी घालणें. मग गोळी निंबाच्या रसांत उगाळून लावणें, व बांधून टाकणें. ३ दिवसांनंतर सोडणें. (३) जासवंदीचें मूळ पाण्यांत वांटून पाजणें. १४ दिवस. गंडमाळा जातील.

६८०. **व्रणास औषध** : (१) दंती, तीळवणी, धोत्रा, अजबला, यांची लावणें. दुष्टव्रण, जाईल. (२) सुवर्णमुळाचें चूर्ण दह्यांत घेणें. (३) सहदेवीमूळ तुपांत वांटून लेप करणें. नाडीव्रण जाईल.

६८१. **श्वेतकुष्ठास उपचार** : (१) लसूण व चुना बांधणें. फोड येईल. ठिपके पालटतील. (२) हळद वांटून गोळा करणें. तितकेंच गायीचें लोणी मिळविणें. एकत्र करून भांड्यांत घालणें. उदक घालून कढविणें. तूप झाल्यावर अंगास लावणें. श्वेतकुष्ठ जाईल.

६८२. **क्षतास औषध** : मोर्चूत, रातांजन एकत्र करून शिरसतेलांत कढविणें. व लावणें.

६८३. **सुरमीस औषध** : (१) मुळ्याचें बीज, आघाड्याचा रस, कोष्ठ, हळदीचीं पानें, श्रीखंड, हळद एकत्र करून आंगास लावणें. सुरमी जाईल. (२) सरांटे, पळसाचें मूळ, धणे, सरक्या हे एकत्र करून आंगास लावणें. सुरमी जाईल.

६८४. **वांगास औषध** : जायफळ, जाईच्या रसांत उगाळून लावणें. वांग जाईल.

६८५. **इसबास** : (१) शेंदूर व मिरें म्हशीच्या लोण्यांत मर्दून लावणें. इसब बरें होईल. (२) तरवडाचें बीज, रानांतील शिरस, कोष्ठ, बांवच्या, दोन्ही हळदी, भद्रमुस्ता, चूर्ण करून शेळीच्या दुधांत लावणें. इसब बरा होईल.

६८६. **खरजेस** : (१) पारा, गंधक, हरताळ, मनशीळ, मोर्चूत, सोमल, कोष्ठ, काळें जिरें समभाग; ह्यांचें चूर्ण करून वस्त्रगाळ करून रुईच्या चिकांत भिजवून लोहपात्रांत घालणें. वजन टांकाचें त्यामध्यें तूप, शेर मिळवून कढविणें. आंगास लावणें. खरूज बरी होईल. (२) पारा, गंधक २ टांक, मिरें ३ टांक, चुना ६ टांक, एकत्र करून ताटामध्यें खलणें. त्यांत तिळाचें तेल १ शेर घालून तांब्यानें खलणें. खरूज जाईल.

६८७. **श्वानाचें विष उतरण्यास** : (१) आघाड्याचा रस डसल्याजागीं लावणें. श्वानाचें विष उतरेल. (२) म्हाळुंगीचीं पानें लसुणांत वांटून लेप करणें. श्वानाचें विष उतरेल.

६८८. **भलत्याचें विष चढल्यास** : नागफणीचा पाला लावणें, बरा होईल.

६८९. **सर्प उतार** : (१) पांढरे वसूची मुळी पाण्यांत वांटून देणें. सर्प उतरेल. (२) नरकीचा कांदा चारणें. सर्प उतरेल. (३) कडामोडीकांदा चारणें, नाना सर्प उतरतील.

६९०. **विंचू व गोमीस** : पळसाचा चीक डांसाचे जागीं लावणें. विंचू, गोमी उतरतील.

६९१. **केश जाण्यास** : भूयीनिंबाच्या पानांत मध घालून उन्हांत ठेवणें. शोधलेला चुना भाग पांच लेप करून लावणें, केंस जातील.

६९२. **रक्त वितळविण्यास :** पिंपळाची साल, शेवग्याची साल वांटून लेप करणें.

६९३. **दुःख जाण्यास :** (१) नवसागर, विख, जेपाळ, सैंधव, वेखंड, कोष्ठ, गुंजा, बिबवे हे वांटून निंबाच्या रसांत गोळ्या करणें. निंबाच्या रसांत उगाळून गंध करणें. दुःख जाईल. (२) वांटून उटणें करणें, गांठ लेप करणें, गांठ जिरेल. (३) विड्याचीं पानें, बिबे ओंवा वांटून लावणें. गांठ भस्म होईल.

६९४. **बहिरेपण जाण्यास :** समुद्रफळ माक्याच्या रसांत उगाळून कानांत घालणें, बहिरेपण जाईल.

६९५. **नळगुदास :** निर्गुडीच्या मुळ्या बारीक वांटून तुपांत खलून वेंबीवर बांधणें. तिसरे प्रहरीं सोडणें. आणि पुन्हा बांधणें. याप्रमाणें ३ दिवस करणें. नळगुद जाईल.

६९६. **इसब जाण्यास :** झेंडू जाळून म्हशीच्या लेण्यांत मर्दून लावणें.

६९७. **मूळव्याधीस :** कांडवेलाचा रस गाईचे तुपाशीं व्यावा.

६९८. **नारूस :** (१) तीन वर्षांचा गूळ, सर्पाची कांत, सवागीची लाही, हीं एकत्र करून गोळी बोराबरोबर करून तीन अथवा सात गोळ्या द्याव्या. (२) कांडवेल, कोरफड, विलायती धोत्रा, मीठ, आंबेहळद हीं एकत्र वांटून नारूवर बांधावीं, दिवस ३. (३) कुचला बी ३ निंबूरसांत उगाळून ३ दिवस लावावा. (४) अमृतवेल मूत्रामध्यें गरम करून बांधणें. (५) रुईचीं पानें, बचनाग, साबण समभाग वांटून पिंडी ३ दिवस बांधावी. (६) ॥ श्लोक ॥ दाणा टांकण टांक एकहि तसा घे तूं कळीचा चुना ॥ दोहींचे द्विगुणीत गूळ मिळवी बहुता दिनांचा जुना ॥ गोळ्या तीन समान त्या करुनियां दे तीन वेळा दिसे ॥ नामें नारायणाचे पठण करित घे व्याधि तात्काळ नासे ॥ १ ॥ (७) ॥ उत्पन्न नारू मूळ प्राप्त होतां ॥ बचनागगंधें वरि लेप देतां ॥ तो वीघरे तंतु गळोन पाणी ॥ निःशेष होई स्मर चक्रपाणी ॥ १ ॥

६९९. **कुत्र्याचे विषावर :** (१) तुरीच्या झाडावरील किडा आणून पंख उपटून टाकावे आणि तीन वर्षांच्या गुळांत किडा कुसकरून सात गोळ्या करवंदा-बरोबर बांधून द्याव्या. (२) देवडांगरी, अंकोल मुळीची साल बोराप्रमाणें दीजे. (३) तिळवणीचा रस व तेल पाजणें. (४) सहस्रमुळी (शतावरी, अस्वली, दिवस मावळी) वांटून पाजणें. कुतरीं पडतील. (५) रविवारीं तांदुळाचे धुवणांत काळया धोत्र्याचें बोंड वांटून लेप कीजे. (६) रिंगणीचीं पिकलीं फळें वांटून लेप कीजे. रोज ३. (७) कापशीचें मूळ कांजींत वांटून पोटांत दीजे.

७००. **पाराउतार :** पारठ्या म्हशीचें शेण मडक्यांत घालणें. पळाटी याचा जाळ अथवा रानशेणीचा घालणें. गायीच्या लेण्यांत माखणें. पारा उतरेल.

७०१. **हिंगूळ पाराउतार** : बाभळीची साल ७ वर्षांच्या पळाट्या एकत्र करून कढविणें, वाफारा देणें, पारा उतरेल.

७०२. **हाडांतला उतार** : मिरें पाण्यांत घालून घुसळणें. वरचा फेंस येईल तो सांधोसांधीं मर्दिणें.

७०३. **सोमल उतार** : नीळ माती वाटून वस्त्रगाळ करणें. दुधांत पाजणें. सोमल उतरेल.

७०४. **नागाचा उतार** : उंबराच्या साली वांटून, दूध व रसामध्यें घालून पाजणें. उतार होईल.

७०५. **मुळासहित पित्त पाडण्यास** : आघाड्याचें बीज १ टांक रात्रीं ताकांत भिजूं घालणें. दुसरे दिवशीं अर्धा वांटून देणें, मुळांसहित पित्त पडेल.

७०६. **चातकी लागल्यास** : शिळें पाणी पिणें.

७०७. **ढेंकरास** : (१) शेवग्याच्या मुळ्यांचा रस ३ टांक त्यांत हिंग भाजून पोटांत देणें. ढेंकर जातील. (२) शेवग्याच्या रसांत अवळेसर गंधक घालून देणें.

७०८. **नपुंसकत्व दूर होण्यास** : केवड्यामधील फुलांचा रस १, चिनी या कापूर १, अंबर १, समभाग वांटून लिंगलेप कीजे. (२) बाभळीचें बीज वांटून वस्त्रगाळ करून ३ टांक साखरेशीं दररोज खाणें. (३) भोकरीचें बीज दह्यामध्यें दिवस सात भिजविणें. मग सावलींत वाळविजे. वांटून दररोज ३ टांक साखरेशीं खाणें. (४) समुद्रफळ लवंगामध्यें उगाळून इंद्रियांस लेप करणें. (५) सालईच्या झाडास शनिवारीं तांदूळ पिंवळे करून पूर्व दिशेकडे मुख करून आंवतून रविवारीं साल काढून सावलींत वाळविजे. साखर मधाशीं प्रातःकाळीं खाणें. (६) कासफळ उजळे गवतात असतें त्यास आणून दररोज तुपामध्यें तळून मधाशीं खाणें. दिवस ७. (७) बाभळीच्या शेंगा कोंवळ्या, कंवठ कोंवळें, व गोंधणें तिन्ही एकत्र वस्त्रगाळ कीजे. मधाशीं गोळ्या बांधिजे. दिवस ४०. दुधांत घेणें. (८) रुदरोज (?) मधाशीं दीजे. दिवस १४. **पथ्य**— तूप-रोटी. (९) पोस्त्या अंकोलाची साल, मुळीची व अंकोलाची अशी सावलींत वाळवून फकी कीजे. दिवस सात घेईजे. (१०) घेटुळीची साल गुळाशीं खावी. दिवस ११. (११) गोंडाळ सावलीत वाळविजे. गाईचे दुधांत रांधिजे. ३ टांक, रायपुरी साखरेशीं दीजे. दिवस १४. (१२) तुळशीमूळ भाग १, रिंगणीमूळ १ भाग, धोत्रामूळ ·।।· भाग. यांचा चाटून रस घेईजे. रोज २१. (१३) लवंगा १ तोळा, जायफळ १ तोळा, जायपत्री ६ मासे, हिंग तोळा २।।, पिंपळी १ तोळा यांची भुकटी कीजे, आणि परातींत घालीजे. विड्याचीं पानें सुमारें २०० यांचा रस घालून खल कीजे. त्याच्या गोळ्या बांधिजे. सुमारें १४ दिवस दररोज गोळी १ दीजे. वर विडा घेईजे. **पथ्य**—आंबट, तिखट, तेलकट खाऊं नये. गव्हांची पोळी, तूप फार खावें.

७०९. **धातुपुष्ट औषधें** : (१) सालंमिश्री पैसाभार, साखर पैसाभार, तूप गाईचें चार पैसेभार प्रातःकाळीं घ्यावें. **पथ्य**—तूप, पोळी, वरण खावें. शरीरावर तेजी येईल. (२) तालीमखाना पैसाभार, भुईतरवड १ मासा, कुटून पक्का शेर शेळीच्या दुधांत टाकून प्रातःकाळीं घ्यावें, पुष्टि होऊन कंबर बळकट होईल व वीर्य आणि बळ प्राप्त होईल. (३) सालंमिश्री ५ पैसे भार, तालीमखाना ५ पैसेभार, सफेदमुसळी ५ पैसे, समुद्रशोक अगर दालचिनी ४ पैसे एकत्र करावे. सर्वांच्या समान नाबद साखर टाकावी. गाईचें दूध कच्चें दीडपाव, त्यांत वरील औषधांचें चूर्ण टाकून घेत जाणें. पथ्य करावें. रति वर्ज्य. (४) वडाचा चीक बत्ताशांत घालून घ्यावा. दिवस ७. (५) अहाळींव पक्कें पावशेर, तूप अदपाव, व गूळ पक्का अच्छेर यांचा पाक करून घेणें. धातु पुष्ट होऊन कळा व तिडकाही राहतील.

७१०. **स्वप्नावस्था व वीर्यपतन यांवर** : (१) भेंडीचीं मुळें रात्रींत ठेंचून कोऱ्या मडक्यांत पाणी घालून ठेवावें. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं त्या मुळ्यांचा रस शोधून रस वजन ०८।· त्यांत बडीशेप पैसाभार, धणे पैसाभार, खडीसाखर पैसाभार हे जिन्नस बारीक वांटून रसांत घालून कालवून सकाळीं घटका दिवसाचे आंत याप्रमाणें औषध घ्यावें. (२) कांटेसावरीची साल आणून सांवलींत वाळवून दररोज १ तोळा गोडुधाशीं घ्यावी. १४ दिवस.

७११. **इसवास** : (१) शेंदूर, मिरें लोण्यांत खलून लावावें. (२) बांब वांटून आंबेहळद मिळवून लावणें. (३) कण्हेरीची मुळी तिळाच्या तेलांत उगाळून त्रिकाळ लावीत जावी.

७१२. **पानथरीस** : (१) तेलिया सुहागी मासा अर्धा व गूळ तीन वर्षांचा दोन पैसेभार, गोळी करून सात रोज देणें. पानथरीचें पाणी होईल. (२) रुईची पानें व मीठ हीं थराबर थर अशीं एकत्र मडक्यांत घालून पूट देऊन भस्म करावें. तें दररोज एक टांकप्रमाणें १४ रोज घेणें. (३) ज्यास प्याहा (पानथरी) आहे त्याच्या नावानें इंद्रावणीचें झाड उपटून टाकणें प्याहा बरा होय. (४) तीन वर्षांचा गूळ व कबूतराची विष्ठा भाग २, हीं ७ रोज घ्यावीं. (५) बकरीचे ताकाशीं समुद्र-फळ खावें. (६) देवडांगर समूळ पंचांग चूर्ण कीजे. टांक ३ उष्णोदकें घेइजे. प्याहा, भगंदर, वात, गुल्म, गांठी हे सर्व रोग जातील. (७) सोरा १ तोळा, निंबूच्या रसामध्यें वांटून निंबूटीस भरणें. रोज खाणें.

७१३. **पानथरी कुपित्थ यांवर** : इंद्रायणाची फक्की करून त्यांत मीठ, आंबेहळद, एकत्र करून ७ दिवस ठेवणें. मग निंबोळीएवढें खाणें. **पथ्य**— मुगाची डाळ, चांगला गहूं अथवा जोंधळा, अळणी ७ दिवस. आठवे दिवशी **उतार**— गाईचें दहीं आंबट व भात ७ दिवस खाणें. मग मध्यम अळणी खात जाणें. पाणी-लवणी पोटांत कांहीं राहणार नाहीं. पानथरी जाईल, पोटांत कुपित्थ राहणार नाहीं. कुडी पाहून औषध देणें.

७१४. **चूर्ण सर्व रोगांवर** : निर्गुडी ॥२, बेहडा ॥९, माक्याचा पाला ॥९, हिरडे ।९, आवळकठी ॥९, गुळवेल ॥९, दालचिनी १०, तरवडसाल ॥४॥, गूळ तीन वर्षांचा २, हीं दिनशुद्धि पाहून गोळ्या मध्यम स्थूल करून दोन्हीसांज सेविजे. याचे गुण एका महिन्यांत अंगींचें क्षीणत्व जाय. अंग निर्मळ होय. अंगीची कंडू जाय. सर्व रोग जातील.

७१५. **चूर्ण सर्व रोगांवर** : काळे तीळ वजन ॥·, खैराचा पाला ४ पैशाभर, ओंवा ॥, भुईतरवड २॥ पैशाभार, एकंदर चूर्ण करून ठेवावें. रात्रीं पाणी भरून ठेवावें, त्यास हात लावू नये. सकाळीं त्या पाण्याशीं फक्की पैसाभार घेत जावी. याप्रमाणें दोहीसांज घेत जावी. **पथ्य** नाहीं. यापासून रोग उत्पन्न व्हावयाचा नाहीं, व स्वप्नांत वीर्य जाणार नाहीं.

७१६. **अर्कक्षार– प्याहा, गुल्म, उदर, अग्निमांद्य, मोडशी यांवर** : रुईचीं पानें १००, मीठ १ शेर, सैंधव १ शेर, चुना कळीचा १ शेर, एकत्र चूर्ण करून थरोथर भरिजे. मातकापड करून पुट थोर दीजे. थंड झाल्यावर काढिजे. तें चूर्ण एक भाग, त्रिकटु एक भाग; लसूण एक भाग, हिंग एक भाग, एकत्र करून घेणें.

७१७. **हस्तिकर्णकंदाचें अनुपान** : हस्तिकर्णकंद याचें हत्तीचे कानासारखें पान असतें. ह्याचें समूळ चूर्ण करून तें प्रातःकाळीं तुपाशीं अथवा मधाशीं टांक ½ घेईजे. यथेष्ठ आहार सेविजे. महा आयुष्यवंत होय. पुरुषार्थ थोर होय. वीर्यवान होय.

७१८. **जीर्णज्वरावर** : (१) खारका ५ हिरव्या, व ५ भाजलेल्या लवंगा, १० हिरव्या, जिरें तोळाभर भाजलेलें, तोळाभर हिरवें, त्याची दोन्हीसांज फकी घ्यावी. (२) जिरें दुधांत शिजवून सावलींत वाळवून चूर्ण करून तें खडीसाखरेशीं ७ अगर १४ दिवस घ्यावें, जीर्णज्वर जाईल.

७१९. **सल** (न वाढणारा गर्भ) **वाढावयास** : मोचरस २ टांक, वाहता देवदार (वरधार) २ टांक, गाईचें दूध पावशेर प्रतिदिवशीं दीजे. असें ४ दिवस करणें.

७२०. **सल वाढण्यास** : आस्कंद दुधाशीं पोटांत घ्यावा, व घृताशीं योनीस लेप करावा.

७२१. **स्त्रीस दोन मुलें झालीं, मग होत नसतील तर** : वाघांटीचें मूळ शनिवारीं आंवतून रविवारीं बोटाप्रमाणें मूळ आणून ऋतुकाळीं चार दिवस विड्यांत घालून खावें. पीक गिळावा. स्त्रीस गर्भ धरील.

७२२. **पडता गर्भ राहे** : (१) तिळवण, रायपुरी साखर समभाग एकत्र करून दुधांत पाक कीजे, मग दीजे. (२) उंबराचे फळांचा काढा कीजे. तांदुळाचे

पीठ, साखर समभाग मेळविजे. मग दीजे. गर्भ राहील. (३) महाळुंगीचें बीज गो-दुग्धांत रांधून ऋतुकाळीं ३ रोज दीजे.

७२३. **मृत गर्भ पडावयास** : उतरणीचें मूळ आणून बायकोचे उजवे पायीं बांधिजे, मृत गर्भ पडेल.

७२४. **प्रसूत लवकर होण्यास** : (१) मुंडीचें मूळ, पिवळा दोरा सात धागे करून कुमारीचे हातानें बांधणें. (२) उतरणीचें मूळ नग्न होऊन काढिजे. धूप दाखवून कडें करून डावे पायीं घालिजे. ताकाळ प्रसूत होय.

७२५. **गर्भधारणेस** : (१) नाकेशराचें चूर्ण तुपांत चौथे दिवसापासून ३ दिवसपर्यंत घेत जाणें. **पथ्य**— दूधभात. भर्त्याचे संभोगानें गर्भ धरील. (२) आस्कंध, गुळवेल, लघुराळ यांचा काढा करून चौथे दिवशीं पिईल ती स्त्री-पुरुषाचे योगाने गर्भ धारण करील.

७२६. **वांझ स्त्रीस उपाय** : (१) ओंवा, पिंपळी, रिंगणी, नाकेशर, यांचें समभाग चूर्ण गाईचे तुपांत जी स्त्री पीत जाईल ती वंध्या असली तरी तीस पुत्र प्राप्त होईल. (२) पुष्य नक्षत्रावर पांढऱ्या जासवंदीचें मूळ आणून नवऱ्या-कडून वांटवावें. मग स्त्रीनें प्यावें. गर्भ धरील. (३) महाळुंगीचें मूळ दुधांत घालून फार वेळ कढवावें. त्यांत तूप घालून विटाळांत ३ दिवस घेणें. गर्भ राहील. (४) ज्येष्ठमध, शेवरीची साल, आंवळकाठी, यांचें चूर्ण समभाग. दुधांत ८ दिवस घेणें. गर्भ धरील.

७२७. **लवकर प्रसूत होण्यास** : (१) महाळुंगाचे आणि मोहाचे सालीचें समभाग चूर्ण करून मध व तुपांत खलून खाणें म्हणजे प्रसूत होईल. (२) चुली-वरील धुरानें जी काजळी येते ती शिळ्या पाण्यांत घेणें. प्रसूत होईल. (३) गुंजेचे झाडास शनवारीं आंबवून रविवारी मूळ काढून तें मूळ, काळ्या सुतानें स्त्रीच्या कम-रेस व मस्तकीं बांधणें. म्हणजे लवकर प्रसूत होईल.

७२८. **केंस चांगले होण्यास** : गायीचे दुधांत तिळाचें तेल आणि खडू वांटून ७ दिवस केंसांस लेप करावा; केंस लांब होतील.

७२९. **डोक्यास टक्कल असेल त्यास** : मधांत गुंजेचें पीठ खलून लेप करावा. टकलाच्या जागीं केंस येतील.

७३०. **पांढरे केंस काळे होण्यास** : निंबाचे तेल ४० मासे दररोज महिनाभर घेणें, पांढरे केंस काळे होतील.

७३१. **काळे केस पांढरे होण्यास** : पंचधारी निवडुंगाच्या चिकाचीं २ पुटें तिळाला देऊन, त्या तिळांचें तेल काढून तें तेल शरीरास लाविलें असतां केंस काळे असले तर पांढरे होतील.

७३२. **केंस गळून पडण्यास** : निवडुंगाच्या चिकाचीं पुटें आवळ्यांसी देऊन आंवळे वांटावे. आणि त्यांचा लेप केल्यानें केंस आपोआप गळून पडतील.

७३३. **तोंडावर पुळ्या येतात त्यांस** : (मुरमास) वेखंड, सांबराचें शिंग, धणे वांटून ३ दिवस मुखास लेप करावा. तारुण्यांत स्त्रीपुरुषांचे आंगावर अगर मुखावर ज्या पुळ्या येतात, त्या येणार नाहींत.

७३४. **आंगास उजाळी येण्यास** : तीळ, जिरें, शाहाजिरें, शिरस हे दुधांत वांटून जो मनुष्य ७ दिवस आंगास लावील, त्यांचें आंग सुवासिक आणि उजळहि होईल.

७३५. **तोंड आल्यास** : (१) कापूरचिनीचीं बोंडें बारीक वांटून दिवसांतून तीन वेळ चूळ भरून टाकावी. (२) भीमसेनी कापूर मासा एक, त्यांत पावशेर पाणी घालून त्याचें एकत्र मिश्रण करून दोन तीन वेळां गुळणी घ्यावी.

७३६. **गरमीवर** : रसकापूर, नागवेलीचीं पानें २० वेऊन त्यांचा रस काढून त्यांत कापूर घालून खलावा व त्याच्या सारख्या चोदा गोळया करून दररोज एक गोळी घ्यावी. **पथ्य**– करावी. **उतार**– तूप व भात खावा.

७३७. **खांडुकास उपाय** : टाकळीचा पाला चावून त्याचा रस काढून दुःखावर चोळावा व मग चोथा वर बसवावा.

७३८. **कळास** : कांगुण्याची भाजी तुपांत तळून मसाला न घालतां अळणी करावी व गव्हाचे पोळींबरोबर १४ दिवस खाण्यास द्यावी.

७३९. **कांटा बाहेर पडण्यास** : कांटेचुंबक लोण्यांत लावावें.

७४०. **तोंड आल्यास** : राजओव्याची वाफ तोंड आल्यास उपयोगीं पडते.

७४१. **नळगुदास** : पडवळाचा पाला पारोशे थुंकयांत वांटून ७ दिवस लावावा.

७४२. **घावास** : मुरदाड तेलांत रानशेणी जाळून न विझवितां तशीच जळत असलेली खलून लावावी.

७४३. **परम्यास उपाय** : (१) कावळीची मुळी गाईच्या दुधांत सात दिवस घेतली असतां परमा जातो. (२) अर्धाशेर दुधांत मुळ्याच्या पाल्याचा रस व थोडें मीठ टाकून सात दिवस घेणें.

७४४. **अर्धशिशीस** : (१) कडूनिंबाचीं पानें तीन, तुळशीचीं पानें तीन, मिरें अडीच, हीं गाईच्या तुपाशीं खलून दीजे. (२) कडू भोंपळा आणून मधील मगज काढून, ठेंचून, रस दोन मासे काढून, नाकामध्यें एक थेंब घालावा. रोग जाईल. (३) जेपाळाची बी निंबूरसांत उगाळून जेथें कपाळ दुखत असेल तेथें बोटभरी लाविजे. बरें होय. (४) रिठा पाण्यांत उगाळून नस्य दीजे. शिंका येतील. बारा वर्षांची शिरव्यथा जाईल.

७४५. **काविळीस** : (१) एरंडाचे पानांचा रस पैसाभार गोदुग्धांत देणें. दिवसां निद्रा करूं नये. (२) उटकटारीच्या मुळाची साल वांटून घ्यावी. दिवस ३. (३) रुईच्या कोंवळ्या डिऱ्या अडीच, विड्यांत खाणें. रोज ३.

७४६. **नपुंसकत्वास** : (१) **वंगेश्वर रसायन**— शिसें २ तोळे, जस्त १ तोळा, व कथील २ तोळे हे तिन्ही एकत्र करून कढई लोखंडाची चुलीवर ठेवून जिनसा आंत घालाव्या. तळीं अग्नि दीजे. खडीसाखर वजन पक्के दीडशेर उत्तम आणून बारीक वांटून पीठ करावें. त्याचा भुरका कढईंत पाणी झालें म्हणजे वर टाकीत जावें. निंबाचे लाकडांचा सोटा करून घोटीत जावें. साखर टाकीत जावी. भस्म होय, वर्ण पीत होय म्हणजे उतरावें. अनुपान— गहूं एक मूठ, तांदूळ एक मूठ, घोटबोरीचा (घोटीचा) पाला एक मूठ, गहूं तांदूळ रात्रीं भिजूं घालून प्रातः-काळीं तिन्ही पाल्यांसुद्धां वांटून वस्त्रगाळ करून, त्या उदकांत मात्र किंचित टाकून आणिक त्यांत तूप चार पैसेभार घालून प्राशन करावें. चवदा रोज देणें. **पथ्य**— चांगलें करावें. लंगोटबंद रहावें. पुरुषत्व येईल. (२) ।। दोहरा ।। पुरुषहीन छित्र तो मालकांगणी मंगाईये ।। मंगाय मालकांगणी जो घृतमें भिजाइये ।। टंक दो प्रमाण नर प्राथ उठ खाईये ।। तो कामिनी कलोळके अनंत सुख पाइये ।। १ ।।(३)।। अनुदिते नुदिते रविमंडले पिबति तोयमनूक्षित मूत्रविट् ।। जयति पित्तकफानिलजागदा सतत सो रमते तरुणीशतं ।। १ ।। (४) लसूण गाईचे दुधाशीं खाणें, २१ दिवस अगर ४२. (५) नाकशिंकणीचें बीज, गुंजांचें बीज, केरचें बीज तिन्ही वांटून खाणें. वीस वर्षांचा नपुंसक असला तरी मर्द होईल. (६) कण्हेरीची मुळी १ रात्रीं आणिजे. बाभळीचें बीज दोन्ही वांटून वजुदास लावणें. नामर्दाचा मर्द होय. (७) दालचिनी वांटून थुंक्यानें......स लावणें. (८) सुंठ १, अक्कलकारा ·।।·, लवंगा ४ भाग वांटून......स लावणें. (९) अक्कलकारा वांटून मधाशीं......स लावणें. (१०) गाजरें सोलून बाफिजे; मग तीं काढून गाईचें तूप मधांत घालून खाईजे. मर्द होय. (११) शिरसाचें तेल, जुना गूळ दोहींचें वजन पैसाभार सात रोज खाणें. मर्द होय. (१२) पांढऱ्या कण्हेरीच्या मुळीची साल व कुहिरीचें मूळ, केशर समभाग वांटून राईप्रमाणें गोळी कीजे......त दररोज २ घालिजे दिवस ७.

७४७. **वीर्यस्रावावर** : गोखरू २।। तोळे, मैदालकडी २।। तोळे, यांचें चूर्ण करून त्यांत साखर घालून, त्याच्या सात पुड्या कराव्या, व अगोदर एक पुडी घेऊन, त्यावर गाईचें निरसें दूध पावशेर घेणें.

७४८. **मोडशीस** : संवदडीचें मूळ ताकांत उगाळून त्यांत सैंधव व सुंठ घालून घेणें. **पथ्य**— जड पदार्थ खाऊं नये.

७४९. **महान् मुखरोगावर** : मोरचूद खापरांत भाजून त्याची बारीक पूड करणें, व पाण्यांत टाकून त्याची गुळणी एक तासपर्यंत तोंडांत धरावी, टाकूं नये; व गिळूं नये. एक तासानंतर गुळणी टाकून गाईचे तुपाची गुळणी घेणें. याप्रमाणें सात दिवस करणें.

७५०. **लहान मुखरोगास** : सोनगेरू १ तोळा, फटकी १ तोळा, याची बारीक पूड करून सात दिवस तोंडास लावणें.

७५१. **गोम डसली तर त्यास उपाय :** (१) रुईचीं पानें, गुग्गुळ जाळून धुरी देणें व पानें वांटून डंखीं लावणें. गोम उतरेल. (२) उदेल तेल डंखीं लावणें, म्हणजे उंदराचें विष उतरेल.

७५२. **सर्पास उपाय :** गूळ व तीळ रुईच्या चिकांत मळून खाणें. सर्प उतरेल.

७५३. **कोणतेंहि विष असलें तरी त्यास उपाय :** आंबाडीच्या मुळ्या मधांत खाणें. विष उतरेल.

७५४. **कुतऱ्याच्या डांसास उपाय :** धोतऱ्याचें बोंड व महाळुंगीचा पाला वांटून लेप करणें म्हणजे डांस बरा होतो.

७५५. **गुहिरा डसल्यास उपाय :** पाईरीच्या मुळ्या आणून त्या ठेंचून त्याचा लेप करावा, म्हणजे विष उतरेल.

७५६. **दुःख बरें होत नसल्यास मलम :** पहिल्यानें धुवावें. सोरा शिळ्या पाण्यांत टाकून पिचकाऱ्या माराव्या व वर मलम लावावें तें :— गाईचें तूप, शेळीचीं व बकऱ्याचीं वाळलेंडकें, व पांढरा कात, संगजिरें, हीं तुपांत खलून मलम करून लावावें, म्हणजे दुःख बरें होईल.

७५७. **वायूस औषध :** ओंवा, मिरीं, सुंठ, बाहव्याची साल, आंवळीची साल, एकत्र करून काढा घेणें. तो असा कीं, शेरभर पाणी घालून पावशेर उरवावें, त्यांत पिठी साखर घालून खावयास देणें. ७ अथवा १४ दिवस. मुळा, काकडी वगैरे पदार्थ वर्ज्य.

७५८. **सुशीवर उपाय :** (१) माक्याचा रस दिवस सात घेणें, म्हणजे सूस राहील. (२) देवदार, हळद, सुंठ, गूळ, हीं सर्व औषधें समभाग करून गोमूत्रांत घेणें. बरें होईल.

७५९. **हीनशक्ति झाल्यास उपाय :** भोपळ्याचें बीज ९ टांक, आघाड्याचें बीज ९ टांक, जायफळ १ टांक, कायफळ १ टांक, मायफळ १ टांक, खुरासनी ओंवा ३ टांक, जायपत्री १ टांक, चिकणाबीज (बळबीज) २ टांक, अफू अर्धा टांक, एकंदर चूर्ण करून भुकटी करून सकाळचे प्रहरीं तीन बोटांनीं चिमूट घेणें. धातू बिघडली असेल तर ती दुरुस्त होईल. **पथ्य**— तेलकट, आंबट वगैरे वर्ज्य.

७६०. **उसण भरते त्यास उपाय :** बिब्याचें लाकूड आणून तें पाण्यांत भिजत घालावें. तें सकाळचे प्रहरीं पिण्यास देणें. ३ दिवस. उसण जाते.

७६१. **कांहीं जखम बरी होण्यास उपाय :** पारा १ तोळा, मनशीळ १ तोळा, मायफळ ३ तोळे, वावडिंग १ तोळा, कात ३ तोळे, माक्याच्या रसांत सर्व जिनसा एक दिवसपर्यंत खलून मग गोळ्या बांधणें. मग ३ भाग करणें, ते असे कीं, प्रथम १ गुंज, दुसऱ्यानें २ गुंजा, तिसऱ्यानें ३ गुंजा, याप्रमाणें गोळ्या घेणें. जखम बरी होईल.

७६२. **कुष्टास उपाय :** वांझ करटोली पाण्यांत वांटून आंगास लेप करणें; कुष्ठ जाईल.

७६३. **प्रमेहास उपचार :** निंबाची अंतरसाल व बाभळीची अंतरसाल, नव्या मडक्यांत भिजत घालून त्याचे पाणी साखरेशीं खाणें. ७ दिवस.

७६४. **मुलाचें भांडें बाहेर पडल्यास उपाय :** केतकीच्या पाल्याचा रस व तिळेल तेल कढवून लेप करणें. भांडें आंत जाईल.

७६५. **तापास औषध :** कडूचिराईत, गुळवेल, द्राक्षें, आंवळे, कचोरा, समभाग काढा करून देणें. दिवस तीन; ताप जाईल. प्रथम कोणते वारीं कोणतें नक्षत्र हें विचारावें. अश्विनी नक्षत्र, रविवार, सोमवार, शुक्रवार ह्या दिवशीं ताप आला तर २१ दिवस राहील. व शनिवार, सोमवार, बुधवार, भरणी नक्षत्रीं ताप आला तर तो वांचणार नाही. गुरुवार, कृत्तिका नक्षत्र पीडा दोन दिवस. रविवार, शनिवार, बुधवार, रोहिणी नक्षत्र, पीडा सात दिवस. सोमवार, शुक्रवार मृग नक्षत्र पीडा ५ दिवस. शुक्रवार आर्द्रा नक्षत्र मनुष्य वांचणार नाहीं. रविवार, शनिवार, बुधवार, पुनर्वसू नक्षत्र, पीडा २ दिवस. सोमवार, गुरुवार पुष्य नक्षत्र, पीडा २६ दिवस. शुक्रवारीं आश्लेषा नक्षत्रीं मनुष्य वांचणार नाहीं. शनिवारीं, बुधवारीं, रविवारी, मघा नक्षत्रीं पीडा ७ दिवस. मंगळवार, शुक्रवार, पूर्वा नक्षत्र पीडा ५ दिवस. सोमवार, शुक्रवार, उत्तरा फाल्गुनी नक्षत्र, पीडा २५ दिवस. रविवार, शनवार, बुधवार, हस्त नक्षत्र, पीडा १५ दिवस. सोमवार, बुधवार, गुरुवार, चित्रा नक्षत्र पीडा १२ दिवस. शनिवार, रविवार, बुधवार, स्वाती नक्षत्र पीडा १० दिवस. मंगळवार, शनिवार, विशाखा नक्षत्र पीडा फार न वाटे. बुधवारीं अनुराधा नक्षत्र, पीडा ४० दिवस. गुरुवारीं ज्येष्ठा नक्षत्र, पीडा, २० दिवस. शनिवार, मंगळवार, मूळ नक्षत्र, मनुष्य न वांचे. सोमवार, बुधवार, पूर्वाषाढा नक्षत्र, पीडा ५ दिवस. बुधवार धनिष्ठा नक्षत्र, पीडा २१ दिवस. रविवार, मंगळवार, श्रवण नक्षत्र, पीडा ५० दिवस. शनिवार, मंगळवार, बुधवार, धनिष्ठा नक्षत्र, पीडा ३ दिवस. गुरुवार शततारका नक्षत्र पीडा १०० दिवस. शनिवार, रविवार, मंगळवार, पूर्वाभाद्रपदा नक्षत्र, पीडा २० दिवस. मंगळवार, बुधवार, उत्तराभाद्रपदा नक्षत्र, पीडा, दिवस १००. गुरुवार, शुक्रवार, रेवती नक्षत्र पीडा १० दिवस. ह्याप्रमाणे २७ नक्षत्रांचे गुण पाहून औषधें द्यावींत.

७६६. **पुष्टीस उपाय :** (१) सराटेमूळ, शतावरी मूळ, काळे तीळ, उडदाचे पीठ, यांचे समभाग चूर्ण करावें. त्यांत साखर मिसळून, समभागें दुधाशीं घेणें. दिवस ७ अथवा १४, वृद्ध पुरुष तरुण होईल. (२) लवंग ८४ टांक, बेहडा, काथ, पिंपळी ८४ टांक, अक्कलकारा ८४ टांक, जांभळीची साल ८४ टांक, यांचें चूर्ण करून तीन ८३ टांक, प्रत्येक दिवशीं घेणें. दिव्य काया होय. (३) केशर ४ टांक, लवंग २ टांक, व अफू १ टांक, जायफळ ३ टांक, कस्तुरी

एक गुंज, हे वांटून एकत्र करून मधांत भिजवून गोळ्या एक टांकप्रमाणें बांधून मधाशीं खाणें. **पथ्य**— तेलकट, आंबट, वगैरे. उतार— मिठाचा खडा देणें. (४) पळसाचा डिंक ३ टांक, सावरीचा डिंक (मोचरस) दोन टांक, मैदालकडी २ पैसे भार, गोखरूं अर्धाशेर, एकत्र करून गाईचें दूध शेरभर त्यांत मिळविणें. पाहिले दिवशीं अधेलाभार. दुसरे दिवशीं रुकाभार. असें चढवावें. **पथ्य**— तेलकट आंबट वगैरे वर्ज्य.

७६७. **अतिमूत्रास औषध** : बीज ९ टांक, काळे तीळ ९ टांक, तीन वर्षांचा जुना गूळ ९ टांक, यांचें एकत्र चूर्ण करून वस्त्रगाळ करणें. २ वेळ ३ टांक खाणें. अतिमूत्र बंद होईल. **पथ्य**— तेलकट, आंबट, तिखट वर्ज्य.

७६८. **रक्त, मुरडा व संग्रहणी यांवर उपाय** : आह्याळींव, मोहरी, मेथी, हे अर्धे हिरवे अर्धे भाजलेले असे वांटून म्हशीच्या दह्यांत घेणें. रक्त, हगवण व संग्रहणी बंद होईल.

७६९. **गर्मीस औषध** : पावलीभार रसकापूर, पावलीभार केशर, पावलीभार वेलची, या तिन्हींचा खल करून पारुसा थुंका अगर चंदनी अत्तर जखमेवर लावून वर भुकटी बसवावी.

७७०. **गरमीचे सुजेवर उपाय** : कांटेचिबूड भांड्यांत गरम करून वाफ घेणें. सूज उतरेल.

७७१. **गरमीवर पोटांत घेण्याचें औषध** : सवाशेर कागदी लिंबांचा रस काढून त्यांत औषधें टाकावयाचीं तीं— मुरदाडशिंग पैसाभार, हिंगूळ पैसाभार, सुपारी पैसाभार, सोनामुखी पैसाभार, डिकेमाली पैसाभार, हीं औषधें वस्त्रगाळ करून लोखंडाचे भांड्यांत लोखंडानेंच खल करून, नंतर त्यांचा रस आटून त्याची भुकटी करून, नंतर लिंबाची अर्धी खाप घेऊन विस्तवावर ठेवावी. त्याच्यावर तांदळाइतकी भुकटी टाकावी. आणि ती खाप खदखदली म्हणजे चोखावी. ७ दिवस; पुन्हां दोन खापा रोज असे सात दिवस; रोज तीन खापा असे सात दिवस. **पथ्य**— तेलकट, आंबट, वातुळ, भात वगैरे वर्ज्य. **उतार**— हरभऱ्याचे डाळीची आमटी. सकाळीं एरंडेल तेल संध्येच्या पळीभर पिणें, म्हणजे बरें होईल.

७७२. **मूळव्याधीस रक्त पडतें त्यास** : दोन तोळे ताजी गुळवेल. त्याची साल काढून अदपाव पाण्यांत भिजत टाकून, जी सकाळीं टाकावी ती संध्याकाळीं घेणें, व संध्याकाळीं टाकावी ती सकाळीं घेणें, व निरानिराळीं घेणें. वस्त्रगाळ करून त्यांत पावलीभार मध टाकून दुसरीं औषधें पावलीभार टाकावीं तीः— भुईतरवड, बाळहिरडे, आंवळकठी, सेंधेलोण, बडीशेप, गुलाबकळी, निशोत्तर, खडीसाखर हीं कुटून वस्त्रगाळ करून रोज पावलीभार सकाळीं व संध्याकाळीं घेणें. **पथ्य**— तेलकट, आंबट वगैरे वर्ज्य.

७७३. **अतिसारावर उपचार** : बाभळीच्या डिन्या, मीठ व पाणी एकत्र करून घेणें. दिवस ३.

७७४. **संग्रहणीस उपाय** : डाळिंबीच्या डिन्या ताकांत वांटून देणें. अथवा वडाच्या सालीचा काढा, तुपाचा प्रतिपाक करून घेणें. दिवस ३. अथवा तांदुळज्याच्या मुळ्या मधाशीं देणें.

७७५. **अतिसारास उपाय** : घेट्टुळीची मुळी, दुधांत वांटून घेणें.

७७६. : **मुतखड्यास उपाय** : सुंठ, हिंग, मीठ यांची कढी करून घेणें, त्यास ७ कढ येऊं द्यावेत. ताक लाल होऊं द्यावें. खालीं उतरून निववावें; मग देणें. मुतखडा जाय.

७७७. **भगेंद्रास उपाय** : कापूर, चंदनानें माखून वाती भगेंद्रांत धरणें, भगेंद्र जाय.

७७८. **मूत्रसारास उपाय** : तिळांचे कोळाचा खार दुधाशीं घेणें. मूत्रसार जाय.

७७९. **बालकपीडापरिहार** : (१) गुग्गुळ, सर्पाची कांत, निर्गुंडी, वेखंड, कोष्ठ, शिवनिर्माल्य, धोत्रा, तूप, हा धूप बालकास देणें. या धुरानें ग्रहबाधा न होय. (२) पांढरे निर्गुंडीचें मूळ शनवारीं आंवतून आदितवारीं घेऊन बालकाच्या गळ्यांत गुंडी बांधणें. कांहीं दोषबाधा होणार नाहीं. किंवा चूर्ण करून देणें, बाळकाचा अतिसार जाईल. वेखंड, चिकणा, हळद हें चूर्ण तेलांत घालून उन्हांत ठेवणें. तेलाचें उटणें करून न्हाऊन निजविणें; बाळकाचे सर्व दोष जातील.

७८०. **कानांत गोमाशी गेल्यास उपाय** : (१) जाईचा रस, पिकल्या लिंबाचा रस, हिंग, मोगरेल असें एकत्र करून कढविणें व निवाल्यावर कानांत घालणें. गोमाशी मरेल. (२) कात पाण्यांत वांटून कानांत घालणें, गोमाशी जाईल. (३) भांगेच्या पानांचा रस व सज्जीखार कानांत घालणें. गोमाशी मरेल, किंवा जाईल.

७८१. **आमांश झाल्यास काढा** : कोंवळीं बेलाचीं फळें, सुंठ, बडीशेप हे तिन्ही समभाग घेऊन त्यांत तीन पटीनें पाणी टाकावें. एकपट पाणी राहिलें म्हणजे मग तो काढा दिवसांतून ३ वेळ ह्याप्रमाणें ३ दिवस घेणें. आमांश जाईल.

७८२. **रक्तवृद्धीस उपाय** : बेलाच्या सालीचा रस तोळे २ पर्यंत काढून त्यांत त्या रसाचे ६ पट गाईचें दूध मिश्र करून त्यांत जिन्याची पूड घालून ती रोज २ मासेप्रमाणें घेणें.

७८३. **पडजीभ येते त्यास** : चिंचोका थंड पाण्यांत उगाळून टाळूवर लेप करावा म्हणजे पडजीभ उतरून जो खोकला येतो तो राहील.

७८४. **लाजाळू** : लाजाळूची मुळी व गोरोचन, हीं दोन्ही घोड्याचे लाळेंत उगाळून मस्तकास तिलक करणें; तो पाहून शत्रू मित्र होतील.

७८५. **अंडवृद्धीवर** : लाजाळूचा पाला वांटून चांगला ऊन करावा. आणि वाढलेले शिरेवर सारखा बसवून पट्टी बांधावी, बरें होय.

७८६. **डांग्या खोकल्यावर उपाय** : लाजाळूची मुळी रविवारीं काढून भोजपत्रांत गुंडाळून पंचरंगी रेशमांत त्याच दोऱ्यानें बांधून धूप दाखवून बांधावी. संध्याकाळचे वेळीं गळ्यांत बांधावें; बरें होय.

७८७. **नेत्रपडळावर** : लाजाळूच्या पानांचा रस व घोड्याचें मूत्र एकत्र करून अंजन करणें. ह्या अंजनानें नेत्रांत पातळ पांढऱ्या रंगाचीं पडळें येतात तीं वितळतात.

७८८. **स्त्रियांस महाबळ (धुपणी) येते त्यास** : लाजाळूचा पाला ताकांत वांटून वस्त्रगाळ करून तो पाला पावशेरप्रमाणें घेत जाणें. ३ दिवसांत गुण येतो.

७८९. **आडवें आल्यास** : (१) शेराचा चीक भांगांत घालिजे. तात्काळ प्रसूत होय. (२) खिरणीच्या मुळ्या व एरंडांचा मगज एकत्र वांटून प्राशन कीजे. तात्काळ प्रसूत होय. दोन्ही उपाय भयंकर दिसतात. तेव्हां विचारपूर्वक अमलांत आणणें.

७९०. **डोळ्यांतील फूल जाण्यास** : (१) पांढऱ्या गुंजेचें मूळ व लवंगा उगाळून डोळ्यांत घालिजे. बारा वर्षांचें फूल जाईल. (२) सुरवारी हिरड्याचे बींतील मगज व पुत्रजीववृक्षाचे बींतील मगज, पुत्राचे मातेच्या दुधांत उगाळून ७ दिवस अंजन करणें. फूल झडे. (३) आवाड्याचे मूळ मधाशीं उगाळून अंजन करावें. (४) नागरमोथा मोठ्या बोकडाचे मूत्रांत उगाळून डोळ्यांत घालिजे. जन्माचें फूल जाईल.

७९१. **रक्तपित्तास** : (१) मध दोन पैसेभार, पाणी तीन पैसेभार, आंत रक्तरोहिड्याचें लांकूड घांसून पाजणें. (२) मध टांक ५, पाणी टांक २॥, तुरटीची लाही १ मासा, एकत्र करून प्यावें. ७ दिवस औषध घेणें. **पथ्य**– अळणी दूधभात.

७९२. **सर्पास उतार** : (१) कासविंद्याची मुळी घांसून अंजन करणें. (२) पांढऱ्या वसूच्या मुळीचें चूर्ण पाण्याशीं द्यावें. (३) रुईचें मूळ पाण्यांत उगाळून नस्य देईजे व अंजन कीजे. (४) गुंजा पाण्याशीं वांटून पाजणें.

७९३. **विंचवास उतार** : (१) पारोशा पिंपळाचें फूल निंबूरसें उगाळून डांसावर लेप द्यावा. तत्काळ उतरेल. (२) विलायती धोतऱ्याचें मूळ शनिवारी आंवतून रविवारीं आणणें व पाण्याशीं उगाळून लेप लावणें.

७९४. **दम्यास उपचार** : उडीद चिलमींत घालून ओढावें. दिवस ७. (२) केळीचीं पानें खापरांत जाळून राख करून मधांत गोड्या हरभऱ्याबरोबर करून त्रिकाळ घेणें. रोज ७. (३) पिंपळीचा चार प्रहर खल करून ती मधाशीं घ्यावी. दिवस ७.

७९५. **नारू** : रानशेवग्याची साल व चित्रकमूळ बारीक वांटून, त्यांत पारव्याची विष्ठा घालून चांगलें मर्दन करावें व गोळी करून वर बांधणें. नारू जळून जाय.

७९६. **खोकल्यावर रामबाण औषध** : मिरीं तोळा १, पिंपळी तोळा १, डाळिंबीची साल २ तोळे, जवखार ·॥· तोळा, यांचें वस्त्रगाळ चूर्ण करून त्यांत गूळ ८ तोळे घालून नंतर तें सर्व खलून त्याच्या गोळ्या ·॥· तोळ्याप्रमाणें कराव्या, व एक एक गोळी घेणें.

७९७. **गरमीवर औषध (रसायन खाल्लें नसल्यास)** : चंदनाचें गोडें तेल व नऊ टांक शेंदूर हे तेलांत एकत्र कढवून दाट झालें म्हणजे काळें होईल. फडक्यास लावून पट्टी मारावी, म्हणजे बसेल किंवा फुटेल.

७९८. **गरमीवर औषध (रसायन खाल्लें नसल्यास)** : चंदनाचें तेल पिकल्या पानास लावून विडा खावयास द्यावा. दिवसांतून विडे ३ खावे. १७ दिवस. **पथ्य**– करावें व अळणी खावें. उतार– अमसुलाची कढी. जुलाब दिवसांतून दोन-तीन वेळा होतील, व वांतीहि होईल; तर घाबरूं नये, बरें होईल.

७९९. **बायकांचे धुपणीस उपाय** : तांबड्या जास्वंदीची मुळी गाईचे दुधांत वांटून प्यावयास द्यावी. दिवस ३. दिवसांतून ३ वेळ देणें. बरें होईल.

८००. **रसकापूर शोधण्याची कृति** : मेंढीचे दुधांत रात्रीं भिजत घालावें. सकाळचे प्रहरीं सुकवावें. असे ७ दिवस करावें. सिद्ध होईल.

८०१. **मुळव्याधीस रामबाण औषध** : कळीचा चुना व पापडखार एकत्र करून खलून ठिपका देणें. जळून जाईल.

८०२. **मूत्र कोंडलें त्यास उपाय** : तांदुळज्याचें बीज तोळे ३ व काकडीचें बीज तोळे २, चंदनाचें तेल अर्धा तोळा. वरील दोन जिनसा पाण्यांत भिजत ठेवणें. एक घटकेनें तें वांटून त्यांत वरील तेल टाकावें. सर्व मिळून एक बाटली करून ती दिवसांतून चार वेळां देत जाणें. दिवस ७ पर्यंत. म्हणजे कोंदलेलें मूत्र, तिडीक, परमा, धातू जात असेल ती, मुतखडा इत्यादि बंद होतील.

८०३. **दमा खोकला इत्यादिकांस** : बेलफळ अर्धा तोळा, ६ बेहडे, ६ हिरडे, प्रत्येक दिवशीं ते फोडून त्याच्या बिया काढून टाकून वरील साल घेणें, व १ तोळा दालचिनी लकडी, ज्येष्ठीमध पावलीभार, ह्या एकंदर जिनसा एक शेर पाण्यांत खलून व कढवून तें पावशेर उरवावें. व तेवढें दिवसांतून ३ वेळा घेणें. म्हणजे दमा, खोकला, क्षयरोग जातो.

८०४. **तोंडावाटे व कानावाटे रक्त पडतें त्यास** : गाईचें तूप नऊ टांक, त्यांत थोडासा गेरू टाकून हातपाय व टाळू यांजला चोळावें. म्हणजे रक्त बंद होतें.

८०५. **हातांपायांस कळा व वांब (गोळे) येतात त्यास** : पुदिना व बडीशेप, हीं एकत्र पावशेर पाण्यांत उकळून दिवसांतून ३ वेळा घेणें. दिवस ७ पर्यंत. गुण येईल.

८०६. **गंडमाळेवर मलम** : (१) गाईचें शिंग आणि खुरासणी ओंवा एक एक तोळा घेऊन तिळाचे तेलांत जाळून राख झाल्यावर तेलांत खलून लावणें. बरें होय. (२) टांकणखार १ गुंजेप्रमाणें दुधांत देणें. अगर समुद्रफळ गाईच्या तुपांत १ गुंज ७ दिवस देणें.

८०७. **मुखरोगावर** : कांटेचिबूड याचीं पानें मुखांत धरणें. **किडे पडावयास** : (१) कळलावीचा कांदा शनवारीं आंवतून, रविवारीं आणावा. डावे पायाचे आंगठ्यास लावून, उगाळून उजवे पायाचे आंगठ्यास लेप करणें, म्हणजे किडे पडतील. (२) गूळ, गुग्गुळ आणि मोहरी एकत्र वांटून पायांस लेप करणें, किडे पडतील.

८०८. **पित्तास उपचार** : (१) नवसागर गुडघ्याखालीं पोटऱ्याला चोळणें. (२) कवठीचे पाल्याचा रस दुधाशीं घेणें.

८०९. **शूळास उपचार** : (१) काळा बोळ, बिब्ब्याची राख, आणि गूळ, तिन्ही सारखीं तीन तीन तोळे घेऊन एकत्र करून घेणें. दिवस १४. (२) उन्हाळीची मुळी कांजीशीं उगाळून देणें.

८१०. **शक्तिवृद्धीस** : (१) उत्तम बचनाग तोळा एक दुधांत शिजविणें. कढ आल्यावर उतरून, हिंगूळ, पिंपळी व मिरीं, एक एक तोळा घेऊन चूर्ण करून, त्यांत एकत्र करून खलावें. नंतर मिऱ्याप्रमाणें गोळ्या बांधाव्यात. एक महिना घेणें. **पथ्य**— मिष्टान्न खाणें. तूप फार खाणें. उष्ण पाणी पिणें, नागवेलीचीं पानें फार खाणें, जिरें, साखर घेणें. (२) दवराज मधांत घेणें, दिवस चौदा. **पथ्य**– तूप आणि रोटी खाणें.

८११. **भगेंद्रास** : चित्रकाची साल एक रुकाभार. रुईची साल रुकाभार, मिरीं दीड रुकाभार एकत्र करून, ताकांत वांटून दिवस सात घेणें.

८१२. **शक्ति येण्यास** : बाभळीच्या कोंवळ्या शेंगा आणून त्या शेंगा अच्छेर, कोंवळीं गोंधणें अच्छेर, सराटे अच्छेर हीं तिन्ही वाळवून कुटून वस्त्रगाळ करून मधांत गोळ्या चाळीस करून प्रत्येक दिवशीं गोळी एक खाणें.

८१३. **खोकल्यास चूर्ण** : अफू, रायपुरी साखर, जायपत्री, गंधक, जायफळ, कनकबीज (धोत्र्याचें बीं) अशीं एक एक तोळा घेऊन चूर्ण करून मधांत खलून गोळ्या मिऱ्याप्रमाणें बांधून प्रत्येक दिवशीं एक मधांत घेणें.

८१४. **पारा निघण्यास** : (१) तोंडलीच्या पाल्याचा रस नऊ टांक, साखर नऊ टांक, एकत्र करून घेणें. दिवस सात. **पथ्य**— तूप व रोटी खाणें. (२) सागरगोट्याचे पाल्याचा रस, राजहंस एक टांक, खडीसाखर नऊ टांक, तूप नऊ टांक एकत्र करून खाणें.

८१५. **परम्यावर** : (१) हळद आंवळीचे रसांत घेणें. पथ्य जोंधळ्याची भाकर, मुगाचें वरण खाणें. (२) काकडीचें बीज, ज्येष्ठमध, दारुहळद, हें तांदुळाचे

धुवणाबरोबर देणें. (३) करटोलीचें बीं बारीक वाटून वस्त्रगाळ करून गाईच्या तुपाशीं घेणें. चौदा दिवस. **पथ्य—** जोंधळ्याची भाकर, तूप, व मेथीची भाजी खाणें. (४) वेहकळीच्या मुळीची साल सांवलींत वाळवून चूर्ण करावें. तें चूर्ण नऊ टांक आणि साखर नऊ टांक, एकत्र करून खाणें. **पथ्य—** मिष्टान्न खाणें. (५) वडाच्या पारंब्या एक मूठ, नाबद साखर एक टांक, जिरें एक टांक, एकत्र बारीक वांटून घेणें. दिवस ३. **पथ्य—** गव्हाची भाकर, वरण अळणी.

८१६. **धुपणीस :** निंबाची व बाभळीची साल मडक्यांत घालून त्यांत पाणी दहा शेर घालून वर गाडगें झांकण ठेवावें. अग्नि देणें. नऊ टांक राहिल्यावर त्यांत तिळाचें तेल नऊ टांक एकत्र करून घेणें. दिवस सात घेणें.

८१७. **मुतखड्यास :** मुळ्याच्या पाल्याचा रस पावशेर, त्यांत थोडा साबण घालून घेणें. दिवस ३. तिडकीस— गुळवेलीचा व वावळ्याचा रस साखर घालून घेणें.

८१८. **बहुमूत्रास :** उंबराचे मुळीचें चूर्ण तीन टांक मधांत घेणें. दिवस तीन.

८१९. **गुंतले मूत्रास :** पंध्याचा रस काढून देणें. कान फुटल्यास— पंध्याचा रस कानांत घालणें. दिन सात.

८२०. **नळास :** (१) शेराच्या डिऱ्या तोळे तीन, मिरीं तोळा अर्धा, हिंग तोळा पाव एकत्र करून गोळ्या करून तुपांत खाणें. दिवस तीन. **पथ्य—** बाजरीची भाकर, वरण तुरीचें, गरम पाणी पिणें. (२) पापडखार तोळा १ याच्या पुड्या तीन कराव्यात. निंबाच्या खापेवर एक पुडी सोडून गरम करून चोखावी. दिवस तीन. **पथ्य—** वरप्रमाणें करावे. (३) मोहव्याचा पाला मधात भिजवून अंडाखालीं शिरेस बांधणें. दिवस ३.

८२१. **मुलाचे पोटदुखीस :** काळा बोळ, व ज्येष्ठमध हीं एकत्र करून घेणें.

८२२. **मुरड्यास :** कासवंदीचा रस दहा टांक, जिरें दहा टांक एकत्र करून देणें. दिवस तीन.

८२३. **नारूस :** (१) टांकणखार तीन टांक, तीन वर्षांचा गूळ नऊ टांक, एकत्र करून घेणें. दिवस सात. (२) नवसागर अर्धा तोळा, याच्या पुड्या सात करणें. दोन तोळे तुपात दररोज एक पुडी घेणें. (३) पांगेऱ्याचीं पानें मीठ घालून वांटून वर बांधणें.

८२४. **शूळास :** हिंग एकांगीं भाजून मिरीं व समुद्रफळ, समभाग चूर्ण तुपाशीं देणें.

८२५. **शक्ति येण्यास :** रुमामस्तकी तोळा एक, कबाबचिनी, सुंठ, दालचिनी, आस्कंद एक एक तोळा घेऊन मधांत गोळ्या करून प्रत्येक दिवशी एक गोळी घेणें. **पथ्य—** नेमस्त असणें.

८२६. **सर्व रोगांवर गोळ्या** : पिंपळीस रुईच्या चिकाचीं पुटें सात देऊन धोत्र्याच्या रसाचीं पुटें सात देऊन वाळविणें. चूर्ण करून मधांत गोळ्या करणें. दिवस चौदा खाणें. **पथ्य**— एकवीस दिवस. **पांडुसंग्रहणीस** : हिरडे व सुंठ पावशेर एकत्र कुटून वस्त्रगाळ चूर्ण करून तीन वर्षांचे गुळांत गोळ्या चौदा करणें. चौदा दिवस मधाशीं घेणें.

८२७. **मुलाचे पोटफुगीस** : काळा बोळ व सुंठ उगाळून पोटावर घालणें.

८२८. **मूत्रकोशास** : तूप, सैंधव, चण्याचें पीठ, रायपुरी साखर एकत्र करून देणें. दिवस तीन.

८२९. **वाघाचे डांसास** : मिरीं, वडाची साल, निंबाची साल, शेवरीची साल, एकत्र वाटून डांसास लेप करणें. पांढरे डोरलीची मुळी पाण्यांत वाटून पिण्यास देणें.

८३०. **डोळ्याचे पडळास** : बेलाचा रस आणि घोड्याचें मूत्र एकत्र करून अंजन करावें.

८३१. **डोळ्यांतील फुलास** : पांढरे घेट्ळीची मुळी व बेलफळ घोड्याचे मूत्रांत उगाळून अंजन करावें.

८३२. **पुष्टतेस** : खसखस तोळे दोन, गाईचें दूध पावशेर, थोडी साखर घालून क्षीर करून घेणें. **नपुंसकपणावर** : घेट्ळीची मुळी नऊ टांक, सोलून जुने गुळाशीं खाणें. दि. ११. नपुंसकपणा जाईल.

८३३. **घोळणा फुटल्यास** : (१) गाईचें तूप, कुंकूं, व केशर एकत्र करून चार थेंब नाकांत घालणें. (२) गाईचें अथवा बैलाचें शेण गरम आहे तोंच पिळोन त्याचे चार थेंब नाकांत घालणें. बरें होय.

८३४. **खरजेस** : (१) जिरें, मिरें, शेंदूर, पारा, मनशीळ, गंधक, एकत्र करून बारीक चूर्ण करून गाईच्या दुधांत ताटांत खलून नंतर त्यांत तूप घालून तांब्याच्या भांड्यानें खलून खरजेस लावणें. खरूज जाईल. (२) शेंदूर आणि मिरी म्हशीच्या लोण्यांत तांब्याच्या परातींत तांब्याच्या भांड्यानें खलून नंतर खरजेस लावणें.

८३५. **सुके खरजेस** : हळद, सैंधव, हरताळ, हे गोमूत्रांत वांटून नंतर आंगास लावणें, खरूज जाईल.

८३६. **शूळास** : संचळ, हिंग, सुंठ, समभाग चूर्ण करून गरम पाण्याशीं घेणें, शूळ जाईल.

८३७. **मस्तकशूळास** : एरंडमूळ, माक्याच्या रसांत उगाळून तुपांत कढवून नंतर देणें.

८३८. **हगवणीस** : राळ तोळा दीड आणि दहीं पावशेर एकत्र खाणें. **पथ्य**— तूप आणि भात.

८३९. **खोकल्यास** : आघाड्याचें बीं टांक एक चूर्ण करून त्यांत थोडीं मिरीं घालून देणें. दिवस तीन.

८४०. **स्त्रीस विटाळ येण्यास** : बेलाच्या सालीचा काढा करून त्यांत गूळ घालून देणें. विटाळ येईल.

८४१. **डोळ्याचे तिडकेस** : शेवग्याचे पाल्याचा रस, मध एकत्र करून डोळ्यांस अंजन करावें.

८४२. **स्त्रीस दूध येण्यास** : (१) कोहोळ्याचा रस आणि तूप असें एकत्र करून पाजावें, स्त्रीस दूध येईल. (२) चित्रकाची मुळी तांदुळाचे धुवणांत उगाळून देणें.

८४३. **स्तन गुंतल्यास** : कोरफडमूळ हळदींत वांटून स्तनांस लेप करणें. स्तन मोकळे होतील.

८४४. **गर्भधारणेस** : जासवंदीचीं फुलें, कमळणीचा कंद, समभागें मधाशीं देणें. दिवस तीन.

८४५. **पुष्टतेस** : भोकराचें बीं, साखर, एकत्र देणें. दिवस सात.

८४६. **धातुस्राव बंद होण्यास** : भुईतरवडाचें चूर्ण दीड माशाप्रमाणें मधांत गोळ्या बांधून प्रतिदिवशीं तुपाशीं एक गोळी देणें, धातु बंद होऊन देह पुष्ट होईल.

८४७. **कानाचे पुवास** : चित्रकाची मुळी तेलांत ऊन करून तें तेल कानांत घालावें. कान बरा होईल.

८४८. **सन्निपातास** : चित्रकाची मुळी व वसूची मुळी उगाळून पोटांत देणें. दिवस तीन.

८४९. **प्रमेहावर** : बाभळीच्या शेंगांचा रस पावशेर, त्यांत साखर व जिरें १ टांकप्रमाणें घालून देणें. दिवस सात. **पथ्य**— हरभऱ्याची भाकर, तूप, वरण अळणी खाणें.

८५०. **दम्यास** : आंबेहळद पावशेर, ओंवा पावशेर, लसूण नऊ टांक, सेंधेलोण दीड टांक, एकत्र बारीक चूर्ण करून तीन बोटांची चिमूट घेणें. **पथ्य**— गव्हांची भाकर, मुगांचें वरण.

८५१. **अत्यंत पुष्टतेस** : जायफळ कोरून त्यांत कण्हेराच्या मुळीचा चीक भरून तोंडीं कीस भरून त्याला कणकीनें बोंचून दिव्याच्या ज्योतीवर भाजून नंतर तें जायफळ काढून बारीक मर्दून मधांत मिऱ्याप्रमाणें गोळ्या करणें. प्रत्येक दिवशीं सकाळीं एक गोळी मधांत घेणें. दिवस ७.

८५२. **डोळे आल्यास** : पांढरे वसूची मुळी, लवंग, चिकणसुपारी, अक्कलकारा, समभाग उगाळून डोळ्यांत अंजन करणें.

८५३. **भूतज्वरास** : (१) सूर्यफुलाची मुळी कानास बांधावी. (२) मुसळीकंद मधाशीं देणें. दिवस ३.

८५४. **पोटशूळास** : मुसळीकंद गरम पाण्याशीं घेणें.

८५५. **सिरमीस** : मुसळीकंद गाईच्या दुधाशीं घेणें.

८५६. **प्रमेहास** : अर्धा शेर दुधांत पांच बिबवे टाकून आहारावर ठेवावें. दाट झाल्यावर घेणें, दिवस एकवीस. बिबवे चांगले ठेंचून घालावेत. याजवर **पथ्य**— तांदुळाचा भात, तुरीचें वरण, तूप खाणें.

८५७. **शक्तिवृद्धीस** : गहूं रात्रीं भिजत घालून सकाळीं चीक काढणें. टांक ३, नाबद साखर टांक तीन, गाईचें दूध अच्छेर, क्षीर करून खाणें, दिवस चौदा. स्त्री वर्ज्य. महिने तीन.

८५८. **शीतज्वरास** : निरगुडीच्या कोंवळ्या पाल्याचा रस पावशेर, तीन पिंपळ्या, तीन मिरीं, तीन लसणाच्या पाकळ्या, एकत्र वांटून खाणें. दिवस तीन.

८५९. **मूळव्याधीस** : लहान चौदा केळीं वांटून त्यांत हिंगूळ तोळा एक घालून त्याच्या गोळ्या चौदा कराव्यात. चौदा दिवस सकाळच्या प्रहरीं खाणें.

८६०. **शक्तीस** : पिसोळ्याची मुळी रुकाभार आणि रायपुरी साखर अशीं एकत्र करून घेणें.

८६१. **पालीचे व सरडाचे विषास** : तुळशीचे पाल्याचा रस काढून देणें; दिवस तीन.

८६२. **खांडकास** : हरताळ निंबूरसांत उगाळून लावणें.

८६३. **केंस वाढायास** : माक्याचा रस केंसांस लावणें.

८६४. **संग्रहणीस** : डाळिंबाचें बीं, बोरीचें बीं, भुईतरवड एकत्र करून देणें. संग्रहणी जाईल.

८६५. **प्रमेहास** : तूप, रायपुरी साखर, भुईतरवड एकत्र करून देणें; **पथ्य**— मिष्टान्न खाणें.

८६६. **मुळव्याधीस** : भुईतरवड निंबाचे रसांत खाणें. दिवस ७.

८६७. **गजकर्णावर** : भुईतरवडाची मुळी गोमूत्रांत उगाळून लावावी.

८६८. **अमृतसंजीवन** : गुळवेलीचा पाला, दालचिनी, चित्रक, माका, तीन वर्षांचा गूळ, आंवळकटी, सुरवारी हिरडे, निरगुडीचा पाला, भुईतरवड, बेहेडा, अशीं सर्वत्र दहा टांकप्रमाणें घेऊन वस्त्रगाळ चूर्ण करून गुळांत गोळ्या तीनशे कराव्यात. प्रत्येक दिवशीं एक गोळी घेणें, पहिले मासीं कंठीं चावत जाणें, दुसरे मासीं आंग निक्के होय. तिसरे मासीं स्त्री भोग होय. चवथे मासीं कोड जाय. पांचवे मासीं शीत स्त्रीभोग होय. सहावे मासीं केश काळे होतील. सातवे मासीं सर्व रोग जाय. आठवे मासीं विसर पडे तो शुद्धीवर येईल. नववे मासीं दुरित जाय. दहावे मासीं स्वामिकार्य होय.

८६९. **पारम्याचे सर्व व्याधीस** : शुद्ध रसकापूर एक तोळा, मिरी बाबीस, लवंगा दहा, एकत्र चूर्ण करून मधांत गोळ्या साहा कराव्यात. दररोज सकाळीं १ संध्याकाळीं एक घेणें. दातांस लागूं न देणें. **पथ्य**— तांदुळाचा भात, वरण, अळणी खाणें. दिवस सहा.

८७०. **हाड्याव्रणावर मलम** : घोड्याचीं नखें तोळे तीन, माणसाचें हाडूक तोळे तीन, जाळलेलें रेशीम तोळे तीन, नासक्या तुपांत खलून शंभर वेळां पाण्यानें धुऊन मग दुःखास लावावें.

८७१. **सुजेवर** : घोड्याची लीद, माका, कांगुणी एकत्र बांधावी.

८७२. **पित्तास** : द्राक्षें, हिरडे, गूळ एकत्र करून खाणें. **कानांतून रक्त पडे त्यास** : अडुळशाचे पानाचा रस, मध घालून पिण्यास देणें. कान बरा होईल.

८७३. **रक्तप्रदरास** : कारलीची मुळी पाण्यांत वांटून पिण्यास देणें. राहील.

८७४. **अतिसारावर उपचार** : बाभळीच्या डिऱ्या शिळ्या पाण्यांत वांटून देणें. दिवस तीन अथवा सात.

८७५. **रक्त पडे त्यास** : तांदुळाचें पीठ दुधांत शिजवून मध घालून देणें. रक्त राहील.

८७६. **दम्यास** : भूतकेशीचें अर्धें पान देणें. दिवस सात.

८७७. **सर्प जाण्यास** : पुष्यार्कीं पित्तपापड्याची मुळी घरांत ठेवावी.

८७८. **विंचू डसल्यास** : पळसाचा चीक अथवा डीक डांसास लावणें.

८७९. **शक्तिवर्धक गुटिका** : अक्कलारा, सुंठ, लवंग, मिरीं, कंकोळ, जायफळ, खुरासनी ओंवा, रक्तचंदन, हीं प्रत्येक एकेक तोळा, अफू अर्धा तोळा, या सर्वांचें वस्त्रगाळ चूर्ण करून मधांत पाणी व चूर्ण घालून दोन दिवस मर्दन करून जोंधळ्याप्रमाणें गोळ्या कराव्यात. सकाळीं एक व संध्याकाळीं एक अशा दिवसांतून दोन गोळ्या घेणें. **पथ्य**— तिखट, तेलकट, आंबट, वर्ज्य.

८८०. **धातुस्राव होत असल्यास** : तीळ अर्धा शेर, चिनी साखर अर्धा शेर, मध पावशेर, एकत्र करून खाणें. दिवस सात.

८८१. **गरमीवर** : (१) वंशलोचन, गोरोचन, कलखापरी, पांढरा कात, कापूरचिनीचीं बोंडें, सफेद दळ, वेलची, सोनगेरू, धणे, कापूर, प्रत्येक एकेक तोळा घेऊन वस्त्रगाळ चूर्ण करून एकवीस पुड्या कराव्यात. एक पुडी दररोज खडीसाखरे-बरोबर घेणें. (२) संवदडीच्या पाल्याचा रस पावशेर, खडीसाखर एक तोळा खाणें. दिवस सात. **पथ्य**— जोंधळ्याची भाकर, तुरीचें वरण.

८८२. **शक्तिवृद्धीस** : आंवळीच्या मुळीची साल सावलींत वाळवून मध, तूप यांत तिचें चूर्ण घालून खलून आंवळ्याप्रमाणें गोळ्या कराव्या. नित्य एक गोळी खाणें, दिवस सात.

८८३. **प्रमेह रोगावर अनुभविक उपाय पहिला** : तिडीकप्रमेहावर पळसाचीं फुलें, लकडी रेवाचिनी, धणे, आंवळकठी, हीं प्रत्येक पाव तोळा घेऊन रात्रीं पावशेर पाण्यांत भिजत घालून सकाळचे प्रहरीं वस्त्रगाळ करून त्यांत छटाक खडीसाखर घालून सकाळीं पिणें. दिवस तीन. **पथ्य**– तेलकट, तिखट, आंबट, वर्ज्य.

८८४. **उपाय दुसरा** : वंशलोचन तोळे अडीच, जटामांसी तोळे अडीच, वेलची तोळे अडीच, खडीसाखर तोळे पांच, अशीं वजनवार घेऊन, सर्वांचें वस्त्रगाळ चूर्ण करून प्रत्येक वेळीं अर्धा तोळा घेणें. ते सकाळीं जेवणापूर्वी व रात्रीं निजतेवेळीं असे दिवस तीन घेणें.

८८५. **उपाय तिसरा** : रानभेंडीच्या मुळ्या, ओलें गोखरूं, पांढऱ्या जास्वंदीची, मुळी ह्या प्रत्येकाचा एक एक तोळा रस काढून त्यांत तीन मासे सब्जाचे बीं घालून तें वाटून वस्त्रगाळ करून एक तोळा मध पिण्यास देणें. दिवस तीन.

८८६. **उपाय चौथा** : वंशलोचन, वेलची, वावडिंग, नाकेशर, दारु-हळद, रेवाचिनी, समभाग कुटून वस्त्रगाळ करून प्रत्येक वेळीं अर्धा तोळा पाण्या-बरोबर अथवा पळसाचे डिंकाचे पाण्याबरोबर घेणें. दिवस तीन.

८८७. **प्रमेह उपाय पांचवा** : उंची अगर, जटामांसी, लकडी रेवाचिनी, वंशलोचन, जंगली वेलची, सब्जाचें बीं, एकत्र वस्त्रगाळ चूर्ण करून चंदनाचे तेलांत गोळ्या करून त्या दिवसांतून दोन अशा सात दिवस घेणें. पथ्य करणें.

८८८. **धुपणीवर उपाय पहिला** : गुलखैरूचीं फुलें पांच, (गांध्याकडे मिळतात.) एक तोळा खडीसाखर एकत्र वांटून घेणें. दिवस सात.

८८९. **उपाय दुसरा** : लकडी रेवाचिनी, ज्येष्ठमध, गोखरूं, लकडी पाषाण-भेद, धणे, बाळहिरडे, धमासा, शिलाजित, शतावरी एक एक तोळा घेऊन किंचित ओबड धोबड, कुटून त्यांचा चतुर्थांश काढा करून सकाळीं पावशेर देणें. संध्याकाळीं तसेंच काढा निकाढा करून देणें. थोडा मध घालून घेणें. दिवस ७ किंवा १२ घेणें.

८९०. **उपाय तिसरा** : १ तोळा दारुहळदीच्या काढ्यांत तीन मासे शिलाजित घालून सात दिवस देणें. निंबाचे सालीच्या रसांत जिरें घालून देणें. दिवस सात.

८९१ **उपचार चवथा** : धायटीचीं फुलें, धमासा, नागकेशर, वावडिंग, दारुहळद, लकडी रेवाचिनी, निशोत्तर, हरितकी, सफेत मुसळी, काळी मुसळी, हीं सर्व तीन तीन तोळे घेऊन, बाडदान (दालचिनीचीं फुलें) ७ तोळे घेऊन रात्रीं पाण्यांत भिजत घालून सकाळीं कढ येईपर्यंत शिजवावें. खालीं उतरून गाळून घेणें, नंतर पावशेर मध व पावशेर खडीसाखर घालून पुनः चुलीवर ठेवून एक कढ आल्यावर त्यांत वेलची, कंकोळ, वंशलोचन, खसखस, तीन तीन मासे बारीक चूर्ण त्यांत मिळविणें. नंतर प्रतिदिवशीं सकाळीं, तिसरे प्रहरीं, रात्रीं निजते वेळीं, असें

तीन वेळेस साडेतीन तोळे घेणें, म्हणजे दुर्धट धुपणी, तिडिकासहित रक्तप्रदर, ज्वरानें पीडित असलेला रोगी हुषार होतो.

८९२. **उपाय पाचवा** : शिरसाची साल दगडी खलबत्त्यांत दगडी बत्त्यानें कुटून तिचा रस एक तोळ्यापासून तीन तोळ्यांपर्यंत जसा जिरेल तसा तूप घालून देणें. दिवस सात. **पथ्य**—अळणी खाणें.

८९३. **धातुस्रावावर उपाय पहिला** : पळसाचा डिंक, सफेत मुसळी, काळी मुसळी, गोखरू, रुमामस्तकी, वंशलोचन, कंकोळ, शिलाजित, समभाग चूर्ण करून, चार तोळे गुलाबपाणी घेऊन त्यांत मर्दून गोळ्या बोराप्रमाणें कराव्या. त्या घेण्याची रीति— रात्रीं निजते वेळीं पावशेर दुधांत पंजाबी सालममिस्री दोन तोळे, खडीसाखर एक तोळा, तूप एक तोळा, असें शिजवून तयार झालें म्हणजे १ गोळी खाऊन वर तें दूध पिणें. याप्रमाणें सात दिवस करावें.

८९४. **उपाय दुसरा** : चिनीया गोंद, रुमामस्तकी, तालीमखाना, बीजबंद हीं समभाग वस्त्रगाळ चूर्ण करून अर्धा तोळा प्रत्येक दिवशीं घेणें.

८९५. **उपाय तिसरा** : गोखरूं, आंवळकठी, धमासा, बाळहिरडे, लकडी पाषाणभेद, बाहव्याचा मगज, ज्येष्ठमध समभाग घेऊन पाणी घालून अष्टमांश काढा करून रात्रीस एक वेळ असें सात दिवस घेणें.

८९६. **उपाय चौथा** : चोपचिनी, पिस्तेमगज, बदामाचा मगज, कबाब-चिनी, गोखरूं, जायफळ, वंशलोचन, बाफळी, शिलाजित हीं एक एक तोळा घेऊन तसेंच कवच-बीं पावशेर, खडीसाखर अच्छेर, गव्हाचें सत्त्व साडेतीन तोळे, या सर्वांचें एकत्र चूर्ण करून मधांत चांगलें मर्दन करून प्रत्येक वेळेस अर्धा तोळा घेणें. **पथ्य**—मैथुन वर्ज्य.

८९७ **उपाय पाचवा** : ज्येष्ठमध, गोखरूं, रेवाचिनी, शिलाजित, अक्कल-कारा, वेलची, सर्वांचें वस्त्रगाळ चूर्ण करून त्याबरोबर खडीसाखर घालून रात्रीं निजते वेळेस तीन मासे घेणें. असे दिवस सात घेणें.

८९८. **नपुंसकत्वावर उपाय पहिला** : तालिमखाना, बीजबंद, खैर, चित्रक, आस्कंद, चिनीया नोंद, दालचिनी, जायपत्री, जायफळ, लवंगा, वेलची, कबाबचिनी, गोखरूं, तालीसपत्र, तेजाना, बापुडी, मिरीं, पिंपळी, सफेत मुसळी, जंगली उडीद, शतावरी, अजमोदा हीं सर्व दीड दीड तोळा घेऊन सर्वांचें वस्त्रगाळ चूर्ण करून जवाचें पीठ दीडशेर घेऊन गाईच्या तुपांत भाजून त्यामध्यें तें वस्त्रगाळ चूर्ण मिळवून दीड शेर खडीसाखरेचा पाक करून, त्या पाकांत तें सगळें कालवून चांगलें मर्दून नऊ टांक प्रमाणें लाडू बांधावे. कल्हई केलेल्या अगर कांचेच्या भांड्यांत ठेवावें. तें घेण्याचें प्रमाण— दररोज सकाळीं एक लाडू खाऊन गाईचें अच्छेर दूध घेणें, आणि घाम येईपर्यंत व्यायाम करावा. दिवस एकवीस.

८९९. **उपाय दुसरा :** रात्रीं एक मूठ उडीद पाण्यांत भिजत घालून सकाळीं वरील साल सोलून, काढून, धुऊन अच्छेर दूध घेऊन त्यांत थोडे उडीद बारीक वांटून, बाकी राहिलेले दुधांत कालवून जायफळ, जायपत्री, लवंग, केशर, वेलची, हीं सर्व अर्धा माशाप्रमाणें, पंजाबी सालंमिश्रीची भुकी दीड तोळा, सर्व एकत्र करून दुधांत टाकून पक्क्या कोळशाचे शेगडीवर, एक दोन कढ आल्यावर ढवळीत असावें. गरम थोडें आहे तोंच घेणें. दिवस १४ **पथ्य**– करावें.

९००. **उपाय तिसरा :** शिलाजित, जायफळ, वेलची, लवंगा, काळे तीळ, काळी मुसळी, सफेद मुसळी, समभाग घेऊन कण्हेराच्या मुळ्याचे रसांत बुडेइतकें एक अहोरात्र ठेवावें. दुसरे दिवशीं गरम पाण्यानें धुऊन बारीक वांटून दीड तोळा सिंगरूफ घालून मधांत कालवून वाटाण्याप्रमाणें गोळ्या कराव्यात. सकाळीं एक एक गोळी घेऊन वर पावशेर दुधांत खडीसाखर व तूप घालून पिणें. बरें होय. ४२ दिवस.

९०१. **अशक्तता दूर होण्यास, उपाय पहिला :** कवचबीज पावशेर, अक्कलकारा पांच तोळे, गोखरू पांच तोळे, बीजबंद पांच तोळे, पंजाबी सालंमिश्री पांच तोळे, जवाचें पीठ अच्छेर, त्रिफळा तोळे तीन, आस्कंद तोळा एक, शतावरी तोळा एक, त्रिकटू तीन तोळे, ज्येष्ठमध एक तोळा, शिलाजित एक तोळा, धणे एक तोळा, कुटकी एक तोळा, दालचिनी एक तोळा, जायफळ एक तोळा, बदाम एक तोळा, काजू तीन तोळे, वेलची तीन तोळे, धमासा तीन तोळे, तवकीर तीन तोळे, वंशलोचन सात तोळे, या सर्वांचें बारीक चूर्ण करून पांढऱ्या उसाचा गूळ अडीच शेर घेऊन त्याचा पाक करून त्यांत वरील जिनसांचें वस्त्रगाळ चूर्ण घालून मर्दून मर्दून एकजीव करावा. किंचित पातळें ठेवावा. तो पाक प्रतिदिवशीं सकाळ-संध्याकाळें मिळून नऊ नऊ टांक घेत जाणें म्हणजे अरुचि दूर होते. जठराग्नि प्रदीप्त होऊन अन्नाचें पचन होतें. शरीर पुष्ट होतें.

९०२. **उपाय दुसरा :** खडीसाखर, दालचिनी, बदाम-मगज, ज्येष्ठमध, सफेत गुंजेचें मूळ, काळी मुसळी, पंजाबी सालममिश्री, कवचबीज, चोपचिनी हीं प्रत्येक साडेतीन तोळे, तीन तोळे पळसाचा डिंक, अच्छेर गाईच्या तुपांत खलून तळून बारीक कुटून तयार करावा. नंतर जवांचें किंवा काळ्या हरभऱ्यांचें पीठ गाईच्या तुपांत परतून पक्के दोन शेर बनारसी साखरेचा पाक करून, त्या पाकांत सदरहू पीठ, त्या डिंकाची भुकटी व वरील औषधांचें चूर्ण मिळवून घोटून घट्ट होत आलें म्हणजे खालीं उतरून त्यामध्यें पिंपळी, सुंठ, पांढरीं मिरीं हीं एक एक तोळा, उंची केशर अर्धा तोळा, हीं बारीक करून पाकावर टाकून अंमळ थंड झाल्यावर एक तोळा चांदीचा वर्ख त्या पाकावर बसवून तो पाक दिवसा (सकाळीं) अडीच तोळे व संध्याकाळीं अडीच तोळे याप्रमाणें औषध खाणें. **पथ्य**– तेलकट, आंबट, वातुळ, शिळें अन्न आणि स्त्रीसंग हीं वर्ज्य करावींत.

९०३. **उपाय तिसरा** : त्रिकटू, शतावरी, गोखरू, ज्येष्ठमध, अक्कलकारा, दालचिनी, कवचबीज, तालीमखाना, रुमामस्तकी, त्रिफळा, रास्ना, कुटकी, तेजबळ, धमासा, ओंवा, जिरें, खुरासनी ओंवा, सफेत मुसळी, काळी मुसळी, तेजाना, कंकोळ, नाकेशर, वावडिंग, लकडीपाषाणभेद, वायकुंभा हीं औषधें प्रत्येक अर्धा अर्धा तोळा घेऊन वस्त्रगाळ चूर्ण करून समसमान खडीसाखर मिश्रित करून प्रतिदिवशीं एक एक तोळा चूर्ण गाईच्या पावशेर दुधांत टाकून सकाळचे प्रहरीं घेत जाणें. याप्रमाणें चवदा दिवस घेणें. घेतलें असतां शरीरांतील गरमी, हाडीज्वर, कडकी इत्यादी जाऊन रक्त शुद्ध होतें. जठराग्नी प्रदीप्त होतो. अन्नाचें पचन होऊन मलशुद्धि साफ होते, आणि शरीरांत उत्तम प्रकारें शक्ति येऊन हुशारी येते. **पथ्य**— दहीं, उडीद, केळ, तेलकट, आंबट, तिखट हीं वर्ज्य असावींत.

९०४. **उपाय चवथा** : बंगाली तांबड्या साळीचें पीठ, अच्छेर गाईचें तूप, अपूट तिळाचें तेल तीन तोळे, गूळ अच्छेर, दालचिनी, वेलची, मैदालकडी, गजपिंपळी, तेजबळ, पिंपळी, पिंपळमूळ, जायफळ, वंशलोचन, जटामांसी, चारोळी, बदाम, पिस्ते, अक्रोड, सफेत मुसळी, काळी मुसळी, खसखस, खुरासनी ओंवा, जिरें, बडीशेप, शतावरी, कंकोळ, पांढरा चंदन हीं प्रत्येक पाव पाव तोळा घेऊन व मध पावशेर, याप्रमाणें सर्व तयार करून, प्रथम साळीचें पीठ तुपांत चांगलें भाजून, गुळाचा पाक करून त्या पाकांत तेल मिळवून नंतर वरील औषधांचें केलेलें चूर्ण मिळवून एकत्र घोटावें. मागून मध सोडावा आणि थोडें हालवून काढून घेणें. प्रति दिवशीं निजते-वेळीं सुमारें तीन तीन तोळे खात जाणें, म्हणजे शरीर रोगरहित होऊन अशक्तता जाऊन उत्तम प्रकारें शक्ति येते. यांस **पथ्य**— मैथुन वर्ज्य.

९०५. **उपाय पांचवा** : (१) प्रति दिवशीं अर्धा तोळा ज्येष्ठमधाचें चूर्ण दुधांत पिणें, किंवा मैदालकडी, काळी मुसळी, सफेत मुसळी, यांचें चूर्ण एक तोळा दोन्ही वेळां मिळून गाईच्या गरम दुधांत चवदा दिवस घेतलें असतां शरीर उत्तम प्रकारचें सशक्त होऊन पुष्टता प्राप्त होते. आणि त्यायोगें वीर्यवृद्धि होते. थकवा येत नाहीं. (२) गुळवेलीचें सत्त्व, गोखरू, कवचबीज, शतावरी, पंजाबी, सालममिश्री, शिलाजित हीं औषधें समभाग घेऊन दररोज मध व तूप यांत मिश्रित करून सात दिवस घेणें. म्हणजे शरीरांतील अशक्तता, आळस व अस्वस्थपणा जाऊन धातुवृद्धि होते.

प्रासादिक सिद्ध औषधें

१. **खापरसूतशोधन** : (१) खापरसूत (ही एक जस्तासारखी धातू आहे.) तोळा १ याचा रस करून त्यांत नवसागराचें पीठ मासा १ घालून घोटावें. मग शेणाचा रस काढून त्यांत विझवावें. याप्रमाणें ७ वेळ विझवावें म्हणजे शुद्ध होतें. (२) खापरसुताचा रस करून कुमारी-रसांत २१ वेळ विझवावा म्हणजे शुद्ध होतें.

२. **मेणमुद्रा : पहिला प्रकार** : गुंजा अर्धा शेर, टरफलें सोलून भिजत घालाव्या. मग अजाचें काळीज तोळे ६, लोहकीट तोळे ६, ही तिन्हीं एकत्र करून, त्यामध्यें मेण मासा १ घालावें. एकत्र खल तीन दिवस करावा. ही मुद्रा जळयंत्राचे संधीस लावून सुकूं द्यावी. दिव्याचे ज्योतीनें सुकवावी. **दुसरा प्रकार** : शिरसेल तेल, मेण, हीं हंडींत घालून अग्नीवर ठेवावीं. तेल नाहींसें होऊन गोळा राहिला म्हणजे खलावा. त्याचा जळयंत्रास संधिलेप करावा.

३. **वज्रमुद्रा** : (१) जुनी काळी वीट घेऊन वस्त्रगाळ करावी. त्यासमान अजाचें काळीज घालून ४ प्रहर खलावें. नंतर ही मुद्रा करावी. (२) गुग्गुळ २ दिवस भिजूं घालावा. नंतर कागद व गुग्गुळ २ प्रहरपर्यंत खलून त्याची मुद्रा करावी.

४. **अमीरी खिचडी** : ही एक औषधीच आहे. पूर्वीं सरदार, श्रीमान, राजे-लोक वगैरे लोकांत हिचा प्रसार असे, पण अलीकडे आमच्या इतर दुर्दैवाप्रमाणें हिचें-देखील आमच्यांत दुर्भिक्ष्य झालें आहे. हिची कृति पुढें लिहिल्याप्रमाणें– एक पात्र घेऊन तें चुलीवर ठेवावें व त्यांत २ तोळे तूप घालावें, आणि त्यांत २ लवंगा टाकाव्या. लवंगा लाल होऊन सुगंध येऊं लागला म्हणजे खिचडीच्या अजमासानें त्यांत पाणी घालून वर झांकण असूं द्यावें, नंतर दुसरें एक पात्र चुलीवर ठेवून त्यांत २ तोळे तूप घालून २ वेलदोड्यांतील दाणे त्यांत टाकावे. नंतर पहिल्या भांड्यांतील पाणी या दुसऱ्या भांड्यांत टाकून तें दुसरें भांडें खालीं उतरून त्यावर झांकण ठेवावें. नंतर तिसरें एक भांडें चुलीवर चढवावें. त्यांत २ तोळे तूप, १ गुंज कापूर, १ मासा केशर, १ मासा सुगंधी कचोरा, १ मासा अंबर, अर्धं गुंज कस्तुरी, या जिनसा घालून सुवास येतांच दुसऱ्या पात्रांतील पाणी या पात्रांत टाकावें. नंतर हें तिसरेंहि पात्र खालीं उतरून तें पाणी गाळून घ्यावें. यापूर्वीं पक्का शेर जुने तांदूळ व अर्धा शेर मुगाची सोलीव डाळ अशी खिचडी, पाण्यानें चांगली धुऊन ठेवावी. नंतर वर सांगितलेल्या गाळून ठेवलेल्या पाण्यांत ती खिचडी टाकावी, व त्यांत १० लवंगा, २० वेलदोडे, ४० मिऱ्यांची भुकटी, सांबरलोण अजमासें ३ तोळे, येणेंप्रमाणें टाकावें. खिचडींत टाकलेले पाणी, खिचडी त्यांत सर्व बुडून न जाईल इतकें असावें. नंतर १५ तोळे दुधाची मलई (साय), १५ तोळे तूप, ४ गुंजा जायफळ, २ गुंजा जायपत्री, यांचें चूर्ण करून त्यांत टाकावें. आणि त्यांतच २ तोळे गुलाबाचा अर्क

टाकावा. फार गर्मीच्या दिवसांत केवड्याचें पाणी टाकावें. ज्या भांड्यांत खिचडी टाकली असेल त्यास बाहेरून माती लावावी, व तोंडावर झांकणी ठेवून तिच्या कडा कणीक लावून बंदोबस्तानें बुजवून टाकाव्या. बाहेर वाफ अगदीं जाऊं देऊं नये. कदाचित् वाफ जाऊं लागली तर पुनः कणीक लावावी. नंतर तें भांडें, प्रज्वलित कोळशाच्या अग्नीवर ठेवावें. दीड तासांत खिचडी तयार होईल; ती उतरून घ्यावी. ही खिचडी बलकर, धातुवर्धक, वात व मोहनाशक, पित्तशामक रुचिकर, दीपन, पाचन आणि मनास आल्हादकारक अशी आहे.

५. हयारिचूर्ण : कुष्ठादिकांवर—

मुस्ता शिखिग्रीव विडंगराल मनःशिला तालक सीस लोध्रम् ॥
कांपिल्लिकं गंधक कुष्ठ दार्वी हयारि चूर्णानि तिलतैललेपात् ॥
व्रणानि कुष्ठानि च मंडलानि विचर्चिका दद्रु निहंति पामा ॥
व्रणं सकुष्ठं गजचर्मयुक्तं सुवर्णवर्णं कुरुते च देहम् ॥

अर्थ : नागरमोथे, मोरचुत, वावडिंग, राळ, मनशील, हरताळ, शेंदूर, लोध्र, कपिला, गंधक, कोष्ठ, दारुहळद यांचें चूर्ण करून तें तिळाचे तेलांत कालवून त्याचा लेप करावा, म्हणजे व्रण, कुष्ठें, मंडलकुष्ठ, विचर्चिका (बारीक फोडांची खरूज), दद्रु, पामा, गजचर्म इत्यादि कुष्ठें दूर होऊन सुवर्णाप्रमाणें देहाची कांति होते.

६. अष्टादश कुष्ठांवर उपचार : बिबवे २००, तेल तोळे १२०० हीं लोहपात्रांत एकत्र पचन करावीं. बिबवे फुटल्यावर पात्र खालीं उतरून, त्यांत पाडळी-मूळ, मेढशिंगीसाल, अंकोलसाल, बहाव्याचा मगज; करंजसाल, निशोत्तर, दंतीमूळ, चित्रकमूळ, कडू जिरें, गंधक, अतिविष, हिरडेदळ, पादेलोण, बिडलोण, सैंधव, बांगडखार, देवदार, हीं चार चार तोळे; बचनाग, त्रिकटु हीं दोन दोन तोळे; भांग ४० तोळे, हिराकस ४० तोळे; रुईचा चीक ८ तोळे घालून तें तेल उन्हांत ठेवावें व त्यास निंबाच्या काष्ठानें घोंटून, तें अंगास लावावें व उन्हांत ४ घटका बसावें. याप्रमाणें २१ दिवस करावें; म्हणजे अष्टादश कुष्ठांचा नाश होतो.

७. अष्टादशकुष्ठ : अशक्त प्रकृतीनें उत्पन्न होणाऱ्या जीर्णज्वर, गर्मी, पित्तविकार, विस्मृति, धातुक्षीणता, आळस, शरीरावरील पिंवळटी, इत्यादि विकारांवर सर्वसाधारण उपाय— कडूनिंबाच्या मुळ्या, दारुहळद, ज्येष्ठीमध, कमळ-कांकड्याचा गीर, कंकोळ, दवणा, लवंग, केशर, अगर, खसखस, नागरमोथा, वेलची, दालचिनी, ब्राह्मी, वेखंड, वाळा, तांबडा किंवा पांढरा चंदन, रुमामस्तकी, गांठीहळद, हे सर्व जिन्नस समभाग घेऊन एक रात्र— सर्व जिनसांच्या पांचपट पाण्यांत भिजत घालावें, आणि सकाळीं ते जिन्नस त्याच पाण्यांत चटणीसारखे बारीक वांटून एक मोठ्या कल्हईच्या भांड्यांत घालावें. व त्यांत पाण्याच्या दसपट उत्तम तिळाचें तेल, त्या तेलाच्या निमें उंची एरंडेल तेल, त्याच्या निमें चंदनी तेल, व तितकेंच गुलाबपाणी,

असें घालून, तें भांडें चुलीवर ठेवून अग्नि लावावा. पाणी आटल्यावर चुलीवरून उतरून घेऊन, थंड झाल्यावर तें तेल बाटलींत भरून ठेवावें. हें दररोज सर्व शरीरास लावल्यानें शरीरकांति सर्वोत्कृष्ट होऊन, वर दर्शविलेले रोग, एक-दीड महिन्याच्या मर्दनानें निर्मूल होतात. तेलाच्या क्रियेंत– विशेष अग्नि, किंवा तेल करपणें, वगैरेकडे विशेष लक्ष देऊन केल्यास गुणांत कमतरता होत नाहीं. तसेंच औषधीहि मिळतील तितक्या ताज्या असून, शोधपूर्वक मिळविलेल्या असाव्या. कोणी अनुभव कळविल्यास यांत आणखी सुधारणा करतां येईल.

८. गर्भिणीच्या अतिसारादिकांवर—

ऱ्हीबेरारलुरक्तचंदनवचाधान्याकवत्सादिषु ।
मुस्तोशीरयवासपर्पटविषाक्काथं पिबेद्गर्भिणी ॥
नानावर्णरुजातिसारकगदे रक्तस्रुतौ वा ज्वरे ।
योगोयं मुनिभिः पुरा निगदितः स्तन्यामये संमतः ॥

अर्थ : वाळा, टेटू, रक्तचंदन, वेखंड, धणे, कुड्याच्या मुळांची साल, नागरमोथे, काळा वाळा, धमासा, पित्तपापडा, अतिविष यांचा काढा करून तो द्यावा; म्हणजे गर्भिणीचे नाना प्रकारचे अतिसार, रक्तस्राव, ज्वर व स्तन्यविकार हे दूर होतात.

९. दशांगपिंडी : कंडू, दद्रू, कुष्ट, इत्यादिकांवर—

कार्पासास्थिहरिद्रुदारुरजनीवातारितैलंगदम्–
गोपालीमिशिमेथिकावरुणजंबीजंयवासैंधवैः ॥
एभिः सिद्ध–महौषधं निगदितं पिंडीदशांगाभिधा ॥
कंडूदद्रुविचर्चिकादिशमनं सर्वे व्रणं नाशनं ॥

अर्थ : सरक्यांचा मगज, हळद, दारुहळद, कोष्ठ, गोरखचिंचेचा मगज, शोपा, मेथ्या, वायवर्णाचें बीज, जव व सैंधव यांचें चूर्ण करून तें एरंडेलांत कालवून त्याचा लेप करावा; म्हणजे कंडू, दद्रू, विचर्चिका आदिकरून कुष्ठरोग व व्रणरोग यांचा नाश होतो.

१०. लवंगादि क्वाथ : शीतज्वरादिकांवर—

लवंगक्षुद्रादशमूलभार्गीमहौषधंपुष्करमूलब्राह्मी– ॥
भूनिंबमुस्तागजापिप्पलीनां श्रृंगीसठीचित्रकत्रायमाणाः ॥
रास्ना वचा पिप्पलिदेवदारुमूलंकणावत्सकवासकानि ॥
प्रत्यक्क् समांशं सकषाययुक्तं एषो कृतं शीतविनाशनाय ॥
वातभ्रमं शून्यमपस्मरं च त्रिदोषहन्यात् किल सन्निपाते ॥
सर्वेषु वातेषु च मौन्यते च क्काथो लवंगादिषु नामधेयः ॥

अर्थ : लवंग, रिंगणी, दशमूल (सालवण, पिठवण, रिंगणी, डोरली, गोखरूं, बेल, ऐरण, टेंटू, शिवण, पाडळ), भारंगमूळ, सुंठ, पुष्करमूळ, ब्राह्मी, किराईत, नागरमोथे, गजपिंपळी, काकडशिंगी, कचोरा, चित्रक, त्रायमाण, रास्ना, वेखंड, पिंपळी, देवदार, पिंपळमूळ, पिंपळी, कुड्याच्या मूळाची साल, अडुळसा हीं समभाग घेऊन यांचा काढा करून तो द्यावा; म्हणजे शीतज्वर, वातभ्रम, शून्यता, अपस्मार, त्रिदोषज्वर, मौनता व सर्व वातविकार दूर होतात.

११. डोळ्यांतील फुलें जाण्यास उपचार—

तुत्थं च काचंच समुद्रफेनं मनःशिला माक्षिक लोहचूर्णं ॥
नारं कपालं सहकुक्कुटांडमाजन्मजातं विनिहंति पुष्पं ॥

अर्थ : मोरचूत, कांच (कांचभस्म), समुद्रफेस, मनशीळ, सुवर्णमाक्षिक, लोहचूर; मनुष्याच्या कपाळरोटीचा तुकडा व कोंबडीच्या अंड्याचीं टरफलें, हीं समभाग घेऊन, त्यांचा (शेळीच्या मूत्रांत) खल करून ठेवावा. ही गोळी पाण्यांत उगाळून अंजन करावें; म्हणजे जन्माचेंहि फूल दूर होतें.

१२. गर्मीवर ससशालीवटी : शुद्ध पारा व कात अर्धा अर्धा तोळा, अक्कलकारा १ तोळा, मध १॥ तोळा, यांचें मर्दन करून पारा मिळून गेल्यावर ·|· तोळ्याची गोळी बांधून द्यावी; म्हणजे सात दिवसांत गर्मी दूर होते. **पथ्य**—अळणी.

१३. अंगांत भिनलेली गर्मी निघावयास : सबज्याचें बीं व मोगली बेदाणा तोळा घेऊन, तुपांत परतून दुधांत खीर करून खावी. याप्रमाणें १४ दिवस करावें, म्हणजे अंगांत भिनलेली गर्मी निघून जाते.

१४. विंचवाचे दंशावर : तुरटीच्या पाण्याचे थेंब डोळ्यांत घालावे म्हणून प्रसिद्ध केलें, त्याप्रमाणें अनुभव घेऊन पाहिला. २–३ इसमांस सदरहू औषधापासून ताबडतोब गुण आला.

१५. सर्पदंशावर : (१) सिलोनांत एकानें केला. त्यांत दंशाचे जागीं कागदी निंबाचा रस भरून व दंशाभोंवतीं जळवा लावून, आणि तिसरे दिवशीं रेचक देऊन मनुष्य साफ बरा केला. (२) दुसरा एक उपाय, आम्ही एका वडाऱ्याकडून मोठ्या सायासानें समजून घेतलेला अनुभविक आहे. जुटी नांवाच्या वनस्पतीची मुळी पाण्यांत उगाळून दंशावर, दंशिताच्या डोळ्यांत व जिभेवर चोळावी. २–४ वेळां असें केल्यानें गुण येतो. ही वनस्पती आणून दुधांत शिजवून ठेवावी व वाटेल तेव्हां उपयोग करावा. दरवर्षीं या मुळीस दुधांत शिजवून ठेवल्यास बरें. रजस्वलादि स्पर्श हींस उपयोगी नाहींत असें तो म्हणतो. विहाडतळ्याच्या मागें डोंगराच्या अंगास ही वनस्पती आहे असा शोध लागतो. अनुभव कोणी कळविल्यास फार उत्तम !

१६. **उचकीवर उपाय** : मद्रास येथील एक डॉक्टर असें म्हणतो कीं, पुढील उपाय उचकीवर हटकून लागू पडतो : दोन्ही कानांत बोटें घालून कान हळूच दाबावे; आणि अशा रीतीनें कान दाबले असतां पाण्याचे लहान लहान पांच सहा घोट गिळावे. पाण्याचें भांडें, दुसऱ्या कोणाकडून तरी आपल्या तोंडाशीं धरवावें. स्वतःच तजवीज करतां आल्यास बरेंच ! उचकी या उपायानें ताबडतोब बंद होते.

तसेंच एक वैद्य म्हणतो, मधुमक्षिकेकडून दंश करवून घेतल्यानें वातव्याधि जाते.

१७. **वशांतील सुजेवर** : बाहव्याची मुळी वांटून कागदास लावून वाळवून, त्याची विडी करून ओढावी. कांहीं वेळानें गुण समजूं लागतो. नंतर तीन तासांनीं पुन्हां ओढावी. पुढें १२–१२ तासांनीं ओढीत जावी.

१८. **काविळीस** : चांगल्या पक्क्या दुधांत किंचित् चुना घालून सकाळीं व संध्याकाळीं द्यावा. अदमोरें दहीं व भात खावा. याप्रमाणें तीन दिवस पथ्यानें वागून औषध घ्यावें. म्हणजे गुण येतो असें एक जणानें कळविलें आहे. गुण पाहून कोणी कळविल्यास उत्तम होईल.

१९. **नेत्रकुसुमाकर** : सुवर्णमाक्षिक किंवा उत्तम कंदाहारा सुर्मा, भीमसेनी कापूर, उत्तम केशर, छिद्राशिवाय मोती, उत्तम पोंवळीं, खरी कळखापरी, हीं औषधें समभाग घेऊन, त्याचे समभाग ममिरा घालून सर्व एकत्र खलून तो सुर्मा डोळ्यांत घातल्यानें सर्व नेत्रविकारांवर गुण येतो. आणि म्हणूनच याच्या गुणावरून यास 'नेत्रकुसुमाकर' हें अन्वर्थ नांव दिलें आहे. यांतील औषधांपैकीं खरा **ममिरा** मिळत नाहीं, आणि म्हणून याचा अनुभव घेण्याचा प्रसंग येणें कठीण पडतें.

२०. **नारूवर** : चिलू जातीच्या घोळूची दामटी करून व तिच्यामध्यें रानशेणी गोवऱ्यांची थोडी राख घालून व तीच थोडी नारूवर टाकून पट्टी बांधावी. तीन दिवस सोडूं नये. यामुळें नारू बसतो; किंवा निचरा होऊन बरें होतें. खाज सुटल्यास शेकावें.

२१. **रक्तपित्तीवर** : बिलायताची मुळी व कोरफडाचा गीर, दोन्ही समभाग मिळून १ तोळा घेऊन गाईच्या पावशेर दुधांत वांटून, दिवसांतून दोन वेळ घेत जावें. तसेंच माकळीच्या कवचाचें चूर्ण करून, उसाचे इनागरींत आंगास लावीत जावें. सहा महिने घेतल्यानें गुण येतो.

२२. **खोकला, क्षय व दम्यास औषध** : अडुळशाचीं वाळलेलीं पानें, रिंगणमूळ, अक्कलकाऱ्याचीं बोंडें, तिधारी निवडुंगाचें फूल, हीं सर्व समभाग घेऊन वस्त्रगाळ चूर्ण करावें, मध्यम प्रकृतीस दिवसांतून एक वेळ चवलीभार मधांत द्यावें. व फारच प्रकृति बिघडली असल्यास सकाळ–संध्याकाळीं देणें. दूध फार खाऊं नये, तेलकट, आंबट, वावडें हें वर्ज्य.

२३. **महामारी, अपचन यांवर** : कागदी निंबाचा रस, पाणी न पडतां एक शेर काढून, व त्यांत चांगली बनारसी साखर दीडपाव घालून चुलीवर ठेवणें.

खालीं उन्हाळीच्या लांकडांचा जाळ लावून, एकतारी पाक झाल्यावर बाटलींत भरून ठेवणें. तसेंच पांढऱ्या कांद्याचा रसहि— लोखंड न लावतां— काढून बाटलींत भरून ठेवावा. देतेवेळीं १ तोळा पाक व अर्धा तोळा रस घेऊन, एकत्र करून घेत जावें. दिवसांतून तीन वेळ घेणें.

२४. **पूप्रमेहावर :** नारळीच्या मुळाच्या पावशेर रसांत जिरें नऊ टांक व खडीसाखर घालून दिवसांतून दोन वेळ घेणें.

२५. **आमांश–अतिसारावर :** वासनवेला (खडीवेल) ची मुळी पाण्यांत उगाळून दिवसांतून दोन वेळां तोळा तोळा घेत जाणें.

२६. **नळगुद किंवा सर्वांगसुजेवर :** आघाड्याची धुरी द्यावी. व म्हशीच्या ताज्या शेणाचा रस एक तोळा, दिवसांतून १ वेळ द्यावा. तेलकट, आंबट, तिखट वर्ज्य.

२७. **धातुपौष्टिक :**

जातीफलं सैंधवहिंगुलानां वराटशुंठीविषहेमबीजम् ।
सपिप्पलीनां समभागयुक्तं जंबीरनीरेणच मर्दनीयम् ॥
खंडाल्पवीर्यो बहुमूत्रमेही स्त्रीणां शतं गच्छति कामतुल्यः ॥

अर्थ : जायफळ, सेंदेलोण, हिंगूळ, बचनाग व धोतऱ्याच्या बिया शुद्ध करून सागरगोट्याचा मगज, सुंठ, पिंपळी हीं सर्व औषधें समभाग घेऊन, जांभळाच्या रसांत ७ दिवस खल करून गोळ्या दीड दीड मासे वजनाच्या बांधाव्या व सकाळ–संध्याकाळीं एकेक गोळी दूध–खडीसाखरेशीं द्यावी. यानें अत्यंत शक्ति येऊन, बहुमूत्रमेह बरा होतो.

२८. **कुष्ठास :** (१) भुईतरवड, कुडा, बहावा, मुंडी, माका, निंबाचीं पंचांगें, कोष्ठ, बांवची, हीं समभाग घेऊन चूर्ण करावें व उष्णोदकाशीं घ्यावें. कुष्ठें नासतील. दिवस ३०. (२) त्रिफला, त्रिकटु, चित्रक, मुस्ता, वावडिंग, वचा, समभाग घेऊन चूर्ण करून ऊन पाण्याशीं १ तोळा रात्रीं घेणें. १८ कुष्ठें नासतील. वलीपलित जाईल. (३) वावडिंग, त्रिफला, चव्य, वचा, द्राक्षा, मंडुकी, पिंपळी, बिबवा, शंखपुष्पी, बांवची, माका, समभाग चूर्ण करावें. कांजींत वांटून अंगास लावावें. १८ कुष्ठें नासतील.

२९. **श्वेतकुष्ठास :** (१) हळदी, कृष्णकनक, आघाडा, हे जाळून, त्यांचा खार काढावा. व त्यांचे दुप्पट सज्जीखार घालून, लोहपात्रांत खलून लावीत जावें. (२) बांवची, गोमूत्रांत २१ दिवस भिजत घालून मग सुकविणें. नंतर कांडून, कोंडा टाकून बाकीपैकीं अर्धा तोळा ७ दिवस गोमूत्रांत घेणें. (३) वेखंड, कोष्ठ, निंबाचीं पानें, हीं सर्व समभाग घेऊन, कांजींत वांटून लेप करावा.

३०. **शिसें :** शिसें कांहीं दिवस जर आंगावर नेहमीं राहिलें, तर त्या जागीं विषाराप्रमाणें पुरळ येतो असें एका डॉक्टराच्या अनुभवास आलें आहे. इतकें विषारी

शिसें आहे, तेव्हां भांड्यांना कल्हई देतांना कथिलामध्यें त्याची भेसळ करण्याची जी लबाडी होत असते, ती किती घातुक आहे हें यावरून लक्षांत येईल. कपड्या, वाडगे वगैरे कथलाचीं दहीं, दूध घेण्याचीं जीं भांडीं करितात, त्यांतसुद्धां लबाड लोक शिशाची भेसळ करीत असतात. याकरतां या बाबतींत चौकसबुद्धि ठेवावी. भांड्यांस कल्हई केल्यावर त्यांत शिशाचा अंश आहे कीं काय हें पाहण्याची सोपी युक्ति आहे. असें कल्हई केलेलें भांडें घेऊन, त्याच्या कल्हईवर एक स्वच्छ कपड्याची चिंधी घासावी. कल्हईंत शिसें असल्यास ती चिंधी काळी होते.

२१. **जीर्णज्वरावर :** अर्धे छटाक गोमूत्रांत मिऱ्याचे दाणे (शक्तिमानाप्रमाणें २ पासून ४ पर्यंत) घालून दररोज घ्यावें. याप्रमाणें कांहीं दिवस घेतलें असतां जीर्णज्वर जातो (यानें शौचास साफ होऊन व अन्नपचन होऊन, लौकरच गुण येईल.

२२. **नळ्युदास :** (१) निर्गुंडी रस घेऊन, त्यांत जिरें घालून घेणें, तीन दिवस अंगास लावावा. (२) निर्गुंडीचें बीं बिड्यांत ओढावें.

२३. **मदनमोहक पाक :** सफेत मुसळी, तालिमखाना, सुंठ, पिंपळीमूळ, पोस्त, आस्कंद हीं सर्व २–२ तोळे; गोखरूं ६, सालंमिश्री २, ससखस ६, बदाम तोळे ५, अगर १, जायफळ १, बळबीज १, लवंग १, दालचिनी २, मळिदा (रवा) शेर १, साखर शेर २, दुध अर्धा शेर, हीं सर्व मिळून लाडू बांधून घ्यावे.

२४. **औंव्याचा अर्क :** ओंवा शेर १ घेऊन शेळीच्या मुताचें पुट १ देऊन सुकवावा. मग माक्याच्या रसाचीं दहा पुटें द्यावीं व सुकवावा. मग कोऱ्या हंडींत रुईच्या पानाचे २ थर करून, त्यावर ओंवा घालावा. नंतर त्यावर वाटी ठेवावी. वाटीचे तोंडावर रुंद मडकें भरून ठेवावें. त्यांवर उडदाच्या पिठाचा लेप करून दम जाऊं देऊं नये. अग्नि १ प्रहर द्यावा. ओंवा भरलेल्या मडक्याच्या खालीं लहान भोंक पाडून त्या खालीं दुसरें एक मडकें ठेवावें; त्यांत अर्क उतरेल. मग अर्क घेऊन पानाचीं खावें. दिवस ८. आधीं कांहीं खाऊन मग अर्क घ्यावा; म्हणजे प्याहा, कास श्वास, जलोदर, संग्रहणी, ओकारी, पित्त इत्यादि बरें होतें.

२५. **केस काळे होण्यास :** बाभळीचा कोवळा पाला निंबाइतका; किंवा कोरफडाचा गीर १॥ तोळा, अथवा एक खोबऱ्याची वाटी; यांपैकी कोणंतेंहि एक सतत वर्षभर खाल्ल्यानें कधींहि केस पांढरे होणार नाहींत, व पांढरे झालेले काळे होतील असें एके ठिकाणीं लिहिलेलें आहे.

२६. **कथल्या गर्मीवर :** (१) शंखद्रवांत पारा घालावा, म्हणजे त्याचें भस्म होतें. तें वालप्रमाण गुळाबरोबर सकाळीं २ किंवा ७ दिवस घ्यावें. (२) पळसाच्या पानांच्या देठानें भस्म (२ गुंजाप्रमाण) सात दिवस घेतल्यानेंहि तोंड येऊन गर्मी बरी होते.

३७. **गळूं फुटण्यास** : जें गळूं फुटत नसेल त्यावर मध्यभागीं तुरीएवढी जागा ठेवून, बाजूनें उडदाचें पीठ घालावें, व मधल्या जाग्यावर ' शंखद्रव ' घालून एक प्रहरपर्यंत राहूं द्यावा; म्हणजे त्याला छिद्र पडून तें वाहूं लागतें.

३८. **विषूचिका, प्याहा, अग्निमांद्य, गुल्म, अजीर्ण, संग्रहणी, कास, श्वास, वातरोग** : या सर्वांवर सैंधव, लोणारखार व मीठ यांचें, मडक्यांत रुईच्या पानावर थरावर थर देऊन, तें लिंपून अग्निपुट द्यावें. नंतर भस्म काढून, त्यांत त्याच्या चौथा भाग— त्रिकटु (सुंठ, मिरें, पिंपळी), चित्रक, वावडिंग, हिंग यांचें चूर्ण घालून तें सर्व एकत्र करून ठेवावें; व जरूर लागेल तेव्हां शक्तिमानाप्रमाणें १, २ किंवा ३ गुंजा, ताकाबरोबर द्यावें; असें रसकुमुदिनी नांवाच्या एका फार जुनाट लेखी ग्रंथांत लिहिलेलें आहे. याचीं औषधें व क्रिया, यांवरून हें गुणकारक होईल असें वाटतें. अनुभव घेऊन कोणी कळविल्यास लोकोपयोग होईल.

३९. **डोळ्याचे तिडकेस** : गायीचें शेण ऊन करून डोळ्यांवर पिंडी बांधणें.

४०. **कृतीचें मेण** : ३० शेर मध, ५ शेर हळद, १० शेर मेण, ३ शेर राळ हें सर्व एकत्र कढवून वस्त्रावर ओतणें; म्हणजे मेण बनतें.

४१. **कृतीची साखर** : पांढऱ्या म्हशीच्या दुधांत खऱ्या राळ्याचे तांदूळ रांधून, ती खीर वाळवावी, व उखळांत कांडून वस्त्रगाळ करणें; म्हणजे साखर बनते.

४२. **ढेकूण न चावण्यास** : सोनचाफ्याचें फूल किंवा सूर्यफूल, बिछान्यांत घेऊन निजलें असतां ढेंकणाचा त्रास होत नाहीं.

४३. **डोळ्यांतील फूल जाण्यास** : हेळूची बी उभी धरून ती पाण्यांत उगाळून अंजन करावें; म्हणजे नवीन पडलेलें फूल त्वरित दूर होतें. हेळूचा वृक्ष कोंकणांत प्रसिद्ध आहे. यास उंबराएवढीं फळें येतात व तीं आंबट असतात. या फळास अळूं असेंहि म्हणतात.

४४. **डांग्या खोकल्यास** : (१) हा खोकला लहान मुलास होतो, व याचा फार जोर असतो. नेहमीं मूल मोठ्यानें " खो खो " अशा स्वरानें खोकत असतें. यावर वेळूची गांठ, सुंठ हीं उगाळून द्यावीं. (२) सतापाचा पाला गळ्यांत बांधावा. (३) उटकटारीचें मूळ गळ्यांत बांधावें.

४५. **तक्रपेय निषेध** :—

> नैव तक्रं क्षते दद्यान्नोष्णकाले न दुर्बले ॥
> न मूर्च्छाभ्रमदाहेषु न रोगे रक्तपैत्तिके ॥ १ ॥

अर्थ : क्षत म्हणजे व्रण ज्यास आहे त्यास, तसेंच उष्ण कालांत रोगी व दुर्बल मनुष्यास, आणि मूर्च्छा, भ्रम, दाह व रक्तपित्त या रोगांत ताकाचें सेवन करूं नये.

४६. **तक्रस्य गुणोत्कर्षः —**

न तक्रसेवी व्यथते कदाचिन्न तक्रदग्धाः प्रभवंति रोगाः ॥
यथासुराणाममृतं सुखाय तथा नराणां भुवि तक्रमाहुः ॥ १ ॥

अर्थ : नित्य ताकाचें सेवन करणाऱ्या मनुष्यास रोगाची बाधा क्वचितच होते. तक्रसेवनाच्या योगेंकरून मनुष्यास रोग उत्पन्न होत नाहींत. जसें देवांना अमृत हें सुखकारक आहे त्याप्रमाणेंच मनुष्यांस ताक हें अमृततुल्य आहे.

४७. **जलोदरास** : कंवडळीचें फळ आणून आडवें चिरून दोन भाग करावे. मग त्यांत हिराहिंग २ तोळे घालून दोन्ही फोडी सुतानें गुंडाळून वरून कणकीचा लेप द्यावा. त्यावर मातकापड करून रानशेणींत अग्नि द्यावा. भाजल्यावर तें फळ काढून वालप्रमाण भक्षित जावें.

४८. **ओकारी** : वडाचीं पिकलीं पानें आणून जाळून राख करून ती जुन्या गुळांत द्यावी. दिवस ३.

४९. **वीर्यवृद्धीस** : रुमामस्तकीचें ३ मासे चूर्ण साखरेशीं घेऊन वर दूध प्यावें. दिवस ७.

५०. **दुसरें** :

धात्री च पथ्या च विडंग-वन्हि शतावरी-गोक्षुरममृता च ॥
ज्येष्ठानुयुक्तं मधु-पिप्पलीषु प्रलेह्य रात्रौ घृतामिश्रितं च ॥
वपुस्थिरत्वं बहुवीर्यवृद्धिर्वेगं च वायुः श्रवणे वराहः ॥
सुवर्णदृष्टिः स्वरकिन्नरश्च बलेन भीमो गतिमान् बृहस्पतिः ॥

अर्थ : आंवळकठी, हिरडे, चित्रक, शतावरी, गोखरूं, गुळवेलीचें सत्त्व, ज्येष्ठमध, पिंपळी यांचें चूर्ण करून तें रात्रीं तूप व (खडीसाखर) यांत मिश्र करून भक्षीत जावें. म्हणजे वीर्यवृद्धि व बळ प्राप्त होऊन वायूप्रमाणें धांवण्याची शक्ति, डुकराप्रमाणें तीक्ष्ण कान, गरुडाप्रमाणें दृष्टि, किन्नराप्रमाणें स्वर, भीमाप्रमाणें बळ व बृहस्पतीप्रमाणें बुद्धि हीं प्राप्त होतात.

५१. **रक्तपित्तावर उपाय** : एक मातीचा डेरा घ्यावा, त्यांत एक शेर आंवळसर गंधक व डेरा भरेल इतक्या गाढवाच्या लेंड्या घेऊन, त्या दोन्हींची बारीक पूड करून त्यांनीं सर्व डेरा भरावा. डेरा गळ्यापर्यंत भरत आला म्हणजे त्यांत एक वाटी ठेवावी. नंतर त्या डेऱ्याचे तोंडावर एक धातूचें भांडें तपेल्याप्रमाणें उपडें घालावें, व या भांड्याचें तोंड डेऱ्याचे तोंडाचे आंत जाईल असें असावें. फट राहिल्यास चिकणमातीनें ती बुजवून टाकावी. मग डेरा चुलीवर ठेवून त्याखालीं मध्यम आंच लावावी, म्हणजे अर्क निघून, तो डेऱ्यांतील वाटींत पडेल. तो अर्क नित्य सकाळीं एक तोळा व सायंकाळीं एक तोळा, असा दिवसांतून दोन वेळा ४० दिवस-पर्यंत देत जावा, म्हणजे उत्तम फायदा होतो.

५२. आंव जाण्यास : चुन्याची निवळ, दुधांतून घेतल्यानें आमाचा नाश होतो. व क्षुधा चांगली लागते. चुन्याची कळी आणून तिच्यांत पाणी ओतीत ओतीत ती दुधासारखी पाण्याशीं जमल्यावर कांहीं काळपर्यंत निवळत ठेवल्यानें खालीं चुना बसून वर जें स्वच्छ पाणी बसतें, ती निवळ होय; तिचा उपयोग कोणत्याहि वयाच्या मनुष्यास होतो.

५३. स्वयंपाकाच्या पळीभर आंव (हरभऱ्याची) एका भांड्यांत घेऊन त्यांत तांदूळ घालावे; तें भांडें अधांतरीं शिंक्यावर ठेवावें, म्हणजे **भात** तयार होतो. हा भात विस्तवावर केलेल्या भाताप्रमाणें पांढरा होतो व त्यापेक्षां अधिक रुचकर लागतो· असें हुन्नरोत्तेजक मासिक पुस्तकावरून कळतें. लोकांनीं एकदां ह्याचा अनुभव घेऊन पाहावा. हा भात आमाचा नाश करणारा, वातनाशक, रुचिकर व क्षुधावर्धक आहे.

५४. छाती रुंद होण्याचा उपाय : जे सुखवस्तु आहेत किंवा ज्यांचें काम बैठें आहे, त्यांच्या फुप्फुसाला जसा व्यायाम व्हावा तसा होत नाहीं व त्यामुळें छाती अरुंद व अशक्त होते. त्याकरितां त्यांनीं खालीं लिहिलेला सोपा उपाय करावा. सकाळीं आंथरुणांतून उठल्याबरोबर ताठ बसावें. हात मागच्या बाजूस पाडावे व खांदे छातीपासून दूर सारावे आणि आंत जितका श्वास घेववेल तितका घेऊन तो धरवेल तितका वेळ कोंडून धरावा. याप्रमाणें सुमारें १५ मिनिटेंपर्यंत कृती केली असतां छाती रुंद होऊन भरते व सशक्त होते. अशा रीतीनें वागणारे आमचे जुने लोक दृष्टीस पडतात.

५५. रुद्रवंती-कल्प : शुभ दिवशीं समूळ काढून सावलींत वाळवावी. हिचें चूर्ण ३ मासे घेण्याचें प्रमाण आहे. घेणाराच्या कोठ्याची, वमन-विरेचनी शुद्धि (क्षेत्रशुद्धि) करावी. नंतर (१) तूप व मधाशीं (विषम-प्रमाण) घेतल्यास वली-पलित रोग जातो. एक महिनाभर घेणें. राळ्याचा भात व गायीचें दूध खावें. तेलकट, आंबट, तिखट वर्ज्य करावें. (२) हिच्या रसांत पारा खलून तांब्याच्या पत्र्यांना लेप देऊन, पुट द्यावें; उत्तम सुवर्ण होतें.

५६. कंडु, दाद, मंडल, वायु इत्यादिकांवर तेल : कण्हेराचें मूळ, कोष्ठ, रुईचें मूळ, भृंगराज (माका), हरताळ, सैंधव, हळद, काटेनिवडुंग हीं सर्व औषधें एकत्र समभाग कुटून, तीं यथेच्छ भिजतील इतकें त्यांत तिळाचें तेल घालावें. तेलाचे चौपट गोमूत्र घालावें. नंतर अग्नि लावावा. गोमूत्र आटून तेल राहिलें म्हणजे गाळून घ्यावें.

५७. खरजेस : शेंदूर, गुग्गुळ, विशेषधूप, मोरचूत, मेण हीं समभाग घेऊन त्यांत निर्भेळ शिरसेल चौपट घालून कढवावें. पक्क झाल्यावर उतरून तें लावीत जावें.

५८. **गजकर्णास :** (१) निर्गुंडीरस व तिळाचें तेल समभाग घेऊन, ताम्रपात्रांत खलून लावावें. (२) पांढऱ्या बाटलीची काच ४ तोळे व पारा १ तोळा घेऊन करंजेलांत घोटावें. उत्तम घोंटून लावावें.

५९. **इसबावर :** शेंदूर व मिरें, म्हशीचे लोण्यांत कढवून लेप करावा.

६०. **अंतर्गळास :** (१) हळद, सज्जीखार, आंवळ्याचीं पानें हीं निंबाच्या रसांत उकळून बांधणें. (२) पारव्याची विष्ठा व कळीचा चुना समभाग घेऊन चण्याएवढी गोळी करून दोहीसांज घेणें.

६१. **साबण करण्याची रीति :** एका भांड्यांत लांकडाची पांढरी राख पाण्यांत कालवून ठेवावी. कांहीं वेळ झाल्यावर बुडाशी राख बसली म्हणजे वरील निवळीचें पाणी हळूच दुसऱ्या भांड्यांत ओतून घेऊन चुलीवर ठेवावें व खूप कढूं द्यावें. नंतर एक प्रकारचा पांढरा पदार्थ सफेत रंगाचा बनतो. मग हा पदार्थ बारीक करून त्यांत पातळ होईल इतकें पाणी घालून चुलीवर ठेवून उकळी फुटली म्हणजे दुधासारखें चुन्याचें पाणी करून त्यांत थोडें थोडें ओतावें. तें कढीसारखें घट्ट झालें म्हणजे खोबऱ्याचें तेल बेतानें त्यांत मिसळून जाईल अशा बेतानें ओतावें. म्हणजे मग कांहीं वेळानें घट्ट पदार्थ बनतो, यासच साबण म्हणावें. सुवासिक साबण पाहिजे असेल तर त्या मिश्रणांत पातळ असतांना सुवासिक तेल अथवा रंगाचें पाहिजे असेल तर आपल्यास पाहिजे तो रंग त्यांत पातळ करून ओतावा.

६२. **महामारीवर औषध :** (१) लसूण, जिरें, सैंधव, सुंठ, मिरें, पिंपळी, ओंवा व भाजलेला हिंग हीं समभाग घेऊन लिंबाच्या रसांत अथवा आल्याच्या रसांत खल करून बोराएवढाल्या गोळ्या करून प्रत्येक गोळी अर्ध्या अर्ध्या तासानें रोग्यास देत जावीं. (२) मिरची, हिंग, जायफळ, दालचिनी व ओंवा समभाग घेऊन, माक्याच्या रसांत किंवा आल्याच्या रसांत खल करून वाटाण्याएवढ्या गोळ्या कराव्या व वरीलप्रमाणें अर्ध्या अथवा एकेका तासानें देत जाव्या. हटकून गुण येतो.

६३. **डोळ्यांत थुवर :** म्हणजे शेर ज्यास काळ्याहुरा आणि इंग्रजींत सिक्किचुश म्हणतात, त्याचा दुधासारखा चीक निघतो, तो कदाचित् डोळ्यांत गेल्यास (१) गुळाची वात करून पापणीच्या मध्यें ठेवून द्यावी. (२) दुधी किंवा नायदी हिची जमिनीवर वेल पसरलेली असते, ती मोडली असतां तींतून पांढरा दुधासारखा चीक निघतो, त्या झाडाचा रस काढून डोळ्यांत थेंब टाकावे. (३) अथवा चिंचेच्या पाल्याच्या रसाचे थेंब घालावे.

६४. **पोटांत केस गेला असतां :** आळूचीं पानें खावीं, म्हणजे पोटांतल्या केसाचें भस्म होतें. अनुभवाअंतीं प्रचीती पाहावी.

६५. **उचकीचा उपाय :** ज्याला उचकी लागली असेल त्याचे आसपासच्या मनुष्यांनीं, रोग्याच्या पोटांत धसका बसेल किंवा भीति वाटेल अशी क्रिया करावी. म्हणजे— नकळत त्याच्या तोंडावर पाणी शिंपडणें, एकाएकीं मोठ्यानें ओरडणें किंवा

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

३ मासे चूर्ण मधांत देणें. उष्णतेपासून उत्पन्न होणाऱ्या खोकल्यावर याचा चांगला उपयोग होईल.

७३. **वातजनित तृषेवर :** काळ्या उसाचा रस व पाणी यांत कोष्ठ व ज्येष्ठमध उगाळून देणें. याचा संधिवातावरहि उपयोग होतो.

७४. **वातशूलास :** (१) ओंवा, हिंग, सैंधव, संचळ, जवखार, हिरडे या जिनसा समभाग घेऊन वस्त्रगाळ चूर्ण करणें. व तें ३ मासे चूर्ण मधांत किंवा साखरेंत देणें. (२) अतिविष, आम्लवेतस, हिरडा, बेहडा, आंवळकठी, सुंठ, मिरें, सैंधव, पिंपळी, संचळ यांचें समभाग चूर्ण करून तें महाळुंगाच्या रसांत खलून, मोठ्या बोरा-एवढाल्या गोळ्या करून सकाळ-संध्याकाळीं ऊन पाण्याशीं देणें.

७५. **आंवळीचा कल्प :** अनेक रोगांवर उपयोग करणें. आंवळीची साल रविवारीं, शुचिर्भूत होऊन आणावी. व २१ दिवस सावलींत वाळवून नंतर तिचें वस्त्रगाळ चूर्ण करून, त्यांपैकीं ३ मासे चूर्ण, पुढीलप्रमाणें त्या त्या रोगावर द्यावें. (१) **गलित कुष्ठास :** गायीचे तुपाशीं. १ महिना घेणें. (२) **गजकर्णास :** तिळाचे तेलांत कढवून लावणें. (३) **शिणक्या वायूस**— मधांत देणें. (४) **शौच होण्यास**— गोमूत्राबरोबर घेणें. (५) **लिंजाना हिवास**— पाण्यांत घेणें. (६) **इंद्रियें बळकट होण्यास**— गायीचे तुपाशीं घेणें. (७) **पित्तास**— गायीच्या दुधांत घेणें. (८) **वातशूलास**— लसुणाशीं देणें. (९) **जलोदरास**— केळीच्या सोपटाच्या रसांत देणें. (१०) **संततीकरितां**— तांदुळाचे धुवणाशीं स्त्रियांस द्यावें. (११) **सुजेवर** आघाड्याचे रसांत लावणें. (१२) **वायुग्रंथीवर**— हिरडा, बेहडा, आवळकठीच्या चूर्णाशीं द्यावें. (१३) **श्वेतकुष्ठास**— वेखंडाशीं देणें. (१४) **समवातास** — कोरफडाच्या मगजांत देणें. (१५) **पंडुरोगास**— म्हशीचे ताकांत द्यावें. (१६) **वातादिक रोगांवर**— माक्याच्या रसांत देणें. (१७) **वलीपलित रोगावर**— शेळीच्या मूत्रांत देणें.

७६. **नारूवर उपचार :** नारूला तोंड पडलें कीं दररोज सकाळीं जखम थंड पाण्यानें धुऊन धुतलेल्या फडक्यानें स्वच्छ करावी. व त्यावर ताजीं बेलाचीं पानें ३ तोळे, व कापूर अर्धा तोळा घेऊन एकत्र वांटावें म्हणजे चांगलें मलम तयार होतें. (पाहिजे तर थोडें पाणी घालावें.) त्या मलमाची चपटी गोळी करून लावावी व वर स्वच्छ कपडा बांधावा. याप्रमाणें दररोज केलें असतां, गुण ३–४ दिवसांत येतो. अनेक वेळां अनुभव घेऊन पाहिला आहे.

७७. **कुत्र्याचे विषावर उपचार :** पिसाळलेल्या कुत्र्याच्या विषावर एक नवीन उपचार निघाला आहे. मनुष्यास तें विष बाधूं लागलें आहे असें लक्षण दिसून येतांच त्याला एखाद्या निवाऱ्याच्या खोलींत नेऊन कढत पाण्याच्या भांड्यांत बसवावें आणि तें पाणी त्याला सहन होईल तितकें जास्त कढत करावें. असें कांहीं तासपर्यंत त्याला त्या कढत पाण्यांत ठेविलें म्हणजे विष बाधल्याचीं लक्षणें नाहींशीं होतात

आणि मनुष्य बरा होतो. हा उपाय अगदीं अकस्मात सांपडला आहे. कोणा एका फ्रेंच डॉक्टरला पिसाळलेलें कुत्रें चावलें, तेव्हां त्यानें निश्चय केला कीं, पिसाळून न मरतां आत्महत्या करून घ्यावी. त्याप्रमाणें त्यास विष बाधूं लागल्याचीं लक्षणें दिसून येतांच, ऊन पाण्यांत बसून शिरा तोडून घेऊन आत्महत्या करावी, ह्या उद्देशानें तो ऊन पाण्यानें भरलेल्या भांड्यांत जाऊन बसला. इतक्यांत विष बाधल्याचीं लक्षणें कमी होत आहेत असें त्याचे लक्षांत येऊन संकेताप्रमाणें शिरा न तोडतां, तो तसाच त्या पाण्यांत बसला. लक्षणें शेवटीं अगदीं नाहींशीं होऊन तो अगदीं बरा झाला ! हा उपाय अगदीं सुलभ आहे, म्हणून तो त्या प्रसंगांत सांपडलेल्या सर्वांनीं करून पहावा.

७८. **पीनस रोगावर :** (१) दूर्वा, केशर व पारोशा पिंपळाचें लांकूड, तुपांत उगाळून एक थेंब नाकांत सोडणें. सात दिवस केल्यानें गुण येतो. (२) मोराचा पाय जाळून, ती राख गायीच्या तुपांत खलून त्याचा थेंब नाकांत सोडीत जाणें.

७९. **मुलांचे पोटांत होतें त्यास :** रानभोपळीच्या रसांत लवंग, मिरें व जोंधळे उगाळून, शक्तिमानाप्रमाणें त्रिकाळ द्यावें. तीन दिवस दिल्यानें गुण येईल. मातेनें जोंधळ्याची भाकर व तुरीचें वरण असें पथ्यास खावें. तीन दिवस.

८०. **पोटशूलास :** कडुनिंबाचा पाला, सुंठ व सेंधेलोण समभाग घेऊन एकत्र खलून गोळ्या बांधाव्या; व पोट दुखूं लागल्यास एक गोळी ऊन पाण्याबरोबर घ्यावी.

८१. **मुलास माती खाण्यापासून होणाऱ्या विकारावर :** बाभूळ, निंब, बोर, निंबोणी व आंबा यांच्या अंतरसालीचा काढा करून देणें. सात दिवस काढानिकाढा देणें. प्रत्येक दिवशीं जिनसा, पाव पाव तोळा घेऊन अर्धा शेर पाणी घालून अष्टमांश उरवून द्यावें.

८२. **सर्पदंशावर उपाय :** देवडांगरीचें एक किंवा दीड फळ पाण्यांत वांटून— गाळून पिण्यास द्यावें. विशेष वांत्या झाल्यावर तूप पिण्यास द्यावें. विष उतरल्यास तूपभात खावा.

८३. **कावीळीस तात्कालिक उपचार :** देवडांगरीचें फळ थंड पाण्यांत उगाळून, देशकालवलावल पाहून पांच चार थेंब नाकांत पिळावे. त्यावाटे अगदीं वाईट पिवळें पाणी निघून रोगी साफ बरा होतो. तूपभात खाण्यास द्यावा.

८४. **मूत्ररेचक :** काळीं द्राक्षें चार तोळे, रात्रीं भिजत घालावीं. नंतर सकाळीं त्यांतील बिया काढून, त्यांत थोडी जिऱ्याची पूड घालून तें पाणी प्यावें. मूत्रस्थानाची कडकी निघून जाऊन मूत्र साफ होतें.

८५. **धनुर्वातावर उपचार :** एके ठिकाणीं वाचण्यांत आला आहे. त्याचा अनुभव कांहीं विशिष्ट जातींस पाहतां येणार नाहीं. ज्यांना पाहतां येईल त्यांनीं कळविल्यास उपयोग होणार आहे. उपाय कांहीं टाकाऊ दिसत नाहीं. तो असा—

पळसाच्या फुलांनीं कढत कढत शेकावें. तसेंच रानडुकराची चर्बी चोळीत जावी व खाण्यासहि द्यावी.

८६. **शीघ्रप्रसूतीस** : धोत्र्याचें मूळ पोटावर दाबावें, असें एकजण कळवितो.

८७. **उष्णतेनें शिस्न सुजल्यास किंवा चट्टे पडल्यास** : चिकण सुपारी, वेखंड, जांभळीची अंतरसाल, पळसाच्या पानांचे सुकलेले देंठ व सावरीची साल यांचा काढा करून त्यानें शिस्न व चट्टे धुवावे.

८८. **सर्वसाधारण चट्ट्यांस मलम** : बाळंतनिंबाच्या काड्या, बाभळीची साल व हळकुंडें हीं समभाग घेऊन त्यांचें वस्त्रगाळ चूर्ण करून मेणांत मलम करावें.

८९. **खरूज, खवडे व आगपैणीस मलम** : कडू जिरें व पांढऱ्या कांद्याचा कीस गाईचे तुपांत जळून राख होईपर्यंत परतावा. राख झाल्यावर तुपांत खलून लावावा. आग होत नाहीं. गुण चांगला येतो.

९०. **सर्व प्रकारच्या ज्वरावर** : 'प्याहा' नांवाचा दगड इराणांत उत्पन्न होतो तो मुंबईत गंध्याकडे मिळतो. त्याचें वस्त्रगाळ चूर्ण १ तोळा व त्यांत कडूनिंबाच्या अंतरसालीचें सत्त्व १ मासा घालून एकत्र करावें. व सर्व प्रकारच्या तापावर गव्हा-इतकें औषध मधांत सकाळ–संध्याकाळ द्यावें. रोग्याच्या स्थितीप्रमाणें तेलकट, आंबट **पथ्य** करवावें. तीन दिवसांत रोगी बरा होतो.

९१. **उष्णता निघण्यास** : गुळवेल व कंकोळ रात्रीं पाण्यांत भिजत टाकून सकाळीं त्यांत कुसकरून चोथा टाकून द्यावा. व तें पाणी प्यावें, यानें साधारण उष्णता लौकर निघते.

९२. **ढेंकणावर उपाय** : कडूनिंबाचें जुनें खोड किंवा उत्तम चंदन उगाळून आंगास लावला असता ढेंकूण कमी चावतात.

९३. **आलें** (सुंठ) : (Zingiber officinalle) हा पदार्थ महौषधींत गणला आहे. आपल्या कुटुंबांत या महौषधीचा वारंवार उपयोग होत असतो. ही औषधी रोगाच्या मूलोत्पत्तीस उच्छेदक आहे. या पदार्थासारखा तीव्र गुणकारी दुसरा कोणताहि पदार्थ साधारण प्रचारांत नाहीं. यास संस्कृत भाषेंत **आर्द्रक** व आरबी, पारशी, तुर्की, सिरियन व चिनी भाषेंत **झेंजिबेल**, अथवा **झेंजिबिल**, व तेलगूंत अल्लम; तामीळ भाषेंत **इंजि** असें नामाभिधान दिलेलें आढळतें. **जर्मन** भाषेंत **इंग्वर** असें आहे, इटालियन भाषेंत **जेंजिओव्हो**; स्पॅनिश भाषेंत **जेंजिब्रे**; पोर्तुगीज भाषेंत **जेंजिब्रे**; फ्रेंच भाषेंत **जिंजेम्ब्रे**; डेनिश भाषेंत **जेंबर**; स्वीडिश भाषेंत **इंजकार**; डेन्मार्क भाषेंत **इंजफर**; लॅटिन भाषेंत **झिंझीबर**; ग्रीक भाषेंत **झिझलबेपीस**; अर्मीनियन भाषेंत **झेंझिबेस** अथवा **सिंगेबेल** व **सिंहलद्वीपीय** भाषेंत **इंगरू** असें नामाभिधान आहे. या औषधीच्या गुणाबद्दल आर्यवैद्यकशास्त्रांत फार विस्तारानें लिहिलेलें आहे. त्याचा सारांश, आर्यभिषकांतून प्रसिद्ध झालेल्या वनौषधीगुणादर्शांत

आलेलाच आहे. अर्वाचीन पाश्चिमात्य शोधक, आल्याचे गुण असे जाणतात— हे पाचनीय आहे. पोटांतला वायु काढण्यावर उपयोगी आहे. यांत एक उडणारें तेल व तीक्ष्ण राळसदृश तत्त्व असतें. याच दोन तत्त्वांवर आल्याचे गुण अवलंबून आहेत.

९४. **महारोगावर** : कोणी एकानें औषध सुचविलें आहे कीं, रोग्यानें फक्त केळीं व तापविल्याशिवाय गाईचें दूध यांचें सेवन करून चाळीस दिवस राहावें व रात्रौ जागरण करून अग्निकुंडाजवळ गीताध्ययन व ईश्वरभजन यांत काल घालवावा !

९५. **गुरांस होणाऱ्या रोगांवर उपाय** : (१) **तोंडास कांटे आल्यास**— हळद व मीठ गवरीच्या खांडानें चोळावें. (२) **अतिसार झाल्यास**— लिंबू व अफू पोटास लावून शेकावें. व थोडें पोटांतही द्यावें. (३) **जखमेस**— पाणकणीस तेलांत खलून लावावें. (४) **लाळ फार येत असल्यास**— कोथिंबीर व तेल चोळावें. (५) **तोंडास खरे आल्यास अथवा चिरा पडल्यास**— तूप-भात खाऊं घालणें. व दांतवण आणि केळ चारणें. (६) **खुरकूत झाल्यास**— चिखलांत बुडवून तो त्याजकडून तुडवावा किंवा चालावें व त्या खुरकुतावर खरकटें पाणी घालावें किंवा मांसाचे पाणी घालावें. अथवा गोमूत्राचा गाळ (तळीं बसतो तो) घालावा. (७) **माशी पडल्यास**— डामर लावावें किंवा तेलांत डिकेमाली आणि कापूर घालून कढवून तें तेल लावावें. (८) **अन्नानें पोट फुगल्यास**— भांग पाजावी. (९) **पाण्यांत घातल्यानें ढाळ होत असल्यास**— ताक पाजावें. (१०) **रक्त पडत असल्यास**— तूप पाजावें व भाकरींत वडीशेपाचें चूर्ण घालून ती भाकर तेलांत चारावी. (११) **डोळ्यास वीं पडल्यास**— कापूर चोळावा. (१२) **शिंग मोडल्यास** तुपांत खलून शेंदूर लावावा. (१३) **शेंपटी ओढावल्यास**— चिकणमातीचे गाऱ्यांत फडकें भिजवून कढत करून बांधावें. (१४) **पडून लचकल्यास किंवा हाड मोडल्यास**— चिकणमाती व चिंचेचा पाला यांचा कडकडीत लेप द्यावा. यानें आव, परसाकडे वरचेवर होणें हें बरें होतें. (१५) **गुरांस फांशी रोग झाल्यास चूर्ण**— हस्तिदंताचा कीस, शिसवीच्या लाकडाचा कीस, केंस, चवळीच्या शेंगांचीं टरफलें, यांची धुरी द्यावी. व खारकेच्या बिया अर्धा तोळा कुटून, तें कणिकेच्या गोळ्यांत चारणें. शिवाय केवड्याच्या कणसाच्या आंतील गीर व मासे खलून चारावें.

९६. **विंचवाचे दंशावर उपाय** : एका बातमीदारानें पुढील उपचार कळविले आहेत—(१) दंश झाल्याबरोबर दंश झालेल्या जागेच्या वरच्या बाजूस धरून कडूनिंबाचा पाला व मीठ हीं दोन्ही स्वच्छ दगडावर थोडें पाणी घालून वाटावीं आणि दंश झालेल्या जागेवर त्यांचा लेप लावावा, तो लेप सुकेपर्यंत विस्तवानें शेकावें, लेप सुकला कीं दंश झालेला मनुष्य खुशाल हसूं लागतो. (२) नवसागर व चुना समभाग घेऊन व त्यांत थोडें पाणी टाकून मिळवावें, नंतर दंश झालेल्या जागेवर लावावें व थोडें हुंगण्यास द्यावें. दोनपासून सहा मिनिटांत गुण येतो.

(३) सिरका (विनागरी) व खडू (चॉक) हीं दोन्ही मिळून दंश झालेल्या जागेवर लावावीं; बारा मिनिटांत गुण येतो. (४) चिंचोका पाण्यांत उगाळून दंश झालेल्या जागेवर बांधावा, गुण पंधरा मिनिटांत येतो. (५) तुळशीच्या झाडाचीं तीन चार पत्रें कुरकून दंशावर चोळावीं. गुण पांच मिनिटांत येतो. (६) वेखंड पाण्यांत उगाळून दंशावर लेप लावावा व थोडें पिण्यासहि द्यावें. गुण आठ मिनिटांत येतो. (७) विंचवानें दंश केलेल्या जागेवर मध चोळावी. मात्र मध स्वच्छ असावी. गुण ताबडतोब येतो. (८) आघाड्याचे तुरे अगर मुळी पाण्यांत उगाळून तें पाणी कडू लागेपर्यंत पिण्यास द्यावें. कडू लागलें कीं विष उतरलें असें समजावें. (९) लाल एरंडाच्या पानांचा रस काढून ज्या अंगास दंश झाला असेल त्याच्या विरुद्ध बाजूचे कानांत घालावा, व तसाच कांहीं वेळ राहूं द्यावा. असे दोन-तीन वेळां केल्यास विष उतरेल.

९७. **कुत्र्याचे विषावर उपाय :** पिसाळलेलें कुत्रें चावलें असतां १४० पासून १८० अंशांपर्यंत तापवलेले पाण्यानें दिवसांतून तीन वेळां स्नान केल्यास कुत्र्याचें विष उतरतें असें सांगतात.

९८. **पटकीवर उपाय :** ज्याला पटकीचा उपद्रव होईल त्याच्या डोकीवर सुमारें अर्धा तासपर्यंत पाणी ओतीत राहिल्यास खात्रीनें गुण येतो असा लाहोराकडून एका डॉक्टरानें अनुभव कळविला आहे. हे डॉक्टर काबुलच्या लढाईंत गेले होते; त्या वेळीं पटकीचे जितके रोगी त्यांना मिळाले, त्या साऱ्यांस त्यांनीं हाच उपचार केला; व त्यानें सर्वांस गुण आला. एकहि रोगी दगावला नाहीं, असें त्याचें म्हणणें आहे.

९९. **सर्पास पळविणें :** घरांत सर्प (नाग) शिरला असेल तर तो ज्या स्थळीं असेल तेथें सांबराचे शिंगाचे बारीक तुकडे करून ते जळत घालावे. त्याचा धूर त्यास सहन होत नाहीं. सबब तो पळून जातो. हें नेटिवाचें औषध झालें. साप घरांतच न यावा यासाठीं कार्बोनिक आसिडाची बुकणी फार उपयोगाची आहे. हे इंग्रजी औषध आहे. अनुभव घेऊन पहावा.

१००. **नायट्यांवर उपाय :** तीन तोळे बेलाचीं पानें व अर्धा तोळा कापूर एकत्र घेऊन त्याचा खल करावा व नायट्याची जागा धुऊन स्वच्छ केल्यानंतर त्यावर त्याचा लेप करावा. ताबडतोब गुण येतो. अनुभव घेऊन पहावा.

तेलें वगैरे

बदामाचें तेल : दोन प्रकारांनीं काढतां येतें: (१) बदामाच्या बिया चांगल्या बारीक कुटून, त्या एका पसरट तोंडाच्या भांड्यांत घालून, विस्तवावर ठेवून थोडासा मिठाच्या पाण्याचा शिपका द्यावा, व खालीं मंदाग्नि लावावा. म्हणजे थोडक्याच वेळांत त्यांतील तेलाचा पाझर निघूं लागतो. असें बराच वेळ केल्यावर फडक्यांत तें सर्व गाळून, तेल पिळून घ्यावें. व चोथ्याचा वाटेल तो उपयोग करावा. या रीतीनें तेल पुष्कळ निघत नाहीं; त्यास वास चांगला नसतो. व थोड्याच दिवसांत तर वाईट वास येऊं लागतो. परंतु तात्कालिक उपयोग करणें असल्यास हें तेल वाईट नाहीं व श्रमहि विशेष नाहींत. (२) बदामाच्या बिया चांगल्या बारीक कुटून, त्या थोड्याशा ऊन करून, त्यास किंचित् कापराचा शिटकारा द्यावा, व लागलींच तेल काढण्याचें एका प्रकारचें यंत्र असतें, त्यांत घालून दाबल्यानें त्याचें तेल भराभर निघतें. हें अदमासें एक-चतुर्थांश— म्हणजे शेरभर बदामाचें पावशेराजवळ जवळ निघतें. हें बरेच दिवस, वास लागल्याशिवाय टिकूं शकतें. फारच दिवस टिकविणें असल्यास, त्यांत गुलाबी उत्तम अत्तर थोडेंसें टाकून ठेवावें म्हणजे झालें. या रीतीनें बहुतेक सस्नेह पदार्थांचें तेल काढतां येतें. व यावर विचार केल्यास, वाटेल तितक्या मोठ्या प्रमाणावर तेल काढतां येण्याचें नवीन यंत्र येथच्या येथें तयार करतां येईल, व थोडक्यांत पुष्कळ फायदा होईल.

प्रथमत: येथे आम्हीं बदामाच्या तेलासंबंधानें लिहिलें, याचें कारण विचार करण्यासारखें आहे. तें असें कीं, तेल निघण्यासारखे जे जिन्नस आहेत, त्यांच्या एकंदर चार तऱ्हा आहेत. **एका तऱ्हेचे पदार्थ** असे आहेत कीं, त्यांच्यावर असणारीं टरफलें, स्वाभाविक रीतीनें अगदीं मृदु असतात, आणि म्हणून त्याचें तेल विशेष आयास केल्याशिवाय निघूं शकतें. अशा तऱ्हेचे पदार्थ म्हटले म्हणजे— तीळ, बदाम, अक्रोडमगज, भुईमूग इत्यादि होत. आणि म्हणून त्यांची कृति आम्हीं प्रथमत: सांगितली आहे कीं, त्यांचें तेल काढण्यास विशेषशी दगदग पडत नाही. **दुसरे पदार्थ असे असतात** कीं, ते स्वभावत: मृदु असतात. परंतु त्यांच्यावर एक जाडें वेष्टण असतें. व तें वेष्टण काढल्यावांचून त्याचें तेल सुलभ रीतीनें काढतां येत नाहीं. वरचीं तीं वेष्टणें— अर्थात् टरफलें सोलून काढावीं किंवा तीं न काढल्यास, निदान त्यांचे ठिकाणीं थोडेंसें मृदुत्व आणण्याचा यत्न करून त्यास तशाच जोरदार सांचांत घालून दाबावें, तेव्हांच त्यांचें तेल निघतें. दुसऱ्या वर्गांत एरंड्या, जेपाळ, धोत्र्याच्या बिया वगैरे पदार्थ येतात. अर्थात् यांचें तेल काढणें असेल तर वर लिहिलेल्या तत्त्वाप्रमाणें त्यांच्यासंबंधानें तजवीज केली पाहिजे.

ज्या बियांवर जाडीं टरफलें असतात, त्यावरचीं टरफलें प्रथम काढून, नंतर त्यांतील मगजाचें तेल काढलें पाहिजे. एरंड्यांवरील टरफलें निघण्याकरितां फारसा

जाय पडत नाहीं. कारण, भुईमुगाच्या शेंगांतील दाणे ज्याप्रमाणें साधारण आघातानें निघूं शकतात, त्याप्रमाणें एरंडाच्या बिया, साधारणपणें फोडतांच त्यावरील टरफलें केव्हांच निघतात. परंतु दुसऱ्या जातीच बिया असल्या, व त्यांवरील टरफलें एरंड्या-सारखीं निघण्याजोगीं नसतील, तर त्या बिया कण्याचक्या ऊन करून नंतर फोडाव्या म्हणजे त्यांवरील टरफलें निघूं शकतील. याप्रमाणें टरफलें काढून, त्यांतील निघा-लेला मगज थोडा चेंचून, व त्यांत पाणी घालून (' आरड ' काढतात त्याप्रमाणें) चुलीवर ठेवावें. नंतर खालीं अग्नि लावला म्हणजे पाणी खालीं राहतें व तेल वर येतें. वर आलेलें तेल, पळीनें काढून घ्यावें. ही पद्धत बहुतेक लोकांस ठाऊक आहेच. या कृतीप्रमाणें मोगली एरंड्यांचें तेलहि आमच्या एका मित्रानें काढलें आहे. असें त्यांजकडून आम्हांस नुकतेंच पत्र आल्यावरून समजतें.

गुजरातेंत एरंड्यांचें पीक मोठें आहे. तिकडे एरंड्यांचें तेल फार काढतात. व सर्वत्र तेंच वापरण्यांत येतें. तिकडे वर सांगितल्याप्रमाणें आरडीनें तेल काढण्याची पद्धत आहे. व शिवाय तेली लोक घाण्यांतूनहि तेल काढतात. परंतु घाण्यांतून तेल काढतांना, बियांवरील टरफलें काढलेले मगज पाण्यांत टाकून, त्यांत थोडें मीठ टाकावें लागतें. असें तेल जळतांना तडतडतें, म्हणून पुनः तें शुद्ध करावें लागतें. औषधाचे कामांत व विशेष शुद्ध असें तेल करणें असेल तर ' आरडी 'ची पद्धतच स्वीकारली पाहिजे.

असो. याप्रमाणें ही दुसऱ्या प्रकारच्या— म्हणजे स्वभावतः मृदु परंतु ज्यावर जाडीं टरफलें असतात अशा बियांचें तेल काढण्याची पद्धति झाली.

दुसरा प्रकार : एरंड्या घेऊन, त्या शिजवून नंतर पाण्यांत घालून ज्याप्रमाणें तीळ वगैरेंचा घाणा तेली करतात, त्याप्रमाणें त्या एरंड्या गाळतात. गाळतांना फक्त पाण्याचा मात्र शिडकावा देतात. एरंड्यांची साल काढण्याची या कृतींत कांहीं जरूर पडत नाहीं. व त्या पाण्यांत शिजवतांनादेखील तेलाचा अंश जात नाहीं. असो. या रीतीनें घाणींतून तेल काढल्यानंतर एक मण तेलांत पांच शेर पाणी घालून तें पाणी जळेपर्यंत तेल उकळावें, म्हणजे तें तेल पूर्ण झालें. त्यांत पाण्याचा अंश राहूं देऊं नये. मणांत पांच शेर पाणी घालावयाचें तें गोडें न घालतां, समुद्राचें खारें पाणी घातलें तर रंग फारच सफेतीवर येऊन ज्याप्रमाणें खोबरेल ग्लासांत जळतें, त्याप्रमाणें हेंहि जळण्यास हरकत नाहीं. एरंड्यांची **आरड** इकडे (बडोदें प्रांतांत) घेत नाहींत. एरंड्या घेऊन, त्या चांगल्या भाजून, उखळांत घालून, त्या कुटून, नंतर, मोठ्या भांड्यांत घालून त्यांत त्याच्या बेतानें म्हणजे पाण्यांत तेल येईल अशा बेतानें पाणी घालून खालीं अग्नि लावावा व वर तेल येत जाईल तें घेत जावें. याप्रमाणें **आरडीची** रीत आहे. **आरडीपेक्षां** वरील रीत फार चांगली.

तिसरा प्रकार : बियांचा असा असतो कीं, त्यांतील परमाणू जाड असून त्यांत तलहि बेताचेंच असतें. व **चौथ्या प्रकारांत** परमाणू जाड असून, तेल

मुळींच नसतें. परंतु त्वचेवर त्यांच्यांतील गुणांचा परिणाम स्निग्धतेसह होण्याकरितां, त्यांचें तेल काढावें लागतें. **तिसऱ्या प्रकारांत** अंकोल वगैरे जातीच्या बिया येतात त्यांचें तेल काढण्याची कृति, त्या त्या विशेष वस्तूवर अवलंबून असल्याकारणानें त्या सर्वांबद्दल एकच तऱ्हा किंवा नियमित विचार येथें दाखल करितां येत नाहींत. त्याबद्दल माहिती त्या त्या जागींच पाहावी. आमच्या ' वनौषधी गुणादर्श ' पुस्तकांत बऱ्याच ठिकाणीं जागजागीं माहिती दिलेली आहे.

चवथा प्रकार : जिनसांचें तेल काढणें असल्यास, त्या जिनसा पाण्यांत कुटून किंवा वांटून, तिळाच्या किंवा दुसऱ्या– जरूरी असेल त्याप्रमाणें त्या तेलांत– टाकून, त्यांस अग्नीवर आंच देऊन चांगला कढ येऊं द्यावा. (हा कढहि जरुरी- प्रमाणें कमजास्त करावा लागतो.) नंतर तें तेल गाळून घ्यावें.

' तिरफळा 'चे सालीस **तेजबळ** म्हणतात. ती कामोद्दीपक व पुष्टिदायक आहे. सालीचा व फळाचा उपयोग अजीर्ण, हगवण व मूत्ररोगावर होतो. ह्याचा उपयोग मूत्रस्थलावर फारच वाखाणलेला आहे.

' **तिवर** ' हें गंगेच्या मुखाजवळहि उगवतें. चिखलावर असलेलीं मुळें कामोद्दीपक आहेत. अपक्व बिया टोंचून, त्यांत लोणी मिश्रण करून त्याचा उपयोग, गळूं, केसतोडा, विद्रधि इत्यादि पिकविण्याकडे करितात. दक्षिण अमेरिकेंत रॉय- ओडीजॉनेरिओमध्यें व सिंध देशांत, सालीचा उपयोग कातडी कमविण्याकडे करितात, व साल जाळून, त्याच्या राखेचा उपयोग कपडे धुण्याकडे करतात. रंगारी लोक, रंगाचें मिश्रण करण्याकडे करतात.

' **तिवस** ' याचा गोंद पळसाच्या गोंदाप्रमाणें आहे. हें झाड पळसाच्या जातीचें (वर्गाचें) आहे. याच्याबरोबर पारिजातकाचें मूळ व धावडशीचें मूळ समभाग घेऊन, त्याचा काढा करून सर्व प्रकारच्या विषांवर कोंकणांत देतात. मुलांच्या अंगावर पुरळ उठल्यास, याचे पाल्याचा रस हळद घालून देतात.

रक्षाक्षार : लांकडाची पांढरी राख पाण्यांत टाकावी. नंतर तें मिश्रण ढवळून निवळी येण्यासाठीं तें भांडें तसेंच स्थिर ठेवावें. राख खालीं बसून निवळ पाणी जें वर बसलें तें हळूच दुसऱ्या स्वच्छ भांड्यांत काढून घ्यावें. ही निवळी पिचकारीनें ओढून घेतल्यास अधिक शुद्ध होऊं शकते. कारण तसें केल्यानें खालची राख ढवळली जात नाहीं. ही निवळी चुलीवर एका भांड्यांत आटूं द्यावी, म्हणजे एक प्रकारचा पांढरा सफेत पदार्थ शिल्लक राहतो. त्याला पर्लॲश अथवा पोटॅशी कार्बोन्स म्हणतात. हा पदार्थ विलायतेहून तयार होऊन इकडे येतो. तो कित्येक औषधांतहि डॉक्टर लोक उपयोगांत आणतात. अर्धशेराला सुमारें पांच सहा आणे पडतात. हा पदार्थ पानांच्या राखेंत जसा मिळतो तसा लांकडांत मिळत नाहीं.

कै. वैद्य परशुराम वाजी पाटील



जन्म इ. स. १८५९]

[मृत्यू इ. स. १९३०

श्री. रमेश रघुवंशी हे प्रसिद्ध करीत असलेल्या "**औषधी वाडां**" पैकी एक **वाड** माझ्या आजोबांचे. माझ्या आजोबांचे नाव परशुराम बाजी पाटील. आता ते हयात नाहीत. माझे आजोबा हे माझ्या आईचे वडील. त्या काळातील, रत्नागिरी शहर व आजूबाजूच्या परिसरातले एक नामांकित वैद्य. अनेक गरजूंनी त्यांच्याकडच्या औषधांचा व औषधि-ज्ञानाचा उपयोग करून घेतला होता.

माझी आई ही त्यांची सर्वात मोठी व लाडकी मुलगी. मीही त्यांचा अत्यंत लाडका नातू होतो. माझे सर्व बालपण त्यांच्याच मायेखाली आणि नजरेखाली गेले. पुढे त्यांच्या वैद्यकीसंबंधी ज्या काही एक-दोन घटना मी दिल्या आहेत त्या मी स्वतः पाहिल्या आहेत.

आजोबा हे त्यांच्या सर्व भावंडांत धाकटे. पण म्हणूनच सगळ्या मोठ्या बंधूंचे अत्यंत आवडते. मातापित्याचे छत्र त्यांच्या बालपणीच नष्ट झाले होते; तरी वडील बंधूंनी पुत्रवत त्यांचा प्रतिपाळ केला होता. त्यांना त्यांनी कधीही काही कमी पडू दिले नाही. त्या काळी शालेय शिक्षणाला जरी आताइतके महत्त्व नव्हते तरीही आजोबा इंग्रजी पाचव्या इयत्तेपर्यंत शिकले होते. घरची फार मोठी श्रीमंती नसली तरी सुस्थिती खास होती. त्यामुळे पैसे मिळविण्यासाठी स्वतः धडपड करण्याची आवश्यकता त्यांना कधी भासली नाही. त्यामुळे फावला वेळ अमाप होता. पण या वेळाचा उपयोग वाममार्गासाठी कधीच केला नाही. अगदी तरुणपणीच दोन गोष्टींनी त्यांचे मन वेधून घेतले : एक शिवभक्ती, आणि दुसरे आजारशास्त्र. या गोष्टींचा छंद त्यांनी शेवटपर्यंत सोडला नाही. यातील शिवभक्ती त्यांच्या घरातच होती. कारण पाटील मंडळी शिवभक्त म्हणूनच गावात प्रसिद्ध होती. आजारशास्त्र मात्र त्यांची स्वतःची आवड होती.

आपली दुसरी आवड पुरी करण्यासाठी ज्यांना या विषयात गती आहे अशा अनेक लोकांच्या गाठीभेटी घेत असत. त्यांच्याकडून निरनिराळ्या वनस्पतींचे गुणधर्म काळजीपूर्वक समजून घेत असत. पूर्वी मिळविलेल्या माहितीशी नवी माहिती ताडून त्या दोन माहितींची सांगड घालीत असत. तसेच गावात येणारे साधू-बैरागी, फकीर, संन्यासी यांनाही घरी आणून व त्यांची उत्तम प्रकारे सरबराई करून त्यांच्याकडूनही काही औषधी योजना गवसल्या तर त्या जमवीत असत. असे करता करता त्यांच्याकडे औषधिविषयक बरीच माहिती जमा झाली. रोगाच्या परीक्षेचेही तंत्र त्यांनी हस्तगत केले. आणि त्यांनी वैद्यकीला सुरुवात केली. मात्र वैद्यकी हा शेवटपर्यंत त्यांचा छंद होता, तो पोटापाण्याचा व्यवसाय कधीच झाला नाही.

त्यांच्या वैद्यकीत रोग्याच्या मूत्रपरीक्षेला फार महत्त्व होते. केवळ मूत्रावरून रोग्याच्या अंतर्गत बिघाडाचे ते अचूक निदान करीत हे मी माझ्या डोळ्यांनी पाहिले आहे.

खाली त्यांच्या रोगनिदानाच्या आणि औषधियोजनेच्या काही हकिकती देत

आहे. त्यावरून या शास्त्राकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण, त्यांची तयारी व अनुभव यांची वाचकांस खात्री पटेल.

कै. बाबांकडे (आजोबांना सर्व बाबा या लाडक्या नावाने हाक मारीत असत.) **इच्छाभेदी** नावाच्या सारक औषधाच्या काही गोळ्या तयार असत. या औषधाचा गुणधर्म असा होता की, जितके रेच आपणास व्हावेत अशी ते औषध घेणाराची इच्छा असेल तितके पाण्याचे घोट गोळीबरोबर घेतले म्हणजे तितकेच रेच त्याला होत. समजा, दोन-तीन रेचांबरोबरच माणसाला थकल्यासारखे वाटू लागले तर त्याच्या पायावर तांब्याने गरम पाणी घालायचे की पुढील रेच बंद.

बाबांकडे जी औषधे होती त्यांतील अनेक तयार औषधे दूरदूरच्या त्यांच्या नातेवाइकांकडेही दिलेली असत. असेच एक औषध माझ्या आईपाशीही होते. औषधाचे नाव जुलाबाचे तेल. कितीही जुन्या बद्धकोष्ठतेवर हे तेल रामबाणासारखे प्रभावी आहे. आमच्याकडे तेव्हा माझ्या आईचे एक मावस-दीर राहात असत. त्यांना बद्धकोष्ठतेचा जुना विकार होता. हे इंग्रजी शिक्षणाचे व सुधारणांचे मोठे भक्त होते. त्यामुळे या प्रकारच्या जडीबुट्टीबद्दल त्यांना एक प्रकारची तुच्छताच होती. माझ्या आईने जेव्हा तिच्या वडिलांचे हे औषध त्यांना सुचविले तेव्हा त्यांनी थट्टेने त्याचा प्रयोग करावयास संमती दिली आणि या औषधाचे जेव्हा मोजून दहाच थेंब दिले (या तेलाचे जास्तीत जास्त बारा थेंब द्यावयाचे असतात) तेव्हा तर त्यांना खदखदून हसूच फुटले. त्यांचे म्हणणे साहेबाच्या मोठ्यामोठ्या डोसाने जिथे काही होत नाही तिथे या दहा थेंबांनी काय होणार ? औषध दिले आणि घटकाभराने माझी आई तिच्या आत्याला भेटावयास म्हणून दूर माहीमला गेली. येथे माझ्या काकांना पाच सहा चांगले जबरदस्त रेच झाले आणि ते अगदी थकून गेले. घरची माणसे माझ्या आईला बोलू लागली की, बापाचे औषध देऊन ही आमच्या पोराला मारून टाकणार. काही माणसे तर आईला आणावयासही माहीमला गेली. संध्याकाळच्या सुमारास जेव्हा आई आली आणि प्रेतवत पडलेला आपला दीर पाहिला तेव्हा तिने एक कागदी लिंबू घेतले आणि त्याचा चमचाभर शुद्ध रस काढून तो पाजला. त्यानंतर काकांना जुलाब झाले नाहीत. पण ते मात्र झोपून होते. दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर ते म्हणाले की, कित्येक वर्षांत मला असे ताजेतवाने वाटले नाही, आणि अशी गाढ झोपही लागली नाही. हीच हकीकत येथे सांगण्याचे प्रयोजन असे की, या वाडातील अनेक औषधे गुणकारी असली तरी अपायाच्या दृष्टीने निरुपद्रवी आहेत व अतज्ज्ञांसही त्यांचा वापर करावयास हरकत नाही.

आणखी एका आसन्नमरण रोग्याची हकिकत अशी : आजोबांकडे एकदा पन्नास-एक वर्षांचा इसम आला. आला तोच मुळी काठी टेकीत टेकीत; आणि म्हणू लागला की, माझा आता शेवट जवळ आला आहे. तेव्हा शेवटच्या म्हणून मी तुमच्या भेटीस आलो आहे. त्याला सांधेदुखीचे दुखणे होते. आणि हातपाय साधे हाल-

वितानाही त्याला मरणप्राय कष्ट होत होते. बावांनी त्याला तपासले आणि एकच प्रश्न विचारला की, मी जर काही जालिम औषध दिले तर ते आपण घ्याल काय? आणि घेतल्यावर तीन दिवस जो भयंकर शारीरिक त्रास होईल तो सहन कराल काय? कारण, आता तुमच्या शरीराला जो त्रास होत आहे तो काहीच नाही असे वाटायला लावणारा तो त्रास असेल. ते गृहस्थ त्या व्याधीला इतके कंटाळले होते, आणि अनेक प्रकारची देशी विदेशी औषधे घेऊनही उतार न पडल्याने इतके त्रासले होते की एकदा हा शेवटचा उपाय करून प्राण गेला तरीही आपली सुटकाच आहे असे समजून त्यांनी बावांच्या प्रश्नास होकार दिला. बावांनी याच बाडातील 'तोंड येण्याचे औषध' असे नाव असलेले औषध तयार करून ते त्या गृहस्थास एका सकाळी दिले. हा हा म्हणता त्या गृहस्थाचा चेहरा, मान वगैरे सुजू लागली, आणि दुसरे दिवशी तर त्यांच्या तोंडातून लाळेची सतत धारच सुरू झाली. शिवाय त्यांच्या शरीरात तर ज्या काही उलथापालथी सुरू झाल्या त्याने तर त्या गृहस्थांनी जगण्याची आशा पारच सोडून दिली. तोंडातून लाळ गळणे सतत दोन दिवस आणि दोन रात्री चालू होते. तिसऱ्या दिवशी त्यांच्या शरीरास आराम पडू लागला. एका आठवड्याच्या आतच ते गृहस्थ पंचवीस वर्षांच्या तरुणाच्या तडफेने आपले अवयव हालवू लागले. रोग्याचा जणू कायाकल्प आणि पुनर्जन्म झाला होता. येथे मुद्दाम आवर्जून सांगण्यासारखी गोष्ट ही की, औषध घेतल्यानंतर त्याचे ताबडतोबीचे परिणाम काय होणार याचे जसे सूक्ष्म ज्ञान माझ्या आजोबांना होते तसेच हा रोगी आपल्या औषधाने बरा होणार याचादेखील हमखास भरवसा त्यांना होता. चांगल्या वैद्याच्या ठिकाणी या दोनच गुणांची नाही का आपण अपेक्षा करीत? आमच्या देशी औषधांच्यासंबंधीही सांगण्यासारखी एक गोष्ट येथे आहे असे मला वाटते. आमची देशी औषधे रोगाच्या विषाची लक्षणे आणि द्रव्ये शरीराच्या आतल्या आत दडपून, मारून टाकण्याचा प्रयत्न करीत नाहीत. तर ज्या अर्थी त्या विषाने शरीर-व्याधीच्या लक्षणाचे रूप घेतले आहे त्या अर्थी कोठल्या ना कोठल्या मार्गाने तो रोग आतून बाहेर येऊ पाहात आहे हे जाणून त्याला बाहेर येण्यासाठी मदत करणारी औषधे आमचे शास्त्र देते. व अशा प्रकारे जणू काही त्या रोगाचे मागणेच एक प्रकारे पुरवून रोगांना ते बाहेर काढून लावते. या ठिकाणी त्या रोगाचीच गती कृत्रिमरीत्या जणू अनंत पटींनी वाढवून माझ्या आजोबांनी त्या गृहस्थाला रोगमुक्त केले होते.

जाता जाता कै. बावांच्यासंबंधी आणखी एक विशेष माहिती सांगण्यासारखी आहे. कै. बावांना किमया करून पाहण्याचाही छंद होता. त्यासाठी ते अनेक साधू-बैराग्यांना घरी आणून त्यांची मनोभावे सेवा करीत असत. या विद्येचा शोध त्यांनी जन्मभर घेतला. एकदा एक साधू त्यांना म्हणू लागला की, तू माझ्याबरोबर सह्याद्री-वर चल, तेथे तुला मी एक अशी वनस्पती दाखवतो की जिच्यामुळे तुला तांब्याचे

सुवर्ण करता येईल. पण वडील बंधूंनी परवानगी नाकारल्यामुळे तो त्यांचा बेत बारगळला. पण पुढे त्यांना आणखी एक बैरागी भेटला. तो आमच्या येथे जवळ जवळ तीन-चार महिने राहात होता. त्याने बाबांना सुवर्ण करण्याची कोणती तरी कृती दाखविली होती. त्याप्रमाणे सगळ्या वस्तू जमा करून व एका मडक्यात, मडक्यावर फडक्याचा घट्ट दादरा बांधून स्त्रीच्या कांकणाची कणकणही जिथे ऐकू येणार नाही अशा एकान्त स्थळी ते मडके त्यांनी बेचाळीस दिवस पुरून ठेवले. बेचाळीसाव्या दिवशी बैराग्याच्याच मार्गदर्शनाखाली ते मडके काढून आणून त्यातील रसायन त्यानी रसरशीत जाळावर त्याचा अर्क काढण्यासाठी ठेवून दिले. पण प्रयोगात कोठे काय चूक झाली माहीत नाही;–मध्येच तेलाचे थेंब गळायचे थांबून बिस्तवावर जे भांडे ठेवले होते ते तडकून सर्व रसायन सांडून गेले. पण जे काही थोडे तेल ते जमा करू शकले ते तांब्याच्या पैशाला लावून तो पैसा चुलीत टाकला असता ऐंशी टक्क्यापर्यंत त्याचे सोने होई. तसेच एवढ्या थोड्या उष्णतेनेही तो घट्ट पैसा हाताने वाकविण्याइतका नरम होत असे. याच प्रयोगाच्या वेळची आणखी एक गोष्ट मला आठवते ती अशी की, या प्रयोगाच्या प्रारंभीच तो बैरागी माझ्या आजोबांना म्हणाला की, "हे पाहा, मी तुला ही विद्या देत आहे; पण यातून जो पैसा उत्पन्न होईल त्यातील फक्त तुझ्या चरितार्थाला लागेल एवढाच पैसा स्वतःसाठी तू खर्च कर. बाकीचा तू दानधर्मात खर्च कर. सोने करताना या बाबतीत तुझे मन अत्यंत शुद्ध हवे." येथे हे सांगावयास हरकत नाही की किमया करण्याचे प्रयोग फक्त आमच्याच देशात होत नव्हते तर युरोपमध्येही ते होत असत. आणि तेथेही सुवर्णप्राप्तीची पूर्वअट निरिच्छ कृती हीच असे.

कै. बाबांकडे नागदंशावरही एक अप्रतिम गुणकारी औषध होते. ही कोठल्या तरी झाडाच्या फांदीची काठी होती, आणि ती त्यांना कारवारकडच्या अशाच कोण्या संन्याशाने कृपा म्हणून दिली होती. ही काठी सहाणेवर उगाळून नागदंश झालेल्या माणसाच्या तोंडात तिचे पाणी घालीत असत. घासावयास ती अत्यंत कठीण होती. औषध घशाखाली उतरल्यापासून अर्ध्या तासाच्या आत दंश झालेल्या माणसाचे विष उतरून तो स्वतःचे व्यवहार स्वतः करण्याइतपत बरा होत असे. या काठीच्या बळावर कित्येक लोकांना मृत्यूच्या दाढेतून त्यांनी बाहेर ओढून काढले होते. या काठीचे नाव मात्र अखेरपर्यंत ते मिळवू शकले नाहीत.

कै. बाबांच्या मृत्यूनंतर त्यांच्या औषधी बाडाची एक हस्तलिखित प्रत माझा धाकटा भाऊ वसंत गोविंद श्रीधनकर याच्या संग्रही होती. त्यांच्या या बाडात अनेक चांगली चांगली गुणकारी औषधे आहेत. या प्रकारच्या देशी औषधी बाडांचे एक वैशिष्ट्य आणि मोठेपण हे की, त्यांतील सर्व औषधी द्रव्ये आजूबाजूच्या परिसरात वाढणाऱ्या वनस्पतींपासून मिळणारी असतात. त्यामुळे आमचे शरीर व मन यांच्याशी ती अत्यंत सुसंगत असतात. कारण ज्या मातीत व हवामानात आम्ही वाढलो त्याच

मातीत व हवामानात तीही जन्मलेली आणि वाढलेली असतात. म्हणून एक प्रकारे आमच्याशी अत्यंत निकट अशी असतात.

कै. परशुराम बाजी पाटील यांनी मोठ्या प्रयासाने जमा केलेली व स्वतः प्रयोग करून अनुभव घेतलेली ही औषधे गोरगरीबांना जरी उपयोगी पडली, आणि तज्ज्ञांना त्यांची छाननी करावयास जर त्यांनी प्रवृत्त केले तर त्यांच्या आत्म्यास निश्चित समाधान लाभेल.

रामराव गोविंद श्रीधनकर

भाग २ रा

१. **उचकी :** उडीद व आंब्याचीं सुकलेलीं पानें चुरून चिलमींतून ओढावयास देणें, व धूर पोटांत ओढणें, अथवा उडीद व सुंभ चिलमींतून ओढणें, धूर पोटांत घेणें.

२. **नाळगूद :** रुईच्या झाडाच्या ढिऱ्या व ढिऱ्यांच्या दुप्पट काळीं मिरें व दुप्पट लवंगा असें एकत्र करून बारीक वाटून प्रत्येक वेळेस ४ मासे खाणें. याप्रमाणें ७ दिवस करावें.

३. **दमा व पोटदुखी :** डोरल्याचा रस १। शेर किंवा ·॥· शेर सोनामुखी, आंवळा, बेहेडा, काळीं मिरें, शेंदेलोण हे जिन्नस प्रत्येकीं १ तोळाप्रमाणें घेऊन वस्त्रगाळ पूड करावी, व गोळ्या बांधून त्या घ्याव्या.

४. **सुरमा :** सोरा १ तोळा, शेंदूर ·।· तोळा, काळ्या बांगड्या २, दोन कागदी लिंबाच्या रसांत खल करून फूल पडलें असेल त्या डोळ्यांत निजतेवेळीं घालावें.

५. **अग्निदग्ध व्रण :** तिळाचें तेल ·।· शेर कढवून त्यांत ३ तोळे राळ वांटून टाकावी. चुलीवरून उतरून थंड पाण्यांत ७ वेळां शुद्ध करावें.

६. **अग्निमांद्य, मंदाग्नी :** (१) बाळहर्डे ४ मासे, रंगारी हर्डे २ मासे, मोठे हर्डे ६ मासे, आंवळे, डाळिंबाचें बीज २ मासे, मिरीं चार मासे, सत्त्वसुंठ २ मासे, ओवा ४ मासे, बाळसन ३ मासे, लाहुरी मीठ १ तोळा, बांगडखार १ तोळा, वेलदोडा ६ मासे, गुलाबाचीं फुलें ५ मासे, बडीशेप ४ मासे, तवकील ४ मासे, रुमामस्तकी ४ मासे, पुदिना ६ मासे, मेथी १ तोळा, पिंपळी ३ मासे, काळीं मिरें ३ मासे, तज ३ मासे, शेंदण्या भाजलेल्या ३ मासे ह्या सर्व जिनसा कुटून लिंबाच्या रसांत खल करावा, व वाटाण्याएवढ्या गोळ्या करून सकाळ-संध्याकाळ एक एक घ्या. (२) पिंपळी, सुंठ, पिंपळमूळ, चित्रकमूळ, समभाग चूर्ण करून पाण्यांतून दिवसांतून तीन वेळां घेणें. असे ७ दिवस.

७. **अग्निरोहिणी, काळपुळी :** कांगोणीचा पाला वांटून पुळीवर बांधणें, अथवा मलम प्रकार ३ रा लावावें.

८. **अजीर्ण :** आंवळे, हरडे, बेहडे, सावरी मीठ, काळे मीठ, शेंदेलोण,

वेलदोडे (लहान), पांढरें जिरें, शहाजिरें, चित्रक, दालचिनी, डाळिंबाचे दाणे, सत्त्वसुंठ, सजीखार या जिनसा अर्धा तोळाप्रमाणें सोनामुखी १॥ तोळा व पिंपळी, काळीं मिरें, अजमोदा, धणे, बडिशेप, जवतळ्या स्त्रांगा ह्या जिनसा पाव तोळा-प्रमाणें घेऊन त्या बारीक कुटून वीस लिंबांचे रसात घट्ट होईपर्यंत घोटाव्या. नंतर अर्धा तोळाप्रमाणे वड्या बांधाव्या व सकाळ-संध्याकाळ एक एक वडी विड्याच्या पानांतून खाणें.

९. **अंडवृद्धी :** खुरासनी ओंवा ६॥ तोळे, व जायफळ १ एकत्र कुटून त्याचे तीन भाग करावे. एक भाग मनुष्याचे लघवींत शिजवून आंडावर बांधावा. रात्रभर राहूं द्यावा. बरें न झाल्यास याप्रमाणें तीन दिवस करावें.

१०. **अतिसार :** रुमामस्तकी, हिंगोळ, भीमसेनी कापूर, कस्तुरी, अफू, व गेरू समभाग चूर्ण करून आल्याच्या रसांत खल करावा, व वाटाण्याएवढ्या बांधाव्या. सकाळ-संध्याकाळ एक एक देणें.

११. **आंग दुखणें :** वडाचीं पिकलेलीं पानें २१ व गूळ दोन तोळे दोन दोन शेर पाण्यांत शिजवावें. अर्धा शेर पाणी राहिलें म्हणजे प्यावें. याप्रमाणें तीन दिवस करावें.

१२. **आमांश :** (१) सुंठ ६ मासे, व पिंपळी ६ मासे, या जिनसा तुपांत तळून बारीक कुटाव्या व पिकलेल्या बेलफळाचा गर एकत्र करून रोज सकाळीं पाण्या-बरोबर खाणें. याप्रमाणें ७ दिवस करणें. (२) सुंठ ५ तोळे, जायफळ १, अफू फुलांचीं सालें १ तोळा, अजमोदा १ तोळा, पिठी साखर ७ तोळे, सर्व जिनसा एकत्र कुटून रोज सकाळीं पाव पैसा भार पूड खावी व थोडें थंड पाणी प्यावें.

१३. **इंद्रिय गुलाब :** (१) रेवाचिनी १॥ तोळा, पांढरें जिरें २ तोळे, कलमी सोरा १॥ तोळा, वेलदोडे ३ तोळे, ह्या जिनसा एकत्र कुटून ह्याच्या ४ पुड्या कराव्या. चार पुड्या चार दिवस सकाळीं खाव्या. पुडी खाल्ल्यानंतर अर्धाशेर दूध व अर्धाशेर पाणी एकत्र करून प्यावें. (२) सोरा मीठ अर्धा तोळा, व पाणी पावशेर एकत्र करून द्यावें.

१४. **इंद्रिय बळकट करणें :** ब्रह्मदंड्याच्या मुळाची साल पावशेर, तालीमखाना पावशेर, ह्या जिनसा एक शेर पाणी घालून कढवाव्या, व २१ गोळ्या बांधाव्या. रोज एक गोळी खावी. ४२ दिवस स्त्री बंद करावी. (२) आस्कंद ५ तोळे, लवंग ७ तोळे, जायफळ १ तोळा, वेलदोडे १ तोळा, मेंढीचें दूध ५ शेर घेऊन त्यांत चूर्ण करून शिजवावें व रोज एक गोळी खावी. (३) कावळ्याचें पीत व तूप एकत्र करून दोन वेळ लिंगास लेप करावा. (४) हरणाची चर्बी, बकऱ्याची चर्बी, व मध समभाग घेऊन ऊन करून स्त्रीसंगाच्या पूर्वीं दोन तास लिंगास लेप करून सुकवावा. (५) हिरा हिंग पाव पैसाभार, व दुप्पट मध, एकत्र करून

इंद्रियास लेप करावा; लांब होईल. (६) पिवळ्या कवड्याची राख मधांत कालवून स्त्रीसंगाच्या पूर्वी १ तास इंद्रियास लेप करावा.

१५. **इंद्रिय नष्ट झालेलें येणें** : (१) पिळूची मुळी, फूलदारूत उगाळून इंद्रियास लेप देणें; वर नागवेलीचें पान बांधून रात्रभर राहूं देणें. सुजलें तरी हरकत नाहीं. याप्रमाणें ७ दिवस करावें. (२) घेटवेलीचें मूळ व गूळ समभाग रोज खाणें. २१ दिवस. (३) गुगुळ २ तोळे, कुचले २ तोळे, बचनाग २ तोळे, खुरासनी ओवा २ तोळे, ओवा २ तोळे, बिब्बे १ तोळा, सोमूल पाव तोळा, गाईचें दूध दोन तोळे, ह्या जिनसा तुपांत खलून त्याच्या गोळ्या वाटाण्याएवढ्या बांधाव्या. व त्याचें तेल काढून तें तेल इंद्रियास लावावें. वर नागवेलीचें पिकलेलें पान बांधावें. ज्या वेळीं बांधावें त्याच वेळीं दुसरे दिवशीं सोडावें. याप्रमाणें ७ दिवस करावें.

१६. **इसब** : काळीं मिरें व शेंदूर समभाग घेऊन म्हशीच्या लेण्यांत खल करून इसबावर लावावें.

१७. **कपाळशूळ** : सजनाचें बीं पक्का पावशेर घेऊन दळावें, व भाकर भाजावी. भाकर एक बाजूनें कच्ची ठेवून त्या बाजूस तिळाचें तेल लावावें, व तेलाच्या बाजूनें डोक्यावर बांधावी. रात्रभर राहूं द्यावी. बरें न झाल्यास याप्रमाणें तीन दिवस करावें.

१८. **कफरोग** : रिंग्यांचा फेंस प्यावा. उलटी झाली तरी चिंता नाहीं. फेस जास्त प्याल्यानें गुण लवकर येईल.

१९. **कर्णरोग** : हिंग, पांढरी गुंज, कांदे, कडू लिंबाचा गर दोन तोळे घेऊन, पाण्यांत वांटून त्याच्या ओल्या गोळ्या मोराचा एक पाय जवप्रमाण तोडून पावशेर तिळाच्या तेलांत घालून कढवावें. आंतील जिनसा जळून तें तेल गाळून ठेवावें. कान फुटत असेल तेव्हां कानांत घालावें.

२०. **कर्णस्राव** : हत्तीच्या दातांचा चुरा एकशेर, एकशेर तिळाचें तेल घालून चुरा जळेपर्यंत कढवावें, व वस्त्रगाळ करून ठेवावें. कान वाहात असेल त्यांत तेल तीन दिवस घालावें.

२१. **कलप** : अस्वलाचें पित्त घेऊन त्यांत गव्हाचें पीठ भिजे तितकें भिजवून मळावें. तें पीठ एक दिवस पांढऱ्या कोंबड्यास चारावें, व कोंबड्यास तीन दिवस झांकून ठेवावें. तीन दिवस गहूं चारावे. कोंबडा काळा होईल. मग चौथे दिवशीं कोंबडा कापून तूप वगैरे घालून मटन शिजवावें. रस्सा येईल तो प्यावा. म्हणजे केस काळे होतील. मांस सुकवून ठेवावें. तें खाल्लें तरी केंस काळे होतील.

२२. **कंवर पुष्टी** : तालीमखाना पावशेर, धावड्याचा चीक पावशेर, केळें १॥ तोळा, गोडें तेल पावशेर, तूप १॥ तोळा, जुना गूळ पावशेर, अगोदर गूळ तेलांत तळावा. नंतर सर्व जिनसांची वस्त्रगाळ पूड करून त्यांत मिळवून २१ गोळ्या

बांधून रोज १ गोळी द्यावी. (२) आंवळकठी व बिब्बे समभाग चूर्ण करून गोळी दांतास लाविल्याशिवाय गिळणें ७ दिवस.

२३. **कंठ सुस्वर करणें** : जायपत्री, वेळा, पिंपळी मातुलिंगदळ, आंवळे समभाग मधांतून घेणें. १ ते ७ दिवस.

२४. **काकमांजर** : चित्रक व गेळा लिंबूच्या रसांत उगाळून लेप करणें. ३ दिवस.

२५. **कमळा (कावीळ)** : (१) कळीचा चुना रोज १ गुंजप्रमाणें खाणें. ७ दिवस. (२) एळ्या, मोठे हरडे, काळीं मिरें १ तोळा, प्रमाणें घेऊन पूड करावी. अजमोदा अर्धा तोळा घेऊन पाण्यात उकडावी, व ती पूड त्यांत टाकावी, व अर्धा तोळा प्रमाणें गोळ्या बांधाव्या. रोज १ प्रमाणें खाणें. ७ दिवस.

२६. **कास (खोकला)** : तालीसपत्रें १॥ तोळा, वेलदोडे ·॥· तोळा, दालचिनी ·॥· तोळा, पिंपळ चार तोळे, सुंठ पाठ तोळा, काळीं मिरें अर्धा तोळा, खडीसाखर ३ तोळे, सर्व एकत्र कुटून बोराएवढी गोळी रोज दोन, याप्रमाणें खाणें. ७ दिवस.

२७. **कुत्रा चावला** : (१) गुगुळ व रुईचा च्वीक समभाग गाळून लावणें. (२) म्हावळंगीच्या पाल्याचा रस चावल्या जागीं लावणें. (३) कात माडाच्या मुळांचा रस नवटांक घेऊन पिणें. ७ दिवस.

२८. **कोड** : पांढरे सुपळीचें मूळ १ तोळाप्रमाणें रोज दोन वेळां खाणें (पाण्यांत उगाळून). १ ते २१ दिवस. (२) हरताळ १ तोळा, बांवच्या १ तोळा, वेरोवसा १ तोळा, रुईचा चीक १ तोळा, सर्व एकत्र कुटून गाईच्या लोण्यांतून रोज अंगास लावणें, १ ते ६४ दिवस.

२९. **कृमी** : घेटोळीची मुळी, उटकटारा, चिनी साखर, व जिरें समभाग देणें. ३ दिवस.

३०. **खरूज** : (१) आकात्याच्या सालीचा रस रोज ४ मासे प्रमाणें खाणें. १ ते ७ दिवस. (२) समुद्रशोकाचें फळ उगाळून लावणें. ७ दिवस. (३) पिंपळीची साल, व पानसुपारी, व कात वांटून लेप करावा.

३१. **गजकर्ण** : आंबेहळद कुटून आंबट ताकांत भिजवून मातीच्या भांड्यांत भरून तें भांडें ११ दिवस जमिनींत पुरावें. नंतर राळ्याच्या तांदळाच्या धुवणांत वांटून गजकर्णास लावणें. ३ ते ७ दिवस.

३२. **गंडमाळ व खरूज** : (१) सजीखार व चुना समभाग वांटून लावणें ७ दिवस. गजकर्णहि बरें होतें.

३३. **गंड (गलगंड) गंडमाळा** : (१) गुगुळ मधांत उगाळून लावणें. ७ दिवस. (२) डावरीचें बीं १ तोळा, शेवग्याचें बीं १ तोळा, व कात २ तोळे, एकत्र वांटून लेप करणें. ७ दिवस. (३) सापाची मेंग तुपांत भिजवून राख करावी.

कसीला ७ तोळे, राळ ३ तोळे, काळीं मिरें १॥ तोळा, मुरदाडशिंग १॥ तोळा, मोरचूत १॥ तोळा, ह्या जिनसा एकत्र कुटाव्या; नंतर लिंबाचीं पानें वांटून त्यांची गोळी करून तुपांत तळावी. गोळी जळेपर्यंत ठेवून नंतर काढावी. नंतर भांडें चुलीवरून उतरून त्यांत बाकीच्या जिनसा टाकून लिंबाच्या लांकडाचा सोटा करून त्याच्या तोंडी पैसा बसवून त्यानें तीन दिवस घोटावें. नंतर गंडमाळीस लावावें. (४) करीयाचे झाड मुळासकट वांटून ७ दिवस लेप देणें.

३४. **गरमी** : म्हावरुकाच्या पाल्याचा रस नवटांक, व गाईचें दूध नवटांक, एकत्र करून ७ दिवस पिणें. **पथ्य**– अळणी खाणें. (२) हरभऱ्याची डाळ शिजवून अर्धा तोळा त्याचें पीठ घेऊन तोंडास सर्व ठिकाणीं जिभेनें चाटावें, व अर्धा तोळा खडीसाखर पाण्यांत टाकून तें पाणी पिणें. **तोंड आल्यासही उपयोगी**. (३) मोरचूद अर्धा तोळा, बाळहरडा पाऊण तोळा, काळीं मिरें १॥ तोळा, पांढरा कात १॥ मासा, एकत्र कुटून चार तास पाण्यांत खल करावा. गोळी हरभऱ्याएवढी बांधावी. सकाळ-संध्याकाळ एक एक खाणें. ७ ते १४ दिवस. पाण्यांत उगाळून चट्टयांवर लावणें. (४) सकया सोमूळ २ गुंज, सफेता २ मासे, जग दोन मासे, एकत्र कुटून, लिंबाच्या रसांत १८ तास खल करावा. गोळी वाटाण्याएवढी बांधावी. रोज एक खाणें. ३ ते ७ दिवस. मच्छी दूध वर्ज्य. (५) पारा १ मासे, मोरचूद १ मासा, काळीं मिरें ३ मासे, बाळहरडे ६ मासे, व जमालगोटे ७ मासे सालांसह तुपांत तळावे, व ते सोलून त्यांतील पाव काढावी, व सर्व एकत्र कुटून ७ भाग करावें. रोज पुडी एक खावी. जुलाब झाल्यास दहीं घ्यावें. पथ्य दूधभाताशिवाय सर्व खावें.

३५. **तोंडांत चट्टे पडल्यास** : बाभळीची साल, वेळाचे मुळाची साल, आंब्याची साल, पळसाची साल, समभाग घेऊन सावलींत कुटून पूड करावी, व १ तोळा पूड अर्धा शेर पाण्यांत टाकून तें पाणी कढवून नवटांक राहिले म्हणजे गाळून त्याच्या गुळण्या कराव्या. ३ दिवस.

३६. **इंद्रियास चट्टे पडल्यास** : म्हशीच्या शिंगाचा मोड खापरांत घालून चुलींत तापवून त्याची बुकी करावी व चट्टयांवर लावावी. ३ दिवस.

३७. **गरमीनें अंग फुटल्यास** : (१) लवंग १ तोळा, मुरदाडशिंग १ तोळा, लहान वेलदोडे १ तोळा, तीन वर्षांचा जुना गूळ पावणेचार तोळे, सर्व जिनसा एकत्र कुटून नागवेलीच्या पन्नास पानांच्या रसांत भिजवून गोळी वाटाण्याएवढी बांधावी. रोज एक खाणें. १ ते १४ दिवस. (२) मुरदाडशिंग पाऊण तोळा, मोरचूत पाऊण तोळा भाजून घ्यावी. भरडी सुपारी तीन तोळे भाजून घ्यावी-सहा लिंबांची राख हीं सर्व एकत्र वांटून सहा लिंबांच्या रसांत खलावी, व हरभऱ्या-एवढ्या गोळ्या बांधाव्या. रोज दोन गोळ्या खाणें. १ ते १४ दिवस. (३) **धुरी देणें**– मोरचूत, इंगूळ, लिंबाची साल, रुईच्या मुळाची साल, बाभळीची साल, सर्व जिनसा पाऊण तोळाप्रमाणें घेणें. साली सावलींत सुकवून घेणें. सर्व एकत्र कुटून

प्रत्येक वेळीं ३ मासे बुकीची धुरी घेणें. धुरी घेते वेळीं मानेपर्यंत पांघरूण घेणें. धुरी तोंडाला लागू देऊं नये. (४) गोड्या एरंडाच्या मुळाची साल १॥ तोळा, इंगूळ १॥ मासा, एकत्र करून वरीलप्रमाणें धुरी घेणें.

३८. **इंद्रियास चट्टे पडल्यास** : (१) सुपारीचें फळ, मुरदाडशिंग, काळी सुपारी (अर्धी कच्ची भाजावी), मोरचूत, शंखजिरें, राळ, ह्या जिनसा १॥ मासाप्रमाणें व कवडी एक जाळून सर्व कुटून वस्त्रगाळ करून गाईच्या तुपांत खलून चट्टयांवर लावणें.

३९. **गुरांना रोग न येण्यास** : टेंबुरणीचें झाड शनिवारीं आंवतून रविवारीं रात्रीं आणून गोठ्यांत पुरावें.

४०. **गरमी** : परसाकडेच्या वेळीं सूज येऊन आग होते तेव्हां गुलाबाचीं फुलें २ मासे, एक अंड्याचें बलक एकत्र खलून लावणें, व अफू ७ मासे, लवंगा, जायपत्री, केशर, शतावरीमूळ, पिंपळमूळ, कस्तुरी, चिकनमूळ, पिंपळी, हरडा, तेजपत्र, आघाडा, गूळ, सुंठ, बेहेडा, अफू, सरडेमूळ, जिरें, आंवळकठी, मायफळ, तालीमखाना, अक्कलकारा, जटामांसी, चोपाचिनी, भोकरबीज, जायफळ, बचनाग, चिनक, कांचकुवरी, सर्व जिनसा १ मासाप्रमाणें घेऊन पूड करून २ तोळे मधांत हरभऱ्याएवढ्या गोळ्या करणें. सकाळीं व संध्याकाळीं विड्यांतून एक एक खाणें; १ ते १४ दिवस. **सर्दी, वात, सन्निपात व हिंवताप जाईल.**

४१. **घटसर्प** : मकामूळ किंवा मखमलीच्या फुलांची माळ गळ्यांत घालणें.

४२. **घोण चावल्यास** : एरंडीचें तेल चावलेल्या जागीं लावणें.

४३. **घोड्याचा रोख** : काळीं मिरें, मीठ, हळद, लसूण, व याच्या वजनाइतकीं वावडिंगें चारणें. ३ ते ७ दिवस.

४४. **सर्व रोगांवर चूर्ण** : लवंग, भीमसेनी कापूर, वेलदोडे, मकवत कीर, नागकेशर, जायफळ, वाळा व त्यांच्याइतकी साखर ४ मासेप्रमाणें रोज खाणें.

४५. **छातींत दुखणें** : एरंडाचें मूळ पाऊण तोळा, घेऊन त्याची फकी दुधांतून तीन दिवस खाणें, व त्याचाच लेप घेणें.

४६. **सन्निपात ज्वर** : (१) कोरानन व जायफळ स्त्रीच्या दुधांत उगाळून नाकांत ओतणें. ३ दिवस. (२) हळद भाजून अर्धा तोळा, गूळ अर्धा तोळा, घेऊन एकत्र खाणें. ३ दिवस.

४७. **चातुर्थिक ज्वर** : (१) सहादेवीमूळ शनिवारीं आंवतून रविवारीं काढून कानांत बांधावें. (२) इंद्रावणीमूळ शनिवारीं आंवतून रविवारीं आणावें, व त्याचा रस मस्तकावर घालावा. तीन दिवस.

४८. **पित्तज्वर** : (१) गुळवेल, त्रिफळा, व कासीनद समभाग वाटून लेप करावा. (२) ३ दिवस शेळीच्या मुतांत हरडा उगाळून पिणें. ७ दिवस.

४९. **श्लेषावात** : इंद्रावणीचें मूळ रात्रीं पिकलेल्या केळयांत घालून सकाळीं काढावें, व केळें खावें. ३ दिवस.

५०. **पित्तज्वर** : हरताळ व चुना समभाग घेऊन कारळीच्या पाल्यांत घोटून मुगाएवढी गोळी बांधावी. रोज १ गोळी साखरेंतून देणें.

५१. **नवज्वर** : हरताळ, पारा व गंधक समभाग घेऊन, कारळीच्या व लिंबाच्या रसांत खल करून, गुंजेएवढी गोळी बांधणें; रोज एक साखरेंतून देणें.

५२. **ज्वर** : रिंगणी मूळ १ तोळा, बावळे साल १ तोळा, भारंगमूळ १ तोळा, निंबाचा पाला १ तोळा, व जायफळ यांचें चूर्ण रोज ३ मासे प्रमाणें देणें. (२) धने व सुंठ यांचा काढा रोज दोन वेळा देणें. ७ दिवस. (३) तृतीय ज्वर मोरचूत, कुचल्याचें बीं, हरताळ हीं १॥ मासाप्रमाणें घेऊन कोरफडीच्या गरांत खल करून काळ्या मिऱ्याएवढी गोळी करणें; रोज एक गोळी नुसती देणें.

५३. **ज्वर** : मनशीळ अर्धा तोळा, कळीचा चुना १॥ तोळा, हीं बारीक कुटून मातीच्या भांड्यांतून चुलीवर ठेवावी, व जळून पहिल्यानें पांढरा रंग येईल, व नंतर लाल रंग येईल तेव्हां भांडें उतरावें, व थंड झाल्यावर औषधें भरून ठेवावें व नागवेलीच्या पिकलेल्या पानांतून रोज एकदां तांदुळभारप्रमाणें देणें. ३ दिवस.

उवा (मंत्र) लालगाई कवळ कवळ परवत कवळ जाई कवळ गाई कवळ बच्याकवळ बच्चेके पेटमें डब्बा डबा कडेल लकडीया बडे गुरूकी शक्ती मेरी भक्ती महादेव भक्ती पुरा मंत्र ईश्वरी वाचा.

५४. **अर्धशिशी, डोक्यांतील रोग, नाकांतून पाणी येणें व अर्धडोकें दुखणें** : पिवळ्या कापडाची राख अर्धा तोळा रुईच्या चिकांत भिजवून, वाळवून त्यांत पाच लवंगा वांटाव्या व रोज ४ वेळां नाकांत ओढावी. ३ दिवस.

५५. **डोक्यांतील खरूज** : आंबेहळद पाऊण तोळा, तुरटी पाव तोळा, हिराकस पाव तोळा, कपिला पाव तोळा, यांची बुकी करून तुपांत शिजवून नंतर खल करावा व लावावा. ७ दिवस.

५५-अ. **डोक्यांतील किडे** : (१) मनुष्याचीं जळालेलीं हाडें १ तोळा, डिकेमाली ३ मासे, कापूर ३ मासे, हीं बारीक कुटून नाकांत ओढावीं. (२) तिळवणीचीं ७ पानें, रुईचें पिकलेलें पान, हीं सावलींत वाळवावीं व काळें मिरें यांची पूड करून नाकांत ओढावी. म्हणजे नाकांतून किडे पडतील; नंतर दवणा, मरवा यांचीं पानें पावशेर घेऊन यांचा रस प्यावा. ३ दिवस. (३) रानशेणीची राख वस्त्रगाळ करून ७ दिवस रुईच्या चिकांत भिजवून घालून मग खळ करून वाळवावी, व ती नाकांत ओढावी. (४) भुईरिंगिणीचीं पानें सावलींत वाळवून वस्त्रगाळ करून नाकांत ओढावीं.

५६. **डुकराचें विष** : उतरणीच्या व रुईच्या पानांचें चूर्ण तांदुळाच्या धुवणांतून देणें. ३ दिवस.

५७. (१) **ढाळ** : सिवद्याचें मूळ तांदळाच्या धुवणांत उगाळून देणें. ३ दिवस. (२) पांढरी डाळ पाव तोळा, दहीं १ तोळा एकत्र करून देणें. ३ दिवस. (३) कुटकी व कावळी यांची पूड तीन मासे पाण्यांतून देणें. ३ दिवस. (४) लालखापरी ४ तोळे, लिंबाच्या रसांत खल करून हरभऱ्याएवढी मात्रा देणें. ३ दिवस. (५) आंबा व जांभूळ यांची साल दह्यांतून उगाळून देणें. ३ दिवस. (६) (मुलांस) जांभळीची अर्धी बी नाकांत उगाळून देणें. ३ दिवस.

५८. **तंबाखू प्रयोग** : तंबाखूस खालील लिहिलेल्या वनस्पतींचीं ७ प्रमाणें पुटें देऊन ओढावी. (१) अफूची– वात जाईल. ७ दिवस वातूळ खाऊं नये. (२) हरभऱ्याची आंब– पित्त शमेल. ७ दिवस. (३) जिरें– हिंवज्वर जाईल. १४ दिवस. (४) मिरें– दमा जाईल. ७ दिवस. (५) कणेरी– मुखदुर्गंधी जाईल. १४ दिवस. (६) धोतरा– अफू घशांत असल्यास जाईल. १४ दिवस.

५९. **दांतविकार** : (१) कोरांटी, जाईचा पाला, व घेटोळीचें मूळ ह्यांच्या वड्या बांधून, २१ दिवस दातांस घासाव्या. दांत घट्ट होतील. (२) जाईचा पाला व घेटोळीचें मूळ यांचें चूर्ण करून मधांत वड्या बांधाव्या, व २१ दिवस दांत घांसावे. (३) उन्हाळीच्या मुळांत दांतवण करून दांत घासावे. १४ दिवस. (४) निगडी, लवंगा, व वावडिंगें रुईच्या चिकांत खल करून दांतांस लेप करावा. कीड मरेल. ३ दिवस. (५) **दंतशूळ**– गुळवेल पाण्यांत वांटून वड्या बांधून दांतांखालीं धरणें. ३ दिवस. (६) कळलावी कंद शनिवारीं आंवतून रविवारीं आणून डावीकडे दांत दुखत असेल तर उजव्या हातानें उगाळून लावणें, व उजव्या दाढेस कीड असेल तर डाव्या हातानें उगाळून लावणें म्हणजे कीड मरेल. (७) गूळ, गुगुळ व मोहरी समभाग वांटून दुखत असेल त्या दाढेच्या पायास लेप देणें. (८) कोष्ठ, देवदार, एरंडमूळ, पिंपळी यांचें समभाग चूर्ण तुपांत कढवून दाढ दुखत असेल त्या ठिकाणीं बाहेरून लेप करावा. ३ दिवस.

६०. **देवीचे वण जाण्यास** : दारुहळद, लोध्र व गाईचें लोणी समभाग उटणें करून लावणें. १४ दिवस.

६१. **धातुविकार** : लागीचे म्हणजे कारस्कीचें बीज पक्का शेर, तूप १ शेर, साखर १ शेर, गाईचें दूध ओतावें, व २८ लाडू बांधावे. रोज १ लाडू खाऊन वर चार तोळे तूप व चार तोळे दूध प्यावें. स्त्रीसंग करूं नये. २८ दिवस. (२) **धातुपुष्टीस** : गाजरें पक्का शेर भाजून, साल काढून रोज खावें. ७ दिवस व १४ दिवस. स्त्रीसंग करूं नये.

६२. **धातु वाहात असल्यास** : बाभळीची अंतरसाल पक्का ४॥ शेर, एक मण पाण्यांत टाकून कढवावें; व १० शेर पाणी राहिलें म्हणजे वस्त्रगाळ करून तें कोऱ्या मातीच्या भांड्यांत कढवावें, व त्यांत केशर १ तोळा टाकावें. पाणी सर्व आटल्यावर हरभऱ्याएवढ्या गोळ्या बांधाव्या. रोज दोनप्रमाणें खाणें. १४ दिवस.

६३. **वीर्यवृद्धि :** पारोशा पिंपळाचें बीं ४ तोळे, वडाचें बीं २ तोळे, साखर ५ तोळे, रोज खाणें. ७ दिवस.

६४. **धातुपुष्टी :** १० बिब्बे कातरून ३ शेर दुधांत टाकून, तेल निघालें म्हणजे सालें काढून टाकावीं, व रानशेणीच्या आगीनें खवा होईपर्यंत कढवावें. रोज दोन तोळे खावें.

६५. **धातु पातळ झाल्यास :** चिंचोके १ तोळा, गव्हांचा चीक १ तोळा, पळसाचा डिंक १ तोळा, गाईच्या ४ तोळे तुपांत गव्हांचा चीक भाजावा. नंतर बाकीचे जिन्नस कुटून टाकावे, व खडीसाखर टाकावी. असे २१ दिवस खावें.

६६. **धातुवृद्धी :** (१) आघाड्याच्या मुळाची साल ३ तोळे, सालममिश्री ३ तोळे, व साखर ६ तोळे एकत्र करून रोज अर्धा तोळा दुधांतून खाणें. २१ दिवस. २१ दिवस स्त्रीसंग करूं नये. (२) सालममिश्री, सफेत मुसळी, तालीमखाना, दक्षिणी गोखरूं, उटगनाचें बीं, इसबगोल, तजकमली, या जिनसा २ तोळे प्रमाणें घेणें, व शेमळाच्या झाडाचा चुरा अर्धा शेर सुकलेल्या भोंकराचा मैदा २ तोळे एकत्र कुटून, रोज १ तोळाप्रमाणें २१ दिवस खाणें. वर दूध प्यावें. २१ दिवस स्त्रीसंग करूं नये. (३) कोरफड ऊन राखेंत भाजून त्याचा गर १। शेर तुपांत तळावा, लाल झाल्यावर उतरावा; नंतर १। शेर तूप व १। शेर साखर (पिठी) यांचा पाक करून त्यांत गर टाकावा. त्याचा पाक करून ४ दिवस कल्हईच्या भांड्यांत ठेवून पांचवे दिवसापासून रोज दोन तोळेप्रमाणें खाणें. स्त्रीसंग करूं नये. (४) शेवग्याच्या झाडाच्या मुळाची साल अर्धा शेर, बाभळीच्या शेंगा पावशेर, जिरें पावशेर, रुमीमस्तकी ३॥ तोळे, सालममिश्री ३॥ तोळे, हीं एकत्र कुटून त्यांत पिठीसाखर १ शेर घालून, रोज १ तोळाप्रमाणें खाणें. वर १ शेर दूध गरम करून प्यावें. संग करूं नये. (५) कथील भस्म २ तोळे, अभ्रक भस्म २ तोळे, सितलाचिनी २ तोळे, व कबाबचिनी २ तोळे, हीं एकत्र करून खलून रोज ३ मासेप्रमाणें खाणें. संग करू नये. (६) अक्कलकाढा, मोचरस, काळी मुसळी, ढवळी मुसळी, भुईमूग, गोड, इंद्रजव, पांढरा मध, चिनिया गोंद, कवचबीज, तेजबळ, तालीमखाना कबाबचिनी, दक्षिणी गोखरूं, रुमीमस्तकी, ह्या जिनसा पाव तोळ्याप्रमाणें घेऊन एकत्र कुटाव्या, व सर्व जिनसांइतकी पिठीसाखर घालून रोज पाव तोळाप्रमाणें खावें. वर पाव तोळा दूध प्यावें. स्त्रीसंग करू नये.

६७. **धातू व इतर पदार्थांची शुद्धी :** इंगळ, सैंधव, जवखार ह्यांचा खल तीन तास पाण्यांत करावा मग शुद्ध होतील. **अभ्रक**– शेवग्याच्या सालीच्या रसांत तीन तास मातीच्या भांड्यांत करावा. **कवडी**– तीन वेळां तापवून ताकांत टाकणें. **माती**– दीड तास लिंबाच्या रसांत शिजविणें. **सोनामुखी**– बारीक करून सहा तास नरमूत्रांत ठेवणें, व सहा तास म्हशीच्या मुतांत ठेवणें. **पारा**– चित्रक, लसूण, भांग, लाल बीट, तुरटी, लोकरीची राख व राई यांत खल करून

७ वेळां धुणें. **नवसागर**— तीन दिवस नरमूत्रांत ठेवणें. **लोह**— गोमूत्र, ताक, तेल, कढवून त्यांत लोह तापवून १२ वेळ भिजविणें. **गंधक**— दूध भांड्यांत घालून भांड्यांचें तोंड बांधावें. त्यावर गंधकाचें मीठ टाकून वर झांकण ठेवून भांडें कांठा-बरोबर पुरावें व ५ तास रानशेणीची आग देणें. **सैंधव**— हळदीच्या पाण्यांत तीन दिवस भिजविणें.

६८. **धापा** : (१) खाऱ्या खाजणांतील तिवराचीं तिन पानें विड्यांतून खाणें. उलटी झाल्यास वऱ्याची आंबील पिणें. (२) वावाळीची साल पक्का शेर व पाणी राहिल्यावर उतरावें, व त्यांत पारा १ तोळा, गंधक २ तोळे, पिंपळी ३ तोळे, बाळहरडा ४ तोळे, बेहेडा ५ तोळे, अडुळशाचा पाला ६ तोळे, भारंगीचें मूळ ७ तोळे, वाकडशिंग ८ तोळे. जिनसा कुटून खल करावा. मात्रा २ गुंजा प्रमाणें मधांतून देणें. ७–१४ दिवस. (३) कुसळें बीज १ शेर भाजून राख करावी. त्यांत लोध्र समभाग मिश्रित करावें. रोज पाव तोळा फकी खावी. (४) गाईच्या दुधांत अर्धा तोळाप्रमाणें भारंगीचें मूळ उगाळून रोज दोन वेळां देणें. २१ दिवस. गव्हांची भाकर, तूप, तूर व भेंडी खाणें. (५) आघाड्याच्या मुळ्या ५ शेर, रुईचीं पिकलेलीं पानें ५ शेर, हुऱ्याच्या पिकलेल्या काड्या ५ शेर. ह्या सर्व सावलींत वाळवून वस्त्रगाळ करून पूड करावी, व कढईत १॥ मण पाणी ठेवून त्यांत टाकून कढवावें, व पूड होईपर्यंत आटविणें. व १ गुंजाप्रमाणें साखरेंतून देणें. थंड होण्यास तुपांतून देणें. भूक लागण्यास विड्याच्या पानांतून देणें. (६) शेवग्याच्या अंतर-सालीचा रस ४ तोळे, आल्याचा रस ४ तोळे. ७ ते १४ दिवस घेणें.

६९. **नळवायु** : सागरगोटा १, व गूळ १ तोळाप्रमाणें तीन दिवस देणें.

७०. **नारू** : (१) स्वागी पाव तोळा तुपांतून देणें. ३ दिवस. (२) कवड्या ऊद १ तोळा वांटून दह्यांतून देणें सकाळीं. संध्याकाळपर्यंत जेवूं नये. संध्या-काळीं दहींभात खाणें. (३) कांटेऱ्याचें बीं वांटून नारूवर बांधणें.

७१. **नेत्ररोग** : (पडदे झडण्यास) (१) अडुळशाच्या रसांत खडीसाखर उगाळून अंजन करावें. ७ ते १४ दिवस. (२) म्हाक्याच्या रसांत हळदीची कांडी उगाळून अंजन करावें. ७ ते १४ दिवस.

७२. **डोळे गेलेले येण्यास** : पांढरी सुरली लिंबूच्या रसांत उगाळून अंजन करावें. ७ ते १४ दिवस.

७३. **खुपऱ्या व फूल झडण्यास** : (१) उपळसरीचें मूळ व काळेरीचा पाला एकत्र वांटून गाईच्या लोण्यांत कढवून डोळ्यांवर बांधणें. ३ दिवस. (२) **कोपरे फुलल्यास**— मनुष्याचीं नखें १ तोळा हुऱ्याच्या चिकांत ३ दिवस भिजत ठेवावीं. नंतर मातीच्या भांड्यांत घेऊन त्याची राख होईपर्यंत आगीवर ठेवावी. नंतर सोना-मुखी १ तोळा, व लाहूरी मीठ १ तोळा, घालून खल करावा; व १ वर्षाच्या

मुलाचें मूत्र घेऊन पुन्हा ७ दिवस खल करून तें औषध शिशाच्या काडीनें डोळ्यांत भरावें. (३) जव १ तोळा घेऊन, शेणाच्या गोळ्यांत ठेवून तो गोळा वाळवून जाळावा, व जळालेले जव २ तोळे, फुलांसह लवंग, व १ तोळा गाईचें तूप कांशाच्या वाटींत घालून, एक लिंबाचा सोटा घेऊन त्याच्या तोंडीं पैसा बसवून त्या सोट्यानें ३ तास खल करावा. मग तें औषध पाण्या येतपर्यंत लावावें.

७४. **फूल जाण्यास** : पांढऱ्या घेटोळीचें मूळ व बेलाचें फळ घोड्याच्या मूत्रांत उगाळून १२ दिवस अंजन करावें. (२) बेलाचा रस घोड्याचें मूत्र समभाग घेऊन ३ दिवस अंजन करावें. (३) पांढऱ्या कणेरीचा चीक व गाईचें लोणी समभाग घेऊन ३ दिवस अंजन करावें. (४) चिंचेच्या पाल्याचा रस व स्त्रीचें दूध ३ तोळे एकत्र करून खाणें. ७ दिवस.

७५. **परमा** : (१) कपाशीच्या पाल्याचा रस ३ तोळे, साखर १॥ तोळा, व गाईचें दूध ३ तोळे एकत्र करून खाणें. ७ दिवस. (२) बाभळीची साल ०८। हिवराची साल, हकली साल, आंब्याची साल, चिंचेची साल, व खैराची साल एकत्र कुटून रोज १ तोळा प्रमाणें चूर्ण साखरेंतून खाणें. ७ दिवस. (३) गोपीचंदन दोन गुंजा रोज पानाच्या विड्यांतून देणें. (४) चिंचोके नवटांक, बाभळीचा पाला ०८। टांक, निरगुडीचा पाला नवटांक, जिरें ३ तोळे, खडीसाखर नवटांक एकत्र कुटून रोज ३ तोळेप्रमाणें खाणें. (५) बाळंतनिंबाच्या अंतरसालीची फकी अगर रस ३ मासे, रोज दह्यांतून देणें. गव्हाची भाकर, तूर, मुगाची डाळ, अळणी खाणें.

७६. **तिडीक परम्यावर** : तज २। तोळे, शेवग्याचा डिंक ॥।· तोळा, धणे ७॥ मासे, बडीशेप १ तोळा, विजबंद १ तोळा, सर्व जिनसा एकत्र करून कुटून रोज ९ मासे याप्रमाणें खाणें व नंतर शेळीचें दूध ०८। शेर पिणें. ७ दिवस.

७७. **तिडीक-परमा, रक्त-परमा व पू-परमा यांवर, किंवा धातु जात असल्यास** : मुलतानी माती ०८। शेर, जुन्या तरटाची राख २ तोळे, हीं एकत्र करून कोऱ्या मडक्यांत घालून, व २ शेर पाणी ओतावें; व एक रात्रभर ठेवून त्यांतील पाणी पिईल तितकें दुसरे दिवशीं अनशेपोटीं पिऊं देणें. ७ दिवस. (२) काकडीचें बीज १ शेर, पाषाणभेद १॥ तोळा, तालीमखाना ०८। शेर, हीं एकत्र कुटून रोज ·॥· तोळाप्रमाणें खाणें. नंतर गाईचें दूध ०८। शेर पिणें. ७ दिवस. (३) आंवळे १॥ तोळा, धणे १॥ तोळा, राळ १॥ तोळा, चुणे गोंद ३॥ तोळे, हीं एकत्र बारीक कुटून त्यांच्या वजनाइतकी साखर मेळवावी, व रोज ·॥· तोळाप्रमाणें सकाळीं खाऊन थोडें पाणी पिणें. ७ दिवस.

७८. **पारा (अंगावर फुटल्यास)** : सहादेवीचा रस ०८। शेर, बेलतुरीचा रस ०८। शेर, खडीसाखर ३ तोळे, जिरें ३ तोळे, हीं एकत्र कुटून रोज घेणें. २१ दिवस.

७९. **आंगांतील जाण्यास** : पानथरीची मुळी १ तोळा, उटकटारा १ तोळा, नाबद साखर १ तोळा, जिरें १ तोळा, हीं एकत्र करून रोज सकाळीं खाणें. ७ दिवस.

८०. **पारा, इंगूळ वगैरे अंगावर फुटल्यास** : सत्त्व सुंठ, नसोतर, सातरा, कपिला, हरडे (मोठे), बेहेडे, हीं सर्व ३ तोळेप्रमाणें, आंवळे ३।।। तोळे, अक्कलकारा २। तोळे, पिठी साखर ८८१।, व अमरवेल ३ तोळे, सावलींत वाळवून कुटावी. वस्त्रगाळ करावी. नंतर साखरेचा पाक करून त्यांत सर्व जिनसा टाकाव्या, व ढवळून उतरावें. त्यांतील रोज सकाळीं २ तोळेप्रमाणें खाऊन थोडें ऊन पाणी ढवळून उतरावें. त्यांतील रोज सकाळीं २ तोळेप्रमाणें खाऊन थोडें ऊन पाणी पिणें. ७ दिवस. (२) रसायन खाऊन अंगावर फुटल्यास— वंशलोचन ४ मासे प्रमाणें रोज सकाळीं पाण्यांतून खाणें. ७ दिवस.

८१. **पारा, हरताळ, इंगूळ, तांबेश्वर खाल्ल्यास** : कोळिंजन व कंकोडी चूर्ण करून समभाग रोज २ वेळ खाणें.

८२. **पित्तविकार** : हरणाच्या शिंगाची राख म्हशीच्या लोण्यांतून खाणें. ७ दिवस.

८३. **पोटांतील सर्व रोगांवर** : (मुलांच्या सुजीस) काळा बोळ, गजगा, व सुंठ समभाग उगाळून पोटांत देणें. व वर लेप करणें.

८४. **पोट फुगल्यास काढा** : हरडेदळ १ तोळा, अडुळसा मूळ १ तोळा, किराईत १ तोळा, लसण्या पाषाणभेद १ तोळा, धमासा १ तोळा, बाहव्याच्या शेंगेचा मगज १ तोळा, हीं एकत्र कुटून अर्धा शेर पाणी घालावें, व कढवून ·।।· नवटांक राहिलें म्हणजे उतरून त्यांत ·।।· तोळा मध घालावा. याप्रमाणें ३ दिवस देणें.

८५. **पोटशूळ** : (१) त्रिफळा, लोहचूर्ण, मध हीं १ मासाप्रमाणें ३ दिवस देणें. (२) पांढर्‍या सुपलीचें मूळ, तांदूळ धुवणांत उगाळून पोटावर लेप देणें. ३ दिवस. (३) काळीं मिरें २ तोळे, लसूण २ तोळे, कडू निंबाचा रस २ तोळे हीं एकत्र वांटून १४ गोळ्या बांधाव्या. व रोज सकाळ-संध्याकाळ २ गोळ्यांप्रमाणें ७ दिवस देणें. (४) टांकणखार, पादेलोण, शेंदेलोण, जवखार, काळीं मिरें, सुंठ, हीं प्रत्येकीं ·।।· तोळाप्रमाणें घेऊन चूर्ण करून पाण्यांत गोळी बांधणें. रोज सकाळ-संध्याकाळ ३ दिवस देणें.

८६. **पोट फुगल्यास** : सुंठ, तज, कपिला, सुरवारी हरडा, गंधवेल, भुईतरवड हीं सर्व ·।।· तोळाप्रमाणें घेऊन चूर्ण करावें, व ३ मासे चूर्ण पाण्याच्या घोटाबरोबर घेणें. ३ दिवस.

८७. **प्रदर** : काळ्या कुड्याची साल व बोळ हीं समभाग घेऊन त्यांत

१ शेर पाणी घालून, आटवून पावशेर करावें. त्यांत नवटांक गाईचें लोणी घालून देणें. ३ दिवस.

८८. पौष्टिक : बचनाग १२।। गुंजा, पांढऱ्या कणेरीच्या मुळाची साल ५ तोळे, इसगंध, नागोरी, तुकुमराई, काळी मुसळी, काळी विचवा, बिजबंद, उटगणाचें बीज, कवचबीज, दक्षण गोखरूं, खुरासनी ओवा, अक्कलकारा, रुमीमस्तकी, उटकटाराच्या मुळीची साल, खारका, पिंपळी, शेवलाच्या मुळांची साल, गोरखमुंडी, कडू कुटकी, कोळिंजन, चिकणसुपारी, मायफळ, चिनी बोरांच्या मुळाची साल, ढवळी मुसळी, शिंगाड्याची मुळी, नागोरी डिंक, भोंकरें, नागरमोथा, समुद्रशोक, शहामिरी, गवोले, चोपचिनी, सोनामुखी, ह्या सर्व जिनसा प्रत्येकीं ५ तोळेप्रमाणें घेऊन, एकत्र कुटून, वस्त्रगाळ कराव्या, व त्याच्या वजनाइतकी पिठीसाखर घेऊन त्याचा पाक करावा; व त्यांत ती पूड टाकून ढवळावी, व पाक घट्ट झाला म्हणजे त्यांत कथलाचें भस्म १० मासे, अभ्रकाचें भस्म १० मासे, भांग २ मासे, हीं टाकून उतरावें. व सकाळीं १० मासे, व संध्याकाळीं १० मासेप्रमाणें देणें. औषध सुरू असेल त्याच्या दुप्पट दिवस स्त्रीसंग करू नये.

८९. प्लीहा (कवळू) : लोणखार ०८।। शेर, डांगरमीठ ०८। शेर, रानसुरण ३ तोळे, निरगुडीमूळ ३ तोळे, रुईचा चीक ०८। शेर, व रुईचीं पानें ३, हीं एकत्र कुटून मडक्यांत भरून शेणीच्या अग्नींत देणें. तीं खाक १ मासाप्रमाणें विड्यांच्या पानांतून देणें. १ ते १४ दिवस. जलोदर, वातपित्त, पाणथरी, गुल्म, आमवात हीं कमी होतील. (२) स्वागीची लाही २ गुंजप्रमाण वेलवांग्याच्या फोडीबरोबर खाणें. १ ते १४ दिवस.

९०. बद व वळ : (१) राळ १ तोळा, पारा १ तोळा, ही एकत्र खलावीं. नंतर पितळींत पाणी घेऊन ७ वेळां धुवावें. व नंतर ४ तोळे तूप टाकून, पुन्हा खलावें. नंतर तें औषध कपड्याच्या पट्टीस लावून ती पट्टी बदास लावावी. दुसरे दिवशीं दुसरी लावणें. १ ते ७ दिवस. (२) सरस व गंधाबिरोजा हीं बरोबर घेऊन बारीक कुटून, त्यांत. पाणी टाकून मातीच्या खापरांत कढवून कपड्याच्या पट्टीस लावून बदावर बसविणें. १ ते ७ दिवस.

९१. भगिंदर : लिंबाची अंतरसाल सावलींत वाळवून कुटून वस्त्रगाळ करावी, व ६ मासेप्रमाणें देणें. १ ते २१ दिवस.

९२. भस्में : (१) **हरताळ–** चित्रकाचा पाला हातानें चोळून गोळा करावा, त्यांत हरताळाचा खडा घालून तो गोळा सुतानें गुंडाळावा व रानशेणीच्या अग्नींत देणें. कुरकटाप्रमाणें भस्म होय. (२) **लोहभस्म–** पोलाद कानसून एरंडीचा मगज काढून एकत्र खल करावा, व मातीच्या भांड्यांत घालून रानशेणीच्या अग्नींत ७ वेळ देणें. भस्म होय. (३) **ताम्रभस्म–** कवसकोहिरीचा पाला व शेंगा दोन्ही एकत्र कुटून गोळा करावा. त्यांत पैसाभाग ओवा घालावा, व त्यांत तांबें घालून

३ गजपुट अग्नींत देणें. भस्म अस्मानी होय. (४) **पारद भस्म**– उतरणीच्या पाल्याचा रस व पारद बाळंतनिंबाच्या सोऱ्यानें खल करावा. गोळा झाला म्हणजे उतरणीच्या पाल्याचा चोथा घेऊन त्यांत गोळी घालून अग्नी गजपुट द्यावा. (५) **इंगूळ भस्म** : अमरवेलीचा रस ८८। व १ तोळा इंगूळ घालून खल करावा. गोळा झाला म्हणजे कोऱ्या गाडग्यांत घालून तोंडाभोंवती पीठ बसवून गजपुट रानशेणीचा अग्नि देणें. (६) **कथील भस्म** - काळ्या उंबराची साल घेऊन तिच्यामध्यें कथलाचे तुकडे ठेवून एक कपडमाेट करून शेणीच्या आगींत देणें. भस्म होईल. तें देण्याची पद्धत रोज एक गुंज खालीलप्रमाणें—

(१) मुख-दुर्गंधी– कापुरांतून दिल्यास जाईल. (२) काखेतील दुर्गंधी– चाफेल तेलांतून दिल्यास जाईल. (३) परमा – काळ्या तुळशीच्या रसांतून दिल्यास जाईल. (४) जलोदर जाण्यास– शेळीच्या दुधांतून देणें. (५) क्षयरोग जाण्यास– सोर मिटांतून देणें. व सालममिश्रींतून देणें. (६) रक्तपिती जाण्यास– हळदींतून देणें. (७) धातू बंद होण्यास– मधांतून देणें. (८) आंगाचा दाह शमण्यास– नागवेलीच्या पानांतून देणें. (९) उदर जाण्यास– हरड्यांतून देणें. (१०) स्त्रीस गर्भ धरण्यास– कस्तुरींतून देणें. (११) अजीर्ण मोडण्यास– दुधांतून देणें. (१२) वात जाण्यास– लसणींतून देणें. (१३) प्लीहा जाण्यास– सोन्यांतून देणें. (१४) मंदाग्नी जाण्यास– पिंपळींतून देणें. (१५) पित्त जाण्यास– दह्यांतून देणें. (१६) कुष्ठ जाण्यास– मुसळकंदांतून देणें. (१७) महापित्त जाण्यास– लवंगांतून देणें. (सर्व ठिकाणीं ३–७ किंवा १४ दिवस देणें.

९३. **नेत्ररोग** : (पडदा आल्यास) पिंपळीची अंतरसाल व पांढरे तीळ समभाग कुटून न्हाव्याच्या शिळेवर उगाळून डोळ्यांत अंजन घालावें. ३–७ दिवस.

९४. **रातांधळें** : (१) कानांतील मळ व मध समभाग घोंटून डोळ्यांत अंजन करावें. ७ दिवस. (२) कडू दुध्या जाळून त्याची राख व मध समभाग घोंटून डोळ्यांत अंजन घालावें. ३ ते ७ दिवस.

९५. **वांती** : (१) नीवशोकिला याचें फळ व माहाळुंगीचें मूळ उगाळून खाणें. (२) भाताच्या लाह्या सुख्या अगर पाण्यांत भिजवून खाणें. (३) हिराकसी, मायफळ, अक्कलकारा, सोनगेरू, या जिनसा प्रत्येकीं १ तोळाप्रमाणें, व कस्तुरी ३ मासे हीं बारीक वाटून पाण्यांत खल कराव्या, व गोळ्या चिनी बोराएवढ्या बांधाव्या, व डाळिंबाच्या रसांत अगर जांभळीच्या पाल्याच्या रसांत उगाळून देणें.

९६. **गंडमाळा** : आघाड्याचा पाला, व त्याचे केसर बारीक वाटून त्यांत समभाग लोणी घालून गोळी बोराएवढी करून सकाळीं व संध्याकाळीं देणें. ३ ते ७ दिवस.

९७ **वायुरोग** : कानी निगडीचा रस, वावळ्याचा रस, व म्हाडीच्या तांदुळाची पेज, प्रत्येकीं एक तोळाप्रमाणें देणें. ७ दिवस.

९८ **अनुर्बात :** (१) वासनवेलीचा पाला, तूप, खडीसाखर एक तोळाप्रमाणें कुटून गोळी करून कांहीं वेळ तोंडांत ठेवून खाणें. ३ ते ७ दिवस. (२) कपाळफोडीच्या पाल्याचा रस व काकडीच्या पाल्याचा रस प्रत्येकी १ तोळा प्रमाणे व गाईचें तूप, दोन तोळे एकत्र करून देणें. ३ ते ७ दिवस.

९९. **वात, शूळ, मंदाग्नि, अजीर्ण, विषमज्वर, द्वाड खाखळी :** सुंठ १२ तोळे, पिंपळी ९ तोळे, लवंग ९ तोळे, सुद्दी १ तोळा, गूळ ५ तोळे, हळद २ तोळे, हीं एकत्र कुटून गोळी बांधावी व ऊन पाण्यांतून देणें. ७ दिवस.

१००. **तिडीक वायू व सर्दी :** (१) खारका ४२ बिया काढून, लवंग ३ तोळे, गुग्गुळ ३ तोळे, ढोर गुंजेची मुळी ३ तोळे, पिंपळी १॥ तोळा, अक्कल-कारा १॥ तोळा, या जिनसांची पूड करून गव्हाच्या पिठाचा लेप करून रानशेणींत भाजाव्या. नंतर पीठ काढून ७ दिवस मधांत ठेवून रोज १ प्रमाणें देणें. (२) कोळिंजन, सुद्दी, रुमीमस्तकी, बच्चनाग, अक्कलकारा, समुद्रफळ, दालचिनी, कबाब-चिनी प्रत्येकीं एक तोळाप्रमाणें, फुटाणे ४ तोळे, गाईचें दूध ०।॥० शेर एकत्र करून १४ गोळ्या मधांत बांधाव्या. १४ दिवस देणें.

१०१. **जीभ वाकडी येते :** (१) सबंध जायफळ २४ तास तोंडांत ठेवावें. (२) काळीं मिरें वांटून, चिलमींत घालून, दोन दोन तासानें चिलम्या १२ ओढाव्या.

१०२. **दांतांत लावणें :** (१) तुरटी दोन तोळे, मोरचूद, एक तोळा, प्रमाणें घेऊन बारीक वांटावें व तव्यावर टाकून त्याचें पाणी मरेपर्यंत भाजावें व बाटलींत भरून ठेवावें. (२) रुमी मस्तकी, मोरचूत भाजून १ मासा जायफळ, तुरटी भाजून, हिराकस, लहान वेलदोडे, मोठे हरडे, बाळहरडे, सतावरी, चिकणी सुपारी, बदामाचीं सालें, सफेत कात, पाक, मिरें, लोहचूर बाभळीचा चीक, ह्या जिनसा प्रत्येकीं १ तोळा प्रमाणें घ्याव्या, व बारीक कुटाव्या. व दातास लावून तोंड धुवावें. १४ दिवस. (३) नागोरी, इसगंध ४ तोळे, कायफळ २ तोळे, सत्वसुंठ १ तोळा, जुना गूळ ३६ तोळे, दुधाचा खवा ३६ तोळे, गूळ व खवा यांचा पाक करून नंतर बाकीचीं औषधें बारीक कुटून त्यांत शिजवावीं, व कांचेच्या बरणींत ठेवावीं. रोज सकाळीं एक तोळा प्रमाणें देणें. (४) आळीव, कळोजी, मेथी, मिरें, आंबेहळद, ह्या जिनसा ३॥ तोळेप्रमाणें घेऊन पूड करावी, व सात भाग करून रोज सकाळीं एक भाग देणें. (५) सुंठ, स्वागीची लाही, शेंदेलोण, हिंग, ह्या जिनसा प्रत्येकीं ०॥० तोळाप्रमाणें घेऊन बारीक कुटून शेवग्याच्या साळीच्या रसांत खलून गोळ्या २१ कराव्या. रोज १ प्रमाणें देणें. (६) बिब्बे १॥ तोळा, खुरा-सनी ओवा पाव तोळा, पारा पाव तोळा, रसकापूर पाव तोळा, काळे तीळ पाव तोळा, जुना गूळ अर्धा तोळा, सर्व जिनसा बारीक कुटून खल करावा, व गोळ्या चिनी बोराएवढ्या बांधाव्या. रोज सकाळीं १ प्रमाणें देणें.

१०३. **गहृच्या वायूवर** : (१) सत्त्वसुंठ, तरटाचें बीं, नागोरी, इसगंद प्रत्येकीं १ तोळाप्रमाणें घेऊन बारीक कुटून त्याच्या पुड्या ७ करून रोज सकाळीं १ देणें. (२) बचनाग १ तोळा, कस्तुरी ३ मासे, अक्कलकारा १ तोळा, जायफळ १ तोळा, जायपत्री १ तोळा, लवंग १ तोळा, रुईच्या फुलांचा गर १ तोळा, ह्या जिनसा बारीक कुटून शेळीचें दूध २॥ तोळे घेऊन त्यांत शिजवाव्या व नंतर घोंटून रोज सकाळीं जोंधळ्याएवढी गोळी करून देणें.

१०४. **पक्षघात, वायू गहृच्या वायूवर** : (१) धने ०८१। शेर, खोबरें नवटांक, कायफळ नवटांक, अक्कलकारा नवटांक, पिंपळमूळ ०८। शेर, जुना गूळ, ०८३ शेर, हीं एकत्र करून लिंबाएवढी गोळी रोज रात्रीं निजतेवेळीं व पहांटेस देणें. २१ दिवस. (२) सोनामुखी ·॥· तोळा, नसोदे, रेवाचिनी, बडीशेप, सत्त्वसुंठ, मिरें, शहाजिरें, पांढरें जिरें, ओंवा, खुरासनी ओंवा, पिंपळी, जवखार, शेंदेलोण, पादेलोण, मीठ, सांबरीमीठ, ह्या जिनसा प्रत्येकीं १ तोळाप्रमाणें घेऊन बारीक पूड करून लिंबाच्या रसांत खल करून दोन मासेप्रमाणें गोळ्या बांधाव्या, आणि रोज सकाळीं व संध्याकाळीं एक एक देणें.

१०५. **पोटशूळ** : पिकलेलें केळें भाजून त्यांतून काळें मिरीं (पूड), व तूप एकत्र करून देणें. ३ दिवस.

१०६. **तेलें** : (१) **वात नाशिनी**— निगडीच्या पाल्याचा रस २ शेर, रुईच्या पानांचा रस २ शेर, मिरजोळीच्या पाल्याचा रस २ शेर, धोतऱ्याच्या पाल्याचा रस २ शेर, तिळाचें तेल २ शेर, मोहरी ०८॥ शेर, चोर ओंवा ८॥ शेर, लसूण ०८॥ शेर, हिंग ४ तोळे, ह्या जिनसा कुटून टाकाव्या, व तांब्याच्या भांड्यांत ओतून तेल तयार होईपर्यंत कढवावें. (२) इसगंध ०८। शेर, व शिरसाचें तेल ०८। शेर, एकत्र कढवावें, व त्यांत अफू ४ तोळे घालून लावावें. (३) **कर्पूर तेल**— कापूर २ तोळे, व ओंव्याचें फूल १ तोळा, एका बाटलींत भरून ठेवावें. म्हणजे तेल तयार होईल.

१०७. **नासारोग** : आपट्याच्या पाल्याचा रस नवटांकप्रमाणें सकाळीं व संध्याकाळीं पिण्यास देणें. ७ दिवस.

१०८. **वायुगोळा** : सत्त्वसुंठ ·॥· तोळा, कुटकी ३ मासे, इंद्रावणीचें मूळ ३ मासे, ओवा ·॥· तोळा, तेल्या स्वागी ·॥· तोळा, सजीखार १ तोळा, समुद्र-फेन ·॥· तोळा, जवखार ·॥· तोळा, तज २॥ तोळे, ह्या जिनसा बारीक कुटून रोज सकाळीं ६ मासेप्रमाणें देणें. (२) सत्त्वसुंठ, सगदयोंइ, चुना, मध, ह्या जिनसा एकत्र करून गोळ्या चिनी बोराएवढ्या बांधाव्या. गोळा उठला म्हणजे देणें. ३—७ दिवस. (३) एरंडीच्या बियाचें तेल १॥ तोळा, दूध ·।· शेर, हळद ३ मासे, एकत्र कढवून, ऊन असतांना पिण्यास देणें. ३—७ दिवस. (४) मोरचूत १ तोळा, सोनागेरू २ तोळे, हीं बारीक वांटून बिन कल्हईच्या भांड्यांत पावशेर

पाण्यांत टाकून, पाणी आटेपर्यंत विस्तवावर ठेवावें. नंतर ती मात्रा विड्यांतून दोन तांदूळभार देणें. काहिली झाल्यावर तूप देणें. ३ दिवस. (५) पिंपळी उगाळून देणें ३–७ दिवस. (६) केळीच्या कांद्याचा रस २ तोळे, व तूप २ तोळे एकत्र करून देणें. ३–७ दिवस. (७) सोनामुखी, पादेलोण, बाळहरडा, हळद हीं सम-भाग घेऊन त्याची फकी एक तोळा खाऊन, त्याच्यावर ऊन पाण्याचा एक घोंट पिणें, त्याच्यावर साळीचा भात, व ५ तोळे तूप खावें. ४ दिवस.

१०९. **सूत्ररोग** : लघवी अडल्यास– नदींतील शिंप्यांचें चूर्ण वस्त्रगाळ पूड करून, रुईच्या चिकांत तीन बोटें रोटी करून, रानशेणींत जाळून ठेवणें, व तें चूर्ण पानाच्या विड्यांतून तांदूळभारप्रमाणें देणें. रोज १ वेळ. ७–१४ दिवस. (२) कपाळफोड्याचें बोंड अगर बीं १ तोळा, जिरें २ तोळे, एकत्र वांटून दोन पैसेभार पाणी काढून त्यांत चिनीसाखर ·।।· तोळा घालून पाजणें, १–२ दिवस.

११०. **सूत्र सारखें वाहातें त्यावर** : रेवाचिनी ४ मासे, कबाबचिनी ४ मासे, दालचिनी ४ मासे, वेलदोडे लहान ६ मासे, कलमी सोरा २॥ मासे, सर्व जिनसा बारीक कुटून सहा भाग करावे. रोज एक भाग पूड खाऊन त्याच्यावर ०८।।। दूध, व ०८॥ शेर पाणी एकत्र करून देणें. ६ दिवस.

१११. **सुताची धार मोटी झाल्यास** : जुनें गोणपाट पांढरें होईपर्यंत धुवावें, वाळवावें, व जाळून राख करावी. राख ३ मासे, व मध ३ तोळे एकत्र करून रोज एक वेळ देणें. सुताची धार आपणास पाहिजे तितकी बारीक झाली म्हणजे औषध बंद करावें.

११२. **सूत बंद झाल्यास** : (१) माक्याचा रस २ तोळे पाजावा. (२) मुळ्याच्या पानांचा रस ०८। शेर, खडीसाखर ३ तोळे, एकत्र करून देणें.

११३. **सूत्र फार वाहातें त्यावर** : शिंगाड्याचीं पानें ·।।· तोळा, व पिठीसाखर ·।।· तोळा, एकत्र करून देणें. १४ दिवस.

११४. **कंवर**– गव्हाचा चीक १ तोळा. गाईचें तूप ४ तोळे घेऊन चीक भाजावा; नंतर चिंचोके १ तोळा व पळसाचा डिंक १ तोळा, हीं बारीक वांटून तुपांत टाकावीं, व दोन तोळे खडीसाखर टाकावी. हा खवा २१ दिवस खाणें.

११५. **मूळव्याध** : (१) काळ्या धोतऱ्याचें पाळ पाण्यांत उगाळून दिवसां-तून तीन वेळ लावावें, व गांजाची धुरी दोन वेळ देणें. ७–१४ दिवस. (२) सबजाचा रस, तुळशीचा रस, माक्याचा रस, हे दीड तोळा, व कागदी लिंबाची राख, व रेशमाची राख एकेक गुंज त्यांत टाकून देणें. (३) सैंधव, ओवा, सुंठ व चित्रक मूळ समभाग पाण्यांत उगाळून लेप करावा. ३–७ दिवस. (४) उदाचें फूल ·।।· मासा, व लोणी ·।।· मासा एकत्र घोंटून कोंबास लेप करावा. ३–७ दिवस. (५) रुईचा चीक व हळद एकत्र करून लेप करावा. ७ दिवस. (६) खैराच्या मुळाची साल सावलींत वाळलेली, त्याचें चूर्ण ३ मासे, व गाईचें दहीं ४ तोळे एकत्र

करून रोज खाणें. २१ दिवस. (७) शंखजिरें २ तोळे वांटून त्यांच्या पुड्या ८ कराव्या. रोज एक पुडी, ८८। पोटांत घेणें. **पथ्य**— दहींभात, अळणी खावें.

११६. **मुळव्याधीनें रक्त पडे यास** : कडू कारवी ·।।· तोळा, सोनगेरू ३ मासे, हीं बारीक वाटून तीन भाग करावे. व ३ शेर दहीं देऊन रुमालात बांधून टांगून ठेवावें, व त्याचें पाणी निघेल तें एक पुडी खाऊन मग प्यावें. दिवसास दहीं खाऊन रहावें. रात्रीं जेवावें.

११७ **रक्त पडे यास** : चुन्याची गोळी चिनी बोराएवढी करून, ऊन केलेल्या तुपांत टाकून गिळावी. याप्रमाणें मोड पडेपर्यंत रोज करावें. **पथ्य**— गव्हांची भाकर, तूप, मुगाची डाळ खावी.

११८. **मुतखडा** : (१) मुळ्याचीं पानें सुकलेलीं ८।। शेर, व सोरमीठ ८।। शेर थंड पाण्यांतून दोन वेळ देणें. (२) पाषाणभेद, वेळापिंपळी, तीन वर्षांचा जुना गूळ समभाग घेऊन, बोराएवढी गोळी करून खडीसाखर २ तोळे, गाईचें ताक ४ तोळे, गोळीबरोबर खाणें. ३ दिवस. **पथ्य**— दहींभात. (३) केशर १ गुंज, कस्तुरी १ गुंज, जायफळ २ गुंजा, जायपत्री १ गुंज, रसांत १ गुंज, हीं सर्व एकत्र कुटावीं. त्यांतील थोडें चूर्ण खाऊन मग शेळीचें दूध ८।। शेर प्यावें. औषध घेतेवेळीं चौरंगा-वर बसावें. नंतर तंबाखूत लखवस लौंचन पाव पैसा भाग घालून कालवावें, व गुड-गुडींत घालून ओढावें. तंबाखूच्या ठसक्याबरोबर इंद्रियांतून रेतीप्रमाणें खडे निघतील.

११९. **परमा** : (१) म्हावरुखाच्या पाल्याचा रस नवटांक, गाईचें दूध नवटांक एकत्र करून देणें. ७. दिवस **पथ्य**— अळणी खाणें, (२) ब्रह्मीच्या पाल्याचा रस, ·।।· तोळा खावा. ७ दिवस.

१२०. **मुरडा** : (१) दूध व पानांचा विडा सकाळीं कांहीं खाण्यापूर्वीं पोटभर खाणें. ३ दिवस. (२) **रक्त पडे यास**— कलमी डाळची ५ तोळे, आंवळकूट २।। तोळे, एकत्र करून रोज १ तोळा प्रमाणें खाणें. ३—७ दिवस.

१२१. **राजयक्ष्मा** : (१) मिरपूड ·।।· मासा, तोंडलीच्या पाल्याचा रस १ तोळा, एकत्र करून खाणें. ७—१४ दिवस. (२) सुंठ, वेखंड, लहान सोनामुखी, बाळहरडे, मोठे हरडे, वावडिंग, कुभे, इंद्रजव, नसोद, धमासा, गिरमाधा, पित्त-पापडा, पळसपापडा, पांढरें जिरें, शहाजिरें, ओंवा, खुरासनी ओंवा, किरमानी ओंवा, सत्त्वसुंठ, पिंपळमूळ, पिंपळी, काळीं मिरें, गंधक, सवणागर, हिंग, कापूर, काचली सडीक, कचोरा, शेंदेलोण, लाहूरी मीठ, जवखार, समुद्रफेस, कुटकी, साबरी मीठ, पठाणी लोध्र, मुरुडशेंग, कसीला, कसीली दालचिनी, जायफळ, मोठे वेलदोडे, लहान वेलदोडे, गुळवेलीचें सत्त्व, सर्व जिनसा समभाग एकत्र कुटून तें चूर्ण सकाळीं ३ मासे व संध्याकाळीं ३ मासेप्रमाणें खाणें. २१—४२ दिवस.

१२२. **अग्निमांद्य** : (१) पिंपळी, पिंपळमूळ, चित्रकमूळ, समभाग चूर्ण करून पाण्यांतुन खाणें. ३—७ दिवस. (२) सोनामुखी १।। तोळा, आंवळे, हरडे,

बेहेडे, साबरमीठ, काळें मीठ, शेंदेलोण, लहान वेलदोडे, पांढरें जिरें, शहाजिरें, चित्रक, दालचिनी, डाळिंबाचे दाणे, सत्त्वसुंठ, सजीखार, किरमाणी ओंवा, वरील जिनसा ·॥· तोळाप्रमाणें; पुढील जिनसा ·।· तोळाप्रमाणें— पिंपळी, मिरें, अजमोदा, धणे, बडीशेप, जव, तकयास्वांगा, ह्या सर्व जिनसा बारीक कुटून २० लिंबाच्या रसांत खल करावा, व सहा मासे एवढ्या वड्या बांधाव्या. सकाळीं व संध्याकाळीं एकेक वडी विड्यांतून खाणें. (३) बाळहर्डे ४ मासे, रंगारी हर्डे २ मासे, मोठे हर्डे ६ मासे, आंवळे ६ मासे, डाळिंबीचें बीं २ मासे, तिरमीर ४ मासे, सत्त्वसुंठ २ मासे, ओंवा ४ मासे, बाळसन ३ मासे, गुलाबाचीं फुलें ४ मासे, बडीशेप ४ मासे, तवखील ४ मासे, रुमीमस्तकी ४ मासे, पुदीना ६ मासे, मेथी एक तोळा, पिंपळी ३ मासे, मिरें ३ मासे, तज ३ मासे, शेंदण्या भाजलेल्या ३ मासे, या सर्व जिनसा बारीक कुटून लिंबाच्या रसांत खल करावा, व गोळ्या चिनी बोराप्रमाणें बांधाव्या. रोज सकाळीं एक व संध्याकाळीं एक प्रमाणें गोळी खाणें.

१२३. **मुलांच्या आंगास लावणें** : (आरोग्यासाठीं हितकारक) वेखंड व चिनी हळद समभाग तेलांत कढवून मुलाच्या आंगास सदोदित लावावी.

१२४. **वीर्यवृद्धी** : लवंग १ तोळा, जायफळ १ तोळा, पांढरा कात १ तोळा, मेंढीचें दूध नवटांक, साखर ४१ तोळे, या जिनसा एकत्र कुटून ४१ शेर (पक्के) दुधांत खवा करावा, व रोज दोन तोळे प्रमाणें खावा. स्त्रीसंग करू नये. (२) आघाड्याच्या मुळाची साल, सालममिश्री व साखर समभाग घेऊन रोज सकाळीं पाव पैसाभार दुधांतून खाणें. २१ दिवस.

१२५. **पौष्टिक** : पिठीसाखर ००॥· शेर, बिब्बे ००।· शेर, गव्हाचा मैदा ००॥ शेर, पिंपळमूळ १ तोळा, मिरीं १ तोळा, सुंठ ३ तोळे, केशर ३ मासे, गाईचें तूप ००॥ शेर, कढवून त्यांत बिब्बे कातरून टाकावे. व तेल निघालें म्हणजे सालपटें काढून टाकावीं. सर्व जिनसा बारीक कुटून त्यांत टाकाव्या, व २८ लाडू बांधावे, आणि रोज सकाळीं व संध्याकाळीं एकेक खावा. स्त्रीसंग करू नये.

१२६. **धातुविकार** : बाभळीची अंतरसाल ३६ तोळे, एक मण पाण्यांत घालून बाभळीच्या लाकडांनीं पाणी कढवावें. पाणी पाव हिस्सा राहिला मग गाळावें, व पुन्हा कोऱ्या मडक्यांत ठेवून केशर एक तोळा टाकून पाणी कढवावें; साफ आटल्यावर गोळी हरभऱ्याएवढी बांधावी. रोज दोन वेळ, दोन गोळ्या खाव्या.

१२७. **इंद्रियास बळ येणें** : (१) कवस कोहिरीचें मूळ व बीं बोकडाच्या मुतांत उगाळून लिंगास लेप करावा. (२) मुळ्याचें बीं ३ तोळे वांटून लिंगास लेप करावा. (३) गुंजेचें चूर्ण म्हशीच्या तूपांत खलून लिंगास लेप करावा. (४) पांढऱ्या कणेरीचें मूळ पूर्व दिशेला गेलेलें सांवली न पडतां काढावें, व मधांत उगाळून लिंगास लेप करावा.

१२८. **कठीण होण्यास** : आघाड्याचा व धोतऱ्याचा रस समभाग घेऊन धोतऱ्याच्या बोंडांत २ दिवस ठेवावा, व नंतर लोण्यांत खलून लिंगास लेप करावा.

१२९. **सभामोहिनी** : काळ्या धोतऱ्याच्या बियाचें चूर्ण व गोरोचन उगाळून त्याचा टिळा कपाळीं लावावा.

१३०. **सर्दी, वात, सन्निपात, व हिंवताप यावर गोळया** : लवंग, जायपत्री, केशर, शतावरी-मूळ, पिंपळमूळ, कस्तुरी, चिकणमूळ, पिंपळी, हरडा, तेजपत्र, आघाडामूळ, सुंठ, बेहेडा, अफू, सराटेमूळ, जिरें, आंवळकूट, मायफळ, तालीमखाना, अक्कलकारा, जटामासी, चोपचिनी, भोंकरबीज, जायफळ, बचनाग, चित्रक, काचकुवरी, सर्व जिनसा १ मासाप्रमाणें घेऊन चूर्ण करावें, व तीन तोळे मधांत खल करून चण्याएवढ्या गोळ्या बांधाव्या, व सकाळ-संध्याकाळ पानाच्या विड्यांतून एकेक खाणें.

१३१. **मोहिनी** : (१) "ॐ नमो भगवते त्रिमुख रसनायका स्वाहा" या मंत्रानें विडा १०८ वेळ मंत्रावा. मंत्र जपते वेळीं वडाखालीं बसावें. (२) तुळशीचें झाड मंत्रानें शनिवारीं आंवतून रविवारीं आणावें. नंतर चित्रक व तुळशीचीं पानें एकत्र करून शेळीच्या दुधांत गोळी करून सावलींत वाळवावी, व उगाळून कपाळास तिलक लावणें.

१३२. **भ्रतारमोहिनी** : लिंबाचें लांकूड बोकडाच्या मुतांत उगाळून योनीस लेप करावा.

१३३. **बंदुकीची गोळी लागल्यावर** : ढेकाळी फळांसुद्धां कुटून त्याचा रस गोळी लागली असेल त्या जखमेंत पिळावा. गोळीचें पाणी होऊन जखम बरी होईल. ३ ते ७ दिवस.

१३४. **धान्याची रास वाढण्यास** : स्वाती नक्षत्रांत आंवळीचा तिवडा आणून खळ्यांत पुरावा.

१३५. **वाघ** : पांढऱ्या घेटोळीचें मूळ रविवारीं सुमुहूर्तें आणून चूर्ण करून ठेवावें. वाघ दिसला म्हणजे खावें. वाघ आंगावर येणार नाहीं.

१३६. **अनेक रोगांवर** : हरणाचें शिंग जाळून राख करावी, व म्हशीच्या लोण्यांतून देणें. ७ दिवस.

१३७. **सर्प** : (१) शिरसाच्या बियांचें चूर्ण निवडुंगाच्या चिकांत खलून दंशावर लावावें. (२) कानांतील मळ दंशावर लावावा. (३) आंबाडीचा खार. चुना, व हळद, समभाग घेऊन गोमूत्रांत खलून, दंशावर लेप करावा. ३ ते ७ दिवस.

१३८. **विषविकार (पोटांत विष गेल्यास)** : (१) मोरचूत भाजून, १ तांदुळभार ताकांत उगाळून, थोडा माक्याचा रस टाकून, देणें. उलट्या झाल्यावर तूप पाजावें. (२) चिंचेचीं मुळें व रुईचीं पानें समभाग वांटून खाणें. ३-७ दिवस.

१३९. **विष (वाघाचे) :** (१) पांढऱ्या घेटोळीच्या मुळाचा रस, व मध दंशावर लावणें. (२) वडाची साल, लिंबाची साल, व शेवग्याची साल पाण्यांत उगाळून दंशावर लावणें. (३) पात्रीमूळ मधांत उगाळून दंशावर लावणें.

१४०. **डुकराचें विष :** उतरणीच्या व रुईच्या पानांचें चूर्ण तांदुळाच्या धुवणांतून देणें. ३ दिवस.

१४१. **लूत :** मिरकाड्याचें मूळ तुपांत उगाळून लावावें. ३–७ दिवस.

१४२. **गरमी (आंगावर फुटल्यास) :** (१) ८८१। शेर पिठीसाखरेचा पाक करून त्यांत सत्त्वसुंठ, निशोत्तर, सावरा, कपिला, मोठे हरडे, बेहेडे, आंवळे, अक्कलकारा, अमरवेल सावलींत वाळवून ह्या सर्व जिनसा ३ तोळेप्रमाणें घेऊन चूर्ण करणें, व पाक तयार झाल्यावर त्यांत घालावें. रोज दोन तोळेप्रमाणें खाणें. व वर थोडें ऊन पाणी पिणें. ७ दिवस. (२) वंशलोचन ४ तोळेप्रमाणें रोज पाण्यांतून खाणें. ७ दिवस.

१४३. **झाड्याच्या वेळेस सूज येऊन आग होत असेल तर :** गुलाबाचीं फुलें ७ मासे, अफू २ मासे, १ अंड्याचा बलक, व दोन-तीन थेंब तेल एकत्र खलून आग होत असेल त्या जागीं बोटानें लावणें. ३ दिवस.

१४४. **शेंदूर पोटांत गेल्यास :** कागदी लिंबाचा रस खाणें, ७ दिवस.

१४५. **शीण :** मीठ ६ तोळे, त्रुचाचे बीं ६ तोळे, विसरजिरें ६ तोळे, कुचले १॥ तोळा, मीठ शिवाय करून बाकी जिनसा भाजून चूर्ण करावें. नंतर मीठ एकत्र करून रोज ४ मासेप्रमाणें ऊन पाण्यांतून खाणें. १४ दिवस.

१४६. **मोडोशी :** पिंपळी १ तोळा, पिंपळमूळ १ तोळा, म्हाक्याचा रस १ तोळा एकत्र घोटून खाणें. ३ दिवस.

१४७. **वरण :** (१)वाघाटीच्या मुळ्याचा काढा—निकाढा देणें. **सूज**— गुगुळ, हळद व लसूण ·॥· पैसाभार घेणें. ७ दिवस. (२) उंबराची अंतरसाल, जाईचें मूळ व निर्गुंडीचा पाला एकत्र वांटून लेप लावणें. ७ दिवस. (३) उन्हाळीचा रस ८८। शेर, खडीसाखर ३ तोळे, गोमूत्रांतून देणें. ३–७ दिवस. (४) सुंठ १॥ तोळा, ८८॥ शेर पाण्यांत टाकून तें पाणी आटवावें, व २ तोळे राहिलें म्हणजे त्यांत गाईचें तूप ·॥· पैसाभार, खडीसाखर १ तोळा घालून देणें. ३–७ दिवस. (५) निरवसी व शेळीच्या लेंड्या एकत्र करून, वांटून (पाण्यांत) ऊन करून सुजेवर वांधणें. ७ दिवस.

१४८. **नारू :** (१) स्वागीभस्म ३ मासे तुपांतून देणें. ३ दिवस. (२) कवड्या ऊद १ तोळा वांटून, दह्यांतून देणें. संध्याकाळपर्यंत जेवूं नये. संध्याकाळीं दहींभात जेवणें.

१४९. **मलमें, नारूवर :** (१) तिळाचें तेल नवटांक कढवून त्यांत राळ २ तोळे, मेण २ तोळे, इंगूळ पावलीभार, व कापूर पावलीभार टाकणें, (२) रसकापूर

१ तोळा, पांढरा कात १ तोळा, शेंदूर ·।।· तोळा, व गाईचें तूप ५ तोळे, हीं काशाच्या ताटांत तांब्याच्या तांब्यानें घोटावें, व १२० वेळां पाण्यानें धुवावें. हें मलम जखमेस, चट्टयास, भाजलेल्यास, इसब वगैरेवर चालेल. (३) मुरदाडशिंग २ तोळे, पाषाण, भेद २ तोळे, शंखजिरें २ तोळे, रोठी सुपारी जाळून २ तोळे, कवडी जाळून खाक २ तोळे, ह्या जिनसा बारीक कुटून ८८।· मेण कढवून त्यांत टाकाव्या, व मलम कपड्यावर लावावें, व ती पट्टी जखमेवर लावावी.

१५० **छातीवर** : एरंडाच्या मुळाच्या सालीचें चूर्ण ·।।।· तोळा, दुधांत टाकून पिणें. ३ दिवस. व त्याच मुळाचा लेप देणें.

१५१. **चट्टयांवर** : मलमें (१४९) सदरांतील प्रकार २ रा चट्टयांवर लावणें.

१५२. **चट्टयांवर मुलाच्या तोंडात पडल्यास** : कुसंब्याचीं फुलें १६ तोळे निरबासी ३ तोळे, ह्या जिनसा शिळ्या पाण्यांत बारीक वांटाव्या, व हरभऱ्याएवढ्या गोळ्या बांधाव्या. रोज मुलाला ८, व मुलाच्या आईला ८ गोळ्या देणे. **बाह्योपचार-** (१) म्हशीच्या शिंगाचा मोड खापरांत घालून तापवावा. त्याची बुकी चट्टयांवर मारावी. ३ दिवस. (२) मोठें मायफळ १।। मासा, धाकटें मायफळ १।। मासा, सुपारीचे फूल १।। मासा, मुरदाडशिंग १।। मासा, काळी सुपारी अर्धी कच्ची भाजून १।। मासा, मोरचूत १।। मासा, कवडी जाळलेली १ मासा, शंखजिरें १।। मासा, राळ १।। मासा, सर्व जिनसा बारीक कुटून गाईच्या तुपांत घोटून चट्टयांवर लावणें. ७ दिवस. (३) (काढा) हरडे, बेहेडे, व आंवळे या जिनसा अर्धवट कुटून काढा करावयाचा असेल, त्याच्या तिप्पट पाणी ठेवून कढवावें. या काढ्यानें चट्टे धुवावे.

१५३. **उदर** : (१) स्वागीची लाही वेलवांग्यांतून खाणें. (२) नवसागर ८८। शेर, तुरटी ८८। शेर, कलमी सोरा ८८।, लाहूरी मीठ ३।। तोळे, हिराकसी १४ मासे, सर्व जिनसा एकत्र कुटून त्याचे जवाएवढे तुकडे करावे, व एका मडक्यास तळाला पांच बारीक भोकें पाडून त्यांत सर्व जिनसा टाकून तोंड बंद करून अर्क काढावा. तो अर्क रोज एक मासाप्रमाणें खावा. खाण्यापूर्वी तोंडाला तूप चोळावें. १४ दिवस देणें.

१५४. **आमांश** : (१) सुंठ ५ तोळे, जायफळ १ तोळा, पिठीसाखर ७ तोळे, अफूच्या फुलाचीं सालपटें १ तोळा, अजमोदा १ तोळा, ह्या सर्व जिनसा बारीक कुटून रोज ३ मासे फक्की खाणें. (२) पेटकुळीचें पाळ दुधांत अगर पाण्यांत उगाळून देणें.

१५५. **संग्रहणी** : आमांशावरील उपचार करावे.

१५६. **विब्बा जास्त लागला असल्यास** : गोपीचंदन व चिंच समभाग पाण्यांत उगाळून तेथें लावणें.

१५७. **रातांधळें** : (१) रुईचें फूल पाण्यांत उगाळून डोळ्यांत अंजन

करावें. ७ दिवस. (२) खारिकेची बी व आंबेहळद स्त्रीच्या दुधांत उगाळून डोळ्यांत अंजन करावें. ३-७ दिवस.

१५८. **बद** : पायरीचें मूळ व रानकुड्याचें मूळ पाण्यांत उगाळून लेप करावा. ३–७ दिवस.

१५९. **बाळंतरोग** : रोज सकाळीं विड्याचीं काळीं पानें पांच व लवंगा पांच एकत्र कुटून देणें. ७–१४ दिवस.

१६०. **धुपणी** : करंजाची साल गाईच्या दुधांत अगर पाण्यांत उगाळून देणें. ३–७ दिवस.

१६१. **धावरें** : खांदवेलीचें मूळ अगर पेटकुळीचें मूळ गाईच्या दुधांत अगर पाण्यांत उगाळून पोटांत घेणें. व वर लावणें. ३–७ दिवस.

१६२. **स्त्रीचें दूध बंद करण्यास** : एक तोळा खडू, व तीन मासे कापूर, एकत्र थंड पाण्यांत खलून स्तनावर लावणें.

१६३. **गांठीवर** : अडीच तोळे सुंठ, व अडीच तोळे काडीचा गंधक (आंवळे गंधक घेऊं नये.) घेऊन बारीक वांटून वस्त्रगाळ करावें व त्यांत ·।।· तोळा सोमल वांटून तिन्ही जिन्नस एकत्र करावे, व गांठीवर लावतेवेळीं त्यांतील बारीक चमचा अगर दीड चमचा घेऊन पितळेच्या वाटींतून निखाऱ्यावर कढवावें. जरा पातळ झालें म्हणजे बोटानें गांठीवर लेप द्यावा व त्याच्यावर रुईचा अगर कापशीचा कापूस थोडा बसवून ती गांठ कपड्यानें घट्ट बांधावी. व दगड गरम करून गरम सोसेल त्याप्रमाणें एक तासपर्यंत शेकावी, व दोन-तीन तासांनी जरूर तर पुन्हां सोडून पूर्वीप्रमाणें एकदां लेप करून व बांधून शेकावी, म्हणजे गांठ बसून ताप काढेल. थंड पदार्थ खाऊं देऊं नये. व पाणी देऊं नये.

१६४. **दम्यावर** : रक्तबोळ चार तोळे. घेऊन तें कुटावें, व त्याचे सात भाग करावे. व संध्याकाळीं त्यांतील १ भाग पावशेर थंड पाण्यांत भिजत घालून सकाळीं तें सारखें ढवळून पावशेर दुधांत ओतून तें प्यावें. सात दिवस घेणें.

१६५. **जुलाबाचें तेल** : कुंवारकांड्याचा रस ·।· शेर, पांढऱ्या कांद्याचा रस ·।· शेर, लिंबाचा रस ·।· शेर, जेपाळाचे गर ५ तोळे, करंदाचा रस ·।· शेर, व ५ नारळांचा रस हे जिन्नस एकत्र घेऊन भांड्यांत कढवावे, व ते तयार झाल्या-नंतर त्यांतील एक थेंब घेऊन विस्तवावर टाकावा, जर तो थेंब चरचरला तर त्यांत पाणी आहे असें समजून पुन्हां कढवावें.

१६६. **किडमळ, इसब, खरूज** : २।। तोळे मेण, ३ मासे खड्याचा हिंगूळ, १० मासे शंखजिरें, ७ तोळे तिळाचें तेल, १।। मासा कापूर, तेल कढवून त्यांत मेण, कापूर, शंखजिरें, हिंगूळ ह्या सर्व वस्तू बारीक करून टाकणें व कढविणें.

१६७. नाळगुद रुईच्या झाडाच्या ढिऱ्या व ढिऱ्यांच्या दुप्पट काळीं मिरें,

व लवंगा असें एकत्र करून बारीक वांटून प्रत्येक वेळेस चार मासे याप्रमाणें ७ दिवस करावें.

१६८. **उचकी** : उडीद व आंब्याचीं सुकलेलीं पानें चुरून ओढणें, व धूर पोटांत गिळणें. अथवा उडीद व जुनें सुंभ चिलमींतून ओढणें, व धूर पोटांत घेणें.

१६९. **दमा व पोटफुगी** : डोरल्याचा रस १ शेर किंवा ·॥ः शेर. सोनामुखी, काळीं मिरें, शेंदेलोण हे जिन्नस प्रत्येकीं एक तोळाप्रमाणें घेणें व वस्त्रगाळ पूड करावी व रसांत खल करावा, व गोळ्या बांधाव्या.

१७०. **सुरमा** : सोरा १ तोळा, शेंदूर अर्धा तोळा, काळ्या बांगड्या कागदी लिंबाच्या रसांत खल करून असेल त्या डोळ्यांत निजते वेळीं घालणें.

कै. आयुर्वेदाचार्य दामोदर विष्णु गद्रे



जन्म १ मे १८७२] [मृत्यु १४ सप्टेंबर १९४७

औषधी बाड या ग्रंथातील एक भाग माझ्या वडिलांनी संग्रह केलेल्या औषधी चोपड्यांपैकी आहे. माझे वडील हे गेल्या पिढीतील महाराष्ट्रातील एक नामांकित वैद्य. त्यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील अडूर या गावी झाला. घरची परिस्थिती अत्यंत गरीबीची. बाबा आपल्या लहानपणच्या आठवणी सांगत त्या आज तुम्हांला खऱ्या-सुद्धा वाटणार नाहीत. त्या वेळी एक पैशात हजामत होत असे; पण तो पैसाही बाबा-जवळ नसायचा.

अशा परिस्थितीत जिद्दीने त्यांनी इंदूर येथील होळकर पाठशाळेत आयुर्वेदाचे शिक्षण पूर्ण केले. प्रथम फणसवाडी व नंतर झावबाचे वाडीत बाबांनी आपला आयु-र्वेदीय व्यवसाय सुरू केला.

बाबांच्या चिकित्सेचे वैशिष्ट्य म्हणजे ‘ रसायन, चिकित्सा यत् जरा व्याधी विध्वंसी भेषजम् तद् रसायनम् ’ या व्याख्येनुसार त्यांची चिकित्सा होतीच; परंतु रस म्हणजे पारा व त्याच्यापासून तयार केलेल्या ग्रंथोक्त व पारंपरिक पाठाप्रमाणे औषधे तयार करून वापरण्यावर त्यांचा अधिक भर होता. ग्रंथोक्त पाठाप्रमाणे सर्व औषधे तयार करावयाची, मग ती कितीही किंमतीची असोत, त्याप्रमाणे औषधे करून ती गरीब श्रीमंत, पैसा देणारा न देणारा याचा विचार न करता रोगनिदानानुसार औषधी योजना करण्याची त्यांची पद्धत होती. एवढी उत्तमोत्तम औषधे वापरूनही बाबांचा रोजचा औषधी दर फक्त चार अथवा सहा आणेच होता. रोग्याच्या मृत्यूनंतर त्याच्या वारसाकडून बाबा पैसे घेत नसत.

ताम्र व गंधक यांचे वनस्पतिमारित भस्म ते करीत असत. त्यासाठी त्यांनी हंपी विरूपाक्ष येथे मुद्दाम मनुष्य पाठवून पांढऱ्या पळसाची फुले मागविली होती. रुईया कॉलेजचे रसायनशास्त्राचे प्राध्यापक भागवत त्या भस्मकृतीवर चर्चा करण्या-साठी वारंवार बाबांकडे येत असत. सातवीण वगैरे वनस्पतीपासून त्यांनी ‘ शितारी-रस ’ नावाच्या गोळ्या तयार केल्या होत्या, व त्या थंडी-तापावर चांगले कार्य करतात.

नाडीपरीक्षा त्यांना उत्तम अवगत होती. गर्भिणीची निदान निश्चिती ते नाडीवरून सांगत असत. कावीळ विकारावर त्यांची अनुभविक चिकित्सा अत्यंत फलदायी होती. मुंबईतील अनेक डॉक्टरही काविळीचे रोगी त्यांच्याकडे पाठवीत व स्वतःही चिकित्सेसाठी येत. धन्वन्तरी डॉ. भडकमकर त्यांच्याकडून नेहमी सुवर्णराज वंगेश्वर व सुवर्णभस्म नेत असत.

एकदा एका डॉक्टरला कावीळ झाली. त्याचे संपूर्ण शरीर पिवळे पडले. बाबांच्या औषधाने त्यांना गुणही चांगला आला. डॉक्टरांनी फीबद्दल विचारले. बाबांच्या स्वभावात गंभीरतेबरोबर मिस्किलपणाही होता. ते डॉक्टरला म्हणाले, “ फी हो कसली देता. आपण परस्परांची सेवा फुकट केली पाहिजे. ”

बॅरिस्टर मुकुंदराव जयकर प्रिव्ही-कौन्सिलच्या कामासाठी लंडनला जायचे होते. त्यापूर्वी त्यांच्या कानात एकाएकी दुखू लागले. जयकर बाबांचे मोठे चाहते.

त्यांनी बाबांना बोलावणे पाठविले. त्या वेळी बाबांनी व्हिजिटला जायचे बंद केले होते. जयकरांचे बोलावणे म्हणून बाबा गेले. तपासून झाल्यावर निघतेवेळी जयकरांनी व्हिजिटचे शंभर रुपये बाबांपुढे ठेवले. बाबा जयकरांना म्हणाले, "मी आता व्हिजिटला जात नाही. तुमचे बोलावणे म्हणून मी आलो. मी ही फी घेणे योग्य नव्हे." बाबांनी नम्रपणे शंभर रुपये नाकारले. जयकरांप्रमाणेच जस्टिस वाय. व्ही. दीक्षित, जस्टिस रांगणेकर, यांची बाबांवर मोठी श्रद्धा होती. सर्व कुटुंबीय मंडळींना घेऊन ते आमच्याकडे औषधोपचारासाठी येत असत.

बाबांना वाचनाचा जबरदस्त नाद होता. त्यासाठी त्यांनी हजारो रुपयांची पुस्तके खरीदली होती. वैद्यक, ज्योतिष, धर्मशास्त्र, वेदान्त, काव्य वगैरे नाना प्रकारचा त्यांचा ग्रंथसंग्रह आजही सुस्थितीत त्यांची स्मृती म्हणून मी जपून ठेवला आहे.

विठ्ठल हे बाबांचे आराध्य दैवत. कावेरीच्या त्रिवेणीसंगमावर स्नान करीत असताना बाबा बुडण्याच्या बेतात असता एका काळ्याकुट्ट मनुष्याच्या स्वरूपात येऊन विठ्ठलाने आपले प्राण वाचविले ही आठवण ते अनेकदा सांगत. विठ्ठलचरणी बाबांची आत्यंतिक श्रद्धा होती. त्यापोटीच माझी मुंज पण त्यांनी शीवच्या विठ्ठल मंदिरात केली होती. अखेरच्या क्षणापर्यंत बाबा विठोबाच्या दर्शनासाठी तेथे नेहमी जात व अनन्यभावे विठ्ठलचरणी एकरूप होऊन जात.

बाबा स्वभावाने सात्त्विक व अत्यंत हळवे होते. स्मरणशक्तीची त्यांना ईश्वर-दत्त देणगी होती. वयाच्या सातव्या वर्षापासून घडलेल्या निरनिराळ्या घटनांची हकी-गत व जन्ममृत्यूची तारीखवार नोंद ते सांगत असत. दुसऱ्या महायुद्धात रंगूनवर झालेल्या बॉम्ब हल्ल्यात अनेक कुटुंबे हिंदुस्थानात आली. त्यांत ३० वर्षांपूर्वी बाबांकडून औषधोपचार करून घेतलेला एक व्यापारी होता. 'महाराष्ट्रीय वैद्य' अशी ओळख दाखवीत एके दिवशी भर दुपारी तो आमच्या घरी आला. त्याचे नाव, गाव, त्याला झालेला रोग, व त्यावरील औषधी योजना वगैरे अचूक तारीख-वार सांगून बाबांनी त्याला थक्क करून सोडले.

बाबांना नृत्य, संगीत व नाटक यांची फार आवड होती. नाटककार देवल, गणपतराव बोडस, गणपतराव जोशी, देवधरबुवा, मखन पखवाजी, वझेबुवा त्याच-प्रमाणे महाराष्ट्रभाषाभूषण आजगावकर, भाऊशास्त्री लेले, विष्णुशास्त्री बापट, लक्ष्मण-शास्त्री गाडगीळ, केरळकोकिळकार आठल्ये, ह. भ. प. पांगारकर, नाना बडोदेकर, यशवंतबुवा कवीश्वर, गोविंदबुवा ढोले, वगैरे अनेक क्षेत्रांतील नामांकित व्यक्ती त्यांच्या बैठकीत असावयाची.

मानवी जीवनावर ज्यांचे अपार प्रेम असते त्यांनाच त्या जीवनाबद्दल विलक्षण कुतूहल असते. या कुतूहलापोटीच वारल्याच्या झोपडीत, संन्याशाच्या मठीत, बैराग्याच्या धुनीजवळ बसून बाबा औषधी योजना मिळवीत. जमदग्नी इतिहासाचार्य राजवाडे प्रेमाने त्यांना औषधे सांगत. टेंबेस्वामींच्या ते पायाजवळ बसत. ज्ञानापोटी

सारा हिंदुस्थान पालथा घातला. हजारो रुपये वेचले. एकदा तर किमयेच्या जीवघेण्या प्रयोगात घरातील सर्व सोने-नाणे गेले. बाबांना ना खंत ना खेद. आयुष्याचा प्रत्येक क्षण ज्ञानकण मिळविण्यात गेला. मिळवलेली प्रत्येक औषधी योजना त्यांनी स्वतः अनुभवून पाहिली व त्याची नोंद बाडात टिपून ठेवली. हे बाड ग्रंथरूपाने प्रसिद्ध करण्याची बाबांना कल्पना पण नव्हती. म्हणूनच तुम्हांला या बाडात क्रम, मांडणीचा आखीवपणा, रेखीवपणा आढळणार नाही. जे आहे ते खरे अनुभवरूपी सोने !

बाबांच्या मृत्यूनंतर २७ वर्षांनी त्यांनी ठेवलेला हा अमोल ठेवा मी तुमच्या पुढे ठेवत आहे. आजच्या मंगल प्रसंगी माझे डोळे आनंदाने पुन्हा पुन्हा भरून येत आहेत. बाबांनी मिळविलेल्या या ज्ञानामुळे महाराष्ट्रात कोणाच्या घरी विझता दिवा पुन्हा प्रकाशित झाला, कुठे आशेचा किरण चमकला, कोणाचे अश्रू रोखता आले तर माझ्या बाबांच्या आत्म्यास निश्चितच समाधान मिळणार आहे,—व तेवढे मला पुरे आहे.

बाबांनी निर्माण केलेली परंपरा त्यांच्या मृत्यूनंतर गेली २७ वर्षे मी अखंडितपणे निष्ठेने चालवीत आहे. त्यांच्याच पद्धतीने मी नाडीपरीक्षा, रोगनिदान व औषधी योजना करतो.

झावबाची वाडी,
ठाकुरद्वार, मुंबई ४.

वैद्य नीलकंठ दामोदर गद्रे

भाग ३ रा

१. **रक्तविकारावर :** शुद्ध पत्री हरताळ, उंबराच्या मुळाच्या पाण्यांत भिजत ७ दिवस टाकून, नंतर विड्यांत अर्धी गुंज द्यावा. **पथ्य**– आंबट, तेलकट देऊं नये. दूध, तूप, वरणभात द्यावा. रक्तविकारावर कामास येतें. मीठ खाऊं नये. जटेली अनुभविक कृती आहे.

२. **कवळूवर :** पारिजात याचा पाला वाटून गोळी दुधांत द्यावी. **पथ्य**– दूधभात.

३. **कामवृद्धीस :** तीळ काळे १ तोळा, अफू १ तोळा, खलून ३–४ खारकांत बी काढून भरून त्या खारका रुईच्या खोडास भोक पाडून त्यांत सात दिवस ठेवाव्या. वर मातकापड करावें. नंतर काढून खलून त्याच्या गोळ्या कराव्या. १ सकाळीं खावी, वर दूध प्यावें. ८–१० दिवस घ्यावें. म्हणजे अंतीं काम होईल. (अनुभविक)

४. **क्षतावर :** चुन्याच्या कळ्या २ तोळे, नवसागर ·॥· तोळा, एकत्र करून भिजवून लावावें. घटकेंत फुटतें व किडे बाहेर येतात.

५. **परमा धुपर्णावर :** मोगली बेदाणा ३ मासे पावशेर पाण्यांत घालून सकाळीं जरा कढवावा. त्यांत तूप साखर १–२ तोळे घालून एक वेळ द्यावा. एक महिना. (अनुभव आला). **पथ्य**– तूप-भात, गोड अदमुरें दहीं, थंड पाणी, पांढरा भोपळा, भेंडा, तोडलें वगैरे भाज्या. आमसोल, आलें, मिरें यांची चटणी खावी. दूध, मीठ वर्ज्य.

(देशमुखीणबाईच्या बाडांतून)

६. **पू बंद होण्यास :** मुरदाडशिंग पाण्यांत उगाळून लेप करावा. वस्त्रगाळ भुकटी (मुरदाडशिंग) कानांत टाकावी. वाहता कान बंद होईल.

७. **जखमेवर :** रानशेण चांगली वाळलेली आणून भट्टीनें राख करून तांब्याच्या परातींत तिळाचें तेल व ती राख घालून खलावें. चिकटपणा आल्यावर मलम होतें. त्याची पट्टी जखमेवर लावणें.

८. **वृषणवृद्धीवर :** काळा बोळ, मिरें, सुंठ, रक्तरोडा, रेवाचिनीचा शिरा, लिंबाच्या रसांत हरभऱ्या–पावस्याप्रमाणें उगाळून गरम करून रात्रीं लेप द्यावा, आणि शेणीच्या शेकानें शेकावें. कळ बंद होते. सुकल्यावर लंगोटी लावावी. सकाळीं पाणी झिरपते. चिरम्या पडतात. १० वर्षांचा असेल तर १४ दिवस. सहा महिन्यांच्या विकारास चार दिवस. पथ्य नाहीं. फक्त स्त्री वर्ज्य. ७, ११, २१ दिवस, अगर महिनाभर जरूरीप्रमाणें करावें. हलवा खावा. सातू भाजून पीठ खावें. पाणी शोषतें. (मुजरद)

९. **आम्लपित्तावर** : कोहळ्याचा लेह, कोहळ्याचें पाणी पळें १००, गाईचें दूध पळें १००, आवळकठी चूर्ण ८ पळें, मंदाग्नीनें शिजवून गोळा होत आल्यावर साखर पळें ८ घालून ठेवणें. रोज २० मासे खावें. (मुजरद)

१०. **तृषेवर** : उत्तम खारीक घेऊन बी काढून त्यांत जिरें चिमटीभर, बडीशेप दाणे २५, दोन चांगल्या वेलदोड्यांचे दाणे घालून एरंडाचीं पांच पानें बाहेरून लावून, माती लावून, असोली नारळाएवढा गोळा करून रानशेणींत भाजावें. आंतील खारीक उत्तम प्रकारें भाजलेली काढून बारीक वांटून त्याचें सरबत साखर व पाणी घालून करावें. ४–५ दिवस द्यावें. तृषा शमन होते. वरील प्रमाण एक दिवसाचें. सर्व द्रव्यें समान घ्यावीं.

११. **जिभेस** : जीभ लाल झाली असेल तर तवकीर, खडीसाखर, किंचित् काल खलून जिभेवर चिमटी चिमटी घेऊन चोळावा, व लाळ गाळावी.

१२. **रक्तमूळव्याधीवर** : मुळ्याचे काप तुपांत तळून खावे व शिजवूनहि खावेत.

१३. **जलोदरास** : खैराचा रस रोज ९ टांक प्रमाणें सात दिवस द्यावा. महाउदर बरें होईल. (हें औषध ३–४ ठिकाणीं आहे.)

१४. **विंचवास** : आघाड्याची मुळी उगाळून लावावी, व चावून खावी. विंचू उतरेल.

१५. **जलोदरास** : शेवगा रस पावशेर, माका रस छटाक, कांडवेलीचा रस ३ तोळे, हे तीन रस एकत्र करून सकाळीं द्यावें. पहिल्यानें वान्ती ४-८ दिवस होते, किंवा होत नाहीं. औषध घेतल्यानंतर २ घटिका वर पाय खालीं डोकें करून असावें. **पथ्य**– जोंधळे भाकरी. गाईचें दूध खावें. खडीसाखर खावी. भात, पीठ वगैरे नाहीं. हें उजव्या कुशींत होतें. मनुष्य पिवळा होतो. यांतील भावना असल्यास द्यावें. यामध्यें पोट मोठें होतें. काळा भोपळा जन्मभर वर्ज्य. १०–१४ दिवस, अगर गुण येईपर्यंत द्यावें. पुढें सहा महिने पथ्य करावें. टांगून खालीं उतरल्यावर दूध ४॥ तोळे, खडीसाखर २ तोळे, साळीच्या भाताच्या लाह्या द्याव्या. चार घटिकांनीं मग पथ्य द्यावें. प्रत्येक नक्षत्रास तुमड्या काढाव्या.

१६. **भाजलेल्यास मलम** : शेंदूर ४० मासे, भल्लातक १५ भोकें पाडून किंवा काप काढून पावशेर काळ्या तिळाच्या तेलांत टाकून कढवावें; व धूर येऊं लागला म्हणजे शेंदूर तेलांत लावावा व तार येऊं लागल्यावर खालीं उतरावें. कापलेल्या जखमेवर पट्टी लावावी, उत्तम आहे. चार दिवसांत घाव भरतो.

१७. **वातपित्तावर कामदुघा** : सोनगेरू व गुळवेलसत्त्व समभाग घेऊन १ प्रहर खल करावा. अनुपान– मधामध्ये दोन वाल शक्ती पाहून द्यावें.

१८. **वाजीकरणास** : सांवरीचा डिंक, केशर, जायफळ, जायपत्री घालून गोळी वालाप्रमाणें बांधावी. निजते वेळीं अर्धा शेर आटीव दुधांत घ्यावी.

१९. **ज्वरावर :** (श्रीरामचूर्ण) हळद, सुंठ, मिरें, पिंपळी, अजमोदा, प्रत्येकीं ३ तोळे, बाळहरडे चार तोळे; पांदोलोण, सैंधव पांच पांच तोळे, हिंगाची लाही दोन तोळे, आवळाकठी १ भाग हीं सर्व औषधें कुटून वस्त्रगाळ चूर्ण करावें. अजीर्ण, त्रिदोष, ज्वर, नवज्वर, संपूर्ण ज्वर, शूल, हृद्रोग, नळवात यांवर द्यावें.

२०. **अगरबत्ती :** मैदालकडी १ तोळा, चंदन उंची ५ तोळे, नागरमोथा २ तोळे, कवड्या ऊद १ तोळा, नागकेशर अथवा पत्रज २ तोळे, कापूर भीमसेनी १ मासा, वेलदोडे दाणे ६ मासे, जायफळ ६ मासे, पिठी साखर २ तोळे, पाक करून नखला १।। तोळा दोन दिवस भिजत घालून आंतील घाण काढून स्वच्छ धुऊन दुधांत शिजवून मग तुपांत तळून कुटून पूड करून घालावा. गुग्गुळ १ तोळा २ दिवस पाण्यांत भिजत ठेवून, पाणी करून घालावें. लवंग फूल १ तोळा, कृष्णागरू २ तोळे अगर ६ मासे, कोष्ठ २ तोळे, शिलारस ३ तोळे, गरम करून कस्तुरी २ मासे, शेराचा कोळसा अगर अडुळशाचा कोळसा ३ तोळे, गुलाबकळी १ तोळा कापूरकचरी १ तोळा, अंबर १ मासा, येणेंप्रमाणें वस्त्रगाळ पूड करून, मिळवून, काड्या अगर गोळ्या करून ठेवाव्या.

२१. **अतिसारावर : सांबरशिंग भस्म** सांबरशिंग गुलबाक्षीचा रस तपेलीत घालून त्यामध्यें सात दिवस भिजत ठेवावें. नंतर रानशेणींत जाळावें. नंतर खल करून गुलबाक्षीच्या कांद्याचा रस काढून त्यांत गोळा करावा. कुंभपूट द्यावें आणि बारीक करून विड्याच्या पानांत मधांत वालभर दोन वेळां द्यावें.

२२. **कानावर :** मांजराच्या हाडाची भुकटी कानांत घालावी. **पथ्य**—७ दिवस करावें.

२३. **नासुरास :** कांकडा कपड्याचा लोण्यांत भिजवून त्यावर मांजराच्या हाडाची भुकटी लावावी. व कांकडा हातांत घालावा. वर पट्टी द्यावी. **पथ्य**— करावें.

२४. **इसबास :** घेरोसा ४।। तोळे, मोरचूत लाही पाव तोळा, कापूर ०।।० तोळा, कात १ तोळा, तांब्याच्या भांड्यांत ताम्रपात्रानें खलावें. दूध घालून ५—७ दिवस खल करावा. खलण्यास लागेल तेवढें दूध घालावें. खवडे गजकर्ण जातें.

२५. **धातुक्षय, बाळंतरोग, ज्वर यांवर नागभस्म :** शिसें ४।। तोळे, गंधक ४ तोळे, तव्यावर शिसें पातळ करून गंधकाचा एक एक खडा टाकावा. नंतर वेलदोडे ४।। तोळे सालीसुद्धां वर टाकावें; आणि कडुनिंबाच्या सोट्यानें खलावें. तीन घटकांनीं भस्म होतें. अग्नीच्या ठिणग्या झाल्या म्हणजे भस्म झालें असें समजावें. हे तीन गुंजा काटे-शेवरीचा बलक २ तोळे घेऊन त्यांत सकाळीं द्यावें. तूप पोळी रोज खावी. बाळंतरोगास मध; ज्वरास पिंपळी; धातुक्षयास आलें, मध, मोगली बेदाणा ३ मासे अगर इसबगोल ३ मासे, यांत द्यावें. ताप ३ दिवसांत जातो. तूप फार खावें.

२६. **आम्लपित्तास :** वाळुक कांकडींत माक्षिकाचे खडे भरून मातकापड

करून गजपुट द्यावें. भस्म होतें. तें गुळांत व जायपत्रींत १ मासा द्यावें. आम्लपित्त १ महिन्यानें जातें. १ ते ३ सत्तकें द्यावें.

२७. **पोलादभस्म** : संग्रहणी हगवणीस पोलाद चुरा ४|| तोळे, हिंगूळ ४|| मासे, एकत्र करून त्रिफळाच्या काढ्यांत खल करून पुटें १० देऊन ठेवावीं. नंतर कोरफडीच्या रसांत १० पुटें, नंतर डाळिंबाच्या रसांत १० पुटें द्यावीं. नंतर १ गुंजभर मुलास. **संग्रहणी हगवणीस**– मध-साखर यांत द्यावें. **पथ्य**–साधारण.

२८. **दांत वळकट होण्यास** : केळीचा दांडा केळफुलाच्या मागील दांड्यास टोंचून जो चीक येईल त्याची गोळी करून दातांस चोळावी. नंतर घटकाभर चूळ भरूं नये. **पथ्य**– तूप भात, तेलकट पदार्थ खाऊं नये.

२९. **धनुर्वातास** : लवंगा बोंडासुद्धां १५ नग, जायफळ १ तोळा, सुंठ २ तोळे, रानतुळशीची मुळी १ तोळा एकत्र करून गोळ्या सात करून सात दिवस द्याव्या. मुगाचें वरण, जोंधळ्याची भाकर, पोळी खावी. विटाळ व तेलकट वर्ज्य. अळणी खावें. **उतार**– हरभऱ्याच्या डाळीचें पाणी अदपाव तूप घालून द्यावें.

३०. **वंदेज** : खागी लाही करून १ मासा कापूर, १, मासा विड्यांत खाऊन मग रमावें. जायफळ कोरून आंत अफू भरून वर कणिक लावून भाजावें; मग खलून गुंजप्रमाण गोळ्या कराव्या. १ गोळी विड्यांत खावी. **उतार**– दूध द्यावें. आस्कंद तीन तोळे, विठीसाखर ३ तोळे, रोज खावें. वर विडा खावा. **उतार**– निंबाचा रस.

३१. **जळवातास** : कापूर २ तोळे, समुद्रफेन २ तोळे, मुरदाडशिंग २ तोळे, सफेता (पुड्याचा) १ तोळा, वेलदोडे २ तोळे, राळ २ तोळे, मेण ९ तोळे तूप २० तोळे, यांचें मलम करून ठेवावें. प्रथम तूप पातळ करून त्यामध्यें मेण सोडावें. मेण पातळ झाल्यावर पुडी टाकून घोटावें.

३२. **दांताच्या किडीस** : रुईच्या पानाच्या रसांत हिंग खलून कानांत धरून वर कापूस बसवावा. दांतांतील किडे पडतील.

३३. **उदरास** : (१) चवक, चित्रक, सुंठ, देवदार यांचा काढा निशोत्तर चूर्ण व गोमूत्र घालून द्यावा. (२) **उदरसूज**– पुनर्नवा, दारूहळद, हिरडे, सुंठ, यांचा काढा गोमूत्र व गुग्गुळ घालून देणें.

३४. **गुल्म व प्लीहेवर** : बाळहरडे व रक्तरोडा यांचा काढा जवखार घालून द्यावा. प्रशस्त आहे.

३५. **ज्वरावर** : आंवळकठी, चित्रक, बाळहरडे, पिंपळी, सैंधव हें चूर्ण भेदी, दीपन व पाचक, श्लेष्म, जिंकणारें. विषमज्वरास मध, पिंपळी-चूर्ण याबरोबर योजावें. मुलांस द्यावें.

३६. **लवंगादि चूर्ण** : लवंग, कापूर, वेलची, दालचिनी, नागकेशर, जायफळ, वाळा, सुंठ, काळें जिरें, कृष्णागरू, वंशलोचन, जटामासी, पद्मबीज, चंदन, पांढरा तगर, काळा वाळा, कंकोळ, एकंदर चूर्णाच्या अर्धा किंवा समभाग

साखर घालून करावें. राजयोग. वृष्य, अग्निदीपक आहे. त्रिदोष, प्रबल प्रदररोग, कंठरोग, कास, उचकी, पडसें, राजयक्ष्मा, अतिसार, उचकी, अरुची, ग्रहणी, गुल्म, उरःक्षत यांवर प्रशस्त आहे.

३७. **क्षीणतेवर (सुवर्ण पंचामृत रस)** : माणिक १, मोती १, प्रवाळ २, पाच २, सुवर्ण ४, येणेंप्रमाणें शुद्ध करून भस्म करून ठेवणें. अनुपान योजून तांदूळभार देणें.

३८. **उष्णतेवर** : उंबराचा चीक, प्रवाळभस्म, खडीसाखर, चांदीचा वर्ख, येणेंप्रमाणें औषधें घेऊन तीन औषधांस उंबराच्या चिकाचीं पुटें देऊन गोळ्या गुंजप्रमाण कराव्या. १ गोळी अनुपान योजून द्यावी.

३९. **क्षुद्बोध पाचक** : रुईचे मोड फुलें पाकळ्यारहित ४ तोळे, जवखार २ तोळे, नवसागर शुद्ध २ तोळे, सूर्यक्षार १ तोळा, येणेंप्रमाणें कुटून लिंबाच्या रसांत खलून बदरीबीजाप्रमाणें गोळ्या कराव्या, व अनुपान योजून द्याव्या.

४०. **आम्लपित्तावर** : कडू वृंदावन, पित्तपापडा, त्रिफळा, खडीसाखर, येणेंप्रमाणें समभाग घेऊन अदमासें १ मासा मधांत देणें. **पथ्य**— सामान्य.

४१. **ज्वरावर** : अतिविष, काडेकिराईत, सुंठ, नागरमोथे, गुळवेल, इंद्रजव प्रत्येक औषध ४ तोळे घेऊन, सात पुड्या कराव्या. १ पुडीचा रोज काढा घ्यावा. **पथ्य**— तुरीचें सार, तुरीचें वरण, तुरीचें पाणी, भात खावा.

४२. **वाजीकरण** : (१) गाईचें तूप १ तोळा, मध २ तोळे, गहूं ·॥· शेर, एकत्र शिजवून रोज दोन वेळा खावें. ५ स्त्रिया भोगील. (२) कांद्याचा रस व दूध एकत्र रोज प्यावें.

४३. **श्वासावर** : (मुजरत) हरभरे भाजून दोन एक ठिकाणीं असतात असे मूठभर घ्यावे. त्यास रुईच्या चिकाचीं ३ दिवस ३ पुटें द्यावीं. सावलींत वाळवावें. रोज सकाळीं जेवणाच्या अगोदर १—२ डाळिंब्यांनीं युक्त असे हरभऱ्याचे गोळे नुसतेच जरा चुरून खावें. १ किंवा २ खावें. दोन वेळा खावें. तीन दिवसांत १२ खावें. अशक्त असल्यास ३ दिवसांत ६ खावें. रोज दोन वेळां. **पथ्य**— गहूं, व हरभऱ्याचें पीठ (डाळीचें) अर्धा शेर एकत्र करून याची भाकर खावी. भाकरीवर पाणी प्यावें. भात, मुगाचें वरण, मेथीची भाजी खावी. स्नान करावें. तूप व तेल यांचा वासही घेऊं नये. **पथ्य**— पांच दिवस करावें. ढाळ झाले तर अफू बाजरीएवढी खावी. दमा श्वास जाईल.

४४. **कफविकारास औषध** : मल्ल, रसकापूर, रससिंदूर तीनही समभाग घ्यावें. लिंबाच्या रसांत खल करावा. मुगाप्रमाणें गोळी करावी, व अनुपानांतून योजावी.

४५. **कामदुघा** : पारा, गंधक, अभ्रक, लोह, बचनाग, सुंठ, मिरें,

पिंपळी समभाग घेऊन त्रिफळेच्या काढ्याच्या तीन भावना द्याव्या. गुंजमात्र गोळी करावी.

४६. **कानावर** : कान फुटतो त्यास सुरवारी हरडे चांगले ४ तोळे, कात पांढरा ४ तोळे, पत्री हरताळ ३ तोळे, येणेंप्रमाणें औषधें घेऊन एकत्र करून बारीक करावीं, व वस्त्रावर चाळावीं. शेळीचें मूत ५ शेर पक्कें घेऊन मडक्यांत घालून अर्धें आटवावें. बोरीच्या लाकडांचा अग्नी द्यावा. नंतर औषधें आंत टाकावीं. आटल्या-नंतर उतरून ठेवावें. चण्यावालाइतकें थंड पाण्यांत खलून कानांत एक दिवस आड घालावें. दिवसांतून चार वेळ. **पथ्य**– करावें.

४७. **वायूवर** : हातांपायांस कळा लागतात त्यावरून मल्ल, कान, शिंग्रूप समभाग घेऊन विड्याच्या पक्क्या पानांच्या रसांत खल करून अर्धी गुंज प्रमाणानें गोळी करावी.

४८. **रातांधळ्यास** : मिरें पाण्यांत उगाळून नेत्रांस अंजन करावें. ३–४ दिवस अंजन करावें.

४९. **क्षयावर** : वसंत ३ मासे, लोह ३ मासे, शतावरी ३२ तोळे, दूध-साखरेंत क्षयादिकांवर देणें.

५०. **धातुपौष्टिक व वंदेज (वंगभस्म)** : तीळ व हळदीचें पीठ करून वाटी करून त्यामध्यें वंग ठेवावें. लाटू करून आंच द्यावी. भस्म होतें. विड्याच्या पानाच्या रसांत दोन्ही सांज १ गुंज द्यावें.

५१. **खोकला** : म्हशीच्या शिंगांतून निघतें, कापुरासारखें असतें तें आणून विड्याच्या पानांत ठेवून द्यावें, व विड्यांत १ गुंजभर देणें. जन्माचा खोकला निर्मूळ होईल.

५२. **हिंवतापावर** : हरताळ पत्री, शुद्ध कळीचा चुना घेऊन त्यांचा कारलीच्या रसांत खल करावा (२ प्रहर). १ गुंजप्रमाणें गोळी करावी. **पथ्य**– दूध-भात, दूध प्यावें. सात दिवस घ्यावें.

५३. **हिंवतापावर** : सोमलशोधित १ तोळा, कारलीच्या रसानें १ प्रहर खल करावा. बाजरीएवढी गोळी करावी. साखरेंत खावी. **पथ्य**– दूधभात खावा. दूध प्यावें.

५४. **शल्यावर** : पांढऱ्या वसूची मुळी दाभणाप्रमाणें बारीक करून फुलांत धरणें, १ प्रहर. शल्य निघेल.

५५. **प्रदरावर, तांबड्या प्रदरावर** : मुलतानी माती ३ दिवस दुधांत खावी. **पथ्य**– तूप रोटी.

५६. **वामक** : वान्ती करण्यास लिंबू अर्धें कापून त्यावर रुईच्या चिकाचे ९ थेंब पाडून तापवून निवाल्यावर रस चोखावा. १ – २ वान्त्या होतील. उतार– दूधभात. अनुभविक आहे.

५७. **हरताळ-भस्म :** हरताळ तोळे १० रुईच्या चिकांत सात दिवस खलावा. पळसाची राख पक्का १ शेर घेऊन आर्धी अर्धी एका मडक्यांत घालावी. त्यावर त्याची चकती ठेवून वर अर्धी राख घालून चेपावी; व तोंडास मातकापड करावें. गजपुट द्यावें. व १ तांदुळभार विड्याच्या पानांत देणें. **सर्व रोगांवर.**

५८. **दृढतेस :** पोस्ताचा काढा ४॥ तोळे, तूप १ तोळा, ओवा १ तोळा, गूळ १ तोळा, हे घालून खावा. दृढता सुरतास येईल.

५९. **आमांश :** सुंठ २ तोळे, सोनामुखी २ तोळे, खडीसाखर २ तोळे, हरडे २ तोळे, चूर्ण करून पुडी सकाळीं दुधांत घेणें. पावशेर दुधांत घ्यावी. आम पडेल.

६०. **गुग्गुळ :** गुगुळ १० तोळे, सुरवारी हरडे १० तोळे (समभाग), चूर्ण करून गोळी करून रोगोक्त अनुपान योजून घ्यावी.

६१. **नागाच्या गोळ्या :** बचनाग १ तोळा, अक्कलकारा १ तोळा, पिंपळी १ तोळा, मिरें :॥: तोळा, जायफळ १ तोळा, जायपत्री ·॥· तोळा घ्यावी. ५ मासे कस्तुरी, आल्याचा रस २ तोळे, तुळशीचा रस ३ तोळे, विड्याच्या पानाचा रस १ तोळा, नंबराप्रमाणें एक भावना द्यावी. प्रत्येक रस ४॥ तोळे घालावा, व बाजरीएवढी गोळी करावी.

६२. **धुपणीवर :** सोरा १ तोळा, वेलदोडे १ तोळा, खडीसाखर १ तोळा, कात १ तोळा यांचें चूर्ण पांढऱ्या धुपणीवर दूध-साखरेंत द्यावें.

६३. **वंधेज :** जायफळ १ व तितकेंच वजन हिंगुळ-खडा घेऊन, त्यांची पुरचुंडी बांधावी. २० तोळे बिनपाण्याच्या दुधांत मडक्यामध्यें दोलायंत्रानें शिजवावें. अर्धें आटल्यानंतर प्रातःकाळीं द्यावें. २१ दिवस स्त्री वर्ज्य.

६४. **स्त्री-रोग :** बायकांस चिकट पाणी पडतें त्यास जायफळ १ तोळा, तुरटी १ तोळा, पांढरा कात १ तोळा, वस्त्रगाळ. पुड्या १४. नित्य १ वेळ घेऊन वर बाभळीच्या आन्तर सालीचा व शेंगांचा काढा करून प्यावा. पथ्य करावें.

६५. **अतिसारावर :** डाळिंब पुटपाक जायफळ १ वाल, अफू १ वाल, टंकणखार १ वाल, गंधक १ वाल, जिरें १ वाल, डाळिंबाच्या बियांत वांटून सर्व डाळिंबांत भरून कणिक लावून भाजावें. नंतर वांटून चूर्णाप्रमाणें करून चण्याएवढ्या दह्यांत द्यावें.

६६. **कानावर :** पू येतो त्यास मायफळ व कात यांची भुकी करून रोज कान धुऊन कानांत टाकावी. ३ ते ५ दिवस.

६७. **भोंवळ जाण्यास :** लसूण ४॥ तोळे कणकेच्या पोळींत घालून पोळी भाजावी आणि तुपाशीं खावी. भोंवळ जाईल.

६८. **धुपणीस :** वातयुक्त. दारूहळद, देवदार, सराटे यांचा काढा गूळ घालून द्यावा.

६९. **जीर्णज्वर वगैरे** : कचोरा, सुंठ, पित्तपापडा, तेल्या देवदार, धमासा, कांटेरिंगणी, नागरमोथा, कटुकी, किराईत हीं प्रत्येकी ·॥ तोळा घेऊन सकाळीं ४ तोळे काढा एकदांच घ्यावा. मध १॥ मासा, पिंपळीचें चूर्ण १॥ मासा घालावें. **पथ्य**– तेलकट वर्ज्य.

७०. **दाहावर** : प्रवाळ २५ तोळे घेऊन त्याला लिंबाच्या व कोरफडाच्या रसाचीं पुटें द्यावीं. भस्म करावें, किंवा तसेंच ठेवावें.

७१. **डब्यास** : मुलाच्या पोटांत होतें त्यास– तालक भाजून (समभाग) कारलीच्या रसांत खल करून गोळ्या कराव्या. मूल पाहून ·॥· गुंज देणें. पाण्याबरोबर.

७२. **कामोद्दीपक वटी** : हयमार जटा शरपुंख जटा। अहिफेन पतंग कुबेर युगं। दरदः करमः सुरसा स्वरसै। गुटिका मकरध्वज बोध करी ॥ १ ॥ लेप असें लिहिलें आहे. परंतु पोटांत दिलें तरी चालेल.

७३. **गरमीवर** : धायटी १ तोळा, खुरासनी १ तोळा, किरमाणी ओंवा १ तोळा, बिबे वांटून १ तोळा, जुना गूळ १ तोळा, लवंग १ तोळा, वेलची १ तोळा, जायपत्री १ तोळा, जायफळ १ तोळा, पारा ३ मासे, सर्व खलून केशर १ तोळा घालावें. मर्दुमकीस चांगलें. रोज ६ मासे ते १२ मासे माणूस पाहून. दह्याचा चक्का ४॥ तोळे सकाळीं एकदां खावा. **पथ्य**– सर्व वावडें.– पोपया, दूध. खरबूज, गूळ वगैरे खावें. केळें, केळीचें पान वगैरे १४ दिवस वर्ज्य. (उतारा नाहीं).

७४. **श्वासावर** : लोणी ९ टांक (१॥ पाव), रुईचीं पानें ४२, सोरा व लोणी कालवून पानास लावून ती मडक्यांत भरून गजपुट द्यावें, उत्तम भस्म (मधांत).

७५. **गरमीवर** : खुरासनी ओवा ३ मासे, जुना गूळ ३ मासे, गाईचें तूप ३ मासे, जायपत्री ३ मासे, पारा ३ मासे, म्हशा गुग्गुळ ३ मासे, भिलावा २ मासे, यांचा लोखंडाच्या तव्यावर लोखंडाचे खलबत्त्यानें खल करून ६ गोळ्या कराव्या. रोज १ गोळी दातांस न लावतां पाण्याबरोबर गिळावी. १ महिना.

७६. **हिंगूळभस्म : विसर्पावर.** हिंगूळ १ तोळा, बिबा २॥ पाव, वजनी तूप २॥ पाव, वजनी मध पावशेर; कढईत बिबे कातून घालून तूप अर्धें घालावें. हिंगुळाचा खडा मधांत बुडवून आंत टाकावा. बाकीची तीनही द्रव्यें वरती टाकावीं. बिब्यांची राख होईपर्यंत चुलीवर ठेवावें. मग खडा कढईतून काढावा व पुसून खलावा. १ गुंज मात्रा देणें.– व अनेक रोगांवर अनुपानपरत्वे द्यावें.

७७ **हिंगूळ भस्म** : हिंगूळ ४ पैसे भार घेऊन लिंबाच्या १०८ भावना द्याव्या. १०८ लिंबांचा रस घ्यावा. रस काढून अग्नीवर शिजवावा. नंतर पिंपळाच्या ढलप्यांची राख ५ शेर खालीवर मडक्यांत घालून मुद्रा करून दीपाग्नि ४ प्रहर देणें. शुभ्र भस्म होतें.

७८. **हिंगूळभस्म** : तांबड्या कण्हेरीचा स्वरस १ शेर (शेरभर),

मडक्यांत घालून हिंगूळ त्यांत घालून दिपाग्नि ४ प्रहर द्यावा. शुभ्र होतें. मात्रा तांदुळभार.

७९. **वान्तीवर :** जांभळीची अंतर्साल जाळून राख करून तुपांत रोज ४ वेळ गुंजभर द्यावी.

८०. **वंगभस्म :** वंग ५ पैसेभार, नागकेशर ५ पैसेभार, ओवा २ पैसेभार, हळदीची पूड २ पैसेभार, सर्वांचें चूर्ण मृत्कढईंत द्रव करून चूर्ण अनुक्रमानें देत जाणें. पिंपळाची साल ५ पैसेभार, अग्नि मोठा देणें. मग कुमारीचीं पुटें १०० देणें. लाल भस्म होतें. मातीच्या तव्यावर. भुजंगराज.

८१. **लोहभस्म :** लोहचूर्ण ।. शेर मुळ्याच्या रसांत भिजत घालून वस्त्रगाळ पूड करून कुमारीचीं पुटें १०० द्यावीं.

८२. **रौप्यभस्म :** (१) पळसाची मुळी कोरून त्यांत रुप्याचा पत्रा घालून मातकापड करून गजपुट द्यावें. भस्म होतें.

८३. **रौप्यभस्म :** (२) बांवच्या वांटून पत्र्याचे दोन्ही बाजूंस दाट लेप करावा. पणतींत मातकापड करून पुट द्यावें. भस्म होतें.

८४. **रससिंदूर क्रिया :** पारा ९ तोळे, गंधक ९ तोळे, सोमल १ मासा, बचनाग १ मासा, हिंगूळ १ मासा, चारी औषधें एकत्र खलून अभ्रकाचीं पानें २ घ्यावीं. मातीच्या बरणींत १ पान ठेवावें. त्यावर औषधाची भुकी घालून वर १ पान झांकण ठेवावें. त्यावर दुसरें संपुट ठेवून झांकावी. सात मातकापडें करून ४ घटिका अग्नी द्यावा, रससिंदूर तयार होतो. शीतळ झाल्यावर काढावें. रससिंदूर तयार होतो. अभ्रकाच्या पानावर औषध घालते वेळीं वालुकायंत्रांत ठेवून अगर चुलीवर अग्नि द्यावा.

८५. **गरमीवर औषध :** खुरासनी ओंवा, जुना गूळ, गाईचें तूप, जायपत्री, म्हशा गुग्गुळ, पारा, प्रत्येकीं ३ मासे, भिलावा २ मासे, लोखंडाच्या खलबत्त्यामध्यें खलून ६ गोळ्या करून रोज १ गोळी दांतास लावल्याशिवाय पाण्याबरोबर अगर चहाबरोबर गिळावी. औषध ३ दिवस, १ महिना अलवण अलवण चण्याची रोटी खावी. ती तीन दिवस खावी. पुढें दूध, तूप, चपाती, रवा, खावा. उत्तम आहे.

८६. **हरताळभस्म :** हरताळ अंड्यांत भरून चिंचेच्या राखेमध्यें तयार करावें.

८७. **गरमीवर (व्रणावर) :** त्रिफळा तव्यावर भाजून ती मस मधांतून लावावी. त्रिफळा, गुग्गुळ पोटांत घ्यावा. वडाचे अंकुर, अर्जुनसादडा, जांभळीची साल, लोध्र, हरडे-दळ यांचा लेप करावा. आग शमते. चट्टे माक्याच्या रसानें अगर त्रिफळ्याच्या काढ्यानें धुवावें. नंतर मोठा शेर पाण्यांत उगाळून लेप करावा. त्रिफळा, कडू पडवळ, कडुनिंबाची साल, किराईत यांचा काढा गुग्गुळ अथवा कात घालून प्यावा.

८८. **सर्व प्रमेहांवर :** गुळवेल-रस मधुयुक्त घ्यावा. लोहभस्म, त्रिफळा, मधुयुक्त घ्यावीं. हरडा मधांत उगाळून पाणी घालून प्यावा.

८९. **भाजल्यावर मलम** : निर्भेळ तिळाचें तेल १ शेर (८० तोळे), चांगलें मेण ४ तोळे घालून, कढवून वारीक फडका भिजवून एक-दोन वेळा पट्टी लावावी. दुसरे दिवशीं नवी पट्टी लावावी. पट्टी लावण्यापूर्वी रात्री दारूनें जागा धुवावी. ५–६ दिवस याप्रमाणें करावें.

९०. **जिभेच्या खऱ्यावर** : सोनकाव १॥ तोळा, तुरटीची लाही ६ मासे, टंकणलाही ३ मासे, मोरचूत लाही १ मासा, येणेंप्रमाणें वस्त्रगाळ करून प्रातः सायंकाळी जिभेस चोळावें. लाळ सांडावी. **पथ्य–** दूध, तूप, तेल, आंबट वर्ज्य करावें.

९१. **नागवंग भस्म** : वंग १ तोळा, शिसें १ तोळा, पारा १ तोळा, काळीं मिरें ४ तोळे.

९२. **चट्ट्यांवर उपाय** : पांढरा कात, शंखजिरें, बाभळीच्या सालीची राख खापरांत तयार केलेली बाभळीची काळी राख प्रत्येकीं १ तोळा घेऊन सर्व एकत्र करून चट्ट्यावर २–३ वेळां लावावें. खपल्या पडतात.

९३. **पीनसावर** : काळ्या गाईचें तूप -।- शेर, पोपयाच्या पानांचा रस २ पैसे भार, मिश्रण करून नाकपुडींत रोज २ थेंब घालावें. झडून पडेल. **पथ्य–** तेल, तिखट वर्ज्य.

९४. **हगवणीवर** : खजूर व तूप पैसा पैसा भार बारीक करून रोज घेणें. तूप भात खावा. (नीलकंठ शास्त्री थत्ते, पुणे.)

९५. **केस काळे होण्यास** : जायफळ ४॥ तोळे, तुरटी ३ मासे, नवसागर ३ मासे, पांढरा कात ३ मासे, तांब्याचा चुना १ तोळा, हिराकस ९ मासे, मीठ १ मासा, मोरचूत १ मासा, आंवळकठी वाळलेली काळी २ तोळे, तेल तिळाचें ४॥ तोळे, येणेंप्रमाणें घेऊन तेल कढईत कढवून जायफळें अर्धीकच्चीं तळावीं आणि ऊन आहेत तोंच तरटांत घालून जोड्याच्या पायानें चेंगरावीं. मोरचूत, तुरटीची लाही करून सारे जिन्नस कुटावे. आंवळकठीचें पाणी करून परातींत पुडीपुरतें घेऊन लोखंडाच्या पहारीच्या बुंध्यानें एक प्रहर घोटावें. नंतर पाण्यानें आधीं केस धुऊन मग तेल केसांस लावावें, एरंडाचें पान बसवून पट्टी ४ प्रहर बसवावी.

[कै. सदाशिव भट बाबा केळकर, पुणे, यांच्याकडील शके १७१५ ते शके १७७५ पर्यंत उतरलेले अनुभविक बाड अडूर येथील भिकाजी विठ्ठल केळकर यांचें आहे.]

९६. **ताम्र** : १००–१५० लिंबांच्या रसांत तांब्याचे २–३ तोळे पत्रे घेऊन पातळ करून अग्नीवर लाल करून विझवावें. नंतर अगस्त्याच्या लुगदींत ठेवून पूट द्यावें. भस्म श्वेत होतें (गो. मो. कार्लेकर)

९७. **कोडावर** : नवमीपासून पौर्णिमेपर्यंत बांवचीचें चूर्ण परातींत पसरून

गोमूत्र घालून ठेवावें. परात चांदण्यांत ठेवावी. नंतर त्याच्या गोळ्या करून पांढऱ्या कोडास लेप करावा. कोड जातें. (गो. मो. कार्लेकर)

९८. **कानावर** : कडू एरंडाचा चीक वाहत्या कानामध्यें घालावा. कान बरा होतो.

९९. **दम्यावर** : ओवा व हळकुंड कुटून रात्रीं चहाप्रमाणें काढा करून झोंपते वेळीं गूळ घालून घ्यावा. श्वास, दमा जातो.

१००. **ताम्र** : गोमूत्र, रुईचा चीक, निवडुंगाचा चीक, मेंढीचें दूध, यांत प्रत्येक वेळीं ३ वेळां जुना पैसा विझवून विझवते वेळीं झांकण घालावें. नंतर बारीक पत्रा करून, नंतर खाजकुहिलीचा पाला खालींवर लुगदीप्रमाणें घालून वाटोळें गव्हाचें पीठ फडक्यास लावून गजपुट द्यावें. शुभ्र भस्म होतें.

१०१. **ज्वरघ्न औषध** : काळ्या तुळशीचा पाला, ब्राह्मीचा पाला, काळें मिरें तिन्ही समभाग घेऊन, बारीक घोटून घोटून वाटाण्याएवढी गोळी करावी. रोज २ ते ३ गोळ्या घ्याव्या. ताप कसाही १ सप्तकांत जातो.

१०२. **वेडावर** : बांवच्या २ शेर गाईच्या मूत्रांत भिजवून उन्हांत सुकवून बारीक करून पूड किंवा गुटिका बांधून १–२ महिने खावयास द्याव्या. वेड, उन्माद जातो.

१०३ **जखमेवर** : जखमेमध्यें कीड झाली असल्यास त्यावर रुईचा चीक घालावा. कीड मरते.

१०४. **मुलांस काढा** : नागरमोथे १० तोळे, बाळहरडे १० तोळे, कडूनिंब साल १० तोळे, पटोल कडूपडवळ १० तोळे, ज्येष्ठमध १० तोळे, यांचा काढा करून रोज मुलांस थोडा थोडा प्यावयास द्यावा. सात दिवसांचा करून त्यांत मध टाकून ठेवावा. अनुभविक.

१०५. **हरताळ** : लाजाळूचा पाला ४ तोळे, पत्री हरताळ १ तोळा, लुगदी करून मातकापड करून पूट द्यावें (पूट लहान द्यावें). नंतर तें भस्म पिकलेल्या वांग्यांत भरून पुन्हा पूट द्यावें. सफेत भस्म होतें.

१०६. **क्षयावर** : ओले अंगूर, बदाम, दूध वगैरे खावयास देऊन गुळवेलीच्या स्वरसांतून मौक्तिकभस्म रोज खावयास द्यावें.

१०७. **ताम्र** : तांबें रुईच्या चिकांत विझवून शुद्ध करून लाजाळूच्या लुगदींत पूट द्यावें. नंतर बारीक झाल्यावर रुईच्या चिकांत घोटून लुगदी करून पिक्या वांग्यांत भरून पूट द्यावें. पांढरें भस्म होतें.

१०८. **पारद** : चुका आंबट भाजीचा नव्हे (निपात्ति) १० तोळे, पारा ४ तोळे, केळीचा कांदा पोखरून चार तोळे पारा त्यांत टाकून निपत्तीचा रस त्यावर घालून चोथा वर बसवून खालींवर मातकापड करून वाळवून फुटलेल्या मडक्याच्या खालच्या भागांत तो ठेवून गजपुट द्यावें. भस्म होतें.

१०९ **कफावर :** टांकणखार रुईच्या चिकांत सात दिवस भिजत ठेवून नंतर मातकापड करून गजपुट द्यावें. तें भस्म १ गुंज, व वेखंड १ गुंज, यांतून चाटण्यास दिल्यास मुलें व मोठीं माणसें यांचा कफ पडतो.

[यापुढील औषधें खालील बैराग्याचीं आहेत. गुरुवेणी प्रसाद वैद्य, प्रयाग, कालीकमलीवाला बावा, हृषीकेश, परमहंस कृष्णानंद सरस्वती, हरिद्वार, शके १८०० वरील उतारा.]

११०. **श्वासावर :** चणे १ शेर (पक्का) देशी दारवेंत ३ दिवस भिजत घालून, नंतर रुईच्या पानांत पुड्याप्रमाणें बांधून मातकापड करून पूट द्यावें. राख होईल. ती २–३ गुंजा दम्या-श्वासावर मधांतून द्यावी.

१११ **नपुंसकत्वास महारसायन :** प्रवालजड २ तोळे जाड असते ती १ तोळा, स्वागी ·|· तोळा, सोमल हे तिन्ही जिन्नस एका बुडकुल्यात भरून त्यावर पणती ठेवून चिणून चिणून तोंड बंद करावें, व मातकापड करून वाळवून ५० गोवऱ्यांचें लहान पूट द्यावें. मग भस्म काढून खसखशीएवढें अगर फार तर बाजरी-एवढें भस्म आल्याचा रस व मध यांत द्यावें. कसाही शेवटीं होणारा कफ, दमा, श्वास– यांजवर उत्तम उपयोग होतो. महायात्रेप्रमाणें याचा उपयोग करावा. त्रैलोक्य-चिंतामणि वगैरेप्रमाणें नपुंसकत्वास ३ दिवस फक्त द्यावें. **पथ्य–** चण्याची रोटी, तूप खाण्यास द्यावें.

११२ **ज्वरावर :** काळें मिरीं, गुळवेल सत्त्व, ओंव्याचे तांदूळ, तिन्ही सम-भाग घेऊन वस्त्रगाळ चूर्ण करून चवलीभार मधाबरोबर चाटवावें. जीर्णज्वर, हिंवताप जातो.

११३ **हिंवतापावर :** काळें मिरें ५ तोळे, कडुनिंब काडी ४० तोळे, ओली काडी कुटून काळ्या मिऱ्याच्या चूर्णासहित एका लाल केलेल्या थाळींत वा मडक्यांत ओतावा. तें मडकें अगर थाळी ताटांत ठेवावीं. ताटांत जो रस सांडेल तो प्यावा. हिंवताप जातो.

११४ **वंगभस्म :** मोठी दुधी पुष्कळ आणून (नायटी) वंगाचे तुकडे करून गोणपाटांत बारीक बारीक तुकडे व दुधी एकत्र बांधून तार बांधून गजपुट द्यावें. पांढरें भस्म होतें. दुधी न मिळाल्यास बाभळीचीं कोवळीं पानें घ्यावीं.

११५ **ताम्र :** तांब्याचा पत्रा गोमूत्रांत १०८ वेळां तापवून, विझवून पुन्हा हळदीच्या पानाच्या रसांत १०८ वेळां विझवावें. गोमूत्रांत वगैरे विरघळलेला चूर घेऊन तो रुईच्या साध्या चिकांत १ ते २ दिवस खलून बारीक बारीक गोळ्या करून १ ते २ वेळां बारीक दुधाच्या लुगदींत ठेवून मातकापड करून गजपुट शेणीचें द्यावें. खाली लाकडाचे तुकडे घालावे. पुन्हा वर घालूं नये. पुन्हा बारीक करून रुईच्या

दुधांतच टिकिया बनवून पहिल्याप्रमाणेंच गजपुट द्यावें. अशीं सात पुटें देऊन ताम्र लालट रंगावर अति उत्तम होतें. अर्ध्या तांदुळाएवढें मधांत द्यावें. अनेक रोगांवर द्यावें. सात पुटें देण्यास कमी करूं नये. बरोबर द्यावीं. रुईचा चीक द्यावा. अनुपान वैद्यकीप्रमाणें योजावें.

११६. **दमा-श्वास :** (१) सफेत रुईचा चीक १०–१५ तोळे घेऊन कोऱ्या बुडकुल्यांत घालून वर मातीची चकती ठेवून एक गजपुट द्यावें. आंत तो चीक आटून भस्म होतें. तें तांदुळाएवढें मधांतून द्यावें. दमा-श्वास ताबडतोब राहतो. **पथ्य**– मुगाचें वरण, रोटी २–३ दिवस देणें. (साधी रुईहि चालते). (२) पाव तोळा अफू घेऊन तिचें पाणी करावें. रुईच्या फुलांतील मोखा १ तोळा घेऊन अफूच्या पाण्यांत खलून बारीक बारीक गोळ्या करून ठेवाव्या. श्वास, खासी, दमा, यांवर द्याव्या. लवकर राहतो. अनुभविक आहे. अर्धा शेर गरम दुधाबरोबर निजतेवेळीं गोळी घ्यावी. दमा लगेच थांबतो.

११८. **धातुक्षीणतेस :** गोदंती हरताळ भस्म लोण्यांत द्यावें, म्हणजे धातूचें बंधारण होतें.

११९. **नवरत्न भस्म :** हळदिया वनस्पतींत नवरत्नांचें भस्म होतें, त्याचप्रमाणें अनेक भस्में त्यामध्यें होतात.

१२०. **चांदीचें भस्म :** बारीक जर घेऊन तिचे तुकडे करून बारीक पानांच्या (लोणी) घोळीमध्यें घोटावी, व तीन पुटें द्यावीं. २०० कंडे (थापटे) प्रत्येक पुटास द्यावे.

१२१. **हरताळ :** शुद्ध पत्री हरताळ डळी शरपुंखाची राख करून मडक्यांत खाली-वर दाबून मध्यें डळी ठेवून चिंचेच्या लाकडाचा अग्नि द्यावा. राखेमध्यें एक काडी उभी करून ठेवावी. पहिल्यानें ३–४ तास दीपाग्नि देऊन नंतर विस्तव वाढवीत जावा. काडी जळतांच अग्नि बंद करावा. भस्म होतें. हरताळ, सोमल, जस्त, चांदी, नाग, वंग, हीं भस्में जमिनींत पुरून ठेवून सहा महिन्यांनीं काढावीं. मग गुण जास्त येतो.

१२२. **सोमल :** सोमल शुद्ध करून अपामार्गाच्या राखेंत खालीवर राख दाबून मध्यें डळी ठेवावी, व राखेंत काडी पुरून ठेवावी. पहिल्यानें ३–४ तास दीपाग्नी देवून नंतर विस्तव आटवीत जावा. काडी जळाल्यावर अग्नि बंद करावा. बोरीच्या लाकडांचा विस्तव लावावा. भस्म होतें. हें भस्म केल्यानंतर लवकर देऊं नये. ४ महिने ठेवून नंतर द्यावें. तांदूळभार देऊन लोण्यांत मिळवून खावें. गिळावें.

१२३. **अभ्रक :** मुंडीच्या रसाची अभ्रकास कर्मीत कमी २० पुटें द्यावीं. भस्म होतें.

१२४. **लोह :** बारीक दुधीमध्यें लोहभस्म तयार होतें.

१२५. **लोह** : प्रथम लोहाचा चुरा खलून हळदियापुटीचा घालून तव्यावर लाल करावा. नंतर खलून (त्याच रसांत) दुधीची लुगदी करून पूट द्यावें; भस्म होतें.

१२६. **गोदंती** : शेवग्याच्या पानाच्या रसांत गोदंती हरताळ फुलतो. गोदंती व हरताळ अनेक रोगांवर देणें. लोह व हरताळ अनेक रोगांवर देणें.

१२७ : **वाजीकरण** : फडे निवडुंगाचे फणा कांटे असतात. ते काढून गरम गरम होईपर्यंत निंबुरांत भाजून नंतर काढून त्याच्या रसांत कणीक घालून तुपांत तळून लाडू करून खावा. वाजीकरण आहे.

१२८. **हिंगूळभस्म** : हिंगूळ, रुई, मेंढीच्या दुधांत शुद्ध केलेला, तीन दिवस कांद्याच्या रसांत खलून त्याची गोळी करून पळसाचें मूळ घेऊन कोरून त्यांत भस्म भरून चोथा वर बसवावा. ५–७ मातकापडें करावीं नंतर भाताचें तूस व शेळीच्या लेंड्या घालून भस्म करावें; भस्म होतें.

१२९. **ताम्रभस्म** : पाण्यामध्यें, नंतर गोड्या तेलामध्यें, मग रुईच्या चिकांत नंतर नवसागराच्या पाण्यांत, तांब्याचा पैसा तापवून विझवावा. नंतर ·॥· तोळा नवसागर पैसा न दिसेल असा त्यावर गिलाव्यासारखा लावावा. मग पळसाच्या मांडीएवढ्या जाड लाकडामध्यें भोक पाडून त्यामध्यें तो पैसा ठेवावा. वर तो भुसा बसवावा, व मातकापड करावें. १५ शेर रानगोवऱ्यांत पूट द्यावें. उत्तम भस्म होतें.

१३०. **स्तंभक** : सुंठ, बिब्बे, वृद्ध देवदारू, समभाग चूर्ण करून ठेवावें. नंतर १ तोळा चूर्ण जुन्या गुळामधून रोज घ्यावें.

१३१. **गंधकभस्म** : गंधक तोळे १२, बाभळीच्या सालीच्या किंवा पानाच्या रसांत ४ प्रहर खलून उन्हामध्यें सुकवून कुपीमध्यें भरावें. मुखमुद्रा व ७ मातकापडें करावीं, व तीं वाळूं द्यावीं. नंतर वालुकायंत्रामध्यें चुलीवर २ लांकडांचा मंद असा अग्नि ४ प्रहर, नंतर मोठा ४ प्रहर अग्नि द्यावा. एकूण ८ प्रहर द्यावा. स्वांगशीत झाल्यावर कुपींतून भस्म काढावें. हिरव्या रंगाचें निघेल. सर्व रोगांवर अनुपान योजून द्यावें.

१३२. **हिंगूळभस्म** : ४ तोळे हिंगूळ (पलांडू) कांद्यास खालीं भोक पाडून त्यांत ठेवून चकती बसवून, २ तोळे जाड शेणाचा थर वर देऊन रानशेणींत पूट द्यावें. १०० पुटें द्यावीं. पांढरें भस्म होतें.

१३३. **अपस्मार** : निगडुंगाच्या पानास रुईच्या चिकाचीं २१ पुटें द्यावीं व वाळवून चूर्ण करून नाकांत तपकिरीप्रमाणें ओढावें. नाकांतून किडे पडून अपस्मार बरा होईल.

१३४. **पारागोळी** : पांढऱ्या तिळवळणीच्या रसांत पाऱ्याची गोळी होते.

१३५. **ताम्र** : तिपानी ऊर्फ आंबोतीच्या पानांत तांबें शुद्ध होतें.

१३६. **शूळावर** : मोठा हरडा फोडून कुटून सालाचें चूर्ण करून ठेवावें.

तूप पातळ करून त्यांत ओतून गूळ घालून सुमारें १ तोळा मिश्रण गरम पाण्यावरोबर घ्यावें. शौचास साफ होईल. वायुशूळ जाईल.

१३७. **मूळव्याध** : बोरीच्या झाडांचीं मुळें आणून त्यावरील साल काढून, कुटून, अगदीं वस्त्रगाळ चूर्ण करावें. तें फक्त दुधावरोबर चांगलें शिजवून प्यावयास द्यावें. सात दिवस करावें. मूळव्याध जाते. **पथ्य**– करावें.

१३८. **दमा-श्वास** : रुईचीं पानें १००, काळीं मिरें, सैंधव, पांदेलोण प्रत्येकीं २० तोळे, प्रत्येक थराथरानें पानें व मिरें भरून मध्यें मीठ पेरून हंडीवर झांकण घालून मातकापड करावें, व वाळल्यावर हंडी उघडी ठेवून २ टोपल्या गोवरी घालून आंच रात्रीं द्यावी. सकाळीं थंड झाल्यावर काढून एकत्र खलून ठेवावें. २ मासे चूर्ण १ तोळा मधामध्यें घ्यावें. श्वास, कास, अग्नि, अग्निमांद्य, एकांत्रा व रोज येणारा ताप यांजवर चालतें. चातुर्थिक ज्वरावरही द्यावें.

१३९. **त्वक्-रोगावर** : राळेचें तेल काढून हरएक त्वक्-रोगावर साखरेंतून अगर लोण्यांतून २ थेंब ३–४ दिवस द्यावें. अंगास मालिश करावें.

१४०. **क्षयावर मौक्तिक भस्म** : गुलाबपाणी, व गुळवेलीचा स्वरस यांत खलून थोडेंसें गोवऱ्यांचें पुट द्यावें. उत्तम भस्म होतें. तें गुळवेलीच्या स्वरसांत द्यावें. त्यामध्यें खडीसाखर व मधाचे ठिपके घालावे. अंगूर, काबुली सेव, डाळिंब, सफरचंद खावयास द्यावें. दूध द्यावें. लहान द्राक्षें, काळीं द्राक्षें, खिसमीस पाण्यांत भिजत घालून कुसकरून खडीसाखर घालून पिण्यास द्यावें. क्षयावर द्यावें.

१४१. **गरमीवर** : पांढऱ्या कण्हेरीच्या मुळाची साल काढून १ तोळा घ्यावी. ती बकरीच्या दुधांत वांटून त्यामध्यें कापूर व हिंग थोडासा घालून, अंडकोश, मांड्या, उरो-पोट, यांजवर रात्रीं लेप करावा. सकाळीं धुऊन टाकावें. २–३ दिवस लेप करावा. मूत्रविकार जाईल. इंद्रियावर लेप करूं नये. सूज वगैरेसुद्धां गरमी दूर होते.

१४२. **नेत्रांवर** : हिंगोट (हिंगणबेट) मुळाची साल पाण्यांत उगाळून थोडा भीमसेनी कापूर उगाळते वेळी घालावा. त्याचें डोळ्यांस अंजन करावें. डोळ्यांचे तिमिर, फूल, गळ, सारा, मोतीबिंदू वगैरे जातात. याच्या सालीचा अर्क काढून कापूर घालून पेटंट बनवावें.

१४३. **नेत्रांवर** : गुळवेलीचा स्वरस कांद्याचा (पलांडु) स्वरस, थोडा कापूर, थोडें सैंधव, थोडा मध घालून डोळ्यांचें औषध तयार होतें. अनेक विकारांवर चालतें.

१४४. **पुष्टी येण्यास** : पळसाच्या मुळाची साल काढून वस्त्रगाळ चूर्ण करून पिंपळाच्या (अश्वत्थ) सालीचें चूर्ण, अगर फळांचें चूर्ण करून दूध-साखरेंतून द्यावें.

१४५. **तापावर** : रक्तचंदन, गुळवेल, पद्मकाष्ठ, धने, कडुनिंब-साल, प्रत्येक औषध १ तोळा घेऊन कुटून यांचा काढा करून द्यावा.

१४६. **पुष्टतेस** : भुईकोहळा, सालंमिश्री, कवचबीज (शाल्मली) साकर-बीज कुटून चूर्ण करून दुधांतून द्यावें.

१४७. **प्रदरावर** : चवळाईच्या मुळांचा रस २ तोळे, १। तोळा मध, ·॥· तोळा खडीसाखर, गुंजभर रसांजन (रसोत) चूर्ण घालून, ज्येष्ठमधाचें चूर्ण १ मासा घालून, चाटावयास देऊन वर गरम दूध द्यावें. मासिक धर्म होत नसेल तर रीतसर होईल. चार प्रकारचे प्रदर साफ बरे होतील.

१४८. **शक्तिवर्धक** : पारा १ तोळा, शुद्ध गंधक १ तोळा, घोटून कज्जली करावी. २ मासे कज्जली, तूप-साखर, आंवा यांजबरोबर ३ दिवस घ्यावें.

१४९. **दंतरोगांवर** : जाईचा पाला पाण्यांत उकळून, त्या पाण्यानें गरम असतांनाच गुळण्या कराव्या. दोन तीन दिवस कराव्या. दांतांचे सर्व रोग जातात.

१५० **शक्तिवर्धक** : पिंपळ, वड, उंबर यांचीं फळें वाळवून चूर्ण करून तूप-साखरेबरोबर घ्यावें. शक्ती वाढते.

१५१ **नपुंसकतानाशक तैल** : डुकराची चरबी राळेच्या तेलांत शिजवून त्यामध्यें थोडा वास कापूर व हिंग घालून इंद्रियास बांधणें, व मालिश करणें.

१५२. **मासिक पाळी** : संक्रान्तीचे काळे तीळ रोज १ तोळाप्रमाणें खावयास देऊन, वर पाणी प्यावयास द्यावें. धुपणी बरी होऊन मासिक धर्म नीट होतो. जेवतांना रोज दहीं खावयास द्यावें.

१५३ **ताम्रभस्म** : तांब्याचा पैसा जुना घेऊन, ६ पैसे भार रुईचा चीक घेऊन, तो पैसा अग्नींत तापवून तांबडा होतांच चिकांत विझवावा. दर वेळीं २ पैसे भार चीक कमी होईल. असेंच रोज ३ वेळां करावें. १८ पैसे भार चीक ३ दिवसांत आटविणें, म्हणजे पैसा फुलतो. नंतर जयपाळाचा गीर २ पैसे भार खलून लुगदी करावी. त्यांत पैसा घालावा. नंतर ८० चिंध्या त्यास गुंडाळाव्या. त्यावर मातकापडें दोन करावीं. मोटभर रान-गोवऱ्या आणून निर्वात स्थळीं खांच करावी. वायु न लागतां अर्ध्या खालीं व अर्ध्या वर अग्नि घालून अग्नि द्यावा. स्वांगशीत झाल्यावर पैसा काढावा. वजनात मासाभर कमी मिळतो. शुभ्र होतो. क्रिया सत्य आहे.

१५४. **शक्तिवर्धन** : कुहिलीचें मूळ आणून दुधांत उगाळून प्यावें. धातुवर्धक, शक्तिवर्धक आहे. वीर्य स्तंभन होतें. मूळ तोंडांत धरूनही वीर्यस्तंभन होतें.

१५५. **ताम्र** : कुमारीच्या रसांत ताम्र घोटून तयार करावें, व तीन पुटें द्यावीं. भस्म होतें.

१५६. **अभ्रक** : कुमारीचा व कडूनिंबाचा रस यांत अभ्रक घोटून पुटें देणें. उत्तम भस्म होतें.

१५७. **सोमल** : अपामार्गाच्या राखेमध्यें सोमल होतो.

१५८. **नपुंसकतानाशक तेल** : डुकराची चरबी, राळेचें तेल, कोंबडीच्या

अंड्याचीं टरफलें २ दिवस घोटून बाटलींत भरून ठेवावें. इंद्रियनिर्बलतेस मालिश करण्यास द्यावें.

१५९. **ताम्र** : ताम्र भूर्जपत्राप्रमाणें पातळ करून औदुंबराचें दूध घालीत जाऊन (५३ दिवस) मग गजपुट द्यावें. ताम्र पांढरें होतें. प्रथम ताम्र तैलेंकरून, तक्रेंकरून घ्यावें.

१६०. **पारदभस्म** : पांढऱ्या कोरांटयाच्या रसांत पारा मर्दन करून मुशींत पूट रानशेणीचें द्यावें. साध्य होतें.

१६१. **सोमलभस्म** : वकाणालिंबाचा रस ३ पावशेर पितळेच्या भांड्यांत घालून १ तोळा सोमलखडा त्यांत भिजत घालावा. तो दोन दिवस ठेवावा. त्याच पाल्याची लुगदी आंब्याएवढी करून तो खडा त्यांत ठेवून नंतर मडक्यांत ठेवून त्यांत तो रस ओतावा. व खापर चांगलें बसवून मातकापड करून ५–६ शेर रानगोवऱ्या खालींवर घालून निर्वात स्थळीं अग्नि द्यावा. स्वांगशीत काढून घ्यावें, मात्रा तंडुल-प्रमाण वजन विड्यांत किंवा तुपांत देणें. **पथ्य**– चार घटकेनें देणें. वान्ती-भ्रान्ति-रहित होय हें सत्य. तूप बहुत खावें.

१६२. **गतकामास** : पांढरा कांदा तुपांत तळून खावा. पावशेरप्रमाणें १४ दिवस खावा. स्त्री, तेल, तिखट, आंबट, वर्ज्य.

१६३. **रौप्यभस्म** : चांदीचा चुरा १ तोळा, गुलाबाच्या फुलांचा रस ३ तोळे, याप्रमाणें खल करून त्याच्याच लुगदींत ठेवून मातकापड करून पांच शेर रानगोवऱ्यांचीं ३ पुटें द्यावीं. उत्तम भस्म होतें.

१६४. **रौप्यभस्म** : क्षयावर द्यावयाचें रौप्यभस्म आंबट डाळिंबाच्या रसांत करावें. भस्म होतें.

१६५. **रसवंग** : २ तोळे वंग, २ तोळे पारा, एकत्र करावें. २ तोळे काळें मिरीं चूर्ण, २० तोळे पोस्तदाणा (खसखस), बारीक करून पारा वंग खापरांत पातळ करून लोखंडाच्या पळीनें घोटावें, व ती भुकी चिमटी चिमटी वर टाकावी. दोन प्रहरपर्यंत पांढरें भस्म होईल. लाल झालें तर उत्तमच. सर्व ताप काढतें.

१६६. **पारा** : पारा गडमूत्रांत कायम करण्यास ४ प्रहर पचन करावा. सिद्ध होतो. १ शेर वंगास १ तोळा द्यावा. पाणी खेंचतो.

१६७. **कुत्र्याच्या विषास** : (१) जिरें, गूळ, व डाळिंबाच्या पानांचा रस ·॥· पेला एकत्र करून प्यावयास द्यावें. २-३ दिवस द्यावें. कुत्र्याचें विष जातें. (२) सुसरीची चरबी आणून ती एका बाटलींत भरून ठेवावी. त्यापैकीं २–३ थेंब साखरेबरोबर द्यावें. **पथ्य**– करावें. तेलकट, तिखट, आंबट, खाऊं नये. अनुभविक आहे. (ज. र. आजगांवकर)

१६८. **मूळव्याध** : कडूनिंबाच्या निंबोण्यांतील आंतील गर काढून कुटून त्याच्या चिकण्या सुपारीपेक्षां लहान अशा २१ गोळ्या कराव्या. रोज १ गोळी

सकाळीं दुधाबरोबर गिळून खावी. रोज दूधभात, पिठीसाखर, याप्रमाणें पथ्य करावें. रक्त-मूळव्याध-मोड, सूज, ठणका, वगैरे जाईल. मोडांस मलम– निंबोण्यांचा गर वांटून २ तोळे, ०॥० तोळा मोरचुताची लाही, याप्रमाणें खलून मलम करावें. लोणी थोडें घालावें. (मोड झिरपून जातो)

१६९. **सर्व ज्वर, अपचन, क्षय, नपुंसकत्वावर :** हिंगूलोत्थ पारा ११ दिवस नागवेलीच्या पानाच्या रसांत खलून तो अगदीं जाड अशा मुळ्यांत पोखरून भरून वर त्याचीच लुगदी बसवून मुळ्यांस मातकापड करून गोवऱ्यांत (रानशेणी न मिळतील तर) पूट देऊन भस्म होईल. तें मलईंतून द्यावें. **पथ्य–** पारदावरील करावें.

१७०. **तिडक्या परमा, धुपणीवर :** भोकरीचें पाळ दुधांत उगाळून द्यावें. पथ्य करावें.

जैन सांप्रदायी एका वृद्ध भिक्षूचा अनुभवयुक्त प्रयोग.

१७१. **ज्वर, क्षय, कुष्टादिक विकारांवर (हरताळ) :** पत्री हरताळ शुद्ध करून (पद्धतीप्रमाणें) पांढऱ्या रुईच्या (मंदाराच्या) चिकांत २१ दिवस, रोज ६ तासांप्रमाणें खलून, त्याची सुकल्यावर चक्रिका करून (दूध मिळेल त्याप्रमाणे) ५ किंवा १० तोळे हरताळ घ्यावा. अगदीं चांगली वाळवून त्या चक्रिकेच्या खाली-वर पांढऱ्या अभ्रकाचे पत्रे देऊन (चक्रिकेचे बाहेर १ अंगुळ पत्रा राहिला पाहिजे.) त्याची सर्व बाजू मिळती करून उत्तम रेशमाच्या धाग्याने मिठाईच्या पुड्याप्रमाणें गुंडाळावें.) त्यामध्यें फट पडूं राहूं देऊं नये. आंतील पत्र्याचा भाग रेशीम गुंडाळल्यावर दिसणार नाहीं इतक्या व्यवस्थितपणें रेशीम गुंडाळावें. नंतर ती गुंडाळलेली चक्रिका एका पिंपळ-पलाश-चिंच-अपामार्ग यांच्या राखेनें भरलेल्या (तोंडोतोंड) एका मातीच्या शरावांत ठेवावी. त्या चक्रिकेच्या सभोंवार एक आंगुळ राख राहील एवढा मोठा तो परळ असावा. त्यावर दुसरा त्याच राखेनें पूर्ण भरलेला परळ उपडा घालावा, म्हणजे त्यामध्यें पोकळी राहणार नाहीं इतकी राख भरावी. नंतर त्यावर मातकापडें सात करावीं. एक सुकल्यावर दुसरें याप्रमाणें तीं करावीं. नंतर तांब्याच्या तारेनें तें संपुट घट्ट बांधावें, व एका मोठ्या मडक्यांत वालुकायंत्राप्रमाणें वाळू घालून तें संपुट ठेवावें. खालीं अर्धी वाळू घालून मध्यें संपुट ठेवून वर अर्धी वाळू मडकें भरेपर्यंत घालावी. मडक्याचें तोंड त्यामधून संपुट जाईल असें असावें. नंतर त्याच्या तोंडावर खापरी ठेवून त्यासहि मातकापड करावें. मग गजपुटाएवढा खड्डा खणून त्यांत रानशेणी घालून व शेळीची लीद घालून मध्यभागीं हड्डी ठेवून वर बाजूला रानशेणी व लीद घालून मधून मधून भाताचें तूसही घालावें, व भट्टी लावावी. चांगली भट्टी पेटल्यावर व धूर निघून गेल्यावर त्यावर पत्रा झांकण ठेवावा. अशा भट्टींत ६ ते ८ दिवस विस्तव राहतो. स्वांगशीत झाल्यावर हंडी काढून पत्र्यामधील भस्म काढून घ्यावें.

तें सफेत व वजनदार भस्म होतें. निर्धूम निर्गंधहि होतें. एक राईपासून पाव तांदूळ-प्रमाणें रोगोक्त अनुपानानें द्यावें. **कुष्टादिक विकार, ज्वर, क्षय** इत्यादि विकारां-वर चांगलें कार्य करतें. हें मौल्यवान आहे.

१७२. **सोमल** : निवडुंगाची राख करून एका मडक्यामध्यें भरून त्यावर सोमलाचा खडा ठेवावा. त्यावर पुन्हा राख भरून तोंडोतोंड आणावी. खालींवर निम्मोनिम्में राख भरावी. नंतर त्यावर एक खापरी घालून मातकापड करावें. व वरील-प्रमाणें वालुकायंत्र करून पुट द्यावें. भस्म होतें. तें काढून घ्यावें किंवा चुलीवर ठेवून ५ प्रहर मंद मध्यम तीव्राग्नि द्यावा.

१७३. **हिंगूळभस्म** : बाभळीचीं पानें डेखें काढलेलीं २० तोळे घेऊन दगडाच्या खलबत्त्यांत बारीक कुटून, त्याचा गोळा करावा. त्यामध्यें हिंगुळाची ५ तोळे वजनाची डल्ली ठेवावी. नंतर त्या गोळ्यास मातकापड करून १०० तोळे गोवरीच्या चूर्णांत आंच द्यावी. याप्रमाणें २१ वेळां करावें. शुभ्र भस्म होतें.

१७४. **ताम्रभस्म** : राताळ्यांच्या आकाराचा असा एक कंद असतो तो कंद गुरांच्या आंखावर बांधला असतां फोड येतो. त्या कांद्यास चीर देऊन त्यामध्यें शुद्ध केलेली तांब्याची तार वळकुटी करून भरावी. त्यावर त्या कंदाचा चुरा भरून त्यावर सात मातकापडें करून वाळवून गजपुट द्यावें. सफेत भस्म होतें.

१७५. **हरताल, सोमल किंवा हिंगूळ अग्निस्थाई करणें** : त्रिधारी निवडुंगाच्या चिकांत खलून वालुकायंत्रांत सराव संपुटांत ठेवून पूट द्यावें. भस्म होतें. चांदीच्या अगर तांब्याचा तेजाबांत गाळलेला चुरा एका शरावामध्यें भरावा. त्यावर हिंगूळ ठेवून वर दुसरा शरावही त्याच चुऱ्यानें भरलेला घालावा. मध्यें फट राहूं देऊं नये. नंतर मातकापड करून मोठें पूट द्यावें. हिंगूळ अग्निस्थाई होतो.

१७६. **हरताळस्थिर** : मुद्रेच्या पाल्याच्या लुगदींत हरताळाचे खडे ठेवून मातकापड करून मोठें पूट द्यावें.

१७७. **कथीलभस्म** : कथलाचें पाणी करून वर एरंडाचा (गोड्या एरंडाच्या पानांचा) रस टाकून हालवावें. पुन्हा रस टाकावा. असे ७ ते ८ वेळां करावें. भस्म होईल.

१७८. **मस्तकास** : केशर, कापूर, वेलदोडा, गाईचें तूप, एकत्र करून हुंगणें.

१७९. **पंडु रोगावर** : पिवळ्या कवड्या व कागदी लिंबाच्या रसांत ८ ते १० दिवस भिजत घालून त्याचें पाणी होईल. तें पाणी सावलींत वाळवावें; व मधांत १ गुंज देणें. **पथ्य**– आल्याचा रस, मधही चालेल. आंबट, तेलकट, गूळ वर्ज्य.

१८०. **लोखंडाचें पाणी** : रक्तरोड्याची साल कुटून पाणी काढावें, व त्यांत लोहास तापवून विझवावें. (त्यावर लिंबाचा रस पिळावा. तापवून विझते-वेळीं) लोखंड पाण्यांत उतरतें. वजन कमी होत जातें.

१८१. **धातुपुष्टतेस** : लोह, पोलाद कीस (कानसलेला) सत्यनाशीच्या पाल्याचा रस काढून त्यांत घालावा. पाणी होईल (गळून जाईल). दहीं व जांभळाचा रस यांत १ गुंजप्रमाणें देणें.

१८२. **शिसें** : पावशेर शिसें परळांत पातळ करून हिरवी राख होईपर्यंत कोरफडाच्या मुळीनें घोटावें. नंतर तांबड्या फुलाच्या डाळिंबीच्या मुळीनें घोटावें. भस्म होतें. (सिंदुरवर्ण).

१८३. **पारद** : एका लोखंडाच्या डबींत २ तोळे पारा, १ तोळा (पिवळें) मोरचूत, घालून व बाकी पाणी घालून डबी घट्ट लावावी. ५–७ दिवसांनीं डबी उघडावी, पिवळें भस्म तयार होतें.

१८४. **ताम्रवंग** : ६ मासे पारा, ६ मासे कथील हीं तांब्यास खालींवर लावून लेप करून वाळूंत कुपी ठेवून भस्म करणें.

१८५. **ताम्र भस्म** : (१) ताम्र शुद्ध पैसा, मोगली एरंडाच्या मोकांच्या लुगदींत गजपुट द्यावें. मोकांच्या जिभा काढाव्या. भस्म शुभ्र होतें. किंवा पर्णवीजाच्या रसांत ७ वेळां विझवून त्याच्याच लुगदींत अग्निपुट द्यावें. किंवा उतरणीच्या पाल्यांत गजपुट द्यावें. किंवा त्रिधारी निवडुंगाच्या गाभ्यांत ठेवून खड्डयांत लाकडाची आंच द्यावी. (२) लिंबाच्या रसांत शुद्ध केलेलें ताम्र खालींवर १ तोळा सोनामुखीचें चूर्ण घालून गजपुट द्यावें. नंतर २० तोळे रुईच्या चिकांत पुट द्यावें. भस्म होतें. जलोदर, वातोदर, कफोदर (लाल भस्म) नपुंसकत्व वगैरेंवर उपयोगी. (३) कथलाची डबी करून त्यांत १ तोळा तांबें, जेपाळबीज २० तोळे, व बिब्बे २० तोळे, मिळून ४० तोळे कुटून अर्धी खालीं अर्धी वर घालून पोटीं ताम्र पैसा ठेवून पक्के पांच शेर कपडे गुंडाळून आंच द्यावी. सफेत भस्म. (४) १ तोळा ताम्र, ५ तोळे कडू शेवग्याची साल, ५ तोळे जेपाळबीज कुटून रुईच्या चिकांत गोळा करावा. कापडमीठ करून गजपुट. अस्मानी लाल भस्म होतें. (५) उंबराच्या चिकाचें लेपण पैशास करून वरून रुईच्या फळांतील कापूस लपेटून पुन्हा चिकाचें लेपण याप्रमाणें ३ वेळां करून ५ शेर कच्चें (कापड) गुंडाळून गजपुट द्यावें. सफेत भस्म. (६) रुईच्या चिकाचीं १०० सूर्यपुटें देऊन नंतर १०० वेळां लाल करून, रुईच्या चिकांत विझवून, १ गजपुट द्यावें. रानशेणी, निवारा, निरभ्र दिवस, एकान्त, सांवली पडूं न देणें. सफेत. (७) शेराच्या दुधाचा लेप पैशास देणें. सावलींत वाळविणें. सात लेप देणें. त्यानंतर म्हशीच्या शिंगाचा शेवटचा तुकडा आणून तोंडी माती देऊन ३ मातकापडें करून गजपुट देणें. श्वेत भस्म. (८) गुळवेलीचे अत्यंत (केसाकार) बारीक तुकडे ६ तोळे, तांबें शुद्ध तोळा १ असे तीन तुकडे खालींवर ठेवून तिच्या पाल्यानें गुंडून सुतानें बांधून कापडमाती उकरून गजपुट द्यावें. (९) तांदुळजाच्या जून मुळ्या ८ तोळे आणून त्याची लुगदी करून ३ मातकापडें करून पूट द्यावें. भस्म होतें. (१०) सफेत रिंगणी छाया शुष्क कुटून मोठ्या गोवरीवर ४ इंच थर देऊन

वर पत्र्याचा चूर ठेवून, वर पुन्हां ४ इंच बुकणी पसरून, मोठी गोवरी ठेवून खड्ड्यांत गजपुट (रानशेणी) द्यावें. सफेद. (११) चिक्वे, जमालगोटा, आघाड्याचीं मुळें, एकत्र करून कुटून चूर्ण करून मध्यें पैसा ठेवून पूट देणें. सफेत. (ताम्र शुद्ध घ्यावें). (१२) चिक्वे (अगदीं तेल भरलेले) अर्धा शेर कुटून एका नारळांत भरावें. त्यांतच तांबें ठेवून खड्ड्यांत आंच द्यावी. सफेत भस्म तयार होतें.

१८७. **स्वरस व क्वाथ (काढा)** : असेल तर अष्टमांश मध मिळवून सुरक्षित राहतो. नासत नाहीं.

१८८. **खोकल्यावर** : अश्वगंधा २॥ तोळे, ज्येष्ठमध २॥ तोळे, गांठे-पिंपळमूळ २॥ तोळे, सुवर्णमाक्षिक भस्म ·॥· तोळा, ब्राह्मीचूर्ण १। तोळा, सर्व मिश्रण खोकल्यावर चांगलें. प्रमाणानें पुड्या करून दूध-साखरेंत, मधांत, साखरेच्या पाकांत ९। तोळे चूर्ण होईल. मोठ्यास रोज ·॥· तोळ्याच्या पुड्या करून देणें.

१८९. **दम्यावर** : धोतऱ्याच्या फळांतील बिया गर वांटून, त्याची राख करून थोडी मधांत द्यावी.

१९०. **मूर्च्छना, मस्तकशूल, भ्रम, विंचवाचें विष, अहिदंश, हैंजा, इत्यादींवर** : नवसागर चुनकळी १-१ तोळा प्रत्येक घेऊन पृथक् खल करून, कांचेच्या बुचाच्या बाटलींत भरून, त्यांत २ मासे कापूर घालावा. तें नस्य उत्तम होतें.

१९१. **दंतरोग** : मायफळ व तुरटी पूर्ण दांतास लावून सर्व रोग (रक्त, पू येणें, वगैरे) जातात. मायफळाच्या पोटलीनें रक्तस्राव बंद होतो.

१९२. **रक्त-आमांश** : मायफळाचें चूर्ण थोडें थोडें मध-साखरेबरोबर चाटून बंद होतो. मुलांस फार फायदा होतो.

१९३. **बालार्क (वैद्यकसार)** : १ तोळा हिंगूळ, १ तोळा प्रवाल, १ तोळा मृगशृंग, १ तोळा केशर, १ तोळा सफेत मिरें, १ तोळा कचोरा, १ तोळा शुद्ध कलखापरी (सर्व समभाग) विड्याच्या पानाच्या रसांत खल करून मुगाप्रमाणें गोळ्या करून ठेवणें. मुलांस. मोठ्यांसाठीं आल्याच्या रसांत, मधांत, दुधांत वगैरे.

१९४. **रक्त प्रदर, श्वेत प्रदर वगैरेंवर (शोणितार्गळ रस)** : लोह ·॥· तोळा, अभ्रक ·॥· तोळा, रसांजन १ तोळा, हिरादखान १ तोळा, तुरटीची लाही ·।· तोळा, रक्तचंदन १ तोळा, सोनगेरु १ तोळा, रससिंदूर १ तोळा, लाख १ तोळा, बाभळीच्या पानांच्या रसांत किंवा रसांजनांत खल करून गोळ्या करून पाण्यांत, ताकांत, धुवणांत, दुधांत, तांदुळजाच्या रसांत वगैरे देणें.

१९५. **दमा** : काळी खजुरी १ तोळा, पिंपळी १ तोळा, मिरें १ तोळा, सैंधव १ तोळा, बारीक चूर्ण करून पुड्या ७ करून मधांत, सकाळ-सायंकाळ घेणें. वर पाणी गरम प्यावें. जुनाट दमा जातो. कोठा साफ होतो. गरम वाटल्यास रात्रीं दूध घ्यावें.

१९६. **जीर्ण तापावर** : काळी खजुरीनें जातो. हें औषध लोणावळ्यास एक खिश्चन देत असे.

१९७. **आंतड्यांचे, गर्भाशयाचे विकारावर** : हळकुंड पाण्यांत भिजत घालून रोज एक हळकुंड दुधांत बारीक वांटून पिण्यास द्यावें. दुसरे दिवशीं २, तिसरे दिवशीं ३ याप्रमाणें २०–२१ दिवस हळकुंडें वाढवीत जाणें.

१९८. **दांताच्या किडी, जंतू, दाढ दुखण्यावर** : रुईचीं २ पानें वांटून त्यांत थोडें पाणी घालून तो रस कानांत २ चमचे घालावा. ५ मिनिटांनीं ओतून टाकावा.

१९९. **शुक्र-तारल्य व आमवातावर पोलादभस्म** : ब्राह्मीच्या लुगदींत पोलादाचा चुरा घालून त्याचें भस्म होतें.

२००. **पुष्टतेवर पारदभस्म** : एका शरावांत काळ्या धोत्र्याचा रस घालून आंच दिली असतांना भस्म होतें.

२०१. **पुष्टतेवर वंगभस्म** : कथील पातळ करून ४ था हिस्सा पारा त्यांत मिळवून त्याचे तुकडे करून मेंदीच्या लुगदीवर बसवून गोवऱ्यांत उत्तम भस्म होतें. पौष्टिक आहे.

२०२. **रौप्यभस्म** : चांदीचा पत्रा २ वेळ मेंदीच्या रसांत विझवून मेंदीच्याच लुगदीनें २ पुटांनीं उत्तम भस्म होतें.

२०३. **वीर्यवर्धक नागभस्म** : नाग पातळ करून मातीच्या अगर लोहाच्या भांड्यांत केवड्याच्या दांड्यानें घोटून भस्म होतें. तें भस्म ८ वेळ कोरफडाच्या रसांत व ८ वेळां दुधीच्या रसांत घोटून गोळा करून मातकापड करून पुट द्यावें. भस्म होतें, यासच नागेश्वर म्हणतात. उत्तम वीर्यवर्धक आहे.

२०४. **ताम्रभस्म** : वनगोभीच्या लुगदींत ताम्रभस्म होतें.

२०५. **सुवर्णभस्म** : ६ मासे सोनें, ६ छटाक कांचनाच्या लुगदींत २ वेळां फुंकून भस्म होतें.

२०६. **बलकारक हिंगूळभस्म** : १ तोळा हिंगुळाचे दोन तुकडे करून त्यांत ३ गुंजा हरताळ मिळवून, खलून, एका शरावांत ठेवून त्यांत आल्याचा रस २ तोळे, व लवंगेचें चूर्ण ४ मासे घालून, वर झांकण बंद करून चुलीवर ठेवावें. ३ तास आंच देणें. उत्तम बलकारक भस्म होतें.

२०७. **ताम्रभस्म** : (१) ताम्र नेपाळी घ्यावें. जास्वंदीच्या फुलाप्रमाणें लाल स्वच्छ चिकटपणाचा घाव सहन करण्यासारखें, व नरम असें ताम्र तेंच नेपाळी समजावें (रस तंत्रात नेपाळी ताम्र उत्तम लिहिलें आहे.) तांब्याचे अतिशय पातळ कंटकविधी करून तापवून तेल, ताक, कांजी, गोमूत्र, कुळथाचा काढा यांत ३-३ वेळां विझवून उत्तम शुद्ध होतें. (२) नेपाळी ताम्राचे बारीक पत्रे करून समभाग सैंधव घालून कांजीत दोलायंत्रानें शिजवावें. उत्तम शुद्ध ताम्र होतें. (३) ताम्राच्या

आठवा हिस्सा सैंधव घेऊन त्याची पुरचुंडी बांधून, गोमूत्रांत स्वेदन करावें, उत्तम ताम्र शुद्ध होतें.

२०८. **भस्मक्रिया :** वरील प्रकारानें शुद्ध केलेलें ताम्र रुईच्या अगर वडाच्या दुधांत ताम्राच्या समभाग गंधक घेऊन रुईच्या, वडाच्या, अगर गाईच्या दुधांत खल करून किंवा निर्गुडीच्या रसांत खल करून सुकवून दोन उत्तम गजपुटें द्यावींत. उत्तम भस्म होतें. किंवा समभाग गंधक घेऊन वरील रसांत खल करून ताम्र पत्र्यांस लेप करावा, व गजपुट द्यावें. उत्तम भस्म होतें.

२०९. **सोमल भस्म :** सोमल १ तोळा लिंबाच्या रसांत ३ तास खलून त्याची चकती करावी, व उन्हांत वाळवावी. नंतर १ पाव कलमी सोरा (२० तोळे), निंबाच्या रसांत खल करून त्याची लुगदी करावी. त्या लुगदींत वरील सोमलाची चकती बसवावी व गोळा वळून (मोदकाप्रमाणें) उन्हांत वाळवावें. नंतर पिंपळाच्या लांकडाची चाळलेली राख २ शेर (पक्के) घेऊन ती एका हंडींत भरून मध्यभागीं वरील गोळा ठेवून व हातानें खालीवर राख दाबून बसवावी. तोंडावर परळ घालून मातकापड करावें, व उन्हांत वाळवून पक्के १५ शेर शेणींत पुट द्यावें. स्वांगशीत झाल्यावर धान्याच्या लाहीप्रमाणें उत्तम भस्म फुलून येतें. (भाताच्या लाही-प्रमाणें फुलून येतें.)

२१०. **हरताळ :** हरताळ गाढवाच्या मुतांत खलून वरील सोमलाप्रमाणेंच त्याचें भस्म करावें. (नजकगड साधू मनोहरदास वैद्य एप्रिल १९४३.)

२११. **यकृत रसायन, पांडुरोगावर (वंगभस्म) :** ५ तोळे वंग लोखंडाच्या कढईंत पातळ करावें. त्याच्यावर कलमी सोऱ्याची १ चिमटी टाकावी, व भांगेची १ चिमटी टाकून पळीच्या दांड्यानें ढवळीत असावें. याप्रमाणें चिमटी चिमटी टाकून २०–२० तोळे सोरा व भांग जाळावींत. याप्रमाणें चुरे करून नंतर ती राख कढईंत एकत्र करून १ तास पर्यंत खाली विस्तव ठेवावा. स्वांगशीत झाल्यावर उतरून नंतर मातीच्या परळांत ठेवून मातकापड करून १२ शेर (पक्के) शेणीची आंच द्यावी; म्हणजे अगदीं पांढरें शुभ्र भस्म होईल. परंतु आंत सोरा असल्यामुळें दुसऱ्या कोणत्याही भांड्यांत घेऊन धुवावें. वर काळें असलेलें पाणी काढून परत चांगलें पाणी घालावें. अशा प्रकारें ५–६ वेळां धुवावें. म्हणजे सोरा निघून जाऊन शुद्ध भस्म तयार होतें. तें एका परळांत वाळवून बाटलींत भरून ठेवावें, व यकृत रसायन झालें. २–४ बदामाचे गर, साखर–लोणी, मिरीं, यांच्या चूर्णांतून द्यावें. पांडुरोगही १५ दिवसांत बरा होतो. तुपांत वंग ७ वेळां पातळ करून विझवावें म्हणजे वंग शुद्ध होतें.

२१२. **यकृतावर थंडा लोह :** कोरफडाच्या गरांत लोहाचा शुद्ध चुरा एकसारखा खलून धुळीप्रमाणें त्याचें भस्म होईपर्यंत खलावें. पाण्यावर तरलें पाहिजे. यकृतावर लोण्यांतून देणें.

२१३. **यकृतावर मंडूरभस्म** : त्रिफळा, मिऱ्याचें चूर्ण, पिंपळी, सुंठ, यावरोबर मिश्रण करून दह्याबरोबर द्यावें.

२१४. **पांडुरोगावर : वंग (पारा, व सोऱ्यांत)** : शुद्ध वंग ५ तोळे, कलमी सोरा २ तोळे, प्रथम कल्हई पातळ करून त्यांत पारा ५ तोळे घालावा. नंतर एकजीव झाल्यावर खलांत घालून कलमी सोरा थोडा थोडा टाकीत असावें. २ तासांनीं उत्तम चूर्ण होतें. तें सर्व चूर्ण एका मोठ्या परळांत ठेवावें, व त्यावर दगड किंवा वीट ठेवून १०–१२ शेर शेर्णीत आंच द्यावी. म्हणजे मोठा स्फोट होऊन ज्वाळा निघतात. त्या निवाल्यावर व अग्नि विझल्यावर व परळ निघाल्यावर पांढऱ्या अंड्याप्रमाणें आंत गोळा सांपडेल. तो नंतर बारीक करून, तें चूर्ण वस्त्रांत गाळून, पाण्यांत धुवून, वाळवून ठेवावें. ५–६ वेळां पाण्यांत धुवावें, म्हणजे आंतील सोरा निघून जातो. तो गेल्यावर वाळवून बाटलींत भरून ठेवावें. स्वप्नदोष, प्रमेह वगैरे विकारांवर १ मासापर्यंत लोण्यांत २ रती हें भस्म द्यावें.

२१५. **खोकल्यावर** : अफू १ मासा, हिंगूळ १ मासा, काळें मिरीं १ मासा, ज्येष्ठमध शिरा ३ मासे, यवक्षार १ मासा, अपामार्गक्षार १ मासा, सुंठ १ मासा, सर्वांचें भस्मगाळ चूर्ण करून पाण्याचा थेंब टाकून गोळ्या कराव्यात.

२१६. **पांडुरोग** : पांढरी तुरटी भाजून अगर कच्ची तुरटी बारीक करून १॥ तोळ्याच्या २१ पुड्या करून लोण्यांतून द्यावी.

२१७. **पांडुरोग** : पिंपळाचीं पानें ७ कोंवळीं वांटून त्यांत लसूण वांटून त्याचें सरबत करावें व मीठ घालून पिण्यास द्यावें.

२१८. **अशक्तता** : धने बारीक कुटून त्याचे तांदूळ काढून ते ३ मासे कुक्कुटाण्डत्वक् भस्म २ गुंज, व मोत्याच्या शिंपांचें भस्म २ गुंजा एकत्र करून, गाईच्या धारोष्ण दुधाबरोबर द्यावें. उत्तम शक्तिवर्धक आहे.

२१९. **कानावर तेल** : तिळाचें तेल घेऊन त्यांत हिंग, वावडिंग, लसूण, डिकेमाली हें घालून अग्नीवर तेल सिद्ध करावें. व गाळून बाटलींत भरून कानाच्या सर्व विकारांवर द्यावें.

२२०. **अंत्रवृद्धीवर** : घृतकुमारीचा गीर २ ते ४ तोळेपर्यंत पाण्यानें धुवून दूध–साखरेंतून २ महिनेपर्यंत घ्यावा. यानें अंत्रवृद्धी लवकर बरी होते.

२२१. **अपस्मार** : सफेत मांदारफूल १ मासा, व जुना गूळ १ मासा, यांच्या गोळ्या करून खाणें. अपस्मारावर उत्तम उपयोग होतो.

२२२. **मूळव्याध** : करंजाचें बीं (वरील सालासुद्धां) घेऊन सकाळीं खाण्यापूर्वीं गिळावें. त्याच्यावर ५ तोळे देशी साखर खावी. पाणी पिऊ नये. मुगाची डाळ व रोटी खावी. ७ दिवस. चांगला गुण येतो.

२२३. **मूळव्याधीच्या ठणक्यावर अर्शवटी** : गुग्गुळ १ तोळा, त्रिफळा ३ तोळे, बारीक करून पाणी घालून गोळ्या मिऱ्याप्रमाणें कराव्यात. मूळव्याधीच्या

माणसास २ ते ४ गोळ्या दिल्या असता ठणका ताबडतोब थांबतो, व आराम वाटतो.

२२४. **मूळव्याधीवर :** कडूनिंबाच्या बिया १ तोळा, बकाणा लिंबाच्या बिया १ तोळा, गुग्गुळ ·॥· तोळा, पांढरा कात ·॥· तोळा, रिठ्याच्यावरील सालीचें भस्म ६ मासे, सर्वांचा मुळ्याच्या पावशेर रसांत खल करून गोळ्या चण्याप्रमाणें कराव्यात. दुधाबरोबर २–२ गोळ्या सकाळीं–संध्याकाळीं द्याव्या.

२२५. **खोकल्यावर :** प्रवाळ ५ तोळे घेऊन, ताज्या गुलाबाच्या ·।· शेर फुलांत, अगर कोरफडीच्या ·।· शेर गरांत ठेवून परळांत मातकापड करून वाळल्यावर आंच द्यावी. उत्तम पांढरें भस्म होतें. न झाल्यास परत १ ते २ वेळां आंच द्यावी. अग्निपुटी प्रवाळभस्म होईल. खोकला, अशक्तता वगैरेंवर अनुपान योजून द्यावें.

२२६. **मधुमेहावर :** जांभळीच्या सालीचा काढा. पिकलेलीं जांभळें खावीं. जांभळांच्या बियांचें चूर्ण करून, कल्क करून, मध, हळद वगैरेंबरोबर घ्यावा. मिरें, कडूनिंब पानें, बेलाचीं पानें यांचा काढा. भस्त भस्म घ्यावें. कढीलिंबाच्या पाल्याचा (कडूनिंब नव्हे) रस रोज खावा. सतरंगी उगाळून, **वांकेरी भातें** उगाळून दुधांत, पाण्यांत घ्यावें. (सीताफळीच्या पाल्याचें औषध जामनगर स्टेटचे प्रायव्हेट सेक्रेटरी यांनी अनुभवून कळविलें आहे.)

२२७. **शर्करामेहावर :** बेलाच्या पानांचा १ तोळा रस दुधांत घ्यावा. (रोज). साखर नाहींशी होते. जांभूळ, आंबा, आंवळी यांच्या सालीचा काढा घ्यावा.

२२८. **शर्करा नाहींशी होण्यावर :** लघु-दुग्धिका समूळ आणून वांटून गाईच्या ताकांत रोज घेणें.

२२९. **सुपारी :** २० तोळे सुपारी फुलबडी, ५ तोळे ज्येष्ठमध, २॥ तोळे वेलचीदाणे, १। तोळा लवंगा, १। तोळा जायपत्री, १ मासा बॉसकापूर, १। मासा अक्कलकारा, ४ मासे केशर, १ मासा कस्तुरी, १। तोळा दालचिनी, ·।।।· तोळा पेपरमिंट, ·॥· तोळा वेलदोड्याचा पातळ अर्क व वेलचीचा अर्क. सर्व चूर्ण तयार झाल्यावर पेपरमिंट हातानें सुपारीस चोळून लावावें, व केशर-कस्तुरी, गुलाबपाण्यांत खलून मागाहून लावावी. जेवणानंतर खाण्यास उत्तम.

बडोदें येथील वाडांतील कांहीं उतारे

(श्रीसिद्धनाथ विठ्ठलमंदिर, बडोदें)

२३०. **क्षुधासागर रस :** १ तोळा सुंठ, १ तोळा काळेंमिरीं, (सर्व तोळाभार) १ हरडेदळ, १ बेहेडे, व १ आंवळकठी, १ पंचलवण, १ जवखार, १ सज्जीखार, १ स्वागी, १ पारद, १ गंधक, (पारद-गंधक विधिवत् कजली), २ तोळे बचनाग, २ तोळे भांग, आल्याच्या व महाळुंगाच्या रसाच्या ३–३ भावना देणें. ज्वारीएवढ्या

गोळ्या करणें. सर्वांचें वस्त्रगाळ चूर्ण करून मग गोळ्या कराव्यात. जेवणाच्यामध्यें लिंबाच्या रसांत व्यावें. वर पांच भागांत घालून घेणें. अगर लिंबाच्या रसांत घेणें.

२३१. **ब्रह्मानंद चूर्ण** : २५ तोळे गोडें जिरें, २१ तोळे सफेत मिरें, ३० तोळे कोठंबी, (पावसांतील काकडी वाळवून त्याचें चूर्ण), २० तोळे पिंपळी, १५ तोळे नवसागर, २ तोळे हिंग भाजून, १२ तोळे सैंधव, २० तोळे पादेलोण, ·।।· तोळा पेपरमिंट, ५ तोळे टार्टारिक ॲसिड (लिंबाचें ॲसिड), पेपरमिंट ॲसिड, हीं दोन मागून मिश्रणें करावींत. सर्व चूर्णांच्या निम्में भाग इतकी पिठी साखर मिळवावी. पावसाळ्यांत ओलट होईल म्हणून ते चूर्ण बाटलींत ठेवावें. **अत्यंत पाचक आहे.**

२३२. **क्षयावर अमृतेश्वर रस** : पारदभस्म, लोहभस्म, गुळवेल सत्त्व- प्रत्येक समभाग मिश्रण करून ठेवावें, व २ गुंजा तुपांतून द्यावें. क्षयावर उत्तम आहे.

२३३. **अनेक रोगांवर महाकनक सुंदर रस** : पारा, गंधक, नागभस्म, कलखापरी, माक्षिक भस्म, अभ्रक भस्म, कालभस्म, प्रवाळभस्म, मौक्तिकभस्म, वंगभस्म, हरताळभस्म हीं सर्व समभाग घेऊन सर्वांच्या समान सोन्याचें भस्म आंत घालून हंसपादीच्या रसांत ३ दिवस खल करून मग गोळा करून काच कुपींत भरून ३ मातकापडें करून, वाळवून, वालुकायंत्रांत ३ दिवस अग्नि द्यावा. थंड झाल्यावर पुन्हा हंसपादीच्या रसांत खल करून वाळवून बाटलींत भरून ठेवावें. राजयक्ष्मा, पांडु, कास, कामला, उदावर्त, कृमी, संग्रहणी, मूळव्याध, वांती, अरुची, अग्निमांद्य, आमशूळ, वातरोग, सर्वज्वर, अतिसार, कफरोग इत्यादि अनेक रोगांचा नाशक आहे. (हा रस कश्यप ऋषींनें निर्माण केला आहे.)

२३४. **विरेचन चूर्ण** : सोनामुखी २० तोळे, सुंठ ५ तोळे, बाळहरडे ४ तोळे, निशोत्तर ५ तोळे, संचळ ७ तोळे, सर्वांचें वस्त्रगाळ चूर्ण करावें. रात्रीं गरम पाण्याच्या घोटाबरोबर घेणें.

२३५. **पाचनचूर्ण** : निशोत्तर १६ तोळे, बाळहरडे ८ तोळे, लेंडी पिंपळी ४ तोळे, सुंठ २ तोळे, सैंधव १ तोळा, या सर्वांचें वस्त्रगाळ चूर्ण करावें. रात्रीं गरम पाण्याच्या घोटाबरोबर घेणें.

२३६. **बाळगोळी** : ५ तोळे इंद्रजव, २।। तोळे वावडिंग, २।। तोळे जायफळ, २।। तोळे जायपत्री, तुपांत शेकून ·।।· तोळा केशर, २।। तोळे बाळ- हरडे, १ तोळा संचळ, २।। तोळे डिकेमाली, २।। तोळे एलया बोळ, २।। तोळे हरडेदळ, २।। तोळे सैंधव, २।। तोळे किराईत, २।। तोळे अजमोदा पानें, २।। तोळे किरमाणी ओवा, ५ तोळे बकरीच्या लेंड्या, १ तोळा गूळ. सर्व वस्त्रगाळ करून कोरफडाच्या रसांत अगर तुळशीच्या रसांत खलून बारीक उडीदप्रमाण गोळ्या करून रोज दुधांतून मुलास १–२ देणें.

२३७. **तहानेवर :** ज्येष्ठमध, आंवळकठी, काळीं द्राक्षें, हीं सर्व बारीक करून बोराप्रमाणें गोळ्या कराव्यात, व तोंडांत धरणें. यानें तहान कमी होऊन तोंडास चव येते.

श्री अण्णासाहेब पटवर्धन यांचा काढा

२३८. **पोटदुखी, मधुमेह, जीर्णज्वर, दमा इत्यादींवर :** गुळवेल १ तोळा, एरंडमूळ ४ मासे, पांढऱ्या वसूचें मूळ ३ मासे, कुटकी ३ मासे, कडू पडवळ ४ मासे, सप्तरिंगीचें मूळ ६ मासे, दारुहळद ३ मासे, मंजिष्ठ ६ मासे, रिंगणीमूळ ४ मासे, रास्नामूळ ४ मासे, देवदार ४ मासे, वावडिंग ६ मासे, सुंठ ६ मासे, गांठी पिंपळमूळ ३ मासे, काडेकिराईत ६ मासे, धायटीचीं फुलें ६ मासे, डाळिंबीची साल ४ मासे, धमासा ६ मासे, मेंदीचीं पानें नग २५, अडुळशाचीं पिकलेलीं पानें नग २, बेलाचीं पानें (त्रिदळ) नग १५, कडूनिंबाचीं पानें नग २५, रक्तचंदन ४ मासे, जांभळीची साल ६ मासे, ज्येष्ठीमध १ तोळा, बडीशेप भाजून ४ मासे, काळेंमिरीं ३ मासे, हे वरील सर्व प्रमाण १ पुडीचें आहे. १ पुडी १०० तोळे पाण्यांत रात्रीं भिजत घालून सकाळीं मंदाग्नीवर काढा करावा. १२ तोळे राहिल्यावर निवाल्यावर बाटलींत भरून १२ भाग करावेत. रोज १ दिवसांत ६ भाग घ्यावे. बाकीचे ६ भाग दुसरे दिवशीं घेणें. बाटली थंड पाण्यांत ठेवावी. प्रत्येक भाग घेतल्यावर १ कप दूध पिणें. **पथ्य—** तेलांत, तुपांत तळलेला कोणताहि पदार्थ खाऊं नये. नुसतें भाकरी-पोळीबरोबर तूप खावें. प्रत्येक वेळीं औषध घेतांना त्यावर दूध अवश्य घ्यावें. पोटदुखीच्या माणसानें शक्य तितका भात कमी खावा. रात्रीं मुळींच खाऊं नये.

२३९. **लाल दुग्धवटी :** अफू, जायफळ, जायपत्री, केशर, धत्तुरबीज, हिंगूळ, काळेंमिरीं, सागरगोटा, हीं सर्व औषधें समभाग घ्यावींत, व धोतऱ्याच्या रसांत खल करून मुगाप्रमाणें गोळ्या कराव्यात. या वयोमानाप्रमाणें मधांतून देणें. अतिसार, आमांश, संग्रहणी, यांवर उत्तम उपयोग होतो. कोणी कोणी वरील औषधांत हिंग तितकाच घालतात.

२४०. **मुंडी प्रयोग :** (१) गोरखमुंडीचें चूर्ण ६ मासे, ब्राह्मीचूर्ण ६ मासे, शंखपुष्पी ६ मासे, यांचें चूर्ण अगर रस १॥ तोळा साखर घालून घेतलें असतां बुद्धि तेजदार होते, हें घेतल्यावर वर गरम दूध साखरेंत घालून प्यावें. (२) **स्वर भंगावर** मुंडीचें चूर्ण फार उत्तम आहे. (३) मुंडी मुळाचें चूर्ण ७ दिवस माक्याच्या रसांत घोटून ३ ते ६ मासेपर्यंत रोज मधांतून चाटावें. वर दूध पिणें. **उत्तम केशवर्धक व केस काळे करणारें** आहे. यावर दूध द्यावें. (४) मुंडीचें चूर्ण, दांती मुळाचें चूर्ण, मधांतून वांटून दूध प्यावें, यानें **रक्तगुल्म** जातो.

२४१. **स्मरणशक्तीवर :** शतावरी, अश्वगंधा, गोखरू, कवचबीज, शंख, पुष्पी, ब्राह्मी, या सर्वांचें चूर्ण करावें, व दुधाबरोबर घेतल्यानें बुद्धी वाढते. स्मरण चांगलें राहतें.

२४२. **गळू फुटण्यास :** फोडावर कॉस्टिक सोडा घाला, म्हणजे गळूं, फोड वगैरे लवकर फुटतात.

२४३. **यकृत प्लीहेवर :** अपामार्गक्षार कोरफडाच्या रसांत हळद, मध टाकून द्यावा. किंवा कुमारी आसवांतून द्यावा. यकृत प्लीहा बरी होते.

२४४. **थंडी-तापावर :** (१) तुबरीमल्ल— कच्चा सफेत सोमल ३ मासे, लाल तुरटी २ तोळे, कोरफडाच्या गरांत १२ तास घोटून ६–६ माशांच्या टिक्या बनवून सुकवून मातीच्या बुड्कुल्यांत ठेवून वर झांकण ठेवून मातकापडें करून सुकवून लहानसा खळगा करून त्यास ३० गोवऱ्यांचें पुट द्यावें. नंतर काढून खलून २–४ गुंजा ताप येण्याच्या अगोदर मधांतून द्यावें. ताप जातो. (२) शुद्ध मनशील १ तोळा, शुद्ध हरताळ १ तोळा, त्रिकुटचूर्ण २ तोळे, या सर्वांचा लिंबाच्या रसांत खल करून २ गुंजा प्रमाणाच्या गोळ्या कराव्यात, व मलेरियाच्या तापावर सकाळ-सायंकाळ १–१ गोळी मधांतून चाटणें. (३) करंजबीजाचें चूर्ण मलेरियावर उत्तम. यानें प्लीहेचा नाश होऊन शरीरांत उत्तम रक्तवृद्धी होते. यावरील चूर्णांत पिंपळीचें चूर्ण मिसळलें असतां तापावर चांगला उपयोग होतो.

२४५. **स्तंभक :** तुळशीचें बीं ८ मासे, अक्कलकाढा ६ मासे, व साखर १४ मासे, या सर्वांचें वस्त्रगाळ चूर्ण करावें. वीर्यस्तंभक, शक्तिवर्धक आहे.

२४६. **तापावर :** करंजबीजाचें चूर्ण, पिंपळी, यांचें वस्त्रगाळ चूर्ण करून द्यावें. ताप जातो.

२४७. **थंडीतापावर ज्वरघ्न गुटिका :** करंडा २० तोळे, सातवीण १० तोळे, पिंपळी ५ तोळे, पारिजातक बीं चूर्ण २० तोळे, मिरें २० तोळे, गुळवेल चूर्ण १० तोळे, रसेश्वर २ तोळे, क्विनाइन २ तोळे, बचनाग ५ तोळे, शुद्ध सोमल ·॥· तोळा. या सर्वांचा तुळशीच्या रसांत खल करून वाटाण्याप्रमाणें गोळ्या कराव्यात, व हिंव-तापावर दिवसांतून ५–६ गोळ्या गिळण्यास देणें. यानें ताप लवकर नाहींसा होतो. थंडी लवकर जाऊन ताप जातो.

२४८. **पाचक, पोट फुगीवर :** हिंगाष्टकचूर्ण १० तोळे, शुद्ध गंधक २० तोळे, लिंबाच्या रसांत ७ दिवस ७ भावना द्याव्यात, व सावलींत वाळवून गोळ्या चण्याप्रमाणें कराव्यात. जेवणापूर्वी ४ गोळ्या १॥ तोळा तुपांत मिश्रण करून चाटाव्यात. अग्निप्रदीप्त होतो. पोटांतील सर्व वातविकार नाहींसे होतात.

२४९. **विरेचन चूर्ण :** सोनामुखी, ज्येष्ठमध, बडीशेप समभाग चूर्ण काळ्या द्राक्षांत अगर बेदाण्यांत खलून गोळ्या कराव्यात. रात्रीं एक गोळी खाऊन वर गरम पाणी प्यावें.

२५०. **उपदंशविकारावर :** १ तोळा पारा, २ तोळे गंधक, विधिवत् उत्तम कज्जली करून तुपांत द्यावें. उपदंशावर चांगला उपयोग होतो.

२५१. **देवी, कांजिण्या, गोंवर, इत्यादींवर :** कडुनिंबाचीं कोवळीं पानें २० तोळे, व काळ्या मिऱ्यांचें चूर्ण ६ मासे बारीक करून खलून गोळ्या चण्याप्रमाणें कराव्यात. १ गोळी दुधाच्या घोटाबरोबर गिळणें.

२५२. **वांगावर :** स्वागीचें चूर्ण मधांतून लावावें. यानें गालावरील डाग, बुरम्या वगैरे लवकर बरे होतात.

२५३. **उदरविकारावर स्वादिष्ट चूर्ण :** डाळिंबाचे दाणे ३ तोळे, साखर ८ तोळे, त्रिकटु ३ तोळे, सर्व एकत्र करून गरम पाण्यांत रात्रीं खावें. उदरविकारावर याचा चांगला उपयोग होतो. यास स्वादिष्ट चूर्ण म्हणतात.

२५४. **भीमसेनी कापूर बनविण्याची रीत :** उत्तम देशी कापूर १० तोळे, बारीक वेलचीदाणे २ तोळे, नागरमोथा १ तोळा, अगर १ तोळा, केशर ६ मासे, दालचिनी १ तोळा, लवंग १ तोळा, सर्व बारीक वस्त्रगाळ करून काशाच्या भांड्यांत ठेवून त्यावर दुसरें काशाचें भांडें ठेवून ऊद बारीक करून तें पीठ पाणी घालून त्यानें संधीलेप करावा. विटांवर ठेवून खालीं तुपाची अगर तेलाची करंगळी-एवढी वात लावावी. ४–५ तासांनीं वर कापूर लागतो, तो थंड झाल्यावर काढून घ्यावा.

२५५. **श्वासावर पिंपळीचा पाक :** पिंपळीचें चूर्ण ८ तोळे, गाईच्या दोन शेर दुधांत घोटून त्याचा खवा करावा, व तो खवा तुपावर भाजून २ शेर साखरेचा पाक तयार करून त्यांत वरील तुपावर भाजलेला मावा घालून याचा पाक तयार करावा. हा पिंपळीचा पाक सर्व प्रकारच्या श्वासांवर अति उत्तम आहे. पाक उतरते वेळीं त्यांत दालचिनी, तमालपत्र, वेलची, नागकेशर, यांचें चूर्ण १–१ तोळा घालावें.

२५६. **नेत्रांजन :** समुद्रफूल, सफेत मिरीं, सुवर्णमाक्षिक, तीन्ही सर्व प्रमाणांत घेऊन, भस्मगाळ पावडर करून, तुळशीच्या रसांत गोळ्या कराव्यात, व पाण्यांत उगाळून डोळ्यांत अंजन करावें. यानें डोळ्याचे सर्व विकार जातात.

२५७. **राजयक्ष्मा (क्षय) चिकित्सा (गुळवेल काढा अगर फांट) :** गुळवेलीचें सत्त्व, आल्याचा रस, मिरें-चूर्ण, दूध-साखर, गाईचें दूध, चिकणामूळ, भू-कूष्मांड (मांस-वृद्धीस भू-कूष्मांड), अश्वगंधाचूर्ण, गुळवेलीचा स्वरस, मध, दूध. यांत मकरध्वज, वंगाचें भस्म, लोणी, मध, खडीसाखर चूर्ण, लवंगादि, सीतोपलादि, शृंग्यादि (पाक विप्पल्यादि) भस्म, लोहकान्त भस्म, अभ्रक भस्म, मृगांक रस, **सुवर्ण भस्म**, सोन्याचा वर्ख, स्वर्णमालिनीवसंत, प्रवाल भस्म, लोकनाथरस, मुक्ता-भस्म, अमृतार्णव रस, स्वर्णपर्पटी, सुवर्णमाक्षिक, पंचामृतपर्पटी. त्रिकटु, त्रिफला, शतावरीबला, ज्येष्ठमध, वावडिंग लोह.

२५८. **क्षयरोग, पांडु, धातुक्षीणता, वगैरेंवर :** बाळंत स्त्रीस १ महिन्यानंतर देण्यास अशक्ततेवर, जीर्ण शक्तिक्षीण मुलांस, पुरुषांस वगैरे सर्वांस पौष्टिक अवलेह. अगदीं बारीक करून अंबर २ मासे, मोत्याचें भस्म (मुक्ताभस्म) १॥ मासा, कस्तुरी १ मासा, केशर ३ मासे, सफेत चंदन चूर्ण १ तोळा, वंशलोचन १ तोळा; बदामगर, पिस्ता, चारोळी शेकून सुकी प्रत्येकीं २ तोळे; प्रवाळ १ तोळा, गुळवेलसत्त्व २ तोळे, सोन्याचा वर्ख ४ पानें (चोपडींतील पान प्रत्येक २ तळहाताएवढें), चांदीचें भस्म चवलीभार (१॥ मासा), चांदीचा वर्ख ४ पानें (चांदीचा वर्ख १–१ मासा) घातल्यास उत्तमच, निदान ४–४ पानें पाहिजेत. मध उत्तम १ रत्तल (४० तोळे), काबुली डाळिंब रस १॥ रत्तल, साखर १००–१२० तोळेपर्यंत चालेल (२॥ रत्तल) डाळिंबाच्या रसांत साखरेचा लेह करून पाक तयार पातळसर झाल्यावर मोठ्या खलांत घालून वरील सर्व प्रकारचीं औषधें घोटीत घोटीत मिळवावीं. एकीकडे मध मिळवीत जावा. अंबर, केशर, कस्तुरी, सोनें, चांदी वर्ख, शेवटीं शेवटीं मिळवावा. एकजीव करून तो लेह दाटलींत (बरणींत) भरून ठेवावा. ५ मासेपर्यंत खाऊन दूध घ्यावें.

२५९. **कागदी लिंबाचा उपयोग :** तापांत अपचन, आंतडीं साफ करण्यास फार उपयोग होतो. जंतुसंहारक धर्म त्यांत आहे. गरम पाण्यांत रस व टर्पेन तेलाचे टिपके टाकून अंग पुसणें. चांगल्या गरम पाण्यांत रस घालून स्नान प्रथम करून नंतर मागून ४ तांबे पाणी नुसतेंच घ्यावें. लिंबाच्या रसांत मसुरडाळीचें पीठ थोडें घालून तोंडास चोळून चोळून वांग, पुटकुळ्या, तोंडावरील काळसर तांबुस डाग जातात. रात्रीं झोपते वेळीं मर्दन करून निजावें. सकाळीं पाण्यानें धुवून टाकावें. आंवळकटीचूर्ण लिंबाच्या रसांत घालून केसांस मर्दन करावें. केस काळे होऊं लागतात, व गळत नाहींत. गरम पाणी, लिंबाचा रस, सैंधव नित्य १–२ वेळां जेवणापूर्वीं प्यावें. खोकला, कफ, श्वास, दमा जातो. डाळिंब रस, लिंबाचा रस, सैंधव, मिरें सुकी टाकून (जरा कढवून) पिण्यास द्यावें. साल वाळवून ठेवून थोड्या गंधकाबरोबर मिळवून त्याची पलंगास वैगरेस व घरांत धुरी करावी. ढेकूण, डांस, जंतू नाहींसे होतात. अजीर्ण, उदरशूलांत रस फार गुणकारी आहे. कॉलरा, जुलाब, आमांश, संग्रहणी वगैरे रोग फैलावत असतो त्या दिवसांत रस पिणें. चांगल्या पाण्याबरोबर या रसानें अनवश्यक फॅट (चरबी) कमी होत जाते. रसांत क्रीम बनविणें. तोंडास चोळण्यास चांगलें. शारीरिक, मानसिक व स्नायूची दुर्बलता याच्या रसानें गरम पाण्याबरोबर घेतल्यास स्फूर्ति येते. तीक्ष्ण, पाचक, हलका व वात-पित्तनाशक रस आहे. ए. बी. सी. व्हिटॅमिन्स यांत आहेत. मलावरोध जातो. चहाप्रमाणें लिंबाचें सरबत स्फूर्तिदायक आहे. परंतु साखरेचें मिश्रण नित्य घेऊं नये. पाणी, लिंबाचा रस हेंच चांगलें. धमनीची कमजोरी जाऊन मांसपेशींना ताकद येते. लिंबू गरम करून त्याचा रस काढून त्यांत पादेलोण काळ्या मिऱ्याचें चूर्ण व सुंठीचें चूर्ण घालून द्यावें. म्हणून पाचकपणा लवकर येऊन आंतड्यांस

तावद येईल.

२६०. **तुळस :** (१) काळ्या तुळशीच्या रसांत पारा बराच घोटला असतां किंवा शिजवला असतां पाऱ्याची गोळी होते. (२) काळ्या तुळशीचें पंचांग घेऊन गाईच्या दुधांत उकळून सुंठ घालून काढा घ्यावा. यानें ताप नाहींसा होतो. (३) तुळशीचें बीज ८ मासे, अक्कलकारा ६ मासे, याबरोबर खडीसाखरेची पूड १४ मासे, सर्व मिश्रण २८ मासे झालें. सकाळ-संध्याकाळ १-१ मासा गाईच्या धारोष्ण दुधांतून घ्यावा. उत्तम शक्तिवर्धक व स्फूर्तिदायक आहे.

२६१. **तापावर :** गरम पाण्यांत हरडा उगाळून, सज्जीखार घालून देण्यानें परसाकडे होऊन प्लीहा कमी कमी होत जाते. सज्जीखार, सोमल हे समभाग घेऊन ओरफडांत खलून पूट द्यावें. तें भस्म थोडें तापांत द्यावें. ताप उतरतो.

२६२. **थंडीतापावर :** श्री स्मृतिसागर ४ तोळे, सप्तपर्ण ४ तोळे, गुळवेल ४ तोळे, क्विनाइन २ तोळे, कुचला २ तोळे, ताम्र ½ तोळा, मिरें १ तोळा, शुद्ध-वत्सनाग ½ तोळा, शुद्धसोमल ½ तोळा, शीतारी रस सर्वांचें चूर्ण करून तुळशीच्या रसांत खल करावा, व उडदापेक्षां जरा मोठ्या गोळ्या बांधाव्या. या थंडीतापावर द्याव्या.

अनुपान : दूध, चहा, किंवा गरम पाणी.

२६३. **माका :** (१) **अर्धशिशी व मस्तकशूळावर :** माक्याचा रस व काळीमिरें यांचें चूर्ण हें अंगावरील खाज, बारीक फोड, यांवर उत्तम आहे. माक्याच्या रसाचा टिपका नाकांत सोडावा. (२) **मुलांच्या कफविकारावर :** माक्याचा रस व मध चाटविणें. (३) **दृष्टि साफ होणें, केंस काळे होणें, भूक लागणें यांवर :** माक्याचें चूर्ण सावलींत वाळवून १ तोळा मध, साखर, तूप, याबरोबर ४० दिवस घेणें.

२६४. **केंस वाढण्यावर भृंगराज तेल :** माक्याचा रस ४ शेर, जास्वंदीच्या फुलाचा रस ४ शेर, १ शेर तेल तिळाचें (८० तोळ्यांच्या शेराप्रमाणें सर्व घ्यावें.) सर्व मिळवून कढवण तेल शिल्लक उरल्यावर उतरून गाळून त्यांत गंधा-बिरोजा, तगर, गंठोना, पानडी (पाच), दवणा, मरवा, यांचें चूर्ण प्रत्येकीं ४ तोळे आंत घालून मडक्याचें तोंड बंद करून कांहीं दिवस उन्हांत ठेवून नंतर रोज डोक्यांस लावावें. यानें केंस पांढरे झाले असल्यास काळे होतात. गळत असल्यास या तेलानें गळेनासे होतात. व केसांचीं मुळें दृढ होऊन लवकर वाढावयास लागतात. याप्रमाणें हें अत्यंत उपयुक्त तेल आहे.

२६५. **प्रमेहावर :** पळसाचीं फुलें २॥ तोळे रात्रीं पाण्यांत भिजत घालून सकाळीं पाणी गाळून सोरावा ०॥० तोळा, व खडीसाखर १॥ तोळा घालून घेणें. अगर मध घालून घेणें.

२६६. **खारकेचें लोणचें :** खारका पावशेर, आलें किसून ८०१, हिंगमासे

३, लिंबें २, सैंधव, ८८८१ पादेलोण ८८८१, रोज सकाळीं १ तोळा घ्यावें. कुकुटांडभ कोंबडीच्या अंड्याचीं छिलटें अगोदर लिंबाच्या रसांत धुवून साफ करावीं. नंतर बारीक करून लिंबाच्या रसांत १–२ दिवस खलून १–२ गजपुटें द्यावीं. सफेद भस्म होईल. तांदुळभार भस्म लोण्यांतून मुलांस अशक्ततेवर द्यावें. २१ दिवस. छिलटें साफ करावीं. त्यामध्यें मळ असूं नये.

२६७. **हिरड्यांची कळ थांबवण्यास** : तुरटीची लाही, काळ्या मिऱ्याची भुकी, व मीठ दातांस हिरड्यांस लावलें तर हिरड्यांची कळ १–२ दिवसांत थांबते. २–३ वेळां करून पाण्याच्या गुळण्या कराव्या.

२६८. **अपस्मारावर** : निवडुंगाची साल काढून ठेचून त्याचा रस अपस्मार येणाऱ्याच्या नाकांत २–४ थेंब सोडावा. अपस्मार आल्यावेळीं चोथा हुंगण्यास द्यावा. थांबतो.

२६९. **संग्रहणी** : ताकांत चित्रकाचें पाळ, खोड, अगर चूर्ण, व कुड्याचें पाळ बरेंच उगाळून, हिंग भाजून लावून, व थोडें काळ्या मिरीचें चूर्ण घालून रोज घ्यावें. (बाबा वैद्य, उरगावकर)

२७०. **सर्पविषावर** : सर्प विषानें एक मनुष्य मृत झाला. त्याजवर एका संन्याशानें तुळशीचा रस त्याच्या नाभीवर, छातीवर, व डोक्यावर घासला, व त्यास रसाचा बोळा सारखा ठेवला, किंचित शुद्धी येतांच केळीच्या सोपाच्या कालाचें पाणी त्यास पाजलें.

२७१. **मलेरियावर** : (१) तुळशीपानें ७, काळीमिरें कुटून ४–५ दिवस रोज २–३ वेळां देणें. (२) तुळस, पारिजातकाची साल, तिवराची साल, यांचा काढा देणें.

२७२. **जंत पडण्यावर** : निंबारा झाडाची साल जाळून त्याची राख अगर सालीचा थोडा काढा देणें. उतारा– तूप द्यावयाचें.

२७३. **क्षयावरील औषध** : पारा ·।· तोळा, सोमल १ तोळा, रुईचा चीक १० तोळे, अभ्रक भस्म १ तोळा, सोन्याचा वर्ख ·॥· तोळा, यांचा खल करून एकत्र झाल्यावर मग रुईचा चीक घालून घोटणें व मग शेवटीं सोन्याचा वर्ख टाकून भुकी ठेवून घ्यावा. साखरेबरोबर देणें. तीळ-प्रमाण रोज २ वेळां; विड्याच्या पानावर खावें. विडा खावा, नंतर थोड्या वेळानें दूध देणें. **पथ्य**– सदरहू औषध सेवन करणारानें ताक, दहीं व व्रहीचा पाला ६ महिनेपर्यंत खाऊं नये. **पाणी बिलकूल देऊं नये.**

२७४. **पोटांतील सर्व वायू, गुलमवात, गांठी वगैरेंवर** : सारी (बिजेळी जाळ), सारण, इत्यादी नांवें आहेत; व पिल्ह असेंही म्हणतात. पाला टणक असतो. पिल्हच्या दोन जाती आहेत. त्याचें सावलींत वाळवून चूर्ण करून ठेवावें, व गुळांतून देणें. चवलीभार, पावलीभार सकाळ-संध्याकाळ घ्यावें. गोमूत्रांत गूळ कालवून घ्यावें. रोज दोन वेळ. सारीच्या पानाचा वाफारा **संधिवातावर उत्तम.**

२७५. **कोणत्याही धुपणीवर** : (१) खारकेची बी, गोपीचंदन दुधांत उगाळून द्यावें. साखर घालावी. खारकेची बी दोन गुंजा, व गोपीचंदन २ गुंजा, याप्रमाणे रोज एक वेळ अगर दोन वेळां द्यावें (पुरुषोत्तम तात्या यांच्या घराण्यांतील). (२) सुवर्णमाक्षिक ·।· तोळा, प्रवाळ ·।· तोळा, सूतशेखर ·।· तोळा, सुवर्णमालिनीवसंत ·।· तोळा, गुळवेलसत्त्व ·॥· तोळा, या सर्वांचें मिश्रण करून दर वेळीं ४ गुंजाप्रमाणें रोज ३ वेळां दूध-साखरेबरोबर द्यावें. (३) चांदीच्या पत्र्यांस (४-५ तोळे) कागदी लिंबाच्या रसांत तापवून विझविणें. अशा ५० भावना देऊन ठेवणें. पुढें भस्म करावें. रुईच्या चिकांत. (४) कृष्ण-तुळशीच्या रसांत सोन्याचा वर्ख अगर चुरा घोटून घोटून त्याचीच लुगदी करून आंत ती वडी (सोनें खलून वडी केलेली) आंत ठेवून मातकापड करून रानशेणींत पुट द्यावें, भस्म उत्तम होतें. सदरहू भस्म फार सारक आहे. कळकीच्या रसांत नामांकित योग सुवर्णाचा आहे.

२७६. **यकृत प्लीहेवर** : (१) पारिजातकाच्या पाल्याचा रस (गाईच्या दुधांत एकत्र करून) १ तोळा काढून त्यांत पिठी साखर घालून माक्षिक शंखभस्म घालून देणें, **ताप नाहींसा होतो**. (२) घोळीचा पाला कुटून त्याची लगदी खालीवर घालून, शंख तुकडे करून ठेवून कोळशांत भस्म करावें. असेंच घेवड्याचें भस्म करावें. (३) कांचनवृक्षाच्या झाडाची साल, फुलें अगर पानें यांच्या रसांत घोटून सोन्याच्या चुऱ्याची (बारीक चुऱ्याची) लुगदी करून, अगर पानांची लुगदी बाहेर लावून पुट देत जावें. १४ पुटें द्यावीं. तांबूस मातीच्या रंगाचें भस्म होतें. (४) गोमूत्र कांजीतेल : चांदीचा जुना रुपया रुईच्या चिकांत ३-३ वेळां लाल करून ताकांत विझवून तो रुपया ठेवून मातकापड करून तो गोळा वाळवून गोवऱ्यांचें गजपुट द्यावें. पांढरें भस्म होईल. (याचप्रमाणें डिकेमाली कुटून खालींवर घालून शरावांत ठेवून मातकापड करून गजपुट द्यावें. गोवऱ्या घालतांनाच आत विस्तव ठेवावा म्हणजे भस्म होईल. (५) सोमल १ तोळा खडा घेऊन, आघाड्याच्या पानाचा रस २ तोळे काढून अभिषेक पात्रानें त्याजवर अभिषेक होईल असें करून मंदाग्नीवर सर्व रस आटवून भांड्यांत कांहीं नाहींसें होईल. त्यांत तो सोमलसुद्धां दिसणार नाहीं. परंतु (कढई) भिंतीस २-३ तास ठेवून द्यावी, म्हणजे २-३ तासांनंतर खालीं तेल उतरेल, तें बाटलींत भरून ठेवावें.

२७७. **तापावर व अनेक रोगांवर** : (१) एक बुडकुल्यांत कोरफडीचा गर घालून मध्यें खडा सोमलाचा ठेवून, मातकापड करून, मंद आंच द्यावी. आंत खडा फुलेल. भस्म होईल. वर लागलेलें सोमलाचें फूल फार वेळ आंच लावून परिपक्व होतें. हें भस्म दमा, श्वास, कास, नपुंसकत्व, ज्वर, अजीर्ण, संधिवात, आमवात, वगैरेंवरही द्यावें. (२) मार्गाच्या राखेंत मंद आंच देऊन सोमल फुलतो. याचप्रमाणें हरताळ करणें (पत्री हरताळ). कथील शुद्ध करून घेऊन त्याचे लहान लहान तुकडे

करून घ्यावे. गोणपाट घेऊन त्यावर कडूनिंबाचा ओला पाला अंथरून त्याजवर तुकडे कथलाचे मध्यें मध्यें ठेवून पुन्हां व पाला घालून गोणपाटाची वळकुटी करून बाहेर घ्यावी. एक-दोन गोणपाटें लावून बांधून एका बाजूस तेंच गोणपाट पेटवावें. एक-दोन दिवशीं आंत फुलून भस्म होईल.

२७८. **डोळ्यांच्या सर्व विकारांवर नेत्रांजन :** मध उत्तम २० तोळे, अर्धा तोळा भीमसेनी उत्तम कापूर, १ तोळा लेंडी पिंपळीचें चूर्ण, हीं सर्व खलून डोळ्याच्या सर्व विकारांवर, **फूल, सारा, गळ, काचबिंदू, मोतीबिंदू, जाळें, खुपऱ्यांची वाढ**, वगैरेंवर गुणकारी. पथ्य नाहीं.

२७९. **गरमी, कास, सूत्र वगैरे यांचा दाह, रक्त पडणें यांजवर :** (१) तमालपत्र, (२) दालचिनी, (३) वेलची, (४) तगर, (५) सर्पातचंदन, (६) उपलसरी, (७) सुंठ, (८) ज्येष्ठमध, (९) कमळ, या सर्व नऊ जिनसांचें चूर्ण करून मध-साखरेबरोबर घ्यावें. (श्री. सरदार महारूल काजी यांनीं सांगितलेलें.)

२८०. **संधिवातावर :** कडू चिराईत पावशेर (७ तोळे), ॥ तोळा पोटॅश आयोडिन, पाणी ८ शेर (४ शिसे) घालून, १ शिसा शिल्लक ठेवून त्यांत अर्धा तोळा पोटॅश आयोडिन घालून ठेवून ७ दिवस सकाळीं-सायंकाळीं घ्यावें. संधिवात बरा होतो. तेलकट आंबट अगदीं वर्ज्य. पोटॅश आयोडिनच्या बदली आघाड्याची राख घालावी.

२८१. **गर्भपातावर :** कुमारीचा रस (कोरफडीचा) २-३ तोळे व तितकेंच तूप एकत्र करून पिण्यास दिलें असतां गर्भ स्थिर होतो. जीस गर्भपात होण्याची खोड आहे अशा बाईस दिलें असतां ९ महिने पूर्ण होऊन संतती चांगली होते.

२८२. **वातशूल अग्निमांद्य आम्लपित्त यांवर :** (१) एक मोठा नारळ घेऊन शेंडी काढून त्यास भोंक पाडून पाणी काढून वाळवून त्यांत समुद्रमीठ (रोजचें खाण्याचें) बारीक करून भरावें, व त्यांत रोज रुईचा चीक आणून घालीत जावा. नारळ ऊन्हांत ठेवावा. चीक जिरला म्हणजे पुन्हा घालावा. याप्रमाणें २० तोळे चीक नारळांत मिठावर घालीत आंत जाईल असें करावें. नंतर त्या नारळास प्रथम कणिक भिजवून लेप करावा, व त्यावर मातकापडें २-३ करावीं; व मातकापडें वाळल्यावर हातभर खड्डा खणून त्यांत रानगोवऱ्या घालून मध्यें नारळ ठेवून पूट द्यावें, सकाळीं स्वांगशीत काढावें, नारळाची करवंटी जळून आत खोबरें, मीठ, व रुईचा चीक यांचा गोळा सांपडेल, तो बारीक खलून ठेवावा, व ३ मासे अगर २ मासे दर वेळीं प्रमाणें रोज २ वेळां तुपांतून घ्यावें. **पोटशूळही** बरा होतो, असा अनुभव बरेच ठिकाणीं आला. **पथ्य—** तूप रोटी, वरण, वरण भात, तूप खावें. स्निग्ध खावें. (हें धन्वन्तरी बापूसाहेब मेहेंदळे यांचें औषध). (२) सोमल, हरताळ, हिंगूळ दुधीच्या रसांत शिजवून घ्यावा, रस आटल्यावर कटोरा लाल होतांच खालीं उतरावा.

२८३. **तापावर :** तिवराचीं पानें २५ प्रमाणें व तुळशीपानें २५ यांच काढा घ्यावा.

२८४. **शक्तिसारक :** (१) लेंडी पिंपळी ३ तोळे, सुंठ ७ तोळे, पिंपळमूळ ३ तोळे, धायरीफूल ३ तोळे, अक्कलकारा ३ तोळे, खैराची साल (खदिरस्तर) ३ तोळे, त्रिफळा ९ तोळे, बाहुफळी (हरणखुरी) १० तोळे, गोजवान (गायजवाळ) ७ तोळे, कमरकस ३ तोळे, बीजबंद ३ तोळे, तालीमखाना ७ तोळे, इसबगोल ७ तोळे, जायफळ १ तोळा, काळें मिरें १ तोळा, मंडूरभस्म ५ तोळे, सर्व बारीक करून मंडूरमिश्र करून १॥ शेर बदामगर, ·॥· शेर पिस्ता, ·॥· शेर चारोळे, १ शेर खिसमिस (हिरवा), ·॥· तोळा केशर, १ वाल कस्तुरी (निराळी बारीक करूं नये, अशीच वाटावी.) शिंगाड्याचें पीठ २८ तोळे घेऊन बदामापासून सर्व बारीक करून आंत मिळवून १॥ शेर तुपांत शेकून घेऊन खालीं उतरून वरील औषधी सर्व मिळवावी. व हें जितकें वजन होईल त्याच्या सवाई साखर घालावी, व पाक करून वडी पाडून ठेवावी. (२) साजुक पथ्यकर अन्न खावें. चपाती, तूप, भात वगैरे रोज २-३ तोळे खावा, दूध प्यावें, अर्ध्या तासानंतर तहान लागल्यास दूधच प्यावें.

२८५. **पंडुरोगावरील योजना :** १ शेर मुगाची डाळ पसरून ३ दिवस त्याचें पीठ पाण्यांत कालवून भजी एरंडेल तेलांतील खावयास द्यावीं. पाणी देऊं नये. दूध प्यावें (गरम घ्यावें). मीठ तिखट पिठांत घालूं नये. रोज परसाकडेला ४, ५, ७, १० अशीं होतील, गरम पाणी धुण्यास घ्यावें. ३ दिवस तुप देऊं नये. मधांतून रोज मंडूर मात्र घ्यावा, ४ गुंजा सकाळीं, ४ गुंजा संध्याकाळीं असा मंडूर घ्यावा.

२८६. **नपुंसकत्व, दुबळेपणा, इंद्रियशैथिल्य व पोटांतील विकारांवर, कंठमाळा** (गंडमाळा): सुंठीचा अर्क १ औंस, कायाकुची तेल १ औंस, १ औंस जपानी एलमिठचें फूल (पेपरमिंट), १ औंस ओव्याचें फूल, कानपुरी कापूर १० तोळे, स्पिरिट (रेक्टिफाइड) १६ औंस, (१ बाटली) पेन किलर (१ औंस), याप्रमाणें मिश्र करून ठेवावें. वरील रोगावर पट्टी घ्यावी. पट्टी लावल्यानंतर फोड येतील ते फोडून टाकून वर तूप लावावें. १५–१५ दिवशीं पट्टी लावावी.

२८७. **गांठ्यावात, गुडघे दुखणें, संधिवात वगैरे हरएक वातावर तेल :** १ शेर (२८ तोळे) तिळाचें तेल, किंवा शिरसतेल, काळ्या धोतऱ्याचीं २ पानें, पानें न मिळाल्यास धोतऱ्याच्या पानांचा रस घालावा. १ तोळा जायफळ, १ तोळा जायपत्री, लवंग १ तोळा, १ तोळा लसुणाची पाकळी, १ तोळा सैंधव बारीक करून, हे सर्व जिन्नस बारीक करून तेल कढत असतांना त्यांत सोडून त्याचा रस होईपर्यंत कढवावें. धूर निघून गेल्यावर उतरून गाळून त्यांत पाव तोळा अफू उगाळून बाटल्या भरून ठेवाव्यात. (**तेलाचा धूर घेऊं नये; विषारी आहे.**)

२८८. **गंडमाळेवर :** भुईचाफ्याची मुळी गोमूत्रांत वांटून गंडमाळेवर

लावावी. ४—५ वेळ लावावी, म्हणजे बसून जाते. पोटांत बिब्याचें तेल पाताळयंत्रानें काढून त्या तेलांत चणे भाजून (भट्टीवरचे) भरडून त्याचें पीठ करून तें सर्व तेलांत मिसळून ठेवावें, व रोज २ मासाभर पहिल्यानें, मग २ मासे, याप्रमाणें रोज महिनाभर घ्यावें. गरम पाण्याबरोबर घ्यावें. **पथ्य**— करावें. तेलकट, आंबट, वर्ज्य.

२८९. **शीतज्वर, चातुर्थिक ज्वरावर** : गोदंती हरताळ पाण्यानें धुऊन (भिजत ठेवून) नंतर गोमूत्रांत ५—६ तास तुकडे तुकडे करून ठेवावा. नंतर गरम पाण्यानें धुऊन टाकून स्वच्छ करून त्यांत आठवा भाग (अष्टमांश) सोमल घालून, कोरफडाचा बलक घालून खलावा. २—३ दिवस खल करून, चकती करून, वाळवून शराव करून संपुट करून गजपुट द्यावें. स्वांगशीत काढून पुन्हा असाच खलून सोमल अष्टमांश घालून कोरफडाच्या रसात खलून गजपुट पुन्हा द्यावें. व स्वांगशीत काढून बाटलींत ठेवून (हवावर्ज्य) २ रती भस्म बत्ताशाच्या साखरेतून द्यावें. उत्तम अनुभव घेतला आहे.

२९०. **परमा, धुपणी, ऊष्णतेचे विकारांवर** : गायजबान, हरीणखुरी, धायटीचें फूल व पाला, या सर्वांचें चूर्ण वस्त्रगाळ करून दूधसाखरेंत घेणें. धायटीचें चूर्ण करून देणें.

२९१. **मूळव्याधीवर** : सोमलाचा खडा (काव थोडी उगाळावी) गोमूत्रांत अगर पाण्यांत उगळून ब्रशानें मोडास बरोबर लावावा. दुसरे ठिकाणीं लावूं नये. संध्याकाळीं सोमल लावल्यावर संध्याकाळीं पोटिस बांधावें, वर पान लावून लंगोटी लावून ठेवणें. पोटिस आळशीच्या पिठांत भस्म गाळून पीठ शिजवावें व मग पोटिसानें लावावें. याप्रमाणें ३—४ दिवस केल्यानें मोड गळून पडतात.

२९२. **रक्तपितीवर** : ४ औंस लायफर अमोनिया, १ औंस कापूर आंत टाकून (साधा कापूर तुकडे करून) बाटली दुप्पट मोठी घ्यावी, व त्यांत सदरहू मिश्रण करून ठेवावें. बाटली मोठी असल्यास उडण्याचा संभव आहे. बाटली उघडतांना तोंड बाजूस करावें. हें औषध रोग असेल तेथें कापसाचा बोळा लावून बुडवून उतरतें लावावें. रोज ४ वेळां.

२९३. **यकृत, प्लीहा, नळाश्रित वात यांवर** : १० तोळे रुईचीं ओलीं पानें मागील शिरा काढून कुटावीं, १० तोळे काळीं मिरें, १० तोळे पांढरें मिरें, १० तोळे पिंपळी (बंगाली), यांचें चूर्ण व तें सर्व एकत्र करून १० तोळे लिंबाच्या रसांत खलून वाळवावें, व नंतर पंचलवण प्रत्येक ५ + ५ तोळे आंत मिश्र करून ठेवावें. पावलीभार रोज घ्यावें. वर गरम पाणी प्यावें. **भूक लागते. शौचास साफ होतें.** वांती होत नाहीं. मुलास औषध सकाळीं व सायंकाळीं प्रवाळ वगैरे, वंशलोचन चूर्ण, अगर शीतोपला यांतून जिरें, मध यांत.

२९४. **दांतांस** : मीट, बिबवे, समभाग तुरीचा पाला, खरोखर मडक्यात

घालून, पूट देऊन, राख करावी, व त्यानें रोज दांत घांसावे. बळकट होतात. हिरडे ५ तोळे, घोंटा ५ तोळे, यांत घालून मोरचुताची लाही ·।· तोळा घालून दंतधावन चूर्ण तयार करावें. दांतांचे रोग जाऊन बळकट होतात.

२९५. **बाळंतरोग, क्षयादिकांवर** : मोती उत्तम ७ अगर साधारण तितक्याच प्रमाणाचें खोबरें घेऊन लवंगांचें चूर्ण १ तोळा करून अर्धा तोळा चूर्ण घालून कोळश्यांत ठेवून १ तासानें खालीं उतरावें व देते वेळीं मोत्यांचें चूर्ण करून द्यावें. १ मोती सुमारें एक वेळ पुरेल, रोज एकदां द्यावें, ७ मोतीं सात दिवस द्यावें. रोज १ मोत्याचें भस्म करून द्यावें. एक दिवस ७ मोत्यांचें भस्म करून बाटली भरून ठेवावी. रोज देते वेळीं १ मोती खलून द्यावें. जायपत्री एक तोळा, लवंग १ तोळा, वेलची १ तोळा, यांचें चूर्ण करून ठेवावें, व त्या चूर्णापैकीं चवलीभार चूर्ण करून घेऊन मध्यें मोत्यांची भुकणी ठेवून मध वर टाकून जिभेनें चाटून खावें. बत्तींत वगैरे औषध द्यावें. कडूनिंबाच्या गुळवेलीच्या रसांत अगर दुधांत वांटून काढलेल्या रसांतही हें भस्म द्यावें. **पथ्य**— दूधभात जेवावा. साखर खावयास सांगावें. दूध प्यावें. पाणी, मीठ, तिखट, तेल, वर्ज; तूप—चपाती चालेल. मोत्याची चुन्याप्रमाणें वाफ निघून जाईल, व वीर्य कमी होईल. सबब खाते वेळीं बारीक करावें.

२९६. **हगवणीवर** : रानहरळीच्या मुळ्या ताकांत वांटून रोज देणें.

२९७. **हिंगूळ शुद्ध करणें** : अभ्रक, बोरीच्या पानांचा काढा करून ठेवावा, व अभ्रक तापवून लाल करून ७ किंवा जास्त वेळां विझवावा, व विझवते वेळीं हातानें चोळावा. म्हणजे तो चिखलासारखा नरम होतो, मग तो चुलीवर ठेवून वाळवावा. तो चांगला विरघळला पाहिजे. तो वांटून मग रुईच्या मुळाच्या सालीचा काढा $\frac{1}{8}$ करून तो गाळून आटवावा. पेजेसारखा करून त्यांत अभ्रकाचा खल करून वाळवून रुईच्या पानांत बांधून गजपुट द्यावें. काढा एकदम पुष्कळ करून ठेवला तरी चालतो. तो थंड ठिकाणीं ठेवावा. प्रत्येक वेळीं रुईचीं पानें लावावीं, वर दोर बांधावा, २-३ पुटांनीं त्यासच मातकापड करावें. ७-८ पुटांनीं निश्चंद्र होतो.

२९८. **कान वाहणें बंद** : कडूनिंबाचीं पानें ५ तोळे ओलीं, व मीठ अर्धा तोळा, एक पाव पाण्यांत कढवून किंवा त्यांचा वांटून रस काढून कानांत रोज घातला तर कान वाहणें बंद होतें. आंतील फोड, पू वगैरे नाहींसें होतें.

२९९. **आमांश, जुलाब वगैरेवर** : (१) शंखभस्म, ताक, मिरें, सैंधव एकत्र करून देणें. (२) कोष्ठकोळिंजन, सुंठ, शेंदेलोण, तूप-साखर, जायफळ, यांचें चाटण. (३) एरंडेल पाव तोळा, गूळ सुपारीइतका, सैंधव २ आणेभार, सुंठ पावलीभार, याप्रमाणें घेऊन असें रोज ३ वेळां चाटवावें. प्रथम एरंडेल बरेंच देऊन आम पडल्यावर, दुसऱ्या दिवसापासून हें सुरू करावें.

३००. **इंद्रलुप्तावर** : वडाचीं पानें भाजून राख मलईतून लावली असतां टक्कल जातें.

३०१. **सुखप्रसव** : वडाच्या पारंब्या गरोदर स्त्रीस दुधांत वांटून द्याव्या. यानें नासावण्याची भीती नाहींशी होते. वडाचा चीक बत्ताशांतून रोज ४–५ थेंब दिला तर **परमा जातो**. रक्तशुद्धी होते. वडाच्या फळांचें चूर्ण दूध-साखरेंत (बियां-सुद्धां) कुटून दिलें तर **धातू पुष्ट** होते.

३०२. **कास, श्वास, प्रमेहावर : कनकासव (कनकशिरोमणि)** : धोतऱ्याचें फळ, फूल, पान (शाखा, मुळें, सर्व) कुटून ३२ तोळे, अडुळशाच्या मुळांची साल ३२ तोळे, ज्येष्ठमध १६ तोळे, पिंपळी १६ तोळे, काटेरिंगणी १६ तोळे, नाग-केशर १६ तोळे, सुंठ १६ तोळे, भारंगमूळ १६ तोळे, तालीसपत्र १६ तोळे, धायटीचें फूल ८० तोळे, मनुका २ शेर (१६० तोळे), पाणी १२८ शेर (८० तोळे शेर-प्रमाणें), मध ६ शेर (८० तोळे शेरप्रमाणें) एक महिना भांड्यांत बंद करून ठेवावें. असलाचे पद्धतीप्रमाणें. बलवीर्य वाढवितें.

३०३. **हरताळ भस्म** : हरताळ १ तोळा, तितकाच चुना घेऊन त्याच्या २ चकत्या करून त्यात हरताळ टाकावा, मग चकत्या मिळवून मडक्यांत घालून तोंड बंद करून त्याला २ फूट एक खळग्यांत टोपलीभर रानशेणींत पूट द्यावें भस्म होतें. ३ गुंजा विड्याच्या पानांतून रोज १ वेळांप्रमाणें ३ दिवस द्यावें. **पथ्य**—अलवण, दूधभात खाणें. हिंवताप जातो.

३०४. **वीर्यवर्धक** : हिंगूळ १ तोळा, रवागी १ तोळा, पारा ६ मासे, या तीहींचा खल करून कोंबडीच्या अंड्यांतील सफेतींत ठेवून वर चकती घालून, मात-कापड करून, २॥ शेर (८० तोळे शेरप्रमाणें) पळसाच्या राखेंत अर्धी राख मडक्यांत खालीं घालून वर अंडें ठेवून अर्धी राख वर पसरून मातकापड करून मुलतानी मातीनें तोंड बंद करून सुकवून चुलीवर ठेवून पळसाच्या लाकडाची ४ प्रहर आंच द्यावी. नंतर भस्म, हिंगूळ, काढून घेऊन १ रतीप्रमाणें पानाबरोबर खावें. **वीर्यवर्धक** आहे. थंडीच्या दिवसांत सेवन करावें.

३०५. **पैत्तिक, शीतज्वर, तृतीयक, चातुर्थिक ज्वर वगैरेंवर** : हरताळ २ तोळे, कात १ तोळा, धोत्रिक भस्म ४ तोळे, यांचा कुमारीच्या रसांत खल करून टिकल्या बनवाव्या, गजपुटांत भस्म करून अर्धी ' रती मात्रा ' द्यावी.

३०६. **ज्वर व शक्तिवर्धकतेवर** : महाज्वरांकुश रस षड्गुण खतराचंद्रोदय १ तोळा, शुद्ध पारा १ तोळा, शुद्ध गंधक १ तोळा, तीन एकत्र करून, ४ तोळे लेंडी पिंपळीचें चूर्ण मिळून १–२ गुंजा रोज २ वेळां मधांतून घेणें.

३०७. **रक्त शुद्धी व अग्निमांद्यावर** : गंधक ३ वेळां दुधांत शुद्ध करून खलांत घालून शेवरीच्या १ वर्षाच्या आंतील मुळाच्या रसाच्या २१ भावना द्याव्या. मग सुकवून सावलींत ठेवावा. रोज १ मासा धारोष्णाबरोबर द्यावा. रक्त शुद्ध होतें. २॥ महिने घ्यावा. ८ व्या दिवशीं एरंडेल घ्यावें. कोठा साफ ठेवावा. डोक्यावर आंवळ्याचें तेल रोज घालावें. उत्तम फायदा अनेक विकारांवर होतो.

३०८. **सोमलाची शुद्धी** : लिंबाच्या रसांत ४ प्रहर घोटून शुद्धी होते. (प्रमाण– पुस्तक रसायनसार, पृष्ठ ४७३, भस्मविधी). चिंच, पिंपळ, पळस यांपैकीं कोणत्याही झाडाच्या सालीची राख करून ३ वेळां कोरफडाच्या रसांत राख भिजवून गजपुट देणें. असें ३ वेळां देणें. मग शरावांत राख खालींवर घालून मध्यें सोमल ठेवून भस्म करावें.

३०९. **सोमलाचा दुसरा प्रयोग** : सोमल १ तोळा गाईच्या २॥ शेर (पक्के) दुधांत धार धरून ४ तोळे कागदी लिंबाच्या रसांत घोटून शुद्ध करून चकती करावी. मग चिंचेची राख मडक्यांत खालींवर घालून भरावी, मातकापड करून सुकवून चुलीवर मंद तीक्ष्ण १६ प्रहर आंच द्यावी, स्वच्छ भस्म होतें. अद्‌भुत योग आहे.

३१०. **प्रमेहावर** : (१) आंवळकठीच्या काढ्यांत ३ मासे हळद, ·|· तोळा मध घालून घेणें. (२) गुळवेलीच्या रसांत मध घालून देणें. (३) तांबें, कथील, मीठ, तांब्याचा पत्रा करून कथलाचा पत्रा बाहेर लावून मीठ खालींवर घालून शरावसंपुट करून राजपुट आंच द्यावी, भस्म होतें. तें **धातुवृद्धी, श्वास, कास** वगैरेंवरही **अनुपान योजून द्यावें.**

३११. **आमांशावर** : हिरादखन, जायफळ चवथा हिस्सा बारीक मिश्र करून, ६ वाल मधांत, ३ दिवस पुड्या चाटवाव्या.

३१२. **रक्तपिती, गलित कुष्टावर हरताळाचें भस्म** : हरताळ चांगला आणून चांगल्या जमिनीवर ठेवून त्यावर २ शेर चुन्याची कळी (चांगली) घालून, हत्तींचें मूत एक घडाभर वर ओतावें. याप्रमाणें ३ दिवस करावें. (मूत ओतावें.) जोंपर्यंत हिरवें मूत दिसेल तोंपर्यंत नित्य घालीत जावें. ज्या दिवशीं चांगलें स्वच्छ मूत दिसेल त्या दिवशीं चुन्यांतून हरताळ काढून घ्यावा, आणि खलून ठेवावा.

३१३. **रुप्याचें भस्म** : ओवा ४ शेर, चांदी २ तोळे शुद्ध करून ओवा खालींवर घालून मातीच्या थाळींत खालींवर घालून पूट द्यावें.

३१४. **ताम्र** : तेल, गोमूत्र, ताक, कुळीथकाढा यांत ७ वेळां विझवून घ्यावें. (पत्रा) नंतर काळ्या धोतऱ्याच्या पानांचा गोळा करून गजपुट द्यावें; व त्याला एरंडाच्या मुळाची साल वाळवून गोळा करून गजपुट द्यावें. नंतर नाकशिंकणी व रुईच्या चिकाचा गोळा करून गजपुट द्यावें. भस्म होईल. ही क्रिया मनशीळ वगैरेंचे सर्व भस्म करील.

३१५. **हिंवतापावर** : मनशीळ १ तोळा, जवखार १ तोळा, कोरफडाच्या रसांत खल करणें, व बोळक्यांत फुंकून कापून खावा. १ गुंज पिठी साखरेबरोबर घेणे.

३१६. **मूळव्याधीवर** : सोमल व मुरदाडशिंग एकत्र खलून तुपांत उगाळून मोडास लावावें. आग होईल, ती सहन करावी. वर लोणी लावावें. मोड गळून पडतील.

३१७. **अरुचि अग्निमांद्य, पडसें, श्वास, खोकल्यावर :** ४ तोळे सुंठीचा काढा घ्यावा. पाण्याचे दोष जातात. कांती वाढते.

३१८. **पौष्टिक :** सुंठ रोज रात्रीं दुधांत उकळून, तूप, दूध घालून (एक तोळा प्रमाणें) घ्यावी. तोंडलें कापून पारा भरून वर चकती बसवून मातकापड करून ४ तास मंद अग्नी द्यावा. हातभर खड्डा करून ५ शेर रानगवऱ्या घालून अग्नि द्यावा. भस्म होतें.

३१९. **महारोगावर औषध :** काळा सर्प मारून, दूध वजन १२ शेर आणून, त्यांत त्या सर्पास टाकून दूध चांगलें कढवून त्याचें दही जमवून ताक करावें आणि लोणी काढून घेऊन ताक खड्डा खोदून त्यांत पुरून टाकावें. लोण्याचें तूप करून, तांब्याच्या अगर जस्ताच्या डबींत तें तूप ठेवून रोग्यास बोरीच्या पानांत १ तांदूळभार नित्य ७ दिवस, अगर बहुत दिवसांचा रोग असल्यास २१ दिवस देणें. **पथ्य–** अलवण चण्याची रोटी खाऊं घालावी. औषध जितके दिवस रोगी घेईल त्याच्या दुप्पट दिवस पथ्य करावें. सदरहू रोग्यास लघुदंती मुळांचें ८–८ दिवशीं रेचक द्यावें. (काढा करून).

३२०. **कामलेवर :** चिंचेचा कुवळ २–४ तोळे व त्यांत थोडा चुना घालून पिण्यास द्यावा. ३–४ दिवस.

३२१. **कफावर :** जनावरांचे (गुरांचे किंवा मनुष्याच्या व्रणांतील कृमी कोणतेही, कानांतीलसुद्धां यांजवर कडू वृंदावनाच्या गराचें पाणी करून कढवून तें वर छाटण्यास द्यावें. रोज १–२ वेळां. **उवा, लिखा वगैरेही जातात.** वालाएवढें सुमारें आंतील गराचें चूर्ण गुळांतून पोटांत द्यावें. छातीस याच फळाच्या गराचा वाफारा द्यावा, म्हणजे कफ व आंतील कृमी नष्ट होतील.

३२२. **तोंडाला येणाऱ्या वाणेवर :** (१) अळईच्या झाडांच्या मुळ्या तोंडांत, दांतांखालीं चावल्या तर, तोंडास येणारी वाण, घशांतील सडलेला भाग बरा होतो. अगर काढ्यांच्या गुळण्या घ्याव्यात. परंतु मुळ्या चावलेल्या उत्तम.

(२) बाभळीच्या कोवळ्या पाल्यानें तोंड आलेलें बरें होतें. पाला चावून, चघळून तोंडास सर्व रस लागेल असें करावें. पोटांत गेल्यास हरकत नाहीं.

३२३. **मधुमेहावर :** अळईच्या सालीचें अगर पानांचें चूर्ण करून पाण्यांत अगर दुधांत घ्यावें. उत्तम गुणकारी.

३२४. **लघवी अडणें, वात, कफ, प्रकोप यांवर :** (एका अनुभवी मनुष्यानें चिकित्सा सांगितली व ती उपयोगांत आली, त्या चिकित्सेचें टिपण) :

गुळवेल, धमासा, सुंठ, दारुहळद, पुनर्नवा, बाळहरडा, रक्तचंदन, वाळा, काळीं द्राक्षें, भारंगमूळ, रक्तरोडा साल, प्रत्येक औषध पाव तोळा, पाणी ३ पावशेर घालून काढा चतुर्थांश करावा. सायंकाळीं किंवा सकाळीं काढा घ्यावा. पुन्हा निकाढा

दुसरे दिवशीं घ्यावा. तात्पर्य, रोज एक वेळ घ्यावा. रात्रीं झोंपते वेळीं गाईचें पावशेर दूध चांगलें तापवून, साखर घालून, त्यांत भारंगमूळ सुमारें चवलीभार उगाळून चंद्रप्रभा १ गोळी उगाळून घेणें, दररोज सकाळीं पाऊण तोळा एरंडेल तेल दुधांतून घ्यावें.

३२५. **उवा, लिखा, कानांतील कीड वगैरेंवर** : मोराच्या पायाचा लहानसा तुकडा तिळाच्या तेलांत तळून काळा झाला म्हणजे काढून उगाळून तेल कानांत घालावें. म्हणजे पू, रक्त, सूज, ठणका वगैरे बंद होतो.

३२६. **पौष्टिक व दूध पचण्याकरतां** : खरधामणीची मुळी उगाळून देणें.

३२७. **मूळव्याधीचें रक्त बंद करण्यास** : फटकीचें चूर्ण व आंबेहळद चूर्ण ३–३ मासे मठ्यांतून अगर दह्यांतून सकाळीं फक्त घ्यावें. बारावाजेपर्यंत जेवूं नये.

३२८. **मधुमेहावर** : उपळसरी ७ तोळे, पेंडकुळी ३॥ तोळे, वाळा १ तोळा, नागरमोथे १ तोळा, यांचें चूर्ण रोज ३ मासे ते ६ मासे रोज ३ वेळां गाईच्या अगर म्हशीच्या दुधांतून. पथ्य– कुळिथाचें काठ, मुगाचें वरण, भात.

३२९. **मोरचुताचें भस्म** : आई, निगडी, व माका यांच्या लुगदींत ठेवून मातकापड करून ५–५ थर खालींवर कोळसे घालून सफेत भस्म होतें. काटे रिंगणीच्या लुगदींत ठेवून वरीलप्रमाणेंच मोरचुताचें भस्म होतें.

३३०. **झाड्यावाटे रक्त पडतें त्यावर** : लोध्र, रक्त्या बोळ, व फटकी या तिहींचें चूर्ण पाण्यांत अगर तांदुळाच्या धुवणांत करून त्यांत घ्यावें.

३३१. **फेंफरें अपस्मारावर** : कुंपणातील निवडुंगाचा स्वरस नाकांत २–३ थेंब घालावा; १–२ वेळां करावें.

३३२. **कफावर, त्रिदोषावर** : मोराच्या अंड्याचीं टरफलें अगदीं बारीक करून मधांतून चाटण्यास द्यावीं. मात्रेप्रमाणें देणें.

३३३. **कफक्षयावर** : सुंठ २ तोळे, हरडामूळ २ तोळे, अडुळशाचीं पानें रोज २, कुळीथ भाजून २ तोळे, रिंगणीमूळ २ तोळे, गुळवेल २ तोळे, यांचा काढा सकाळ संध्याकाळ. **शृंग्यादि चूर्ण** रात्रीं गरम पाण्यांत. **लोहमाक्षिक** चूर्ण, **त्रिकटुचूर्ण** तूप, साखर, मधाबरोबर. (दामुअण्णा सांबारे, सांगली, यांची चिकित्सा).

३३४. **बाळंतरोगावर, व कफ, वात, ज्वरावर नंदपूड चूर्ण** : काळें जिरें, डिकेमाली, सागरगोटा मगजचूर्ण, पांदेलोण, आंबेहळद, कुटकी, शेंदेलोण, समभाग चूर्ण करून पाण्यांतून घ्यावें.

३३५. **रक्तशुद्धीवर** : (१) रक्तरोडा १० तोळे, ओंवा ५॥ तोळे, हळद ३ तोळे, धमासा १॥ तोळा, धने ५ तोळे, जिरें २ तोळे, बाळहिरडे १ तोळा,

सोनामुखीचा पाला ५ तोळे, सुंट १ तोळा, गुळवेल ओली १० तोळे, कडुनिंबाची साल ६ तोळे, उपळसरी ५ तोळे, शतावरी ओली १० तोळे, १०० पानें अडुळशाचीं, पाणी ५ पशेर घालून २॥ शेर काढा करून, १ तोळा मध घालून, तो काढा ७ दिवस घ्यावा. (२) शुद्ध केलेले ताम्रपत्रे घेऊन त्यांस रक्तचंदनाचा पाला वांटून त्याचा जाड लेप करावा, व गजपुट द्यावें. पहिल्यानें भस्म झालें होतें व नंतर क्रमानें त्याच रसांत ४ वेळां पूट देऊन स्वच्छ पांढरें भस्म होतें.

३३६. **सांधे दुखण्यावर :** सफेत मुसळीचें वस्त्रगाळ चूर्ण थंडीच्या दिवसांत १ तोळा दुधांत घालून खलून, तूप-साखर अगर दूध-साखरेंत घ्यावें. बरे होतात.

३३७. **शक्ती वाढते :** मायफळ कुटून, वस्त्रगाळ चूर्ण तूप, गुळांतून ७ ते २१ दिवस खावें. रेचक अगोदर १–२ वेळां एरंडेल तेलाचें घ्यावें.

३३८. **चैतन्यकारक :** वावडिंग पाळ पाण्यांत, ताकांत उगाळून, पावली-भार रोज घ्यावें. **वात जातो, भूक लागते.** वाकेरी मातें नुसतें व्रणरोपणार्थच नव्हे तर बारीक ताप, उष्णता जाते. पाण्यांत उगाळून नित्य २ महिने घ्यावें. दुधांत किंवा पाण्यांत वाकेरीचें मातें ३ महिने घेऊन रक्त पडणें बंद झालें असा अनुभव वराच आला.

३३९. **क्षय, शक्ती, बाळंतरोग व धातुक्षय यांवर :** पोईंचे दाणे २४ तोळे, जायफळ ४॥ तोळे, जायपत्री ४॥ तोळे, लवंगा ४॥ तोळे, सुंठ ४॥ तोळे = १८ तोळे, वरील सर्वांचें चूर्ण करून ठेवून दाणे तसेच ठेवावे, व ते सुंठीचे अगर कोणत्याही वरीलपैकी चूर्णांत चेपून ठेवावें. नंतर सर्व म्हणजे ४२ तोळे एकत्र करून त्याच्या गोळ्या एरंडाचीं सुमारें १००–१२५ पानें वाटोळीं लावून (हातरून) पोळा तयार करावा, व त्या पोळयास वर माती १ बोट जाडीची देऊन गोवऱ्यांत आंच द्यावी. सुमारें लहानशा तव्याएवढ्या २० गोवऱ्या आडव्या लहान पाटीभर लहानशा गोवऱ्या असाव्या. गोळा एका थापट्यावर ठेवून सभोवती गोवऱ्या फोडून लावाव्या. अदमासें २–३ तास आंच द्यावी. नंतर गोळा विझवून, फोडून, वाफेसुद्धां तें औषध घेऊन नंतर त्यांत ४२ तोळे साखर कालवून ठेवावी, व रोग्यास रोज सकाळीं १ तोळा, व सायंकाळीं १ तोळा याप्रमाणें रोज २ वेळां दुधाच्या घोटाबरोबर द्यावें, दूध फक्त गाईचें असावें. बलाबल पाहून पुढें औषध १॥ तोळा दर वेळीं द्यावें. रोज ३ तोळे किंवा ४ तोळे द्यावें. दूध रोज ३–४–५ शेर लागेल. एक वेळ अगर दोन वेळां अगदीं थोडा (आंब्या-इतका) दूधभात जेवावा. अडेल तर साखर तोंडी लावण्यास हरकत नाही. हें उत्तम औषध आहे. **पाणी पिण्यास अगदीं देऊं नये.**

(२) पारा १ तोळा, गंधक १ तोळा, तांबें १ तोळा, लहान बुडकुल्यांत दुधीचा पाला वांटून त्यावर गंधकाची पूड करून घालावी. त्यावर पारा ठेवावा, त्यावर पैसा

ठेवावा, त्यावर पुन्हा पारा घालून, गंधकाची पूड घालावी, व वर आर्धी दुधाचा पाला घालावा, तोंडी खापरी बसवून मातकापड तोंडापासून सर्व बुडकुल्यास करावें. २–४ पाव्या रानशेणीचें पूट द्यावें. भस्म (श्वेत) होईल.

३४०. **खरूज, गजकर्ण, नायटा, इसब (मलम)** : पारा, गंधक, कापूर, मोरचूद, यांत मुरदाडशिंग हीं बारीक करून लोण्यांत अगर व्हॅसलिनमध्यें तयार करून हें सर्व पोटीस बांधून मग लावावें.

३४१. **शक्तिवर्धक दीपक पाचक** : त्रिफळा चूर्ण ६ तोळे, लोह १ तोळा, कस्तुरी अर्धा तोळा, ज्येष्ठमध चूर्ण २ तोळे, मधांत खल करून (सप्तामृत) गोळी करून ठेवून २ गोळ्या रोज देणें. अगर मधाशिवाय चूर्ण करून ठेवून पुडी बांधून मधांत चाटण्यास द्यावें.

३४२. **उदरावर** : नवक्षार (सैंधव, संचल, सज्जी, नवसागर, यवक्षार, टंकण, कांचलोण, बिडलोण, पापडखार, सांबरी मीठ) प्रत्येकी १–१ तोळा, व १ शेर ओवा (४० तोळे), ५ तोळे आंबेहळद, ५ तोळे मैदा लकडी कुटून सर्व चूर्ण करून महाळुंगाच्या गराची १ भावना द्यावी, व पुन्हा कडू वृंदावनाचे सालीशिवाय सर्व गर घालून गराची भावना द्यावी. नंतर सावलींत वाळवून कुटून बाटलींत ठेवून थोडें थोडें चवली ते पावली भार, गरम पाण्यावरोबर देणें. **पथ्य**– बाजरीची भाकरी थंड व तूप, गूळ, दूध द्यावें.

३४३. **जुनाट खोकला, मूळव्याध यावर** : पावशेर मंजिष्ठ (२० तोळे) घेऊन तो कुटून अगदीं वस्त्रगाळ पूड करून, (एकशा नंबर १), (ब्रँडी नं. १), एक बाटली घेऊन ब्रँडी थोडी थोडी घालून मंजिष्टाचा खल करीत जावा. जितकी ब्रँडी लागेल तसतशी घालून खलीत जावें. मग चण्याचेप्रमाणें गोळ्या बांधून ठेवाव्या. एक सकाळीं, एक सायंकाळीं, ताजें पाणी आणून त्याबरोबर खावी. २१ दिवस घेणें. **वांगें खाऊं नये.**

३४४. **मूळव्याधीवर** : मुरदाडशिंग कुटून बारीक करून कुपांत घालून मूळव्याधीच्या मोडास लेप करावा. किंवा अफूच्या घट्ट पाण्यांत मिळवून लावावी. रोज ३ वेळां. पक्षी बगळ्यापैकीं बगळी (मादी) चें हाड घेऊन त्याचें भस्म करावें. तें भस्म तांब्याच्या रसांत टाकावें. भस्म होईल. तांब्याचा रस बगळ्याच्या हाडाचा तुकडा टाकून लवकर होतो.

३४५. **धातुपुष्टी, क्षय, श्वास, अग्निमांद्य, अरुची, ज्वर वगैरेंवर** : १ तोळा हिंगुळ्याचे (३० तोळे तूप, ३० तोळे बिब्बे, ३० तोळे मध, ७५–७५ तोळे सर्व जिनसा ठेचून २॥–२॥ तोळे ३–३ तोळ्यांचे २ खडे वेगळे ठेवले तरी चालतील. मोठ्या कढईत, (टोप) मग आंच द्यावी. तूप वगैरे तापल्यावर सर्व पेट घेईल. नंतर सर्व जळून राख झाल्यावर आंतील खडे काढून कापून ठेवणें. अनुपान लावून तोंडांत कांगणीचें बी पुरचुंडी करून भस्म होतें.

३४६. **धातु घट्ट होण्यास :** सफेद मुसळी १ तोळा, सुपारीचें फूल १ तोळा, अर्धाशेर खडीसाखर (४० तोळे), सालममिश्री १ तोळा, रोज अर्धा शेर दुधांत १॥ शेर पाणी घालून आटवून दूधही पाऊण हिस्सा राहिल्यावर, त्यांत वरील चूर्ण, व साखरेची ५ पुडी करून देणें. अर्धा शेर दुधांत प्रथम पाणी ६ शेर घालून आटवून, पाणी जळून दूधही पाऊण हिस्सा राहिल्यावर, चटकन पुडी घालून साखर मिळविणें. कोणाच्या नजरेसमोर हें औषध पिऊं नये. व पिण्यास उशीर केल्यास मग दगडासारखें टणक औषध चिकट असें होत जाईल. करितां लवकर प्यावें, व जरा निजून राहावें (रात्रीचें प्यावें.) म्हणजे निवारा मिळेल. घेतल्यावर दोन तासांच्या आंत घाम वगैरे येईल. दुसरे दिवशीं कमी घाम येईल, तिसरे दिवशीं अगदीं घाम कमी कमी होत जाईल; म्हणजे मग प्रकृतीस लागू पडलें असें समजावें.

३४७. **अनेक प्रकारचे ज्वर :** हिंगूळ १ तोळा, जायपत्री १ तोळा, जायफळ, १ तोळा, पिंपळी १ तोळा, पिंपळमूळ १ तोळा, नवळखार ·।· तोळा आल्याच्या रसांत २–३ तास घोटून गोळी बाजरीप्रमाणें करावी. आल्याच्या रसांत, विड्याच्या पानांत, २ गोळ्या दर वेळीं, मोठ्यांस रोज ४ गोळ्यांपर्यंत द्याव्यात.

३४८. **आम्लपित्तावर :** सोनामुखीचा पाला १ तोळा, वाळलेली बाळहिरडी १ तोळा, पिंपळी १ तोळा, पापड भाजून लाही करून त्याचें चूर्ण करून ३ **मासे** पाण्यांत अगर दुधांत घेणें. रोज दोन वेळां.

३४९. **पोट फुगणें, नळवात, व उदर यांवर :** बाटलीभर लिंबाचा रस, ५–६ पिवळ्या कवड्या कुटून, ६ मासे पापडखार बारीक करून, आंत टाकावा. बाटलीस जोस येऊन फेंस बाहेर येऊं लागेल. करितां दाबून कद्यानें तरी धरून ठेवणें.

३५०. **परम्यावर गोळी :** सुंठ, मिरें, पिंपळी, हिरडा, आंवळकठी, नागरमोथे, गुग्गुळ, गोखरूंच्या अष्टमांश काढ्यांत खलून गोळ्या करणें, बोराच्या आठळीएवढ्या; रोज २ गोळ्या पाण्याबरोबर घेणें.

३५१. **लहान मुलांस होणारे कफाचे विकार, अपचन, पांडू वगैरेंवर :** वाघाचा दांत (सुळा), पांढऱ्या गोकर्णीचें पाळ, सोनामुखीच्या पानाच्या काढ्यांत सकाळीं उगाळून द्यावयाचें.

३५२. **जाग्रणाच्या दोषावर :** रात्रीं कांदा, गूळ, व पाणी अगर दूध, रोज घेऊन.

३५३. **घटसर्प :** कडू दोडकी, व कडू कवंडळ यांच्या भुकीची धुरी घेणें; किंवा विडी करून ओढणें, म्हणजे घटसर्पाचें तात्काळ पाणी होतें. त्याचप्रमाणें आशी झाडाची साल (बारतोंडी) ओढली असतां घटसर्प बरा होतो.

३५४. **व्रणावर :** पिंगुळवेलीचें तेल कोणत्याही घाईंत लावलें असतां व्रण बरा होतो.

३५५. **माणसांचे, गुरांचे, व्रणशोषक** : काडभोवरीच्या पाल्याचा रस अगर चोथा घाडींत भरला असतां कृमी मरतात.

३५६. **व्रणांत किंवा व्रणावर** : पर्णबीज, पाणपोईचा पाला कुट्टून, आंत मध घालून, गरम करून लेप करावा. रोज फरक पडत जाईल, बरा होतो.

३५७. **घूस, उंदीर, पिसवा, पिसाळलेलें कुत्रें यांचे विषावर** : विषमोगरीचें मूळ पाण्यांत उगाळून चिंचोक्याइतकें घेतलें तर अप्रतिम गुणकारी आहे. कुत्र्याचें विष हटकून बरें होतें. रोज पैसा भार उगाळून थंड पाण्यांत प्यावयाचें. **पथ्य**— भाकरी तांदुळाची व गूळ खाण्यास देणें. ७ दिवस, पथ्य ठेवावयाचें. पाणी दिल्यास चालेल. या औषधानें अनेक बरे झाले आहेत. बेलापूरचे केळकर यांच्या घराण्यांत हें औषध पिढीजात सुरू होतें. (दोनशें रुपये देऊन धन्वंतरी बापूसाहेब मेहेंदळे यांनीं त्यांजकडून ऐकलें, तेंच हें औषध आहे.)

३५८. **बायकांचे दोष, जीर्णज्वर, पोटांत दुखणें, गर्भाशयांतील निर्बलता यांवर** : कडू बोरीचें पाळ पाण्यांत उगाळून दिलें तर बारीक ताप, विषारी सर्पटणाऱ्या प्राण्यांच्या विषावर आहे. पाळांचा चांगला उपयोग होतो. कडदोरीच्या वेली असतारा फळें, जोडफळें येतात. फळांत पक्व झालेवर कापूस निघतो.

३५९. **मुलांस शक्तिवर्धक, कोठा साफ होण्यास** : एक भाग कमळकाकडी (कमळाक्ष) गर फोडून बारीक चूर्ण, १ भाग वंशलोचन, ·।।· तोळा वेलची, २ भाग खडीसाखर, सर्व एकत्र मिळवून त्या भुकींतून प्रवाळ १ गुंज मिळवून मधांत द्यावा, अगर दूध-साखरेत. मुलांस फार उत्तम. कोठा साफ होण्यास उपाय चांगला.

३६०. **वातहारक संधिवात वगैरेंवर** : पिंपळाची साल १० तोळे, रुईच्या मुळाची साल १० तोळे, १ रत्तल गणे (तांदळाचे) तेलांत जाळून राख करावी, व नंतर १ तोळा अफू कुकदी करून तेलांत टाकून राख करावी.

३६१. **क्षय विकार, कास, श्वास, अग्निमांद्य, अरुची, वगैरेंवर** : पिंपळी बंगाली ४ तोळे घेऊन, १ तास गुलाबपाण्यांत खलून ठेवावी. मधाबरोबर व अनुपानास योजून देणें. सोमल, हरताळास, वगैरे अनुपान योजावें.

३६२. **सोमलाचें भस्म** : विलायती हुरा (ज्या हुऱ्यास कावा वगैरे), पाने जाड असतात, त्यांचीं पानें ४०-५० घेऊन कुट्टून, लुगदी करून (रसासुद्धां) तींत मध्यें सोमलाचा खडा ठेवून मडक्यांत किंवा परळांत रस आटेपर्यंत मंद आच द्यावी. याप्रमाणें ३ वेळ करावें. म्हणजे दर वेळीं आंतील सोमल काढून घेऊन पुन्हा रसाच्यासह लुगद्यांत ठेवणें. नंतर चवथे वेळीं पुन्हां लुगदी वाटोळी लावून ऊबदार लोकरीच्या पटक्यांत गोळा बांधून मग मातकापड करून वाळवून ८–९ शेणींचें पूट द्यावें. सफेत भस्म होईल. ताम्राचें १ तोळा, कटकवेधी पत्र्यांचें २५-२५ वेळां

गोमूत्र व नंतर कड्ड जिन्याच्या रसांत तापवून विझवून त्याचे बारीक बारीक तुकडे करून सफेत कण्हेरीच्या (पांढरी) कळ्या ४० तोळे घेऊन, कुटून लगदा करून खालीं घालून त्यावर ताम्राचे तुकडे (पत्र्याचे पातळ तुकडे) घालून वर पुन्हां लुगदी घालून मातकापड करून २ गजपुटें द्यावीं. पहिल्यानेंच होईल. परंतु पुन्हां जरूर वाटल्यास चांदीचें १ पूट द्यावें.

३६३. **नवळेपणावर (जादू असर)** : १५ तोळे ब्रँडी उंची, १ तोळा शिलाजित, १ तोळा केशर, १ तोळा काळ्या लोहाण (ऊद), ·।|· तोळा कस्तुरी, ·।· तोळा अंबर, ·।|· तोळा अफू, ·।· तोळा खारा कापूर, ब्रँडींत हे ७ जिन्नस घोटून, खलून मग सर्व दारू मिश्रण करून स्टॉपर्ड बरणींत अगर बाटलींत ठेवून रोज एकदां बाटली हालवावी. याप्रमाणें ७ दिवस द्यावा. सातही दिवस रोज २४ तासांनी एकदा बाटली हालवून नंतर ७ दिवसांनी वर येणारा अर्क (तवंग) काढून घेऊन दुसऱ्या बाटलींत ठेवावा. तें मुख्य औषध. त्यांतील ४-५ थेंब अर्क चमचाभर दुधांत मिसळून पिण्यास द्यावा. वर दूध पिण्यास सांगावें. कमताकत असेल त्यास उत्तम ताकद येते.

३६४. **वात, ताप, अग्निमांद्यावर** : १० तोळे सोरा कढईत ठेवून (बारीक करून) त्यांत ७ रिठे सालासुद्धां आंत टाकावे, व काडीनें ढवळावें. विस्तव अगदीं हलका ठेवावा. (एका बारीक लाकडाच्या अग्नीप्रमाणें). रिठे ७ जळून गेल्यावर दुसरे ७ रिठे आंत टाकावे, व पुन्हा ढवळावें. याप्रमाणें १० तोळे रिठे आंत जाळावे. म्हणजे भस्म तयार होईल. तें विस्तवावर उडणार नाहीं, तोंपर्यंत रिठे टाकून (तात्पर्य) सिद्ध करावें. तें भस्म पाव गुंज, अर्धा गुंज इतकें द्यावें. क्वचित दोन गुंजा, १ गुंजही द्यावें, पाण्याबरोबर, दुधाबरोबर, विड्याच्या पानांत वगैरे.

बाबा परमानंद संन्यासी यांजकडून

३६५. **अर्धांग ज्वर, वातावर** : २० तोळे कुचल्याची भुकी शुद्ध करून, बारीक केलेली तव्यावर ठेवा. खालीं थोडी, त्या भुकीवर २ तोळे हिंगुळाचा खडा ठेवून बाकी भुकी वर चेपून बसवावी. चवथा हिस्सा खालीं व तीन हिस्से वर दाबून वर तांब्याची वाटी झाकण घालून, तवा-वाटीच्या सांध्यास उडदाचें पीठ भिजून चिणून बसवावें, सकाळपासून संध्याकाळपर्यंत विस्तव १२ तास बारका, एक लाकडाचा द्यावा. म्हणजे चांगलें भस्म सिद्ध होईल. धूर वगैरे आल्यास उडदाचें पीठ त्यावर चेपून बसवावें.

३६६. **वाजीकरण** : हिंगुळाच्या ९ तोळे खड्यावर १ बाटली (२० औंस) देशी दारूची व एक बाटली कांद्याच्या रसाची (चुवा) अभिषेक देऊन भस्म होतें. उपयोगी आहे.

३६७. **ताप, अर्धांगवात, मूत्ररोग वगैरेवर :** (१) सोरा १० तोळे, नवसागर १० तोळे, प्रत्येक बारीक करून मिळवून लोखंडाच्या कढईंत ठेवून बारीक अग्नीवर (मंद आच) द्यावी, व चाळीस तोळे रुईचा चीक जवळ ठेवून घ्यावा. त्यांतील थोडथोडा (चमचा चमचा) घालीत जावा. लोखंडाच्या सळईनें ढवळीत जावें. म्हणजे त्याचें भस्म होईल. धूर निघण्याचा बंद होईपर्यंत चीक घालून ढवळावें. कडा काळसर झाली म्हणजे भस्म झालें समजावें. काळा लालट (जांभळी) रंग होईल. तें बाटलींत ठेवावें.

(२) १ तोळा चांदीचा पत्रा (ओवा कुटून खलून त्यांत पाणी घालून त्याचा अर्क पिळून घ्यावा) त्या अर्कांत १०० वेळां पत्रा तापून विझवावा. मग १० तोळे रुईच्या मुळावरची साल १० तोळे घेऊन, ती कुटून तिचा लुगदा करावा. तो खालींवर ठेवून मध्यें पत्रा घालून मात-कापड करून (मातीच्या २ थाळया घेऊन) २० शेर पक्के (१६०० तोळे) गोवरीचें पूट द्यावें. सफेद भस्म.

(३) वरीलप्रमाणें पत्रा तयार करून घेऊन कसरीच्या पानाची (कोवळ्या ढिऱ्याची), व सफेद गुंजांच्या पाल्याची लुगदी एकत्र कुटून दोन दोन तोळे प्रत्येकीं १ तोळा चांदीच्या पत्र्यास खालीवर ठेवून ५ शेर आंचींत भस्म होतें. (शेर ८० तोळे थराचा).

(४) कुमारीच्या रसांत ७ वेळां अगर जास्त वेळांसुद्धां चांदीचा पत्रा विझवून कुमारीचा लुगदा ५ तोळे कुटून, खालींवर घालून, मातकापड करून (मातीच्या खापरींत) २॥ शेर पक्के गोवऱ्यांची आंच द्यावी. याप्रमाणें ३ वेळ २॥-२॥ शेरांची आंच द्यावी. म्हणजे सफेद भस्म होईल.

३६८. **सुवर्ण भस्म, अतिशक्तिकारक :** सुवर्णाचा बारीक चुरा किंवा वर्ख लाल दांड्याच्या चवळाईच्या रसांत कांटेमाठाच्या रसांत खलून गोळी करून, ती गोळी रुईचें लांकूड मुळाकडील जाड घेऊन (वीतभर तुकडा), कोरून भोक पाडून, आंत ती गोळी बसवून वर चुरा बसवून, मातकापड करून मोठें पूट २॥ मण गोवऱ्यांचें द्यावें. लाल भस्म उतरेल.

३६९. **इंद्रियास ताकदीवर :** सोमल १ तोळा, कलमी सोरा २ तोळे, घोटून, तिळाचें २ तोळे तेल त्यांत मिळवून, एकजीव करावें, तें लोखंडाच्या पळींत घालून विस्तवावर पळी ठेवावी. तेल तापून पेट घेईल. नंतर तेल सर्व जळल्यावर, थंड झाल्यावर आंत सुकी असेल ती घेऊन बारीक करून बाटलींत (उघड्या) हवेवर ठेवावी. म्हणजे आंत तेल तयार होईल. तें तेल कमताकद असलेल्यास १ झीग (काडीस लावून) विड्याच्या पानांस चोळून लावावें (बाजरी इतकाठिपका सरासरी) विडा खाण्यास द्यावा. तेल इंद्रियास मर्दन करण्यास थोडें घ्यावें, इतर तेलांत वगैरे मिळवून लावावें.

३७०. **क्षयावर, पांडुवर :** १ तोळा अंगूर (मोठीं द्राक्षें), १ तोळा पिंपळी-चूर्ण, १ तोळा खडीसाखर, हीं खलून खलून गोळ्या १२ कराव्या. पावलीभारप्रमाणें गोळी बांधून १२ गोळ्या. रोज २ गोळ्यांप्रमाणें खाण्यास द्याव्या. **पथ्य**—गोड ताक व भाताच्या लाह्या खाण्यास द्याव्या, अगर दूध द्यावें (कफ असल्यास ताक देऊं नये, दूध द्यावें). ताक अरसी जास्त प्यावें. बहुतेक ताकावरच ठेवावा. (नडियादचे कबीरपंथी साधूनें सांगितलें).

३७१. **अजीर्ण, अग्निमांद्य, वातनाश, कटिशूळ वगैरेंवर :** पादेलोण, स्वागीची लाही, हिंग समभाग, शेवग्याच्या पाल्याच्या रसांत खलून गोळी करून द्यावी.

३७२. **शक्तिवर्धक गोळ्या :** १ तोळा केशर, १ तोळा जायफळ, १ तोळा जायपत्री, $\frac{1}{2}$ तोळा कस्तुरी, अंबरभार, पिंपळमूळ, अगर मिरें सफेद १ तोळा, अर्धा तोळा चांदीचा वर्ख, सोन्याचा वर्ख, दोहोंपैकीं एक, जिंद बेदस्तर (जवादी मांजराचे अंड), पाव तोळा, कागदी लिंबाच्या रसांत ३ दिवस खल करून मिऱ्यायेवढ्या गोळ्या करून, रोज २ वेळां दर वेळीं १ प्रमाणें दुधावरोबर घेत गेल्यास शक्ती लौकर वाढत जाते.

३७३. **आमांश, मुरडा वगैरेंवर :** १ तोळा टाकणखार लाही, २ तोळे शुद्ध हिंगूळ, ४ तोळे अफू, लिंबाच्या रसांत खल चांगल्या प्रकारें करावा. खल चांगला झाल्यावर, अर्ध्या गोळ्या मधांत मिळवून कराव्या, व अर्ध्या तशाच कराव्या. दिवसास लिंबाच्या रसाच्या व रात्रीं मधांतील गोळ्या खाव्या.

३७४. **आमांश, अपचन, शौचशुद्धीवर :** बाळहरडी तुपांत भाजून (न करपूं देता) नंतर वस्त्रास पुसून तिची पूड करून ठेवावी. त्या भुकींत १ तोळा मध, ·।· तोळा जायफळ चूर्ण करून ठेवावें. म्हणजे १० तोळे बाळहिरडी घेतली तर २॥ तोळे जायपत्री नंतर आमांश झालेल्यास किंवा अपचनास २॥–३ गुंजा मोठ्यास दर वेळीं पाण्यांतून अगर भात, अगर साखरेबरोबर देऊन, वर पाणी, याप्रमाणें रोज ४–५ वेळां द्यावें. म्हणजे मुरडा कमी होऊन आम पडेल, मळ धुऊन शौचास होईल. अफूच्या गोळ्यांपेक्षां नेहमीं हें चांगलें.

३७५. **शक्ती, अपचन, अग्निमांद्य वगैरेंवर :** रससिंदूर अगर मकरध्वज (मिळाल्यास उत्तम, नाहीं तर हिंगूळ शुद्धसुद्धां चालेल) ३ तोळे, मकरध्वज ३ तोळे, रससिंदूर अगर हिंगूळ २ तोळे, मौक्तिक १ तोळा, सुवर्णवर्ख २ तोळे, चांदीचें भस्म अगर १ तोळा चांदीचा वर्ख, ·॥· तोळा कस्तुरी, ·।· अंबर, १ तोळा अगारस्ताचें चूर्ण, (यांबद्दल चंदन पांढरा २ तोळे) अगर महाळुंगाच्या रसांत खल करून गोळ्या १ गुंजे प्रमाणें बांधाव्या. रोगावर अनुपानाप्रमाणें द्याव्या. त्रिकुटीच्या चूर्णांत अगर वावडिंगाच्या चूर्णांत मधाबरोबर देणें. रोज दूधभात वगैरे स्निग्ध अन्न खाणें. चवलीभार वावडिंगाचें चूर्ण व दूध खडीसाखरेंत गोळी उगाळून, लोणी, मध, खडी-

साखर शक्तीकरितां देणें. ज्वरांत ही गोळी कृष्ण-तुळशीच्या रसांत द्यावी. जीर्णज्वर, क्षय, कांस, श्वास, अपचन, अग्निमांद्य, धातुगत विकार, सूतिकादोष, कफावर आल्याच्या रसांत, मध अगर विड्याच्या पानांत वगैरे.

३७६. **अनेक तापांवर :** ५ तोळे कुटकी, ५ तोळे उसवा, १० तोळे किराईत, २–३ तोळे सोनामुखीचा पाला, ५ तोळे कडूनिंबावरील गुळवेल (निंबगीलोण), कुटून एकत्र करून एक बाटली २४ औंस उत्तम गुलाबपाणी घेऊन त्यांत दोन बाटल्या २४ औंसाच्या पाणी घालून भिजत ठेवावें. ४ दिवसांनंतर कढवून एकशम, फक्त पाणी ठेवून गाळून तापावर मध घालून द्यावें. १ तोळा दरवेळीं, रोज ३ वेळ.

३७७. **परम्यावर :** वडाचा चीक बत्ताश्यांत घ्यावा ४–५ ठिबके घ्यावा. रोज दूध भात, पोळी, वरण याप्रमाणें ४–५ दिवस दिलें असतां परमा जातो.

३७८. **तापानंतरच्या अशक्ततेवर :** सशक्त करण्यास वडाच्या कोवळ्या पारंब्या कुटून, वांटून त्यांत पाणी घालून कढवून (जरा तो सर्व रस पाण्यांत घेऊन) म्हणजे काढा करून मध घालून ७ दिवस देणें. म्हणजे ताकदवाढ होईल.

३७९. **हृदय, छातीचे ठोके साफ होऊन छातींतील कळा, हृदयाचे विकार बरे होण्यावर :** पारा, गंधक, कज्जली १ गुंज, मयूरपिसाच्या डोळ्यांची राख १ गुंज अगर २ गुंजा, ओवा २ गुंजा, सर्व मिश्रण करून मधांतून चाटण्यास देणें.

३८०. **कोणत्याही व्रणांवर साफ होण्यास व व्रण भरण्यास :** धायरीच्या पानांचें चूर्ण करून वर रोज भुकी टाकीत जावी. म्हणजे जखम वगैरे भरेल. तुरटीच्या भुकटीनें आंतील कीड बाहेर येते.

३८१. **मूळव्याधीवर :** वडाच्या पानांची राख करून तेलांत खलून मोडास लावावी. म्हणजे मूळव्याध कमी होत जाते. मोड नरम पडून नाहींसे होतात.

३८२. **कोडावर, तापावर, गरमीच्या विकारांवर :** पत्री हरताळ १॥ तोळा घेऊन चिनी मातीचे बरणींत (झाकणाचे) बारीक तुकडे करून टाकून, त्याजवर कोरफडीचा रस ३ तोळे, व बाभळीच्या सालीचा रस (अंगरस दाबून वगैरे काढून) ३ तोळे मिळवून, रस ६ तोळे त्यांत घालून बरणीचें झांकण लावते वेळीं उडदाचें पीठ लावून मुलतानी ७ मातकापडें करावीं. नंतर ती बरणी मडक्यांत राखेंत ठेवून खालींवर राखेच्या मातीची पुन्हां तें मडकें चुलीवर ठेवून अगदीं दीपाग्नीप्रमाणें आंच सुरू करावी. आंत बरणी गरम होईल इतकी आंच ठेवावी. अगर गोवरीच्या भुशांत ठेविली तरी चालेल. दोन दिवस बारीक आंच देऊन आंतील पाणी आटलें म्हणजे पुन्हा थोडी जास्त आंच द्यावी. नंतर पुन्हा त्याहून जास्त आच द्यावी. असें करतां करतां २ दिवसांच्या ४ आंच दिल्या असतां आंत भस्म होतें, रस पुन्हा पाहिजे तर १–२ वेळां घालावा. मलईतून, लोण्यांतून, द्राक्षांतून वगैरे द्यावें. (एका मारवाडी व्यापाऱ्यास हें औषध एका साधूनें सांगितलें होतें.)

३८३. **गांठ्या वायू, संधिवात, गरमीच्या विकारावर, व अनेक वातांवर** : डाल चिकणा, व सोमल समभाग घेऊन ४–४ तोळे किंवा ३–३ तोळे बोरीच्या पानांच्या रसांत खलून डमरूयंत्रानें संधिलेप करून भस्म फूल उडवावें. तें बाटलींत ठेवून अर्धे तांदळाइतकें, लोणी, मलई, किंवा अंगूर यांतून द्यावें. पहिल्यानें भूक लागत नाहीं. ७ दिवस फक्त द्यावें. नंतर देऊं नये. महिन्यानंतर जास्त भूक लागूं लागेल: तूप पोळी वरण वगैरे खाणें. **ताकदीकरितां उत्तम.** पुढें पुढें सर्व ताकद येते.

३८४. **उन्हाळीवर** : गोंड्याच्या जासवंदीच्या फुलांच्या पाकळ्या लिंबाच्या रसांत घालून एक दिवस ठेवून लालसर होतें. साखर घालून देणें.

३८५. **हाडी ज्वरावर** : पिंपळ्या २ तोळे, अजमोदा पावलीभार, अर्धा कप पाण्यांत भिजत ठेवून तें पाणी सकाळीं टाकून देऊन अजमोदा व पिंपळी चटणीसारखी वांटून पाणी टाकून ठिकऱ्या लाल करून ५–६ विझवून थोडें मीठ टाकून देणें.

३८६. **डोकें अति दुखत असेल तर** : माक्याचा रस अर्धा तोळा, सुपारीएवढा गूळ मिळवून ३ दिवस घ्यावा.

३८७. **गंडमाळेवर व इतर गांठींवर** : अमरकंद कुटून वर लावणें व पोटांत घेणें. पांढऱ्या शरपुंखेची मुळी क्षयासारख्या तापावर रोज दुधांतून देणें. तांबूस पुखावर (उन्हाळी) सुद्धां चालेल. त्याच्या मुळ्या पाण्यांत उगाळून गंडमाळेवर लेप रोज लावावा. पांढरी शरपुंखावर अमृतसंजीवनीच आहे.

३८८. **सन्निपातावर, वातावर, अग्निमांद्यावर, क्षय, अशक्तता, कफ, क्षय, पांडु वगैरेवर** : (१) शंभर नंबरी सोनें तुकडा अगर बांगडी, पाटली वगैरे घेऊन विस्तवावर लाल (भात्यानें फुंकून) दर वेळीं करून अकराशें वेळां गुलाब पाण्यांत विझवावें. गुलाबपाणी पक्का पाऊणशेर (६० तोळे घ्यावें.) सदरहू पाणी रोज पांच ठिपकेप्रमाणें रोज ३ वेळां घ्यावें. (२) तांब्याचा टोप अगर पातेलें, (जुनें पातेलें चांगलें) घेऊन त्यांत ११०० तोळे पाणी घालून, चांदी ५ तोळे, सोनें ५ तोळे, अस्सल पोलाद ५ तोळे, लोहचुंबक ५ तोळे, कथील ५ तोळे, याप्रमाणें टाकून त्या पाण्याचा काढा करावा. ११ तोळे शिल्लक ठेवून तें पाणी २–२ ठिपकेपासून ५ ठिपके-पर्यंत वरील सर्व विकारांवर देणें. पाण्याचा काढा मंद मंद करावा. एकदम जोराचा अग्नी लावून करूं नये. कोळशाचा चालेल. (पुणतांबेकर वैद्यबुवा यांच्या घराण्यांतील.)

३८९. **ताप उतरण्यावर, व जाण्यावर** : खैराचा पाला सुका अगर ओला पाण्यांत घालून आधण आणून विसण न घालतां स्नान करावें. अगर फडक्यानें अंग पुसावें. खडीसाखर भ्रासकापूर याचें पाणी दिल्यास दाह शांत होतो. लघवीची जळजळ : दूध-पाण्यांत खडीसाखर, कापूर, घालून देणें.

३९०. **नपुंसकत्वावर** : काळे हरभरे किंवा साधे हरभरे दळून त्याची डाळ करून सालीची राळी ठेवून डाळ तनि तोळे, व सालें सुमारें पसाभर (मुठीभर) दोन्ही

कुटून ७ तोळे थंड पाण्यांत रात्रीं भिजत घालून तें पाणी सकाळीं वस्त्रगाळ करून ५–६ तोळेपर्यंत घेऊन त्यांत ३–४ तोळे उत्तम मध मिळवून द्यावें. तें पाणी प्याल्यानंतर पांढऱ्या कांद्याचा रस २–३ तोळे, व लसूण १ कांदीचा रस कुटतांना एकत्रच कांदा लसूण कुटून काढून त्यांतही एक तोळा मध घालून पिणें. रोज सकाळीं एकदां फक्त चण्याचें पाणी घेतांच वर रस कांद्याचा घेणें. नपुंसकत्व, इंद्रियनिर्बलत्व, अधातुत्व वगैरेंवर उत्तम होय.)

३९१. **कामलेवर :** गोड्या एरंडीचीं पानें, (कोवळीं नव्हेत व जूनही नव्हेत अशीं मध्यम घेऊन) कुटून त्यांची सुपारीएवढी गोळी ७ दिवस म्हशीच्या दुधांतून कालवून देणें. साखर घालावी. ३ दिवसांत कामला नाहींशी करण्यास दोन सुपारी-इतकी गोळी व अर्धाशेर दूध, एक दिवसांत नाहींशी करण्यास ४ ते ५ सुपारीएवढी गोळी १ शेर दुधांत मिळवून देणें. जुलाब ४ ते ८ पर्यंत पिवळया रंगाचे होतील. उतार चिंचेचें पाणी, लिंबू , तूप, दहीं, पेरू.

३९२. **सफेद, लाल, मिश्र वगैरे सर्व प्रकारच्या धुपणीवर :** अशोकाचीं मध्यम पानें (कोंवळीं व जून नाहींत अशीं) कुटून १ तोळा रस काढून १ तोळा गाईचें तूप अगर २–३ तोळे मध मिळवून देणें. **पथ्य –** तूप भात, वरण, पोळी, तुरीची खिचडी वगैरे.

३९३. **धुपणीवर :** चिकणी सुपारी, लवंग, वेलची, जायपत्री, चुना, कात वगैरे टाकून विडा करून त्यांत कबुतराची विष्टा सुकवून खलून ठेवून ४ आणे भार (चवलीभार) विड्यांत घालून रोज देणें. ७ दिवस द्यावें. **पथ्य –** डाळ भात, तूप. चपाती, सदरहू. औषध हातखंडा आहे.

३९४. **परम्यावर :** बाभळीच्या लाकडांतील धूण (लागलेलें लाकूड असतें त्यांतील मातीस धूण म्हणतात.) ·।।· तोळा, ·।।· तोळा हळद भुकी, १ तोळा साखरपिठी, १। तोळा चंदनतेल उत्तम. एवढ्याचें मिश्रण ७ दिवस पुरेल. **पथ्य–** फक्त एकदां सकाळीं देणें. वर थंड पाणी प्यावें. डाळ, चपाती, पथ्य करावें.

३९५ **गरमीवर :** १० तोळे गोडें जिरें, १० तोळे पिठी साखर, २ तोळे समुद्रफेस, ४ बिब्बे, (४ बिब्यांऐवजी १ तोळा कुटकी गुजराती वगैरे लोकांस.) सर्व कुटून बारीक करून ७ दिवस ७ गोळ्या सकाळीं फक्त एकदां गुळांत कुटून देणें. गुळांतच गोळी करावी. (गुजराती लोकांस बिब्बे न घालतां, कुटकी १ तोळा घेणें.)

३९६. **गरमी, नपुंसकत्व, क्षय, पांडु, अग्निमांद्य रोगांवर :** बिब्याचें तेल १० तोळे, हरताळभस्म किंवा अफू २ तोळे, पारा १ तोळा, सर्व घेऊन कटोऱ्यांत चुलीवर ठेवून गरम करून मिलाफ करून ठेवून मग सावकाश कांहीं गुळवेलसत्व अगर पीठ हातास लावून गोळया बांधून ठेवाव्या. उत्तम उपयोग होतो. (गणेश विठ्ठल काळे, पंचवटी, यांच्या घराण्यांतील).

३९७. **श्वेत प्रदरावर :** तामलकी (भुयथळी) वांटून, ४–५ मिरें घालून कल्क करून (प्रदररिपूची गोळी) असें मिश्रण देणें. **मधुमेहावर** नुसताच कल्क द्यावा.

३९८. **मधुमेहावर :** जांभळीची साल १ तोळा, पारिजातकाची साल ·॥· तोळा, गुळवेल ·॥· तोळा, सराटे १ तोळा, अंजनमूळ ·।· तोळा, सुंट २ भार यांचा काढा देणें.

३९९. **बुद्धी तेज होण्यावर :** (१) मालकांगोणीचीं पानें १–२ रोज सकाळीं प्रमाणें ४० दिवस लहान मुलास खावयास द्यावीं. वर दूध प्यावें, अगर नुसतींच पानें खावयास द्यावीं. (२) लहान मुलांस देण्यास ब्रह्मीचा पाला, वेखंड, सुंठ एकत्र खलून गोळ्या करून ठेवून दूध-साखरेंतून रोज देणें. २–३ दिवस, ६ महिनेसुद्धां. ब्रह्मीचा ताजा पाला वांटून वेखंड घालूनही उपाय करावा.

४००. **भगंदरावर : (अमृतधारा मलम) :** गांवठी कापूर, ओवा फूल, पेपरमिंट फूल, हे सर्व समभाग घेणें, याच्या पावपट नवखाराचें हवेंत ठेवून पाणी होतें तें पाणी, १ तोळा व थोडी ब्रँडी, २ तोळे, १ तोळा दालचिनीचें तेल, घोड्याचें नख २–४ तोळे, गाढवाचें नख २-४ तोळे यांचा मिलाफ करून भगंदर वगैरेंवर औषध. या दोन्ही मिळून ८ तोळे नखें घेऊन तुप किंवा तेलांत १–१ तोळा जाळून त्याची राख होते. नंतर त्यांतच म्हणजे तेलांतच १ तोळा अफू घ्यावी, २ तोळे मेण घ्यावें, नंतर सर्व खलवत्त्यांत कुटून घोटून मलम करून ठेवणें. अफू जाळून घेणें, कच्ची घेऊं नये. हें भगंदर, नाखूर, व्रण सर्व प्रकारचे, व जखम होणें, यांजवर मलम लावावें. भगंदराचें छिद्र लहान असेल म्हणून कापसाची वात करून त्यास मलम लावून आंत भरावें, पू वगैरे काढून जखम मोठी होत जाईल व बरी होईल.

४०१. **कुष्ट व अन्य रोगांवर, नव्हे सर्व रोगांवर :** पांच अगर १० तोळे पारा शुद्ध (हिंगुलोत्थ), तीनशें लिंबांच्या रसांत घोटून २-३ महिने, नंतर बेलफळ तोंडाकडे कापून त्यांत १–२ तोळे पारा भरून वर चकती बसवून आंत कापडमात करून १० शेर पक्के गोवरींत आंच द्यावी. भस्म सुईच्या अग्रावर घ्यावें. अनुपान योजून घ्यावें.

४०२. **वायुगोळा, यकृत, समस्त शूळ वगैरे वाताचे सर्व विकार, बद्धकोष्ठता, अपचन, अग्निमांद्य यांवर :** कुमारीरस (गर) १०० तोळे, नवखार २० तोळे, सज्जीखार २० तोळे, सोनारपुडी २० तोळे, पादेलोण २० तोळे, नवसागर २० तोळे; हे सर्व आठ दिवस वरणींत भिजत घालून तोंड झांकून ८ दिवसांनंतर आंत सर्व ठेवून त्यांतील रोज लहान चमचाभर घेऊन त्यांत एक टिपका अमृतधारा घालून घ्यावें, असेंच गिळण्यास द्यावें. दातांस वगैरे लावूं नये.

४०३. **डोळ्यांकरितां सुरमा : (१)** डोळ्यांच्या अनेक विकारांवर तुरटीची लाही ४ तोळे, समुद्रफेस ४ तोळे, सांबरशिंग ४ तोळे, सफेत सुरमा ४ तोळे,

देशी कापूर १ तोळा किंवा उत्तम भीमसेनी कापूर, त्यांत घालून घोटणें. गुलाब-पाण्यांत उत्तम घोटून डोळ्यांत सुरम्याप्रमाणें किंवा काजळाप्रमाणें लावणें. (२) हळकुंडें सोलून किंवा साल काढून १५ दिवस लिंबाच्या रसांत भिजत टाकणें. नंतर सुकवून (सावलींत) जांभळाच्या शरकानंतर वाळवून जुन्या तुपांत उगाळून डोळ्यांस लावावें. सर्व रोग जातील. ही हळद वरील औषधांत घातली तर सुरमा अप्रतिम ठरेल.

४०४. **ताप, खोकला, रक्तविकार, अग्निमांद्य, व ताकदीवर :** (चमत्कारिक औषध योग). १ रत्तल बिब्ब्याचें तेल, १ रत्तल गंधक घेऊन कढईत मंद अग्नीवर थोडें तेल (बिब्ब्याचें, घालून गंधक रत्तलभर घालून पातळ होतांच तेल-सुद्धां त्रिफळाच्या पाण्यांत ओतावा (त्रिफळा रात्रीं भिजत घालून सकाळीं याप्रमाणें ७ वेळां बिब्ब्याच्या तेलांत पातळ करून ओतावा. नंतर तो गंधक पाण्यानें साफ धुवून स्वच्छ करून नंतर तीवर कांच नवसागर (कानी नवसागर, तो नवसागर वडीप्रमाणें असतो.) घालून खलून नंतर मडक्यांत डमरूयंत्रानें वर सत्त्व लागेल (दोहोंचें) तें घ्यावें. बाटलींत ठेवावें. नाहीं तर पाणी होईल. ४-५ तास अग्नी मंद व नंतर तीक्ष्ण ताव देणें. १ गुंज देणें. साखरेप्रमाणें दूध जास्त घ्यावें. गरमी वगैरे सर्व विकारांवर उपयोग.

४०५. **खलीतावर (चारी पडते त्यावर) लावण्यासाठी :** सफेद कोहरीचीं पानें फुलें आणून वाळवावीं (सावलींत.) नंतर सोमलास खालींवर घालून काची कुपींत अग्नि फारसा न देतां वाळूंत कुपी ठेवावी. त्या गरमीनें तेल निघतें. किंवा चुलींत बाटली ठेवून शेकावी. जळवा मेलेल्या तेलांत तळून तें तेल लावलें तर तळहतावरसुद्धा केस येतील.

४०६. **हिंगूळभस्म :** शुद्ध हिंगूळ १ तोळा एरंडेलात फडका भिजवून चेंडू बांधून एरंडेलांतच भिजवून बत्ती द्यावी, तेल सरलें म्हणजे चेंडू काढून दडपून ठेवून मग खडा काढून बारीक खलून ठेवावा. अनुपान योजून द्यावा. तूप, बिब्बे, मध १-१ शेर घेऊन त्यांत हिंगूळ ठेवून भस्म होतें.

४०७. **गंधक भस्म :** १ तोळा गंधक घेऊन दगडाचा चुना भाजलेला ताजा तोळे १०, मुशींत निम्मा चुना घालून त्याजवर गंधक ठेवून त्यावर निम्मा चुना दडपून कोळशाच्या अग्नीवर ठेवून, १ प्रहर भात्यानें फुंकून अग्नि द्यावा, म्हणजे भस्म होतें.

४०८. **पांडुरोग, आमवायू, विषूचिका, अतिसार, संग्रहणीवर :** ४ तोळे अफू नवी, ४ तोळे कुचला, ८ तोळे मिरें पांढरें चूर्ण, आल्याच्या रसांत खल करून गोळया कराव्या.

४०९. **कफावर :** रक्तरोड्याच्या सालीचें चूर्ण आर्धा तोळा देऊन पावशेर दूध प्यावें.

४१०. **जीर्ण ज्वर, श्वास, कासावर** : काळीं द्राक्षें, नागरमोथे, पहाड-मूळ, धणे, येरंडमूळ, गुळवेल, रक्तचंदन, किराईत, पद्मकाष्ठ, निंबळसाल, कचोरा, सुंठ, धमासा, काळा वाळा, काकडशिंगी, कुटकी, वाळा, रिंगणी, प्रत्येक एक एक तोळा घेऊन सात पुड्या.

४११. **शोफोदरावर** : त्रिफळा ३ तोळे, गुळवेल ३ तोळे, निशोत्तर ३ तोळे यांचा काढा करून घ्यावा. घोसाळ्याच्या पानांचा रस अंगास लावावा. शुष्क खोकल्या-वर उपयोगी.

४१२. **जंतावर काढा** : नागरमोथे, उंदरकानी, त्रिफळा, शेवग्याची साल, वावडिंग यांचा काढा द्यावा.

४१३. **अतिसारावर उत्कृष्ट** : कुड्याची साल ४ तोळे, पाणी ८ तोळे, काढा करून २ वेळां पाजावा. रोज.

४१४. **हगवण, जुलाब, मोडशीवर** : आल्या-लिंबाचा रस वज्रखार घालून घ्यावा.

४१५. **मूत्र सुटण्यास** : ४ तोळे मुळ्याचा रस, सौरखार घालून घ्यावा. चवलीभार किंवा पावलीभार घ्यावा.

४१६. **हरताळ भस्म** : शिरसाच्या पाल्यांत भस्म ५ गोवऱ्यांनीं चिंचेच्या पाल्याच्या लुगद्यांत अस्मानी रंगाचें भस्म होतें.

४१७. **मल्ल भस्म** : महाळुंगीच्या पाल्याचा रस व आल्याचा रस यांत खल करून, वडी करून, शेराच्या (हुराच्या) राखेंत ४ प्रहर अग्नि द्यावा. भस्म होतें.

४१८. **नपुंसकत्व दूर होण्यास** : शुद्ध हिंगूळ १ तोळा घेऊन, पितांब-राच्या फडक्यांत चपटी पिशवी बांधून, कणीक गाईच्या दुधांत घालून त्याची रोटी करून आंत पिशवी घालून निखाऱ्यावर खरपूस भाजावी, व तें भस्म काढून ठेवावें. मध, साखर, तूप, लोणीबरोबर, २ महिने घ्यावें. **पथ्य**— तेल वर्ज्य, स्त्री वर्ज्य.

४१९. **वीर्यवर्धक, शक्तिवर्धक रौप्य भस्म** : मेथीच्या पाण्याच्या लुगद्यांत अगर बाभळीच्या ढिऱ्या कोवळ्या कुटून त्याच्या लुगद्यांत २–३ दिवस लहान पुटें देऊन होतें. ओल्या सालीचें चूर्ण भुकटी लुगदी करून त्यांतही होतें. रौप्य चोख घ्यावें. अगर शुद्ध करून घ्यावें.

४२०. **कुष्ठविकार, ज्वरहारक, शक्तिवर्धक** : पत्री हरताळ सत्यनाशीच्या रसांत ३ दिवस, शुद्ध करून त्याच रसांत खलून वडाच्या सालीच्या राखेंत खालींवर राख घालून गजपुटपेक्षां जरा कमी पुट द्यावें. औषध अनुपान योजून देणें.

४२१. **नेत्ररोग, शुक्ररोग, वीर्यवृद्धी यांवर** : आंवळ्यांचे काप काढून (आंतील बिया काढून वांढून) तें जितकें वजन निघेल तितकाच मध मिळवून बरणींत अगर मडक्यांत मातकापड करून जमिनींत ४ महिने पुरून ठेवावें, नंतर

काढून, रोज २–२ तोळे सकाळीं फक्त एकदां खावें. १२ वाजतां जेवण करावें, सकाळीं त्याजवर कांहीं खाऊं नये. मडकें सावलींत पुरून ठेवावें. हें रसायन आहे. सदरहूमध्यें सोन्याचा वर्ख २ भार घातला तर फारच उत्तम.

४२२. **मूळव्याधीवर** : (१) रक्त अगर मोड किंवा सूज यांजवर सुरण किसून त्याचा तूप-गुळांत शिरा बनवून रोज ७ दिवस घेणें. १० तोळे रोज द्यावा. (२) ढांक काकसार २ तोळे, व २ तोळे गुलाबाची कळी, २ तोळे वेलची, गुलाबपाणी अर्धा शेर, सर्व पाण्यांत मिळवून त्याचा अग्नीवर चहाप्रमाणें बनवून बाटलींत ठेवून रोज ३ तोळे द्यावें.

४२३. **ताम्रभस्म** : श्वेतरिंगणी (लक्ष्मणा) हिच्या पंचांगादि उपयोग करून ताम्र लुगदींत ठेवून गजपुटानें भस्म होतें. या वनस्पतींतही अनेक भस्में होतात, व फार चमत्कारिक योग होतात. (वेधी वगैरे). परंतु खावयास उपयोगी अशीं भस्में प्रशस्त आहेत.

४२४. **वायु विकारावर** : कळीचा लसूण ७ तोळे, सुंठ ७ तोळे, मध १४ तोळे, सर्व एकत्र मिळवून, २ गुंजा कस्तुरी त्यांत मिळवून १ दिवस ठेवून देऊन त्यांतून ४ तोळे रोज खावें.

४२५. **वायू, अग्निमांद्य यांवर** : आल्याचा रस २ तोळे गरम करून त्यांत मध १॥ तोळा घालून २ वेळां द्यावा.

४२६. **मूत्र कमी होण्यास, मूत्रांतील साखर कमी होण्यास** : तुपांत भाजून मखाणा १ शेर (२८ तोळे), मोठी वेलची ५ तोळे कुटून, १० तोळे खडीसाखर यांचें चूर्ण रोज २ तोळे, ३ वेळां द्यावें. पाणी, दूध वर पिऊं नये.

४२७. **आंवळसार गंधक भस्म** : पांढऱ्या पळसाच्या रसांत खलून १ तोळा गंधक कोंबडीच्या अंड्यांत भरून वर चकती बसवून मातकापड करून, वालुका यंत्रात पूट द्यावें. अप्रतिम भस्म होतें. याचप्रमाणें काळ्या माक्यांत हें भस्म व सोमल, तांब्रादि हरताळसुद्धां सर्व भस्में होतात.

४२८. **श्वेतपलाश भस्म** : हातभर लांब व मांडीएवढा जाड १ तुकडा घेऊन त्यास २–३ ठिकाणीं भोकें पाडून (आडव्या दांड्यास) आंत पारा, ताम्र, सोमल, हरताळ वगैरे, कोणतेंही घालून वर तोच चुरा बसवून मातकापड करून पूट द्यावें. भस्म होतें.

४२९. **ताम्रभस्म** : केळीच्या कांद्याच्या रसांत (२ शेर रसांत) ताम्र पत्रा घालून, शिजवून, त्याचा कलंक जाईल. नंतर मनाशिळाच्या लुगदींत ठेवून मातकापड करून पुट द्यावें, गुलाबी रंगाचें भस्म होतें.

४३०. **काळा सोमल फार तेज असतो, त्याचें भस्म** : दोन तीन शेर दुधांत, दोलायंत्रानें सोमल काळा अगर पांढरा शिजवून दुधाचा मावा होई-पर्यंत, नंतर तें दूध जमिनींत पुरून टाकावें. (कारण कोणत्याही जीवाच्या तोंडीं

लागूं नये). आंतील खडा काढून घेऊन मग रानकांद्यास (कांद्याप्रमाणेंच सफेत असतो तो विषारी आहे.) भोक पाडून आंत खडा ठेवून मातकापड करून शेणींत लहान पुट द्यावें. फार महत्त्वाचें भस्म होतें. नंतर बाभळीच्या लाकडाचे कोळसे करून त्यांत ताम्र लाल करून त्याजवर थोडें टाकावें.

४३१. **नपुंसकत्वावर** : चारोळी आणि कडूनिंबाच्या निंबोळ्याच्या गरांत पत्री हरताळ खलून पाताळयंत्रानें तेल काढावें (करवंटींत ठेवून). सोमल व हरताळ एकत्र अगर निरानिराळे शुद्ध करून, (श्वेतपलाश) पांढऱ्या पळसाच्या मुळाच्या अगर सालीच्या रसांत खलून, अगर फुलांत खलून, याची लुगदी करून मातकापड करून, रानशेणीच्या बेताच्या आंचेंत भस्म होतें. हें अनेक प्रकारें उपयोगी होतें. श्वेत पलाशांत ताम्र, रौप्य, पारद, हिंगूळ, सुवर्ण, सोमल, हरताळ, आदिकरून सर्वच भस्में चांगलीं होतात. परंतु दुर्लभ असल्यामुळें क्वचितच शोधून मिळेल.

४३२. **डोळ्याच्या विकारांवर उत्तम उपयोगी** : उंसाच्या शेतांतील उंसाच्या पाल्यावर पडलेलें दंव जमवून बाटलींत ठेवून डोळ्यांत तुरटीची भुकी कच्ची टाकून वर सदरहू पाण्याचे ४ ठिपके टाकावेत.

४३३. **धातुक्षीणतेवर** : प्रवाळ, चांदीचें भस्म, किंवा वर्ख, गोखरूंचें चूर्ण, आंवळा कुटून त्याच्या भुकींत खावें. वर दूध घ्यावें. **पथ्य**– तेलकट वर्ज्य.

४३४. **चाई पडते त्यावर** : तुरटी, हळद, बिब्बा उगाळून लेप करणें.

४३५. **व्रण, उपदंश याजवर** : हिरडेदळ, बेहडेदळ, आंवळकठी, मंजिष्ठ, करंजाचें मूळ, उपळसरी, कडूनिंबाची साल, यांचा काढा गंधकाच्या रसांत घालून घ्यावा. **पथ्य**– दूध-भात, वरण, पोळी.

४३६. **हरताळ भस्म** : पत्री हरताळ कोहोळ्याच्या रसांत पुरचुंडी बांधून दोलायंत्रानें ५ दिवस शिजवावा. नंतर कडूनिंबाच्या पाल्याच्या रसांत घोटून चकत्या बसवून, उन्हांत वाळवून ठेवून, पिंपळाची राख दाबून तोंडापर्यंत भरून चुलीवर २४ तास मध्यमाग्नि द्यावा. मधून मधून धूर येत असेल तर त्यावर राख चेपावी. स्वांगशीतल काढून घ्यावा. तापलेल्या खापरीवर टाकून पाहावा, धूर आला तर भस्म सिद्ध नाहीं. पुन्हा पुट द्यावें. १०–१२ तास. हरताळकारणास ब्रह्मचर्य, निवान्त जागा, रजस्वला वगैरे नसेल अशी जागा पहावी.

४३७. **एकादिक, तृतीयक, चातुर्थिक ज्वर, सतत येणारा ज्वर यांवर** : शीतल ज्वरावर शुद्ध हरताळ १ तोळा, मोरचूत १ तोळा, चुनकळी १ तोळा, धोतऱ्याच्या रसांत खलून गजपुट द्यावें. काळ्या वर्णाचें भस्म होईल. मात्रा २ गुंजा जेवणाच्या अगोदर ४ तास, खडीसाखरेबरोबर देणें. मुलास १ गुंज पुरे. एक दिवसाच्या सेवनानें ज्वर नष्ट होतात.

४३८. **लहान मुलांस ज्वर, आंकडी, कफ, पोटफुगी, वगैरेंवर, खोकला, श्वास, संग्रहणी, वगैरेंवरसुद्धां (बालामृत)** : वावडिंग ६ मासे,

अतिविष ३ मासे, माकडशिंगी १॥ मासा, नागरमोथे १॥ मासा, सुंठ १॥ मासा, वेखंड ३ मासे, सोनामुखी ३ मासे, बाळहिरडे ३ मासे, समुद्रफळ २ अदद (मासे), सर्व कुटून काढा पाण्यांत करून अर्धा शिल्लक ठेवून २० तोळे साखरेची चाचणी करून त्यांत घालून स्वागी ६ मासे फुलवून रुमामस्तकी ३ मासे, रंग लाल पाहिजे तर ४ गुंजा रतनजोत त्यांत खलून घालून ठेवावी. अनेक विकारांवर ३ मासेपर्यंत रोज २ वेळां देणें.

४३९. **पौष्टिक, कृमिनाशक, वातनाशक, ज्वरहारक व अत्यंत पाचक (मुलांकरितां)** : अतिविष १ तोळा, सागरगोट्यांच्या मगजांचें चूर्ण १ तोळा, गुळवेलसत्त्व १ तोळा, या तिन्हींचें बारीक चूर्ण करून कुड्याच्या सालीच्या काढ्यांत खलून, गोळी २ गुंजाप्रमाणें बांधावी. १ गोळी आईच्या दुधांत खलून अगर मधांत देणें. गुणयुक्त आहे. सागरगोटे भाजून फोडून चूर्ण द्यावें.

४४०. **पाळीच्या तापावर** : अतिविष २॥ तोळे, फकडीचें फूल २॥ तोळे, सोनगरू १ तोळा, तिन्ही वस्त्रगाळ करून पूड करून ठेवून थंड पाण्याबरोबर १॥ मासाप्रमाणें, ताप कोणत्याही पाळीचा येण्यापूर्वी ४ तास १–१ तासानें हें चूर्ण द्यावें. गरीब लोकांस उपयुक्त आहे.

४४१. **श्वेत कुष्ठनाशक (योग)** : बांवच्या २० तोळे, चित्रकमुळाची साल २ तोळे, दोहोंचें बारीक चूर्ण करून कुष्ठ असलेल्यास सकाळीं–सायंकाळीं ४–४ मासे पाण्याबरोबर खावयास द्यावें. आणि हेंच चूर्ण चंदनाप्रमाणें गोमूत्रांत बारीक वांटून पांढऱ्या मंडळावर (कुष्ठावर) लेप करण्यास द्यावा. आणि उन्हांत बसावें. अंग फार तापेपर्यंत बसूं नये. साधारण गरम होईपर्यंत बसावें. असें १ महिनापर्यंत करून कुष्ठ अवश्य नष्ट होतें. **पथ्य**– तेलकट, आंबट, वर्ज्य करावें. अनुभूत योग आहे.

४४२. **स्थूलीकरण नंबेळाईवर** : हळद ४ तोळे, अश्वगंध ३ तोळे, म्हशीच्या दुधांतून लाविलें तर लेपानें गुण येतो. रोज खाऊनही उपयोग होतो. कांहीं दिवस करणें.

४४३. **जस्ताचें भस्म** : जस्त शुद्ध करून तुकडे करून एका थाळींत समभाग हळदीचें चूर्ण घालून पुट द्यावें. पिवळें भस्म चांगलें होतें.

४४४. **जुलाब बंद होण्यास** : कांद्याच्या (पलांडू) रसांत संजीवनी (दारू) द्यावी.

४४५. **भगंदरावर उत्तम उपाय** : चोपचिनी वस्त्रगाळ १। तोळा, साखर १। तोळा मिश्र करून तुपाची धार सोडून लाडू होईपर्यंत तूप घालून चांगलें मिळवून १–१ तोळ्याचे लाडू बांधावे. सकाळ–सायंकाळीं १–१ लाडू खाऊन वर गाईचें दूध द्यावें. १५ ते २१ दिवस करावें. **पथ्य**– करावें. पुरुषत्व येईल.

४४६. **मूळव्याधीवर (रक्ती)** : तुरटी २० तोळे, मोरचूत ४ तोळे, सोमल ४ तोळे, तीन्ही बारीक खलून क्रमानें निवडुंग, हुरा (शेराचा चीक), रुईचा चीक

यांत खल करून ३–३ भावना द्याव्या. नंतर गोमूत्र ४० तोळे, गोडें तेल १० तोळे कढईंत घालून तें चूर्ण शिजवावें. गोमूत्र जळून तेल शेष राहीपर्यंत कढवून, गाळून घ्यावें. फाया करून कापसानें मोडास लावावें. ३–४ दिवसांत मोड जळून जातील.

४४७. **सफेद केस काळे करण्यास :** कोरंटा बिया, बांसा कटसरैया पंचांगांचा स्वरस १ शेर, भृंगराज स्वरस १ शेर (८० तोळे), दोन्ही स्वरस एकत्र करून चौथाई तिळाचें तेल घालून, मंदाग्नीवर पचन करून तेल सिद्ध करून उतरून ठेवणें. रोज लावण्यानें काळे केस होतात. स्वरसांत बकरीचें दूध घालून मग तेल कढवावें.

४४८. **दंत दृढीकरणावर :** कुरंट्याचें (कोरंट्याचें) पंचांग ५ तोळे, काळेंमिरें १ तोळा, लाहोरी मीठ २॥ तोळे, सर्व कुटून कपड्यावर गाळून कापूर ६ मासे घालून, दंतधावन करणें. दातांचे सर्व रोग नाहींसे होतात.

४४९. **त्रैलोक्य संमोहन वटी :** शुद्ध विजया (भांग) ८ तोळे, हिंगूळभस्म, रससिंदूर, अभ्रकभस्म, लोहभस्म, लवंग, भीमसेनी कापूर, शंखभस्म, प्रत्येकीं १ तोळा, गोखरूं, कवचबीजचूर्ण, काकडशिंगी प्रत्येकीं २॥ तोळे, सर्व एकत्र करून भांग, शतावरी, आसकंद, यांच्या काढ्यांत ७-७ भावना देऊन, ३-३ गुंजेची गोळी करून, स्त्रियांचे रोग (आर्तवनष्टता वगैरे) बरे होतात. क्लीबता नष्ट होते. सर्वत्रांस उपयोगी.

४५०. **फसली ज्वर नाशक :** गोदंती हारताळ व कासीस (हिराकस), समभाग घेऊन घृतकुमारीच्या (कोरफड) रसांत खलून, नंतर चकत्या करून सुकवून शरावांत ठेवून गजपुट अग्नि द्यावा. याप्रमाणें ३ वेळां पूट द्यावें. लाल भस्म होईल. मात्रा अर्धी गुंज ३ मासे साखरेंत द्यावी. पाण्याबरोबर पिण्यास देणें.

४५१. **ज्वरांकुश :** श्वेता (शंखजिरें) २० तोळे, हिराकस २० तोळे, पत्री हरताळ ६ मासे, एक शेर (८० तोळे) कुमारीच्या गरांत खलून, गोळा करून संपुट करून, गजपूट द्यावें. तांबडें भस्म होईल. मात्रा १ ते २ गुंजा बत्ताशांतून रोज ३ वेळां देणें. तापावर उपयोग उत्तम.

४५२. **श्वासावर :** अभ्रक १ गुंज, ताम्र १ गुंज, रससिंदूर १ गुंज, जवखार १ गुंज, पिंपळीचूर्ण ४ गुंजा, मिळवून मधाबरोबर सकाळीं-सायंकाळीं चाटणें.

४५३. **ध्वजभंग, प्रमेह, क्लीबता, दुर्बलता वगैरे रोगांवर योगविधी :** रससिंदूर १ तोळा, सोनें भस्म अगर वर्ख ३ मासे, चांदीचें भस्म अगर वर्ख ६ मासे, अभ्रक भस्म १ तोळा, लोहभस्म १ तोळा, वंगभस्म २ तोळे, ताम्रभस्म ३ मासे, कासीस भस्म ३ मासे, जायफळ, लवंग, वेलची, दालचिनी, जिरें, नागरमोथे, प्रियंगुफूल प्रत्येकीं ६–६ मासे; कबाबचिनी १ तोळा, प्रथम काष्ठौषधीस निरनिराळे बारीक चूर्ण करून, मग तोलून, एकत्र करून, नंतर वरील भस्में मिळवून कोर-

फडाच्या रसांच्या ३ भावना, त्रिफळाक्काथ ३ भावना, एरंडमूळ रस ३ भावना देऊन गोळा करून वर एरंडाचीं पानें लावून लपेटून ७ दिवस अहोरात्र धान्याच्या राशींत ठेवावें. नंतर काढून वाटाण्याप्रमाणें गोळ्या करून पानांच्या रसांत अगर मधांत किंवा दूध-साखरेंत घ्याव्यात. रोगाप्रमाणें अनुमान योजावें. (प्रकृतीप्रमाणें) नपुंसकता, वाजीकरण, आयुष्यवर्धक, प्रमेह, श्वास, कास, अरुचि, मंदाग्नि, आमशूल, हृदयशूल, पित्तशूल, संग्रणी, आमवात, आम्लपित्त, भगंदर, कामला, इत्यादी रोगांवर गुणकारी आहे.

४५४. **अशक्तता, नबळाईवर अजब चूर्ण** : नकछिकनी ३ रती, कायफळ ६ रती, वलंग ४ रती, केशर १ रती, हिंगूळ ४ रती, दालचिनी १ मासा, माजूफल ४ रती, अफू ४ रती, चांदीचे व सोन्याचे वर्ख प्रत्येकी ७ (२ रती), कस्तुरी १ मासा, रेगमाही १ मासा, या सर्वांचें चूर्ण करून अगदीं तापलेल्या दुधाबरोबर साखर घालून द्यावें. एकसारखें दूध प्यावें. ताकद वाढेल. एका रात्रींत १०–१५ शेर दूधही पचतें. आग वाटल्यास दूध प्यावें. अनुभविक दवा आहे. शरीर कांती वाढेल.

४५५. **ध्वज-भंगता, शुक्रनष्टता, मांद्य, कमजोरी, वगैरेंवर मृगनाभ्यादि वटी** : कस्तुरी १ मासा, केशर २ मासे, जायफळ ३ मासे, वेलची बारीक २॥ मासे, वंशलोचन ३॥ मासे, जायपत्री ४ मासे, सोन्याचा वर्ख १ मासा, चांदीचा वर्ख २ मासे, वंग ३ मासे, सर्व घेऊन खलून खलांत २४ तास विड्याच्या पानांत घोटून १–१ गुंजेची गोळी करून, रोज २–२ गोळ्या मलईबरोबर घेणें.

४५६. **सुगंधी उद्वर्तन** : अगर, कापूर, केशर, लोबान (कवड्या ऊद), लोध्र, खस (वाळा), नागरमोथे, सर्व समभाग चूर्ण, अगराचें चूर्ण अगर पाण्यांत उगाळून लेप केला असतां तात्काळ दाह शांत होतो. वरील उद्वर्तन बोरीच्या अंतरसालीच्या काढ्यांत अंगास लाविलें तर उन्हाची पीडा होत नाही.

४५७. **उत्तम वीर्यवृद्धीवर भस्म** : प्रवाळ शुद्ध करून निर्गुंडीच्या रसांत खलून पूट द्यावें. भस्म तयार होतें.

४५८. **प्रदरावर** : दूर्वांचा रस तांदुळाच्या धुवणांत वांटून घालून खडीसाखर मिळवून देणें.

४५९. **आंकडी रोगावर** : अक्कल कारा ३ तोळे अगदीं कुटून, ३२ तोळे पाण्यांत काढा करून अष्टमांश राहिल्यावर (४ तोळे) गाळून भांड्यात कांचेच्या ठेवून त्यांत ३ तोळे नवे वेखंड (जुने नको) जरा कुटून, त्यांत कालवून ६ दिवस उन्हांत ठेवावें म्हणजे तयार मात्रा झाली. त्यापैकीं थोडें अंगावरील (आईच्या) दुधांत उगाळून मुलांस द्यावें. रोज २-३ वेळां. ३ दिवसांत गुण पडतो. या शुद्ध केलेल्या वेखंडानें आंकडी बरी होते. आंकडीवर परमौषधी आहे.

४६०. **श्वास :** हिंगोट (हिंगण बेटाचें पाळ) आंतील मगज चवथा हिस्सा, मिरें ५ दाणे, गरम दुधांत घेतलें तर ७ दिवसांत श्वास नाहींसा होईल. हिंगण बेट व मिऱ्याचें चूर्ण करावें.

४६१. **पोटांतील वायू वगैरेवर :** मध, सुन्नेमाली मीठ (नीमक), पादेलोण, सैंधव, साखरी मीठ, जवखार, सज्जीखार, पांढरें मिरें, नौसागर, कलमी सोरा, निंबूचें सत्त्व, अम्लवेतस, सुंठ, मिरें, पिंपळी, साधें मीठ, हिंग, सर्वांचें चूर्ण करून बाटलींत भरून ठेवावें. पोटांतील नळवायु, **अजीर्ण शूल** वगैरे सर्व विकारांवर पाण्यावरोबर देणें.

४६२. **श्वासावर :** शंखभस्म १ तोळा, गुलाबी तुरटी ३ मासे मिळवून ठेवून १ गुंज मात्रा द्यावी. तूप रोज जास्त खावें. दमा लागलींच बसतो. तुपांत चाटावें.

४६३. **स्तंभकयोग :** जमीनकंद (सुरण असावे) तुळशीचीं मुळें कुटून समभाग चूर्ण करून पाण्यावरोबर द्यावें.

४६४. **ताम्रभस्म विधी :** साधारण कांहीं रोगांत गुण करून १ पैसा ह्याची शुद्धी करून निवडुंगाच्या चिकांत पारा खलून (१ तोळा) लेप द्यावा. त्याजवर कथलाचे ६ मासे पत्रे लपेटावे. ४ तोळे तुरटी बारीक करून खालींवर घालून मध्यें पैसा ठेवून १६ शेर पक्के गोवरीत आंच द्यावी. पैसा फुलतो. यानें कोडही नाहींसें होतें.

४६५. **जलोदरावर :** बाळ हरडे तव्यावर चांगले भाजून फुगल्यावर बारीक खलून चूर्ण करून त्याचा आठवा हिस्सा सैंधव बारीक करून मिळवून ठेवावें. नंतर ५ तोळे गोमूत्रांत सकाळीं–सायंकाळीं रोज २ वेळां ३ मासे चूर्ण द्यावें. यानें ३० दिवसांत जलोदर साफ बरें झालें. मूत्र रोज जास्त २ शेर होऊं लागेल. झाडे २–३ होतील.

४६६. **हातापायावरील सुजेवर :** ३ मासे बाळ हिरडीचें चूर्ण ५ तोळे गोमूत्रांत रोज २ वेळां घ्यावें. पंडुरोग पिवळेपणा डोळ्यांवरील सूज नाहींशी होते.

४६७. **मुलांचे (वरपट), लिव्हर यकृत (दोषावर) :** डबा, कफदोष, उजवे-डावे बाजूची सूज वगैरे यकृत प्लीहेचे रोगावर : नवसागर २ तोळे, खडीसाखरेची भुकी २ तोळे, कोरफडीच्या गराचा तुकडा ४ तोळे घेऊन, एका भांड्यांत (कांचेच्या) ठेवून त्यावर वरील भुकटी पेरावी, व उन्हांत भांडें ठेवावें. म्हणजे पाणी सुटेल, तें काढून घ्यावें. भुकी थोडथोडी पेरावी. सर्व २–२ तोळे पेरून झाल्यावर सर्व अर्क निघेल तो बाटलींत ठेवून २० टिपके दर वेळीं मोठ्यांस द्यावा. २ वेळां रोज द्यावा, बत्तासा अगर साखरेंत द्यावा. मुलांस ५–१० थेंब वयमान पाहून देणें.

४६८. **पीनसावर :** काळ्या तिळाचें तेल पावशेर (२० तोळे), माक्याचा रस २० तोळे, सैंधव २ तोळे, सर्व कढवून तेल राहिल्यावर उतरून गाळून

बाटलींत ठेवावें. हें उत्तम नस्य आहे. पीनस साफ बरा होतो. **पथ्य**–मुगाचें डाळ रोटी.

४६९. **संग्रहणीवर** : पर्पटीसारखें औषध ज्यास करितां येणार नाहीं त्यास या औषधाची योजना करावी. टेंटू (शोनाक) ची साल काढून धुवणांत धुवून कुटून त्याचा पुटपाक विधीनें सालीचा रस काढून ठेवून रोज १ तोळा सकाळीं, दुपारीं, व सायंकाळीं याप्रमाणें ३ तोळे द्यावा. पुरी व मुळ्याची भाजी खावी. आश्चर्यजनक गुण आहे. (हा गुप्त योग आहे.)

४७०. **नासूर अगर लहान छिद्राच्या व्रणावर** : (अनुभूत प्रयोग) : चुना, कात पांढरा, सोमल पांढरा, सर्व समभाग सुरम्याप्रमाणें बारीक घोटून वस्त्रगाळ बुकी करून ती बुकी नासुरच्या आंत पोचवावी, म्हणजे व्रण मोठा होतो. नंतर चुना न घालतां फक्त २ औषधें घोटून त्याची बुकी आंत भरीत जावी. म्हणजे व्रण बरा होतो. **पथ्य**–१५-२० दिवस ठेवावें.

४७१. **अपस्मारावर अनुभविक योग** : सफेद रुईचें फूल १ मासा, जुना गूळ ३ मासे, बारीक वांटून गोळी रोज १ दुधाबरोबर खावी. ४० दिवसांत अपस्मार जातो. **पथ्य**– तेलकट वगैरे वर्ज्य.

४७२. **मूळव्याधीवर** : करंजाच्या बिया पक्क्या झालेल्या कापून साली-सुद्धां ठेवून सकाळीं उठतांच अनशापोटीं तोंडांत सोडून वर ५ तोळे देशी साखर खावी, व त्या साखरेच्या पाण्याबरोबर बी गिळावी. पाणी पिऊं नये. **पथ्य**– मुगाचें वरण, चपाती खावी. मूळव्याध ७ दिवसांत साफ बरी होते. पुन्हा होत नाहीं. आश्चर्यदायक गुण आहे.

४७३. **रक्तार्श (रक्त पडणें) यावर** : रसांजन (रसोत) ३–३ मासे पाण्या-बरोबर रोज २–३ वेळ २–३ दिवस द्यावें. रक्त पडणें बंद होतें. फार अनुभव आहे. रक्त पडून अशक्तता बरी होते. पंडुरोग बरा झाला.

४७४. **मुलांच्या कृशता वगैरे रोगांवर** (बालरोग) : वेलची दाणे ३ मासे, वंशलोचन ६ मासे, केशर ६ मासे, मोतीभस्म ४ गुंजा, सर्व मिश्रण करून ठेवावें. ४ गुंजांची मात्रा सकाळीं द्यावी. दूध प्यावें.

४७५. **मुलांच्या शोषावर उत्तम तेल** : कासवाची पाठ ३ मासे, केशर १ मासा, अफू २ मासे, तेल काळ्या तिळांचें (छटाक पक्का), त्यांत सर्व कढवून बारीक करून तेलांत पाणी न घालतां जाळून तेल गाळून अंगास मालिश करावें.

४७६. **स्त्रियांच्या रक्तस्रावावर** : (१) कमलकेशर, नागकेशर, पिंपळाच्या झाडाची लाख सर्व १–१ भाग, व खडीसाखर बुकी ३ भाग, मिश्र करून ३–३ मासे दुधाबरोबर रोज दोन वेळां द्यावी.

(२) गोदंती हरताळ (घापण) ५ तोळे घेऊन कडूनिंबाच्या एक शेर

ओल्या पानांच्या रसांत खल करून संपुट करून गजपुट द्यावें. त्या भस्मापैकीं १–१ गुंज सकाळ–सायंकाळ डाळिंबाच्या लेहातून द्यावें. रक्तस्राव बंद होतो.

४७७. **दंतमंजन उत्तम** : बदूरची साल, बकुल वृक्षाची साल, सैंधव, ज़िरें, अक्कलकारा, तुरटी कच्ची, लवंग, शीतल चिनी, सुंठ, काळें मिरें, लेंडीपिंपळी, त्रिफळा, माजुफळ १, हुलास १, वेलची, सुपारी, रुमामस्तकी, कात पांढरा, लोध्र, कापूर, बालछड, सर्व समभाग वस्त्रगाळ करून मंजन करणें. गरम पाणी तोंड धुण्यास घ्यावें. दांतांतून रक्त पडणें, दांतांचें हालणें वगैरे विकार जातात, दांत दुखणें बरें होतें.

४७८. **सन्निपातावर वनस्पती गुटिका मिश्रण** : वावडिंग, सुंठ, पिंपळी, हरडा, बेहडा, आंवळकठी, वेखंड, गुळवेल, शुद्ध बिब्बा (भिलावा), शुद्ध बचनाग, सर्व कुटून समभाग सर्व घेऊन चूर्ण करून गोमूत्राबरोबर खलून गोळा करून गरम पाण्याबरोबर ४ गोळ्या घेणें. दिवसांतून २–३ वेळां घेणें. अगर आल्याच्या रसांत घेणें. २–२ तासांनीं (वैद्यांची ही खास संजीवनी गुटी आहे. काशी, रामेश्वर बाजूकडे जुने वैद्य ही गोळी वापरीत असतात.)

४७९. **लहान मुलांचें पोट दुखतें त्यावर चमत्कारिक योग** : टरपेन तेल २ थेंब, १ तोळा बडीशेपचा अर्क, यांत घालून पाजावें. म्हणजे पोटदुखी थांबून त्वरित आराम पडतो. पोटावर पण हें चोळावें. कडू निंबाच्या तेलाचा फाया मुलाचे गुदद्वारास चोळला तर थोड्या वेळांत परसाकडे होऊन पोट थांबतें.

४८०. **मुलाच्या पोटांतील जंतांस औषध** : एरंडेल तेल १ तोळा, टरपेन तेल १ तोळा मिळवून बाटलींत ठेवणें. व त्यापैकी १० थेंब दर वेळीं आईच्या दुधांतून अगर गरम पाणी १ तोळा घेऊन त्यांत सकाळ सायंकाळीं देणें. ३ दिवस देणें. म्हणजे जंत मरून परसाकडच्या वाटे पडून जातात. आईनें दुध पाजून मग हे औषध लगेच पाजावें. मग थोडा वेळ अंगावर पिण्यास घेऊं नये.

४८१ **परम्यावर सोपें औषध** : कलमी सोरा १। तोळा, शीतल चिनी १। तोळा, दोन्ही कुटून मिश्र करून ४–४ मासे पुडी करून २–३ वेळां थंड पाण्याबरोबर द्यावा. पाणी बरेंच प्यावें. (पोटभर हा अर्थ). परमा बंद होतो. (नवा परमा बंद होतो.)

४८२ **मूर्च्छानाशक सुगंधी** : कापूर ३ मासे, नवसागर, चुना कळी (न भाजलेला) १। तोळा, तीन्हींचें मिश्रण स्टॉपरर्ड बाटलींत करून ठेवून जरूर तेव्हां नस्य करण्यास बूच काढून बाटली लावावी. बेहोष रोगी, दांत बसणें वगैरेमध्यें व अपस्मारांचे वगैरे झटक्यांत वास देणें. मूर्च्छा हटेल. शिंका कोणाकोणास येते, परंतु रोग हटतो.

४८३. **अतिसार, दस्त वगैरेवर** : अफू ६ मासे, कापूर ६ मासे, इंद्रजव ६ मासे, जायफळ ६ मासे, स्वागी फुलवून ६ मासे, कुटून गाळून २-२

गुंजांची गोळी करून ठेवावी. दिवस रात्रींत २-३ वेळां द्यावी. थंड ताज्या पाण्याबरोबर देणें. झाड्याचे सर्व प्रकार बंद होतात. मळ बांधून परसाकडे होतें. मूत्र साफ होतें.

४८४. **गंडमाळा, अपची वगैरेवर** : (शाङ्र्गधरोक्त) कांचावर गुगुळ तयार करावा, व विडंगारिष्ट (शाङ्र्गधरोक्त) करावें. सकाळीं वरील गुगुळावर विडंगारिष्ट द्यावें. दुपारीं कांचनाच्या सालीचा अर्क काढून तो पिण्यास द्यावा. सायंकाळीं पुन्हां गुगुळ देऊन विडंगारिष्ट द्यावें. मौक्तिकभस्म लोण्याबरोबर दुपारीं द्यावें. वर कांचनाचा अर्क द्यावा. भावप्रकाशोक्त लेप करावा.

४८५. **मॅग्नेशिया मिक्श्चर** : १ तोळा लवण (अर्क लवण) सैंधवाचें अगर मिठाचें पाणी १ मासा, मिश्र करून सकाळ-सायंकाळ दिल्यानें जबरदस्त कब्ज थोडे दिवसांत नाहींशी होते. (मॅग्नेशिया सल्फास १ शेर, व गरम पाणी १ शेर घेऊन त्यांत चांगलें मिश्र करून गाळून ठेवणें.)

४८६. **व्रणावर लेप** : दहीं कपड्यांत बांधून पाणी काढून टाकून दहीं घेऊन व्रणावर लेप करावा. फोड फुटतात, असलेले बसतात; दाह शूल नाहींसा होतो.

४८७. **व्रणावर मलम** : मनुष्याच्या डोक्याचें हाड (कपालास्थी) जाळून त्याचें भस्म १ तोळा वस्त्रगाळ करून, पारागंधक कज्जली ६ मासे, तिळाचें तेल ४ तोळे, मेण १ तोळा, तेल गरम करून त्यांत मेण सोडून मग सर्व वस्तू टाकून एक दिवस घोटून मलम करून ठेवावें. असाध्य व्रणावर लेप करविण्यास द्यावें. असाध्य व्रण बरे होतात.

४८८. **संजीवनी सुरा (ब्रँडी)** : ब्रँडी १५ तोळे, उत्तम शुद्ध करून शिलाजित, केशर काश्मिरी १ तोळा, कवड्यालोबान १ तोळा, अंबर ३ मासे, अफू ६ मासे, कापूर ३ मासे, सर्व वस्तू कुटून बारीक खलून दारूंत मिळवून स्टॉपर्ड बाटलींत ठेवून रोज २–३ वेळां बाटली हालवावी, याप्रमाणें ३ दिवस ठेवून नंतर गाळून घेऊन बाटलींत ठेवणें. ५ थेंब अगर १०. चमचाभर दुधांत घेणें. वर गरम दूध पिणें (स्तंभक प्रयोगांत उत्तम). ५ दिवसांत असर होते.

४८९. **गरमीवर** : गरमीच्या विकारावर सर्वोत्कृष्ट औषध. शुद्ध पारा १ तोळा घेऊन लहानशा अग्निशिशींत घालून मातकापड चांगलें करून त्यांत ५ तोळे तेजाब घालून शिशी कोळसे पेटवून शेगडीवर ठेवावी, खुल्या जागेंत ठेवावी. कांचेच्या शिशींतून धूर निघण्याचा बंद होईपर्यंत खुल्या जागेंत एकीकडे ठेवावी. थंड झाल्यावर पांढरें पारदभस्म होईल. तें काढून बाटलींत ठेवावें. मात्रा १ तांदुळापासून ४ तांदुळांपर्यंत सांजांतून अगर हलव्यांतून मिश्र करून गिळण्यास द्यावें. या औषधापासून कोणा रोग्यास ओकारी व रेच होतात, कोणास होत नाहीत. कसाही रोगी असो, सडलेला असो, ३ दिवसांपासून ७ दिवसपर्यंत हें औषध द्यावें. गुण उत्तम येतो. वर्ज्य– दूध, दहीं, पेढा, बर्फी, किंवा दुधाचे पदार्थ देऊं नयेत. अगदीं वर्ज्य.

तूप-रोटी, सांजा खावा. मिष्ट मांससुद्धा चालेल. **पथ्य**— जरूर पाहिजे. उत्तम योग आहे.

४९०. **शक्तिवर्धक योग : जुनाट गरमीचें विष वगैरेंवर :** सुवर्ण-मालिनीवसंत ३ मासे, लोहभस्म ३ मासे, प्रवाळ ६ मासे, अभ्रक भस्म ३ मासे, सुवर्ण भस्म ३ मासे, रजत भस्म ३ मासे, सर्व खलांत घालून ठेवावें. २ गुंजांची पुडी, सकाळ—सायंकाळीं डाळिंबाच्या सरबतांतून देऊन १॥ तासानें द्राक्षारिष्ट जुनें ७ दिवस घ्यावें. उत्तम प्रकृती होते. क्षीणवीर्यासही उपाय.

४९१. **ध्वजभंग :** शुद्ध रुमी हिंगुळ १ तोळा, काळें मिरें ६ मासे, शुद्ध बचनाग ३ मासे (मीठातेलिया) पाहिल्यानें बचनागाचे लहान लहान तुकडे करून १ दिवस गोमूत्रांत भिजत टाकून नंतर काढून घेऊन नंतर उन्हांत वाळवून ठेवणें. याचप्रमाणें ताज्या लिंबाच्या रसांत हिंगूळ घोटून १ दिवस ठेवावा. नंतर तिन्ही एकत्र करून नंतर १ दिवस नाकशिंकणीच्या रसांत घोटून रस न मिळाल्यास नाक-शिंकणीचा काढा घट्ट करून घ्यावा. मात्रा १ तांदूळभर रोज विड्याच्या पानांतून ३ दिवस, ७ दिवस इतकी घ्यावी. म्हणजे अशक्तता मोडून ताकद येईल. नबळाई मोडेल. भूक लागेल.

४९२. **प्लीहा, पोटशूल, वात, पोटांतील विकार, अग्निमांद्य यांवर :** टाकणखार, जवखार, नवसागर, कलमी सोरा, सैंधव, व पादेलोण, बिडलोण, रुईचा खार, शुद्ध आंवळसार गंधक, चित्रकसाल, सुंठ, पिंपळी, ओवा, खललेला हिंग, याप्रमाणें सर्व बारीक करून कोरफडाच्या रसांत खल करून बोराच्या आंटीएवढी गोळी करून रोज २ गोळ्या सकाळ-सायंकाळ १ प्रमाणें मठ्ठा घेऊन त्यांत, जिरें, सैंधव, काळें मिरें घालून प्लीहावर घ्यावी. बाकी पोटांतील विकारांस पाण्याबरोबर घ्यावी.

४९३. **पारा षोडश संस्कारानें शुद्ध व उत्तम होतो त्याचा प्रयोग :** पारा १ शेर घेऊन, २ शेर आंवळसार गंधक शुद्ध करून घेऊन २ शेर गंधक राहील इतकी मोठी स्वच्छ कढई घेऊन त्यांत गंधक २ शेर मंदाग्नीवर पातळ करून मधोमध पारा ओतावा. नंतर चुलीवर कढई गंधक लालट होईपर्यंत आंच देऊन मग खालीं उतरून निवाल्यावर गंधकाचा पाऱ्यास कोट (वेष्टण) चढेल. तें छेदून काढून आंतील पारा स्वच्छ करून घ्यावा. पारा उडणार नाही. आंतच राहील. कदाचित नजरचुकीनें कज्जलीसारखा झाल्यास खलून चिंध्यांत गुंडाळून काढून घ्यावा. पण लक्ष ठेविलें तर काळा न होतां मध्येंच वितळतो. त्यावर गंधक लपेटून बसतो.

४९४. **प्रदरावर उत्तम योग :** दारुहळद, रसांजन, नागरमोथे, बेलकाचरी, शुद्ध भल्लातक (बिब्बा), अडुळशाचीं पानें, किराईत समान भाग घेऊन अगदीं कुटून ठेवून देणें. मात्रा २॥ तोळे काढा करून, मोत्याचें भस्म १ गुंज, प्रवाळ १ गुंज मधांत मिळवून पिळून वर काढा घ्यावा. घोर रक्तप्रदर बरा होईल.

४९५. **भगंदरावर :** कुत्र्याच्या आणि मांजराच्या हाडाचें भस्म करून, समभाग गाईच्या दुधांत, लोखंडाच्या कढईत मर्दन करून भगंदरावर लेप करावा. शीघ्र आराम.

४९६. **ज्वरावर योग :** (ज्वरनाशक) गोदंती भस्म १॥ मासा, करंजाचे बीचा गर ५ तोळे, कडूनिंबाच्या पाल्यांत १ तोळा किराईत, ४ तोळे लेंडी पिंपळी, ३ तोळे बाळहिरडे, २ तोळे तुरटीची लाही, १॥ तोळा जिरें, १॥ तोळा नागरमोथे, १ तोळा कुटकी, १ तोळा पित्तपापडा, या सर्वांचें चूर्ण करून तुळशीच्या रसांत (कृष्ण-तुळशीच्या) खलून मात्रा करून १ मासा प्रमाणें बलाबल विचार करून देणें, वातादि रोजचा ताप, एकोत्रा, तिहोत्रा, विषमज्वर, या सर्वांवर उत्तम उपयोग होतो. ईश्वरकृपेनें बहुतेकांस गुण येतो. तुळशीचीं पानें, किराईत काढा, मध वगैरे अनुपान योजून देणें.

४९७. **संग्रहणीवर :** आंवळ्याचा चुरा पोटलींत बांधून गरम पाण्यांत भिजवून गरम करावा, व त्या १ तोळ्यांत कवडी भस्म ४ गुंजा घालून दर वेळीं दिवसांतून २ वेळ प्रमाणें खावें. ओले आंवळे असले तर चुरा करून घ्यावा. पाण्यांत मिळवूं नये. २० गुंजांपर्यंत भस्म वाढवावें, व मग उतरीत जावें. **पथ्य**— (हलकें अन्न) संग्रहणीचें द्यावें. ताक जास्त दिल्यास फार फायदा होतो.

४९८. **धातुपौष्टिक, रक्तवर्धक, नपुंसकता, अनेक रोगांवर (मदनानंदरस) :** अत्युत्तम अनुभविक आहे. अक्कलकारा, जायफळ, जायपत्री, वेलची, बारीक काश्मिरी केशर, उत्तम कस्तुरी, शुद्ध धत्तुरबीज चूर्ण, शुद्ध कुचल्याचें चूर्ण, भांगेचें बीजचूर्ण, अंबर, स्वर्णपत्र (वर्ख), सिद्धचंद्रोदय, शुद्ध अफू, शुद्ध हिंगूळ; प्रथम हिंगूळ व अफू वटवृक्षाच्या चिकांत १ दिवस घोटून खारकेची बी गुठली काढून त्यांत हिंगूळ व अफू भरून कच्च्या सुतानें बांधून बाहेर गव्हाचा आटा लावून पुरीप्रमाणें तुपांत तळून पक्कें तळून काढून, बाहेरचे पीठ काढून टाकून खारकेसह आंतील औषधें वगैरे अफू हिंगूळसह खलांत खलून मग वरचीं औषधें सर्व मिश्र करून ७ भावना अफूच्या बोंडाच्या घट्ट काढ्याच्या, अगर अफीणीचे पोस्ताचे ओल्या बोंडाचा रस काढून त्याच्या ७ भावना द्याव्या. बांगला पान (विड्याचें) स्वरसाच्या नंतर १ भावना वटवृक्षाच्या चिकाची करून अगदीं मर्दन करून गोळ्या १-१, २-२ गुंजेच्या बांधाव्या. सावलींत वाळवून बाटलींत भरून ठेवाव्या. **हाच मदनानंद रस** तयार झाला. मग बलाबल विचारेंकरून १ अगर २ गोळ्या दर वेळीं याप्रमाणें रोज २ वेळां खडीसाखरेच्या भुकीबरोबर घेऊन वर गरम दूध यथाशक्ती घ्यावें. याच्या योगानें आशुपातळ, धातुतारल्य, स्वप्नावस्था, वीर्यस्राव, नपुंसकता आदी करून समस्त वीर्यविकार नष्ट होऊन, पुंसत्वशक्तीचा अत्यंत उत्तम संचार होतो. या वस्तूचा उपयोग अशा मनुष्यानें करावा कीं ज्याच्या घरीं कुटुंबप्रकृती ठीक आहे. नाहीं तर अनर्थ होईल.

४९९. **पुढील गोळ्यांत सोमल भस्म आहे त्याची कृति :** श्वेतभस्म १ तोळा, दालचिनी २ तोळे, प्रथम सोमल उत्तम गुलाबपाण्यांत १५–२० मिनिटें घोटून चकत्या बनवाव्या. नंतर एका मातीच्या थाळींत खालींवर दालचिनी २ तोळे कुटून चूर्ण घालून मध्यें चकत्या ठेवून मातकापड करून आठ आंगुळें उंच चुलीवर ठेवून बोरीच्या बोटाएवढ्या काठ्यांची (लांकडांची) दिव्याप्रमाणें मंद आंच द्यावी. ८० तोळे लाकडाची आंच द्यावी. लांकडें सरतांच थंड झाल्यावर खालीं उतरून तें भस्म अफू ९ मासे, शुद्ध पारा १ तोळा, सोमल भस्म १ तोळा याप्रमाणें घेऊन पहिल्यानें अफू ३ मासे घेऊन १० तोळे पाण्यांत कढवून २॥ ते ३ तोळे काढा करून, गाळून, त्यांत वरील सर्व मिळवून (थोडथोडें पाणी घालून) खल करावा. अफीणीचा काढा सरतो तोंच गुलाबपाणी घालून खल ६ दिवस करावा. ६ दिवसांनंतर पारा आंत मिळून जाऊन त्याची चमक नाहींशी होते. नंतर मसूरप्रमाणें गोळी बनवून, छायाशुष्क करून ठेवावी. नंतर १ गोळी सकाळीं, १ रात्रीं नवटांक दुधाबरोबर (५–६ तोळे दूध निदान तरी) गिळावी (प्यावी). याचा अनुभव खाणारा असेल तोच सांगेल. ७ दिवसांत अत्युत्तम अनुभव येतो. चित्त प्रसन्न होतें. जाहिराती औषधें यापुढें टिकणार नाहींत.

५००. **विषमज्वर, एकांत्रा, थंडीताप, अंतरिक, चातुर्थिक ज्वरावर :** सोमल १ तोळा (पांढरी), तुरटी १० तोळे, दोहोंचें निरनिराळें चूर्ण करून शरावांत खालीं ५ तोळे चूर्ण तुरटीचें घालून मध्यें सोमलचूर्ण ठेवून वर पुन्हां, तुरटी ५ तोळे चूर्ण घालून, दाबून शराव घालून, मातकापड करून, पांच पावशेर (१। शेर, म्हणजे १०० तोळे), शेणींत ठेवून भस्म करावें. नंतर थंड झाल्यावर काढून बाटलींत ठेवावें. मात्रा ·॥· गुंज ते १ गुंजपर्यंत तापाच्या पूर्वी १ तास खडीसाखरेच्या भुकींत देणें. आल्याच्या रसांत महाश्वास बरा होतो. **पथ्य**— तेल, मिरची, आंबट वर्ज्य. परीक्षा करून अनुभाविक योग आहे.

५०१. **खोकला, चामडीचे रोगांवर :** मल्लभस्म सोमल श्वेत १ तोळा, शुद्ध चुनकळी १ तोळा, दोन्ही कोरफडीच्या रसांत चांगल्या प्रकारें (दगडींत) घोटून टिकल्या बनवून, कटोऱ्यांत घालून, मातकापड करून, सुकवून ४ शेर पक्क्या शेणींत ठेवून फुंकावें. भस्म स्वांगशीत घ्यावें, तूप–दुधांत १ तांदुळ-मात्रा देणें. अनुभवित.

५०२. **वातव्याधी, ज्वर, उपदंश, वगैरे अनेक रोगांवर :** कलमी सोरा, शिंपीचा चुना अगर शौक्तिक, पांढरा सोमल स्वागीखार (टंकण) लाही, प्रत्येक २ तोळे नवसागर १६ तोळे, सर्व बारीक करून ८ तोळे रुईच्या चिकांत खलून २–२ तोळ्यांची चकती (डिकडी) बनवून सुकवावी. संपुट करून मातकापड चांगलें करून सुकवून २॥ शेर पक्क्या शेणीची आंच द्यावी. म्हणजे भस्म तयार होतें. मात्रा १ रती–अर्धी रत्ती, अनुपान उपयुक्त योजून द्यावी. अर्धांगवात, उपदंश, वातव्याधी, गढ्यावात (संधिवात वगैरे) जीर्ण ज्वर, नवज्वर, सन्निपात, परमा

आदिकरून नष्ट होतात. हें रोग निर्मूल करण्यांत अद्वितीय आहे. न्युमोनियांत हें भस्म फार फायदा करतें. घाम काढून ताप हटवितें. मूळव्याध, गलगंडावर उपयोगी आहे. (हा अनुभविक योग काशीकडील वैद्य देवदत्त, गुरुदासपूर येथील रघुराजसिंह वैद्य हे प्रशंसा करतात.)

५०३. **वीर्यवृद्धीवर :** साधा मादक पदार्थ— त्रिफळा १० गुंजा, प्रवाळभस्म ५ गुंजा, कबाबचिनी २ गुंजा, वंशलोचन ५ गुंजा, कीकरचा ५ गुंजा, वेलची ३ गुंजा, (कीकरचा— भाजलेला गोंद) एकूण ३० गुंजा मधाबराबर चाटणें. वर दूध प्यावें, वंग च्यवनप्राश, चंद्रप्रभा याबरोबर दिली असतां फार फायदा होतो. अनुभव उशिरा पण चांगला.

५०४. **फिरंग, उपदंश यांजवर** (अद्भुत मलम) : रसकापूर ·॥· तोळा, मुरदाडशिंग ·॥· तोळा, खैरसाल ६ तोळे, कापूर ·॥· तोळा, मोरचूत १ मासा, सर्व खलून व्हॅसलिन अथवा लोणी घालून मलम तयार करून ठेवावें. उपयोग उत्तम होतो. अनेक चट्टयांवर गुण येतो.

५०५. **उपदंश गर्मीवर :** पांढरा सोमल ६ मासे, रसकापूर १ तोळा, डालचिकणा १ तोळा, रुमी हिंगूळ १ तोळा, सर्व बारीक करून तीन दिवस ब्रँडीमध्यें खलून त्याच्या चकत्या बनवून सुकवून शराव २ सारखे घेऊन एकांत ठेवून वर झांकण घालून संधिलेप उत्तम करून मातकापड करून बोरीच्याच लांकडानें मंद अग्नि ४ तास द्यावा. बोटाएवढीं २ लांकडें खालीं ठेवून अग्नि द्यावा. ४ तासांनीं अग्नि बंद करून निवाल्यानंतर उतरून हळूच वर लागलेलें सत्त्व काढून घेऊन बाटलींत ठेवावें. लोणी किंवा मलईत १—२ तांदूळभार द्यावें. **पथ्य**— ठेवावें. दूध जास्त प्यावें. गरमी, निर्बलता झालेल्या शेंकडों लोकांना गुण आला.

५०६. **मुळव्याध मोडाची :** सोमल १ तोळा, चवळईच्या भाजीच्या रसांत २ घंटे दोलायंत्रानें शिजवून शुद्ध करून त्यांत शंखजिरें ६ मासे, कापूर ३ मासे घालून पाण्याबरोबर खलून वटी बनवून ठेवावी. शौचास जाऊन आल्यानंतर मोडास पाण्यांत उगाळून नेमकी लावावी. याप्रमाणें ३ दिवस लावून ३ दिवसांनीं मोड बाहेर फुलून येईल. नंतर त्यावर दहींभात कालवून ७ दिवस लावावा. पान लाऊन लंगोटी लावावी. मोड साफ गळून पडतील. मात्र पहिल्या दिवशीं जिथें उगाळून लेप केला तिथेंच करावा. दुसऱ्या ठिकाणीं करूं नये. मोड पडल्यानंतर खळग्यांत मलम भरावयाचें तें ४ तोळे तूप, १ तोळा मेण, शेंदूर (सिंदूर) ६ मासे, पारा १ तोळा, याप्रमाणें घेऊन तूप पातळ करून नंतर मेण सोडून, नंतर सर्व घालून तें मिश्रण तांब्याच्या थाळींत, तांब्याच्याच लोटीनें घर्षण करून तीन तास घोटून डबींत ठेवून घ्यावें. या विकारानें वरील मोड पडलेल्या जाग्यास लेप करावा. भरून येईल. अनेक ठिकाणीं वातार्श, रक्तार्श, पित्तार्श वगैरेवर अनुभूत योग आहे.

५०७. रक्त पडणें बंद होण्यास : कडवा सुरण ५ शेर घेऊन त्यांत १ शेर तुरटी सुरणास भोंक पाडून त्यांत भरून मातकापड करून २० शेर पक्क्या शेणीच्या आंचींत भस्म करणें. सुरण मडक्यांत भरावा, व मग झांकण घालून मातकापड करून गोवरींत मडकें ठेवणें. तें भस्म रक्त पडणें लगेच बंद करतें. दह्याच्या मलईत रोज २–३ वेळां द्यावें.

५०८. योषापस्मार (हिस्टेरिया) : १ तोळा जटामांशी, १ तोळा रुईचें फूल, २ तोळ्यांच्या ४ पुड्या करून १ पुडीचा काढा २ वेळां कापराचा वास लावून अगर हिंग घालून देणें.

५०९. स्त्रियांचे आर्तव नष्टता वगैरे विकारांवर : ताम्रभस्म सोमनाथी व अशोकारिष्ट रोज एक महिना दिल्यानें आर्तवजनित शूल वगैरे नष्ट होतात.

५१०. पाऱ्याची गोळी : हिंगुळांतील पारा नाकशिंकणीच्या रसांत १ प्रहर खलून नाकशिंकणीच्या लगद्यांत बंद करून मातीचें मातकापड शरावात बंद करून पांच शेर गोवऱ्यांचें पुट द्यावें. थंड झाल्यावर पारा काढून ३ तास लिंबाच्या रसांत ठेवावा, म्हणजे गोळी होते. ही गोळी १ तास दुधांत ठेवून, गोळी काढून दूध द्यावें. २१ दिवस घेतल्यानें अनुभव आला.

५११. मुळव्याधीवर : सुरण अर्धा शेर घेऊन तुकडे करून सुकवून कुटून चूर्ण करून, चूर्णावरोबर सफेत खडीसाखरेची भुकी मिश्र करून १ तोळा सकाळीं–सायंकाळीं पावशेर गाईच्या दुधावरोबर घ्यावें. अर्शावर उत्कृष्ट आहे.

५१२. निर्बलता, श्वास, वात वगैरेवर ताम्र भस्म विधि : पारा शुद्ध १ तोळा, हिंगूळ १ तोळा, सोमल १ तोळा, तीन्हींचा खल धोतऱ्याच्या ११० फुलांच्या रसांत खल करून, १० दिवस रोज १०–११ फुलांचा रस काढून, खल करून नंतर फुलांचा चोथा राखून ठेवावा. नंतर लहान लहान वड्या करून वाळवून ठेवून तांब्याच्या डबींत (तांबें शुद्ध असावें) ठेवून धोतऱ्याच्या फुलांच्या लुगदींत ठेवून मातकापड करावें. प्रत्येक वेळीं वाळवून ७ मातकापडें करावीं. नंतर १ मण रान-शेणीचें गजपुट द्यावें. थंड झाल्यावर भस्मसहित डबी वांटून, पुटें करावीं. त्याचें वजन पूर्ण अगर २ मासे कमी होईल. भस्मांत काहीं कमी राहिलें असल्यास पुन्हां धोतऱ्याच्या फुलांच्या रसांत घोटून १ गजपुट द्यावें. म्हणजे उत्कृष्ट भस्म होईल. अनुपान लोणी अगर मलई, मात्रा १ अगर २ तांदूळ १५ दिवस खावें. नपुंसकता, अशक्तता, श्वास, वात, वगैरेंवर अनुपानभेदानें द्यावें. सर्व रोगनाशक आहे.

५१३. नपुंसकता, उपदंश यांवर : कज्जली (पारा, गंधक १–१ तोळा), सोमल रस १ तोळा, कापूर १ तोळा सर्व बरोबर रिठ्याच्या टरफलाचें पाणी करून ८ प्रहर खलून तांब्याच्या डबींत मातकापड करून १२ प्रहर वालुकायंत्रांत आंच द्यावी. उपदंश, नपुंसकता यांवर लोणी, मनुका, मलई वगैरेंबरोबर द्यावें.

५१४. **नपुंसकतेवर** : अफू ३ मासे आल्याच्या रसांत घोटून १ तोळा रुमी हिंगुळाच्या खड्यास लेप करावा व वाळल्यानंतर सोमल ३ मासे आल्याच्या रसांत खलून अकूवर पुन्हा लेप करून तारांनीं बांधून १। शेर (पक्का) तुपांत बोरीच्या लाकडाच्या मंद अग्नीवर तूप सर्व संपेपर्यंत ठेवून उतरावें. मात्रा १ तांदूळ लोण्या-बरोबर देणें.

५१५. **स्तंभन गुटिका** : समुद्रशोषाचें बीं १ तोळा, धोतऱ्याचें बीं शुद्ध १, तोळा, जायपत्री ३ तोळे, जायफळ १ तोळा, खुरासनी ओंवा ३ तोळे, शुद्ध अफू ६ मासे, भांग १ तोळा सर्व कुटून, पोस्ताच्या काव्याची १० कापडभावना देऊन, धोतऱ्यांच्या बियांच्या तेलांत खलून २ गुंजेची गोळी करावी. दुधाबरोबर खावी.

५१६. **कृष्ण प्रमेहनाशक, शक्तिवर्धक** : अश्वगंधा, वरधारा चूर्ण, समभाग घेऊन ३ मासे दुधाबरोबर नित्य सेवन करणें. हें शौचास साफ करणारें आहे.

५१७. **शक्तिवर्धक** : कवचबीज, तालीमखाना, बरोबर साखर घालून, दुधावरोबर घेणें.

५१८. **मुख सुगंधी गुटी** : जायफळ, कापूर, लवंग, वेलची, दालचिनी, कस्तुरी प्रत्येकीं ४ मासे, गुलाब पाण्यांत खलून गोळी करून तोंडांत धरावी.

५१९. **दांत साफ राहण्यास** : बाभळीचा कोळसा १० तोळे, काजूफळ ५ तोळे चूर्ण, रुमामस्तकी ५ तोळे, कायफळ १ तोळा, कात ५ तोळे, सुपारीची राख ५ तोळे, कापूर देशी २ तोळे, वेलचीदाणे १ तोळा, सैंधव ५ तोळे या सर्वांचें चूर्ण करावें. व कांहींही खाल्ल्यानंतर यानें दांत घांसावे. साफ दांत होऊन कीड व दंतरोग नाहींसे होतात. सदरहू चूर्णांत बकुळीची साल ५ तोळे, व कोरंट्यांचें पंचांग ५ तोळे घालावें. म्हणजे उत्तम दंत-धावन झालें.

५२०. **केस काळे करण्यास व शक्ति येण्यास** : तिळाचें तेल १ शेर, माक्याचा स्वरस १ शेर, आंवळ्याचा स्वरस १ शेर घालून १५ तास आंत मुरवावा. नंतर उन्हांत ठेवून अगर चुलीवर मंदाग्नीनें फक्त तेल राहीपर्यंत कढवून तेल थंड करून गाळून त्यांत ओटोरोज १–३ ड्राम, जैतून तेल २ ड्राम, जेस्मिन एथर २ ड्राम, बदाम तेल ४ औंस, याप्रमाणें घालून तेल ठेवावें. म्हणजे असमयीं केस पांढरे होतात त्यांजवरही उत्तम. हें तेल रोज लावल्यानें केस अगदीं काळे राहतील. याबरोबर शड्गुण बलिजारित मकरध्वज ३ मासे १ तोळा काळ्या माक्याचें बीज मिश्र करून २-३ गुंजप्रमाण खाल्ल्यास (मलई, मध वगैरेंत) शक्ति-ही उत्तम येईल.

५२१. **हाडी ज्वर निघण्यास** : त्रिफळा ५ तोळे, कुटकी ५ तोळे, कडू-निंबाचीं सुकलेलीं पानें ५ तोळे, किराईत १५ तोळे, एकूण ३० तोळे सर्वांचें चूर्ण करून रोज एक तोळा सकाळीं फकी मारून थंड पाणी प्यावें. पाणी बरेंच प्यावें.

१०-१५ तोळे. गरम पाण्यानें जुलाब होतील. करितां एक-दोन दिवसांनी गरम पाणी मध्येंच प्यावें.

५२२. **अशक्तता (नपुंसकता) वगैरेवर** : २० तोळे वेलची चूर्ण (बियांचें वेलचीचे दाणे काढून), २० तोळे वंशलोचन, दोन्हींची पूड करून रोज रात्रीं पाव तोळा दूध—खडीसाखर घालून घ्यावें. दूध थंड करून घ्यावें. सकाळीं त्याचप्रमाणें पाव तोळा घ्यावें. रोज दोन वेळां घ्यावें.

५२३. **उत्तम शक्तिवर्धक** : ब्रह्मदंडीचा वेल असतो. (उटकटारीचें झाड असतें.) ब्रह्मदंडीचें मुळामुद्धां चूर्ण २० तोळे, तर मिऱ्याचें (काळें मिरें) चूर्ण ५ तोळे, घालून रोज १ तोळ्याचें मिश्रण २ तोळे पाण्यांत पत्तीप्रमाणें (थंडाईप्रमाणें) प्यावें. प्रकृती चांगली होईल.

५२४. **केस काळे होण्यास** : माका रस तोळे २, सोनामुखीच्या पाल्याचें चूर्ण ·।· तोळा, मिश्र करून रोज सकाळीं घ्यावें. ६ महिन्यांनीं केस काळे होतात.

५२५. **बल, आनंद, पुरुषार्थ वाढविणारी, शीघ्र पतनचा शत्रू, वृद्धास तरुणत्व देणारें व स्तंभन करणारें भस्म** : दोन मोठ्या सारख्या शिंपा घेऊन एका शिंपेंत २॥ तोळे आंवळसार गंधक पसरून त्यावर पारा ५ तोळे (शुद्ध) घालून, त्यावर २॥ तोळे गंधक घालून, वर शिंप बसवून चांगलें मात-कापड करून, सुकवून १५ धान्यांच्या मुसांत भाताच्या फोलांत (पक्के १५ शेर) ठेवून आंच द्यावी, स्वयंशीत झाल्यावर काढून पाऱ्याचें भस्म घ्यावें. १ तांदुळापासून अर्धी गुंज लोणी किंवा मलईतून देणें.

सालममिश्री २० तोळे, तालीमखाना ५ तोळे, वेलची २ तोळे, सफेत मुसळी, बळी ३ तोळे, तुलमलंगा, गोखरूं, दालचिनी, वंशलोचन, गुळवेलसत्त्व, निशास्ता, गव्हाचा मैदा, रुमीमस्तकी ५–५ तोळे; केशर, कापूर, लवंग ३–३ मासे, कासनी ५ मासे, बडीशेप १० मासे, जायफळ १० मासे, जायपत्री १० मासे, सुपारी ५ मासे, गुलाबफूल ५ मासे, मोचरस ५ मासे, बदामगर, द्राक्ष, खारीक २–२ तोळे, धने ७ मासे, कस्तुरी ६ मासे, साखर २ शेर, दूध खवा ३ शेराचा, पाकविधीप्रमाणें करून वड्या पाडाव्या. १६० तोळे.

५२६. **स्तंभक, अशक्ततेस उत्तम, पुष्टिकर योग** : सफेद कण्हेरीच्या मुळाची साल २ तोळे, बारीक करून २॥ शेर दुधांत मिळवून तापवून दहीं विरजून त्याचें लोणी करून, रात्रीं विड्याचें पान घेऊन त्यांत थोडें खावें. वर गरम दूध प्यावें.

५२७. **अर्दितवात, गृध्रसी, व अर्धांगवात वगैरेंवर** : रुईचें मूळ, अनंतमूळ, किराईत, देवदार, रास्ना, वेखंड, टाकळ्याचें मूळ, शेवग्याची साल, सुंठ, मिरें, पिंपळी, पिंपळमूळ, वेखंड, चित्रक, माका, प्रत्येकीं १॥–१॥ तोळा घेऊन, ७ पुड्या, मध घालून ७ दिवस काढा उडदाचे वडे अळणी तुपांत तळून लोण्याशीं खावे.

५२८. **मोतीबिंदू, सारा, जाळें, पडदा, फूल वगैरेंवर डोळयांचें औषध** : सोरा (कलमी सोरा), नवसागर दोन्ही समभाग घेऊन, एका हंडींत ठेवून वर दुसरी हांडी बरोबर बसवून सांध्यास मातकापड करून चुलीवर ठेवून बोरीच्या लांकडाचा २ दिवस विस्तव ठेवावा. म्हणजे त्याचें सत्त्व वर लागेल, तें बाटलींत ठेवून घ्यावें. रोज सळईनें डोळ्यांत २ वेळां लावावें. अगर गुलाबपाण्यांत मिसळून २ ठिपके डोळ्यांत सोडावें.

५२९. **वातनाशक तेल** : ५ तोळे कुचला, २० तोळे तुपांत तळून शिळ्या बिया झाल्यावर काढून टाकून त्या तुपांत २० तोळे आटा, २० तोळे पिठी साखर मिसळून चांगला लाडवाप्रमाणें भाजून खमंग झाल्यावर उतरून ठेवून डब्यांत ठेवून रोज थोडें थोडें खावें. **वातविकार** जातात. सदरहूप्रमाणें ५ तोळे कुचला, २० तोळे तेलांत तळून (तेल शिरसाचें, अळशीचें, तिळाचें, वगैरे.) तयार होईल.

५३०. **मेंदूविकार, झोंप यांवर** : बदामगर ७, मिरें ७, वेलदोडे ७, रात्रीं पाण्यांत भिजत घालून त्याच पाण्यांत सकाळीं वांटून भांगेप्रमाणें (साखर वांटून) गाळून रोज पिण्यास द्यावें, म्हणजे मेंदुगत विकारांवर उत्तम झोंप येईल. गरम पाण्यांत गळ्यापर्यंत १५ ते ३० मिनिटें टबांत बसून नंतर अंग पुसून गाईचें दूध प्यावें. मज्जातंतु बरे होतील. रुधिराभिसरण साफ होईल.

५३१. **मस्तकभ्रम, वेड, उन्माद यांवर** : महाळुंगामधील फक्त आंबट गरांत सांबरशिंगाचा तुकडा घालून मोठें पुट द्यावें म्हणजे भस्म होतें. तें (मृगशृंग) भस्म माशीच्या पंखाइतकें सूक्ष्म जिभेवर सोडून वर पाणी पिण्यास द्यावें. याप्रमाणें ४-५ दिवस १-२ वेळ रोज करावें.

५३२. **अनेक प्रकारच्या तापांवर** : धोतरा काळा किंवा सफेत त्याचें
फळ, लवंगा, वावडिंग, आलें (कच्चें) घेऊन त्यांत ५-६ लवंगा टोंचून त्या
फळांस मातकापड करून (१-२) अर्धा तास गोवऱ्यांची नरम आंच देऊन, मात-
कापड काढून, लवंगासुद्धां खलून (सर्व पाळ आंतील, बाहेरील) गोळी मुगापेक्षां
मोठी गोळी करून ठेवावी. पिठीसाखरेबरोबर रोज २ गोळ्या घेणें. गरमी वाटून
घसा सुकेल तर तूप थोडेंसें द्यावें, म्हणजे उतार होईल.

५३३. **दमा, मधुमेह जाऊन शक्ति येण्यावर** : कोरफडाचा गर काढून,
त्यांत सैंधव, जिरें, हळद, मिरें, वगैरे घालून, तुपांत तळून, रोज खावयास द्यावें.
म्हणजे दमा बसतो. याच अनुपानांतून लोह वंगेश्वर माक्षिक द्यावें. म्हणजे मधुमेह,
शर्करामेह जातो. शक्ती चांगली येते. तुपावर तळलेलें द्यावें.

५३४. **हाडीज्वर, शक्ति यांवर** : लसणीच्या दोन कांद्यांतील अगर एक
कांद्यांतील बिया सोलून रात्रीं २०-२५ तरी बिया दुधांत चांगल्या शिजवून निजते
वेळीं घ्याव्या, बिया खाऊन वर दूध प्यावें. साखर उकळतांना घालावी. यांत जरूर
तर प्रवाळभस्म घालावें.

५३५. **उत्तम शक्तिवर्धक** : बाभळीचा पाला दोन तोळे वांटून, भांगे सारखा गाळून, पाण्यांत साखर घालून मिळवून पिण्यास द्यावें. रोज वर दूध घ्यावें.

५३६. **ताम्रभस्म** : (१) ताम्रास कोरफडींचीं पुटें द्यावीं. पत्रा करून अगर शुद्ध करून म्हणजे अस्मानी रंगाचें भस्म होतें. रोज पुट लव्हाळ्याचें, कोळशाचें अगर शेणीचें चालेल. (२) तेजाबांत लाल करून विझवून अगर न विझवतां ७ वेळां रुईच्या चिकांत विझवून कुत्रा नामक गवताच्या लुगदींत भस्म होतें. अनुभूत.

५३७. **पौष्टिक भस्म** : कडूनिंबाचा रस काढून, त्यांत पारा खलून, गोळी करून, निगडुंगाचा तुकडा उभा करून त्यांत भोक पाडून गोळी भरून वर चुरा बसवून मातकापड करून गजपुट द्यावें.

५३८. **शारीरिक व मानसिक शक्ति, मेंदू , हृदय, यकृत, मूत्ररोग इत्यादींवर अत्यंत गुणकारी (रजत अवलेह)** : शुद्ध पारा व शुद्ध आंवळसार गंधक २—२ तोळे घेऊन ३ दिवस एकसारखे खलून कज्जली करावयाची.नंतर शुद्ध चांदीचा चुरा १ तोळा घेऊन, त्यांत मिळवून ३ दिवस लिंबाच्या रसांत खलून टिकडी बनवावी. नंतर कांटेवाली चवराई (कांटेमाठ) त्यांत २० तोळे लुगदी करून त्यांत ठेवून कापडमात करून १६ शेर पक्क्या शेणींत गजपुट द्यावें. (रानशेणी उत्तम) अत्यंत उत्तम भस्म होतें. मात्रा १ ते ४ तांदूळ २ तोळे लोण्यांत द्यावें. रोज दोन वेळां घेतलें तर चांगली वीर्यवृद्धि होते. साधारण स्त्रीपुरुषांनींसुद्धां ८० दिवस सेवन केलें तर खास संतती होईल. प्रमेदावर गुणकारी.

५३९. **बलवंत होण्यास (वसंततिलक रस) धातुवृद्धि, हृदय, मस्तिष्क, आमाशय, यकृत, मूत्राशय, वृक्कद्वय, शिस्नेंद्रिय वगैरे** : शुद्ध पारा १ तोळा, शुद्ध आंवळसार गंधक १ तोळा, ४ प्रहर घोटून कज्जली करून स्वर्णभस्म १ तोळा, कृष्ण अभ्रक भस्म २ तोळे, वंगभस्म २ तोळे, लोह ३ तोळे, प्रवाळभस्म ४ तोळे, अनविंद मोती ४ तोळे, या सर्वांचा गोखरूंच्या घट्ट काढ्यांत किंवा ओल्या गोखरूंच्या रसांत खल करून शराव संपुष्ट करून (मातकापड वगैरे) १ शेर रानशेणीचें पुट द्यावें. पारा उडूं नये म्हणून लघुपुट असावें. याचप्रमाणें ७ पुटें (गन्नारसाचीं) व नंतर ७ पुटें अडुळसा रसाचीं द्यावीं. नंतर काढून ४ तोळे कस्तुरी नेपाळी, भीमसेनी कापूर ४ तोळे, मिळवून कांचेच्या शिशांत ठेवून द्याव्या. मात्रा १ गुंजा ते २ गुंजा, मध-खडीसाखर, तूप यांत देणें. (गन्ना म्हणजे ऊस.)

५४०. **आर्तवदोष, पोट फुगणें वगैरे** : करंजसाल ३ तोळे, देवदार ३ तोळे, भारंगमूळ ३ तोळे, तीळ २ तोळे, सुंठ २ तोळे, यांचा काढा जवखार, सैंधव वगैरे घालून अगर हिंग, पांदेलोण घालून द्यावा.

५४१. **तापावर** : (१) किराईत, कडूनिंबसाल, सात्विण, कडू पडवळ, कटुकी, यांचा काढा तापावर उकळून ठेवून द्यावा. रोज २—३ वेळ मीठ, नवसागर, सैंधव वगैरे घालावें. (२) आघाड्याच्या काड्या अगर मूळ, काळें जिरें, हळद,

बडीशेप यांचा काढा कफ पडण्यास द्यावा. व तापही कमी होतो. त्यांत रक्तरोडा वगैरेचा काढा घालून द्यावा. सदरहू काढा न्युमोनियांतही चालतो. जवखार घालून द्यावा. करंजसाल, स्त्रियांच्या रोगांत ज्वरांत वापरावी.

५४२ **पीनसावर :** केवड्याचा भुस्सा आंतील काढून नाकांत ओढावा, तपकिरीबरोबर.

५४३. **मूळव्याधीचे मोड ठणकण्यावर :** ताबडतोब गुण येण्यास खारकेच्या बिया बारीक ठेंचून, निखाऱ्यावर धुरी द्यावी. तसेंच केवड्याच्या कणसाच्या भुश्याची धुरी द्यावी.

५४४. **चाळणपुळी, फोड, व्रण, वगैरेतील पुवावर :** पारिजातकाची साल पाण्यांत उगाळून रोज लेप करीत जावा. साबणानें धुवून पुन्हा पुन्हा लेप करीत जावा. चाळणपुळी वगैरेवरसुद्धां तसेंच सहस्रघृत करून त्यांत पारिजातकाच्या पाल्याचा स्वरस घालून द्यावा. व तें घृत इसबावर आधीं पिकलेलें केळें बांधून वर चोळावें. म्हणजे इसब वगैरे किडवळ नाहींसा होतो.

५४५. **गरोदरपणांत नासवणाऱ्या बायकांस :** गोखरूंचा काढा १ तोळा करून नवटांक दुधाबरोबर रोज द्यावा. म्हणजे नासवत नाहीं. साखर घालावी.

५४६. **परम्यावर :** सागरगोटीचा पाला ओला घेऊन, त्याचा २ तोळे रस काढून, तूप व साखर घालून पिण्यास द्यावा. रोज सकाळीं एकदां किंवा दोन वेळां याप्रमाणें तीन दिवस द्यावा.

५४७. **आमांशावर :** शंखजिरें बारीक करून वस्त्रगाळ पूड १ पावली-भार, व तूप साजूक १ तोळा, याप्रमाणें रोज २ पुड्याप्रमाणें ३ दिवस द्यावा.

५४८. **जीर्णज्वरावर :** डाळिंबाच्या रसांत हजरत बोर उगाळून रोज द्यावें.

५४९. **गरमीवर :** वनस्पतीचें उत्तम औषध कांटेधोतऱ्याची सत्यनासी मुळी कुटून १॥–२ तोळे रस काढून, तुपांतून तो रस रोज, सकाळीं एकदां या प्रमाणें ११ दिवस देणें. **पथ्य–** फक्त गव्हाची चपाती, व तूप खावयास द्यावें. खाण्याची दुसरी वस्तू कोणतीही खावयाची नाहीं. पाणी चालेल. या उपायानें कोणतीही गरमी साफ नाहींशी होईल.

५५०. **हिंवतापावर :** काळें मिरें ५ तोळे, कडूनिंबाची काडी ४० तोळे ओली घेऊन त्याचा रस काढून, अगर काढा करून, तो गरम (लाल) मडकें करून त्यांत ओतावा. मडकें ताटांत ठेवावें. रस उसळून जातांच ताटांत पडेल तो द्यावा. रोज २-२ चमचे ४-५ दिवस द्यावा. दूध पिण्यास द्यावें. थोडा भात खावा.

५५१. **बधिरत्व व कान वाहणें यावर :** निर्गुंडी, जाई, माका, शेवगा, तुळस, रुई, कापशी, कारली, आलें, या सर्वांचा रस ४–४ तोळे व बचनागाचें चूर्ण ४ तोळे, व २० तोळे तिळाचें तेल सर्व एकत्र करून कढवून तेल फक्त राहि-ल्यावर उतरून तेल गाळून ठेवावें. हैड्रोजन-पॅरॉक्साइड आणून कानांत २–४ थेंब

घालून कान पुसून काढावा, व रोज वरील तेल ४–४ थेंबांप्रमाणें कानांत घालावें. कान वाहणेंही कमी होत जाईल.

५५२. **महाकुष्ट, रक्तदोष यांवर तालकेश्वर रस :** ४ तोळे शुद्ध हरताळ (पत्री), १ तोळा बचनाग, अंकोळाच्या मुळाच्या रसांत खल करून, टिकिया (चकत्या) कराव्या. वाळवून हांडींत पळसाची राख भरून मध्यें चकत्या ठेवून वर दाबून दाबून पुन्हा राख बसवावी. पळसाची राख न मिळाल्यास आघाड्याची राख घ्यावी. शराव संपुट उत्तम करून कापडमाती ४–५ वेष्टणें करावीं. वाळवून २४ तास क्रमानें मंद, मध्य, तीक्ष्ण, अग्नि द्यावा. स्वांगशीत झाल्यावर काढून ४ तोळे भस्म तोलून घ्यावें. २–३ गुंजा रोज देणें. अनुपान बांवचीच्या तेलांतून ४० दिवस द्यावें. दुधावर ४० दिवस राहावें.

५५३. **कफक्षयावर :** १०० तोळे अभ्रक पुटें देऊन जवळ जवळ निश्चंद्र होईपर्यंत नंतर ७ पुटें हिंगूळ घालून द्यावीं. १०० तोळे अभ्रकास १० तोळे हिंगूळ दर वेळीं घालून कोरफडांत खलून, वाळवून पूट देणें अशीं ७ पुटें द्यावीं. उत्तम होतो. कफक्षयावर वापरण्यास सोमल घालून पूट द्यावें. १ रत्तलास ५ तोळे सोमल दर वेळीं घालून पूट द्यावें. अशी ३–४ पुटें द्यावींत. ताम्रपत्रा एक रत्तल घेऊन किंवा पाहिजे तेव्हढा घेऊन दुप्पट सैंधव घेऊन, तें लिंबाच्या रसांत खलून पत्र्यावर लेप द्यावा, व पत्रा १० दिवस वाळवावा. नंतर हिरवा भाग कापून टाकून गरम पाण्यानें विटाच्या तुकड्यांनी घासून धुवून पत्रा घ्यावा. नंतर चिंचेचा बलक व ताक यांत १० दिवस भिजत ठेवावा, नंतर साफ करून त्याचे तुकडे बारीक करून, १ रत्तल पत्र्यास आंवळसार गंधकाची भुकी ५ तोळे घेऊन परळांत पत्रा ठेवून त्यावर गंधक भुरभुर करून थोडाथोडा पेरावा. पुन्हां पत्रा ठेवावा. त्यावर पेरावा, याप्रमाणें करून कोरडा पत्रा व गंधक झांकून ८ दिवस ठेवावा. पुन्हां ५ तोळे गंधक घेऊन पत्र्यावर पहिल्याप्रमाणेंच पेरून लहान कुकुटपूट गोवरीनें वगैरे द्यावें. नंतर थंड झाल्यावर काढून १ रतल पत्र्यास २० तोळे सोमल घेऊन, पैकीं १० तोळे सोमलची पत्र्यांवर भुकी करून पेरून, पुन्हां कुकुटपुट द्यावें. तें पूट मैदानांत वगैरे द्यावें. घरापाशीं वगैरे देऊं नये. पुन्हां आणखी १० तोळे सोमलाचें पेरून तसेंच पूट द्यावें. मग काढून गोड्या एरंडाच्या पाल्याच्या रसाचें गजपुट द्यावें. अशीं दोन पुटें द्यावींत. पुढें कुकरंधा (गंगावती), टोमॅटो, गुलाबफूल, सुरण, आलें, हळद, पळसाचीं ओलीं फुलें, केशर, जायफळ, जायपत्री, मिश्रण शेवटीं करून त्यांत केशर घालून ताम्र भिजून वाळवावें, नंतर साधारण पुट द्यावें. भस्म तयार होतें.

५५४. **पन्ना लोरमणी वगैरे रत्नांचे भस्म :** (हिऱ्यांची जात) माणिक वगैरे सर्व रत्नांचा मारणविधी प्रथम निवडुंगाचा तुकडा घेऊन त्याचे दोन भाग उभे चिरून त्यांत वरीलपैकीं रत्नें भरून भाग जमवून वर मातकापड करून वाळवून पूट द्यावें. कोळशाचें पूट चालेल. (अर्धा मण कोळशाचें) पूट दिल्यानंतर काढून

पुन्हा निवडुंगाचा चीक काढून त्यांत भिजून, खलून, वाळवून लोखंडाच्या कढईंत खालीं विस्तव करून (कोळशाचा) कढई एकदम लाल होईपर्यंत पूट द्यावें (माक्षिक-प्रमाणें) सर्व रत्नें व भांडें लाल झालें पाहिजे. नंतर स्वांगशीत झाल्यानंतर काढून तापवून आल्याच्या रसांत विझवावें असें रेतीप्रमाणें बारीक होईपर्यंत विझवावें. आल्याचा रस पितळेच्या पातेलींत ठेवावा, आल्याचीं पुटें १०–१२ लागतील. मैद्याप्रमाणें बारीक व चमक नाहींशी होईपर्यंत पुटें लोहाच्या भांड्यांत तापवून आल्याच्या रसांत विझवीत जावें. चमक गेल्यानंतर सोनचांफ्याच्या फुलांत खलून लोखंडाच्या कढईंत ठेवून (उघडा) मातकापड केल्याशिवाय अग्नी करावा, रंग आल्यानंतर भस्म झालें. पांढुर-वट गुलाबी कबरा असा रंग येतो.

५५५. **पाऱ्याचें भस्म** : (१) पारा लिंबाच्या रसांत घोटून १ दिवस विटकऱ्याच्या चूर्णांत घोटून गाळून घ्यावा. वस्त्रांत पिळून नंतर केळीच्या कांद्याच्या रसांत २४ तास घोटून लुगदी करून, केळीच्या कांद्याचे दोन तुकडे करून आंत कोरून पारा भरून, भुसा वर घालून थोडा रस केळीचा घालून दुसरा तुकडा वर ठेवून मातकापड करून पूट द्यावें. गोळी या तुकड्यांत. (२) बेलाच्या झाडास विंधण्यानें भोंक पाडून ३ महिने पारा आंत टाकून ठेवावा, वर चुरा बसवून त्यावर माती वगैरे लावून ठेवावी.

५५६. **स्त्री-पुरुषांचे धातुगत विकार** : ओढौळ (जास्वंदीच्या कळ्या) ५ घेऊन गाईच्या दुधांत वांटून, आणखी दूध मिश्र करून, थोडा मध व चवलीभार खरें तिळाचें तेल मिळवून घ्यावें. म्हणजे स्त्रियांचा धातुक्षय, धुपणी वगैरे जातात, पुरुषांचे धातुगत विकार, स्वप्नावस्थादि दोष जातात. २१ दिवस घ्यावें. **पथ्य**– करावें. उष्ण पदार्थ खाऊं नयेत.

५५७. **हरताळ तेल** : कांचेच्या ग्लासांत आंत बसेल असा अभ्रक वाटोळा कापून बसवावा, त्यावर १ तोळा हरताळ, व ·।।· भार शरपुंखेचीं पानें चुरून वर पेरावीं. हरताळ बारीक पूड करावा. नंतर त्यावर पुन्हा अभ्रक बसवून मातीनें वर शरावाप्रमाणें वाटोळें लिंपावें व त्या शरावांत कोळसे पेटवून फुंकणीनें फुंकावें. म्हणजे हरताळाचें तेल अभ्रकाच्या बाजूच्या किनारींतून ग्लासांत उतरतें.

५५८. **हरताळ तेल** : ओल्याची नाकशिंकणी लुगदी करून त्यांत हरताळ १ तोळा घालावा, व ती लुगदी गाईच्या शेणांत गोळा करून ७ दिवस ठेवावी. म्हणजे आंतून फेंस येऊं लागेल. नंतर तो फेंस चमच्यानें कपांत भरून ठेवावा. फेंस येण्याचा बंद झाल्यावर आंतील हरताळ काढून घेऊन एका बाटलींत दुसऱ्या नाक-शिंकणीचा चुरा खालीवर घालून, मध्यें हरताळ घालून, व फेंस आंत घालून बाटलीस बूच मारून माती लावून २१ दिवस ठेवून द्यावें. म्हणजे बाटलींत तेल उतरतें.

५५९. **मेंदूला शक्ती येण्यावर** : खारीक ५ तोळे, अंजीर सुके ५ तोळे, बेदाणा ५ तोळे, बदामगर ५ तोळे, खडीसाखर ५ तोळे, आर्धा तोळा गुळवेल सत्त्व, ·॥· तोळा प्रवाळभस्म. वरील जिनस अगदीं बारीक कुटून सत्त्व मिश्रण करून त्यांत लोण्याचें तूप पावशेर अदमासें (२० तोळे), गरम असें घालून ढवळून एकत्र करणें. व अदमासें २–२ तोळ्यांचा लाडू बांधून ठेवणें, सकाळीं शौच-मुखमार्जन करून खाणें. रोज १ प्रमाणें. जरूर तर वर दूध घेणें. पाहिजेच असें नाहीं, मेंदूला शक्ती येते व सर्वसाधारण हुशारी येते, व वाढते.

५६०. **शौचास साफ होणें व पचनशक्तीवर** : (१) सैंधव ५ तोळे, पादेलोण ५ तोळे (संचलखार) एकत्र करून भुकी करावी. रुईच्या पानाच्या ७ पत्रावळी म्हणजे प्रत्येक पत्रावळीस २८ ते ३० पानें असावीं. म्हणजे ७ पत्रावळींस २१० पानें तरी असावीं. अशा चोईनें लावून (टोचून) पत्रावळी करून मग मडक्यांत खालीं पत्रावळी घालून, वर वरील सैंधव व पांदेलोणाची भुकी पेरून वर ३ पत्रावळी घालून, मडक्यांत वर झांकण घालून वर माती-शेणानें तोंड लिंपून २–२ तास शेणीची आंच द्यावी, व निवाल्यानंतर आत भाकरीप्रमाणें दामटी झालेली असते, ती काढून ठेवावी, व रोज जेवण झाल्यावर व नंतर ५ वजातां सायंकाळीं चिंचोक्या इतकें तें मीठ खावें. थंड पाणी वर घेतलें तर परसाकडे साफ होतें. गरम पाणी घेतलें तर जुलाब होतो. व नुसत्या मिठानें पचन चांगलें होतें. वारा सुटेल व पोट फुगणार नाहीं. रात्रीं दुधांत खारीक, खजूर, द्राक्षें, अंजीर, व सुंठ पावतोळा, खडीसाखर व तूप घालून कढवून द्यावें.

कांहीं जुन्या बाडांतील उतारे

५६१. **कुष्ठावर** : कोरफडाचा रस हिरवा, हळद, सैंधव, एकत्र करून रोज खावें.

५६२. **गंडमाळावर** : मध, गुग्गुळ, समभाग खावा.

५६३. **त्वचारोगावर** : वेखंड, चिकणा, हळद तेलांत घालून मुलांच्या अंगास लावावें.

५६४. **क्षयरोगावर** : पिकलेलीं रिंगणीचीं पानें ७, गाईच्या दुधांत अर्धवट फोडून शिजवून, दूध अर्धें करून, पानें काढून टाकून, १ लवंग कुटून घालून, मावा करून, मग खावा. **पथ्य**— साळीचा हलका भात, व १ शेर दुधाचें प्रमाण द्यावें. मावा करून दोन वेळ द्यावा. तूप खाण्यास द्यावें.

५६५. **कानांतील दडा सुटण्यास** : अक्कलकारा, लसूण, तिळवणीचें बी, निगडीचें बीं, तिळाच्या तेलांत तळून तेल तयार करून ठेवावें, व कानांत घालावें.

५६६. **तिडका कान फुटण्यावर** : सुंठ, सैंधव, पिंपळी, कोष्ठ, नागरमोथे, वेखंड, लसूण, रुईचीं पानें, तिळाच्या तेलांत तळून कानांत घालावें.

५६७. **कानांतील दडा सुटण्यावर :** वेखंडाची भुकटी कानांत भरावी, व बाहेरही चोळावी.

५६८. **श्वेतकुष्ठावर :** बांवच्याचें चूर्ण लोण्यांत खावयास द्यावें.

५६९. **रक्तशुद्धीवर :** शेतवडाच्या पानांत गंधक भस्म— शेतवड पानें ओलीं १६ तोळे, व गंधक शुद्ध केलेला (आवळसार गंधक) २ तोळे, वांटून लुगदी करून शरावांत घालून पूट द्यावें. एका रात्रींत चुलीवर भस्म होतें. मध, साखर, तूप, लोणी वगैरेंतून किंवा सकाळपासून रात्रीपर्यंत चुलीवर शरावांत मातकापड करून ठेवून खालीं विस्तव लावून भस्म होतें.

५७०. **शूळ, आमशूळ, आम्ल, पित्तशूळ, अजीर्ण, पोट फुगणें, उदावर्त वगैरेवर :** वातशूल, अजीर्णावर पिकलेलें केळें, वेलची, रसग्रोळ, वगैरे साल काढून एका केळ्यास १०–१२ ठिकाणी भोंक पाडून आंत मिठाचे लहान लहान खडे घालावे, अशी ५–७–१० केळीं तयार करून मडक्यांत किंवा शरावांत घालून मातकापड करून रात्रभर पुट द्यावें. कोळश्यांत अगर शेणींत भस्म बारीक करून २ गुंज ते ४–५ गुंजा मधांत वगैरे खावयास द्यावें.

५७१. **आमांश (मुलांचा अगर मोठ्यांचा) बंद होण्यास :** डाळिंबाची साल वाळवून, कुटून, चूर्ण करून, दह्यांतून साल उगाळून किंवा चूर्ण मिळवून रोज २–३ वेळां द्यावें.

५७२. **वातविकार व अपचनावर (शरावतीचें लोणचें) :** ओल्या शावरीच्या आंतील दोर काढून वरील साल बारीक तासून काढून, लहान लहान तुकडे अंगुळ अंगुळ करून बरणींत टाकावे. वर कागदी लिंबाचा रस ओतून काळें मिरें चूर्ण करून, हिंग थोडासा भाजून, कुटून, व मीठ घालून ठेवावें. मुरल्यानंतर जेवणानंतर रोज खावें. सकाळीं, दुपारीं, रात्रीं ताजें.

५७३. **अनेक कुष्ठांवर, महारोगावर :** सहदेवीचा पाला, आंवळसार शुद्ध गंधक, सुमारें दीड लिंबाइतका गोळा एकत्र खलून, व दोन लिंबांइतकें लोणी गाईचें अगर म्हशीचें त्यांत मिळवून चांगलें घोटून मिश्रण तयार झालें म्हणजे तें पातळ स्वच्छ अशा मलमलीच्या फडक्यांस चोळावें, व जरा वाळूं द्यावें. मग एका लोखंडाच्या सळईनें तें कापड लोंबत ठेवून खालीं पेटवावें व खालीं काचपात्र अगर कल्हईचें भांडें ठेवून फडक्यांतून पेटतांना गळणारें तूप भांड्यांत धरावें, व गाळून बरणींत ठेवावें. रोज पावलीभार एकदां सकाळीं खावयास द्यावें, व अंगासही चोळावें. यानें उत्तम देहशुद्धी व रक्तशुद्धी होते. ४० दिवस किंवा जास्त दिवस घ्यावें. **पथ्य—** दूधभात जेवावा.

५७४. **कायाकल्प, शरीर निरोगी होण्यास :** रात्रीं रोज झोपतेवेळीं हरडा साधा कुटून, साल काढून, चवळून खाऊन, वर गरम पाणी घोटभर प्यावें.

१४ वर्षें करावें. कायाकल्प होतो. कुटून वस्त्रगाळ करूं नये. शरीर तेज, शुद्ध, व निरोगी होईल. कमी होतें तर अर्धवट कुटून खावा.

५७५. **कानांतील व्रणावर :** सहदेवीचें तेल तयार करून द्यावें.

५७६. **मूळव्याधीचें रक्त पडतें त्यावर :** पांढरा कांदा पोखरून आंत थोडी अफू घालून चकती वर बसवून मातकापड करून मंदाग्नींत भाजून काढून, वांटून खल करावा. मध घालून चाटण करावें. रक्त बंद होतें. मोडास गंगावतीच्या पाल्याचा (भांबुर्डी) रस शौचास जाऊन येऊन चोळावा. रोज करावें. म्हणजे मोड नाहींसे होतात. अमरकांदा-चूर्ण गांठीवर लावावें. व रोज दुधांतून पोटांत घ्यावें. लहान गांठी बऱ्या होतात.

५७७. **ज्वर, रक्तशुद्धीवर :** हरताळभस्म, शेंदूर, पत्री हारताळ २ तोळे, अगर भस्म शुद्ध करणें तो चुन्याची कळी मडक्यांत घालून मध्यें हरताळ ठेवून वर पाणी ओतून १-२ रात्रीं ठेवावें. नंतर आंतील हरताळ काढून धुऊन शुद्ध होतो. तो पुढील भस्मांस वापरावा. हरताळ, पळसाच्या लाल फुलांच्या रसांत १५-१७-२१ दिवस घोटून चकती करून वाळवून संपुट करून शंभर शेणींत पूट द्यावें. शेंदूर तयार होतो. तें भस्मही रक्तशुद्धीवर द्यावें. ताप वगैरे जातो.

५७८. **रक्तशुद्धी, ज्वर, कृमी, अन्य ज्वर (क्षय) वगैरेंवर :** माका-पानें, सहदेवी पानें, मिरें सफेत, चूर्ण अगदीं घोटून-घोटून हरभऱ्याएवढ्या गोळ्या करून रोज १ गोळी दुधांत उगाळून द्यावी. प्रथम वरील तूप घ्यावें. नंतर ही गुटिका घ्यावी. अगर ताम्रबलाचूर्ण अगर चिकण्याचा दुधांतील काढा सुरू करावा. शेताडाच्या ओल्या पानांचा २ शेर गोळा त्यांत १ शेर आंवळसार गंधक घालून, वांटून (अगदीं बारीक) एकत्र गोळा करून गोळा अर्धा खालीं, त्यावर थोडा (·॥· तोळा) गंधक पेरून दुन्डा पैसा ठेवून त्यावर थोडा गंधक व अर्धा गोळा वर दाबून शरावसंपुट करून भस्म गजपुटानें करावें. ४—५ पुटांनी सफेद भस्म होत जाईल. अति उत्तम भस्म होतें. तांदूळभार घ्यावें; तूप, मध, लोणी वगैरे.

५७९. **महारोगावर** (चमत्कारिक कल्प) : जुनी ५—१० वर्षांची चिंच घेऊन, तिची कुटून गोळी करून तो गोळा काजऱ्याच्या जुन्या झाडास भोंक पाडून आंत भरावा. वर काढलेलें साल वगैरे बसवून वर मातीचा लेप करावा. ४८ दिवस ठेवून आंतील चिंचेचा गोळा काढून घ्यावा. रोग्यांस रोज त्यांतील १ गोळी २—४ गुंजेप्रमाणें खावयास द्यावी, पाण्याबरोबर याप्रमाणें महिना, दीड महिना घ्यावें. रोज एक वेळां फक्त. पू—रक्त वाहणें वगैरे सुकतें. त्वचा नवी चांगली येईल. असा अनुभूत कल्प आहे. **पथ्य—** दूधभात वगैरे जेवावा. दूध घ्यावें.

५८०. **पांडु-कामलावर :** दुधांतून रोज गोड्या एरंडाच्या पानांचा रस देणें.

५८१. **अपस्मारावर :** माकीचा (मीनाक्षी) रस जिभेवर रोज चोळला तर लाळ गळण्याची कमी कमी होत जाईल. गाईच्या दुधांतुन मिनाक्षी शिजवून रोज काढा द्यावा.

५८२. **जंतावर :** पांगेऱ्याचा रस २ लहान चमचे द्यावा. ४–४ दिवशीं २–३ वेळां द्यावा. मग अपस्मारावरील औषध सुरू करावें.

५८३. **शक्तिवर्धक, वातहारक :** लघु चिकणा (बला) मूळ स्वच्छ धुवून, दूध, पाण्याच्या काढ्यांत साखर घालून रात्रीं कढवून पाणी आटवून दूध कमी झाल्यावर उतरून रोज घ्यावें. एक वेळां शक्ति मेंढीची वाढते. भोंवळ जाते. अपस्मार, आंकडी बंद होते. ताकद वाढते. १ तोळा मूळ जरा कुटून काढा करावा. आलें असेल तर फार उत्तम. स्मरणशक्ति तरतरीत होईल. लघु चिकण्याच्या मूळाचें चूर्ण दुधांतून रोज घेतलें तर १५–२० दिवसांतच ताकद येते.

५८४. **नायटे, इसब, खरूज वगैरेवर :** कृष्ण-तुळशीचीं पानें वांटून वांटून गोळा करून त्याचा पाण्याशिवाय रस काढावा (एक शेर). ह्यांत कृष्ण-तुळशीच्या पानांची लुगदी बारीक वांटून ५–१० तोळे, त्या रसांत, कालवून कल्क तयार होतो. त्यांत अर्धा शेर खोबरेल तेल घालून तेल सिद्ध करावें म्हणजे रस आटून फक्त तेल राहिल्यावर उतरावें. खरूज, कांटा वगैरेवर रोज चोळून लावावें. दूर्वा वांटून ताकांत कालवून घेतल्यास अंगावरील फोड व उष्णतेचे विकार नाहींसे होतात. जस्त २ तोळे, सोमल (संख्या) १ तोळा, पारा १ तोळा. प्रथम जस्ताचें पाणी करून पारा मिळवावा. मग खलून भुकी करून सोमल त्यांत मिळवावा. नंतर पारोशा पिंपळाच्या फळाच्या रसांत (भेंडीच्या ओल्या पालाच्या रसांत) खलून वडी करावी. पारोसा पिंपळ अष्ट-कातांचें पीठ करून मुशींत खालींवर घालून मध्यें वडी ठेवून मातकापड करून सव्वाशेर रानशेणींत पूट द्यावें. भस्म होतें.

भस्में

५८५. **भस्म :** (१) जरीचें रुपें १ तोळा (तात्पर्य चिनी चांदी) त्याची डबी करून पारा १ तोळा त्यांत घालावा. झाकण लावून उडदाची डाळ व तांदूळ यांची खिचडी करावी. कस आल्यावर आंत डबी टाकावी. तोंडीं झांकण ठेवून निखाऱ्यावर ठेवावी. निवाल्यावर डबी काढावी, औषध सिद्ध होईल.

भस्म : (२) हरताळ तोळा १, रुईच्या चिकांत ३ दिवस भिजत घालून गोवरी १ पोखरून, चिंचेच्या सालीची भुकणी खालीं घालून वर हरताळवडी ठेवावी. वर भुकणी घालून दुसरी गोवरी वर झांकावी. खळग्यांत ठेवावी. फुंकून घ्यावी. वर राख घालावी. माती घालावी (राखेवर), पहांटेस काढावी. पारा लोखंडाच्या पळींत तापवावा. त्यास भस्म घ्यावें.

भस्म : (३) लाजाळूच्या रसांत उत्तम सोनें मासा १, अगर १ गुंज, बोळक्यांत लाजाळूचा रस घालून सोनें आंत टाकावें. वर झांकून मातकापड करून रानशेणींत (सुमारें १ पाटीभर) बोळकें मध्यें ठेवून फुंकावें. भस्म. तांबें १ तोळ्यास १ जवभार, ३ दिवस.

भस्म : (४) वृंदावनाचा रस (ओल्या कमळाचा अगर मुळांचा) काढून ठेवावा. पारा १ तोळा, गंधक १ तोळा, सोमल १ तोळा, खलून गोळा त्या रसांत करून मुशींत थोडा रस घालून गोळा आंत ठेवून मूस बंद करून मातकापड करून ३ पुटें देणें. तांब्याचें व कथलाचें भस्म होतें.

भस्म : (५) पारा, गंधक, समरस करून (कज्जली) करावें. पांढऱ्या रुईच्या चिकांत पूट देणें. (खलून) भस्म होतें.

भस्म : (६) सोमल, पारद, टाकणखार, नवसागर, सर्व समभाग घेऊन मग कथिलाची वाटी करणें, व झांकणही कथिलाचें करावें. वरील सोमल वगैरे ४ औषधें लिंबाच्या रसांत खलून, गोळा करून वाटींत भरावा. झांकण घालून १ सुरणकंद कोरून आंत मोठी वाटी घालून, वर सुरणाची काढलेली चकती बसवून, मातकापड करून वाळवून गोवरीचें पूट द्यावें.

भस्म : (७) आघाड्याची राख झोळींत घालून कुसुंबा गाळतात तसें पाणी घालून झोळींतून पाणी खालीं गळेल (क्षारयुक्त) तें पाणी खापरावर सोमल ठेवून वर त्या पाण्याचा चोळ द्यावा. फुलेल तें तांबें तोळ्यास वाल द्यावें.

भस्म : (८) पारा ५ पैसे भार पक्के व ५ पैसे भार बिब्याच्या झाडावरील साल, या दोन्हींचा खल काजळाप्रमाणें करून गोळा करावा. त्या गोळ्यांत मातकापड करून वाळवून गवत २ भारे घेऊन, त्याचे ५-६ भाग करावे. एका भागांत पहिल्यानें गोळा फुंकून काढावा. याचप्रमाणें एका एका गवताच्या भागांत पुन्हा पुन्हा फुंकावा. सर्व सिद्ध होईल. तोच गुटिका समजावा.

भस्म : (९) बिब्याच्या झाडावरील सुक्या सालीचे तुकडे काढून त्याचे लहान लहान तुकडे करून मडक्यांत भरून पाताळयंत्रानें तेल काढून बाटलींत ठेवावें. तोळा किथिलास १ रती द्यावें, पाणी शोषील. १ तार होईल.

भस्म : (१०) सोमल रवा तव्यावर ठेवून शिंदीचा दारूचा चोळ थोडा थोडा द्यावा. फुलेल. कथिलास देणें. पाणी शोषील.

भस्म : (११) पारा तोळा १, शिसें तोळा १, शिसें पातळ करून पारा मिळवावा. समरस होईल. मग गंधक तोळा १ घेऊन, कुंडल्यांत पसरून त्यावर ती वडी (पारा-शिशाची) ठेवून चूर्ण करून त्यावर टाकणखार १ तोळा घेऊन बारीक करून त्यावर पसरावा. मुद्रा करून अग्नि देणें. भस्म १ तोळा तांब्यास १ रती देणें.

भस्म : (१२) कोलत्याच्या मुळ्या खापरांत पसरून ताम्रपत्रे अगर पैसा ठेवून पूट देणें. पैसा फुलेल. बत्ताशाप्रमाणें १ गोवरीचें पुट देणें. पाऱ्याचें लिंग करण्यास तें भस्म कामास येईल.

भस्म : (१३) जस्त उत्तम ६ पैसे भार, पारा २ पैसे भार, जस्ताचें पाणी करून, त्यांत पारा घालून, समरस करणें. त्याची ठिकडी करावी, व सांबर मीठ (सांबर लोण) १ शेर बारीक करून खापरांत पसरून वर टिकडी ठेवून चुलीवर ठेवून त्या ठिकडीवर लिंबाच्या रसाचा चोळ देत जाणें. तीक्ष्ण अग्नि ६ प्रहर द्यावा. भस्मांत ती टिकडी हातानें मोडेल. अशी बारीक कुसकरून पाहणें. शुभ्र होईल. तांबें तोळ्यास रतीभर देणें.

भस्म : (१४) वंग (कथील) पातळ करून निर्गुंडीच्या रसांत हळद घालून २–३ वेळां ओतावें (जात्याची पेड खालची एका भांड्यावर ठेवून त्याच्या भोकांतून ओतावें, म्हणजे अंगावर उडत नाहीं). नंतर बाभळीचा पाला वांटून त्याची भाकरी करून त्यांत तुकडे घालावे. पुन्हा वर भाकरीप्रमाणें पाल्याची लुगदी घालावी. याप्रमाणें थरावर थर, लावून कपड्यांत (स्वच्छ) गुंडाळून मातकापड करून शेणींत गजपुट द्यावें. उत्तम कळ्या होतात. सफेत भस्म तयार होतें.

भस्म : (१५) संख्या सोमल तोळा १, कागदी लिंबांत मध्यें भरून दोन रानशेणीमध्यें पूट द्यावें. अशीं १० पुटें द्यावींत. श्वेत भस्म होईल.

भस्म : (१६) कथील, पिसोळ्याच्या रसांत ९ वेळां पाणी करून विझवावें. मग कडू तेलांत १ वेळ विझवावें. मग लिंबाच्या रसांत १ वेळ विझवावें. श्वेत भस्म होतें.

५८६. **नपुंसकत्वावर :** आघाड्याची राख करून खापरावर थोडी घालून सोमल खडा वर ठेवून वर राख घालून कोळशाच्या अग्नीवर ठेवावा. तो फुलेल, परंतु थोडा कच्चा राहील. तो सोमल व पारा समभाग लिंबूरसांत खलून मुशींत अग्नि देणें. तो पाणी शोषील. पहिला कच्चा सोमल १ तांदूळमात्राप्रमाणें ७ तास लोणी अगर मलईबरोबर घ्यावा.

५८७. **अंग बाहेर येतें त्यावर :** गुदद्वारांतून अगर योनीच्या बाहेर अंग येतें, त्यावर पहिल्यानें तुरटीचें पाणी करून थोडा कापूर टाकून त्यांत कापूस भिजवून तो बोळा योनीच्या आंत चेपून वरच्या बाजूस घालावा (अंग बाहेर आलें त्याच्या वरच्या भागांतून आंत) व अंग आलें असेल त्यावर लाजाळूच्या पाल्याचा रस चोळून, बाळहिरडे, मायफळ, तुरटी यांची वस्त्रगाळ पूड करून त्या लाजाळूच्या रसावर हें चूर्ण दाबून अंग बाहेर दाबून आंत लोटावें. म्हणजे कायमचें बसत जाईल.

५८८. **रक्तप्रदरावर :** सफेद खरें रेशीम घेऊन त्याची राख करावी, व वालाइतकी राख मधांतून द्यावी. त्वरित गुण.

५८९. उलटी थांबण्यावर : (१) तुरटीची लाही दुधांतून व सोनगेसार एकत्र दिला असतां उलटी थांबते. (२) सोरेखार, टाकणखार, नवसागर, फटकी हीं चारही एक एक तोळा घेऊन चिंचेच्या वलकांत कालवून (चिंचेचें पाणी उकळून गाळून), त्यांत वरील क्षार घालून पाणी आटेपर्यंत कढवून त्यांत १ तोळा मृगश्रृंग भस्म मिळवून, म्हणजे ५ तोळे सर्व होईल. तें मिश्रण बाटलींत ठेवून २ गुंजाप्रमाणें देणें. गुळाबरोबर देणें. पाणी देऊं नये. तावडतोब उलटी थांबते.

५९०. अंगाचा दाह होतो त्यावर : गंधक रॉकेल तेलांत खलून, आंगावर— पोट, मांड्यांवर गजकर्णाप्रमाणें लाल दाह होतो त्यावर चोळावा.

५९१. नंदवातावर : मिरें, सहदेवी माका, कृष्णतुळस, ब्राह्मी यांचा रस काढून मधांतून पोटांत देणें. ५—६ ठिपके रस आंगास चोळावा. नंदवात जातो; व आठोळी बाळंत होऊन मूल जातें त्या बाईस वात होतो त्यावर द्यावा.

५९२. तापावर : गुळवेलीचा तुकडा एक सुमारें ३ अंगुळें घेऊन खडी-साखर, वगैरेबरोबर रोज चावून खावा. ज्वर जातो. प्रथम चिकटलेला क्षयादीवर उपाय आहे.

५९३. वातविकारावर : शतावरीवरील रस कुटून, १ तोळा रस गाईच्या ४—५ तोळे दुधांत खडीसाखर घालून द्यावा.

५९४. व्रणावर : सिताफळीचीं पानें कृमिनाशक आहेत. त्यांचा रस किंवा लुगदी व्रणांवर लावली तर कीड मरून व्रणरोपण होतो.

५९५. मधुमेहावर : बेलाचा रस पाणी किंवा मध घालून अर्धा पावशेर सकाळ-संध्याकाळ घेणें.

५९६. लघ्वींतून धातू जाणें : (अण्णासाहेब पटवर्धनांचा काढा) लेंडी-पिंपळी नग ५, गोखरूं मासे ४, पांढरी वसू मासे ३, धमासा मासे ३, बडीशेप मासे ३, एरंडमूळ मासे ३, मेथ्या मासे ३, खडीसाखर मासे ६, पाणी १॥ शेर, ३ वेळां अर्धा पावशेर कोमट पिणें.

५९७. शक्तीवर (प्रवाळभस्म) : रुईच्या चिकांत प्रवाळ खलून, चीक घालून, संपुष्ट करून आंच द्यावी. भस्म ताकददार होतें. शरीरकांती वाढते. पानां-तून द्यावें.

५९८. पित्तावर : १ तोळा हिंगुळांतील काढलेला पारा, व ८ तोळे गंधक शुद्ध एकत्र खलून आल्याच्या रसांत खल करून गोळ्या बांधून ठेवाव्यात. पित्तविकारावर वगैरे अनुपान योजून द्यावा. संध्याकाळीं.

५९९. क्षीण क्षय पूर्वस्वरूप, ताप थोडासा वगैरेवर : बृहत्सुवर्णमालिनी गाईच्या तुपाच्या काढ्यांत पिंपळी व पाणी, खडीसाखर घालून, काढा करून सकाळीं देणें. सकाळीं १ शेर पाण्याचा पावशेर काढा करून तो काढा सायंकाळीं रोज १ तोळा द्यावा. रोज एक एक तोळा चढवीत सात दिवस द्यावा. याप्रमाणें क्रम सुरू

ठेवणें. सातव्या दिवशीं ७ तोळे, ८ व्या दिवशीं १ तोळा पुन्हा द्यावा. व पुढें २+३+४+५+६+७ याप्रमाणें रोज द्यावा. ताप निघतो. गुळवेलीचा १ तुकडा सकाळच्या काढ्यांत कुटून घालावा.

६००. **उचकीवर** : झेंडूंचीं फुलें कुसकरून पाण्यांत गाळून तें पाणी पिण्यास द्यावें.

६०१. **क्षय, बाळंतरोगावर (हळदीचें सत्त्व)** : ओली हळद किसून पाण्यांत धुवून तळांत खालीं सत्त्व असतें. पाणी निवळत ठेवून तें सत्त्व ४ ते ८ गुंजा दर वेळीं दुधांतून द्यावें. गोमूत्रांतून हळदीचें सत्त्व घेणें उत्तम. छातींतील कफ नाहींसा होतो. ताप कमी होतो. २१ दिवस घ्यावा.

६०२. **दमा, श्वास** : पिंपळीची ओली साल कुटून काढा करून घ्यावा. दमा बसतो. ३ दिवस. २-३ वेळां घ्यावा.

६०३. **पोटांतील विकारावर** : गोविंदफळाच्या भाजीनें पोटांतील रोगांचा उद्गम नाहींसा होतो.

६०४. **आंकडी अपस्मारावर** : गोविंदफळाची (वाघांटीची मुळी) कांद्याच्या रसांत उगाळून नस्य करावें.

६०५. **उलटी थांबण्यावर** : वेलची सालासुद्धां कुटून काढा करून देणें.

६०६. **स्त्रियांच्या प्रदरावर** : उपळसरी चूर्ण १ तोळा, सुंठ, जिरें, पिंपळी तीन्ही मिळून ·।· तोळा. १। तोळ्याच्या १२ पुड्या करून रोज ३ पुड्या दुधाबरोबर द्याव्यात. त्यांत प्रवाळ जरूर तर घालावा. अनुभविक.

६०७. **कोड** : वांग्यास भोंक पाडून त्यांत १ तोळा आंवळसार गंधक घालून, तोंड बंद करून फोपाट्यांत दोन तास पुरून ठेवावें. नंतर तें वांगें वांटून त्यांत १ तोळा काळें मीठ (पादेलोण) व २१ काळींमिरें वांटून त्याच्या पुड्या करून रोज सकाळीं १ याप्रमाणें ७ दिवस देणें.

६०८. **कपाळदुखीवर काढा** : धमासा, गोखरूं देवदार, मनुका, सुंठ, वडीशेप, कटुकी, बेलफळ, गुळवेल, एरंडमूळ, रास्नामूळ, पांढरी वसू, मिरें, तुळशीचीं पानें १०-१२, कडूचीरू पानें १०-१५, खडीसाखर, सूतशेखर गुंजभर मधांत घेऊन वर काढा घ्यावा. (अण्णासाहेब पटवर्धन यांचा कपाळदुखीवर अनुभविक)

६०९. **दम्यावर** : सोमल खडा १ तोळा, खापऱ्यांत ठेवून अग्नीवर ठेवून काढ्या तुऱ्याचे चमच्यांनीं अभिषेक (चुवा) ४ प्रहर सारखा देणें. भस्म होईल. तें भस्म सुईच्या अग्रावर डाळिंबाच्या रसांत देणें. **पथ्य**- तेलकट, तिखट, आंबट वर्ज्य.

६१०. **शक्तिवर्धक (सोमल तेल)** : सोमल १ तोळा, जायफळ १ तोळा, लवंगा १ तोळा, केशर १ तोळा, चारी पदार्थ बारीक वांटून चिनी मातीच्या भांड्यावर (पेला वगैरे) कपडा बांधून तें चूर्ण त्यावर पसरावें, व वर अभ्रकाचा पत्रा ठेवून त्यावर

कोळसे ठेवून विस्तव ठेवावा. १ प्रहरांत तेल खालीं पडेल. तें सुईच्या अग्रावर विड्याच्या पानाबरोबर खाणें. शक्ती वाढेल. आत्मविश्वास वाढेल.

६११. **दम्यावर :** केळीचीं सोपटें ओलीं सावलींत वाळवून त्यांची राख अस्मानी रंगाच्या डबींत ठेवून रोज रविवारपासून सुरू करून विड्याच्या पानांत अगर विड्यांत रोज १ गुंज खाण्यास द्यावी. तूप रोज जास्त खावें. जन्माचा दमा जाईल.

६१२. **कास–श्वासावर :** काटेरिंगणीचें पंचांग २० तोळे, रुईचीं पिकलेलीं पानें २० तोळे, सैंधव १० तोळे, ओवा ५ तोळे, हीं सर्व एकत्र करून कोऱ्या मडक्यांत घालून तोंड बंद करून, लहानसें पुट द्यावें. स्वांगशीत झाल्यावर काढून चणाभर हिंगाची लाही त्यांत मिसळून लोखंडाच्या कढईत बारीक करून घोटून घोटून ठेवावें. १–१ मासा औषध सकाळीं व रात्रीं झोपते वेळीं तोंडांत सोडून चोखून चोखून खाणें. ४० दिवसांत मुळापासून श्वास जातो. (कितीही जुना असला तरीसुद्धा)

६१३. **प्रसूती रोगावर :** कवेळ दशमुळांचा काढा सकाळीं व सायंकाळीं देऊन काढ्यानंतर ४–४ तासांनीं, सुवर्णमालिनी वसंत आल्याचा रस व मध यांत द्यावा. जरूर फायदा होतो. अनुभव आहे. बरोबर महानारायणी तेलाचें मालिश करावें. सोन्यांत स्वागीप्रमाणें काम होईल.

६१४. **खोकला, श्वास, पंडुरोग यांवर :** अफू ·।· तोळा, ·।।· तोळा रससिंदूर, गाईच्या दुधांत १ दिवस खल करून, बाजरीएवढी गोळी करावी. वरील पाऊण तोळ्याच्या चौसष्ट गोळ्या कराव्या.

६१५. **वातावर, नपुंसकत्वावर, शय्या (येणेवर) येण्यास ज्वर वगैरेवर :** सोमलखडा शेराच्या (काड्या हुरा) चिकांत खलून लुगदी करून तुऱ्याच्या नाग्यांची राख करून मडक्यांत खालींवर वाळून ८ दिवस (६४ प्रहर), मंद, मध्य, तीव्र अशी आंच द्यावी. राख दाबून बसवावी. वरील भागांत छेद येऊं नये. अशी दाबून बसवावी. सोमलाची वाफ तोंडांत जाऊं नये अशी तजवीज ठेवावी. जवळ बसूं नये. दोन दिवस मंद अग्नि द्यावा. थोडा वाढवा. नंतर मोठा अग्नि द्यावा. याप्रमाणें ८ दिवस निदान ४ दिवस तरी अग्नि दिल्यावर आंत सोमल फुलून निघतो.

६१६. **दमा, श्वास, कांस यांवर :** अडुळशाचे तुरे फुलें व चूर्ण करून मधांतून रोज द्यावें.

६१७. **अशक्तपणा, नबळाईवर :** खारीक १, बदाम २, पिस्ते ४, काळे मिरें ५, सर्व जिनसा रात्रीं पाण्यांत भिजत घालून सकाळीं खारीकेमधील आठोळी काढून चारी वस्तू मिऱ्यासुद्धां वांटून लुगदी करावी, व तुपांत तळून लाल झाल्यावर मग साखर मिळवून खाण्यास द्यावी. याप्रमाणें १ ते ४–५ खारकांपर्यंत वाढवाव्या. त्याच प्रमाणांत बदाम, पिस्ते, मिरें वाढवून रोज देणें. शक्ति लवकर वाढेल.

६१८. **त्वरित रक्त वाढण्यास** : उत्तम मौक्तिकभस्म विड्याच्या पानांतून देणें. तावडतोब रक्त वाढतें. नायकांचा विटाळ बंद झाल्यास मनुष्याची डाळ ४ तोळे वांटून साखर घालून दुधांत मिसळून देणें. विटाळ होऊं लागेल.

६१९. **संधिवातावर** : मुई-तरवडाच्या पाल्याचें चूर्ण करून तें २ मासे दोन वेळां रोज निर्गुडीच्या रसांत देणें. **पथ्य**– वुप पोळी. डाळिंबाच्या रसांत सदरहू चूर्ण दिलें तर **छातीचे रोग** नाहींसे होतात. उरांत कळ करीत असेल तर त्यावर देत जाणें.

६२०. **मर्दुमकीकरितां** : सुंठ घ्यावा. उत्तम आहे. विड्यांत घ्यावा. तेल वगैरे वर्ज्य. कस्तुरी, केशर वगैरेंच्या विड्यांत उत्तम. आटीव दुधांत उत्तम.

६२१. **वेड, मस्तक, भ्रमउन्माद, वगैरेवर** : पक्का (जून पिकलेला), कोहोळा घेऊन त्याची कलिंगडाप्रमाणें मध्यभागापर्यंत जाईल (गरापर्यंत पोचेल) अशी खाप काढून, त्यांत गूळ १॥ तोळा घालून, काढलेली खाप वरती बसवावी. व तो कोहळा बाहेर बरोबर ठेवावा. ५ दिवसांनीं आंतले गर घ्यावे. अति उत्तम उपाय.

६२२. **आंकडी, हिस्टेरियावर** : सोनामुखी १० तोळे, बाळहरडे ५ तोळे, सैंधव ५ तोळे, आंवळकठी ५ तोळे, सुंठ ५ तोळे, या सर्वांचें चूर्ण करून, पावली-भार ऊन पाण्यांत घ्यावें.

६२३. **उचकीवर** : चणे (हरभरे) भरडतात त्याचीं टरफलें बारीक करून विडी करून ओढण्यास द्यावी. तावडतोब उचकी राहते.

६२४. **दम्यावर** : काळ्या अगर कोणत्याही धोत्र्याच्या बिया १ तोळा, गोमूत्रांत घालून त्या वांटून त्याच्याबरोबर तितकीच जायफळाची पूड घालून चण्या-प्रमाणें गोळ्या किंचित् लहानसर करून १ गोळी घेणें. आल्याच्या रसांत गोळ्या करणें. अनुपान पाण्याबरोबर गिळण्यास.

६२५. **अनेक रोगांवर** : सोमलाचा खडा शुद्ध करून अगर तसाच वडाच्या झाडाचा छेद करून त्यांत ठेवून, व भुसा बसवून वज्रमुद्रा करून, सहा महिने आंत ठेवून काढावा. म्हणजे भस्माप्रमाणें होतो. राईप्रमाणें द्यावा.

६२६. **सफेद धुपणी, दमा व लाल कफ, यांवर** : शरपुंखा कांड्याचें चूर्ण वस्त्रगाळ करून तांदुळ रात्रीं भिजत घालून सकाळीं कुसकरून त्याच्या ५ तोळे धुवणांत द्यावें. सुमारें चवलीभार शरपुंखा चूर्ण चिलमींतून ओढणें.

६२७. **धातुक्षीणतेवर उत्तम** : कवचबीज २ मासे चूर्ण पाण्यांत उकळून दूध घालून रोज द्यावें. कवचबीज दुधांत उगाळून टरफल काढून तुपांत परतावें. गोखरूचूर्ण, वेलची वगैरे घातली तर स्वादिष्टपणा येऊन गुणही त्वरित साधेल. यापासून शौचास साफ होतें.

६२८. **गरमीवर** : (सर्व प्रकारच्या) एक तोळा रसकापुरास १० तोळे मेंदीचें दूध घालून तांब्याच्या भांड्यांत कडूलिंबाच्या दांड्यानें बुढाशीं तांब्याचा पत्रा

बसवून, अगर ताम्रपत्र्यानेंच घोटावें. तें दूध जिरल्यावर दुसरें १० तोळे घालावें. याप्रमाणें ८० तोळे (पक्काशेर) दूध मेंढीचें त्यांत जिरवून त्याचा गोळा करून तो गोळा गोड्या एरंडाच्या पानांत गुंडाळून त्याचा पुडा बांधून उन्हांत टांगून ठेवावा. ६–७ दिवसांत त्या दुधाचें तूप सर्व विचरून गेलें म्हणजे हिरवट, जांभळट, भुकी राहील. ती बाटलींत भरून ठेवावी. सदरहू भस्म तांदुळभार मलईतून अगर गोड्या दह्यांतून दांतास न लावतां खाण्यास द्यावें. रोज फक्त एकदां. **पथ्य–** गव्हाची चपाती, उडदाचें वरण, व पुष्कळसें तूप खाण्यांत आलें पाहिजे. तेल, आंबट, विशेष करून वर्ज्य. हातखंडा औषध. देह अगदीं निर्विष होतो.

६२९. **संधिवात, रुची, गृध्रसी, पक्षघातावर** : रुईच्या चिकांत सोमल खलून मडक्यावर मडकें ठेवून संधिलेप करून भस्म वर लागतें. पाव तांदुळभार वातावर द्यावें.

६३०. **डोळ्यांची लाली, सारा, फूल, वडस वगैरेवर** : शेवग्याच्या पाल्याचा रस व मध मिश्र करून डोळ्यांत अंजन करावें.

६३१. **अफूचा अंमल उतरण्यास** : शिताफळाच्या पानांचा रस द्यावा. किंवा पानांची पूड पाण्यांतून द्यावी. परंतु रस उत्तम.

६३२. **तांबड्या धुपणीवर, पांढऱ्या धुपणीवर** : (निळ्या) रेशमाची राख मधांत वगैरे. पांगारियाची साल दुधांत उकळून देणें.

६३३. **अग्निमांद्य, ज्वर, उदरस्थ विकार, दमा, शूळ, वगैरेवर** : १ तोळा सोमल शुद्ध करून, एक तोळ्यास एक शेर दूध (गाईचें) घेऊन, सोमल-सुद्धां खल करून तो खवा शेवटीं ढवळींत करपवावा. म्हणजे शेवटीं सोमलाची काळी राख दुधासुद्धां शिल्लक राहते. तें भस्म तांदुळभार अगर कमी अनुपान योजून द्यावें.

६३४. **कानाच्या विकारांवर** : वेखंड उगाळून वहात्या कानांत घालावें. कान बरा होतो. दारु, अफू, एकत्र करून ठेवून घालणें. मध, कडूनिंबाचा रस कानांत घालणें.

६३५. **वाहत्या कानावर** : वंशलोचन अगदीं पीठ करून कानांत चिमटीभर टाकून, अडुळशाचीं पानें वाफारून वर त्याचा रस काढून घालावा. साफ बरा होतो.

६३६. **आमांशावर** : तुपांत भिलाव्याचीं दोन फुलें पाडून पिठी साखर घालून गोळी करून खाण्यास द्यावी. पोटांतील कळा थांबतात. मुरडा बंद होऊन परसाकडे जाणें बंद होतें.

६३७. **डोक्याच्या जडपणावर** : कवड्या ऊद उगाळून रोज लेप करावा; व कानांत तुरटीची लाही घालून लिंबाचा रस वर पिळावा, म्हणजे डोकें राहतें.

६३८. **वातावर, गांठ, पोटांत कळ, उरांत कळ, यकृत, प्लीहेवरील आलेला गोळा, उराशीं कळ येऊन फुगवटी येते त्यावर** : काळा हिंग उगाळून

पाण्यांत कालवून लेप करावा. वर कापूस चिकटवणें. १–२ दिवस करावें. थोडी हिंगाची लाही तूपांतून पोटांत द्यावी. आळशीच्या पोटिसानें शेकण्याच्या वेळीं आंत थोडी मोहरी वांटून घालावी. मग पोटिस करून शेक करावा. म्हणजे कफ साफ निघतो.

६३९. **कफावर** : कडू जिरें वांटून त्याचें पाणी गाळून घेऊन, त्यांत हळकुंड व काकडशिंगी उगाळून पिण्यास द्यावें. परसाकडे होऊन कफ पडतो.

६४०. **गुल्मावर** : गोरखमुंडी ताकांत वांटून वात (किंवा रक्त) गुल्मावर द्यावी. गुल्म बरा होतो. शतावरीचा काढासुद्धां गुल्मावर द्यावा. किंवा लसूण, शेंदेलोण खाण्यास द्यावें.

६४१. **उचकीवर** : लसूण सुमारें १०–१२ पाकळ्या कुटून, दूध-पाण्याच्या काढ्यांत पचवून काढा द्यावा.

६४२. **फुटक्या कानावर** : आघाडा वाळलेला असेल तो जाळून त्याची राख तेलांत मिश्र करून, कानांत घालावी. (तेलांत राख घालून शिजवून गाळून ठेवावी.) तें तेल कानांत घालावें, म्हणजे कानाचा ठणकाही राहतो.

६४३. **क्षय आदिकरून विकारांतील चिकटलेला ताप कमी होण्यास** : भिलावा (बिब्वा) एक ठेंचून आंत मिरें, ज्येष्ठमध घालून त्याचा काढा करून द्यावा.

६४४. **जठराग्नि प्रदीप्त होऊन धातुवृद्धी होते, जीर्णज्वरावर** : बिब्वा (वांटून सोसेल त्याप्रमाणें) गोळी लहान-मोठी हवी तशी करून, तितकाच गूळ व तितकेंच तूप घालून रोज पोटांत घेणें.

६४५. **तापावर** : वडाच्या पानाची राख मधांतून द्यावी. (आमच्या आईचें औषध.)

६४६. **दम्यावर** : लवंगा वाळूंत भाजून (वाळू आधीं लाल करून नंतर लवंगा घालाव्या.) चांगल्या फुगल्या म्हणजे वरील बोंड काढून टाकून चाळणीवर चाळून त्या लवंगांचें (फडक्यावर न गाळतां) चूर्ण बारीक करणें. तें चूर्ण तापवून निवालेल्या पाण्यांत चवलीभार टाकावें. नंतर पाणी लालट होईल. (तात्पर्य, लवंगा लाल भाजल्याची खूण आहे.) कमीजास्त भाजण्यांत चूक आहे असें समजावें. लाल पाणी पिण्यास द्यावें (चूर्णमिश्रित). म्हणजे १५ मिनिटांत दमा राहतो. रात्रीं घेतलें तर झोंप उत्तम येते, व सकाळीं शौच्यास साफ होतें.

६४७. **बाळंतरोगावर** : कडू शेवगा (रानशेवगा) याच्या पाल्याचा रस दुधांतून देणें. त्याचें पाल दुधांत उगाळूनही द्यावें. भूक लागत जाते. प्रमाण वाला-एवढें. दोन वेळां. दूध जास्त लागतें.

६४८. **गरोदर स्त्रीच्या पोटांत मूल हालत नसेल तर उन्हाळी, मूत्रकृच्छ्र, पोटदुखी इत्यादी गरोदर स्त्रीच्या विकारांवर** : ·॥· तोळा बाळंतशेपा, ·॥· तोळा जिरें, ·॥· तोळा काळें जिरें (कडू जिरें), ·॥· तोळा एरोदस,

·।।· तोळा कमळकाचेरी, प्रत्येक वेळीं याचा काला करून गूळ घालून किंवा नुसताच घ्यावा. म्हणजे वर लिहिलेले सर्व रोग दूर होतील.

६४९. **उदरावर :** कोळिस्ता (तालिमखाना) झाडाच्या ताज्या मुळ्या आणून रोज ६ तोळे मुळ्यांचा काढा भांड्यावर झांकण ठेवून करावा. तो दिवसांतून तीन वेळ घ्यावा. प्रत्येक वेळीं ५ तोळे काढा घ्यावा. त्यांत त्याच झाडाच्या मुळ्यांची राख प्रत्येक वेळीं एक मासाप्रमाणें मिळवून घ्यावी. त्याच दिवशीं लघवी सुरू होऊन आराम वाटूं लागेल. याप्रमाणें तीन दिवस काढा घ्यावा.

६५०. **धावरें, ग्रंथी वगैरेवर :** लवंग, दालचिनी, पाण्यावर वांटून (गंधासारखें) त्यांत थोडा चुना घालून धांवरें, ग्रंथी वगैरे असेल तेथें सारवावें. वर गूळ सारवावा. म्हणजे ओढा बसून रक्त फाकेल व गांठ बसेल.

६५१. **कॉलऱ्यावर गोळ्या :** अफू ·।· तोळा, काळीं मिरीं १ तोळा, हिंग २ तोळे, यांची भुकी करून, मधांत गोळ्या करून, कोऱ्या चहाबरोबर गिळण्यास द्याव्या.

६५२. **मूळव्याधीवर (मलम) :** अफू चवलीभार, मायफळाची भुकी अर्धा तोळा (वस्त्रगाळ), व्हॅसलिन २ तोळे यांत मिसळून गुदद्वारास मलम मोडास वगैरे लावावें. ४–५ दिवसांत मोड नरम पडतात. रक्त बंद होतें. सूजही जाते.

६५३. **मोड, मूळव्याध, रक्त पडणें, सूज वगैरेवर :** खवल्या मांजराचीं नखें रोज पाण्यांत उगाळून लहान चमचाभर आणखी पाणी घालून पिण्यास द्यावें. दिवशीं दोन वेळां चिंचोक्याइतकें पाहिजे. ६–७ दिवसांत बरे होतात. **पथ्य**– सौम्य पदार्थ घ्यावे. हींच नखें आंकडीवर लहान मुलांस उपयोगी आहेत. लहान मुलास गव्हाइतकें नख, मध, आल्याचा रस, तुळशीचा रस वगैरेंत द्यावें.

६५४. **ओकारीवर :** महाळुंगाचें मूळ पाण्यांत अगर मधांत उगाळून चाटण्यास द्यावें. कसलीही ओकारी राहते. सदरहू औषध मक्याच्या दांड्याच्या राखेपेक्षां अधिक गुणकारी आहे.

६५५. **कृमी पडण्याकरतां :** सूर्यफुलाच्या बियाचें चूर्ण १ मासाभर अगर वयमानाप्रमाणें कमी, मुलांना उपयोगी.

६५६. **कृमिनाशक, व गर्भस्राव होण्यावर :** पोपयाच्या बियांचें चूर्ण मधांतून द्यावें. १–२ मासेपर्यंत रोज द्यावें.

६५७. **पोटदुखी, अजीर्ण, वगैरेवर :** निर्गुंडीचे तुरे अगर डिऱ्यांमध्यें लसूण एकत्र वांटून सैंधव व हिंग घालून देणें. रोज ५–७ घास सकाळीं द्यावें. गोळी पाण्यांत गाळून मग लाही व सैंधव घालावें.

६५८. **नाकांतून रक्त पडतें यावर :** अंबाडीची भाजी (अंबाडीचा पाला) चूर्ण चिलमींतून ओढावें, व नाकांतून धूर सोडावा. रक्त बंद होतें.

६५९. **पोट फुगणें, वात, कमरेंतील वात, शौचास साफ होणें, यकृत, प्लीहा, वगैरे व अपस्मार यांवर :** रुईचीं मुळें वसंत, ग्रीष्म, ऋतूंत वाळवंट भागांत किंवा पोकळ जमिनींत झालेलीं काढून पाण्यानें स्वच्छ धुवून वरची खडबडीत साल काढून टाकावी. सावलींत इतकीं वाळवावीं कीं, त्या मुळांस चाकूनें कापल्यास चीक निघत नाहीं. (तात्पर्य, चीक आंतल्या आत मुरून जावा.) अशी वाळल्यानंतर वरील साल चाकूनें तासून तिचें वस्त्रगाळ चूर्ण करून ठेवावें. २ गुंजा अनुपान आल्याचा रस, मध वगैरेंतून दिलें असतां उपयोग होतो.

६६०. **मूत्र सुटतें, मुतखडा पडतो :** कच्च्या पोपयास चिपा घेऊन (म्हणजे चाकूनें रेघा ओढून) आंतून चीक दुधासारखा निघतो, तो ताटांत किंवा फडक्यावर धरून वाळवून ठेवावा. बाटलींत ठेवून दोन गुंजा द्यावा. **अग्निमांद्य** मोडून आंतडी साफ होतात. ह्याच चिकाचा उपयोग, पोपयाच्या पानांचा रस १-१॥ तोळा, तूप तितकेंच घालून, किंवा दूध मात्र २–३ तोळे घालून द्यावा.

६६१. **तोंड आलेलें बरें होण्यास :** धमासा २–४ तोळे घेऊन काढा चतुर्थांश करून त्याच्या गुळण्या कराव्यात. दिवसांतून २–३ वेळां काढा खडीसाखर घालून थोडा पोटांतही द्यावा.

६६२. **उन्माद, भ्रमण, वेड, मस्तक स्तब्धता, झोप न येणें वगैरेंवर :** कोहाळा (जून) मोठा घेऊन त्यास कलिंगडासारखी फोड काढून त्यांत ३ तोळे तूप घालून वर (फाका बसवून) तो कापलेला भाग वर ठेवून रात्रीं हवेंत ठेवावा. नंतर सकाळीं पाणी त्यांतील २–३ तोळे निघतें तें (गुळाचें) गाळून पिण्यास द्यावें. दुसऱ्या दिवशीं, दुसऱ्या ठिकाणीं, भोंक पाडून असेंच पाणी काढून द्यावें. याप्रमाणें एका मोठ्या कोहाळ्याचा ३–४ वेळां उपयोग होतो. ज्यांस द्यावयाचें त्यांस ३–४ दिवस पडसें फार येतें म्हणजे मग औषध बंद करावें. तो रोग बरा होतो.

६६३. **व्रणावर :** कापूरभेंडीची मुळी पोटांत रोज थंड पाण्यांत उगाळून सकाळीं-सायंकाळीं वालाइतकी किंवा जास्त उगाळून लावावी. पथ्य नाचणीची भाकरी किंवा लाल भात असतो. त्याच्या तांदुळाचा भात व तूप हेंही चालेल.

६६४. **उदरावर :** गोकर्ण पांढरी (अगर नच मिळावी तर काळी) तिच्या बिया सुमारें पावलीभार अगर पसाभर वांटून शेळीच्या दुधांतून द्याव्या. नच मिळाल्या तर मूळ वांटून द्यावें. परंतु बियांचा गुण जास्त. याप्रमाणें सकाळ-सायंकाळ ३–४ दिवस द्यावें.

६६५. **केंस येण्यावर :** कापूर लिंबाच्या रसांत खलून चाई पडली असेल तेथें लावा.

६६६. **मुलांची आंकडी, कफ, कृमिनाशावर :** लहान मुलांस डिकेमाली रोज दोन मोहऱ्यांइतकी दुधांत घालावी. अगर १ मोहरीइतकीसुद्धां पुरेल. कधीं कधीं एरंडेल मधांत २ ठिपके द्यावें.

६६७. **रक्त गुदद्वारावाटे पडतें त्यावर :** वडाच्या पारंब्या (कोंवळ्या) वांटून साखर घालून वांटून द्याव्या.

६६८. **घाम बंद होण्यास :** रक्तचंदनाचा काढा मध घालून द्यावा.

६६९. **ताप उतरण्यावर :** बाजरी दळून, थोडें १–२ तोळे पीठ तुपावर कॉफीप्रमाणें भाजून पाणी घालून शिजवावें. पाणी घालून कॉफीप्रमाणें द्यावें. घाम फार सुटेल, परंतु अशक्तपणा येणार नाही.

६७०. **गांठी विरघळण्यावर :** रक्तरोडा, कवड्या ऊद, रेवाचिनीचा शिरा, पुनर्नवा, यांचा लेप गांठीवर द्यावा.

६७१. **अंगवातावर, सर्वांगावर, अर्धांगावर, संधिवातावर :** टाकळ्याचें तेल अत्यंत गुणकारी. ताबडतोब चमत्कार दाखवील.

६७२. **मुलांना आंकडी (आंचके) येतात त्यावर :** सांबरशिंग दुधांत उगाळून थोडें द्यावें. मुलांचें तोंड आल्यास कापसानें ग्लिसरिन चोळावें.

६७३. **कफ विकृतीचा जोर मोडण्यास :** कळकाचीं पेरें असतात तेथें गांठी येतात व तेथून काठ्या फुटतात, त्या गांठी १ तोळा कुटून, इंद्रजव १ तोळा, किराईत १ तोळा, सुंठ १ तोळा, रुईच्या पानाचा रस १ तोळा, व पाव तोळा मध घालून द्यावा. म्हणजे इतरही वांती करता उपयोगी.

६७४. **षंढत्वावर :** १ तोळा हिंगूळ शुद्ध मेंढीच्या दुधांत केलेला, ६ मासे जायफळ, ६ मासे जायपत्री, ६ मासे गोरोचन, ४ मासे कस्तुरी, ६ मासे अफू, शुद्ध केलेल्या आल्याच्या रसांत १ तोळा गांजाचें बूट (शिजवून शुद्ध करून बिया काढून चूर्ण करणें), ३ मासे धत्तुराबीज शुद्ध करून सर्वांचा खल आल्याच्या रसांत करून गोळ्या गुंजप्रमाण बांधून सकाळीं व संध्याकाळीं १–१ गोळी द्यावी. शरीराच्या शक्तीप्रमाणें विड्याबरोबर द्यावी. अगर दुधांतून द्यावी. पूर्ण चेतना येईपर्यंत ब्रह्मचर्य पाळावें.

६७५. **वाळंतरोगावर :** भारंगीचें मूळ आणून तें गाईच्या दुधांत उगाळून रोज ४ मासेप्रमाणें द्यावें. २१ दिवस. **पथ्य**—दूधभात. पाणी देऊं नये. दूधच पिण्यास द्यावें.

६७६. **कोणत्याही मूळव्याधीवर :** बकाणा निंबाच्या काड्या (पानें झाडून टाकलेल्या) कुटून, वस्त्रगाळ चूर्ण करून, गोमूत्रांत गोळ्या बांधाव्यात. दररोज सकाळीं-सायंकाळीं २ गोळ्या घ्याव्या. गोळी ४ मासेप्रमाणें घ्यावी. पाण्याबरोबर घ्याव्या. ७ दिवसांनीं एकदां रेचक घ्यावें. असें तीन वेळां घ्यावें. २१ दिवसांत रोगी (कोणतीही असली तरी) बरा होतो. तूप पुष्कळच खाण्यांत यावें. कोणत्याही तऱ्हेनें तूप खाण्यांत यावें. सुरणाचे काप तळून खावे, व तूपही पीत जावें.

६७७. **वातचक्र (नूतन) याजवर :** कडू निंबाचीं पानें सावलींत वाळवून त्याचें चूर्ण करून (४० तोळे), त्यांत हळदभुकी ५ तोळे घालून, एकत्र खल

करून, बाटलींत भरून ठेवावें. रोज १ तोळा चूर्ण दुधांतून किंवा पाण्यांतून ४–६ महिने घ्यावें. **पथ्य**—दूध-भात.

६७८. **रक्तदोष, गंडमाळा, अपची ग्रंथी, अंगाववरील उपदंश, व्रण, गांठी यांवर (पारिभद्ररस)** : कडूनिंबाच्या बिया (आंतील), एरंडबीज (गोड्या एरंडेल बिया), पारा, गंधक, प्रत्येकीं समभाग घेऊन, केवळ पाण्यांत खलून गोळ्या बांधाव्यात. मात्रा १ ते २ गुंजा, तूप-साखरेंत अगर नुसत्या तुपांत गिळणें. गोळी चावूं नये. दर दिवशीं २ गोळ्या. **पथ्य**—मीठ अगदीं वर्ज्य.

६७९. **गंडमाळा, अपची वगैरे खोल व्रणांवर** : औषध न पोचलें तर त्यांत कडूनिंबाच्या बियांच्या तेलांत वात बुडवून ती व्रणांत आंत भरावी (रोज) निंबाचें तेल निंबोण्या वांटून कढवून करावें.

६८०. **विटाळ सुरू होण्यावर** : काळे तीळ ४–५ तोळे, गुळवेल-सत्त्वाचा काढा रजोदर्शनास द्यावा.

६८१. **शौचास साफ होण्यास, कफावर, मुळव्याधीवर** : ज्येष्ठमध १ औंस, सोनामुखी २ औंस, बडीशेप १॥ औंस, गंधक शुद्ध असा अगर त्याचें फूल १ औंस, साखर (शुद्ध) ६ औंस, हे सर्व मिश्रण करून ३ पासून ६ मासे रोज निजतेवेळीं अगर सकाळीं घ्यावें, कफावर दुधांतून, शौचास वगैरे होण्यास ऊन पाण्यांतून. ह्या औषधांत प्रवाळ घालून मूळव्याधीस द्यावें.

६८२. **रक्तमूळव्याधीवर** : ११ तोळे सोनामुखी, २॥ तोळे ज्येष्ठमध, १ तोळा शुद्ध गंधक, १५ तोळे खडीसाखर, २ तोळे वेलदोडे, ५ तोळे बडीशेप, १ तोळा वंशलोचन, सर्वांचें बारीक चूर्ण करून द्यावें.

६८३. **उंदराच्या विषावर** : चिंचेचें मूळ पाण्यांत उगाळून वर लेप करावा व थोडें पाण्यांत द्यावें. ५–६ दिवसांनीं बरें होईल.

६८४. **थानाच्या सुजेवर** : गणसुरीचें मूळ उगाळून लेप करावा.

६८५. **भगंदरावर** : अगस्त्याच्या बियांचें चूर्ण कांगणेल तेलाशीं मिश्र करून जखमेवर पट्टी बांधावी. गुदद्वारापाशीं फोड वगैरे येतात त्यावरही उपयोगी.

६८६. **महारोगावर, रक्तदोष, उपदंश वगैरेंवर** : गाजर वाळवून, त्याचें वस्त्रगाळ चूर्ण करून गव्हाच्या सत्त्वांत साखर–तूप घालून बरोबर रोज ३ तें ६ मासेपर्यंत घ्यावें. **पथ्य**—व्यवस्थित ठेवणें. तूप-पोळी साखर घ्यावें. इतर फारसें खाऊं नये. पाणी न पितां नुसत्या गाजरावर राहावें, म्हणजे गाजर खाऊन असावें.

६८७. **अपचन, पोट दुखणें वगैरे** : अगदीं जून व मोठा असा कोहळा (कूष्मांड) घेऊन त्याच्या देठाकडील बाजू विभागून युक्तीनें वाटोळी अशी कापून त्यांत बारीक करून उत्तम असा पांढरा हिंग १०–१२ तोळे, व सैंधव (पादेलोण) १२ तोळे, असें घालून गाबडी वर बसवावी. ती चांगली नीट बसवून त्यास मातकापड २–३ लावून उन्हांत वाळवावी. नंतर गुरांच्या पायाखालील (कोरडे)

गवत जेथें टाकतात तेथें ऊन पाहून त्या गवताच्या राशींत कोहाळा मातकापड केलेला ठेवून वर गवत घालावें. याप्रमाणें २०–२५ दिवस अगर महिनाभर कोहाळा उन्हांत ठेवून आंत पाणी झालें म्हणजे तें पाणी हळूच ओतून घेऊन बाटल्या भराव्यात. सदरहू पाणी उत्तम. कोहाळा गवतांत जपून ठेवावा. कदाचित प्राणिमात्र आत शिरून फोडण्याचा संभव असतो. म्हणून आदबशीर ठेवावा.

६८८. **गंडमाळावर** : त्रिफळेचा काढा सकाळ-सायंकाळ ३–४ तोळेप्रमाणें तूप घालून घ्यावा.

६८९. **दूध येण्यास** : कोष्ठ, अश्वगंध, शेंदूर एकत्र लेप द्यावा.

६९० **चामखिळीस उपाय** : चामखिळीवर बोराचा कांटा तुपांत भिजवून निवडुंगाचा चीक लावून रोपावा.

६९१. **ढाळास** : चाफ्याची साल वरून खालीं लावावीं. आणि ४ गुंजा उगाळून निरशा दुधांत द्यावी. २ ढाळ होतील.

६९२. **नारूस** : रुईचें पान पिकलेलें विड्यांतून द्यावें.

६९३. **हिंवतापावर** : हरताळ, चुना, तुळशीचा रस, माक्याचा रस घालून गोळ्या कराव्यात. आणि गूळ थोडा घेऊन त्यांत गोळी द्यावी.

६९४. **डोळ्याच्या फुलास** : तुरटी भाजून, खडीसाखर घालून, डोळ्यांत पूड घालावी.

६९५. **काळजास** : हेदीचा रस (पाला कुटून) संध्येच्या पळीभर द्यावा. **पथ्य**— तूपभात खावा. पेज द्यावी. तेल, तिखट, आंबट वर्ज्य.

६९६. **अनेक नेत्ररोगांवर** : पुनर्नवा, (पांढरा चांगला, तो न मिळाला तर तांबड्या फुलांचा) डोळ्यांत फुलास तुपांत उगाळून, पाणी गळत असेल तर मधांतून, कंड करीत असेल तर माक्याच्या रसांत. डोळ्यांनी दिसत नसेल तर तिळाच्या तेलांत. रातांधळें असल्यास कासाळूच्या रसांत. डोळ्यांत केस असल्यास हळदीची पूड पाण्यांत घालून तिच्या निवळींतून.

६९७. **मण्यारीस** : धायटीच्या पानाचा रस पोटांत द्यावा. चोथा अंगास लावावा.

६९८. **कवळू, उदर रोगांवर** : (१) कोरफडीचा ४ तोळे बलक व हळद तोळा १ प्रातःकाळीं घेणें. (२) बाजारी वडाचें पान, खारीक, द्राक्ष, खडीसाखर यांचा काढा घ्यावा.

६९९. **वायुहारक चूर्ण** : सुंठ १ तोळा, गंधक पूड १ तोळा, चित्रकमूळ २ तोळे, सैंधव १ तोळा, हरडेदळ २ तोळे, हिंग भाजून पाव तोळा, अजमोदा १ तोळे पिंपळी १ तोळा, वावडिंग १ तोळा, जवखार अर्धा तोळा, चवळू हे सर्व जिन्नस निराळे कुटून नंतर एकत्र करून भोजनाच्या वेळीं प्रथम घासांत चिमुटभर घ्यावें. १४ दिवस.

७००. **धावरें, रक्तबाऊ** : (विसर्प) सावरीची साल, आघाड्याचें मूळ, सोनखार (सोनाराकडे असतो तो), हीं सर्व एकत्र करून समभाग पाण्यांत उगाळून लेप करावा. कालवून मिश्रण चांगलें होतें.

७०१. **वांती** : महाळुंगीचें मूळ पाण्यांत द्यावें. वांती राहील. साखर व गुळवेलीचा रस समभाग द्यावा. कोरडी ओकारी राहील.

७०२. **मुळव्याधीच्या मोडांस** : पिंपळीची मुळी पाण्यांत उगाळून लावावी.

७०३. **बहिरेपणावर** : इंद्रावणीच्या फळांतीड १४ बिया तेलांत कढवून तेल कानांत घालावें.

७०४. **कफावर** : वेखंड भाजून कुटून पूड करावी. गुळाचा पाक करून त्यांत गोळ्या बांधाव्यात.

७०५. **काळीज फुगतें त्यास** : काळ्या तुळशीचा रस एक घोट काढून त्यांत टाकणखार १ गुंज घालून द्यावी.

७०६. **आंगावर प्रदर जातो व निद्रानाशावर** : चहा मासा १, रक्तचंदन मासा १, जिरें मासा १, देवदार मासा १, सुंठ मासा १, लवंग मासा १, काडेचिराईत १ मासा, धने १ मासा, बेदाणा १ मासा, यांच्या काढ्यांत खडीसाखर घालून काढा द्यावा.

७०७. **पांढरी धुपणीवर** : केळीचें भस्म, जवऱ्याची पूड, आणि खडीसाखर हीं सर्व जांभळीच्या रसांत द्यावीं. धुपणी जाईल. अगर जांभळीच्या काढ्यात.

७०८. **बहुमूत्रास** : कोऱ्या कोरफडीचा (कुमारी) रस मधमिश्रित द्यावा. बहुमूत्र जाईल.

७०९. **वांझेस गर्भ राहील** : महाळुंगीच्या बिया गाईच्या दुधांत शिजवून खाण्यास द्यावें.

७१०. **धुपणी** : पिकलें केळें तांदुळाच्या धुवणांत द्यावें.

७११. **गंडमाळेस** : समुद्रफेस तुपांत उगाळून गंडमाळेस लेप करावा.

७१२. **ओकारी, ढाळणें** : कुचल्याची गोळी सुमारें २ गुंज सकाळीं गिळावी. वर पुन्हा पाणी द्यावें.

७१३. **आंगांतील ठणका, कळा वगैरेवर** : मोहऱ्या बारीक वांटून त्यांत गूळ घालून दुःखावर गोळी ठेवावी, आणि शेण पट्टीनें शेकावें.

७१४. **गजकर्णास** : आवळ्या गंधक, पारा, सारेखार (कांडीची), हिंगूळ सर्व समभाग घेऊन गाईच्या लोण्यांत खलून लावावें.

७१५. **मूत्रकृच्छ्रास** : पळसाचीं पानें आणून शिजवावीं, व पावशेर काढा घेऊन त्यांत सोराखार पूड घालून द्यावी. शिजलेल्या पानांचा शेक करावा.

७१६. **लहान मुलाच्या पोटांत होतें त्यास** : कोशीच्या किड्याचें घर आणून किड्याचें घर फोडून त्यांतील मळ काढावा. तो मळ गुंजभर घेऊन, त्यांत दोन गुंजा गूळ घालून मुलास द्यावें.

७१७. **पित्तास औषध्र** : पित्तपापडा, द्राक्षें, खडीसाखर, सुंठ, बाळहिरडे हीं कुटून आले-रसांत गोळी बांधावी, सकाळीं द्यावी.

७१८. **वायूस औषध** : पितळी, चित्रकमूळ, पिंपळमूळ, १-१ तोळा, सुंठ पैसाभार हे जिन्नस कुटून पक्का शेर पाणी घालून ४ तोळे द्यावा.

७१९. **अर्धशिशीस** : (१) रिठ्याचा फेंस काढून त्यांत किंचित् गूळ घालून नाकांत ओढावा. उजवीकडे दुःखत असेल तर डावीकडे उपाय करणें, व डावीकडे दुःखत असेल तर उजवीकडे उपाय करणें. (२) बिब्बा फोडून विड्याच्या पानांच्या डेखांस लावावा, आणि डोळ्याच्या कोपऱ्यांत नाकाकडे लहानशी गोळी असते त्याजवर ठिपका द्यावा. दुसरीकडे लावूं नये.

७२०. **मूत्रकृच्छ्र, लघवी अडण्यावर** : गाईचें दूध १४ तोळे घेऊन चांगलें उकळावें. नंतर त्यांत एक लिंबाचा रस उकळी येत असतांच पिळावा. चोथा-पाणी झाल्यानंतर उपररस सात पदरी फडक्यांतून गाळून सात-आठ वेळां भांड्यांत खालीवर करून ओतावें नंतर त्यांत साखर घालून द्यावें.

७२१. **बृहत्पूर्ण चंद्ररस** : पारा (हिंगुलोत्थ) ·||· तोळा, गंधक ·||· तोळा, लोह ·||· तोळा, अभ्रक ·||· तोळा, रोप्य ·||· तोळा, वंग ·||· तोळा, सुवर्ण १/८ तोळा, ताम्र १/८ तोळा, कास्य १/८ तोळा, जायफळ ·|· .तोळा, लवंग ·|· तोळा, वेलची ·|· तोळा, जिरें ·|· तोळा, भीमसेनी कापूर ·|· तोळा, प्रियंगु ·|· तोळा, नागरमोथे ·|· तोळा, विड्याच्या पानाच्या रसांत घोटून विड्यावरोवर गुंजप्रमाण खाण्यास द्यावें.

७२२. **जीर्ण ज्वरावर** : आंवळीचें चूर्ण, सोनामुखी, बडीशेप, सैंधव, अगर पादेलोण, सर्व समभाग घेऊन चूर्ण पावलीप्रमाणं दिवसांतून दोन्ही वेळ द्यावें.

७२३. **मुलाच्या दम्यावर** : इंद्रायणीचें मूळ, थोडी सुंठ दुधांतून अगर पाण्यांतून मुलास पाजावी. दमा बरा होतो.

७२४. **खरूज** : साधी चिंच तुपांतून अगर लोण्यांतून लावली तर खरूज साफ बरी होते.

७२५. **कुत्र्याच्या विषावर** : मगरीची (सुसरीची) चरबी सुमारें मिऱ्याइतकी पिकलेल्या केळ्यांत मध्यभागीं घालून रोज एकदां फक्त सकाळीं गिळण्यास द्यावी. केळ्याचा तुकडा लहानसा घ्यावा. **पथ्य**— तेलकट, तिखट वर्ज्य. दूधभात नुसता, किंवा पोळी वरण खाणें.

७२६. **कुंतल तैल** : पांढऱ्या तिळाचें तेल ८० तोळे, जैतुनचें तेल २० तोळे, बकुल-अत्तर ४ ड्राम, चमेली अत्तर ४ ड्राम, चंदन तेल अस्सल ४ औंस,

गुलाब अत्तर ४ ड्राम, नारसीस रंग ४ ड्राम, गुलाबी अगर इच्छेप्रमाणें घालून तेल तयार करावें. प्रथम पहिलीं २ तेलें चांगलीं मिळवून मग रंग घालावा. नंतर सुगंधी तेलें टाकून मिळवून बाटलींत भरावें. हजार नंबरी तेल होईल.

७२७. **नारूवर** : वेखंड, सुंठ यांचा काढा गूळ घालून रोज द्यावा.

७२८. **वीर्यवर्धक** : पांढरी मुसळी २ तोळे, तालिमखाना ४ तोळे, गोखरूं ६ तोळे, खडीसाखर ८ तोळे, चूर्ण रोज ६ मासे दुधांतून घेणें.

७२९. **क्षयादिकांतील तापांवर** : कुचला चूर्ण (शुद्ध भाजून) ।: तोळा, दालचिनी १ तोळा, मिरें १ तोळा, वंशलोचन १ तोळा, सर्वांचें चूर्ण करून ७२ पुड्या करून रोज ३ द्याव्या. दूध-साखरेंतून कडू निंबाच्या पाल्याचा रस दूध घालून वांटून काढून त्यांत पुड्या द्याव्या. बदामाची खीर वर खाण्यास द्यावी. ताकभात दूधभात खावा. (नाशिक येथें गेल्या वेळीं वासुदेवानंदसरस्वती टेंबेस्वामींनीं सांगितलेलें औषध.)

७३०. **रक्त-संग्रहणी, रक्ती मूळव्याध, रक्ताची (मोडांतून पिचकारी उडणें)** : काळा कुडा याच्या मुळाच्या सालीचें चूर्ण करून ताकाच्या निवळींत किंवा ताकांत रोज ३ वेळां ३–३ मासे दर वेळीं प्रमाणें देणें. अंग बाहेर येणें थांबतें. दहीं, ताकभात खावा. उत्तम अनुभूत.

७३१. **आमांशावर** : धायटीच्या फुलांचें वस्त्रगाळ चूर्ण करून रोज २–३ वेळां पावली-पावलीभार गुळांतून देणें. तांबडी आम असेल तर दुधांतून द्यावें.

७३२. **पोटशूळावर** : (अनुभविक) जव तुपांत खरपूस भाजून चूर्ण करून मधांत रोज २–३ वेळां घ्यावें. शूळ जातो. पथ्य ठेवावें. तूप वगैरे खावें. थंड खाऊं नये.

७३३. **पोटशूळ, आमदोष, अशक्तता वगैरेंवर** : वरधारा १० तोळे, विव्वे ७ कुटून, बारीक चूर्ण करून गुळाबरोबर १४ दिवस खावें. वर ऊन दूध प्यावें.

७३४. **गर्भावरोधक** : पिंपळी, वावडिंग, टांकणखार प्रत्येकीं २–२ तोळे घेऊन, चूर्ण करून, ऋतुस्नानानंतर ७ दिवस गाईच्या दुधांतून सेवन करावें. ५ मासे रोज प्रमाणें.

७३५. **पुष्पप्रद योग** : केशरादि चूर्ण, नागकेशर, व खडीसाखर १०-१० तोळे घेऊन, ६ मासे गाईच्या दुधाबरोबर विटाळशी होण्याच्या अगोदर ७ दिवस सुरू करावें, विटाळ साफ होऊं लागेल.

७३६. **वेडावर, (चित्तभ्रम)** : लवंग १ तोळा, चोपचिनी ।· तोळा, वेळची १ तोळा, गोडें जिरें १ तोळा, उपळसरी १ तोळा, सर्वांचें चूर्ण गाईच्या दुधांत द्यावें.

७३७. **मूळव्याध मोडांस** : डिकेमाली उगाळून लावावी. मोड गळतील. त्रिफळा रोज रात्रीं द्यावी.

७३८. **लघवी होण्यास :** (१) मुळ्याचें पाणी (पाला व कांद्यासह) पाजावें, मूत्र सुटेल. (२) ओंवा–आल्याचा काढा करून देणें, लघवी सुटेल. (३) तीळ, मीठ, वांटून गरम करून ओटीपोटीं शेकावें, लघवी सुटेल.

७३९. **डोळ्यांवर :** उपळसरीचा अर्क डोळ्यांतील झार जाण्यास चांगला.

७४०. **परम्यावर :** सागरगोट्याचा पाला वांटून (पाणी घालून) त्यांत गोमूत्र घालून रोज सकाळीं द्यावा. २ तोळे रस, २ तोळे गोमूत्र घ्यावें. अगर तूप घालावें, मग गोमूत्र नको. ३ दिवस द्यावा.

७४१. **मधुमेहाच्या व्रणावर :** जितसाया नांवाची मुळी (ही वनस्पति कोंकणांत होते) उगाळून लेप करणें.

[पंढरपूर येथील भाऊ सरदार यांचे वडील बापूसाहेब मेहेंदळे, पुणें, यांजकडे होते. त्यांनीं सांगितलेलीं औषधें.]

७४२. **दमा :** १ बिब्याचे ४ तुकडे करून टाकून टांकणखाराची लाही गुंज–दोन गुंजा घालून तें दूध पिण्यास द्यावें. रोज एकदां प्रमाणें ३–४ दिवस द्यावें. दमा साफ कमी होतो. पथ्य–आंबट, तेलकट पदार्थ, मांस वर्ज्य.

७४३. **नारू :** रिठे ७–८–१० भिजत घालून, बिया काढून, सालीचा फेस काढून ७ पानें बिब्यांचीं मांडून त्यांवर तो फेस पोफळाइतका दिसेल असा घालावा. व कात उंची अर्धा तोळा कुटून, त्याची भुकी ७ पानांवर घालावी (फेसावर), व फेस थोडा नारूच्या ठिकाणीं चोळून वरील सात पानें बांधावीं. ३ दिवस सोडूं नये. पाणी लावूं नये. भिजेल असें करूं नये. नारू आंत जळून जातात.

७४४. **सर्पविषावर :** कडू वृंदावनाचा रस, अगर वांटून पाण्यांत कल्क करून कपभर पाजावा. कडू वृंदावन तोळा– दीड तोळा तरी पाहिजे. बाकी पाणी घालावें. वांटून तयार करणें. वांती, जुलाब, होऊन विष उत्तरेल.

७४५. **गलितकुष्ठावर :** नखरंजन बीज, डिकेमाली, पद्मफळ (कमल काकडीचा मगज), बाळहरीतकी, सुपत्री (सोनामुखीचा पाला), मार्कंडिका, सर्वांचें चूर्ण करून त्यांत शुद्ध गंधक १ पुडीस २ गुंजांप्रमाणें घालून, २ किंवा ३ पुड्या दुधांत साखरेंत लोण्यांत तुपांत वगैरे देणें. विशेषतः लोण्याचा चांगला उपयोग होतो. (कुष्ठावर वैद्य मयाशंकर यांनी अनुभवलेलें.)

७४६. **फुटलेल्या भागास (तेल) :** चमेली, मोगरा, ब्राह्मी, कमळ वगैरेचें राळ, शंखजिरें वगैरे घालून वर चोळण्यास द्यावें.

७४७: **शौचास साफ होण्यास व बद्धकोष्ठतेवर :** बाळहरडे रस, व सैंधव वगैरे एका बाटलींत ठेवून महिन्यानें खाण्यास सुरुवात करावी. २–३ बाळ हरडे क्षारासुद्धां खावे. गरम पाणी प्यावें.

७४८. **मुळव्याधींत रक्त पडण्यावर** : कळलावी कंद (लांगली), व शेगळाच्या मुळावरील साल कुटून गोळ्या करून ठेवाव्या. मूळव्याधीच्या रोग्यास बेंबीच्या आसपास पाण्यांत वाटोळा लेप करावा. रक्त पडणें बंद होतें.

७४९. **मधुमेहावरील (अनुभविक काढा)** : वेलची, ज्येष्ठमध, गोखरू, रेणुकाबीज, एरंडमूळ, अडुळसा पानें, पिंपळी, पाषाणभेद (लकडी), दररोज प्रत्येकी ३ मासेप्रमाणें घेऊन यांचा कुटून काढा–निकाढा घ्यावा. ३२ तोळे पाण्याचा ८ तोळे काढा घ्यावा, व तसाच निकाढा सायंकाळीं घ्यावा. त्या काढ्या–निकाढ्यांत २–२ गुंजा शिलाजित घालून घ्यावा.

७५०. **गंडमाळेवर** : कुचला २० तोळे, अजमोदा (ओंवा) २ तोळे, काळें मिरें ।।। तोळा, कडुनिंबपानाचा रस २० तोळे, ८० तोळे तिळाचें तेल घेऊन त्यांत कडुनिंबरस व वरील औषधें कुटून घालावीं. कुचल्याचे आडकित्यानें तुकडे करावे, व तेल शेगडीवर मंदाग्नीनें कढवावें. कुचल्यामुळें वाफ विषारी येईल. करितां तेलाचाचीं (ढवळण्यास) जागें वर तोंडावर, नाकावर पदर बांधून जावें. तेल ४० तोळे राहिल्यावर गाळून बाटलींत भरून ठेवावें. व गंडमाळांच्या ग्रंथीवर कापूस काडीवर गुंडाळून रोज २–३ वेळां चोळण्यास द्यावें. मुळापासून गांठी बसून जातील.

७५१. **भगंदरावर** : वडाच्या कोंवळ्या पारंब्या बारीक वांटून चकती करून भगंदरावर रोज बांधावी. पू वगैरे बंद होऊन छिद्र भरून येईल. ७–८ दिवस रोज करावें.

७५२. **नारूवर** : दालचिनी कुटून, वांटून पाण्याचा हवका मारून नारूवर बांधावी. बिब्याचीं पानें वर बांधावीं. ३–४ दिवस.

७५३. **ज्वरावस्थेंत पोट साफ करण्यास** : (सारक; युनानी नुस्खे) शुद्ध पारद, शुद्ध गंधक, (दोन्हींची कज्जली करून) कुटकी १५ तोळे (वस्त्रगाळ), कोरफडाचा गर १५ तोळे, गूळ १५ तोळे, खल करून गोळी हरभऱ्याएवढी मोठी करून ऊन पाण्याबरोबर २–३ गोळ्या रात्रीं किंवा दिवसांतून २–३ वेळां देणें.

७५४. **मधुमेह (डायाबिटिस) यावर** : कलखापरी (तंजावरास मिळते ती; पांढुरकट तुकडे असतात ती) बारीक करून गोमूत्रांत ७ दिवस भिजत घालावी. नवें गोमूत्र रोज घालावें. नंतर धुवून कोरफडाच्या रसांत खलून त्याचा गोळा करून शेणींत १ पुट द्यावें. निवाल्यावर बारीक करून नारळाच्या पाण्यांत १५–२० दिवस खल करून वाळवून मुकीच ठेवावी. ग्रहाळ्याचें पाणी घ्यावें. रोज ४–५ गुंजा सदरहू औषध २० तोळे ग्रहाळ्याच्या पाण्यांत २।। तोळे खडीसाखर घालून द्यावें. संध्याकाळीं गाईच्या २० तोळे दुधांत २।। तोळे खडीसाखर घालून त्यांत ४ गुंज शिलाजित द्यावें. अदमुरें दहीं भात खावा. कलखापरीऐवजीं जस्त भस्म २ गुंजा घेतलें तरी लागू पडेल असें वाटतें. कारण जस्त भस्म मेहावर प्रशस्त आहे.

७५५. **दुखापतीवर तेल** : कायफळाचीं सालें बाजारांत जाड तुकडे विकत मिळतात, त्यांचें चूर्ण १ रत्तल वस्त्रगाळ करून, मोहरी (शिरसाचे) तेलांत घालून तें करपेपर्यंत मंद आंचेवर तयार करावें; व थंड झाल्यावर गाळून ठेवावें. त्याचा उपयोग सांधे, गृध्रसी वगैरे वायु, गुडघे, ढोपर, आमवात यांवर करावा. रोज चोळावें, व तेलांत करपलेला चोथा पुरचुंडीत बांधून गरम तव्यावर पुरचुंडी गरम करून तिनें शेकावें. उपयोग चांगला होतो. कायफळ सालीच्या चूर्णांत तूप तयार करून रोज २ तोळेप्रमाणें पिण्यास द्यावें. (कोल्हापूर येथील कै. भिकुशास्त्री द्रवीड यांचा पाठ.)

७५६. **डांग्या खोकल्यावर** : कारिंटे तुकडे करून वाळवून त्याची काळी राख करून ठेवून गुंज गुंज मधांतून चाटण्यास द्यावी. रोज २-३ वेळां. मुलांचा व मोठ्यांचा डांग्या खोकला जातो.

७५७. **मूतखड्यावर** : पांढऱ्या चंदनाचा काढा देऊन रक्तचंदनाचाही काढा चालतो.

७५८. **गंडमाळा, कास-श्वास, भगेंद्र यांवर** : कडू कंवठीच्या बिया ३० तोळे घेऊन, बारीक कापून काचरी करून ठेवावें. तांब्याचा पत्रा लाल करून लिंबाच्या रसांत विझवून (पत्रा ३२ वेळ तापवून विझवावा.) शुद्ध करून ठेवावा. विड्याच्या पानाच्या रसांत पारा मर्दन करून त्याचा लेप करून त्याचा लेप जुन्या पैशावर करावा. (पैसा किंवा पत्रा शुद्ध करून ठेवावा.) पांढरा होईल. शरावांत १५ तोळे कडू कंवठीच्या बिया खालीं घालून वर पैसा अगर पत्रा ठेवून त्यावर पुनः १५ तोळे कडू कवठीच्या बिया घालून झांकण बंद करून सांध्यास मातकापडें ७ करून गजपुट शेणीचें द्यावें. भस्म होईल तें गाईच्या लोण्यांत १ तांदूळ सकाळ-संध्याकाळ रोज २ वेळां द्यावें. १० दिवस द्यावें. भगेंद्र, पार्श्ववायूवर चांगला उपयोग होतो.

७५९. **धातुवृद्धी व शक्ती वाढण्यावर** : लोहभुकी १५ तोळे कांचेच्या पेल्यांत घालून त्यावर १ कप आंबट कागदी लिंबाचा रस ओतावा. २ दिवस ठेवून लोह धुवून स्वच्छ करून उन्हांत वाळवावें. नंतर कपांत ठेवून आंबट डाळिंबाचा रस १ कपभर घालून १५ दिवस रोज उन्हांत ठेवावें. म्हणजे सुकेल. पुन्हां रस घालण्यास नको. शरावांत ठेवून मातकापडें ७ सांध्यांस फक्त करावीं. वाळवून पुनः पुनः करावें. याप्रमाणें करून गजपुट द्यावें, शेणींत करावें. पांढरें लोहभस्म होईल. २० दिवस रोज २ वेळां १–१ तांदुळभार तुपांत द्यावें. जरा जाते. फार पथ्य नाहीं. इच्छेप्रमाणें खावें. दूध, तूप, दहीं, वगैरे खावें.

७६०. **संधिवात, पोटांतील वात, सूज, ठणका, आमवातावर** : रस-कापूर बारीक करून बशींत अंगावरच्या दुधांत २४ तास उन्हांत ठेवून शुद्ध होतो. (देशी रसकापूर चांगला.) पैकीं अर्धा तोळा घेऊन २–२ तोळे एरंडेल तेलांत टाकून ४८ तास घोटावा. नंतर तें रसकापूर घोटलेलें तेल ६० तोळे एरंडेल तेलांत

मिश्र करून ढवळावें. सर्व तेल पांढरें होईल. त्यांत सोरेखार चुना झालेला १ गुंज फक्त गुरुभस्म म्हणून मिळवावा. बाटलींत भरून ठेवावें. आठवड्यांतून २ वेळां रविवारीं–गुरुवारीं सकाळीं फक्त तोंडांत संध्येची अर्धी पळी सोडून गिळावें. पांच मिनिटें वर कांहीं खाऊं नये. मग वाटेल तें खावें, प्यावें, जेवावें, सर्व चालेल. अशक्त सशक्त होईल. गर्भार बाईसही उत्तम. अंगांतील रोग जातात. सशक्तपणा १ महिन्यांत येईल. भूक चांगली लागेल. चोळण्यासही उत्तम. व्रणही रसकापुरामुळें बरा होतो. तात्पर्य, व्रणांतही भरावा.

७६१. **ताप, विषमज्वरावर आमलक्यादि चूर्ण** : आंवळकटी, बारीक पिंपळी, हरड्याची साल, चित्रकमूळ (साल), सैंधव, सर्व समभाग करून, चूर्ण करून ठेवावें. ताप व विषमज्वरांत, सागरगोट्याचें भाजून केलेलें चूर्ण ·।।· तोळा मिळवून देणें.

७६२. **मुरडा थांबण्यास** : बारीक दुधी अगदीं लहानपानाची, मिरें घालून वांटून पाणी दिलें तर एक दिवसांत गुण येतो.

७६३. **गर्भाशयशुद्धि, अल्पार्तव, गुल्म वगैरेंवर** : शुद्ध हिंगूळ ५ तोळे, टांकणखार लाही ५ तोळे, त्रिकटु १५ तोळे, काळा टोळ्या बोळ १ रत्तल (४० तोळे), आल्याच्या रसांत खल करून चंद्रप्रभेप्रमाणें गोळी करून वाळवून ठेवणें. दुधांत अगर पाण्याबरोबर २ गोळ्या बारीक करून खाणें, रोज दोन वेळां. सकाळीं वर तीळ-गूळ खाणें, व सायंकाळीं पिंपळी व सुंठीचें चूर्ण मधांतून गोळ्यांवर खाणें. शौचास साफ होतें.

७६४. **प्रमेह, कास-श्वास, विषमज्वर, फूप्फुसाची अशक्तता, हृदयाची कमजोरी वगैरेंवर दिव्य रसायन** : अभ्रकभस्म १ मासा, लोहभस्म १ मासा, वंगभस्म २ मासे, प्रवाळभस्म ४ मासे, गुळवेलसत्त्व ४ मासे, चांदीचा वर्ख ४ मासे, खडीसाखर १६ मासे, १ गुंज ते ४ गुंजांपर्यंत सर्व घोटून ठेवावें. मलई, मध, आल्याचा रस वगैरे अनुपान. वारंवार पडसें, सर्वसाधारण अशक्तता दूर होते.

७६५. **आमांश व परसाकडे जास्त होणें यांजवर प्रवाहिका** : बाळहरडी तुपावर भाजून चूर्ण करून समभाग पिठीसाखर मिळवून रोज २–३ वेळां देणें. अवरोध नाहींसा होतो. याबरोबर बडीशेप भाजूनही चूर्ण घातलें तर मुरडा नाहींसा होतो.

७६६. **बद्धकोष्ठता, प्रवाहिका यांवर** : पिकलेल्या केळयास साखर लावून खाण्यास द्यावें.

७६७. **मुतखडा पडण्यावर** : चंदनाच्या सालीचा (चुऱ्याचा) काढा दगडीबोर (हजरत बेर) व जवखार घालून द्यावा.

७६८. **शौचास साफ होण्यास** : बाळहरडे एरंडेल तेलांत तळून अगर भाजून, चूर्ण करून त्यांत गुलाबकळीचें, व थोडें बडीशेपेचें चूर्ण घालून गुळांत गोळी सकाळीं द्यावी. जवखार, मध, पिंपळी, आल्याचा रस, कफास अनुपान.

७६९. **कफावर** : वेखंड, पुष्करमूळ, मायफळ, वावडिंग, कांकडशिंगी, सुरवारी हरडा, यांचें चूर्ण कोरफड रसांत कवडीभस्म घालून चाटण करणें, किंवा गोळ्या करून देणें.

७७०. **अशक्तता, क्षय वगैरेवर** : शतावरीचा एक्स्ट्रॅक्ट, सोन्याचा वर्ख, अंबर, कस्तुरी रसपर्पटी, शिलाजतु यांचा गुलाबपाण्यांत खल करून देणें. उत्तम योग.

७७१. **स्त्रियांच्या आर्तव वगैरेवर** : एळ्याबोळ, मायफळ, हिंगाची लाही, सागरगोट्याचें चूर्ण देणें.

७७२. **रक्त वाढण्यास** : (१) पिंपळाची लाख कोहोळ्याच्या रसांत देणें. (कोहळा भुरा, पापडास पाणी घेतात तो). (२) लाख रोज २–३ गुंजा द्यावी. कोहोळ्याचें पाणी १ औंसपर्यंत चालेल. त्यांत मध-साखर जरूर तर घालावी.

७७३. **तापावर** : पित्तपापडा ३ तोळे, नागरमोथे १ तोळा, कडु निंबाची अंतरसाल १ तोळा, काळीं द्राक्षें १ तोळा, यांचा काढा १ रत्तल पाण्याचा ५–७ तोळे करून द्यावा. (अजमलखान, दिल्ली)

७७४. **रक्तवाऊ, धांवरें, एकदम नागिणीसारखी वळी लाल होणें, सुजणें, यांजवर** : काजऱ्याची बी उगाळून लेप केल्यानें गुण आला. अनुभविक.

७७५. **सायटिका, कमरेच्या त्रिकास्थिपासून कळा मारतात** : पायीं चालणें कठीण जातें, त्याजवर बकऱ्याच्या पायाच्या नळ्या आणून चेंचून त्यांचा सुरवा काढून मिरें-मुकी, तुपाची फोडणी, लसूण वगैरे घालून द्यावा. कळा ८ दिवसांत थांबतात.

७७६. **कर्णरोगनाशक तेल** : कोष्ठ, सुंठ, वेखंड, हिंग, बडीशेप, शेगटाच्या शेंगांतील बी, शेंदेमीठ, सर्व बारीक करून त्याच्या चौपट मोहरीचें तेल घालून, व मोहरीच्या तेलाच्या चौपट बकऱ्याचें मूत घालून फक्त तेल राहीपर्यंत कढवून ठेवावें व गाळून कानाच्या अनेक रोगांवर उपयोग करावा.

७७७. **कर्णस्रावावर** : तांबटी तुरटी (लाल फटकरी) फुलवून बारीक चूर्ण करून १–२ गुंजा वाहात्या कानांत घालून वर कापूस बसवावा. रात्री तेल (तिळाचें अगर चमेलीचें) जरा गरम करून कानांत घालावें. सकाळीं गरम पाण्यानें कान धुवावा (पिचकारीने नव्हे) व कापसानें पुसावा. दुसऱ्या दिवशीं महाळुंगाच्या रसांत थोडा सज्जीखार घालून कानांत घालावा. पुन्हा तुरटीचें चूर्ण व तेल घालावें. याप्रमाणें ४–५ दिवसांत कान वाहणें बंद होईल. पाण्याच्या धारेनें कान धुवावे.

७७८. **ताप, खोकला, क्षय वगैरेंवर :** हिंगुळाचा खडा अगस्त्याच्या (तांबडा उत्तम) फुलांच्या रसांत घोटून गोळी करून पुन्हा कढईत ठेवून रसाचा चुवा देणें. ४ प्रहर घोटून, ४ प्रहर चुवा (अभिषेक देणें). १० ते २० तोळे रस लागेल. तांदुळाइतकी मात्रा देणें.

७७९. **कफ पडण्यावर :** खाजकोलतीचीं मुळें (मुळावरील साल), अडुळशाच्या मुळावरील साल, कापशीच्या मुळावरील लाल, काळीं मिरें हीं सर्व समभाग घेऊन वस्त्रगाळ चूर्ण करून ठेवावें. पावलीभार कमीसें मधांतून द्यावें.

७८०. **कर्णनाद (कानांत गुं गुं, फस्फस् आवाज होतो) त्यावर :** लसूण अगर कांदा-रस, आल्याचा रस, हिरव्या केळ्याचा रस, कोरफडाचा रस, प्रत्येक ३–३ तोळे, तिळ-तेल ५ तोळे, आगीवर गरम करून मग थंड तेल मिळवावें. तेल ५ तोळे राहील इतकें मंद कढवावें. कानांत घालावें. तेलाऐवजीं तूपहि चालेल.

७८१. **कृमि नष्ट होण्यावर :** मुलांस ज्येष्ठमध चूर्ण २ तोळे, ओव्याचें चूर्ण १ तोळा, ओव्याचें चूर्ण ३ दिवस कोरफडाच्या रसांत भिजवून, वाळवून मग मिश्र करावें. तुळशीच्या रसांत पुड्या करून देणें. कफ वमन होऊन भूक लागेल.

७८२. **इसब, नायटे वगैरेंवर :** बांवची (काळ्या बिया), टाकळ्याचें बीं, दगडी हरताळ, हीं तीन समभाग बारीक कुटून जर १० तोळे घेतलीं, तर पारा १ तोळा, आंवळसार गंधक १ तोळा, दोहोंची कज्जली करून त्यांत वरील १० तोळे चूर्ण मिळवून देतेवेळीं लोणी घालून मलम करणें. पोटीस बांधून मग मलम चोळण्यास द्यावें. इसब जातो. गुणकारी.

७८३. **गळ, फूल, सारा, लाली, पिटपिटणें, प्रकाश सहन न होणें, यांजवर :** डोळ्यांवर उत्तम सोंगटी. बैरागी फकीरी दवा, करंजाच्या बियांचें बारीक चूर्ण करून तांबड्या पळसाच्या फुलांच्या रसांत घोटून बारीक सोंगट्या लांबट करून ठेवाव्या. डोळ्यांस पाण्यांत उगाळून रोज लावणें उत्तम.

७८४. **: डोळ्यांच्या हजारों विकारांवर :** हिंगणबेटाची साल पाण्यांत उगाळून रोज डोळ्यांत घालावी. नाशिक येथें शंभर वर्षांचा एक ब्रह्मचारी भेटला होता,–त्याचा योग आहे. पळसाच्या फुलांच्या रसांत हिंगणबेटाच्या सालीची कुटून सोंगाटी करून ठेवावी असें वरील पाठावरून वाटतें.

७८५. **पोटशूळावर :** हिंगणबेटाच्या बिया बारीक वांटून सुंठ व हिंगाची लाही समभाग घालून गोळ्या करून बोराएवढी गोळी गुळांतून द्यावी.

७८६. **मूळव्याधीच्या मोडावर :** कडूनिंबाच्या आंतरसालीचा काढा करून कोमट काढ्यानें माकड हाडापासून (चौक) गुदद्वारापर्यंत शेकावा. ४–५ दिवस करावें. मोतीचुराचे लाडू फक्त खावे. दुसरें कांहीं खाऊं नये. मोड बारीक होऊन गळून पडतात. काढा ७–८ शेर पाण्याचा दोन शेर रोज करून द्यावा.

७८७. **मस्तकाच्या विकारावर (नस्य) :** काळ्या तिळाचें तेल २० तोळे, माका रस २० तोळे, सैंधव २ तोळे, सर्व कढवून तेल शिल्लक राहिल्यावर गाळून नस्य करावें. स्वर शुद्ध होतो. कृमि मरतात. पथ्य—मुगाचें कण, पोळी भाकरी खावी. नाकांतून पाणी गळणें, दाट पडसें येणें, मिथ्या दुःखणें यांवर उत्तम आहे.

७८८. **दमा-श्वासावर :** उपळेट (सुगंधी कोष्ठ), पुष्करमूळ यांचें चूर्ण मधाबरोबर देऊन दमा श्वास गेला. ज्येष्ठमध व बेहेड्याचें समभाग चूर्ण करून मधाबरोबर २ ते ३ वेळ दिलें असतां कफ सुकलेला निघून जातो, व उर्ध्वावाटे बाहेर पडतो.

७८९. **शूलावर योग :** काळीं द्राक्षें बिया काढून समतोल खडीसाखर मिळवून त्याची वांटून लगदी करावी, व त्यांतून अग्निकुमार संजीवनी दिल्यानें शूळ तत्काळ बरा होतो.

७९०. **नेत्ररोगांवर :** बाळहिरडे, अगर सुरवारी हिरड्यांची साल, अगर साध्या हिरड्याची साल, समभाग खडीसाखरेशीं वांटून एका बाटलींत ठेवावी, व त्यांत भिजेल इतकें गुलाबपाणी घालून उन्हांत ठेवावी. चांगलें मिश्रण झाल्यावर त्यानें अंजन डोळ्यांस काजळाप्रमाणें लावावें. सर्व विकार जातात.

७९१. **अनंत उपयुक्त, दीर्घायुकारक, विंशति व शताधिक प्रमेहांवर अगदीं चमत्कारिक व अत्यंत शक्तिवर्धक योग :** (अष्टमूळचूर्ण) : (१) केवडी-मूळ, आम्रमूळ, पिंपरमूळ, जांभळीचें मूळ, बाभळीचें मूळ, आमसुलीचें मूळ, कडूनिंबाचें मूळ, व महाळुंगीचें मूळ घ्यावें, सर्व समभाग चूर्ण गाईच्या ताकाशीं रोज अर्धा अर्धा तोळा २ वेळां देणें.

७९२. **मंदाग्नि, रक्ताल्पता वगैरेंवर (योग) :** हिंगाष्टक चूर्ण २ मासे, २॥ तोळे लोण्याबरोबर सकाळीं देणें. सायंकाळीं सीतोपला २ मासे, सुवर्णमालती-वसंत २ गुंजा, मधाबरोबर देणें.

७९३. **तोंडावरील तारुण्यपीटिकांवर :** जायफळ लिंबाच्या रसांत उगाळून लावणें.

७९४. **नवसागराचें तेल :** नवसागराची कांडी २ तोळे एका मोठ्या वांग्यांत मध्यें भरून वर ओला आटा (भिजवलेली कणीक) लावून तोंड बंद करावें व दुसऱ्या बाजूस वांग्यास सुईनें चाळणीप्रमाणें भोकें पाडून कांशाच्या थाळींत कडक उन्हांत ठेवावें. म्हणजे छिद्रांतून थाळींत पातळ पदार्थ उतरेल तें नवसागराचें तेल.

७९५. **क्षयरोगावर अनुभविक औषध :** अडुळशाच्या सालीचें चूर्ण १० तोळे, ज्येष्ठमध चूर्ण ५ तोळे, बारीक पिंपळीचें चूर्ण २॥ तोळे, वंशलोचन १॥ तोळा, दालचिनी चूर्ण ७ मासे, केशर ४॥ मासे, मोतीभस्म २। मासे, कान्त लोहभस्म ॥ तोळा, याप्रमाणें औषधी घेऊन तीं सर्व भस्माप्रमाणें एकजीव करावींत, व मधाशीं खल करून ४ गुंजप्रमाणें गोळ्या कराव्यात. अगर मधांत मिसळून चाट

पाकाप्रमाणें अवलेह करावा. क्षयरोग्यास शक्तीप्रमाणें ·।।· तोळ्यापासून १।। तोळ्या-पर्यंत दर दिवशीं २ वेळां द्याव्यात. गोळ्या करणें झाल्यास गाईच्या दुधांत उगाळून खडीसाखर घालून द्याव्यात, म्हणजे साध्य व कष्टसाध्य क्षयरोगी लवकर सुधारतो.

७९६. **क्षयरोगावर शास्त्रोक्त मृगनाभ्यादि वटी** : ही वटी शास्त्रशुद्ध रीतीनें तयार केल्यास ती क्षयरोगावर चांगला परिणाम घडवून आणते असा अनुभव आहे. पाठ खालीलप्रमाणें : कस्तुरी उंची ६ मासे, मोती १ तोळा (अस्सल), जायपत्री १।। तोळा, उंची केशर २ तोळे, जायफळ २ तोळे, कागदी वेलची दाणे २ तोळे, अक्कलकारा २ तोळे, कंकोळ २ तोळे, भीमसेनी कापूर ६ मासे, शुद्ध काजरा बी १ तोळा, सुवर्णवर्ख १० पानें, चांदी वर्ख २० पानें, याप्रमाणें औषधी घेऊन प्रथमतः मोती गुलाबपाण्यांत घालून भस्माप्रमाणें विरून जाईपर्यंत खल करावा. ज्या औषधींचें वस्त्रगाळ चूर्ण करणें असेल त्यांचें चूर्ण करून घालावें. तत्पूर्वीं वर्ख मिळवून तो बारीक करून घ्यावा, व मग सर्व चूर्ण मिळवून गोळ्या होण्याएवढ्या बारीक खल करून १ गुंजप्रमाण गोळ्या कराव्यात. या गोळ्या पथ्यशीर वागवून घेतल्यास क्षयारंभीं वाटणारी अशक्तता, ज्वर, श्वास, कास वगैरे क्षयान्तर्गत त्रासदायक विकार नष्ट होतात. गोळ्या घेणें त्या गाईचें दूध, मध, आलें, साखर, अडुळसा रस, व मध या अनुपानांतून द्याव्यात. हें औषध गुणदायी आहे. तें स्वतःचें खल संस्कारी पाहिजे.

७९७. **कफ, श्वास, कासावर** : १० तोळे सैंधव बारीक करून रुईच्या चिकांत खलून त्याचा गोळा बनवावा, व तो ५ ते ६ रुईचीं पानें घेऊन त्यांत लपेटून त्यावर शेणमाती मिश्रित करून त्याचा १।। ते २ अंगूळ जाड लेप करावा, व रस-रशीत कोळशाच्या आगींत ठेवून द्यावा, व चांगला भाजून निघाल्यावर काढावा. थंड झाल्यावर त्यांतील सैंधव काढावा, व वेळीं २ गुंजाप्रमाणें मधाशीं अगर आलें-खडीसाखर यांशीं सकाळ-संध्याकाळ द्यावा. म्हणजे श्वास, कास वगैरे विकार बरे होतात.

७९८. **कौलूच्या वाढीवर** : नवसागर १ तोळा, टाकणखारलाही १ तोळा कलमी सोरा १ तोळा, बारीक पिंपळी १ तोळा, रेवाचिनी १ तोळा, जवखार ९ मासे, व सैंधव ९ मासे, हीं बाजारी द्रव्यें आणून काटेकोर फडाच्या (कुमारी) रसांत खल करून गोळ्या १ गुंज प्रमाणांत कराव्यात. सकाळ—सायंकाळ गरम पाण्यांतून द्याव्यात. कौलू यकृत बरा होतो.

७९९. **व्रण भरून येण्यास मलम** : पिंपळाच्या सालीची राख वस्त्रगाळ करून ठेवावी. पांढरें मेण १ तोळा, व शुद्ध तिळाचें तेल १० तोळे, मंदाग्नीवर ठेवून मेण तेलांत मिळवून गेल्यावर खालीं उतरून त्यांत वरील पिंपळसालीचें भस्म थोडथोडें घालून जलदीनें ढवळावें. याप्रमाणें तें मिश्रण मलमाप्रमाणें जाड होईपर्यंत राख घालावी.

८००. **मुळाच्या डब्यावर (कच्छपोदरावर)** : पोपयाचा चीक मधांतून देणें. पिंपळी, जवखार चूर्ण, गोमूत्रांतून द्यावें. रक्तरोडा, पिंपळी, बाळ-हरडीचा काढा खार घालून द्यावा.

८०१. **उदावर** : रत्तल १ गोमूत्र मध घालून (२–३ तोळे मध) देऊन उदरी (उदरपीडित) २–३ बरे झाले. एक पौंड दूध रोज फक्त द्यावयाचें. १५ दिवसांनंतर २ पौंड दूध द्यावें.

८०२. **यकृत प्लीहेवर** : पुनर्नव्याच्या काढ्यांत गोमूत्र घालून द्यावें.

८०३. **तोंडावरील पुळ्या वगैरेवर** : काळें जिरें (कडू जिरें) गोमूत्रांत वांटून चोळलें असतां पुळ्या सर्व जातात.

८०४. **श्वेतकुष्ठावर** : गोमूत्र, कडू जिरें यांचा रात्रीं लेप करून सकाळीं गोमूत्रानें धुऊन टाकावें. श्वेत डाग कमी होत जातात.

८०५. **पोटांतील शूळावर** : वीट तापवून तीवर गोमूत्र शिंपून फडका गोमूत्रांत भिजवून यकृत शेकावें. त्यानें लवकर फरक पडेल. पोटांतील शूळ वगैरें-वरही गोमूत्र उत्तम आहे.

८०६. **शक्तिवर्धक** : पारा १, गंधक १, कळलावीचा रस व पांढरा हुळहुळ रस (पांढरी तिळवण), यांच्या रसांत खल करून उडदाप्रमाणें गोळी बांधून ठेवावी. दिवसांतून २ गोळ्या दुधाबरोबर गिळण्यास द्याव्यात. जाग्यावर बसलेल्यासही चाल-ण्याची शक्ती येते.

८०७. **दम्यावर** : रुईच्या फुलांतील मोख सात, व लवंगा सात, बारीक कुटून गोळ्या कराव्या, व ऊन पाण्याशीं द्याव्या. दमा राहतो.

८०८. **हिंवतापावर** : नवसागर (भाजलेला अगर उडवलेला) व सोन-गेरू विड्याच्या पानांत देणें.

८०९. **किडे मारण्यास** : फटकी (तुवारिका) टाकावी.

८१०. **बहुमूत्र शमण्यास** : गंधक गुळाबरोबर द्यावा.

८११. **वाहत्या कानावर** : कडू एरंडाचा चीक कानांत घालावा. कान बरा होतो. अनुभव आहे.

८१२. **श्वासावर** : ओंवा व हळकुंड कुटून चहाप्रमाणें गूळ घालून काला करून द्यावा. दमा साफ बरा होतो.

८१३. **खोकल्यावर** : रुईचा चीक ५ तोळे, बाजरी १ तोळा, ३ दिवस चिकांत टाकून मग त्याची लुगदी करून मखमलीच्या कपड्यांत बांधून ती पुरचुंडी शरावांत किंवा बुडकुल्यांत ठेवून पुट द्यावें. गोवऱ्याचें उत्तम, अगर कोळश्याचेंही चालेल. नंतर तें खलून बाटलींत ठेवून मुगाइतकें भस्म मधांतून रोज दोन वेळां चाटावें. कसाही खोकला जातो. (जोधपूरच्या धर्मशाळेंत वैरागी उतरले होते तेथें टांगेवाल्यास त्यांनीं दिलेलें औषध हें आहे. ताबडतोब खोकला गेला.)

तोरस्करांच्या बाडांतील उतारे

८१४. **नारूवर :** तुरटीची भुकी साखरेच्या बरोबर २–३ दिवस द्यावी.

८१५. **धुपणी बंद होण्यास :** मायफळाची पावडर करून त्याची फडक्यांत पुरचुंडी करून योनींत ठेवावी.

८१६. **परम्यावर :** सागरगोट्याच्या पाल्याचा रस तुपांतून द्यावा.

८१७. **पोटांतील डब्यावर :** वांकेरीच्या भात्याचें चूर्ण दुधांतून दिलें असतां चांगला उपयोग होतो.

८१८. **चाई पडते त्यावर :** (चाई म्हणजे केंस जाऊन पांढरी जागा होते ती) अफूचें पाणी चोळावें.

८१९. **धांवऱ्यावर :** सागाची ओली साल पाण्यांत उगाळून लेप करावा, व पोटांतही द्यावें.

८२०. **रक्ताशावर :** नागकेशर १ तोळा, वेलची १ तोळा, बाळहरडे २ तोळे, कोरफडीच्या रसांत टाकून वाटाण्याएवढ्या गोळ्या कराव्यात, व दिवसांतून ३ वेळां १–१ गोळी द्यावी.

८२१. **मुळव्याध :** कडूनिंबाच्या बियांतील मगज १ तोळा, हिरा हिंग $\frac{1}{4}$ तोळे, रसवन्ती $\frac{1}{2}$ तोळा, बारीक करून वाटाण्याएवढ्या गोळ्या करून द्यावें. मूळव्याधीवर उत्तम.

८२२. **अतिसार, मुरडा, आमांश, संग्रहणी, या सर्वांवर** (त्रिविक्रम रस) **:** अफू, हिंग, कात सर्व समभाग घेऊन आल्याच्या रसांत खलून गोळ्या कराव्यात. उत्तम गुणकारी.

८२३. **दंतधावन :** बकुळीची साल, कोरांटकीचीं मुळें (चूर्ण), बदामाच्या सालीची राख, रिंगणी जाळून राख करून दांत घांसणें. दात उत्तम होतात.

८२४. **स्वर बंद होण्यावर पौष्टिक योग :** पांढऱ्या शेवरीची साल गाईच्या दुधांत (निरसें दूध) उगाळून जिरें व पिठीसाखर घालून १४ दिवस द्यावें. सकाळ व संध्याकाळ.

८२५. **धुपणी प्रदरावर :** दारूहळदीच्या काढ्यांत मध घालून शिलाजित २–३ गुंजा देणें. अगर चंद्रप्रभा १ गोळी देणें.

८२६ **: डोळ्याच्या मोतींबिंदूवर :** चिनई पेल्याचा अगर जुन्या वरणीचा तुकडा उंसाच्या शिरक्यांत अगर रसांत उगाळून नेमका मोतीबिंदूवर रोज लावावा. आंत झिजत जातो.

८२७. **मोतींबिंदूवर :** नाइटी दुधीचा चीक रोज लावून मोतीबिंदु गेला असें ऐकलें आहे.

८२८. **दम्यावर :** धोतऱ्याच्या एका पानाचा रस मलईत फक्त एकदां देणें.

८२९. **नवतारुण्य येण्यास ब्रह्मचारीच्या बाडांतून (औषधिकल्प) :** सफेत मिरेंचूर्ण ३ तोळे, सुंठ ३ तोळे, पंजाबी सालममिश्री ३ तोळे, जटामासी ३ तोळे, खुरासनी ओंवा ३ तोळे, अक्कलकारा ३ तोळे, ६ औषधी १८ तोळे कत्र-गाळ चूर्ण करून ठेवावी. केशर उत्तम १॥ तोळा, अफू १॥। तोळे, मध १ बाटली (१॥ पौंड). **कृती :** अफूचे लहान लहान तुकडे करून अर्ध्या बाटलीभर पाण्यांत ते तुकडे भिजत ठेवून नंतर कपडछान करून (वस्त्रावर गाळून) तें पाणी घ्यावें. नंतर तें पाणी अर्धी बाटली व मध १ बाटली लोखंडाच्या कढईत कढवावें. कढवून १ थेंब लाकडावर सोडून पाहावा. पाणी जळून तार येईपर्यंत कढवावें. कढई उतरून थंड पाण्याच्या परातींत ठेवून त्यांत चूर्ण केशरासुद्धां सर्व थोडें थोडें ढवळीत जावें व घोटून घोटून एकजीव करून बरणींत ठेवावें. मात्रा १ चण्याप्रमाणें (२ गुंजा सुमारें) दुधाबरोबर खावी. दूध प्यावें, दुसरें पथ्य कांहीं नाहीं. खाईल त्याचें रक्तच बनत जाईल. अफूयुक्त औषध मागें पांडुरोगावर देऊन चांगला गुण आला.

८३०. **खोकल्यावर :** डिकेमालीचें चूर्ण मधांत चाटणें.

८३१. **आम्लपित्तावर :** लिंबाच्या फाकीवर डिकेमाली घालून, गरम करून चोखावी. एका फांकीवर साखर घालावी.

८३२. **कफ, छाती हालणें, फुप्फुसांतील कफ सुटण्यावर :** कोंबडीचें ताजें अंडें फोडून (रात्रीं घातलेलें किंवा २–३ तासांपूर्वीं) त्यांतील बालाइतकें पाणी संध्येची अर्धी पळी सुमारें घेऊन, त्यांत थोडी हळदीची भुकी व थोडा मध किंवा गूळ घालून लहान मुलांस पाजावें. म्हणजे रोज १ वेळां याप्रमाणें २–३ दिवस घालावें. किंवा लहानास ४–८ दिवशीं मधून मधून घालीत जावें. पाणी पातळ असेल तितकें चांगलें. बलक घट्ट नसावा. तात्पर्य, अगदीं ताजें अंडें असावें.

८३३. **डबा, कफ, घुसमटणें, घुरघुर, सर्व कफ विकारांवर :** कोंबड्याची विष्ठा वालभर सुमारें घेऊन अर्धा तोळा गोमूत्रांत मिळवून कालवून गाळून मुलास पाजावी. झाडा होतो. कफाचे दोरे दोरे पडतात.

८३४. **नारूवर :** गोरखमंडीचीं बोंडें तव्यावर जाळून राख करून ठेवावी. रोज पावलीभार राख गुळांत, मधांत वगैरे द्यावी. ७ दिवस. नारू बरा होतो.

८३५. **डबा, सुशी, यांवर :** मृगकिडा मधांत बारीक करून द्यावा.

८३६. **रक्तप्रदरावर उत्तम योग :** कच्ची तुरटी (भुकी) २ मासे, गेरू-शुद्ध (·॥· मासा), चपडा लाख ·॥· मासा, ह्याप्रमाणें औषध तयार करून ठेवावें. रोज सकाळीं १ मासा, व सायंकाळीं १ मासा, समभाग पिठीसाखर मिळवून देणें. वर बकरीचें किंवा गाईचें दूध ताजें थंड प्यावें. धारा प्रदर बंद होतो.

८३७. **मलम, दाद, खरूज, वगैरेवर :** लवंगाचें तेल १ मासा, दाल-चिनी तेल १ मासा, आयोडिन ॥· मासा, व्हॅसलिन पांढरें २॥ तोळे, याप्रमाणें तयार करून द्यावें.

८३८. **स्त्रियांचे मासिक धर्म, व ऋतु साफ होण्यावर** : तारामंडूर-प्रमाणें ८ मासे, मंडूरभस्म, सुंठ, काळेंमिरें, त्रिफळा, पिंपळी, चित्रक, चवका, वावडिंग, प्रत्येक १-१ मासा समभाग, गूळ २॥ तोळे मिळवून गोमूत्रांत खलून गोळ्या करून ठेवाव्या. १–१ माशाच्या गोळ्या.

८३९. **कान वाहतो त्याजवर** : शेराच्या (हुऱ्याच्या) कोंवळ्या डिऱ्या निंबुरांत भाजून त्याचा रस काढून रोज ४-४ थेंब कानांत घालावा. जुनाट वाहणारा कानही बरा होतो. रस टिकण्यासाठीं आंत कोलनवॉटरचे ठिपके अगर मध घालून ठेवावा.

८४०. **विषमज्वर, विशेषतः शीतज्वरावर (ज्वरकुलान्तक वटी)** : सोनगेरू १ मासा, हिंगूळ शुद्ध २ गुंजा, करंजबीज मज्जाचूर्ण ८ गुंजा, कटुकी चूर्ण ४ गुंजा, पाण्यांत किंवा कोरफडाच्या रसांत खल करून चण्याप्रमाणें गोळ्या कराव्या. लाभकारी आहे. रोज गोळ्या २-३ खाव्या.

८४१. **प्रसूतिरोग, तापावर वगैरेवर** : कायफळाच्या सालीचें (छिलका) चूर्ण साखरेच्या पाकाबरोबर २–३ मासे दर वेळीं द्यावें. ३-४ वेळां देण्यानें गुण येतो. (चंपा स्टेटमध्यें एक बाई नेहमीं बाळंतरोगावर देत असे.)

८४२. **गळूं फुटण्यावर** : चित्रकाच्या चूर्णाचा अगर चित्रकमूळ पाण्यांत उगाळून लेप केला तर गळूं फुटतें.

८४३. **दाद, गजकर्ण, नायटे यांजवर** : गुमा (शेताडाचें मूळ) रॉकेल तेल, गंधक एकत्र करून चोळावें. कीड कोणतीही मरते.

८४४. **लिव्हर दोष, प्लीहा, कफविकारांवर** : इंद्रावणें फोपाव्यांत भाजून त्यांत सैंधव, पादेलोण, आंबेहळद, आणि कडू जिरें घालून बारीक वांटून गोळ्या करून ठेवाव्या. वाटेल तर थोडा जवखार घालावा. पोट दुखणें, वगैरे **मुलांच्या पोटांतील जाळे कफाचें धरतें, डबा, सुशी, छाती हालणें** वगैरेंवर हें औषध उत्तम आहे. हें गरम पाण्यांत गोमूत्रांत वगैरे द्यावें.

८४५. **जंतावर** : सात्विणाची साल पैसाभार कमीशी ताकांत वांटून एक-जीव करून ताक गाळून विण्यास द्यावें. जंत मरून पाणी होऊन पडतात. ८ दिवशीं पुन्हा द्यावें. पुन्हा जंत होणार नाहींत.

८४६. **मुरडा तावडतोब थांबण्यावर** : रक्तरोड्याची साल जाड असते, ती नारळाच्या १ वाटीच्या आपरस दुधांत (आपरसांत) उगाळून पाजावी. आमांश मग सावकाश बरा होतो.

८४७. **आंकडी अपस्मारावर** : माका, आलें, तुळस, कांद्याचा रस (तांबडा, पांढरा, कोणताही), समभाग घेऊन त्यांत रुद्राक्ष बराच ३–४ गुंजा उगाळून, मध घालून, सोनें उगाळून अगर वर्ख घालून चाटणें. वारंवार द्यावें. आंकडी जाते. अपस्मारावरही उपयोग होतो.

८४८. **तापावर, देवीवर :** चिंचोके कुटून चूर्ण करावें, व समभाग हळद घालून ठेवावें. व तें चूर्ण रोज चवलीभार २ वेळां केळीच्या पाण्यांतून द्यावें. केळीच्या सोपटाचें पाणी कालाचें पाणी काढावें. ताप येतांच दिल्यास ताप उतरतो. देवी हलक्या येतात; देवी येतही नाहीत. साथ असेल तेव्हां द्यावें.

८४९. **व्रणावर मलम : (१)** सफेता, कापूर, शंखजिरें, मेण, तूप नारळाचें पुदेल तेल, यांचें मलम. **(२) जखमेवर :** जायफळ, जायपत्री, वेलची, चिकणी सुपारी, पांढरा कात, मुर्दाडशिंग, शंखजिरें, सफेता, तांबडा तंबाखू सर्व एकत्र वस्त्रगाळ करून जखमेवर बुकी टाकावी.

८५०. **वायूवर :** लवंगादि तैल कोष्ठ ५ तोळे, जटामांसी ५ तोळे, लवंगा ५ तोळे, नागरमोथा ५ तोळे, मंजिष्ठ ५ तोळे, लाख ५ तोळे, यांचा २८ शेर पाण्यांत काढा करून (७ शेरचा ३॥ शेर काढा करून, १ शेर तिळाचें तेल अगर राईचें तेल घालून तें कढवावें, व ५ तोळे बचनागची बुकी टाकून तेल सिद्ध करून ठेवावें. चांगला उपयोग होतो.

८५१. **जीर्णज्वरावर, धातुविकारावर :** (पिंपळीपाक) गाईचें दूध ८ शेर, पिंपळी ॥ शेर, नागकेशर, दालचिनी, वाळा, लवंग यांचें चूर्ण १—१ तोळा घालून, साखर घालून पाक करावा. याचा उत्तम उपयोग होतो.

८५२. **खोकल्यावर (चूर्ण) :** अश्वगंधा २॥ तोळे, ज्येष्ठमध २॥ तोळे, गांठे पिंपळमूळ २॥ तोळे, सुवर्णमाक्षिक भस्म ॥ तोळा, ब्राह्मी चूर्ण १। तोळा, सर्व वस्त्रगाळ चूर्ण करावें.

८५३. **स्त्रियांच्या आर्तव शुद्धतेवर, हिस्टेरियावर :** इंद्रावणीच्या बीजाचें चूर्ण, पुष्करमूळ किंवा अगराचें चूर्ण, पिठीसाखरेंतून द्यावें. त्यांत १ गुंज वंगेश्वर घातल्यास योषापस्मारावर उत्तम.

८५४. **रक्तार्श, कफार्श, यांवर :** कोरफडाचा गर २ ते ४ तोळे, दुधाबरोबर अगर कोणत्याही भाजीबरोबर वगैरे घातल्यास मूळव्याध बरी होते. किंवा २ तोळे कोरफडाचा गर एकदां पाण्यांतून टाकावा. पुन्हां पाणी घालून व दूध घालून काढा करावा, पाणी जळून जाऊन दुधासारखा भाग उरल्यावर १ तोळा तूप व १ तोळा साखर घालून प्यावें. यानें उत्तम गुण येतो.

८५५. **बहुमूत्रावर :** काळे तीळ भाजून गुळाबरोबर लाडू करून खावे.

८५६. **वात विकार, आम, मुंग्या येणें, शैथिल्य, सांधे धरणें वगैरेवर :** २० तोळे चूना गूळ, २० तोळे म्हैशा गुग्गुळ, २० तोळे एक कळीचा लसूण. चुलीवर प्रथम गूळ कढईत घालून पातळ झाल्यानंतर गुग्गुळ गाळून आंत टाकावा. (रात्रीं पाण्यांत भिजत घालून सकाळीं चूर्ण करून) नंतर लसूण कुटून त्याचा लगदा आंत टाकून पाक करावा. तार आली म्हणजे उतरून ताटांत ओतून वड्या पाडाव्या. तें ६० तोळे औषध १५—२० दिवस खावें.

८५७. **ताप वगैरे विकारांवर** : कडू वृंद्रावन फळें ओलीं बारीक कुटून बादलींत पायानें तुडवावीं. बऱ्याच वेळानें मनगटाच्या केसांस जीभ लावून पाहावी. कडू लागल्यास त्याचा अंगांत प्रवेश झाला.

८५८. **दम्यावर** : गाईचें दूध ७ शेर तापवून जाड करून थोडें विरजण लावून कांहीं विरजलें म्हणजे रुईचीं पानें ६० घेऊन त्या पानांस तें दूध सारवून एकावर एक पान बसवून मडकीं भरून तोंडास सात मातीकापड करून, हातभर खोलीचें अग्निपुट द्यावें. नंतर बाहेर काढून गुंजभर भस्म, अनुपान मध, अगर साखर, अगर तूप गाईचें, किंवा लोण्यांतून बल पाहून द्यावें. ७ दिवस अगर १४ दिवस द्यावें. **पथ्य**– मीठ बंद. वरणभात, अदमुरें तापवून पाहिजे तर घालावें.

८५९. **दम्यावर** : पारिजातकाच्या कोंवळ्या आंकुऱ्या सुमारें ४ तोळे, त्यांत रुईचीं पानें सुमारें २ तोळे एकत्र करून, मोटली बांधून वर शेण लिंपून मुंबरांत पुरून रस सुमारें संध्येची एक पळी, त्यांत संध्येची पळीभर मध, आल्याचा रस पळीभर, मोरचुताची लाही उडदाएवढी एकत्र करून द्यावी. दिवस ३. **पथ्य**–ऊन पाणी, अदमुऱ्यांतून द्यावें. मीठ थोडें, आणि कालवणास कांहीं घेऊं नये.

८६०. **काळपुळीवर** : पेंडकुळीचा पाला कांजींतून वाटून बांधावा. दिवस ७. नंतर पाळ कांजींतून उगाळून ३ दिवस लावावें.

८६१. **नारूवर** : बिबा गुळांतून गोळ्या करून ५ दिवस द्यावा. देवचाफ्याची साल वांटून वर लावावी.

८६२. **व्रणावर** : गंधक ५ तोळे, वेलदोड्याची पूड अर्धा तोळा, रानतुरीच्या पाल्याची पूड अर्धा तोळा, गाईचें लोणी सुमारें वीस तोळे, लोणी तव्यावर घालून वर कापसाचा थर बसवून वर पुन्हा थोडें लोणी घालून वर पूड घालावी. याप्रमाणें थरावर थर घालून तव्याखालीं जाळ करून तूप तांबडें होईपर्यंत ठेवून उतरून गुंजभर विड्याच्या पानास लावून खाणें. २१ दिवस. **पथ्य**– अळणी. ताकभात.

८६३. **मांडळावर, वळ वगैरेवर** : भीरंडीचा पाला बारीक वांटून लावावा. दिवस ५ अगर ७ (फुटण्याच्या पूर्वी लावावा).

८६४. **देटपुळीवर** : निवळीचा चीक बोटास लावून त्यावर सुका चुना बसवावा. दिवसांतून २ वेळां. खपली जाहल्यास काढून पुन्हां वर लावावा.

८६५. **मुतखड्यावर** : तुपकड्याची (चिकणकढा) (बला) पाळें वांटून रस सुमारें ४ तोळे खडीसाखर घालून द्यावा. सकाळीं व सायंकाळीं याप्रमाणें ७ दिवस. मूत्रखडा झिजून जाईल.

८६६. **नेत्ररोगावर** : रात्रौ पाण्यांत लवंग कुटून भिजत घालून सकाळीं त्या पाण्यांत पांढऱ्या गुंजांचें पाळ व सतफळ उगाळून डोळ्यांत घालावें. म्हणजे डोळ्यांतून पाणी वगैरे रोग जातात. उष्णता वाढेल तर खडीसाखर उगाळून डोळ्यांत

लावावी. फुलास हेंच औषध घालावें. डोळ्यांस थंडावा येणेंस पाहिजे तर मनुष्याच्या दुधांत औषध उगाळावें.

८६७. **सर्पदंशावर** : रिंगणीमुळी उगाळून पोटांत द्यावी व दंशावर लावावी.

८६८. **गर्भपात बंद होण्यास** : दरबारीचा पाला वांटून रस काढून १ तोळा द्यावा.

८६९. **कामिणीवर** : जाईचा पाला व गोड्या एरंडाच्या पाल्याचा रस पाण्यांतून देणें.

८७०. **अमांशावर** : हसोळीच्या आंकन्या पाण्यांत वांटून जिरें-साखर घालून देणें.

८७१. **सर्वांगांत व्रण झाल्यास** : गाईचें लोणी पावशेर तव्यावर थोडें घालून वर कापूस, वर गंधकाची पूड, असें थर घालून जाळ करून तूप चांगलें जाहलें म्हणजे उतरून गुंजभार दररोज विड्याच्या पानास लावून खाण्यास द्यावें. दिवस २१. **पथ्य**— वातुळ, तेलकट वर्ज्य करावें. मोड पडतील.

८७२. **मेदोरोगावर** : कॉफी पाण्यांत शिजवून खडीसाखर घालून द्यावें. दिवस फार घेतलें पाहिजे. अंग साफ झडून जाईल.

८७३. **काविळीवर** : पापडखार अर्धा तोळा, व कळीचा चुना अर्धा तोळा, एकत्र करून दह्यांत घालून दहीं पिण्यास द्यावें. **पथ्य**— म्हशीचें दहीं व भात. दिवस १.

८७४. **गर्मी किंवा सर्व प्रमेहांवर** : १ तोळा पांढऱ्या जासवंदीचें पाळ, १ तोळा पांढऱ्या पटकुळीचें पाळ, १ तोळा पांढऱ्या गुलवक्षीचें पाळ, १ तोळा इलायची, १ तोळा जायफळ, १ तोळा पत्री, १ तोळा माडाचें पाळ, १ तोळा पोफळीचें पाळ, १ तोळा रसवाला केळीचा कांदा, १ तोळा चवईचा कांदा, कस्तुरी २ गुंजा, १ तोळा बनकेळीचा कांदा, या सर्वांचे रस काढून त्यांत इलायची वगैरे सर्व जिन्नस घालून पावशेर पिठीसाखर गोड मधुर होईपर्यंत घालून सकाळीं घ्यावें. दिवस ३. **पथ्य**— करावें.

८७५. **धातूवर** : (जिन्नस तोळेवार) २ जिरें, ३ सावीखार, (साठ) ३ सरांटे, ·॥· कंकोळ, १ सबज्याचें बीं, ·।· पांढरा चंदन, ४ गुळवेल, ·॥· लवंग, ·।· इलायची, सर्व जिन्नसांचें वस्त्रगाळ चूर्ण करून पिठीसाखर अर्धा तोळा, व चूर्ण वयमानें द्यावें. ७—१४ दिवस अगर कांटेकुवारीचा गीर व साखर चिर्नीदुन द्यावें.

८७६. **म्हसे म्हणजे शिस्नास चामखीळ होतात त्यावर** : १ तोळा मोरचूत, (तोळेभार) १ कळीचा चुना, १ हरताळ, १ शेळीच्या लेंड्या वस्त्रगाळ पूड करून थंड पाण्यांतून लावावें. ५—७ दिवसांत गळून पडतील.

८७७. **दुखाणूं फुटण्यास** : १ तोळा मीठ भाजून, १ तोळा पांढरा कांदा भाजून, १ तोळा वेखंडाची पूड, १ तोळा हळदीपूड, एकत्र वांटून तुपांत मिळवून वर २–३ वेळां लावावें.

८७८. **आर्ष व मुळव्याधीनें रक्त पडतें त्यावर** : १ (तोळेवार) रान आलें, १ फणस आलें, १ किराईत, १ आंवळकठी, गरम पाण्यांत उगाळून पोटांत द्यावें. दिवस ७.

८७९. **कामिणीवर औषध** : शेगलाच्या सालीचा तुकडा पैसाभार व खोबरें एकत्र करून खाण्यास ७ दिवस द्यावें.

८८०. **कडकी, साधारण ताप यांवर (काढा)** : गुळवेल, टांकळीमूळ नरवेलमूळ, कुटकी, बेलाची साल. काढा करून २ वेळां देणें.

८८१. **रजोदोष होण्यास** : नागकेशर १ तोळा, गाईचें तूप १ तोळा, साखर १ तोळा, एकत्र मिश्र करून लगेच द्यावें. दिवस ३ रजोदर्शन होईल.

८८२. **देटपुळीवर** : कवंडळीच्या आंकऱ्या कांजींत अगर धुवणांत वांटून दिवसांतून २–३ वेळां लावावें. दिवस ३ अगर ५.

८८३. **नागेश्वर रस** : शिशाचें भस्म (नागभस्म) १० तोळे शुद्ध हिंगूळ, १० तोळे, शुद्ध मनशीळ १। तोळा, आणि शुद्ध गंधक सर्व सम म्हणजे २१। तोळे मिळवून, सर्वांचा लिंबाच्या रसांत १ दिवस खल करून टिकऱ्या कराव्या. व सुकवून शरावांत घालून वर झांकण व मातकापड उत्तम करून गजपुट द्यावें. औषध स्वांगशीत, वाटलींत भरून ठेवावें. विड्यांत अगर विड्याच्या पानाच्या रसांत (थोडा मध घालून) शक्ती फार येते. धातुस्तंभक, वर्धक हें भस्म होतें. लोणी, मध, साखर, मलई, तूप, वगैरे अनुपानें योजावीं. दूध वगैरेसुद्धां.

८८४. **श्वास, कांस, न्युमोनिया वगैरेंवर** : मृगशृंग (सांबरशिंग) भस्म करून, शरावांत रुईचा चीक भिजेल इतका घालून शराव झांकून मातकापड करून १ मण शेणीची आंच द्यावी. पांढरें भस्म झालें तर उत्तम; न झाल्यास पुन्हा रुईचा चीक घालून पुट द्यावें. २ गुंजा मधांत रोज दोन वेळां द्यावें. रोगाचें मान कफ जास्त असेल तर २–३ तासांनी असें देत जावें. ही मात्रा साधारण सांबरशिंग भस्मापेक्षां तीक्ष्ण आहे.

८८५. **गालगुंडावर** : भेंडीचा पाला कुटून त्याचा रस गालगुंडावर चोळावा. १-२ दिवसांत बरें होतें. थानाच्या सुजेवर हा रस लावून बरें होतें. टाळू लागणें वगैरे बरी होते.

८८६. **उडतें, डबा, कफ (ब्रॉंकायटिस) वर** : कबुतराची किंवा कोंबडीची विष्ठा चिंचोक्याइतकी घेऊन २ तोळे गोमूत्रांत कालवून कपड्यांवर गाळून तें मुलास पाजावें. छाती हालणें, उडतें, छाती चोंदणें दोन तासांत बरें होतें. झाड्यावाटे कफाचे दोर पडतात.

८८७. **शूळ, जुलाब, अपचन वगैरेंवर :** बिब्बा, चिंच, सैंधव, हिंग-लाही एकत्र कुटून गोळ्या करून ठेवाव्या. २, ३, ४ गोळ्या गिळण्यास द्याव्या.

८८८. **डांस न होण्यावर :** गंधक, डिकेमाली, वेखंड, यांची पूड करून तिचा धूर करावा.

८८९. **हाड्या व्रणावर :** कंवडळाच्या बियाचें तेल लावावें. हटकून व्रण बरा होतो.

८९०. **किडणी दोष, यकृत दोष, पायाची सूज वगैरेंवर :** पुनर्नवा-मूळ बकरीच्या किंवा गाईच्या दुधांत उगाळून द्यावें.

८९१. **उलटी थांबण्यावर :** दुधांतून तुरटीची लाही व सोनगेरू एकत्र द्यावें.

८९२. **खोकल्यावर रामबाण :** बेहडा मोठा टपोरा ताजा सुकलेला घेऊन हातावर तूप घेऊन त्यास चोळून माखावें. नंतर वाटोळी कणीक पोळी तयार करण्यास पाण्यांत भिजवतों अशी भिजवून गोळा करावा, व तूप लावलेल्या बेहेड्यास सभोंवतीं लावून उंडा लहानसा करून निखाऱ्यावर भाजावा. कणीक करपून निवाल्यावर फोडून बेहडा फक्त घ्यावा, व तो फोडून साल घेऊन वाळवावी. खोकलेकऱ्यास तोंडांत धरण्यास थोडी थोडी द्यावी. खोकल्याचा ठसका राहून झोप लागते.

८९३. **जीर्ण ज्वर :** माक्याच्या रसांत बाळहरडे ३ दिवस भिजत घालून, काढून पुसून तुपांत न करपतील असे तळून (फुगतील असे) ठेवावे. मुलास १–२, मोठ्यांस २–३ बारीक करून साखरेबरोबर ऊन पाण्याबरोबर देणें. यानें कोठा साफ होईल.

८९४. **सारक :** बाळहरडे, सोनामुखी, आंवळकठीचें चूर्ण द्यावें.

८९५. **अंधत्व, कमी दिसणें, उन्हाकडे न बघवणें यांवर :** (१) काबुली आंबट डाळिंबाचा रस २ थेंब डोळ्यांत रोज दोन वेळ घालावा. शॉर्ट साइटवर चांगलें. (हें फकिरी औषध आहे.) (२) तिळाचें तेल २–३ उकळ्या काढून, थंड झाल्यावर गाळून बाटलींत ठेवावें व डोळ्यांच्या दोन्ही बाजूंच्या आंखांवर आंगठ्यानें घासावें. (रोज) तेल जिरवावें.

८९६. **खरजेवर :** कारिंट्याच्या (दिवाळीच्या दिवशीं चुरडण्याकडे उपयोग करितात तीं चिराटें) या वेलाचीं मुळें काढून त्याची काळी राख करून गोड्या तेलांत खलून लावणें. कशीही खरूज बरी होते. (खात्रीची योजना)

८९७. **उलटी, जुलाबावर :** बोरांतील बिया जमवून ठेवून त्यांची राख मधांतून २–२ गुंजा द्यावी. उलटी ताबडतोब थांबते, व जुलाबही बंद होतात. (अहमदाबादी बोरें नव्हेत. वाटोळीं कोकणी किंवा देशावरील बोरें त्यांच्या बिया.)

८९८. **जुनाट दमा (श्वास) यांजवर :** पारा १ तोळा, जायपत्री तोळा १, निर्गुंडीचा रस ८८८१३।। टाक, हे जिन्नस खलात घालून खलून गोळी करणें.

२ कोरी बुडकुलीं किंवा पणत्या घेऊन त्यांत ठेवून मातकापड करून तोंड लिंपून खळगा खणून रानशेणीची आंच द्यावी. भस्म पोटांत देण्यास उत्तम. कदाचित कांहीं सिद्धी होईल. (वजन पुरें उतरलें तर) जनादीभर.

८९९. **कुत्र्याच्या विषावर** : विष्णुक्रांताच्या पाल्याचा रस २ तोळे बुधवारीं फक्त एकदांच देणें. **पथ्य**— तेलकट, आंबट ७ दिवस वर्ज्य, सातव्या दिवशीं वाहत्या पाण्यांत स्नान अर्धा तास करावें. खात्रीचें औषध.

९००. **गळवास लेप** : साबण व विलायती कोळसा पाण्यांत उगाळून लेप केला तर लवकर बसतें (पिकत नसेल तर.)

९०१. **कवळू वाढली तर** : कोरफडाच्या रसांत पापडखार द्यावा, रोज सकाळीं.

९०२. **बाळसंजीवन किंवा बाळसुधा वटी** : अतिविष, काकडशिंगी, मायफळ, वेखंड, (पुष्करमूळ) नागरमोथे, वंशलोचन, पिंपळी, सुरवारी अगर साधा हरडा, प्रत्येक चवलीभार, १। तोळा मधांत खलून द्यावा.

९०३. **बालार्क रस** : १ तोळा हिंगूळ (शुद्ध), १ तोळा प्रवाळ, १ तोळा मृगशृंग, १ तोळा केशर, १ तोळा सफेद मिरें, १ तोळा कचोरा, १ तोळा शुद्ध कलखापरी, समभाग सर्व विड्याच्या पानाच्या रसांत मुगाप्रमाणें गोळ्या कराव्या. (वैद्यकसार)

९०४. **उचकीवर** : देवकापशीच्या बोंडांतील कापसाची विस्तवावर टाकून धुरी द्यावी. लगेच उचकी थांबते.

९०५. **अकालीं पात किंवा स्त्रियांचें नासवणें याजवर** : औदुंबराचीं लहान लहान कोवळीं फळें आणून, बारीक वांटून, दूध-साखरेंतून रोज दोन वेळां देणें. दीड-दोन महिने द्यावें. गुण येतो. (कुंभकोणमूचे स्वामी व वैद्यराज त्र्यंबकशास्त्री वैद्य, काशी, व कै. गंगाधरराव आठवलेसुद्धां हें वापरीत असत.)

९०६. **आपटून, पडून, अगर कापून जो घाव किंवा जखम शरीरास होते त्याजवर (भरण्यास उत्तम उपाय)** : उंबराची साल पाण्यांत उगाळून, गंधासारखी वाटीत भरून त्यांत तितकेंच तूप घालून बोटानें घोटून किंचित निखाऱ्यापाशीं ठेवून गरम करून एकजीव झाला म्हणजे (तें मिश्रण होत आलें म्हणजे) व्रणांत भरून वर पान केळीचें अगर विड्याचें वगैरे लावून पट्टी बांधावी. म्हणजे ४—६ दिवसांत आंतील पू वाहून व्रण भरत येतो. (रोज २ वेळां लावणें).

मूळव्याध, रक्तचुंवळ वगैरेस : माणसाचे नखांची धुरी गोवरीवर टाकून परसाकडचे रस्त्यास द्यावी. वाटोळें कांहीं कापड गुरगटून धुरी द्यावी. मखमालीचे फुलांचा चुरा करून चिलिमींत २—३ वेळां ओढावा. मखमालीचा पाला ओला वाटून लुगदी तेथें बांधावी. (१२—१३ वर्षे मौन धारण केलेला बुवा मोरटक्का सनावद यानें सांगितलेलें औषध).

[बडोदें सरकार (**महाराज गायकवाड सयाजीराव**) यांस चातुर्थिक मलेरिया चिकटला, तेव्हां अनेक उपायांनींसुद्धां तो ताप कमी झाला नाहीं. त्या वेळीं एका मद्रासी खवासानें उपाय केला व तो उत्तम ठरला. तापही साफ गेला. त्यानंतर हा प्रयोग अनेकांवर करून फारच उपयोगी ठरल्यामुळें खालीं दिला आहे.]

९०७. **चातुर्थिक हिंवतापावर प्रयोग** : मनशील १ तोळा, कळीचा चुना १ तोळा, आंवळसार गंधक शुद्ध १ तोळा, स्वागीखार १ तोळा, या चार जिनसा कोरफडाच्या रसांत १ दिवस घोंटून लहान लहान चकत्या (टिक्या) बनवून सुकवाव्या. नंतर एका मातीच्या संपुटांत बंद करून मातकापड करून १० रत्तल (५ शेर पक्के) गोंवरीचें अग्निपुट द्यावें. स्वांगशीत झाल्यावर बारीक खलून बाटलींत ठेवावें. ·।।; गुंज साखरेच्या पाकांत देणें. मलेरियावर फार उत्तम आहे. तापांतही देण्यास हरकत नाहीं. (अंगांत खूप ज्वर असतांनासुद्धां) कोणतेंही नुकसान नाहीं.

(२) या वरील अर्धा तोळा भस्मांत २० तोळे साखर घालून घोटून ठेवावें. मुलांस हें औषध द्यावें.

९०८. **विटाळ साफ होण्यास व सर्व वातांवर** : सोमल करंज झाडाच्या सालीच्या रसांत ३ दिवस भिजत ठेवून शुद्ध होतो. नंतर १ तोळा सोमल व १० तोळे पांढऱ्या मिऱ्याची भुकी मधांत खलून ठेवून देणें. २ गुंजा औषधें घेऊन गुळामध्यें ठेवून गिळावें. **पथ्य**– कांजीवर ठेवणें. (सुब्रह्मण्यम् स्वामी कुंभकोणम्, यांचें औषध)

९०९. **सूतिकाज्वरावर** : कायफळाच्या सालीचें चूर्ण (छिलटें) वस्त्रगाळ करून ४ ते ६ गुंजा अगर १ ते १।। मासा साखरेच्या पाकांत रोज २–३ वेळां द्यावें. ३ दिवसांत गुण येतो. बऱ्याच तापांत याचा उपयोग होतो.

९१०. **विरेचन चूर्ण** : काळा दाणा ३ तोळे, सोनामुखी पाला ३ तोळे, पादेलोण १ तोळा कुटून बारीक चूर्ण २।। मासा ते ८ मासे रात्रीं झोपतेवेळीं खावें. कोमट पाण्याबरोबर. पोटांत मुरडल्यास बडीशेप चावावी. रस खावा. अगर बडीशेपच चूर्णांत कुटून १–२ तोळे घालावी. जुलाब होतील. पोटांतील विकार जातील.

९११. **बालकाचें वमन, खोकला व ताप यांजवर** : सहदेवी, माका, पिंपळी यांचें समभाग चूर्ण करून मधाबरोबर चाटवावें. अगर मध, अतिविष चूर्ण चाटवावें. ज्वर जातो.

९१२. **गात्रशोषावर** : आस्कंद आणि रससिंदूर यांस दुधांत घोटून बरोबर तूप मिळवून तांब्याच्या पात्रांत शिजवावें. म्हणजे सिद्ध घृत होईल तें खावें. मात्रा यथोचित. गात्रशोष, कांतिनाश, अस्थ्यग्रता वगैरे रोग जातात.

९१३. **ज्वर, खोकल्यावर (चूर्ण)** : हिंग, सुंठ, पिंपळी, बडीशेप,

हरडा, ह्या पांचांस पंचामृतरस असे म्हणतात. यांचें चूर्ण मधावरोबर थोडें थोडें चाटावें; यानें ज्वर, खोकला नष्ट होतो.

९१४. **देशी दंतमंजन** : रुमामस्तकी, गुलाबी तुरटी ६–६ मासे, मध, २ तोळे, खल करून डबींत ठेवावें. सकाळ-सायंकाळ बोटास घेऊन दांत घांसावे. साफ होतात. पाण्यानें चुळा भराव्या.

९१५. **गजकर्णास** : वडाचीं पानें लोखंडी खिळ्यास गुंडाळून जाळून राख करावी, आणि तिळाच्या तेलांत लावावें.

९१६. **जुलाबावर** : मसुराची डाळ वांटून २ घोट पाण्यांत मिळवून, साखर घालून देणें.

९१७. **प्रदरावर** : रुईचें पान आणून त्यास गाईचें तुप थोडें लावून शेणीच्या विस्तवावर जरा ऊन करून, योनीवर बांधावें. पान काळें झालें म्हणजे टाकावें. पुन्हा दुसरें बांधावें. याप्रमाणें दिवसास १०–११ पानें, याप्रमाणें ३ दिवस. (काळें पान होण्याचें बंद होईपर्यंत).

९१८. **दातांस औषध** : पत्री, पुनर्नवा, तिळ्या, पिंपळी, कोळिंजन, वेखंड, कुटकी, सुंठ, भद्रमुस्ता, बाळहरडी, सर्व समभाग चूर्ण करून सुमारें चवली-भार चूर्ण विड्याच्या पानांतून दाढेंत धरावें. दांताचे सर्व विकार जातील.

९१९. **सर्वांगास सूज आल्यास** : कुटकी, किराईत, सुंठ, समभाग चूर्ण करून ऊन पाण्यांतून अगर मधांतून पावलीभार सकाळ–संध्याकाळ घ्यावें. लघवी फार होऊन सूज उतरेल.

९२०. **विषम ज्वरावर** : खुबरखल्ला याचें वीं पातळून वर रोगी निजवावा. घाम येऊन ताप जातो.

९२१. **परिणामशूलावर** : बाभळीचे कांटे १। तोळा, चिंच्याचीं पेरें १। तोळा, गूळ २॥ तोळे, याचा काढा १४ दिवस घ्यावा. **पथ्य**– साधारण.

९२२. **दांतवण दांतास लावण्यास** : १० तोळे हरडा साल, ३ तोळे मोरचुताची लाही, ·॥· तोळा लोखंडाचा कीस, २ तोळे हिराकस, २ तोळे मायफळ. हरडा, मायफळ, हिराकस यांचें चूर्ण करावें. कीस व लाही खल करून चूर्णांत मिळवून थंड पाणी घालून वांटून गोळा करावा. नंतर उन्हांत ठेवून फकी करावी. सुवास पाहिजे तर लवंग, वेलची थोडी मिळवावी.

९२४. **कान वाहतो त्यास** : पेंढराचें फळ तुळशीरसांत उगाळून कानांत घालावें.

९२५. **वायूवर व कफावर** : १ तोळा गुग्गुळ, १ तोळा रक्तबोळ, १ तोळा हिंगूळ, तिन्ही जिन्नसा गाईच्या दुधांत खल करून १ दिवस पुरा जाहल्या-वर, गुंजेएवढी गोळी ऊन पाण्यांतून द्यावी. कफावर दाढेंत धरण्यास द्यावी.

९२६. **व्रणावर मलम** : (भागवार) ·।· मोरचूत, ·॥: पांढरा कात, ·|||. शहाजिरें, १ सुपारी जाळून, ·॥· आंवळकठी, सर्व जिन्नसा वस्त्रगाळ पूड करून लिंबू-रसांत खल करून तुपांतून लावावें.

९२७. **डोळ्यांत फूल पडतें त्यावर** : तगरीचीं फुलें वांटून डोळ्यांत घालावी. (१–२ महिने)

९२८. **शीतज्वरावर** : १ तोळा शुद्ध केलेला सोमल, २ तोळे कुटकी, २ तोळे खैराचा कात, २ तोळे शुद्ध गंधक, १ तोळा बारीक पिंपळी, आल्याच्या रसांत ३ दिवस खल. काळ्या विड्याच्या पानाच्या रसांत खल दोन दिवस. उडदा-एवढ्या गोळ्या बांधाव्या. आल्याचा रस व पानाच्या रसांतून १ गोळी द्यावी. (३ दिवस.)

९२९. **हिंवतापावर** : ओल्या मिरचीचा पाला, व माक्याचा पाला, या प्रत्येकाचा निपाणी रस पाव तोळा, प्रमाणें त्यांत चौपट मध घालून सकाळीं द्यावा. ३ दिवस.

९३०. **कामिणीवर** : गोड्या एरंडाची कोवळीं पानें सुमारें ४ तोळे वांटून म्हशीच्या दह्यांतून द्यावीं. (दिवस ३) **पथ्य**– दहीं भात.

९३१. **कोणत्याही कडकीवर धातुक्षीणतेवर** : बारीक पानाच्या नरवेलाचें पाळ, गाईच्या दुधांतून सुमारें ४ तोळे उगाळून सकाळीं द्यावें. थोडी साखर घालावी.

९३२. **प्रदरावर** : नरवेलाचीं कोवळीं पानें वांटून अंगरस सुमारें १ तोळा काढून साखर घालून द्यावा.

९३३. **धातुक्षीणतेवर रामबाण** : अर्जुनवृक्षाची साल २ तोळे, गाईच्या दुधांतून देणें.

९३४. **गुरांची वार पडण्यास** : धामिणीवरचें बांदें रस काढून साखर घालून पाजावा.

९३५. **बाळंत होण्यास** : म्हशीचें ताक पावशेर, शेंदेलोण १ तोळा, पांढऱ्या गुंजेचें पाळ पाव तोळा, ताकांत उगाळावें. एकत्र करून पाजावें, म्हणजे दोन तासांत बाळंत होईल.

९३६. **भाजलेल्यावर** : गाईचें तूप पावशेर, नर आजण्याच्या सालीचा रस नवटांक, एकत्र करून, रस आटेपर्यंत कढवून तें तूप लावावें. (रामबाण)

९३७. **व्रण, अगर कोणतेंही चकन पडल्यास** : घेवड्याच्या पानाची पूड अगदीं काजळासारखी अर्धा तोळा, गाईचें तूप अच्छेर एकत्र करून १ दिवस खलून कोवळ्या पानास औषध लावून, तें पान लावावें. दिवसांतून ३ वेळां. दिवस ७–१४.

९३८. **कामिणीवर हटकून गुण** : दहीं म्हशीचें सुमारें १० तोळे, त्यांत पापडखाराची पूड सुमारें ४ मासेभार घालून सकाळीं एक वेळ याप्रमाणें तीन दिवस द्यावें.

९३९. **गंडमाळेस** : चिंचोका माक्याच्या रसांत उगाळून रोज लेप करावा.

९४०. **पांढऱ्या केसांचे काळे केस होण्यास** : पुंवाड्याची (टांकळी) मुळें आणून छायेंत सुकवून चूर्ण करून बकरीच्या मूत्रामध्यें ७ दिवस खावें.

९४१. **सर्व वातांवर** : इंद्रजव, चित्रक, सुंठ समभाग चूर्ण करून तुपाशीं द्यावें.

९४२. **कटिवात, शूळ वगैरेंवर** : आस्कंद, खडीसाखर यांचें चूर्ण तुपांत द्यावें.

९४३. **मधुमेहावर** : जस्तभस्म ·।: तोळा, मंडूरभस्म ·।· तोळा, मनशील ½ तोळा, तगरगंठोणा १ तोळा, अफू शुद्ध १ तोळा, खल करून मुगाएवढ्या गोळ्या कराव्या: १ गोळी सकाळीं थंड पाण्याबरोबर अगोदर खाऊन मग गिळावी. (डॉ. वामनराव देसाई, वांद्रें, यांच्या बाडांतून).

९४४. **त्रिदोषावर** : रात्रीं चमकणाऱ्या वनस्पतीचें मूळ पुष्य नक्षत्रीं काढून आणून ठेवावें. त्रिदोष होऊन शेवटच्या स्थितींतील रोग्यास मधांत, दुधांत पाजावें. त्रैलोक्यचिंतामणी मात्रेप्रमाणें बोलावयास लावील. हिमालयांत ही वनस्पती रात्रीं प्रकाश पाडणारी कोठें कोठें आहे.

९४५. **स्मरणशक्तीवर** : ब्राह्मीचूर्ण, कोष्ठ, वेखंड, ज्योतिष्मतीच्या पानांचें चूर्ण, समभाग करून सोन्याचा वर्ख, मध, व तूप मिश्र करून मुलास १ वर्षापासून ५ वर्षेपर्यंत सकाळीं रोज द्यावें. शतवर्षेंही स्मृती नष्ट होणार नाहीं. मेधा धारणा वाढेल. अनेकांच्या अनुभवात आहे. (पुरातन अनुभवी लोकां-कडून पाठ).

९४६. **अमृतरस** : (दीक्षित कै. भाऊशास्त्री लेले यांच्या योजनेपैकीं सुधारून) सूतशेखर ६४ तोळे, गंधकराज रसायन ६ तोळे, अभ्रक ३ तोळे, मौक्तिक भस्म ३ तोळे, कपर्दिका भस्म ८ तोळे, कृष्ण-तुळशीच्या रसांत खल करून २–२ गुंजेच्या गुटिका बांधाव्या. सन्निपात, प्लेग, व सर्वसाधारण ज्वर, अग्निमांद्य, अशक्तता वगैरे अनेक रोगांत उत्तम उपयोग होतो.

९४७. **नेत्ररोगावर** : सोरेखार, व तुरटी कच्ची, १–१ तोळा समभाग बारीक करून, १० तोळे गुलाबपाण्यांत चांगलें मिळवून, १ वाल (२॥ गुंजा) मोरचूत, त्यांत बारीक करून खलून, पेपरवर फिल्टर करून, गाळून, बाटल्या भरून ठेवाव्या. फूल, सारा, गळ, खुपऱ्या, वगैरेंवर रोज २ वेळां घालावें. औषध अनुभवसिद्ध.

१४८. **वाजीक पास्त :** १ किंवा २ मासे कळी (गंधक) ७ दिवस गुळांत खावा.

१४९. **गर्भवृद्धीवर :** केळाचें पंचांग किंवा मूळ दुधांत वाटावें.

१५०. **वाजीकरणास :** माका व दूध समभाग घ्यावें.

१५१. **अर्धशिशी :** रिठा पाण्यांत उगाळून नाकांत ओढावा. अथवा अगस्त्याच्या पानांचा रस नाकांत ओढावा. किंवा ज्येष्ठीमध पाण्यांत उगाळून ओढावी. म्हणजे बरी होते.

१५२. **अंधत्वावर :** नागिणीची किंवा सर्पाची मेंग (कात) चकचीभार व उपळसरीचें मूळ मधावर उगाळून घोटून एकत्र करून, २-२ थेंब डोळ्यांत सोडावे. सकाळ-सायंकाळीं. म्हणजे अंधत्व जातें.

१५३. **खरजेवर :** दह्यांत कुंकू (सिंदूर) घालून खरजेस लावावें. **इसबावर,** गाईच्या मूत्रांत ओवा बारीक वाटून त्यांत सोनकगुंजभर घालून लेप करावा.

१५४. **कृमी, कोंडू नाशावर :** डिकेमाली लिंबाच्या रसांत उगाळून मुळांशास लावावी.

१५५. **दंतधावन चूर्ण :** अक्कलकारा २ तोळे, पांढरी तुरटी भाजून फुलवून २ तोळे, कापूर देशी २ तोळे, सैंधव (सेंदेलोण) २ तोळे, आणि कडू-निंबाच्या पानाची राख काळी ४ तोळे, सर्व एकत्र करून दांत सकाळीं व रात्रीं घासणें. सैंधव, शिरसाचें तेल (कोंकट) पाण्यांत मिळवून गुळण्या कराव्या. पायोरियावर उत्तम योग आहे.

१५६. **त्रैलोक्य संमोहन वटी :** शुद्ध विजया (भांग) ८ तोळे, हिंगूळ-भस्म, रससिंदूर, अभ्रकभस्म, लोहभस्म, लवंग, भीमसेनी कापूर, शंखभस्म, प्रत्येक १-१ तोळा; गोखरू, कवचबीज चूर्ण, काकडशिंगी २॥-२॥ तोळे; भांग, शतावरी, आस्कंद यांच्या काढ्यांत ७-७ भावना देऊन २-२ गुंजेची गोळी खावी. हांफा, धातुक्षीणता इत्यादींवर.

१५७. **डोळ्यांचे विकार व मोतिबिंदु यांजवर :** शिरणीचें बीज ३ मासे, रिठ्याचें बीज आंतील पांढरा गर ३ मासे, समुद्रफळ ३ मासे, या सर्वांचा दोन कागदी लिंबांच्या रसांत खल करून बाटलींत भरून ठेवावें व सुरम्याच्या सळईनें रोज १-२ वेळां मोतिबिंदु नाहींसा होईतोंपर्यंत लावावें. रात्रीं झोपतेवेळीं लावावें.

१५८. **जखमेवर :** तिळाचें तेल अर्धाशेर (१४ तोळे), हाथभळीचा पाला (ओला) ७ तोळे, तेलांत घालून कढविणें. (खरपूस होऊन करपेपर्यंत) उतरताना ·।· तोळा फटकीचें चूर्ण आंत टाकून मिळवून गाळून ठेवणें. जखमेवर, व्रणावर लावणें. चांगला उपयोग होतो.

१५९. **इसब, गजकर्ण, खरूज, व्रणांवर :** गाजराचा रस, पत्री खडी-साखर, मध, गंधक, सर्व समभाग खलून, मलम बनवावें.

९६०. **धुपणीवर :** गोरखचिंचेचा मगज ताकांतून सकाळ–संध्याकाळ देणें.

९६१. **स्तंभक :** कात पांढरा ·|· तोळा (३ मासे), दुधांत आंटवून घेणें. पाहिल्यानें ५ ग्रेन फटकी साखरेबरोबर द्यावी.

९६२. **कायाकल्प :** (१) भू-कुष्मांडी सत्त्व काढून, शतावरीचा कल्क अगर घट्ट केलेला रस पाव तोळा, रोज चवलीभार व शिलाजतु ४ गुंजा घालून, गाईच्या दुधांत रोज दोन वेळां खावें. ४० दिवसांत अति धातुवृद्धी होईल. सर्व इंद्रियें बळकट होतील. (२) आंवळा झाडावर जून झालेला माघ-फाल्गुन मासांतील घेऊन, १ रत्तलास १ रत्तल मध घालून, बरणींत ३ महिने ठेवून द्यावा. आंवळ्याचें काप काढून मिश्र करावें. नंतर (३ महिन्यांनंतर) काढून १ तोळा रोज सकाळीं खाऊन वर दूध द्यावें. हें मिश्रण पळसपापडीचें चूर्ण चवलीभार टाकून तूप मधाशीं खाऊन वर काळ्या गाईचें दूध प्यालें असतां केंस काळे होतात. वीर्य अति वाढतें. नजर तीक्ष्ण होते. दांत असल्यास बळकट होतात. नसल्यास दांतांच्या कण्या येतात. सुरकुत्या अंगाच्या जातात. (२) श्वेत पळस (पांढरा न मिळाला तर साधा पळस घ्यावा.) मुळें कुटून रस काढावा, अगर जमिनींत खळगा करून पळसाचें मूळ तोडून त्याखालीं मडकें (निरढावलेलें, कोरें नको) ठेवावें. तें पाणी धरून ठेवावें. ८ दिवसांत बरेंच पाणी उतरेल. त्यांत समभाग आंवळ्याचा (जून आंवळ्याचा) रस मिळवून रोज ४ तोळे दोन्ही मिळून व ४ तोळे मध त्यांत मिळवून प्यावा. यथेच्छ गाईचें दूध प्यावें. **पथ्य—** तेल, मिरची, मोहरी, हिंग खाऊं नये. दुग्धावर शक्य तों राहावें. तीन मासांत काया पालटून जाईल.

९६३. **लघवींतून धातु जाणें, लाल लघवी होणें, धुपणी, कडकी वगैरेवर (अमृतवल्ली चूर्ण :** अमरकंद, उपळसरी, ओकबोकी, (पेंडकूळ) वाळा, गोखरूं, नागरमोथा, या ५ औषधांचें समभाग चूर्ण करून चवली ते पावली-भार दुधांतून रोज दोन वेळां द्यावें.

९६४. **योनीशुद्धीवर :** हिराबोळ, मायफळ समभाग घेऊन चूर्ण करून, पाण्यांत बोराच्या आंठीएवढ्या गोळ्या करून वाळवून ठेवणें. १ गोळी योनींत रोज ठेवणें. ३ गोळ्या ठेविल्या असतां योनी शुद्ध होते. धुपणी जाते.

९६५. **काळपुळी, दाढी, गाठी, वण, गळवें, सूज, वगैरेवर :** रान-शेवग्याचें मूळ किंवा साल, नाचणे, बाजरीचें पीठ, बकरीच्या सुकलेल्या लेंड्या, आंबेहळद, हें समभाग घेऊन चूर्ण करून द्यावें.

९६६. **मूतखडा, कवळू वगैरेवर :** सोरेखार ·||· मासा, मीठ १ मासा, कांद्याच्या रसांत सकाळीं पिण्यास देणें. १४ दिवस. **पथ्य—** तेलकट, आंबट वर्ज्य.

९६७. **विटाळ साफ होण्यास :** स्त्री विटाळशी बसण्याच्या दिवसांत सावरीचा डिंक चवलीभार, बारीक करून गाईच्या दुधांतून देणें.

९६८. **मुलांच्या डब्यावर :** वांकेरीचें भातें २ गुंजा, चमचाभर दुधांतून द्यावें.

९६९. **मुलें जगत नसून नासावण्यावर :** उपरसालीचा (उपळसरी) काढा पहिल्या महिन्यापासून ९ महिने पर्यंत द्यावा. चूर्ण दुधांतून देणें.

९७०. **सल वाढण्यास :** आस्कंदाचें चूर्ण दुधांतून द्यावें.

९७१. **नासवण्याच्या खोडीवर :** भोकरीच्या सालीचा रस २ तोळेपर्यंत दुधांतून द्यावा.

९७२. **दम्यावर औषध :** रानांत चरणाऱ्या शेळ्यांची लीद (लेंड्या) गोळा करून, त्या जाळून पांढरी राख करावी, व तें भस्म २–२ गुंजा मधांतून द्यावें.

९७३. **अनेक ज्वरांवर (पूर्ण प्रतिज्ञा रस) :** पारा १ तोळा, गंधक १ तोळा, कलखापरी ६ तोळे, आल्याचा रस भावना ३, निर्गुंडीचा रस भावना ३, गुंजप्रमाण गोळी, अनुपानपरत्वें. (जुन्या बाडांतील उतारा.)

९७४. **गरोदर बायको नासावते व रक्तस्राव होतो त्यावर :** धने बारीक करून, त्याच्यांत खडीसाखर घालून, काढा किंवा सरबत करून, ४–४ तोळे दर वेळीं असें रोज ३ वेळां प्रवाळ घालून देणें.

९७५. **ताकद वाढण्यासाठीं :** शिलाजीत, वेलचीचें चूर्ण घालून दुधाबरोबर पिणें.

९७६. **हाडीताप, जीर्ण ज्वरावर :** हिंगूळ शुद्ध, व कवड्या लोबानची कवडी समभाग घेऊन, लिंबाच्या रसांत ४ दिवस खलून गोळ्या करून ठेवणें.

९७७. **धुपणी, सोमरोग, स्त्रीरोग; वगैरे श्वेत प्रदरावर :** केळें, गाईचें तूप, खडीसाखर, दालचिनी १॥ तोळा, पठाणी लोध्र १ तोळा, धायटीचें फूल ६ मासे, वेलची मोठी ६ मासे, सुंठ ८ मासे, मायफळ ३ मासे, चांदीचा वर्ख थोडा, हें सात दिवसांचें औषध होईल. सर्व मिळवून लेहासारखें खावें.

९७८. **धातुपुष्टी, प्रमेह, धुपणी वगैरेवर :** बीजबंद, तालीमखाना, ज्येष्ठमधाचा शिरा (सत् मुलेठी) वंशलोचन, सालंमिश्री, सत् बिरोजा (गंधाबिरोजा), मुक्ता किंवा शौक्तिकभस्म, हरड्याचें बीं, बेहड्याचें बीं, शिलाजित, लहान वेलची, वंग, प्रवाळ, प्रत्येकीं ६ मासे, गोळी करून दुधाबरोबर घेणें.

९७९. **घटसर्पावर :** आशीच्या झाडाची साल आणून ठेंचावी; चिलमींतून किंवा विडींतून ओढण्यास दिली असतां तत्काळ रोगी बरा होतो. आशीस फळें येतात तीं वांकडीं तिकडीं खळगे पडलेलीं असतात.

९८०. **वाताचा ठणका, पाय, ढोंपरें यांची सूज, व कळा यांवर :** सारीचा पाळा (पिलू मिरजोळी असेंही म्हणतात) हीं झाडें खाडी-किनाऱ्यास असतात. त्याचा पाला आणून वाफारा द्यावा. पाल्याची लुगदी पेंड करून वर

बांधावी. म्हणजे कळा नाहींशा होतात. पाल्यांत दारू गांवठी घालून पेंड केला तर चांगलाच.

९८१. **वृषणाच्या सुजेवर :** सारीची मुळी गोमूत्रांत, गरम पाण्यांत उगाळून लेप द्यावा.

९८२. **डोळ्याची लाली, सारा, गळ यांवर :** रसांजन (रसवंती) कुटून, दारूहळद कुटून, तुरटीचें फूल, त्यांत कागदी लिंबाचा रस भिजेल इतका घालून, कांचेच्या बरणींत तयार करून ठेवावें. डोळ्यांत सळईनें रोज अंजन १–२ वेळां करावें. (ऋषीकेशच्या साधूनें सांगितलेलें औषध.)

९८३. **संधिवात, ठणका, कमरेची फूट, कोणत्याही वातावर :** १ तोळा पांढरा सोमल, शिरसाच्या १ शेर तेलांत पुरचुंडी बांधून दोलायंत्रानें अर्धा तास किंवा थोडा जास्त कढवून मग काढून टाकावा. तेल गाळून बाटलींत ठेवावें. सांधे दुखण्यावरही हें तेल उत्तम आहे. रोज रगडून चोळावें.

९८४. **दमा, खोकल्यावर :** नाचणीच्या सत्वामुळें दम्यानें बेजार झालेले ३–४ रोगी चांगले सशक्त झाले. दम्यामुळें त्यांना तापही येत असे. सर्व विकार २ महिन्यांत गेले. सत्त्व (नाचण्याचें) काढून पाण्यांत दोन तोळे शिजवून, गूळ घालून, दूध टाकून, प्यावें. बारीक मनुष्यसुद्धां थोडें मांसल होतें.

९८५. **खोकल्यावर :** माक्याच्या रसांत मध घालून, अभ्रक १ गुंज, अगर प्रवाळमाक्षिक २ गुंजा, अगर प्रवाळपंचामृत, लोकनाथ रस, वगैरे द्यावा.

९८६. **व्रण पिकवण होऊन, पू निघून, भरण्यापर्यंत लावण्यास :** तगरीचा पाला ओला वांटून त्याची गोळी करावी. तेवढेंच लोणी व पाल्याची गोळी एक करून जखमेवर बांधावी. म्हणजे पू निचरून व्रण भरेल, जखमही भरून बरी होईल. (मुचकुंद आश्रम, द्रवीड संन्यासी, साखरपें, यांच्या मुखांतून.)

९८७. **आंकडीवर :** (१) अश्वत्थाच्या पारंब्या मधांत उगाळून देणें. (२) नागदवणी मोठ्या पानांची याचा रस २ ठिपके मधांत किंवा दुधांत देऊन उलटी होते, व आंकडी बंद होते.

९८८. **अपस्माराच्या झटक्यांवर :** वाघांटीची (गोविंदफळ) मुळी कांद्याच्या रसांत उगाळून नाकांत नेमके ४ थेंब सोडावे; असें २–४ वेळां करावें. बंद होतो.

९८९. **नेत्रांच्या सर्व विकारांवर, खुपऱ्यांवर :** दुधी बारीक लाल पानांची, लाल दांड्याची, जमिनीवर पसरलेली (गोरख दुधी), पान तुरीच्या डाळीप्रमाणें असतें. तोडलें तर मोहोरीइतका चीक येतो. हा चीक डोळ्यास लावावा. आंत खुपऱ्यांवर चोळावा.

९९०. **पोटांतील विकारावर :** १ तोळा दुधी पाण्यांत वांटून ७ मिरें वांटून

घालून, भांगेप्रमाणें छाणून साखर घालून प्यावी. साफ झाडा होऊन २–३ दिवसांत सर्व पोटांचे विकार मोडतील. व वायू, वगैरे सर्व जाऊन पोट साफ होईल.

१९१. **शक्तीवर, धातु घट्ट होण्यावर** : थोरली दुधी (नाइटी) १ तोळा, ७ मिरें घालून, वांटून, रोज सकाळीं साखर घालून प्यावी. (शिवाच्या मंदिरांत वैरागी आला होता त्यानें सांगितलें. मागें मुझफरपूरच्या ब्रह्मचाऱ्यानें हेंच सांगितलें होतें.)

१९२. **जीर्ण ज्वरावर** : पिंपळी १ भाग, माकारस ३ भाग, खलून गोळ्या करून घेणें. अतिशय उपयुक्त. (नेपाळ, पशुपति मंदिराच्या पुजाऱ्यानें सांगितलेलें औषध.)

१९३. **अनेक असाध्य रोगांवर अप्रतिम (घृत)** : ४ तोळे हरताळ (पत्री), घेऊन गाईच्या शेणांत ७ दिवस ठेवावा. शेण २–३ दिवसानें बदलावें. नंतर गोमूत्रांत ७ दिवस ठेवावा. गोमूत्र रोज नवें टाकावें. नंतर ताकांत ७ दिवस टाकावा. ताक १ दिवसाआड बदलावें. नंतर काढून स्वच्छ धुऊन त्याची खलांत बारीक पूड करून पक्के १६ शेर दूध घ्यावें. (१ तोळा हरताळास ४ शेर दूध हें प्रमाण असावें). पाहिजे तर १ तोळ्याचेंच प्रमाण घ्यावें. मग दूध ४ शेर पुरेल. दूध चांगलें कढईंत पातेल्यांत तापत ठेवतांना आंत हारताळाची पूड चांगली घोंटून मिळवावी. मग दुधास ४–५ कढ येईपर्यंत, लाल खरपूस होईपर्यंत तापवून, दहीं-ताकानें विरजण लावावें. थोडें पाणी घालून दुसरे दिवशीं तें दहीं घुसळून त्याचें लोणी काढून, तें कढवून तूप करून बाटलींत ठेवावें. ताक जमिनींत पुरून टाकावें. (कोणत्याही प्राण्याच्या तोंडास लागूं नये.) मग तूप काडीस लावून पाव तांदुळाइतकें विड्यांत, मधांत, लोण्यांत, साखरेंत, मलईंत सकाळीं एकदां द्यावें. विषारी असल्यामुळें जास्त देऊं नये. **पथ्य**– चांगलें ठेवावें. वरण, पोळी, दूध चण्याची भाकरी, तूप वगैरे. यानें गरमीचे सर्व विकार, संधिवात, हाडांतील ताप, अशक्तता, नपुंसकत्व, वगैरे जातें. नवळे लोकांस खास हटकून उपाय आहे. याच-प्रमाणें सोमलाचें तूप करावें. दोन्ही तुपें ३० वर्षांच्या आंतील माणसास देऊं नयेत असें गुरूचें सांगणें आहे. सोमलास हरताळाच्या दुप्पट शुद्धी करावी. दूध तितकेंच घ्यावें. सोमलाचें तूप गांठीयावात, आमवात, संधिवात, वगैरेंवर सर्वांवर वरीलप्रमाणें चालतें.

१९४. **लहान मुलाच्या वृषणवृद्धीवर** : एरंडेल लावून रोज रगडावें व ओंवा–मीठ समभाग गरम करून पुरचुंडीनें शेकावें. कमी कमी होत जाईल.

१९५. **मूळव्याध** : करंजाचें मूळ शेवग्याच्या सालीच्या रसांत उगाळून मोडांवर लेप करावा. मोड गळून पडतात.

१९६. **दमा, डांग्या खोकल्यावर** : कासवाची पाठ शिळ्या पाण्यांत उगाळून, प्यावयास द्यावी. त्यांत थोडा मध घालावा. डांग्या खोकलाही जातो. (रोह्याकडील एक मनुष्य वापरतो.)

९९७. **जीर्ण ज्वर :** डाळिंबाच्या रसांत दगडी बोर उगाळून द्यावें. १०–१२ दिवसांत जीर्णज्वर जातो.

९९८. **क्षयावर :** दगडी पाषाणभेद २ गुंजा ताकाच्या निवळींत द्यावें.

९९९. **महारोगावर :** (१) पाव तोळा लघुदंती मुळाचा काढा करून देणें. (२) फूट वगैरे पायांस, बोटास असते. त्यावर एक बाटली चुन्याच्या निवळींत नवटांक नवसागराची पूड घालून कापसानें चोळण्यास द्यावें.

१०००. **वातावर :** काळीं मिरें १ पासून २०–२५ पर्यंत रोज चावून खात जाणें, व १–१ कमी करून उतरीत जाणें. चोळून वरील साल काढून खावें.

१००१. **शौचशुद्धीवर :** सोनामुखी १० तोळे, बाळहरडे १०, पादेलोण २॥ तोळे, सैंधव २॥ तोळे, सुंठ २॥ तोळे; आंवळकटी ५ तोळे, यांचें चूर्ण रोज रात्रीं द्यावें.

१००२. **जीर्णज्वरावर :** प्रवाळ, त्रिकटू, मधाबरोबर रोज २ वेळां.

१००३. **पित्त विकारावर :** आंवळकटी, प्रवाळ, सूतशेखर, तुळस किंवा आलें यांच्या रसांत खलून द्यावें.

१००४. **पाळीच्या तापावर :** सूतशेखर, क्विनाइन, तुळस-रस, आलें किंवा माका-रस, यांत खलून द्याव्या.

१००५. **हिंवतापावर :** (१) सागरगोटा गर, पिंपळी, मिरें, सातवीण साल, तुळशीच्या रसांत खलून देणें. (२) पारिजातकाचीं १०–१२ पानें कुटून त्यांचा काढा ५–६ कप करून, आंत क्विनाइन चवलीभार मिश्र करून तो १ कप काढा २ दिवस द्यावा. रोज ३ वेळां याप्रमाणें २ दिवसांचे ६ भाग करावे. (३) तिवराच्या सालीचा काढा असाच करून द्यावा. त्यांत क्विनाइन इतकें नको. रोज २–३ गुंजांप्रमाणें घालून, ३ भाग करून द्यावे, दर वेळीं १ गुंज कोयनेल पुरे.

वरील दोन्ही काढ्यांत उकळतांना बाळहरडे २ तोळे, गुलाबकळी १ तोळा कुटून, घातली तर शौचास सहजच होत जाईल.

[आंबाघाटानजीक श्री दत्ताचें देऊळ बांधणारे साखरपेंनजीकचे मुचकुंद आश्रमांतील नारायणस्वामी मलबारकडील (मल्याळी) यांच्याकडील खुद्द त्यांनी सांगितलेलीं औषधें, कल्प वगैरे]

१००६. **ताम्र :** १ शेर अपामार्गाच्या (आघाडा) ओल्या पानांची लुगदी वांटून करते वेळीं पावशेर आंवळसार गंधक वांटतेवेळींच घालावा; व चांगली लुगदी करावी. मग मजबूत मडकें (हंडी) घेऊन (न फुटेल इतकें मजबूत असावें), त्याच्या तळास त्यांतील अर्धी लुगदी दाबून बसवावी. त्यांवर आंवळसार गंधकाची भुकी २ तोळे पेरून त्यावर ताम्रपैसा (तापवून लाल करून, चिंचेच्या बलकांत वगैरे विझविलेला) १ तोळा सुमारें वर ठेवून त्यावर पुनः गंधकभुकी १॥ ते २ तोळे वाटून

अर्धी लुगदी वर चेपावी, व झाकण न ठेवतां २ बाजूंस लांकडाचे मोठे ओंडे लावून चुलीप्रमाणें करून अगर चारही बाजूंस कुंडाप्रमाणें ओंडे लावून त्यावर हंडी ठेवून खालीं विस्तव बेताचा, अगदीं तीक्ष्ण नव्हे असा द्यावा. सकाळपासून रात्रीं १०–११ वाजेपर्यंत विस्तव ठेवावा. ओंडे जळतील ते आंत आंत हंडे उचलून घेत जावें. ते जळल्यास दुसरे लावावे. सकाळीं पैसा चुरेल, असें भस्म निष्कलंक होतें. सफेत करणें तर याच कृतीनें पुढें वरील लुगदींत गंधक दर वेळीं देत देत ५–७ वेळांनंतर ७ पुटें चुलीवर, लाकडाच्या पहिल्याप्रमाणें देऊन किंवा शरावांत घालून शेणीचीं पुढील पुटें देऊन उत्तम भस्म होतें. तें अर्धा तांदुळभार दर वेळीं रोज १ वेळां लोण्यांतून द्यावें. शक्तिवर्धक व ज्वर, वातविकार, पोटांतील अनेक विकारांवर द्यावें. याच कृतीनें शेताडाच्या पानांच्या लुगदींत (गंधक वगैरे पूर्ववत) तांबुस भस्म होतें. शेताडाच्या पानांच्या लुगदींत स्वर्ण, रौप्य वगैरे भस्में होतात.

१००७. **आम्लपित्त, अजीर्ण व वातविकारावर** : माका पानें पांढरीं मिरें, समभाग वांटून गोळ्या पाण्यावरोवर, दुधावरोवर घ्यावें.

१००८. **विटाळ येण्यास** : पांढऱ्या फुलांचा अडुळसा, त्याची रोज ५ पानें धुऊन बारीक वांटून गोळ्या करून किंवा लुगदी करून पावशेर दूध व साखर यांत मिळवून पिणें. ३ दिवस. प्रत्येक महिन्यास रोज सकाळीं एकदां देणें. विटाळ साफ होऊं लागेल. महिन्यानें पुन्हा ३ दिवस द्यावें.

१००९. **पत्री हरताळ भस्म** : चुना, पाणी, कळीचें पाणी, जाईचा रस, कोहोळा, ताक, गोमूत्र, कागदी लिंबाचा रस, कडूनिंबरस, कोरफडाचा रस, काळ्या तुळशीचा रस, यांत दोलायंत्रानें शिजवून शुद्ध करावा. वराच निर्विष होतो. म्हणून हरताळास शुद्धीकरणाची आवश्यकता आहे. नंतर २ तोळे हरताळास १६ तोळे शेतवडाचीं (शेताडाचीं) निवडून, त्या ओल्या पानांत वांटून, बारीक लुगदी करावी; मग शरावांत घालून वर संपुट करून, सुकवून चुलीवर १ प्रहर मंद, मध्यम, तीव्र अशी आंच द्यावी. मग तें सर्व भस्म कामास येतें. पत्रीहरताळ शुद्ध वरीलप्रमाणें करून काळ्या तुऱ्याच्या निगडीचें ओल्या पानाच्या लुगदींत (मोठ्या गोळ्यांत) भस्म होतें. त्याचप्रमाणें हरताळ कोरफडांत (रसांत) खलून, कडूनिंबाच्या झाडाचें मोठें पाळ काढून, त्यास भोंक पाडून, आंत हरताळ घालून काळ्या निगडीच्या पानांची लुगदी वर बसवून मातकापड करून गोवऱ्यांत किंवा लाकडांत भस्म होतें.

१०१०. **गळूं, व्रण, रक्ताची पिकलेली गांठ, वगैरेवर पुवाचा निचरा होऊन व्रण सुकत जाण्यास उपाय** : तगरीचीं ओलीं पानें वांटून, गोळा करून त्याच्याबरोबर लोणी तितकेंच मिळवून पुन्हां वांटून मिळवावें. पुन्हा वाटण्याचें कारण, लोण्यांतील ताक वेगळें राहूं नये. नंतर तें मिश्रण व्रणावर वगैरे लावून बांधून ठेवावें. याप्रमाणें रोज ४–५ दिवस केल्यास व्रणांतील पू सर्व नाहींसा होऊन व्रण भरून येईल. दुसरा उपाय करण्यास नको.

१०११. **कल्प** : सफेद मिरें १ शेर घेतलीं तर १ शेर दुधांत रोज दूध आटेपर्यंत शिजवून निथाळल्यावर त्यांतून काढून पुन्हा शेर दुधांत शिजविणें. यांतील दूध आटविलेलें खाण्यांत चालेल. याप्रमाणें २१ शेर दुधांत २१ वेळां शिजवून काढून पुसून बारीक वस्त्रगाळ चूर्ण करून ठेवावें. हा एक कल्प आहे. तें चूर्ण ४–६ गुंजांपर्यंत रोज तुपाबरोबर दुधांत, साखरेंत, किंवा लोण्यांत द्यावें. वातविकार, नेत्रविकार, जीर्णज्वर, अग्निमांद्य, अरुचि वगैरेवर द्यावें.

१०१२. **हरडा कल्प** : रात्रीं झोपते वेळीं हरडा (बाळहरडी नव्हे), कुटून, साल काढून, चघळीत चघळीत खाऊन, वर गरम पाणी दोन घोट द्यावें. अगदीं चूर्ण करूं नये. हा एक कल्प आहे. रोज रात्रीं १ हरडा खावा. नेत्र, दांत (असल्यास) ठीक होतील. कांती, आयुष्य वाढेल. पचन होईल. इतर विकार चिकटणार नाहींत.

१०१३. **मलेरियावर** : कृष्ण-तुळशीचीं पानें कुटून बारीक वांटून सुपारी-एवढी गोळी करून कापूरवडी बारीक एक, आंत मिळवून सकाळीं १ वेळां फक्त याप्रमाणें ३ दिवस देणें. खाल्ल्यानंतर २ घोट गरम पाणी प्यावें.

१०१४. **कामदुधारस** : (१) सोनकाव (गेरू), हा लोखंडाच्या कढईंत तुपांत श्यामवर्ण येईपर्यंत भाजावा; नंतर खलांत घालून आंवळ्याच्या स्वरसाचीं तीन पुटें देऊन गोळ्या करून ठेवाव्या.

१०१५. **पित्तविकार, धातुगत जीर्णज्वर वगैरेवर** : वरीलप्रमाणें गेरू श्यामवर्ण भाजून झाल्यानंतर आल्याच्या रसांत तीन भावना देऊन गोळ्या करून ठेवाव्या. भावनेकरितां खल चांगला करावा. १० तोळे गेरूस २ तोळे तूप भाजण्यास द्यावें. देण्याचें प्रमाण २ गुंजा. उष्णता, कपाळशूल, पित्तभ्रमण, धुपणी वगैरें-वर अनुमानपरत्वें द्यावें.

१०१६. **सर्व रोगांवर** : अनुपानपरत्वें गुणावह होणारें म्हणून महात्म्यांनीं सांगितलेलें औषध : हीराहिंग, बचनाग, गोखरूं, सोमल पांढरा, तेल्या टांकणखार, पिंपळी, आस्कंद, कुटकी, श्वेत मिरें, पत्री हरताळ, पिंपळमूळ, शुद्ध जैपाळ, वेखंड, गंधक, आंवळेसर पारा, सुंठ, हीं सोळा शुद्ध केलेलीं औषधें समप्रमाण घेऊन समान (भारंभार) काळ्या मावयाच्या रसांत ३६ प्रहर खल करून मिऱ्याप्रमाणें गोळ्या कराव्या, व अनुमानपरत्वें द्याव्या.

१०१७. **संग्रहणी, कफविकार, अपचन, जीर्णज्वर, वगैरेवर** : इंद्र-जवाचें चूर्ण, लेंडी पिंपळीचें चूर्ण समभाग दिवशीं दोन पुड्या मधाबरोबर चाटण्यास द्याव्या. २-३ महिने द्यावें.

१०१८. **उचकीवर** : (१) हळदीची विडी करून ओढण्यास द्यावी. (२) निर्गुडीचा पाला १ शेर, एक शेर पाणी घालून काढा करून, ५ तोळे राहि-ल्यावर उतरवून, त्यांतील एक चमचा काढा, व हिंग उत्तम अर्धा वाल, नुसता उगा-

ळून देणें. शेवटची उचकी राहील. कडूनिंबाच्या पानाची धुरी उचकी लागणाऱ्यास द्यावी. खोली बंद करून धूर गिळण्यास लावावा. म्हणजे उचकी राहील.

१०१९. **तापावर (ज्वरांकुश)** : सोमल भस्म, व हिंगूळ भस्म, वांगें मोठें घेऊन त्यांत एक हिंगुळाचा खडा १–२ तोळ्यांचा घालून ११–१२ वेळां भरीत करण्याजोगें वांगें भाजावें. आंतील खडा प्रत्येक वेळीं वांग्यात भरीत जावा. नंतर दुध्या भोपळा लहानसा घेऊन त्यांत तो खडा घालून मातकापड करून पुट द्यावें. दुध्या भोपळ्यास भोंक पाडून त्यांत खडा भरून वर लुगदी बसवावी. हिंगूळ करण्याप्रमाणेंच सोमल वांग्यांत करावा. हरताळ सांगितल्याप्रमाणें करून (गोड्या एरंडाचीं पानें लावून) तें भस्म देऊन साखरेबरोबर वर शतावरीचा काढा द्यावा. (वृंदावनबुवा).

१०२०. **संधिवात, आमवात, लखवा, अर्धांगवात वगैरेंवर (वातहारक तेल)** : १० तोळे ग्याळाच्या मुळांचें चूर्ण, २० तोळे कडू वृंदावन मुळें, १ तोळा किंवा १॥ तोळा अफू, ४० तोळे तिळाचें तेल चुलीवर ठेवून मंदाग्नीनें तापवून त्यांत पहिल्यानें वरील सालींचें चूर्ण टाकून, कडू वृंदावनाचीं मुळेंही कुटून टाकून तीं जळल्यावर शेवटीं अफू टाकून (वरील, बारीक तुकडे करून) तेल पक्कें झाल्यावर उतरून ठेवून उपयोग करावा.

१०२१. **आम्लपित्तावर** : लिंबाच्या फांका करून एकीवर डिकेमालीचें चूर्ण व एका फांकीवर पिठीसाखर घालून फांकी दोन्ही चोखाव्या, म्हणजे आम्लपित्तही तेव्हांच नाहींसें होईल.

१०२२. **वाताच्या कळा, ठणका वगैरेंवर** : गोड्या एरंडेलाच्या बोक्या (कोंवळ्या) कुटून त्याचा रस वर लावावा, व नंतर त्यांवर गूळ चोळावा. म्हणजे कळा २–४ दिवसांतच राहतात. कमर, पाय, मांड्या फुटण्यावर उत्तम.

१०२३. **उलटीवर** : दूध घातल्याशिवाय चहा (साखर घालावी) दिला असतां उलटी खात्रीशीर बंद होते.

१०२४. **अर्धशिशी वगैरे वातजनित मस्तकशूलावर** : ज्या बाजूस डोकें दुखत असेल त्याच्या विरुद्ध बाजूच्या कानांत लिंबांचा रस ४ ठिपके टाकून, वर पापडखाराची वस्त्रगाळ भुकी चिमूटभर टाकावी, व पुन्हा वर लिंबाचा रस टाकावा. याप्रमाणें फक्त १ दिवस, फार तर २ दिवस सकाळीं उपचार केला असतां डोकें दुखण्याचें खास राहतें.

१०२५. **वातानें पाय, कमर, सांधे वगैरे धरतात, दुखतात त्यावर** : वाघाट्याच्या पाल्याचा रस (गोविंदफळें येतात तिचा) २ तोळे व तूप तितकेंच घालून दिला असतां ते बरे होऊन, चालण्यास चांगलें येतें. जळवात, गृध्रसी, वगैरेंवर उत्तम आहे.

१०२६. **यकृत, प्लीहावर काढा** : बार्सिंगांचा काढा व बाळहिरडे प्रत्येकीं ६ आणे भार, रक्तरोडा साल, कुळीथ, सुंठ, प्रत्येकीं २ आणे भार यांच्या काढ्यांत वांझकर केळीचा कांदा, व जवखार २–३ गुंजा दर वेळीं, याप्रमाणें रोज २ वेळां.

१०२७. **न्युमोनियावर (कफज्वर) लेप वगैरे लावण्यास (चाटण)** : अडूळशाचा रस, कोरफडीचा रस, काल्याचा रस, पुदिन्याचा रस, तुळशीचा रस, मध, खडीसाखर, हे सर्व घेऊन त्यांत रिंगणमूळ उगळावें. हळकुंड उगाळून टाकण-खार लाही, ज्येष्ठमध भुकी घालून चाटण करण्यास द्यावें. **लेप छातीवर**— आळशी, आंबेहळद, कापूर, अफीण, थोडा नवसागर, हीं सर्व कागदी लिंबाच्या रसांत घोटून ज्या भागास कफ असेल त्या बाजूस लावावा. लेप देण्याच्या अगोदर त्यांत जुना कळीचा मिश्र करून लगेच लेप करावा, व वर कागद लावावा. नंतर मीठ गरम करून शेक देत जावा. रोज २-३ वेळां. तापावरील काढा कफज्वरावर सुरु ठेवावा.

१०२८. **रक्तपित्तीवर** : खाण्याचे कांदे पांढरे सफेत २१ आणून ठेवावे. निऱ्हाडिया मडक्यांत घालून आंत पत्रीहरताळ घालावा. वर रस घालावा. २१ दिवस रोज १ कांद्याचा याप्रमाणें रस घालावा. मग त्यांजवर अतुदीच्या तुळाचा रस वांटून पिळावा. मग उतऊन तिचा संभाळावा खोट होईल. मग रानशेणीचा अग्नी घ्यावा. मग हरताळ मरेल. तीच मात्रा नागवेलीच्या पानांत खावी. दिवस ४०. **पथ्य**— तुरीची डाळ, गहूं, भाकरी खावी. मीठ, तेल, वावडे पदार्थ खाऊं नयेत. (महंत)

१०२९. **सुलभ प्रसूतीस** : म्हाळुंगाच्या आणि मोहाच्या सालीचें चूर्ण (समभाग) तूप व मध यांत चाटावें; म्हणजे आयासावांचून प्रसूती होईल. चुलीवर धुरामुळें जी काजळी धरते ती शिळ्या पाण्यांत द्यावी, म्हणजे लौकर प्रसूत होईल. यात संशय नाहीं.

१०३०. **वंध्या होण्यास** : तीन वर्षांचा जुना गूळ ३ तोळे, १ मात्रा रोज याप्रमाणें १५ दिवस खावा. ती जन्मभर वंध्या होईल. १–२–३ पाळ्या कराव्या.

१०३१. **केस काळे होण्यास व इंद्रलुप्तीवर** : मधांत गुंजेचें पीठ खलून लेप केला असतां टक्कल (इंद्रलुप्त) जाऊन केस नवे येतील.

१०३२. **तोंडावरील पुळ्या जाण्यास** : वेखंड, सांबरशिंग, धने हीं वांटून तोंडास लेप करावा. म्हणजे तीन दिवसांत पुळ्या नाहींशा होतील.

१०३३. **केस जावयास औषध** : निवडुंगाच्या चिकाची आंवळ्यांस पुटें देऊन तें वांटून लेप केला असतां केस आपोआप गळून पडतात.

१०३४. **काळिमा जाऊन तोंडास गौरवर्ण येण्यास** : तीळ, जिरें, शहाजिरें, शिरस हे दुधांत वांटून ७ दिवस अंगास लेप करील, त्याचा सर्व काळिमा जाऊन वदन चंद्रासारखें होईल.

१०३५. **हिंवतापावर पथ्य** : काडेकिराईत १० तोळे, ८० तोळे पाण्याचा अष्टमांश काढा करून रोज घ्यावा. **पथ्य**—तेलकट, ताक, दही, वाटूळ देऊं नये.

१०३६. **नारूवरील औषध :** शतावरीची मुळी ओली सुमारें ८ अंगुलें आंतील दोरा कापून बारीक वांटून त्यांत पाणी घालून पिळून तो रस रोज २-३ वेळ घ्यावा. कांहीं वेळांचे वर १ तोळा तूप पिण्यास देणें. ढेकर वगैरे येतात. नारू साफ बरे होतात. (पुरुषोत्तम विनायक मळेकर, पेन्शनर डोंबिवली, यांजकडील).

१०३७. **विषूचिका, कॉलऱ्यावर :** कातरी निर्गुंडीचा पाला ओला आणून कुटून, बारीक खलून, गोळ्या करून, तयार (सुपारीएवढ्या) सावलींत वाळवून ठेवाव्या, देतेवेळी पाण्यांत कुसकरून पाणी गाळून पिण्यास द्यावें. (हा अनुभव केळकर यांनीं वारकरी टाकूर वगैरे लोकांना सांगितला.)

१०३८. **अतिशय घाम येणें बंद करण्यास :** पिंपळाचीं पानें ७ सुकलेलीं, सुंठ अर्धा तोळा, ओंवा अर्धा तोळा, निगडीचीं फुलें ।· तोळा, एक शेर पाण्यांत काढा करून पावशेर उरवावा, व थोडा थोडा द्यावा.

१०३९. **दम्यावर :** ओंवा, लवंग, गेळफळ, पांढरा कात, बिब्बा, कडू जिरें हे सर्व जिन्नस कुटून चवलीभार चूर्ण खाणें. वर गरम पाणी प्यावें.

१०४०. **न्युमोनियावर :** बावडिंगाची मुळी, लिंबाच्या रसांत, पाण्यांत, ताकांत, उगाळून द्यावी. (भालचंद्र डॉक्टरकडे विकण्यास या मुळ्या असत. महात्मा गांधींकडे असलेले डॉक्टर परुळेकर दिल्लीस भेटले ते.)

१०४१. **कामलेवर :** गोड्या एरंडाचीं कोवळीं पानें व मेंदीचा पाला गाईच्या दुधांतून ३ दिवस देणें. पथ्य— दूधभात खाणें. मीठ वर्ज्य.

१०४२. **डोळ्यांतील फुलावर :** दुधीचे पान तोडून चिकाचा ठिपका द्यावा. ७–८ दिवस. यानें फूल नाहींसें होतें.

१०४३. **व्रणावर :** दुध्याचा पाला व्रण शोषण करणारा आहे. वांटून लेप द्यावा, म्हणजे सुकत जातो.

१०४४. **फुरशाच्या विषावर पोटांत घेणें व लावणें :** फांगळा (सबज्याप्रमाणें झाडें असतात) पैकीं तांबड्या फुलांचा फांगळा घेणें. त्याची मुळी वालाइतकी पाण्यांतून घेणें, व जखमेवर लावणें. सकाळ संध्याकाळ ३ दिवस.

१०४५. **सायटिका, खंजवात यांजवर :** पारिजातकाचीं १० पानें उकळून, त्यांत थोडा हिंग घालून घेणें. पानें उकळून कुटून हिंग भाजून गोळी खावयास द्यावी. रोज एक वेळां याप्रमाणें २–३ दिवस.

१०४६. **भगंदरावर :** मोठ्या डोक्याचा सरडा जिवंत तिळाच्या तेलांत टाकून तळून त्याचें तेल काढिलें असतां तें तेल भगंदरावर उत्तम आहे. कडू निंबाच्या काढ्यानें रोज भगंदर धुवून वातीनें तें तेल रोज २–३ वेळां आंत भरून भगंदर बरें होतें.

१०४७. **अशक्तपणावर :** पलाश (पळस) कोणताही, तांबडासुद्धां उत्तम, त्याच्या लहान झाडांच्या (अगदीं रोपा, हात—दोन हात उंचीचा,) मुळ्या

बारीक कुटून वस्त्रगाळ करून तें चूर्ण रोज २ वेळां दूध खडीसाखरेंतून घ्यावे. 'वृद्धोपि तरुणायते' नेहमीं दिलें असता प्रकृती सुदृढ होते. (टेंबेशास्त्री श्रीवासुदेवानंद, हादीहांडा)

१०४८. **पित्ताच्या अपचीवर व उमासे यांजवर :** कोकमसालाचे सरबत घेणें.

१०४९. **क्षयकेसरी :** २ भाग मिरें, २ भाग तुरटीची लाही, १ भाग बचनाग, १ भाग नवसागर, एकूण बारीक चूर्ण करून अर्धगुंज मात्रा पिठीसाखरें-तून २–३ वेळां देणें. दुधावर ठेवावें.

१०५०. **शक्तिवर्धक गोळ्या :** बचनाग दुधांत शिजवून काढून घ्यावा. सुंठ १ तोळा, हिंगूळ १ तोळा, मिरें १ तोळा, दिवशी १ तोळा, सर्व समभाग ४ औषधें आल्याच्या रसांत गोळ्या करून दिवशीं गुंजेप्रमाणें गोळ्या २ दुधाबरोबर, विड्यांच्या पानांत वगैरे घ्यावी. आलें, साखर. हिंगुळाच्या ऐवजीं मल्लसिंदूर उत्तम आहे.

१०५१. **दांतांवर :** रुईचा चीक मडक्यांत काढून त्यांत समुद्रमीठ घालून मातकापड करून भट्टी करावी. आंतील काळी राख काढून ठेवून रोज दांत घासावे. स्वच्छ, रोगरहित, मजबूत होतील.

१०५२. **मूळव्याधीवर :** खाजकुहिलीच्चीं ओलीं पानें वांटून लुगदी मोडांवर बांधली असतां मूळव्याधीचे मोड जीर्ण होतात, व मूळव्याधीची इजा होत नाहीं. ७ दिवस करणें. **पथ्य**– पाहिजे. सदरहू पानांचा रस अगर मुळ्यांचें चूर्ण दूध-साखरेंत, तुपांत, देऊन मूळव्याधीवर अनुभव घेणें आहे. पानांचा मात्र अनुभव आहे. (वामन शंकर गोखले, यांजकडून).

१०५३. **हिंवतापावर :** धोतऱ्याच्या फळाची साल, अगर मुळीची, कोणतीही वालाइतकी विड्याच्या पानांत अगर गुळांत घ्यावी. २–३ दिवस घेऊन ताप जातो.

१०५४. **कफावर :** गांठे पिंपळमूळ चूर्ण रोज २–३ वेळां आल्याचा रसांत, मधांत दिलें असतां कफाचे बेडके सुटतात. ताप जातो. कफही जातो. क्षयावर कांहीं लोक घेतात.

१०५५. **आम संग्रहणी, संग्रहणी वगैरेंवर :** लोह भस्म २ गुंजा, दहीं २ चमचे, तूप १ चमचा, भाताच्या पहिल्या घासाबरोबर मिळवून घ्यावें. रोज २ वेळा. मग दहींभात जेवावा. (वन्याजीबाबा).

१०५६. **डोळयांचे विकार जाऊन लांब दृष्टि येण्यावर :** सुरम्याची डळी (सुरम्याचा दगड) हरिणाचे वितांत २–३ महिने भिजत ठेवून, कडूनिंबा-वरील मधांत घोटून ठेवून पापण्यांतून रोज अंजन करावें.

१०५७. **अग्निमांद्य, अपचन, ताप, बद्धकोष्ठ, पोटशूळ, वगैरेंवर :** सुंठ १ तोळा, मिरें १ तोळा, पिंपळी १ तोळा, बाळहिरडे १ तोळा, सफेत मिरें १ तोळा, नवसागर ·॥· तोळा, कुटकी १ तोळा, पादेलोण १ तोळा, रुईच्या फुलांतील गोळे ·।· तोळा, इतकीं खलून लिंबाच्या रसांत खलून, गोळी चण्यापेक्षां कमी करून, रोज २–२ घ्याव्या, सकाळीं-संध्याकाळीं.

१०५८. **खरूज, डोक्यांतील फोड यांवर :** सफेत कण्हेरीचें मूळ बारीक करून २–३ तोळे, शिरसाचें तेल १० तोळे घेऊन, त्यांत कढवून साल करपल्यावर काढून तेल, खवडे, डोक्यांतील फोड, खरूज यांजवर, सदरहू तेलांत १ तोळा पत्री हरताळ कढवून तें तेल वात-विकाराला लावण्यास घ्यावें. नपुंसकत्वावर चेतना येण्यास इंद्रियास लावण्यास उपयोग करावा.

१०५९. **डोक्यांतील खवडे रोग (केसांचा) कीड वगैरे मरण्यास :** खोबरेल तेलांत शिपिचंद मिळवून त्यांत अमृतधारा (ओव्याचें फूल, पेपरमिंट फूल, कापूर) मिळवून डोक्यास लावण्यास दिलें, त्याचा उत्तम उपयोग झाला. (अनुभूत). पत्री हरताळ घालून **अर्धांगवातावर, गृध्रास, गांठ्या वातावर** वगैरे उत्तम उपयोग होतो.

१०६०. **श्वास, कांस, दमा, कफ वगैरेंवर :** रुईचा चीक १ तोळा, कोरफडाचा गर १ तोळा, कडूनिंबाचीं पानें २ तोळे, ४ मिरें (सैंधव ·॥· तोळा, संचवड ·॥· तोळा, बुडलोण ·॥· तोळा, माचलोण ·॥· तोळा,) व ६ मासे नवसागर, सर्व कुटून २० तोळे जवाची पिठी घेऊन पाण्यांत भिजवून त्याची मूस तयार करून त्यांत वरील कुटलेला गोळा ठेवून पिठानेंच मूस बंद करून, वर कापडमाती करून सुकवून, वीत, दोन विती खड्डा करून त्यांत गोवऱ्यांत पूट द्यावें. आंतील औषध १ गुंजप्रमाणें दरवेळीं ६ मासे मधाबरोबर देणें. दमा बरा होईल. मध, आलें, खडीसाखर.

१०६१. **मूळव्याधीवर :** निंबोण्या (कडूनिंबाच्या बिया) ३ तोळे, कडूनिंबाच्या बिया ३ तोळे, साखर तोळे, दर वेळीं १-१ तोळाप्रमाणें ६ दिवस घ्यावें. सर्वप्रकारची **मूळव्याध** जाईल. तेलाची भाजी व चपाती रोज द्यावी. (साधूचें औषध).

१०६२. **वातविकार, ताप वगैरेवर :** केळीचा कांदा पोखरून (लहानसा) त्यांत सोमलाचा खडा ठेवून वर तो कांद्याचा चुरा बसवून त्यांवर मुलतानी माती, कापूस व हिंग एकत्र कुटून त्याची कापडमाती करून (कांद्याच्या तोंडावर सारून) नंतर कापडमात करून वाळवून पूट द्यावें. वातविकार, अर्धांगवात, नपुंसकत्व, ताप वगैरेवर अनुपान योजून द्यावें.

१०६३. **कवलूवर :** कवलूवर सकाळीं ५ तोळे वांगें, व ५ तोळे गूळ, चावून खावा. १० दिवस सकाळीं फक्त, म्हणजे कवलू जाते. शौचास साफ होतें.

१०६४. **कवळूवर :** महाळुंगाचा आंतील रस काढून ठेवून सुमारें १ तोळा रसांत १० मुया आंत टाकून बाटली बूच मारून ठेवावी. तो रस झाल्यावर कवळूवर सकाळीं अर्धा चमचा रस, १ तोळा पाणी घालून द्यावा, ५-७ दिवसांत कवळू जाईल.

१०६५. **ताप, वात, अग्निमांद्य, शूल, नपुंसकत्व वगैरे अनेक रोगांवर :** कुचल्याच्या बिया, कोरफडाचा गर काढून मोठ्या बरणींत थरांवर थर याप्रमाणें भरीत १० दिवस घालून नंतर काढून बिया खोलून, आंतील (जिभली) काढून बारीक करून ठेवाव्या. अनुपानानें घेणें.

१०६६. **वीर्यवर्धक :** पांढरे शेवरीची जाड साल दुधांत २१ दिवस उगाळून दूधसाखरेंत द्यावी. अत्यंत वीर्यवर्धक. (श्री. कविताबुवा महाळुंगेकर).

१०६७. **नपुंसकत्वावर (ध्वजभंग) :** पावलीभार अफू घेऊन पांच खारका देठाकडे कापून आंतील बी काढून त्या खारकांत समभाग पावलीभार अफूच्या गोळ्या कराव्या. म्हणजे ५ गोळ्या अफूच्या ५ खारकांत भरून वर कापलेला वरील खारीक तुकडा बसवून सुतानें बांधून त्या खारका गव्हाच्या आत्यांत मुठे ५ करून त्यांत भराव्या, पीठ पाण्यांतच भिजवावें. मुठे चांगले वळावे. बाहेर पडूं नये असे. नंतर ते मुठे गोवऱ्यांत ठेवून अगर (कोळशांतसुद्धा चालेल) माफक आंच द्यावी. मुठे करपले म्हणजे कापून फोडून बाहेरील भाग पिठाचा टाकून देऊन खारकासुद्धां बारीक करून त्यांत जाडे अंगूर (सुकलेलीं द्राक्षें मोठीं) सुमारें ५-७ गोळ्या होतील अशा बेतानें घालून चण्याप्रमाणें गोळ्या करून रात्रीं, सकाळीं, वाटेल तेव्हां एक गोळी तोंडात टाकावी. चेतना उत्पन्न होण्यास फारच अनुभविक असें आहे.

१०६८. **कास्तिस भस्म :** लिंबाच्या रसांत काशीस घालून वाळवून नंतर कोरफडाच्या गरांत कालवून (सुकेंच) कोळून म्हणजे फार रस घालूं नये. मडक्यांत घालून पूट द्यावें, म्हणजे भस्म होतें. तें भस्म व मृगशृंग भस्म प्रत्येकीं गुंज-गुंज मिळवून दूध-साखरेंत, तूप-साखरेंतून द्यावें. लहान मुलांची व मोठ्यांची तांबडतोब रक्तवृद्धी होते. कफ, श्वास, नाहींसा होतो. छाती (हार्ट) मजबूत होतात. मुलास रक्त वाढविण्यास उत्तम औषध आहे. ताबडतोब अंगांत शक्ती वाढते. शरीरास लालपणा येतो. (मोडक, सांगली)

१०६९. **मूळव्याधींत किंवा एरवीं रक्त पडत असेल तर :** वाळा १ तोळा, नागरमोथे २ तोळे, यांचें चूर्ण दूध-साखरेबरोबर द्यावें. इसबगोल रात्रीं भिजत घालून सकाळीं खडीसाखर घालून तुपांत परतून खावा. २-३ वेळां द्यावें.

१०७०. **शिब्यावर :** वॉशिंग सोडा, व कागदी लिंबू चोळणें.

१०७१. **चाई (टकलावर) :** केस येण्यास लवंगी मिरचीचा पाला व जासवंदीचें फूल चोळणें.

१०७२. **रक्तपिती व जळवातावर** : पांढऱ्या पांगाऱ्याची साल १ तोळा, पिठी मूठभर, १ तोळा तूप, यांचें चूर्ण वस्त्रगाळ करून, रोज १ तोळाप्रमाणें, तूप पिठीसाखरेबरोबर ४० दिवस द्यावें. ४० दिवस गंधक रसायन द्यावें, म्हणजे रक्तपिती, कान जड वगैरे झालेले फुटून लस जाऊन साफ सुकूं लागतात, व नंतर बरे होतात. वरण पोळी, तूप, पथ्य द्यावें. पुढें गोड ताक व जोंधळ्यांचा हुरडा द्यावा. वर्षातून हंगामी १ वेळां अगर जोंधळ्याची भाकरी आणि ताक रोज खावें. पायाच्या जळवाताच्या भेगाही फुटलेल्या बऱ्या होतात. मनुष्य समाजपतित झालेला पुन्हा समाजांत येतो. (तुळजापूरचे शास्त्री यांचा अनुभव).

१०७३. **सोमल भस्म** : निवडुंगाच्या चिकांत खलून सोमल घेणें. सज्जीखार भुकी चांगली करून एका तव्यावर खालीं १० तोळे घालून मध्यें खडा ठेवून वर १० तोळे सज्जीखार भुकी चेपून पहिल्यानें मंद आंच बारीक, दोन ढपल्यांची द्यावी. (२ तास). थोडा सज्जीखार भुकी राखून ठेवून फूट होऊन धूर वगैरे येऊं लागल्यास पुन्हा वर चेपावें. नंतर ३–४ तास कडक आंच द्यावी. आंत फुलून भस्म तयार होतें. याच-प्रमाणें कांद्याच्या रसांत सोमल खलून सज्जीखार चेपून भस्म करावें. (वाजीकरणी). हेमक्षीरींत हरताळ खलून पळसाच्या वगैरे राखेंत भस्म करावें. कागदी लिंबांत चवलीभार चांदी बारीक पत्रा करून घालून लिंबास मुलतानी कापड (मातकापड) करून २–३ वेळां पूट द्यावें. सफेत भस्म होतें.

१०७४. **नाकांत पीनस होतो त्याजवर उत्तम उपाय** : रानतुळशीचा रस नस्य करावा, अगर ठिपके ४–५ नाकांत टाकून ओढावे. म्हणजे किडे बाहेर पडतात. ३–४ दिवस रोज नस्य करावें. अत्यंत उत्तम उपाय आहे. ह्यानें नाक चपटें होणें, मस्तक दुखणें, घ्राण न येणें, पू, श्लेष्मा नाकांतून जाणें वगैरे सर्व विकार एकाच रसानें बरे होतात.

१०७५. **केस काळे होण्याचा कलप** : आंवळे ३, बेहडा १, आंब्याची कोय (गर), लोहभस्म चूर्ण १ तोळा, पाणी पावशेर, कढईंत घालून कल्क आळवून करून नंतर लावावें. हरडा व माक्याचा रस, व केळीच्या दांड्याचा चीक यांत असावा.

१०७६. **सर्वसाधारण काढा** : हिरडा २, (सर्व तोळेभार) बेहडा २, आंवळकटी २, गुळवेल २, धमासा २, सुंठ २, किराईत २. (विष्णू भटजी डोंगरे, पडघवली, यांचा सर्वसाधारण काढा)

१०७७. **कान वाहण्यावर** : वाहत्या कानांत, समुद्रफेस लिंबाच्या रसांत घोटून भुकी टेवून द्यावी, थोडीशी कानांत टाकून वर कापूस बसवावा. कानांत पाणी वाहतें तें बंद होईल. पू वाहील तर लोहानंतर तें वेळचे तेल कानांत टाकावें.

१०७८. **मूळव्याधीमुळें रक्त, मोड, सूज, वगैरे यांजवर** : बकायन (बिया) कुटून सर्व चूर्ण करून कापडावर गाळून बाटलींत भरून ठेवावें. ६ मासे

थंड झिव्व्या पाण्यांत सकाळीं घ्यावें. तसेंच सायंकाळीं घ्यावें. रक्त १ दिवसांत बंद होईल.

१०७९. **गरमी, परमा, रक्तपिती व इतर वायुदोषांच्या विकारावर :** दूर्वा मासे ३, कडूनिंबाची अंतरसाल ५ तोळे, रसकापूर १ तोळा, मोरचूद लाही ३ मासे, गाईचें साजुक तूप २५ तोळे, सांगितल्या कृतीनें वरील औषध तयार करून विड्याच्या पानांत घालून विडा करून सुपारी कात घालून दुसरे पानांत विडा करून दोन प्रहरीं व रात्रीं खाणें. **पथ्य** – तूप रोटी, अळणी वरण, साखर, चपाती वगैरे.

१०८०. **शक्तिवर्धक, जीर्णज्वरनाशक व धातुक्षीणतेवर :** गुळवेल १ तोळा, गोखरू १ तोळा, उकळून मग थंड झाल्यावर खडीसाखर घालून काढा रोज घेणें.

१०८१. **तोंड आल्यावर :** टांकणखाराची लाही लावून लाळ गाळणें.

१०८२. **अमृतधारा :** १ औंस थायमल, १ औंस पेपरमिंटफूल, २ औंस कापूर, एकूण ४ स्टॉपर्ड बाटलींत ठेवणें.

१०८३. **सर्पविषावर व कोणत्याही विषावर :** सरपटणाऱ्या प्राण्याच्या विषावर— ३ तोळे बेलाच्या सालीचा अगर पानाचा स्वरस, ३ तोळे चाफ्याच्या (खुर चाफा) सालीचा रस, यांत २ गोळ्या संजीवनीच्या घ्याव्या. देवडांगरीचें फळ १ घेऊन त्यांत जिरें असतें तें कुचलून ४ तोळे थंड पाणी पिण्यास द्यावें. वारंवार याप्रमाणें २–३ वेळां घ्यावें. घणसुरीचें पाळ पोटांत घ्यावें, व अंगास लावावें. विषावर वगैरे लावणें. पोपई कच्ची किसून वाफवून कवडी यकृत वगैरे ठिकाणी २–४ दिवस बांधावी. नाहींशी होईल.

१०८४. **वारीक तापावर :** नागरमोथा, व पित्तपापडा समभाग चूर्ण करून पाण्यांतून अगर दुधांतून फक्त चूर्ण चवलीभार घ्यावें. रोज २ वेळां, ८ दिवस देणें.

१०८५. **गंडमाळेवर :** बिल्वदलें बारीक वांटून, त्यांत तूप घालून, गरम करून, २–३ वेळां गांठीवर बांधावें. गंडमाळ निश्चितपणें बरी होईल

१०८६. **रक्तसंग्रहणीवर :** पांढऱ्या काताची पूड ६ मासे, विड्यांत द्यावी. २–३ दिवसांत बरी होते.

१०८७. **घटसर्पावर :** हादग्याच्या सालीचा काढा पाजावा. (रामबाण). अनुभूत. (अनंतराव मोजार यांचे मालवण, पुराणिक यांच्या टिपणांतील.)

१०८८. **मुळव्याध, उरक्षय वगैरेवर :** जमिनीवर दुधी म्हणून झाडें असतात त्यांचा रस जिरें–खडीसाखर घालून घेणें. रक्त बंद होतें. रात्रीं गाईचें दूध विरजून पहांटेस पाणी न घालतां घुसळून घ्यावें. अनेक वाताच्या विकारांवर अनुमान-प्रमाणें क्षयांतही उत्तम असें समजलें.

१०८९. **नवशरीर कल्प :** पळसाचीं ताजीं फुलें किंवा फुगे (अर्धवट फुललेलीं फुलें आणून तुपांत (चांगल्या) न करपतील अशीं तळून त्याची भुकी करून तूप-मधांत रोज खावी. २१ दिवसांत ताजातवाना मनुष्य होईल. (२) जून आंवळ्यांचा रस, माक्याचा रस १॥-२ तोळे प्रत्येक घेऊन, मध मिश्र करून सकाळीं प्यावा. वर गाईचें दूध शक्ती मानेल त्याप्रमाणें प्यावें. साखर घालावी. माक्याचा व आंवळ्याचा रस काढून समभाग (तीळ तेल) मिश्र करून कढवावें. फक्त तेल शिल्लक ठेवून उरवावें. तें तेल कापूर वगैरे घालून ठेवावें. नित्य केसांस चोळून लावावें. पोटात पराळे रस घेऊन हे तेल अंगास लावल्यानें अंगाच्या वळ्या जातील, केस काळे होतील, पिकणार नाहींत, व तारुण्य प्राप्त होईल. ४० दिवस हें घ्यावें. ३ महिने घेतल्यास दिव्य कान्ती होईल. गाईच्या दुधाचा उपयोग जास्त करावा. (कनखलतीर्थ, हरीविश्वनाथ).

१०९०. **झोप येण्यावर :** कागदी लिंबाचा रस कल्हईच्या भांड्यांत काढून त्यांत चांगला कापूर खलून लेप डोळ्यांस लावावा.

१०९१. **झोप येण्यावर :** कोवळें वांगें भाजून भरीत नुसतें मधावरोबर घ्यावें.

१०९२. **शक्तिवर्धक योग :** गुळवेलीचें कडूनिंबावरील सत्त्व काढून रोज घ्यावें. काळ्या गाईच्या दुधांत साखर-मध घालून घ्यावें. गुळवेल कडूनिंबावरील न मिळाल्यास आंबा वगैरे झाडावरील घ्यावी. ओल्या गुळवेलीचा रस दुधांत काढून साखर घालून नित्य दिल्यास क्षय जातो. फळांच्या रसावर राहावें. खजूर, फळें, दूध वगैरेंवर राहावें. पुढें कण्हेरी, पेज देण्यास सुरुवात करावी. नंतर भात चपाती वगैरे द्यावी. ओली गुळवेल कुटून चोथा करून रोज अंगास घासून अर्ध्या-तासानंतर ऊन अगर थंड पाण्यानें स्नान करावें. अंगकांती चटकदार होईल. सुरकुत्या जातील. अंगास तुकतुकीतपणा येईल. गुळवेल ' अमृता ' नावें प्रसिद्ध आहे ते गुण नामसदृश आहेत. (समक्ष पाहिलेला योग आहे.) (मुझफ्फरपूरचा ब्रह्मचारी बाबा नाशिक येथे भेटल्यावेळीं, वर्षें उमर १००).

१०९३. **दाहयुक्त जीर्णज्वरावर :** गुळवेल सत्त्व पिंपळी, मधांत चाटण्यास द्यावें. तेलकट खाऊं नये.

१०९४. **मस्तकभ्रम, वेड, उन्माद वगैरेवर :** पक्का पिकलेला (मोठा) कोहळा घेऊन त्यास गरापर्यंत गाबू पाडून त्यांत १॥ तोळा गूळ भरून वर कापड वसवून मोकळ्या हवेंत ठेवावा. सकाळीं पाणी गाळून पिण्यास द्यावें. दुसरे दिवशीं दुसरे ठिकाणीं भोक पाडून दुसरी गाबू पाडावी. त्यांत गूळ घालून पुन्हा तसेंच गाळून सकाळीं घ्यावें. याप्रमाणें ३-४ दिवस करावें. म्हणजे पडसें येईल. पडसें आल्यास औषध देणें बंद करावें. चक्कर येणें, साफ बरें होईल.

१०९५. **उलटी बंद होण्यास** : बाटलीभर कोरफडाच्या रसांत ५ तोळ्यांस १ तोळाप्रमाणें सोडा घालून ठेवावा. त्यांतील १ तोळा औषध द्यावें. तें औषध जाचत नाहीं. दूधभात, हलकें अन्न वगैरे द्यावें. पहिल्या पहिल्यांदा ३ वेळां, मग २ वेळां द्यावें.

१०९६. **धातुवर्धक व चैतन्यवर्धक** : बाभळीच्या पानाची लुगदी करून त्यांत चांदीचा तुकडा ठेवून मातकापड करून रोज भट्टींत (जेथें स्वयंपाक अगर मिठाई वगैरे तयार होते तेथें) घालून ४० पुटें द्यावीं. आंतील उत्तम भस्म होतें. ४० पुटांची जरूरी नाहीं. फार मोठी अशी आंच दिली तर लवकरच म्हणजे ५–७ पुटांत चांदी फुलून भस्म होतें.

१०९७. **अत्यंत पौष्टिक** : एका भांड्यांत मध १–२ तोळे घेऊन त्यांत गाईचें दूध काढतांना गरम असतें तें कपड्यावर काढतांनाच गाळून घ्यावें, त्यांत अभ्रक, वसंत, प्रवाळभस्म वगैरे असें घेतल्यास फारच उपयोग होतो.

१०९८. **पोटांत गोळा, गुल्म वगैरेवर** : अननस पिकलेला तुकडे करून ४–५ तुकडे सुमारें पाव अननस, एका बाजूस मिरचीची भुकी व दुसऱ्या बाजूस मीठ लावून खाण्यास द्यावें. असें ७–८ दिवस द्यावें. सुमारें आठ दिवसांनी ३–४ जुलाब होऊन पोटांतील नासका भाग कमी होईल, व गोळा थोडा थोडा कमी होत जाईल. याप्रमाणें थांबून थांबून ८ दिवस सोडून अगर महिना पंधरा दिवस सोडून अननस खात जावा. (हटकून गुणकारी औषध). (सुबाराव रामचंद्र दीक्षित ऊर्फ सुब्रह्मण्य स्वामी).

१०९९. **कवलूवर** : नारळाची करवंटी सकाळीं थंड पाण्यांत उगाळून वालाइतकी रोज द्यावी. अति भूक लागून अन्न खपेल. शौचास वगैरे साफ होईल. सायंकाळीं दूध घ्यावें. तूप वगैरे खावें.

११००. **कवलू, ज्वर, कफविकार, तोंड मचमचीत होणें यांवर** : एक बाळहिरडी व एक पिंपळी थंड पाण्यांत उगाळून सकाळीं घ्यावी. याप्रमाणें रोज एक दिवशीं एक पिंपळी व एक बाळहिरडी वाढवीत जाऊन सातवे दिवशीं ७ बाळहिरडे व ७ पिंपळ्यांप्रमाणें वाढवून घ्याव्या. न सोसेल तर ५ दिवसपर्यंत वाढवाव्यात. शौचास जुलाब होत जाऊन, मोडकळी वगैरेंवर उत्तम आहे. सातवे दिवशीं साखरभात थोडा तरी खावा.

११०१. **व्रणावर** : तुरटीची भुकी (कच्ची) कोणत्याही व्रणावर टाकल्यास आंतील किडे मरतात.

११०२. **अंगांतील कांटा, शल्य वगैरेंवर** : आघाड्याच्या मुळाची राख लोण्याबरोबर खाण्यास द्यावी.

११०३. **डांग्या खोकला व साधा खोकला यांवर** : हळकुंडाची गांठ (गाठे हळकुंड) घेऊन तें निखाऱ्यावर कोळशाप्रमाणें जाळून ताटांत ठेवावें. वर

वाटी झांकण ठेवल्यानंतर त्याची बारीक वस्त्रगाळ पूड करून एका मोठ्या वेलचीचे दाणे तुपांत लाल होतील असे तळून त्याचीही पूड त्यांत सामील करावी व संदल (पादेलोण) त्यांत २ वालाइतके मिश्रित करून त्याच्या लहान लहान पुड्या करून मधांत चाटाव्यात. याप्रमाणें भस्म प्रमाणानें तयार करून ठेवावें.

११०४. **सर्व रोगांवर अनुपानपरत्वें** : हिराहिंग, बचनाग, (शुद्ध केलेलें गोखरूं, सालम पांढरा, पिंपळी, तेल्या टाकणखार, आस्कंद, कुटकी, श्वेतमिरें, पत्री हरताळ, पिंपळमूळ, जेपाळ शुद्ध, वेखंड, आवळे गंधक, पारा, सुंठ, यांचें समप्रमाण घेऊन समान (भारंभार) काळ्या माक्याच्या रसांत ३६ प्रहर खलन करून मिऱ्याप्रमाणें गोळ्या कराव्यात. (महात्म्यांनी सांगितलेलें औषध).

११०५. **आमांशावर** : ऊन पाण्यांत कुड्याच्या पाळाची साल ६ मासे सुमारें उगाळून, त्यांत सुंठ ३ मासे उगाळून, आंब्याची कोय अर्धा हिस्सा उगाळून, जायफळ अर्धें उगाळावें. ४ तोळे पाणी घालून निम्मे एकदम घेऊन, निम्मे मग अर्धें अर्धें घ्यावें. त्यांत मध १ तोळा घालावा. (ओरसकर बुवा).

११०६. **जलोदरावर** : त्रिधारी निवडुंगाचा चीक गुळावर ३ ठिपके टाकून घ्यावा. म्हणजे जुलाब होतात. उदरांतील पाणी नाहींसें होतें. नंतर चुऱ्याची निवळ पिण्यास द्यावी. परंतु पाणी देऊं नये. तूप-भात घालावा. याप्रमाणें रोज ३–४ दिवस करावें.

११०७. **वाजीकरण** : गुंजा पांढऱ्या २ तोळे एक शेर दुधांत अर्धाशेर पाणी घालून चांगल्या शिजवाव्या. वालाच्या डाळिंबीसारख्या होत तोंपर्यंत शिजवाव्या. नंतर गरम पाणी घालून धुऊन सालपटें काढावींत. अगर डाळ जात्यांत कुटून शिजवाव्यात. म्हणजे चांगल्या शुद्ध होतात. लगेच खलबत्त्यांत घालून कुटाव्या. चूर्ण करून ठेवावें. दुधाबरोबर १ गुंज फक्त गोळी करून घ्यावी.

११०८. **बहिरेपणावर** : रुईचीं पिकलेलीं पानें शेकून रस काढून, कानांत घालावा. ठणका जातो.

११०९. **दांतखीळ बसलेली उघडण्यावर योजना** : तुरटी (फटकी)-ची लाही चांगली करून गुलाबपाण्यांत खलावी. पुनः लाही करावी. पुनः खलावी, असे २–३ वेळां पुनः पुनः करून लाही गुलाबपाण्यांत खलून ठेवावी. ती लाही जबडा उघडण्यास दांतांवर किंवा हिरड्यांवर चिमटी सर्व ठिकाणीं सोडावी. म्हणजे १०–१५ मिनिटांनीं जबडा उघडेल, व मग औषधी योजना पोटांत घेण्यास उपयोग होईल. (वैद्यराज गणपतराव लागवणकर यांचेकडील)

१११०. **गंडमाळेवर (रसमंजिरी)** : (१) एका फडक्यांत ७ वेळां रुईच्या चिकांत वाळवून नंतर २॥ तोळे लोणी, २॥ तोळे गंधक, दोन्ही थकून फडक्यास

लेप करावा. वाती करून पेटवावी. खालीं कांचेच्या भांड्यांत तें तूप धरावें. गंडमाळेस लावावें...गाठ धरून. चामडीचे सर्व रोग बरे होतात. १ गुंज विड्याच्या पानांतून देणें.

(२) रुईच्या झाडावर माती (वाळवी) असते ती जमवून गंडमाळेस पाण्यांत लेप करावा. गांठी बसत जातात.

१०११. **उरांतील दुःख, जळजळ, खोकला, कफ, ज्वरांश वगैरे-वर :** कोरफडीचा रस १० शेर, ५ शेर गूळ एका मडक्यांत भरून ४० दिवस पुरून ठेवावें. नंतर उकरून आंतील आसव वाटीनें दुसरे भांड्यांत काढून घ्यावें. जेवणानंतर २॥ तोळे घ्यावें. २ वेळां. उत्तम गुणकारी.

१११२. **तोंड येण्यास :** हरभऱ्याएवढा (लहानसा) हिंगूळ १ तोळा, रुईची साल १ तोळा, काळ्या कुड्याची साल (कुडई) १ तोळा, नाटकनारीची साल, तिन्हींचा खल करून हिंगूळसुद्धां ७ पुड्या कराव्यात. चिलमींतून ओढाव्या. १-१ पुडी रोज संपेपर्यंत सपाटून ओढावी. वाऱ्यावर फिरूं नये. अंघोळ बंद. कुळथाची अळणी काट, व भात खावा. ७ दिवसांनंतर चण्याच्या डाळीची आमटी गरम करून, मसाला, हिंग, जिरें, मिरें, वगैरे घालून भात त्याच्याशीं खावा. हरडा, बेर, त्रिफळेचा काढा करून चुळा भरून टाकाव्यात. (आंत काढ्यांत) तुरटी घालावी, म्हणजे तोंड २-३ दिवसांत बरें होतें. **छातीपासून सर्व विकार जातात. व्रण भरतात.** वाल ४-५ शेर जातें. परमा, गरमी, बंद होतात. **पथ्य**— पाहिजे. घसा, जिभा, गळा यांसी कापी पडलेले व्रणही बरे होतात.

१११३. **काळपुळी, थानपुळी, चाळणपुळी यांजवर :** वावळ्याची साल (याच्या अभावीं रानशेवगा चालेल.) तो कडू असतो. त्याची साल सुकवून चूर्ण करावें. १४ तोळे वावळाचूर्ण, १४ तोळे नाचणीचे चूर्ण, ७ तोळे बांवची, ५-६ तोळे आंबेहळद, याप्रमाणें आपणास पाहिजे. तितकें कमीजास्ती प्रमाणात घ्यावें. सूज, गांठ, सर्व प्रकारच्या सुजी, गांटी, पुळ्यांस. (सदरहू औषध सांगितल्याबद्दल बक्षीस दिलें रु. २५. असें औषध अनुभविक खात्रीचें आहे.)

१११४. **शूलनाशक (गोळ्या) :** (१) कळलावीचा रस (वंगली) हिंग, मिरें, तुपांतून द्यावें. तात्काळ शूल जातो. चवलीभार. (२) सागरगोट्याचें चूर्ण, हिंग, कळलावीच्या रसांत खलून गोळ्या कराव्यात. ओंवा वगैरे घालून द्याव्या. सदरहू शूलनाशक तुपातून द्यावें. (३) काळें मिरें, व गूळ समभाग पुष्कळ कुटून लगदी गरम डब्यांत भरून २१ दिवस ठेवावें. नंतर गोळी थोडी खावी. पोटशूल थांबतो. अग्नि प्रदीप्त होतो.

१११५. **हिंवतापावर :** गूळ, तुळशीचीं पानें, मिरें कुटून गोळ्या करून रोज ३ गोळ्या द्याव्या. वर दूध द्यावें.

मलशुद्धीवर : १ तोळा पादेलोण, १ तोळा बाळहरडे, १ तोळा निशोत्तर,

१ तोळा गुलाबकळी, १ तोळा सोनामुखी, ·।।· तोळा सुंठ, यांचें चूर्ण ऊन पाण्या-बरोबर अगर सकाळीं चहाबरोबर पावलीभार देणें. मलशुद्धी साफ होते. मेद झडतो.

११**१६. क्षयावर :** शंखाच्या तोंडांत रुईचा चीख भरून, शंख चुलीवर ठेवावा. चीक जिरला म्हणजे पुनः पुनः दोन-तीन वेळां असेंच करावें. नंतर त्या शंखाचें भस्म करून गुंज गुंज मधांतून वगैरे देणें. (इंदूरचे साधू).

१११७. इसब, गजकर्ण वगैरेवर : १ पौंड व्हॅसलिन, ·।।· पौंड गंधक, ५ तोळे कॅलोमेल, १० तोळे बोरिक ॲसिड, २ तोळे मोरचूद, कापूर १ तोळा, एकूण वस्तू पांच, व कापूर पाणी वगैरे येत असल्यास कॅलोमेल सुकेंच चोळण्यास द्यावें. हें सर्व प्रकारच्या कृमिजन्य चामडीच्या विकारांवर उत्तम आहे.

१११८. व्रण वगैरेवर : खोबरेल १ शेर (२८ तोळे), मेण १२ तोळे, शेंदूर १ तोळा, लोखंडी कढईत घालून शेंदूर काळा होईपर्यंत कढवावें. उतरल्यावर जरा गरम आहे तोंच २ तोळे टरपेन (टरपेन तेल) घालून निवाल्यावर डबड्यांत ठेवावें. व्रण रोगावर उत्तम.

१११९. मुलास खोकल्यावर : काकडशिंगी, अतिविष, पिंपळी, जवखार, पुष्करमूळ चूर्ण मधांतून द्यावें. (भाऊसाहेब दिवेकर).

११२०. संधिवातावर : १० शेर केळीच्या कांद्याच्या पाण्यांत (अगर कालाच्या) ५ तोळे सोमल कढईत टाकून मंदाग्नीवर शिजवावा. २ शेर पाणी राहिल्या-वर उतरून बाटलींत भरून ठेवून सुजेवर, सांधे वगैरेवर, कटिवातावर वगैरे चोळणें.

११२१. सुजेवर : १ शेर गोमूत्रांत पावलीभार सोमल टाकून शिजवावा. चतुर्थांश करून फक्त चोळणें, चांगला गुण येतो.

□

श्रीधन्वन्तरि

अच्युत बाळकृष्ण पाध्ये गुर्जर यांचें बाड

१. **लहान मुलांची छाती कफानें दाटते त्यास उपाय :** कांदा ठेचून, त्यांत पाणी घालून, अष्टमांश काढा करून, तो पाजावा, व दुसरा कांदा चांगला ठेचून वा किसून, त्याचें पोटिस करून, त्यानें छाती, कुशी शेकाव्यात.

२. **लहान मुलांच्या आंकडीवर उपाय :** तेल्या-स्वागी-टंकण खाराची लाही १ गुंज, आईच्या दुधांतून द्यावी. याप्रमाणें एक तासांत तीन वेळ दिल्यानें, आंकडीचा जोर कमी होऊन, मूल सावध होतें.

३. **आंकडीवर उपाय :** कारिवण्याचा- ब्राह्मीचा रस २ मासे, मध २ मासे, कोष्ठ-कोळिंजनाची पूड १ मासा, एकत्र करून त्यांत पुतळीचें सोनें ५-६ वेढे उगाळून ठेवावें, व तें मिश्रण मुलांस थोडें थोडें चाटवावें.

४. **आंकडीवर उपाय :** अक्कलकाऱ्याची मुळी तीन तोळे घेऊन अर्धवट चेंचून त्यांत ४८ तोळे पाणी घालून काढा करावा. तो गाळून एका मातीच्या परळांत ठेवावा. नंतर एक ३ तोळे वजनाची वेखंडाची मुळी वरील साल काढून ती चेंचून, तिला पूर्वीच्या काढ्याची ५-६ सूर्यपुटें द्यावीं व चांगली वाळल्यावर संग्रहीं ठेवावी. ती मुळी पाण्यांत उगाळून पाजावी. यानें आंकडी कमी होते. हा उपाय सतत तीन दिवस करावा.

५. **दाढदुखीवर उपाय :** रुपयाच्या आकारापेक्षां कांहीं मोठी एक स्वच्छ कापसाची चकती करून, ती चकती पितळींत पाणी भरून, त्यावर हलकेच ठेवावी. ती त्या पाण्यावर तरंगत राहील. नंतर सुमारें १ तोळा तूप घेऊन तें गरम करून पातळ झाल्यावर सर्व तूप त्या चकतीवर, ती सर्व चकती भिजेल असें हळूहळू टाकावें, नंतर सुमारें २ चिमटी लाल मिरच्यांची पूड, तूप टाकलेल्या चकतीवर टाकावी. नंतर दुखणारा भाग खालीं राहील अशा रीतीनें निजून त्या चकतीचा मिरचीपूड असलेला भाग दुखऱ्या भागावर ठेवून, लाळ गळूं द्यावी. यानें आराम वाटेल. (२) पेरूच्या झाडाची कोंवळसर पानें आणून, पाट्यावर चटणीप्रमाणें वांटावीं, व ती लुगदी दुखणाऱ्या दाढेच्या पोकळींत भरावी. उत्तम गुण येतो.

६. **बोटाचें पेर सुजल्यावर उपाय :** एखाद्या बोटाचें पेर सुजून दुखूं लागतें. त्यावर उपाय न झाल्यानें तें फार ठणकून पिकतें, सबब थोडें दुखत आहे त्या वेळीं त्यावर उपाय करावा. तुरटीची पूड करून ती पाण्यांत विरघळेल इतकी घालून ठेवावी व तें मिश्रण वारंवार पेरावर घालून सुकवावें. याप्रमाणें बरेच वेळां केल्यानें दुखणें बंद होईल.

७. **पेरावर उपाय** : देवडांगरीचें फळ हिरवें मिळाल्यास, त्याची एक बाजू कापून तें फळ पेरावर टोपीप्रमाणें बसवावें. ओलें फळ नच मिळेल तर सुकें फळ पाण्यांत भिजत घालून ठेवावें व त्यानंतर त्याचा कापून वरप्रमाणेंच उपयोग करावा. टोपीप्रमाणें घालून वर फडक्यानें बांधावें. सूज उतरेल.

८. **पेरावर उपाय** : कोरफडीची जाडसर पात आणून त्याचा मधला भाग थोडा पोखरून त्यांत बोट घालून पेरावर गर राहील असें ठेवून वर कापडाची पट्टी बांधावी.

९. **इसबावर उपाय** : गंधाबिरोजा (एका झाडाचा रस मलमाप्रमाणें पातळसर असतो, गंध्याच्या दुकानांत मिळतो.) तो एका बारीक फडक्यावर घालून ती पट्टी किंचित् गरम करून बिरोजाचा भाग इसबावर बसेल अशा रीतीनें लावावी. ती पट्टी आपोआप सुटेल तेव्हां सोडावी. मुद्दाम काढूं नये. आठ-दहा दिवसांत हटकून गुण देतो. पथ्य कांहीं नाहीं. शरीरांत कोठें गांठ उठल्यास वरीलप्रमाणेंच पट्टी लावावी. रक्त पसरून जाऊन गांठी वितळतात. उत्तम उपाय आहे.

१०. **इसबावर उपाय** : भांग तोळा १, ओंवा तोळा १, मिरीं तोळा १, लसूण १॥ तोळा, यांची शरावांत घेऊन राख करावी. ती शेळीच्या मूत्रांतून लावावी. इसब जातो.

११. **इसबावर उपाय** : मेथी व आंबेहळद यांचें चूर्ण करून कोरफडीच्या एका मोठ्या पातींत भरून तीन दिवस ठेवावी. नंतर इसबाच्या जागेवर चोळून चोळून लावावें. इसब जातो.

१२. **इसबावर उपाय** : बिब्याचें तेल काढून त्यांत शेंदूर घालून लावावें दिवस ३.

१३. **इसबावर उपाय** : इसबाच्या जागेस थोडें घांसून दोन प्रहरांनंतर पाण्यांत शंख्या सोमल उगाळून लावावा. व त्यावर घटकाभर ऊन लागेल असें बसावें. मग थंड पाण्यानें ती जागा स्वच्छ धुऊन वर तपकिरीची पट्टी बांधावी. ३ दिवसांनी सोडावी. त्या जागेस थंड पाण्याचा स्पर्श करूं नये.

१४. **आम्लपित्तावर उपाय** : सुंठ, मिरीं, पिंपळी, हरडा, बेहेडा, आंवळकटी, नागरमोथा, वावडिंग, श्वेतचंदन या सर्वांचें समभाग चूर्ण पोटांत घ्यावें. आम्लपित्त जातें.

१५. **गंडमाळेवर उपाय** : पांढऱ्या कण्हेरीच्या मुळ्या २ भाग, काळ्या धोतऱ्याचा पाला ६ भाग, अफू १ भाग, रुईच्या मुळाची साल ६ भाग, भांगेचा कूट २ भाग, याप्रमाणें उत्तम चूर्ण करून घोड्याच्या मुतांत खलून गोळी हरभऱ्याएवढी करा. सकाळ-सायंकाळ एक एक गोळी घेणें. सर्व प्रकारचे ग्रंथिरोग व शरीरतिडकेस व नामर्दीसही ही गोळी द्यावी. उत्तम उपाय आहे.

१६. **गंडमाळेवर उपाय** : रिंगणीचें मूळ शनिवारीं आमंत्रण देऊन आणावें. त्याचे तुकडे करून कुमारीच्या हातून सुतानें त्यांची माळ करून गळ्यांत बांधावी. गंडमाळा जाम बरी होते.

१७. **गंडमाळेवर उपाय** : मेहेंदीचा पाला, पांढरा कात, चिमणीची व कोंबड्याची विष्ठा एकत्र करून मलमाप्रमाणें वांटून खलून थोडें पाणी घालून लेप द्यावा. उत्तम उपयोग होतो.

१८. **गंडमाळेवर उपाय** : समुद्रफळ, दहीं व रुईचा चीक एकत्र करून खलून त्याचा लेप द्यावा. ७ ते १४ दिवस हा उपाय करावा. गंडमाळा जाम. पोटांत अमरकंदाचें चूर्ण देणें.

१९. **गंडमाळेवर उपाय** : वांकेरीचें भातें, उपळसरीचें मूळ, व खाऱ्या पाण्यांतील लव्हाळ्याचें मूळ, तीनही एकत्र करून उगाळून दररोज दोन वेळ पोटांत घेणें. गंडमाळा, त्याचा ताप, क्षय, वगैरे विकार हटकून दूर होतात. ४० दिवस हा उपाय करावा.

२०. **व्रणावर मलम** : पारा १ भाग, गंधक १ भाग, मुरदाडशिंग २, कपिला ४, मोरचूद ·|· (सर्व भाग प्रमाण), तूप ३ भाग, घालून चांगलें खलावें. हें मलम व्रणावर लावावें. प्रथम बाभळीच्या सालीचा काढा करून त्यानें व्रण चांगला धुऊन वर मलम लावावें. बाभळीची साल न मिळेल तर त्रिफळ्याच्या काढ्यानें चांगला धुवावा. नंतर चांगला पुसून वर मलम लावावें. पोटांत १४ दिवस गुग्गुळ द्यावा. व्रण भरत आल्यावर बाभळीच्या सालीच्या काढ्यांत गोपीचंदन उगाळून त्यांत मलम घालून, त्याचा लेप द्यावा. व्रण लवकर सुकेल.

२१. **व्रणावर उपाय** : कडूलिंबाच्या ओल्या काड्या मूठभर घेऊन गाईचें लोणी पावभार एका भांड्यांत एकत्र कढवावें. अर्क चांगला निघून तूप तयार झाल्यावर उतरावें. या तुपांत वात भिजवून व्रणांत घालावी. वर उत्तम पिंजलेल्या कापसाची पट्टी ठेवून फडकें बांधावें. याप्रमाणें दिवसांतून २–३ वेळ वात घालून ठेवावी. याप्रमाणें १४–२१–४० दिवस करावें. पोटांत वांकेरी भातें द्यावें. **पथ्य–** गाईचें तूप, रोटी, साखर, पाणी तापवून घेणें. उत्तम गुण येईल.

२२. **व्रणावर उपाय** : कडूनिंबाचा व घोसाळीचा पाला समभाग एकत्र चटणीप्रमाणें वांटून, त्याची वडी करावी व ती तुपांत तळावी. तूप हिरव्या रंगावर येतांच मग वडी काढून त्यांत शेंदूर, राळ, पांढरा कात, वेलची, सडकी सुपारी यांचें चूर्ण एकत्र करून कांशाच्या भांड्यांत वाटीनें खलून लावावें– सर्व व्रण बरे होतील. **पथ्य–** अळणी, गहूं, तूप, साखर घेणें. भात वर्ज्य.

२३. **खाज, दादीवर उपाय–** पारा, गंधक, हळद, दारुहळद, जिरें, शहाजिरें, मनशीळ, सैंधव, मिरें, सर्व लोण्यांत खलून शरीरावर लावावें. त्वग्रोग दूर होतात.

२४. **श्वेतकुष्टावर उपाय** : काळा सर्प आणून शरावसंपुटांत घालून

त्याचें भस्म करावें. तें भस्म समभाग बिब्याच्या तेलांत घालून खलावें. नंतर त्याच्या. निम्में नवसागर घालून खलावें. नंतर नवीन व्यालेल्या मेंढीचें दूध ४२ तोळे, तिचा बछडा पिण्यापूर्वी काढून घ्यावें. तें त्यांत मिसळावें. नंतर त्यांत खैराचा साड, कडूलिंबाचीं पानें, परवराचीं पानें, गुळवेल यांचीं चूर्णे व अडुळशाचा काढा घालून तांब्याच्या पात्रांत उत्तम खलावें. त्याचा लेप द्यावा. श्वेतकुष्ठ जाय.

२५. **श्वेतकुष्ठास लेप :** रुईचें मूळ, गंधक, कुटकी, हरताळ, हरडेदळ व हळद यांचा गोमूत्रांत खलून लेप लावावा. श्वेतकुष्ठ जातो. पोटांत बांवची व सोमसतीचें चूर्ण घेणें.

२६. **शरीरावर उठणाऱ्या दीर्घकाल राहणाऱ्या दादी व त्यांची खाज यांवर उपाय :** तूप अच्छेर आणून चुलीवर कढ आणावा, आणि कढ येतांच त्यांत ५–७ बिब्बे फोडून घालावे. चांगले कढल्यावर त्यांत मनशीळपूड थोडी घालावी. मग एका परातींत थंड पाणी घालून त्यांत तें ओतावें. थंड झाल्यावर तें तूप काढून ठेवावें. शरीरास लावल्यानें खाज, दाद बरें होईल.

२७. **गजकर्णास उपाय :** अंजीराच्या पाल्याचा रस १० तोळे, मोरचुदाची लाही ४ मासे, ताम्रपात्रांत खलून लावणें, गजकर्ण जाईल.

२८. **चामखिळास उपाय :** (१) विड्याच्या पानास थोडा चुना लावून तें हातांत धरून बोटांनी चांगलें चुरावें. रस येईल तो चामखिळास चोळावा, बराच वेळ चोळल्यानें चामखिळ पडून जातील.

(२) **चामखिळास उपाय :** एखाद्या विहिरींत मनुष्यानें जीव दिला असेल, त्या विहिरीजवळ जाऊन हातांत उडीद घ्यावेत व जितके चामखीळ शरीरावर असतील त्या प्रत्येकाकडे पाहून एक एक उडीद त्या विहिरींत टाकावा. याप्रमाणें सर्व चामखीळ निघून जातील. (हा सिद्धयोग आहे.)

२९. **गोवर, कांजिण्या, देवीस उपाय :** भोंक न पाडलेले मोती पाण्यांत घालून एक रात्र ठेवून तें पाणी सकाळीं पाजावें. यानें सर्व विकार बाहेर पडतील. त्याचप्रमाणें गोरोचनही गाईच्या दुधांतून द्यावें. उत्तम उपयोग होतो.

३०. **मूळव्याधीवर सिद्धयोग :** तांब्याच्या एका पंचपात्रींत रात्रीं पाणी घालून ठेवावें. सकाळीं त्याच शिळ्या पाण्यांत गोड्या शेंगुळाची ओली साल (शिग्रु) गंधाप्रमाणें उत्तम रीतीनें सुमारें तोळाभर उगाळावी. तें गंध बाकीच्या पाण्यांत मिसळून प्यावें. याच भांड्यांत पुन्हा पाणी भरून त्यांत सकाळप्रमाणेंच शेंगुळाची साल उगाळून तें मिश्रण सायंकाळीं पिणें. **पथ्य–** फार तिखट पदार्थ, हिंग, मोहरी वगैरे वर्ज्य करावें.

३१. **कपाळदुखीवर धूम्रप्रयोग :** रुईचें पाळ आणून त्याचें भरड चूर्ण करून ठेवावें. कपाळ जोरानें दुखत असेल त्या वेळीं पळींत निखारे घेऊन, त्यावर तें चूर्ण टाकून येईल तो धूर नाकांत घेणें. तात्काळ दुखणें थांबतें.

३२. **दंतविकारावर उत्तम उपाय** : अर्धा शेर सैंधव (सैंधव नच मिळाल्यास मीठ चालेल) व तितकेच विग्दे एकत्र करून एका कोऱ्या गाडग्यांत भरून त्याच्या तोंडावर मातीची पणती बांधावी. ती पणती व गळा यांत मातकापड करावें. म्हणजे आंत हवा जाणार नाहीं. नंतर १०–१५ गोवऱ्या खालीं घालून त्यावर तें मडकें ठेवावें. पुन्हा वर १०–१५ गोवऱ्या घालून अग्नि देणें. थंड झाल्यावर, काढून आंतील पदार्थाची पूड करून डब्यांत अगर बाटलींत भरून ठेवावी. दररोज लावल्यानें दांत हालणें, हिरड्या सुजणें वगैरे विकार दूर होतात.

३३. **डोळे स्वच्छ होण्यास उपाय** : दररोज रात्रीं निजतेवेळीं स्वच्छ सहाणेवर बाळहरडी १०–१५ फेरे उगळावी. त्यांतच खडीसाखरेचे तितकेच फेरे उगाळून तें पाणी डोळ्यांत घालावें. याप्रमाणें नित्य केल्यानें डोळ्याचे सर्व विकार दूर होऊन डोळे स्वच्छ होतात.

३४. **डोळे स्वच्छ होण्यास** : एक चांगलें लाल दाण्याचें मोठें डाळिंब घेऊन, त्याचे दाणे एका स्वच्छ फडक्यांत घेऊन पिळावें. तो रस एका उत्तम कल्हई केलेल्या भांड्यांत घेऊन त्यांत एका पिकलेल्या कागदी लिंबाचा रस घालून ठेवावा. नंतर एका दुसऱ्या कल्हई केलेल्या भांड्यांत उत्तम पत्री खडीसाखर ७ तोळे, व पाणी पावशेर घालून मंदाग्नीवर त्याचा पाक करावा. पाक करीत असतां त्यावर मळी येईल ती चमच्यानें काढीत जावी. पुढें साखरेची तार येण्याजोगा पाक तयार झाल्यावर पूर्वीच्या भांड्यांतील मिश्रण त्यांत थोडें थोडें टाकून ढवळीत राहून एकजीव करावा, व थोड्याच वेळानें तें मिश्रण चुलीवरून उतरून एका कांचेच्या स्वच्छ बाटलींत भरून ठेवावें. हें मिश्रण दररोज सकाळीं व रात्रीं निजतेवेळीं कांहीं थेंब डोळ्यांत घालीत जावें. यानें डोळ्याची आग, सारा, वगैरे सर्व विकार दूर होतील.

३५. **लहान मुलांच्या वांतीवर उपाय** : एक लिंबू कापावें. त्याचा अर्धा भाग घेऊन त्यावर खाण्याचा ओला चुना पानास लावतों त्याप्रमाणें ओल्या भागावर लावून तें अर्धें लिंबू निखाऱ्यावर ठेवून त्यांतील रस कढ येऊन वर येऊं लागल्यावर मायफळाची वस्त्रगाळ पूड वरणाभर त्यावर घालून एका काठीनें निखाऱ्यावर असतांच ती पूड त्यांत जाईल असें करावें. नंतर तें लिंबू उतरून दुधांत पिळून लगेच पिण्यास द्यावें. जरूर तर थोडी साखर घालावी.

३६. **अर्धांगवात, सर्वांगवात, श्वानदंश यांवरील सिद्धयोग** : दररोज सायंकाळीं चांगला स्वच्छ माका आणून तो साफ करून ठेवावा. पहांटे चार वाजतां उठून माका पाट्यावर चटणीप्रमाणें वाटून त्याची एक वडी करावी. नंतर एका पळींत एरंडेल तेल घालून तें चांगलें कढलें म्हणजे त्यांत ती वडी घालून चांगली तळावी. खालवर दोनही बाजू चांगल्या न करपतां तळल्यावर ती वडी सूर्योदयापूर्वी त्यांत कांहीं तेल पळींत शिल्लक असल्यास तेंही त्यांत मिसळून खावें. जरूर तर रुचीसाठीं थोडी साखर घालावी. मग वर दूध पिणें.

याप्रमाणें १४–२८ दिवस हा उपाय चालू ठेवल्यानें अर्धांगवात, सर्वांगवात, अपबाहुक, मन्यास्तंभ, यांवर उत्तम उपयोग होतो. जरूर तर पुढेंही हा उपाय चालू ठेवावा. तसेंच पिसाळलेला कुत्रा चावल्यास उपाय १४ दिवस करावा. मात्र **जलसंत्रास** होण्यापूर्वीं हा उपाय झाला पाहिजे. म्हणजे पुढें कोणताही उपद्रव होत नाहीं. **पथ्य–** लवण वर्ज्य. मीठ बिलकुल खावयाचें नाहीं. या औषधावरील पथ्य केलेंच पाहिजे. वातविकारावर बरेच दिवस पुढें औषध चालू ठेवणें असल्यास मिठाऐवजीं थोडें थोडें सैंधव वापरलें तरी चालेल. श्वानदंशावर मात्र १४ दिवस वरीलप्रमाणें पथ्य केलेंच पाहिजे.

३७. **गर्भिणीच्या वेणा कमी झाल्यास त्या पुन्हा येण्यास सिद्ध प्रयोग :** काळ्या गाईचें, ती नच मिळाल्यास दुसऱ्या गाईचें दूध १०–१५ तोळे घ्यावें, व त्याच गाईचें गोमय (शेण) लिंबाएवढें घेऊन तें चांगलें बोटांनीं दाबून एकजीव करून, त्या दुधांत मिसळावें, व तें सर्व मिश्रण करून त्यांत थोडी साखर घालावी, व तें सर्व मिश्रण वस्त्रगाळ करून एकदम गर्भिणीस पाजावें. वेणा येऊन सुखप्रसूती होते.

३८. **वेणा येण्यासाठीं प्रयोग :** टंकणखाराची लाही १२ गुंजा मधांत देऊन वर गरम दूध पाजावें.

३९. **टणक केंसतुड पिकण्यास उपाय :** (१) पिंपळाची ओली साल आणून त्याचा रस काढावा. त्यांत २–३ काळीं मिरीं गंधाप्रमाणें उगाळून त्याचा लेप देणें. (२) केसतुड पिकण्यासाठीं गेरू, हळद, मीठ, ही पाण्यांत उगाळून (कालवून) त्याचा लेप करावा.

४०. **गांठ अथवा केसतुड आंत पू होऊन जाड कातडी असल्यानें फुटून निचरा होत नाहीं त्यावर :** ज्या ठिकाणीं फुटणार असें वाटेल त्या जागीं मोरचूद उगाळून (पाण्यांत) ठिपका द्यावा, व त्याच्या सभोंवतीं पातळसर गंधाबिरोजा लावून वर वस्त्राची पट्टी बसवावी. मात्र मोरचूद लावलेली जागा मोकळी ठेवावी. सर्व वाहून जात असतांही बिरोजाची पट्टी ठेवावी.

४१. **सामान्यतः कोणत्याही नवीन गांठीवर :** गंधाबिरोजाची पट्टी ठेवल्यानें ती गांठ वितळून नाहींशी होते.

४२. **व्रण फुटण्यास उत्तम उपाय :** खरा हस्तिदंत आणून तो व्रणाच्या मुखाच्या जागीं पाण्यांत उगाळून लावावा, व त्यावर सारखें थेंब थेंब पाणी घालून ओला राखावा. एक दिवसांत मुख तयार होऊन पू निघून जाईल.

४२. **व्रणाचें तोंड लहान असल्यानें पू लवकर बाहेर येत नाहीं त्यावर उपाय :** व्रणाच्या तोंडावर तूप व साखर ठेवून कांद्याचें अथवा गव्हाचें गरम गरम पोटीस बांधावें. त्यानें मुख विस्तृत होऊन पू निघून जाऊन बरें वाटेल.

४४. **रक्तमूळव्याधीवर खात्रीचा उपाय :** कडूनिंबाचें बीं (लिंबोळ्या), बकायण लिंबाचें बीं, म्हशा गुग्गुळ, रसांजन, काळें मिरीं, बाळहरडी, हीं सर्व समभाग घेऊन त्याचें चूर्ण करावें व दगडी खलबत्त्यांत खलून (पाण्यांत) त्याच्या लहान बोराएवढ्या गोळ्या बांधून ठेवाव्या. दररोज सकाळीं रसांजन ३ गुंजा, थंड पाणी ३ तोळे, एकत्र करून त्यांत एक गोळी घालून घेत जावी. यानें ७ दिवसांत उत्तम गुण येतो.

४५. **कंपवातावर चूर्ण :** हळद, हिंग-लाही, वेखंड, सुंठ, अजमोदा, ओंवा, मिरी, पिंपळमूळ, बडीशोप—या सर्वांचें समभाग चूर्ण करून तुपांतून देणें.

४६. **वातबद्ध शरीरावर गांठी येतात त्यावर उपाय :** मेथ्या मूठभर शिजत घालाव्या. त्या चांगल्या शिजत आल्यावर त्यांत गव्हाचा रवा मूठभर घालून दोन्ही एकत्र शिजल्यावर त्यांत तूप ३ तोळे घालून एकत्र घोटून तें सर्व मिश्रण सकाळींच एक वेळ देणें. दिवस ४०. **पथ्य**— करावें. साधारण वातरोग जाय.

वातानें शरीर सुजतें त्यावर उपाय : ओंवा, मिरें ३–३ तोळे, यांचें चूर्ण करून त्याचे तीन भाग करावे. एक भाग पाणी घालून भाकरीसारखें करून उकडावें, व त्यांत तूप ६ तोळे घालून खावें. याप्रमाणें ३ दिवस घ्यावें. **पथ्य**—स्नान वर्ज्य, वारा घेऊं नये.

४७. **वातानें शरीर उडतें त्यास उपाय :** कोष्ठाचें चूर्ण तुपांत देणें. वात जाय. **कटिवातास चूर्ण**— ओंवा नवटांक, लसूण नवटांक, खोबरें पावशेर, कोष्ठ पावशेर, या सर्वांचें चूर्ण करून ७ दिवस घेणें. **पथ्य**— तेलकट, तिखट, आंबट, वावडें वर्ज्य. (२) नारळ सुका आणून त्यांत आळीव, लसूण, मध, हे तीन जिन्नस घालून भाजावा. नंतर खोबऱ्यासकट सर्व जिन्नस वांटून अर्धा तोळा खात जावें. १३ दिवस घेणें.

४८. **वृषणांत पाणी सांठून घट्ट झाल्यास :** चिंचेचा पाला आणून तो बुडेल इतकें गोमूत्र घालून शिजवावा. गोमूत्र आटत आल्यावर पुन्हा तितकेंच गोमूत्र घालावें नंतर तें आटल्यावर तो गरम आहे तोंच एका फडक्यावर पसरून वृषणा-भोंवतीं बसवून वर घट्ट लंगोट बांधावा. याप्रमाणें ७ ते १४ दिवस केल्यानें उत्तम गुण येतो.

४९. **वृषणांत वात, कफ, भरून ठणका लागत असल्यास उपाय :** चांगला खजूर आणून, त्यांतील बिया व देंठ काढून टाकावे. तो पाट्यावर उत्तम लोण्याप्रमाणें वांटावा. त्यांत १ शेरास ३ तोळेप्रमाणें कळीचा चुना घालून परत वांटावा. खलांत घोटावा. नंतर एका एरंडाच्या पानावर तें मिश्रण पसरून वृषणावर लावून वर घट्ट पट्टा बांधावा. याप्रमाणें केल्यानें वृषणास लागणाऱ्या कळा, सूज वगैरे कमी होतात. ३ दिवसांत उत्तम गुण येतो. विकाराच्या जोराप्रमाणें कमीजास्त उपाय करावा. यानें वृषणास सूज येणें, झोंबणें वगैरे कांहीं होत नाहीं.

५०. दाढ ठणकत असल्यास उपाय : उत्तम शिकेकाई आणून चूर्ण करावें. तें चूर्ण कापसांत ठेवून दाढेच्या खाचींत भरावें. लाळ येईल ती थुंकावी.

५१. दाढ ठणकत असल्यास उपाय : चिंचेचा गर, हळद, थोडें मीठ व शिकेकाईची पूड एकत्र वांटून ती लुगदी दाढेच्या पोकळींत भरावी. उत्तम गुण येतो.

५२. आम्लपित्तावर सिद्धयोग : सोनामुखीचा पाला एक तोळा, तुपांत तळून घेतलेल्या बाळहर्डींचें चूर्ण १ तोळा, लेंडी पिंपळी १ तोळा, यांचें वस्त्रगाळ चूर्ण करावें. नंतर त्यांत पापडखार तव्यावर भाजून त्याची लाही होते तें चूर्ण ३ तोळे मिसळून तें मिश्रण बाटलींत भरून ठेवावें. यांतील ।· तोळा चूर्ण तुपांतून अगर पाण्यांतून खावें. ५ ते ७ दिवस घ्यावें. उत्तम गुण येतो.

५३. उचकीवर उपाय : गोपीचंदन व सोनकाव समभाग चूर्ण घ्यावें. तें ।· तोळापर्यंत मधांतून घ्यावें.

५४. जखम भरण्यास रोपण तेल : तिळाचें तेल ·॥·शेर, व बाभळीचा पाला ३॥ ते ७ तोळे घेऊन, कढईंत घालून कढवावें. नंतर उतरतांना त्यांत ·।· तोळा तुरटीची लाही घालून तें सर्व मिश्रण खलबत्त्यांत घालून एकत्र घोटून ठेवावें. याचा उपयोग कोणत्याही जखमेवर करावा. उत्तम गुण येतो. अनुभविक आहे.

५५. गांठीनें फार आग होते व लवकर फुटत नाहीं त्यावर उपाय : पांढऱ्या फुलांच्या तगरीचा पाला गंधाप्रमाणें बारीक वांटवा, त्यांत $\frac{1}{4}$ लोणी, व दोन हरभरे कापूर मिसळावा, व उत्तम मिश्रण करून गांटीवर २–३ वेळां लावावें.

५६. स्त्रियांच्या स्तनावरील सुजेसाठी व ठणका लागल्यास उत्तम उपाय : सागरगोट्याचा ताजा पाला, एरंडाचा ओला पाला, व रुईचा ओला पाला, हीं एकत्र चांगलें चटणीप्रमाणें वांटून लगदा करावा. नंतर एका मातीच्या भांड्यांत अथवा खोलगट तव्यावर तो लगदा ठेवून त्यावर गोमूत्र घालून शिजवावें खदखदल्यावर उतरून स्तनावर लावण्याजोगा मध्यम ऊन आहे तोंत्र एरंडाच्या पानांवर पसरून ते स्तनांवर बांधणें. युक्तीनें स्तनावर पट्टा बांधावा. याप्रमाणें दिवसांतून दोन वेळ हा उपाय करावा.

५७. रक्तातिसार–रक्तप्रदर कोणत्याही द्वारानें रक्तबाहेर पडत असल्यास गुण देणारा उपाय : उंबराच्या झाडास चोंचे मारून त्याचा पांढरा दुधासारखा चीक येतो तो १५–२० थेंब घेऊन, त्यांत साखर घालून, पातळ होण्यासाठीं दूध घालून, लगेच प्यावें. दूध घालून बराच वेळ राहिल्यास तें दह्याप्रमाणें घट्ट होतें; सबब लगेच प्यावें. याप्रमाणें दिवसांतून ३ वेळां घेणें उत्तम. यानें तात्काळ रक्त बंद होतें व उष्णतेचे इतर विकारही बंद होतात.

५८. वाट सरल्यास उपाय : रविवारीं शुचिर्भूत होऊन आघाड्याची मुळी उपटून आणावी. मुळी काढणाऱ्या मनुष्यानें पूर्वेस वा उत्तरेस पुढा करून मुळी

काढावी. तसेंच त्या वेळीं झाडावर आपली छाया पडणार नाहीं अशा रीतीनें आपण उभे राहावें. ही मुळी आणून ठेवावी. ज्या मनुष्याची वाट डाव्या बाजूस सरली असेल त्याच्या उजव्या हातास ही मुळी काळ्या सुतानें बांधावी. उजव्या बाजूस सरल्यास ती डाव्या हातास बांधावी. वाट ओटींत सरल्यावर गळ्यांत बांधावी, व बेंबीच्या वर सरली तर कमरेभोंवतीं वेढा देऊन ओंटीवर बांधावी. या मुळीचा चमत्कार असा आहे कीं काळ्या सुतांत बांधून उपयोग केल्यास वाट आपोआप जागेवर येते.

५९. **भयंकर पोटशूळावर उपाय** : घोड्याच्या लेंडीचा आपरस ३–४ तोळे काढून त्यांत भाजलेला हिंग २–३ वाल मिसळून घ्यावा. लेंडीचा आपरस येण्यास कठीण झालें तर त्यांत थोडेंसें पाणी मिसळून बोटांनीं चांगलें मळून रस काढावा. घोड्यापेक्षां घोडीची लेंडी मिळाल्यास जस्त चांगलें. इतर कोणत्याही औषधानें गुण येत नसेल तर या औषधानें हटकून गुण येईल.

उदर रोगावर प्रारंभींचा खात्रीचा उपाय : उदराचा संशय येतांच मीठ १ तोळा, हिंगलाही ·|· तोळा, व गोमूत्र ५ तोळे एकत्र करून पिणें. प्रथम मीठ व हिंगलाही खलबत्त्यांत घालून एक तास उत्तम खल करावा. नंतर त्यांतील फक्त ·|· तोळा मिश्रण ५ तोळे गोमूत्रांत मिसळून घ्यावें.

६०. **पोटांत कळा मारून झाडा होत असल्यास जुनाट विकारावर खात्रीचें औषध** : कमलकाप (कुसुम काचरी), सुंठ व मिरीं, ही तीन औषधें ·||· तोळ्याप्रमाणें घेऊन उत्तम चूर्ण करावें. त्या सर्वांत फक्त एक गहूंभार अफूचें चूर्ण मिळवून मधांत कालवून चाटण करावें, व दिवसांतून ४ वेळ चाटावें. यानें फार दिवसांचा विकार बरा होतो. चाटण खाल्ल्यावर दोन घोट पाणी प्यावें.

६१. **लहान मुलांच्या यकृत व प्लीहेवर उपाय** : मोत्यांच्या शिंपांचें भस्म व मौक्तिकभस्म १ गुंज, व पिंपळी १ गुंज, एकत्र खलून गाईच्या दुधांतून द्यावें. तें सतत १४ दिवस पोटांत घ्यावें, व वर लावण्यासाठीं पुढील औषधें समभाग घेऊन तीं गोमूत्रांत वांटून दाटसर लेप तयार करावा. व तो दिवसांतून २–३ वेळ दुखत असलेल्या भागावर लावावा. पळसाची साल, रुईचें मूळ, गजपिंपळी, आस्कंद, व शेवग्याची साल, इतरही कोठें जागा दुखत असल्यास हा लेप लावल्यास बरें वाटतें.

६२. **गर्मीनें केस जातात व गळा बसतो त्यावर उपाय** : विलायती धोत्रा (कांटेधोत्रा) याचें मूळ आणून कुटून रस काढावा, तो ५ पैसे भार घेऊन, त्यांत जिरें ३ मासे चूर्ण घालून पिणें. **पथ्य**— नाचण्याची भाकर, व तोंडास लावण्यास आलें. वर प्रमाणें ७ दिवस औषध, व पथ्य करणें. दुसऱ्या सप्तकांत सर्व खावें. गर्मी साफ बरी होय.

६३. **गर्मी बरी झाल्यावर अंगांत रक्त भरून शक्ती येण्यास उपाय**— नारळाच्या माडाची पोय आणून त्यांतील तुऱ्याचे कोवळे दाणे पाट्यावर वांटावे, व

ते गुळाच्या पाकांत तूप घालून त्याचा एकजीव करून सुपारीएवढी गोळी बांधावी. सकाळ-सायंकाळीं एक एक गोळी दुधांतून घेणें. पथ्य साधारण करावें.

६४. **मस्तकांत उष्णता होऊन डोळे तळावतात त्यास उपाय** : एरंडाच्या बियांचा मगज गाईच्या दुधांत वांटून, गरम करून, मस्तकास लेप करून, वर एरंडाचीं पानें बांधावीं. ३ दिवस करावें. रोग जाय.

६५. **इसब, पेणीवर उपाय** : अफू ।· भाग, कापूर ·।।· भाग, व शेंदूर १ भाग, हीं तीन औषधें एकत्र करून त्यांत जादा पिकल्यामुळें ज्याच्यावरील सर्व साल काळी झाली आहे असें एक केळें (कुजलेलें) घालावें, आणि तें सर्व मिश्रण तांब्याच्या परातींत घालून तांब्याच्या पंचपात्रीनें एक प्रहर खलावें. तें हिरवें मिश्रण लावल्यानें हटकून गुण येतो.

६६. **केंस गळून टक्कल पडतें त्यावर केंस येण्यास उपाय** : खार, अथवा चानी या नांवानें झाडावर राहणारा उंदराप्रमाणें एक प्राणी असतो, या प्राण्यास धोंड्यानें मारून त्याचें ताजें रक्त लावावें. खात्रीनें केंस येतात. मात्र या प्राण्यास धोंड्यानेंच मारावा. इतर पदार्थांनीं मारल्याचा उपयोग होत नाहीं.

६७. **पिसाळलेल्या कुत्र्याचें विष उतरण्यास उपाय** : सदर उपाय जलसंत्रास होण्यापूर्वी करावा. जलसंत्रास म्हणजे कुत्रा चावलेला माणूस पाण्यास पाहून किंवा पाण्याचा आवाज ऐकूनही भितो. पावसाळ्यांत भाताचीं शेतें पिकणाऱ्या हंगामांत त्यावर एक प्रकारची माशी उत्पन्न होते. तिला बाळ असे म्हणतात. तिच्या पंखांवर निरनिराळ्या रंगांचे छांटे असतात. शेतांतून कोणी मनुष्य जात असल्यास सदर माशी त्याच्या अंगाला लागल्यास अंगावर भाजल्यासारखे फोड येतात. सदर माशीपासूनच डॉक्टरांच्या वापरांत येणारा ब्लिस्टर नांवाचा पदार्थ होतो. सदर माशी आणून वाळवून तिचें चूर्ण करून ठेवावें. कुत्रें चावलेल्या मनुष्यास विषाचें लक्षण दिसतांच वरील माशीचें चूर्ण गुळांत घालून खाण्यास देणें, व जवळ बरेंच ताक तयार ठेवावें. माशीचें चूर्ण पोस्टांत नेल्यानें त्या मनुष्यास वांत्या होऊं लागतात. त्या वेळीं त्यास ताक पाजीत जावें. प्रथम वांतींतून पडणारें ताक काळें होऊन पडतें. तें पांढरें पडूं लागल्यानें विष निघून गेलें असें समजावें. वांती आपोआप बंद होते; मात्र ताक भरपूर देणें.

६८. **केंस येण्यास दुसरा उपाय** : एक जातिवंत मेलेला सर्प आणून मातींत पुरावा. त्यावर गहूं पेरावे. सदर गव्हाचे कोवळे अंकुर दुधांत वांटून मस्तकावर लावावे, केंस येतात.

६९. **तबकीया हरताळाची किमया मात्रा** : तबकीया हरताळ ·।।· शेर आणून, खलांत घालून खल सारखा चालू ठेवावा. ६० दिवस हा खल रात्रंदिवस चालला पाहिजे. एक मनुष्य थकतांच दुसरा लावावा. मध्यंतरीं थांबवूं नये. याप्रमाणें साठ दिवस अखंड खल केल्यानें त्याचें लाल भस्म तयार होतें. ताम्राचा

रस करून त्यांत हें हरताळ भस्म घातल्यास मुर्चा होय. मृत्युसमयीं दिल्यास चार घटका शुद्धी होऊन मनुष्य बोलूं शकतो. याचा अनुभव घेतला आहे.

७० **आमलकी रसायन :** आंवळकटी चूर्णास आंवळ्याच्या रसाच्या सहस्र भावना देऊन सांवलींत सुकवावें. अक्षय्य टिकाऊ रसायन. सर्व स्त्रिरोगांवर देणें.

७१. **त्रिदोष गुटी :** बचनाग गोमूत्रांत ३ दिवस भिजत घालून त्याचें चूर्ण २ तोळे, हरताळ भस्म ३ तोळे, सोमल भस्म २ तोळे, पिंपळी २ तोळे, मिरें १ तोळा, पारा २ तोळे, गंधक २ तोळे एकत्र आल्याच्या रसांत ३ दिवस बारचा खल करून २ गुंजेची एक गोळी बांधावी. मृत्युसमयीं बेशुद्ध मनुष्यास आलें-रस व मध-पिंपळींतून एक गोळी दिल्यास शुद्धी येऊन बोलणें चालू होतें.

७२. **वातपित्त मात्रा उत्तमपैकीं :** उत्तम शुद्ध हिंगूळ १ तोळा, हरडा बेहेडा, आंवळकटी १–१ तोळा, नागकेशर १ तोळा, त्रिफळा १ तोळा, मिरें १ तोळा, दालचिनी १ तोळा, सुंठ १ तोळा, लवंग १ तोळा, बेलाची जाळून तिची राख १ तोळा, गेरू १ तोळा, या सर्व चूर्णांत लिंबाचा रस घालून तीन दिवस खल करून मात्रा बांधावी. मधांतून घ्यावी. वातपित्ताचे सर्व रोग जातात.

७३. **वंग भस्म जडीली क्रिया :** रुईच्या चिकांत पारा व वंग शुद्ध करून (वंग २ भाग, पारा १ भाग, याप्रमाणें घ्यावें) प्रथम वंग पातळ करून त्यांत पारा ओतावा, एकत्र मिश्रण होईल तें मातीच्या खापरांत घालून चुलीवर ठेवावें. पातळ झाल्यावर त्यावर आंबेहळद, ओवा, व भांग यांचीं निरनिराळीं चूर्णें घालून पळीनें घोटावें. तीन प्रहरांत उत्तम भस्म होतें. सर्व रोगांवर देणें.

७४. **ताम्रभस्म जडीली क्रिया :** उत्तम शिवराई पैसा आणून चिंचेच्या झाडास भोंक पाडून त्यांत घालावा. व वर चिंचेचा गीर लावून भोंक बंद करावें. पंधरा दिवसांनीं काढून त्या शुद्ध ताम्राचें भस्म करावें. प्रथम शेतवड म्हणजे बक-पुष्पी (तिचीं पांढरीं फुलें बगळ्याप्रमाणें दिसतात) हिचा पाला आणून, तो उत्तम चटणीप्रमाणें वांटावा, आणि त्याचा गोळा करून ठेवावा. नंतर ४ अथवा ३ लांब मोठीं लांकडें आणून त्या चार दिशेकडून लावून त्याचीं टोकें एकत्र येतील अशा रीतीनें जोडून त्यास अग्नी लावावा. त्यांचीं टोकें पेट घेतांच त्यावर एक परळासारखें मातीचें भांडें ठेवावें त्यांत तो शेतवडाचा गोळा निम्मे खालीवर घालून वर शुद्ध गंधक अर्धा तोळा मधोमध घालून त्यावर तांब्याचा पैसा ठेवावा. त्यावर पुन्हां अर्धा तोळा शुद्ध गंधक घालून बाकीचा अर्धा गोळा घट्ट दाबून वर बसवावा, व खालीं अग्नी सुरू ठेवावा. वरील पात्रास चांगला अग्नि लागून आंतील गोळ्याचें चांगलें उत्तम भस्म राख झाली पाहिजे. तेथपर्यंत लांकडें पुढें करीत जावीं. उत्तम भस्म झाल्यावर भस्माच्या राखेंत बत्ताशाप्रमाणें पैशाचें भस्म तयार झालेलें मिळेल. तें काढून घ्यावें. महारोग, जलोदर वगैरे रोगांवर लोणी-साखरेंतून द्यावें. असाध्य

साधयेत् शीघ्रं—सावधगिरीनें हें भस्म तयार करायचें. तें चुलीवर ठेवायचें नाहीं. लांकडांवरच ठेवून झालें पाहिजे. अशी परंपरा आहे.

७५. **रौप्यभस्म जटीली क्रिया** : चांगला रुपया आणून तो शुद्ध करावा. एका शरावांत तो ठेवून त्यांत २ तोळे तालिमखान्याचें चूर्ण घालून त्याला मातकापड करून त्याला गजपुट द्यावें. याप्रमाणें तीन पुटें दिल्यानें तो बत्ताशाप्रमाणें फुगलेला मिळेल. मग खलांत घालून बारीक करून ठेवणें. तालिमखान्याप्रमाणेंच मेंदी अक्कलकाढ्याच्या चूर्णानेंही वरीलप्रमाणेंच भस्म होतें. सर्व रोगांवर चालतें.

७६. **पारदभस्म जटीली क्रिया** : शुद्ध पारा ४ तोळे, शुद्ध गंधक ४ तोळे, यांचा वडाच्या दुधांत खल करून, वडी करून, खापरांत घालून, चुलीवर ठेवून अग्नि देणें. वर वरचेवर वडाचें दूध घालून वडाच्या लाकडाच्या सोट्यानें घोटावें. एक दिवस याप्रमाणें केल्यानें उत्तम पारदभस्म होतें. सर्व रोगांवर चालतें.

७७. **कामोत्तेजक भस्म जटिली क्रिया** : शिसें ·॥· शेर, कथील ·॥· शेर, जस्त ·॥· शेर, आणून हीं सर्व काळ्या घोड्याच्या मुतांत वेगवेगळीं ७—७ वेळां गरम करून बुजवावीं, म्हणजे शुद्ध होतील. नंतर तीनही धातु खापरांत घालून चुलीवर ठेवून, अग्नि द्यावा. मात्र अग्नि देणें तो बोराच्या लांकडांचा द्यावा. पातळ झालेल्या मिश्रणांत आंबेहळदीचें चूर्ण थोडें थोडें टाकून पळीनें सारखें घोटावें. सर्वांचें उत्तम चूर्ण झाल्यासारखें दिसल्यावर उतरून ठेवावीं, व तें भस्म होईल. मग जायफळ व लवंग चूर्ण २—२ मासे घेऊन त्यांत वरील भस्म २ रती घालून मधांतून चाटावें. दिवस १४. यानें बहुत कामोत्तेजना होय.

७८. **नपुंसकत्व हरसिद्ध योग** : पांढऱ्या कण्हेरीचीं मुळें १ शेर आणून, तुकडे करून सावलींत वाळवावीं, व बारीक करावीं. फार बारीक करूं नये. नंतर शेळीचें दूध ४ शेर, व पाणी एक शेर एकत्र करून एका मडक्यांत घालून तें मडकें, जमिनींत खळगा खणून त्यांत खालीं रानशेणी घालून पेटवून त्यावर ठेवावें, व कण्हेरीच्या मुळ्यांची एका फडक्यांत मोटली बांधून ती दुधाच्या मिश्रणांत बुडेल अशी ठेवावी. पाणी जळून दूध चांगलें तापल्यावर उतरावें. मुळ्यांची मोटली काढून टाकावी, व तें दूध विरजावें. त्याचें लोणी काढून तूप तयार करून ठेवावें. नंतर जायफळ, लवंग, जायपत्री, व अक्कलकारा यांचें समभाग चूर्ण वरील तयार तूप विड्याच्या पानांस थोडें लावून त्यावर चूर्णाचें मिश्रण थोडें टाकून खावें. यानें नपुंसकत्व **नष्ट होऊन** मनुष्य बहुत कामी होय.

७९. **उत्तम धातुपौष्टिक, क्षीणता घालविणारी सिद्ध पाकवडी** : सालम मिश्री, पंजाबी चूर्ण १० तोळे, तालिमखाना, काळी मुसळी २ तोळे, सुंठ १ तोळा, पिंपळी १ तोळा, सफेद मुसळी १ तोळा, जायपत्री १ तोळा, केशर १ तोळा, तमालपत्र १ तोळा, लवंग १ तोळा, कस्तुरी १॥ मासा, दालचिनी १ तोळा, जटामांसी १ तोळा, खारिक २० तोळे, खोबरें ५ तोळे, शिंगाडे १ तोळा, अक्रोडाचें

बीज २ तोळे, नागकेशर १ तोळा, चिनी साखर ३ शेर व दुधाचा खवा ६० तोळे, बदाम २० तोळे, (ऊन पाण्यांत भिजत घालून सोलून वांटून घेणें). मग १० तोळे तुपांत खवा भाजून साखरेच्या पाकांत खवा, सर्व चूर्णें घालून ढवळावें, व त्यांत निवाल्यावर मध ५ तोळे घालून उत्तम ढवळून वड्या पाडाव्या. त्या प्रत्येकीं २ तोळ्याच्या असाव्यात, अथवा मोठ्याही कराव्यात.

८०. **वातकफादिक उत्तम पौष्टिक, लवंगादि वटी :** लवंगा मूठभर आणून गाईच्या १० तोळे दुधांत रात्रभर भिजत घालून ठेवणें. सकाळीं मंदाग्नीवर शिजवाव्या. दोन घटकांनीं त्यांत साखर मूठभर घालून पाट्यावर चटणीप्रमाणें वांटून ठेवावें. नंतर त्यांत जायफळ ६ मासे, सुंठ ३ मासे, मिरीं ३ मासे, जायपत्री ३ मासे, आरकंद ३ मासे, अफू ३ मासे, लवंग ३ मासे, गोखरूं ३ मासे, कापूर ३ मासे, नागकेशर ३ मासे, हीं सर्व द्रव्यें अखंड घेऊन घोंगडीच्या फडक्यांत एक दिवस बांधून ठेवावीं. दुसरे दिवशीं चूर्ण करून लवंगांच्या गोळ्यांत घालून सर्वांचा खल करून गोळ्या बांधाव्या. त्या दुधाबरोबर घेणें. क्षीणत्व जातें. अग्नि प्रदीत होतो. चेहरा तेजःपुंज होतो. (हा शिवप्रोक्त पाक अश्विनीकुमार संहितेंत आहे.)

८१. **उष्णतेनें डोळ्यांत खुपऱ्या होतात त्यास उपाय :** तुरीच्या डाळीचें एक शेराचें वरण शिजवावें. तें शिजत असतां त्यांत दोन मोठीं हळकुंडें घालून ठेवावीं. शिजल्यावर तीं हळकुंडें काढून ठेवून वरण खावें. आणि पुनः तींच हळकुंडें एक शेराच्या वरणांत शिजवावीं. याप्रमाणें सात वेळ त्या हळकुंडांस पुटें दिल्यावर, सावलींत वाळवून ठेवावीं. सहाणेवर उगाळून त्याचें अंजन करावें. खुपऱ्या जातात, व डोळे स्वच्छ होतात.

८२. **नेत्ररोगावर सिद्ध गुटिका :** हळदीवरील सालपट साफ काढून तिचें चूर्ण करून वाळे १ तोळा, बरडी सुपारीचें चूर्ण १ तोळा, कडूनिंबाचीं पानें १ तोळा, पिंपळी १ तोळा, नागरमोथा १ तोळा, वावडिंग १ तोळा, मिरें १ तोळा, कापूर १ तोळा, बोकडाच्या मूत्रांत खलून गोळ्या बांधाव्या. त्याच्या अंजनानें सर्व नेत्ररोग जातात. पाण्यांत उगाळून घातल्यास चाळिशी सुटते. मधांतून रातांधळें जातें. माश्याच्या रसानें रातांधळें त्वरित दूर होतें. स्त्री-दुग्धांतून अंजनानें फूल झडतें. गोमूत्रांतून अंजन केल्यास चिपड दूर होतें.

८३. **नेत्र लाल होतात त्यावर उपाय :** उत्तम पिकलेलें एक डाळिंब आणून त्याच्या दोन फाकी सारख्या कराव्या. नंतर त्या पुनः जोडल्यावर कणिक लावून विस्तवांत भाजावें. नंतर काढून त्या दोनही डोळ्यांवर बांधाव्या. ३ दिवस हा उपाय करावा. दररोज डाळिंब नवीन घेणें. लाली कमी होऊन डोळे स्वच्छ होतात.

८४. **श्वेतप्रदरावर अनुभविक उपाय :** (१) लाल सुपारी, मायफळ, धायटी फूल, मोचरस, गेरू, रसांजन, तांदुळजाचें मूळ, तांदुळाच्या धुवणांतून देणें. दिवस १४.

८५. **श्वेतप्रदरास उपाय :** (२) नागकेशर चूर्ण ताकांतून देणें. ७-१४ दिवस. **पथ्य-** दूधभात, मीठ वर्ज्य.

८६. **रक्तप्रदरास उपाय :** उंदिराची लेंडी, गुळवेल सत्त्व व साखर समभाग चूर्ण दुधांतून देणें. दिवस १४. अथवा दह्यांतून देणें.

८७. **रक्तप्रदरास उपाय :** दर्भाचें मूळ, तांदुळाच्या धुवणांत उगाळून, साखर घालून पिणें. **पथ्य-** तिखट, व तेलकट वर्ज्य.

८८. **गर्भपाताची खोड जाण्यास :** उत्तम तेल्या देवदार आणून, गाईच्या दुधांत गंधाप्रमाणें उगाळून साखर घालून, सकाळींच घेणें. यानें गर्भपाताची खोड जाते व गर्भधारणा होते.

८९. **गर्भवृद्धीसाठी उपाय :** आस्कंद अर्धा तोळा घेऊन चांगला ठेंचून तीन कप पाण्यांत काढा करावा. अर्धा कप उरल्यावर, त्यांत तितकेंच दूध घालून, थोडें उकळून, गाळून साखर घालून पिणें. यानें गर्भिणी व गर्भ या दोहोंची उत्तम वाढ होते. सदर काढा बाळंत होईपर्यंत दिल्यास अंगावर दूध येतें, शक्ती वाढते.

९०. **गरोदर स्त्रियांस अपथ्यानें रक्तस्राव होतो, त्यामुळें गर्भाची वाढ खुंटते. त्यास सल म्हणतात, तो वाढण्यास उपाय :** पांढरे कोरिंटाची मुळी गाईच्या दुधांत उगाळून देणें. सकाळ-सायंकाळ देणें. दिवस २१ ते ४०.

९१. **सल वाढण्यास उपाय :** तोंडलीची मुळी गाईच्या दुधांत वांटून देणें. दिवस १४, **पथ्य-** फक्त दूधभात, पुत्र होय.

९२. **सल वाढण्यास उपाय :** लाल रताळीं पाणी घातल्यावेगळें शिजवून, उकडून, रजस्वला झाल्या दिवसापासून सात दिवस पोटभर खावींत. आणखी कांहीं खाऊं नये. निःसंदेह सल वाढेल.

९३. **स्त्रियांस तीन महिनेपासून आठ महिनेपर्यंत गर्भपात होण्याची खोड होते, त्यास सिद्ध उपाय :** एरंडाच्या कोवळ्या डिऱ्या आणून वांटून करवंदाएवढ्या तीन गोळ्या कराव्या. तळहातावर खोबरेल तेल घालून त्यांत गोळी ठेवून दांतांस न लागतां गिळावी. याप्रमाणें तीन गोळ्या द्याव्या. **पथ्य-** दूधभात. रोग जाय.

९४. **बाळंतरोगास उपाय :** निळ्या कोरांटीचें मूळ व मयूरशिखेचें मूळ दुधांत उगाळून घोटांत देणें. हींच दोन मुळें दुधांत उगाळून अंगास लावणें. दिवस २१. बाळंतरोग निःशेष जाय.

९५. **बाळंतरोग गुटी :** सुंठ ४ तोळे चूर्ण वस्त्रगाळ करून, तें ८ तोळे गाईच्या दुधांत घालून शिजवावें. खव्याप्रमाणें झाल्यावर त्यांत पुढील चूर्णें घालून वाटावें. जायफळ, जायपत्री, लवंग, वेलची, सुंठ, मिरीं, पिंपळी, हरडा, बेहडा, आंवळकठी, कृष्णागर, केशर, वंशलोचन, दालचिनी, पांढरी मुसळी, प्रत्येकीं १ तोळा चूर्ण घालून वाटावें. नंतर त्यांत अभ्रकभस्म, लोहभस्म, मौक्तिक भस्म, सुवर्ण-

भस्म अथवा वर्ख, प्रत्येकीं २ मासे घेऊन, वरील औषधांत मिळवावें. नंतर ९ शेर खडीसाखरेचा पाक करून त्यांत वरील औषधें घालून मध, तूप, द्राक्षें, बदामगीर, वगैरे घालून वड्या अगर गोळ्या तयार कराव्या. त्या दुधांतून घेणें. पांडुरोग, बाळंतरोग, क्षय, या सर्वांवर उत्तम उपयोगी आहे.

९६. **बाळंतिणीचे ज्वर, खोकला, वगैरे विकार जाण्यास :** पंचामृत वटी–टंकणलाही, मिरें, वंशलोचन, लवंग, यांच्या चूर्णास माक्याच्या रसांत तीन भावना देऊन उत्तम खल करून, जोंधळ्याप्रमाणें गोळ्या कराव्या. दुधांतून देणें उत्तम गुण होय.

९७. **बाळंतिणीच्या कासश्वासावर अमृतवटी :** शुद्ध बचनाग, मिरें, लवंग, टंकणलाही, यांस माका-रसांत खलून, गोळी राईप्रमाण बांधावी, दुधांत अथवा मधांतून चाटवावी. असाध्य रोगहि दूर होतो.

९८. **पित्तानें रात्रीं तृषा लागते त्यास :** पाणी जास्त प्यावें लागतें, त्यामुळें अन्न अंगास लागत नाही. नागकेशर १ तोळा, भाताच्या लाह्या १ तोळा, नागरमोथा १ तोळा, ज्येष्ठमध १ तोळा, दालचिनी १ तोळा, वेलची १ तोळा, निर्गुडीच्या कोंवळ्या डिऱ्या १ तोळा, या सर्वांचें चूर्ण करावें. तें ३ मासे चूर्ण साखर व मधांत घालून घेणें. २१ दिवस घेणें. अन्न पचून शक्ती येते.

९९. **नागमात्रा :** बचनाग गोमूत्रांत ७ दिवस भिजत घालून ठेवावा. नंतर पाण्यानें धुवून त्याचें चूर्ण करून त्यास विड्याच्या पानाच्या रसांत उत्तम खल करून ३ भावना देणें. नंतर माक्याच्या रसांत ३ दिवस खलावा. ३ भावना देणें. राई-प्रमाण गुटी करावी. दम्यावर तुळशीच्या रसांत, कफास आल्याच्या रसांत, नळास मधांतून देणें. उत्तम उपयोग होय.

१००. **क्षय, क्षयांतील खोकला, अशक्तता यांवर उपाय :** गुळवेल सत्त्व, मंडूरभस्म, हिंग, सैंधव, लवंग, कृष्णागर, पिंपळी, दालचिनी, वाळा, कापूर, प्रत्येकीं अर्धा तोळा; वेलची, कमळाक्ष-बी, सुंठ, जिरें, नागकेशर, तगर, जायफळ, हरडे, नागरमोथा प्रत्येकीं एक तोळा, सर्व चूर्ण करून समभाग खडीसाखर घालून मध-तुपाशीं देणें, क्षय जाय.

१०१. **क्षयरोगावर :** रुईचीं फुलें, व आस्कंद, यांचें चूर्ण करून मेंढीच्या दुधांत देणें.

१०२. **खोकल्यावर उपाय :** सुंठ, बाळहरडे व नागरमोथा, समभाग चूर्ण करून, गुळाच्या पाकांत मिसळून बोराएवढी गोळी बांधावी. रात्रीं निजतांना एक गोळी दाढेखालीं तोंडांत ठेवून त्याचा रस चोखावा. खोकला जाय.

१०३. **खोकल्यास उपाय :** भारंगमूळ, बेहडा, हळद, काथ, यांचें चूर्ण करून गुळाच्या पाकांत गोळी बांधावी, खोकला जाय.

१०४. **खोकल्यास उपाय** : टाकणखार लाही, सुंठ, मिरीं, पिंपळी, लवंग, समभाग चूर्णास कोरफडीच्या रसांत खलून गोळ्या बांधाव्या, व त्या विड्याच्या पानांतून देणें. कास जाय.

१०५. **सुकी ढांस लागते त्यास उपाय** : काळ्या तुळशीचा रस २ तोळे, साखर १ तोळा, तूप :॥· तोळा, एकत्र कीजे, तें घेतल्यानें सुकी ढांस जाय.

१०६. **सुकी ढांसेस उपाय** : उंबराच्या पानावरील फोड साखरेंत मिसळून खावें. अथवा बदाम, साखर, एकत्र करून खाणें. सुकी ढांस जाय.

१०७. **वातावर चूर्ण** : खारकेची बी एक शेर, अक्कलकारा ५ तोळे, पिंपळी ५ तोळे, लसूण ६ तोळे, सुंठ ५ तोळे, या सर्वांचें चूर्ण करून गुळांत गोळी सुपारीएवढी बांधावी. सर्व प्रकारचे वात जातील.

१०८. **सर्व शरीरांत वायु खेळतो त्यास उपाय** : पिंपळी २ मासे, पिंपळीमूळ २ मासे, निर्गुडीच्या कोवळ्या डिऱ्या (अंकूर) एक तोळा, हीं सर्व एकत्र वांटून गोळी करून खाणें. ७–१४ दिवस घेणें. वात कमी होय.

१०९. **वातावर वाफारा** : धूप पावभार, पाणी पावभार, गुग्गुळ ५ तोळे, सर्व एकत्र करून, गाडग्यांत भरून, विस्तवावर ठेवावें, व त्याची वाफ ज्या ठिकाणीं वाताची वेदना असेल तेथें घेणें.

११०. **वातावर उत्तम गोळी** : कडूलिंबाची अंतरसाल कच्चा शेर एक, घेऊन त्याचें चूर्ण करावें. त्यांत जायफळ तोळे २, लवंग तोळे २, पिंपळमूळ तोळे २, सुंठ तोळे २, हिंग तोळे २, यांचीं चूर्णें मिसळून शेवग्याच्या सालीच्या रसांत घालून वांटावें. अगर खलांत उत्तम खल करून तीन मासे प्रमाणाची गोळी बांधावी. मध, आलेंरस, माकारस, निर्गुडीचा रस यांपैकीं कोणत्याहि अनुपानांतून देणें. चौऱ्यांशीं प्रकारचे वात जातील. २१ ते ४० दिवस. **पथ्य**– गव्हाचें अन्न व तूप घेणें. स्नान वर्ज्य. थंड पाण्यास स्पर्श करूं नये. वाऱ्यावर बसूं नये. उत्तम गुण येतो.

१११. **वातावर लशुन रसायन** : उत्तम लशुन वांटून, त्यांत तूप, मध, व सुंठ, मिरीं, पिंपळी, यांचीं चूर्णें घालून तें चुलींत जमिनींत पुरून ठेवावें. वर नेहमींप्रमाणें स्वयंपाक करावा. २१ दिवसांनंतर काढून दररोज सेवन करावें.

११२. **वातावर वृद्धवैद्य तेल** : एरंडाच्या पाल्याचा रस पावशेर, काळ्या धोत्र्याच्या पाल्याचा रस एक पाव, रुईच्या पाल्याचा रस एक पाव, सुंठ १० तोळे, वेखंड १० तोळे, हिंग २ तोळे, व एरंडेल तेल सव्वाशेर, एकत्र करून मंदाग्नीवर शिजवावें, तेल शिल्लक राहिल्यावर उतरावें, व मग एका भांड्यांत घालून नेहमीं उन्हांत ठेवावें. तीन दिवसांनंतर त्याचें मालिश करावें, व शेळीच्या लेंड्यांत अग्नी करून त्यानें अंग शेकावें. सर्व वातरोग जाय.

११३. **कंपवातावर** : तिळाचें तेल १२ टांक, इंद्रावणमूळ ३ टांक, मंदाग्नीवर शिजवून, गाळून, त्यांत तितकाच मध घालून त्यापैकीं प्रत्येक वेळीं ३ टांक खावें.

११४. **महावातारि तैल : कृति :** पारा भाग २, हरताळ भाग ४, मनशीळ भाग ६, त्याचें समान तमालपत्र, वेलची, नागकेशर, व सर्वांच्या समान सोनामुखीचें चूर्ण करून, त्या सर्वांचा रुईच्या दुधांत खल करून ओलसर असतांनाच एक गजभर पांढरें वस्त्र घेऊन, त्यावर त्याचा लेप द्यावा, व त्या वस्त्राचा कांकडा तयार करून ठेवावा. त्यावर पांच पैसेभार तेल घालून तो कांकडा एका लांकडास बांधून ठेवावा. कांकडा तेलांत चांगला भिजवून नंतर पेटवावा, व तो एका परातीवर धरून त्या कांकड्याचें पेटत असतांना तेल गळेल तें परातींत सांडेल, तें बाटलींत भरून ठेवावें. (मात्र तो कांकडा संपूर्ण जळेपर्यंत थोडथोडें तेल कांकड्यावर घालीत जावें.) त्या तेलांत तितकेंच दूध मिसळून अंगास मर्दन करावें. कंपवात, अर्धांगवात जातात.

११५. **ऊरुस्तंभावर उपचार :** पिंपळमूळ, भिलावा, यांचा कल्क करून मधांत देणें.

११६. **ऊरुस्तंभावर :** त्रिफळा, कुटकी, चवक, पिंपळमूळ, यांचें चूर्ण मधांत किंवा गोमूत्रांत देणें.

११७. **मेदोरोगास उपाय :** सुंठ, मिरीं, पिंपळी, वावडिंग, चित्रक, नागरमोथा, व गुग्गुळ, यांचें समभाग चूर्ण मधांतून देणें.

११८. **मेदोरोगास उपाय :** सुंठ, वावडिंग, धमासा, जवखार, लोहकीट, आंवळकठी, यांचें चूर्ण मधांतून देणें.

११९. **उदररोगावर उपचार :** रुईचीं पानें व मीठ घेऊन एका मडक्यांत तळास थोडें मीठ घालून व रुईचीं पानें लावावीं. त्यांवर पुनः मीठ व पुनः रुईचीं पानें याप्रमाणें थर देऊन गजपुट द्यावें. अथवा चुलीवर ठेवून अग्नि लावावा. उत्तम काळें चूर्ण होय. त्यांत ओवा, वावडिंग, सुंठ, मिरें, पिंपळी, यांचें चूर्ण मिळवून गोमूत्रांतून देणें.

१२०. **वायगोळ्यास उपाय :** शिरगोळा वांटून, वस्त्रगाळ चूर्ण करावें. वायगोळा उठेल त्या वेळेस थंड पाण्यांतून देणें. दिन ३–७. वायगोळा जाय.

१२१. **वायगोळ्यास रामबाण गुटी :** सुंठ तोळा १, टंकणलाही तोळा १, हिंग तोळा १, गोपाचें बीज तोळा १, समभाग चूर्ण करून, शेवग्याच्या सालीच्या रसांत खल करून गोळ्या कराव्या. लसणीच्या रसांत अथवा तुपांत देणें.

१२२. **सुजेवर उपचार :** कोणत्याही कारणानें अंगावर सूज आल्यास— चांगला मोठा एक निवडुंगाचा सोट आणून त्याचे उभे दोन काप करावे. नंतर त्यांतील गर थोडासा काढून टाकून जागा पोकळ करावी, व त्यांत वरील धान्याचे तांदूळ भरावे. व दोनही काप पूर्वीप्रमाणें जोडून त्यास सुतानें बांधावें. वर थोडीशी माती लिंपून तो सोट मुंबरांत भाजावा. काढून त्यांत शिजलेले वऱ्यांचे तांदूळ दुधांतून खावे, यानें सूज तत्काल दूर होय.

१२३. **सुजेवर लेप** : थोरल्याच्या पाल्याच्या रसांत वारुळाची माती, नाचण्याचें पीठ, व चिंचोक्याचें चूर्ण घालून शिजवावें, व त्याचा लेप करावा. सूज उतरे.

१२४. **सुजेवर** : निवडुंगाची राख आणून पाण्यांत घालून रात्रभर ठेवावी. सकाळीं वरील निवळी पोटांत देणें व खालील गाळाचा लेप करावा.

१२५. **उदरावर उपचार** : उदररोग फार वाढल्यास गोड्या पाण्यांतील खेकडा म्हणजे कुर्ली आणून ती मारून तिच्या पोटांत रुईच्या चिकाचे ४–६ थेंब घालून ती भाजून देणें. यानें रेच होऊन उदररोग जाय.

१२६. **जरंडी व कौल्हवर उपचार** : गोमूत्रांत खोरेटीचें पाळ, चित्रकाचें मूळ हीं उगाळून त्यांत जवखार घालून पिण्यास देणें.

१२७. **कौल्हवर गोळ्या** : खोरेटीची साल आणून, चांगली कुटून, तिचा काढा करून गाळावा. पुनः चुलीवर ठेवून आटवून दाट झाल्यावर त्यांत जवखार व चित्रकाचें चूर्ण घालून चांगलें घोटून गोळ्या बांधाव्या. सकाळ–संध्याकाळ एक एक गोळी गोमूत्रांतून अथवा ऊन पाण्यांतून घ्यावी. जरंडी कौल्ह दूर होय.

१२८. **नारूस उपाय** : (१) रुईचा चीक तोळे २, आणून त्यांत एक शिंप चांगली तापवून विझवावा. याप्रमाणें चिकांत लाल करून विझविल्यानें तिचें उत्तम भस्म होतें. हें भस्म २ रती रुईच्या पानावर दहीं घालून खाण्यास देणें. दिवस ३. **पथ्य**–गहूं, तूप, नारू नष्ट होय.

१२९. **नारूवर उपाय** : (२) तुरटी चार तोळे घेऊन, दोन तोळ्यांची लाही करून, ती व दोन तोळे कच्ची, यांचें चूर्ण एकत्र करून ठेवावें. यांत सोन-काव चार तोळे घालून, चांगलें घोटून त्याच्या ७ पुड्या करणें. दररोज शिळ्या पाण्यांतून एक पुडी देणें. ७ दिवस हा उपचार करावा. प्रथम दिवशीं रात्रीं चणेची डाळ एक मूठ भिजत घालून औषध घेतल्यावर ती खावी. यानें नारू बाहेर पडेल अथवा जिरेल. **पथ्य**– गहूं, तूप, थंड पाणी, आणखी कांहीं खावयाचें नाहीं. पुढें चवदा दिवसांनंतर उडीद, मूग, यांपैकीं सहा महिने कांहीं खावयाचें नाहीं. नारू कधीं होणार नाही.

१३०. **वज्रलेप प्रकार** : उत्तम पिंपळाची अथवा बोरीची लाख, व तितकेंच वजनाचें शिसें घेऊन दगडी वायनांत घालून, लोखंडी पहारीनें मोठ्या जरानें सारखें कुटावें. कुटण्याच्या उष्णतेनें दोनही पदार्थ पातळ औषध लोण्याप्रमाणें एक लगदा होईल. तो पातळ आहे तोंच लावून सांधा करावा. घट्ट लगेच होतो याकडे लक्ष ठेवावें. उत्तम वज्रलेप होय.

१३१. **वज्रलेप दुसरा** : मूर्ति वगैरे घट्ट बसविण्यास याचा उपयोग होतो. उत्तम बिब्बे मिलावे आणून, त्यांचें पाताळयंत्रानें तेल काढावें. अथवा बिब्बा थोडा दुखवून दिव्यावर पेटवावा, म्हणजे त्याचें जें तेल गळेल तें धरून ठेवावें. नंतर जुने

लोहकीट आणून ते पाण्यांत उकळून टाकावें. म्हणजे त्यांतील मातीचा अंश दूर होईल. मग तें लोहकीट उत्तम कुटून त्याचें चांगलें बारीक चूर्ण करून तें वस्त्रगाळ करावें, आणि विंग्याच्या तेलांत मिसळून सारखें खलावें. खलतां खलतां तें जाडसर होऊन चिकट झाल्याबरोबर लावावें. म्हणजे उत्तम जोड बसतो. मात्र सावधगिरी—लेप जाडसर चिकट होऊन बोटास चिकटूं लागला म्हणजे लागलाच उपयोग करावा अन्यथा तो लगेच सुकला तर खलबत्ता एकच होऊन मग तो निघणें शक्य नाहीं, असें होतें. सबब लक्षपूर्वक काम करावें. मूर्ति कायम करतांना अथवा एखादा अवयव जोडतांना याचा उपयोग होतो.

१३२. **श्वेतवज्रदंती चूर्ण** : शिशाचे पत्रे छटाक, पिंपळी पैसाभार, लोखंडाच्या कढईत घालून अग्नीवर ठेवून पळीनें ढवळावें. थंड झाल्यावर काढून त्या भस्मांत वेलची तोळा १, शंखजिरें तोळा ·॥·, घालून उत्तम खलून दांतांस लावावें.

१३३. **शाहवज्रदंती चूर्ण** : मायफळ, चिकणी सुपारी, सोनामुखी, हिराकस व लोहरेत एकत्र चूर्ण दांतांस लावावें. दांत घट्ट होतात.

१३४. **आरक्त वज्रदंती चूर्ण** : उत्तम अळता आणून, कढवून, दाट करावा. मग प्रथम दांतांस आंबट लावून, मग आळता लावावा. डाळिंबाप्रमाणें लाल दांत होतील व घट्ट होतील.

१३५. **अळता करण्याची रीति** : टंकणखार १ भाग, पिंपळाचा अथवा बोरीचा लाख १० भाग, व पाणी १०० भाग, एकत्र कढवावें. उत्तम लाक्षारस अळता तयार होय.

१३६. **सर्व रोगहारक यशद भस्मक्रिया** : यशद म्हणजे जस्त पावशेर, कलखापरी चूर्ण दीड पाव घ्यावें. लोखंडाच्या कढईत जस्त घालून खालीं जाळ लावावा. जस्त पातळ झाल्यावर कलखापरीचें चूर्ण त्यावर थोडथोडें टाकून लोखंडाच्या पळीनें सारखें घोटावें. एक प्रहरानंतर पांढऱ्या रंगाचें भस्म तयार होय. भस्म तयार करतांना अग्नि प्रखर लावून पळीनें सारखें घर्षण करीत असावें, म्हणजे अग्निभस्म तयार होतें. नंतर हें भस्म घेऊन त्यांत कोरफडीचा रस अथवा गाईचें दूध घालून चांगलें खलून त्याच्या वड्या तयार करून उन्हांत चांगल्या वाळवाव्या, व शरावसंपुटांत घालून गजपुट द्यावें. अशीं तीन पुटें दिल्यावर तें भस्म गुंजप्रमाण सर्व रोगांवर अनुपान-परत्वें घ्यावें. उत्तम गुण होय. सर्वसाधारण अनुपान मध, क्षयावर तूप व मध किंवा मध, लोणी, खडीसाखर, श्वासावर, सुरवारी हरडा मधांत उगाळून त्यांतून द्यावें. मूळ-व्याधीवर लोणी, मध, सुरवारी हरड्यांची पूड, यांतून देणें. पुष्टतेसाठीं मध, तूप, जायफळाच्या चूर्णांत देणें; अर्धांगवातास पातळ केलेल्या गाईच्या तुपांत देणें; वातावर नागवेलीच्या पानाच्या रसांतून देणें. शैत्यावर मधपिंपळींतून देणें; सर्व नेत्ररोगांवर त्रिफळा, ज्येष्ठमध चूर्ण, मध, तूप, यांतून देणें. डोळ्यांस उत्तम तेज येतें. अनुपान-

परत्वे इतर रोगांवरहि द्यावें. **पथ्य**— तूप पोळी खावी. मीठ वर्ज्य. उष्णोदक प्राशन करावें, व याशिवाय रोगोक्त पथ्यहि सांभाळावें.

१३७. **हिंगूळभस्म सिद्धपद्धती :** हिंगूळ उत्तम घेऊन त्यास मेंढीच्या दुधाचीं सात पुटें व लिंबाच्या रसाचीं सात पुटें द्यावीं. नंतर हिंगूळ एक तोळा असे तर त्यास तीनशें पानांचा रस जिरवावा. पानें नागवेलीचीं चांगलीं घ्यावीं. वरील-प्रमाणें रस जिरेतों सारखा खल सुरू ठेवावा, सिद्ध होय. यांस अग्निपुट देणें नको. सर्व रोगांवर चालतें. हें सिद्ध हिंगूळभस्म तांदळाइतकें द्यावें. जायफळाबरोबर धातु-पुष्टता दोन सप्तकें दिल्यानें उत्तम पुष्टि येते.

१३८. **हिंगूळभस्म, प्रकार दुसरा :** एक तोळा हिंगूळखडा घेऊन बिब्बे अडीच पाव, तूप अडीच पाव, मध पावशेर घ्यावें. प्रथम चुलींत विस्तव घालून त्या-वर कढई ठेवावी. त्यांत तूप व बिब्बे फोडून घालावे. नंतर हिंगूळाचा खडा मधांत घोळून तो मधोमध ठेवावा. प्रथमचें तूप जळत आल्यानंतर बाकीचे बिब्बे तूप, मध, वरचेवर घालून संपवावे. सर्व जळून गेल्यावर हिंगुळाचा खडा काढून ३ दिवस उत्तम खल करावा. हें हिंगूळभस्म तयार झालें. याची मात्रा रतीभार, योग्य अनु-पानांतून देणें. **पथ्य**— आंबट, तेलतिखट खाऊं नये. गहूं, तांदूळ, व तूप साखर हे पदार्थ खावे. तूप जास्त घेणें. वावडें, वातूळ, जड पदार्थ, अति उष्ण, व शीतपदार्थ वर्ज्य करावे.

१३९. **हिंगूळभस्म, प्रकार तिसरा :** ओली हळद चांगली वांटून चटणी-प्रमाणें अर्धा शेराचा गोळा तयार करावा. त्यांत पैसाभार हिंगुळाचा खडा मधोमध ठेवून त्या गोळ्यासभोंवार तीन मातकापडें करावींत. उन्हांत मातकापड वाळवून गजपुट देणें. उत्तम भस्म होय. खल करून तंदुलप्रमाण मात्रा सर्व रोगांवर देणें.

१४०. **हरताळभस्म सिद्ध क्रिया १ :** मोठ्यापैकीं चांगलीं पिकलेलीं दोन केळीं आणावीं. त्यांत एका केळ्याचें तोंड कापून त्यांतील मधला गीर थोडा काढून पोकळ करावें. त्यांत निर्गुंडीचा रस काढून घालावा. मग शुद्ध हरताळाचा खडा घेऊन त्यासभोंवतीं निर्गुंडीच्या पाल्याची चटणी लावून तो खडा त्या केळ्यांत घालावा. मग दुसरें केळें पोकळ करून तें वर बसवावें. मग त्यास मातकापड करून चार घटका सुकल्यावर अर्धी पाटी रानशेणीचें पूट द्यावें. मग हलकेच तें केळें भस्म झालेलें ताम्हनांत ठेवून मधील हरताळभस्म काढून घेणें. याची मात्रा अर्धा तांदूळपासून एक तंदूळपर्यंत देणें. अनुपान मुख्य अर्धें केळें. उत्तम पौष्टिक आहे.

१४१. **हरताळभस्म प्रकार २ :** प्रथम पळसाचीं लांकडें आणून तीं जाळून पक्के दहा शेर राख तयार करून ठेवावी. नंतर शुद्ध हरताळ आणून त्यास पिवळ्या फुलांची बोंडांची मुंडी आणून तिच्या पाल्याच्या रसांत एक प्रहर उत्तम खल करावा. मग त्याच्या पातळसर वड्या करून वाळवाव्या. मग पळसाची राख पांच शेर एका मडक्यांत घालून ती हातानें चांगली दाबून वर हरताळाच्या वड्या ठेवाव्या, आणि

बाकीची राख वर घालून चांगली दाबावी. वर पुनः दोन शेर वाळू घालावी. नंतर तें मडकें चुलीवर घालून, सतत बारा प्रहर मध्यमाग्नि द्यावा. निवाल्यानंतर युक्तीनें हरताळाच्या वड्या शुभ्र झालेल्या काढून घ्याव्या. मात्रा, पथ्य वगैरे पूर्वींप्रमाणें जाणावें.

१४२. **हरताळभस्म प्रकार सिद्ध पद्धति ३** : मातीचें बोळकें अर्धपाव पाणी राहील एवढें घेऊन त्यांत दोन तोळे शुद्ध हरताळ घालावा. व तें बोळकें भरेपर्यंत रुईचा चीक आंत घालावा. नंतर बोळक्याच्या तोंडावर बसेल असा खापराचा तुकडा वर बसून तोंडास मातकापड करावें, आणि पळसाची राख निमें पूर्वीं सांगितल्याप्रमाणें एका मडक्यांत खालीं दाबून बसवून वर तें बोळकें ठेवावें. शिल्लक राख वर बसवून मडकें चुलीवर ठेवून मध्यम अग्नि बारा प्रहर लावावा. शुभ्र निर्धूम भस्म होय. अनुपानपरत्वें सर्व रोग जातील.

१४३. **कौतुकार्थ पारदभस्मक्रिया** : शुद्ध पारा, व मोरचूद समभाग घेऊन, एक प्रहर पाथरीच्या रसांत खलून गोळी तयार करावी. ही गोळी रस सुकून चांगली होते. बारा रुईचीं पानें आणून मध्यें गोळी ठेवावी. खालींवर दोन गोवऱ्या ठेवून त्याची हलकी आंच देणें. बत्ताशाप्रमाणें फुगेल. हें भस्म धातुपुष्टिकर आहे.

१४४. **ताम्रभस्मक्रिया सिद्ध पद्धति प्रकार १** : त्यासाठीं प्रथम ताम्रशुद्धि सांगतों. प्रथम जातिवंत ताम्रपत्राकरून, सामान्य शुद्धि करून घ्यावी. नंतर त्यास पुढीलप्रमाणें पुटें द्यावीं, म्हणजे ताम्र तापवून पुढील पदार्थांत बुडवावें. काळ्यातिळाचें तेल, गाईचें ताक, कडूलिंबाच्या पाल्याचा रस, हिरव्या जांबर लिंबाचा रस, रुईचा चीक, काळ्या धोत्र्याच्या पाल्याचा रस, शेळीचें दूध, निळागंधक तुपांत खलून त्याचें खल, येणेंप्रमाणें शुद्धी केलेला ताम्रपैसा घेऊन मग दोन मोठ्या विटा कोरून त्यांत साळीचा कोंडा भरून त्यावर निळ्या गंधकाची पूड घालावी व त्यावर तो पैसा तापवून लाल झाल्यावर ठेवावा. आणि वर साळीचा कोंडा घालून त्यावर दुसरी कोरलेली वीट कोंडा भरून उपडी घालावी, व दडपून ठेवावी. निवाल्यावर पैसा काढावा. बत्ताशाप्रमाणें होय.

१४५. **ताम्रभस्मक्रिया सिद्ध पद्धत प्रकार २** : पूर्वींप्रमाणें शुद्ध केलेला ताम्रपत्रा दोन पैसेभार घेऊन तो कागदाप्रमाणें पातळ करून, त्यास दहापांच भोकें पाडावीं. नंतर तांदुळजाचा रस दोन पैसेभार घेऊन पणतींत तो पत्रा ठेवून तो रस त्यावर घालून दुसरी पणती वर बसवून मातकापड करून, गजपुट द्यावें. अशीं दहा पुटें दिल्यानें ताम्र शुभ्र होय.

१४६. **ताम्रभस्म तिसरा प्रकार** : शुद्ध ताम्राचा कीस करून त्यांत लिंबूरस घालून, खल करून वड्या कराव्या. सुकल्यावर शरावसंपुटांत घालून गजपुट देणें. याप्रमाणें तीन पुटें देणें. भस्म सिद्ध होय.

१४७. **ताम्रभस्म चौथा प्रकार** : विलायती काटेधोत्र्याचीं दहा पुटें शुद्ध ताम्रचुरास देऊन शेवटीं एक गजपुट देणें.

१४८. ताम्रभस्म पांचवा प्रकार : मातीचें बोळकें आणून त्यांत शुद्ध ताम्रचुरा १ तोळा घालावा. त्यावर तांदुळजाचा रस तो चूर बुडेइतका घालून त्यावर दुसरें बोळकें बसवून मातकापड करून शेगडींत घालून रानशेणीचा अग्नि द्यावा. याप्रमाणें १५ पुटें प्रत्येक वेळीं ताजा रस घालून द्यावीं, शुभ्र भस्म होय.

१४९. ताम्रभस्म प्रकार सहावा : शुद्ध तांब्याचा एक पैसा घेऊन, मोरचूद पैसाभार व जिरें पैसाभार हीं एकत्र करून तीं तरवडाच्या रसांत भिजवून त्या पैशास खालवर लेप करून शरावांत ठेवून गजपुट द्यावें. शुभ्र भस्म होय. मात्र अग्नीची आंच चार प्रहर राहिली पाहिजे इतक्या गोवऱ्या असाव्या. मात्रा तंदुलप्रमाण देणें. विड्याच्या पानाचा रस, मध, हें सर्वसाधारण अनुपान योजावें. आल्याच्या रसांतून, अथवा लोणी, साखर, मध वगैरे योग्य अनुपानानें दिल्यास स्थूल उदर, कास, श्वास, पांडुज्वर, गुल्म, प्याहा, क्षणदाह, अर्शसंग्रहणी, हे विकार हटकून दूर होतात.

१५०. रौप्य भस्म क्रिया : पळसाच्या झाडाची ओली मुळी आणून त्यास भोंक पाडून शुद्ध केलेला रुपया घालून गजपुट द्यावें. भस्म होय.

१५१. रौप्यभस्म प्रकार दुसरा : परळांत बांवच्यांचें चूर्ण घालून वर रौप्यपत्रा ठेवावा. वर पुनः बांवचीचूर्ण घालून परळ दुसरें झांकण घालून, मातकापड करून गजपुट देणें. भस्म होय.

१५२. सुवर्णमाक्षिक भस्म : उत्तम सुवर्ण माक्षिक आणून तें वस्त्रगाळ चूर्ण केलेलें ३० तोळे, व सैंधव चूर्ण १० तोळे एकत्र करून एका लोखंडाच्या कढईत घालून अग्नीवर ठेवावें, व त्यावर लिंबाचा रस पिळावा व तें पळीनें ढवळावें. सर्व रस जिरून लोखंडाची कढई व आंतील चूर्ण लाल अग्नीसारखें झाल्यावर उतरावें. रस जिरत असतां वर येणारी वाफ तोंडांत गेल्यास खोकला येतो, व घसा बसतो. तरी जपावें. हें उत्तम शुद्ध होतें. हें एकवार पाण्यांत धुवून घेणें. नंतर पुनः लोखंडाच्या कढईत घालून अग्नीवर ठेवावें. व त्यांत एरंडेल तेल घालून जिरवावें. नंतर महाळुंगाचा रस, व शेवटीं गाईचें तूप जिरवावें. हें उत्तम लाल रंगाचें भस्म होतें.

१५३. सुवर्णमाक्षिक भस्म प्रकार २ : उत्तम सुवर्णमाक्षिकाचें चूर्ण करून त्यांत कडू काकडीचा रस घालून चुलीवर ठेवून लाल होईपर्यंत तापवावें, म्हणजे तें फुलून येतें. नंतर कडू काकडीच्या रसांत उत्तम खल करून वड्या करून वाळवाव्या. व शरावांत घालून गजपुट देणें. याप्रमाणें एकाच पुटांत उत्तम जांभळ्या रंगाचें भस्म होय. कडू काकडीस कारिंटें अथवा चिराटा असें म्हणतात. याचे वेल काकडीसारखेच असतात. त्यावर फळें लिंबाएवढींच येतात. त्यांतील गर अत्यंत कडू असतो. त्यांत बिया असतात. तो रस गाळून घेणें. याशिवाय कांकडीएवढीं मोठीं

फळेंहि मिळतात. तींहि फार कडू असतात. त्यांचा रसहि चालतो. यास निराळी शुद्धि नको.

१५४. **सुवर्णमाक्षिक भस्म प्रकार ३ :** वरप्रमाणेंच सुवर्णमाक्षिकाच्या चूर्णास केळीच्या कांद्यांच्या रसांत उत्तम खल करून गजपुटें दिल्यानें उत्तम लाल रंगाचें भस्म बनतें. यालाहि निराळी शुद्धि नको.

हीं तीनही भस्में उत्तम गुणकारक आहेत

□

॥ श्रीः ॥

कुपिस्थ रसायनसंग्रह

वैद्यकावर ग्रंथ पुष्कळच आहेत व औषधेंहि पुष्कळ आहेत. सर्व ग्रंथ वाचणें ज्याप्रमाणें कठीण आहे त्याप्रमाणें ग्रंथोक्त सर्व औषधें तयार करणेंहि जास्त कठीण. म्हणून या दोन्ही गोष्टी जवळजवळ अशक्य समजल्या जातात; तथापि या आमच्या यादींत दिलेलीं औषधें कुपिस्थ रसायन वर्गांतील असून तीं करण्यास फार श्रम व वेळहि लागतो. आणि थोडें दुर्लक्ष झाल्यास सर्व मेहनत फुकट जाते. यामुळें तीं औषधें तयार करण्याचें काम फारच थोडे वैद्य करितात. त्यांत अनेक बहुमूल्य औषधांचा वापर केला जात असल्यामुळें फार मोठ्या धनिकांच्या साहाय्यावांचून तीं तयार करणेंहि शक्य नसतें. तरीसुद्धां ईश्वरकृपेनें वैद्यकाविषयीं प्रेम असणाऱ्या एका संस्थानाधिपतींनीं आश्रय दिल्यामुळें हीं सर्व औषधें तयार करून त्यांच्या गुणाचा अनुभवही पाहतां आला. हें ज्ञान इतरांसहि अनायासानें मिळावें या हेतूनें पुढील सर्व औषधांच्या सविस्तर कृती आणि गुणधर्मही लिहिले आहेत. हीं औषधें आम्हीं स्वतः तयार करून, प्रत्यक्ष अनुभव घेऊनच लिहिल्यामुळें यांत संशय घेण्याचें कारण नाहीं.

रसायनें तयार करणाऱ्यांसाठीं आवश्यक सूचना

रसायनें तयार करतांना त्यांचा प्रारंभ शुभ दिवस पाहून करावा. विशेषतः अमृतसिद्धियोगावर प्रारंभ करणें चांगलें. तसेंच औषध खलांत घालतांना पूर्वेस अथवा उत्तरेस तोंड करून तें औषध खलावें. खल चालू करतांना खलासमोर अथवा उजव्या बाजूस एका धान्यराशीवर एक उदकपूर्ण कलश ठेवून, गंध, फूल, सुपारी घालून आम्रपल्लव वर ठेवून त्यावर नारळ ठेवावा. त्यांत कलशासही बाहेर गंध, फूल लावावें. नंतर खल सुरू करावा. याप्रमाणें नेहमीं कलश असावा. कुपिस्थ रसायनें प्रथमच लावणें असल्यास पांच कुमारिका, एक सुवासिनी, व ब्राह्मण यांची पूजा करावी. नंतर भट्टीवरील वालुकायंत्राची पूजा करावी. मग अग्नि पेटवावा, व ब्राह्मणद्वारा श्रीशंकर व आपल्या उपास्य देवतेवर अभिषेक करावा. औषध तयार झाल्यावर काढून त्यावरही गंध, फूल वगैरेंनी पूजा करावी. याप्रमाणें व्यवस्था करण्याचा सांप्रदाय आहे. त्याप्रमाणें केल्यास औषधें उत्कृष्ट वीर्यसंपन्न होतात, असा अनुभव आहे.

कुपिस्थ रसायनांत वापरावयाचीं सर्व औषधें उत्तम रीतीनें शुद्ध करून घ्यावीं लागतात. त्यांची रीति पुढीलप्रमाणें.

१. **पारा** : हिंगुळांतून डमरूयंत्रानें वर उडवून घेतलेलाच वापरावा.

२. **हिंगूळ** : उत्तम रुमि हिंगूळ आणून त्याचें फार बारीक चूर्ण करावें, आणि लिंबाच्या रसाच्या ७ भावना द्याव्या, लिंबाचा रस न मिळाल्यास आल्याचा रस किंवा कडूलिंबाच्या पाल्याचा रसहि भावनेस द्यावा.

३. **गंधक** : आवळागंधक घेऊन तो तुपांत पातळ करावा आणि पातेल्यांत त्याच्या चौपट गाईचें दूध ठेवून तोंडावर फडका बांधावा. आणि त्यावर पातळ गंधक ओतावा. दुधांत पडलेला गंधक पाण्यानें धुऊन उपयोगांत आणावा. तुपाचा उपयोग खरजेस लावण्यास करावा.

४. **मनशीळ** : मनशीळ बारीक चूर्ण करून अगस्त्याच्या पाल्याच्या रसाचीं ३ पुटें देणें.

५. **हरताळ** : पत्री हरताळाचे बारीक तुकडे करून चुन्याच्या निवळींत दोलायंत्रानें एक प्रहर शिजवावे. अथवा कळीचा ताजा चुना आणून त्यांत पत्री-हरताळाचे तुकडे मिसळावे, त्यावर पाणी ओतावें. चुना शिजून थंड झाल्यावर हरताळ काढून घ्यावा. ही उत्तम शुद्धी आहे. मात्र यात हरताळाचे वजन बरेंच कमी होतें. चुना शिजत असतां त्याची वाफ डोळ्यांस लागू देऊं नये.

६. **सोमल** : शंख्या सोमल तांदुळजाच्या रसांत अथवा गाईच्या दुधांत दोलायंत्रानें एक प्रहर शिजवावा.

७. **रसकापूर** : गाईच्या तुपांत घालून १५ दिवस कडक उन्हांत ठेवावा.

८. **बीर** : बीर हा तेलंगणांतून इकडे येतो. लोखंडी पळींत घालून तापवल्यानंतर त्यावर हळूहळू स्त्री-दुग्ध घालून निववावा. याप्रमाणें सात अथवा तीन वेळ शुद्धी करावी.

९. **माक्षिक** : सुवर्णमाक्षिक ३ भाग, सैंधव २ भाग, यांचें चूर्ण करून लोखंडाच्या कढईत घालून तापवावें. वर लिंबाचा रस पिळावा. सर्व मिश्रण आगी-सारखें लाल झाल्यावर उतरावें. थंड झाल्यावर पाणी घालून एक रात्र तसेंच ठेवावें. सकाळीं वरील पाणी टाकून द्यावें. यांत क्षार निघून जातो. मग सुकवून देणें.

१०. **मोतीं, शिंप, शंख, कवड्या** : हे सर्व पदार्थ एक रात्र लिंबाच्या रसांत भिजत घालावे: शुद्ध होतात. मग स्वच्छ धुऊन घ्यावेत, व त्याचें चूर्ण करावें. मोतीखेरीज बाकीचे पदार्थ अग्नींत फुलवून घेणें.

११. **तुरटी** : अग्नीवर फुलवून घेणें.

१२. **टंकणखार** : अग्नीवर फुलवून घेणें.

१३. **सोरा** : पाण्यांत विरघळवून गाळून उन्हांत सुकवावा.

१४. **नवसागर** : मातीच्या भांड्यांत पाणी घालून त्यांत नवसागर शिजवावा; सुकल्यावर चूर्ण होतें.

१५. **सोनें व रूपें** : सोनें व रुपें यांचे वर्खच वापरावे. या धातु मुळांत शुद्ध असतील तरच वर्ख तयार होतो.

१६. **सुवर्ण, रौप्य, ताम्र, कांस्य, कथील, शिसें, लोह, पितळ, जस्त** : यांस धातु असें म्हणतात. यांची शुद्धी कर्तव्य असेल तेव्हां या धातूंचे पातळ कंटकवेधी पत्रे करून ते अग्नींत लाल झाल्यावर पुढील पातळ पदार्थांत सात सात वेळ पुनः पुनः तापवून विझवावे. निदान तीन तीन वेळां तरी तापवून विझवावे. तेल, ताक, गोमूत्र, कुळथाचा काढा व कांजी यांत विझवावें. हें न जमल्यास केळीच्या कांद्याचा रस काढून त्यांत विझवावें, उत्तम शुद्ध होय.

१७. **कथील, शिसें** : कथील व शिसें यांचे पत्रे न करतांच अग्नीवर पातळ करून पूर्वीच्या पदार्थांत ओतावें. मात्र ते आंगावर उडूं नयेत याबद्दल खबरदारी घ्यावी, अथवा रुईच्या पाल्याच्या रसांत हळदीची पूड घालून तें मिश्रण वायनांत घालावें. त्यावर जातणीचें पेड ठेवून त्याच्या भोकांतून हे पातळ केलेले पदार्थ ओतावे, म्हणजे पातळ पदार्थास स्पर्श झाल्यानें हें मिश्रण अंगावर उडतें. जातणीच्या पेडामुळें बाहेर पडत नाहीं.

१८. **अभ्रक** : वज्राभ्रक अग्नींत तापवून लाल झाल्यावर गाईच्या दुधांत ७ अथवा ३ वेळ विझवावा. अथवा बोरीच्या सालीच्या काढ्यांत तापवून विझवावा. नंतर त्याचें चूर्ण करावें.

१९. **मोरचूत** : मधांत खलून एक लघुपुट द्यावें.

२०. **जस्त** : जस्त पातळ करून गोमूत्रांत ओतावें.

२१. **कलखापरी** : गोमूत्रांत ७ दिवस भिजत घालून शेवट स्वच्छ पाण्यानें धुऊन घेणें.

याशिवाय वरील द्रव्यांच्या शुद्धीचे अनेक प्रकार आहेत. पण आम्ही स्वतः करून अनुभविलेल्या रीतीच लिहिल्या आहेत.

धातुभस्में कर्तव्य असल्यास त्यांच्या रीति इतरत्र पाहाव्यात. थोडक्यांत पुढील रीत आहे :

शुद्ध धातूचें चूर्ण करून त्याच्यामध्यें तितकाच पारा, आणि तितकाच गंधक घालून कोरफडीच्या रसांत खल करून सुकल्यावर शरावसंपुटांत घालून गजपुट अग्नि देणें. उत्तम काजळासारखें बारीक होईपर्यंत पुटें द्यावींत. मात्र दुसऱ्या खेपेपासून पुढें भस्माच्या $\frac{१}{४}$ पारा, $\frac{१}{४}$ गंधक घेऊन पूर्वीप्रमाणेंच खल करून गजपुटें द्यावींत. मात्र ताम्रभस्म होण्यास ताम्राचें वरीलप्रमाणें भस्म केल्यावर शेवटीं आंबुतीच्या रसांत खलून वाळवून गजपुट देणें. आंबुती न मिळाल्यास चुका अथवा घोळ यांच्या पाल्याच्या रसांत खलावें. म्हणजे कलंकरहित होतें. अथवा एक मोठा सुरण आणून तो मधोमध कोरून त्यांत ताम्रभस्माची गोळी करून घालावी. वर सुरणाचाच कीस दाबून मातकापड करावें आणि गजपुट अग्नि द्यावा. ताम्रांतील संपूर्ण कलंक सुरणांत जाऊन सुरणाचा रंग हिरवा होतो. हें ताम्रभस्म अत्युत्तम होतें.

२२. **हिंगुळांतील पारा उडवून घेण्याची रीत पुढें दिली आहे :** हा उडविलेला पारा लसणीचा रस, हळदचूर्ण, कोरफडीचा रस, लिंबाचा रस या प्रत्येकांत एक एक दिवस घोटून धुऊन घेतल्यास जास्त गुणावह होतो. नाइलाजास्तव बाजारी पारा वापरण्याचा प्रसंग आल्यास पारा कांचेच्या अगर चिनी मातीच्या पेल्यांत घालावा आणि त्यावर तेजाब, प्युअर नैट्रिक ॲसिड ओतून लांकडाच्या अगर कांचेच्या चमच्यानें ढवळीत राहावें, म्हणजे त्यांतील घाण निघून जाऊन पारा स्वच्छ होतो. तो धुऊन घ्यावा.

२३. **गजपुट :** दीडहात लांब, रुंद, व खोल असा खळगा करून त्यांत शेणी घालाव्या. मध्यें शराव ठेवावा. खालीं-वर निमेनिम शेणी असाव्यात. याचें नांव गजपूट.

२४. **डमरुयंत्र व त्यांतून पारा उडविण्याची रीति :** एक लहान व दुसरे त्याच्या दुप्पट मोठें मडकें आणावें; मात्र त्यांचीं तोंडें सारखीं असावींत. त्यांपैकीं लहान मडक्यांत शुद्ध हिंगूळ घालून त्या मडक्याच्या तोंडावर दुसरें मोठें मडकें उपडें ठेवून दोहोंच्या तोंडांतून वाफ जाऊं नये असा संधिलेप करावा, व मग मोठें मडकें वर येईल अशा रीतीनें तो जोड चुलीवर ठेवून खालीं तीव्र अग्नि लावावा. वरच्या मडक्यावर ओल्या वस्त्राची चौपडी ठेवावी व त्यावर पुनः पुनः गार पाणी सोडीत जावें. म्हणजे खालच्या मडक्यांतील पारा वरील मडक्याच्या बुडास चिकटून राहतो. चार प्रहरांनंतर अग्नि काढून टाकावा. थंड झाल्यावर दुसरे दिवशीं वरील पारा खालील मडक्यांत पडणार नाहीं अशा रीतीनें उतरून संधि सोडवून पारा काढून वस्त्रांत पिळून घेणें.

२५. **वालुकायंत्र :** फार जाड नाहीं व फार बारीक नाहीं अशी गोड्या पाण्यांतील वाळू आणून ती चाळून ठेवावी. मग पैएवढी तळाशीं भोक पाडलेली एक मातीची कुंडी घेऊन त्यांत मातकापड केलेली कुपी त्या भोकावर मधोमध बसेल अशी ठेवावी. ठेवतांना गोपीचंदनाचें लहानसें अळें करून त्यावर ती कुपी ठेवावी. म्हणजे वाळू गळणार नाहीं. मग कुपीच्या कंठापर्यंत वाळू भरावी, व मंद, मध्यम तीव्र, या क्रमानें अग्नि द्यावा. कुपींत क्षार वगैरे घातले असल्यास ते व गंधक वर कुपीच्या गळ्याशीं लागून तोंड बंद होतें तें होऊं नये यासाठीं लाकडी मूठ असलेल्या दोन वीत लांबीच्या दाभणापेक्षां थोड्या जाडसर सळया तयार करून ठेवाव्या व लाल करून कुपीच्या तोंडांत फिरविल्यानें क्षार व गंधक जळून जाऊन कुपीचें तोंड मोकळें राहतें.

रसायनें

१. **श्रीरामसिंदूर :** पाराभाग ६, गंधक ६, हिंगूळ १५, तालक १॥, मनसीळ २, शिसें १, सोनें १, हे सर्व रुईच्या चिकांत, पारोशी पिंपळाच्या रसांत

हंसपादीच्या रसांत, डाळिंबाच्या फुलाच्या रसांत, पांगारीफुलांच्या रसांत एकेक प्रहर खलून कुपींत भरून बारा प्रहर अग्नि द्यावा. अनुपानयुक्त सर्व रोगांत द्यावें.

२. **गोरखसिंदूर** : पारा भाग २५, गंधक १५, हरताळ ९, मनसीळ ४॥, सोमल २१, घेऊन आल्याचा रस, काळ्या तुळशीचा रस, घालून खलावें. नंतर सुकवून कांचकुपीमध्यें घालून वालुका यंत्रांतून १६ प्रहर अग्नि द्यावा. हा रस श्वास, कास, वायु इत्यादि विकारांवर द्यावा.

३. **मच्छिंद्रसिंदूर** : पारा भाग १६, गंधक ८, सोमल ४, हिंगूळ २, रसकापूर ५, घेऊन आल्याच्या रसांत व वांजकाटलीच्या रसांत ६ दिवस खलून वालुकायंत्रांतून १६ प्रहर अग्नि द्यावा. हा रस महावात, सन्निपात, श्वास, वायु, पक्षावात, अर्दित इत्यादि विकारांवर द्यावा.

४. **अग्निकुमार** : पारा भाग १२, रसकापूर १२, हिंगूळ १५, गंधक १५, वीर १० (दालचिकणा अगर करोझीन सब्लिमेंट), सोमल १२ घेऊन यांना रुईचा चीक, लिंबाचा रस, हंसपादीरस, यांच्या भावना देऊन वालुकायंत्रानें बत्तीस प्रहर अग्नि द्यावा. याचे गुण ऐंशीं प्रकारचे वात, वातरक्त, महाश्वास, गुल्म, सूतिकावात इत्यादि रोगांवर अनुपानयुक्त द्यावा. यानें अंगाचा दाह झाल्यास सरवत द्यावें.

५. **त्रिलोकसिंदूर** : पारा भाग १०, गंधक १०, रसकर्पूर १०, सोमल १५, घेऊन आल्याचा रसाची भावना देऊन वालुकायंत्रानें १६ प्रहर अग्नि द्यावा. उपयोग अनुपानयुक्त सर्व रोगांवर.

६. **हरगौरी रस** : पारा भाग ६, गंधक ६, वीर ६, मल्ल ६, हरताळ ६, तुरटी ६, या सर्वांना वालुकायंत्रानें बत्तीस प्रहर अग्नि द्यावा. उपयोग अर्धांगवात, अर्दित, कर्णनाद यांवर.

७. **पंचसूत** (धन्वंतरीय) : रसकर्पूर ६ भाग, रससिंदूर ३, हिंगूळ ४, पारा २, वीर १, यांना स्त्री-दुधाची अगर दुधीच्या रसाची भावना द्यावी. व वालुकायंत्रानें १२ प्रहर अग्नि द्यावा. गुण— सन्निपात, श्वास, वायु यांवर देणें.

८. **विक्रमार्क पंचसूत** : हिंगूळ भाग ८, रसकर्पूर ४, वीर २, गंधक ४, रससिंदूर ४, यांना १६ प्रहर अग्नि द्यावा. उपयोग जन्मशैत्यावर.

९. **समीरपन्नग** (नंबर १) : पारा भाग १०, गंधक १०, हरताळ १०, मनशीळ १०, सोमल १० यांना ३२ प्रहर अग्नि द्यावा. हा अतितीव्र आहे; यास्तव थंड उपचार करणे. हा श्वासादिकांवर चालतो.

१०. **समीरपन्नग** (नंबर २) : पारा भाग १०, गंधक १०, हरताळ १०, मनशीळ १०, सोमल १०, वीर १०. सर्व कृती व उपयोग वरीलप्रमाणें.

११. **अगस्ति पंचसूत** : पारा भाग १०, गंधक १०, रसकर्पूर १०, वीर १०, रससिंदूर १०, हिंगूळ १०, अग्नि १६ प्रहर द्यावा.

१२. **वातराक्षस** : हिंगूळ भाग २, पारा २, वीर २, तालक ७, गंधक ७, अग्नि १२ प्रहर देणें. हा रस वायु, श्वास यांवर देणें.

१३. **ब्रह्मास्त्रसिंदूर** : रससिंदूर भाग ५, वीर ९, हिंगूळ १०, पारा १०, गंधक १०, मनशीळ ५, अग्नि १६ प्रहर देणें. वायुविकारावर द्यावा.

१४. **प्रलयकालाग्निरस** : पारा भाग १०, गंधक १०, वीर १०, रससिंदूर १०, रसकर्पूर ५, यांना आल्याच्या रसाच्या भावना द्याव्या. अग्नि १६ प्रहर देणें. हा रस श्वास, कास, यांवर द्यावा.

१५. **दोषामृत** : पारा भाग ५, गंधक ८, मनशीळ ३, हरताळ ६, सोमल ६, वीर १, यांना अग्नि १२ प्रहर देणें. हा रस वातज्वर, शीतज्वर, कफज्वर यांवर द्यावा.

१६. **रामबाण** : हिंगूळ भाग ८, मनशीळ ४, गंधक ६, सोमल ३, अग्निप्रहर १२, हा रस नवज्वर सन्निपात यांवर आल्याच्या रसांतून ·॥· गुंज देणें.

१७. **द्वादशार्क** : पारा भाग ६, गंधक ६, मनशीळ ६, सोमल ६, कलखापरी ६, रसकर्पूर ६, हिंगूळ ६, हरताळ ६, वीर ६, पीतसोमल ६, रससिंदूर ६, मोरचूद ६, नवसागर ६, यांना अग्नि देणें, प्रहर २. हा रस जिव्हास्तंभ, हनुस्तंभ, रक्तष्ठिवी, सन्निपात, विषमज्वर इत्यादि दुःसाध्य रोगांवर द्यावा.

१८. **सुवर्णराजवंगेश्वर** : पारा भाग १०, कथील १०, वंग १०, नवसागर १०, अग्नि १६ प्रहर देणें.

१९. **सूतशेखर** : पारा भाग ५, गंधक ८, हिंगूळ २, सोमल १६, अग्नि प्रहर १६ देणें.

२०. **तालककुंकुम** : हिंगूळ भाग ८, हरताळ ८, गंधक २, मनशीळ १, अग्नि १६ प्रहर देणें. अयं रसः श्वासे युज्यते.

२१. **श्वासकुठार** : हिंगूळ भाग ८, सोमल ८, मनशीळ ८, पारा ८, अग्नि १६ प्रहर देणें.

२२. **सूर्यशेखर** : पारा भाग १६, रसकर्पूर, १२, गंधक १०, मल्ल १०, अग्नि १६ प्रहर देणें. हा अर्धांगवायु, कटिवात, धनुर्वात यांवर द्यावा.

२३. **व्याधिहरण** : पारा भाग १०, गंधक १०, रसकर्पूर २०, अग्नि-प्रहर १६ उपदंशावर द्यावा.

२४. **सन्निपातानलरस** : पारा भाग १५, गंधक ८, हिंगूळ १६, मोरचूद ४, कलखापरी ४, यांचा लिंबाच्या रसांत खल करून अग्नि १६ प्रहर देणें.

२५. **मार्तंडभैरव** : पारा भाग १५, गंधक १५, मोरचूद ७॥, सोमल ४, यांना अग्नि १६ प्रहर देणें. उपयोग सन्निपातावर.

२६. **तालकेशरी** : हरताळ भाग १०, मोरचूद २॥, पारा १०,

गंधक १०, रसकर्पूर १०, अग्नि १६ प्रहर देणें. हा शीतज्वर, एकाहिक, द्व्याहिक, त्र्याहिक, चातुर्थिक इत्यादि ज्वरांवर द्यावा.

२७. **नवज्वरेभसिंह** : पारा भाग १०, गंधक १०, लोह १०, ताम्र १०, शिसें १०, जेपाळ १०, यांना माशाच्या पित्ताची भावना देऊन अग्नि १६ प्रहर देणें. हा नवज्वरावर चालतो.

२८. **अष्टमूर्ति** : पारा भाग १, हिंगूळ १, मनशीळ १, हरताळ १, मुरदाडशिंग १, तुरटी १, सोनें ·।।·, रुपें ·।।·, रसकापूर १, गंधक ६, यांची कज्जली करून मातकापड केलेल्या कुपींत भरून वालुकायंत्रानें प्रथम चार प्रहर दीपाग्नि द्यावा. ८ प्रहर मध्यमाग्नि. नंतर ४ प्रहर भडाग्नि द्यावा. स्वांगशीत झाल्यावर कुपीच्या गळ्यास लागलेलें औषध घ्यावें. हा वातरोग, सन्निपात, वायु, कफजन्य कास आणि श्वास यांवर द्यावा.

२९. **पूर्णचंद्रोदय** : पुतळीच्या सोन्याचा कीस भाग ४, पारा ३२, गंधक ६४, यांची कज्जली करून त्यांना तांबड्या कापशीच्या फुलांची भावना द्यावी. नंतर कोरफडीची भावना द्यावी. नंतर ती अर्ध्या कुपीपर्यंत भरून वालुकायंत्रानें तीन दिवस अग्नि द्यावा. स्वांगशीत झाल्यावर कुपीच्या गळ्याशीं आरक्तवर्णी रस घ्यावा. याचा घेण्याचा प्रकार पूर्णचंद्रोदय भाग ४, भीमसेनी कापूर १, जायफळ ३, सुंठ ३, मिरीं ३, पिंपळी ३, लवंग ३, कस्तुरी ३ मासे घालून विड्याच्या पानाच्या रसांत खलून उडदाएवढ्या गोळ्या बांधाव्या. व यांतील १ गोळी त्रयोदशी विड्याबरोबर खावी. म्हणजे मेदोद्धत स्त्रियाहि अकालींच शिथिल होतात. गोळी खाल्ल्यावर आटीव दूध घ्यावें. त्याचप्रमाणें मांस, मांडे, नवान्न मिष्टान्न भक्षण करावें.

३०. **त्रिपुरभैरव** : पारा भाग १०, गंधक १०, हिंगूळ १०, नवसागर १, तुरटी ५, रसकापूर १०, अग्नि १६ प्रहर. हा अनुपानपरत्वें पक्षाघात, वायु, उपदंश यांवर उपयोगी असतो.

३१. **मल्लसिंदूर** : पारा भाग ९, रसकापूर ९, सोमल ४, गंधक ५।।, हीं सर्व औषधें एकत्र खलून मातकापड केलेल्या एका कुपींत भरून वालुकायंत्रानें १६ प्रहर अग्नि द्यावा. स्वांगशीत झाल्यावर काढून घ्यावा. हा यथायोग्य अनुपानेंकरून सेवन केला असतां संपूर्ण वात, सन्निपातादि रोग बरे करितो.

३२. **दरदसिंदूर** : पारा भाग ९, रसकापूर ९, गंधक ५।।, दरद ४।। यांची कज्जली करावी. ती कुपींत भरून वालुकायंत्रानें १६ प्रहर अग्नि द्यावा. याचा वातरोगांवर उपयोग करावयाचा असल्यास तक्राच्या अनुपानांतून द्यावा. म्हणजे सन्निपात, ज्वर शांत होतात.

३३. **रससिंदूर** : पारा भाग १०, गंधक १०, नवसागर २।। यांना अग्नि ८ प्रहर द्यावा. हा मिऱ्यांबरोबर पांच गुंज खावा. म्हणजे अग्नि प्रदीप्त करितो. कामदीप्ति करितो. हा संयोगाने ज्वरादि रोग नष्ट करितो.

३४. **रससिंदूर** : पारापलें तोळे ५, गंधकपलें ५ तोळे, नवसागर २ तोळे, तुरटी १ तोळा, अग्नि २४ प्रहर देणें.

३५. **समगंधररससिंदूर** : पारा भाग १०, गंधक १०, नवसागर २।।, अग्नि १२ प्रहर देणें. स्वांगशीत झाल्यावर याचा रंग केशराप्रमाणें होतो तो घेणें. पाककाळीं कुपीचें तोंड नवसागर बंद करतो. याकरितां तिच्या तोंडावर शलाका तापवून घालून तिचें तोंड मोकळें करावें. याप्रमाणें जितका वेळ पचन करावें तितका गुण वाढतो.

१६. **द्विगुणगंधसिंदूर** : पारा भाग १, गंधक २, याला २७ प्रहर अग्नि द्यावा. हा दोन गुंजा दूध व साखर यांच्याशीं द्यावा. म्हणजे प्रमेह, श्वास, कास, षंढत्व, अल्पवीर्यत्व यांचा नाश करितो.

३७. **द्विगुणगंधसिंदूर** (प्रकार २ रा) : याला अग्नि ३२ प्रहर देणें, व अनुपान विड्याच्या पानांतून. (हा रससिंदूर भास्करानें निर्माण केला.)

३८. **त्रिगुणगंधसिंदूर** : पारा भाग १, गंधक ३ तोळे, शिसें १ मासा, यांची कज्जली करून कुपींत भरावी आणि वालुका यंत्रांतून तीन दिवस पचन करावी. याचा उपयोग अनुपानपरत्वें संपूर्ण रोगावर करावा. हा शरीर बळकट करितो. शुक्राचीं शतें उत्पन्न करितो.

३९. **षड्गुणगंधसिंदूर** : हिंगुळांतील पारा भाग १, गंधक ६ घेऊन कज्जली करावी, व कोरफडीच्या रसांत मर्दन करावी. ती चांगली वाळल्यानंतर कुपींत भरून तिला वालुकायंत्रांतून ७ अहोरात्र अग्नि द्यावा. स्वांगशीत झाल्यावर काढून घ्यावा. हा रससिंदूर १ वाल मधाशीं द्यावा. म्हणजे स्तंभन, दंडवृद्धी, वीर्य, बल, तेज, पुरुषत्व, पुष्टी यांना उत्पन्न करितो. माजलेल्या हत्तीप्रमाणें जोर देतो. आणि षंढत्व व वंध्यत्व नाश करितो. त्याचप्रमाणें संन्यास रोगाचा नाश करितो. याला घेणारा मनुष्य १ दिवसांत १०० स्त्रियांशीं गमन करूं शकतो. आणि मनाला आनंद देतो. हा पांच-सहाशें रोगांचा नाश करितो, हा विश्वामित्रानें केला.

४०. **षड्गुणजीर्णगंधकसिंदूर** : पारा भाग १, गंधक १, यांची कज्जली करून वालुकायंत्रानें १६ प्रहर अग्नि द्यावा. कुपीचें तोंड शलाकेनें मोकळें करीत जावें. थंड झाल्यावर माणिकासारखा बनतो. माणिक काढून घ्यावा. त्याला पुन्हां पूर्ववत् अग्नि द्यावा. याप्रमाणें ६ वेळ पचन करावें. म्हणजे पाऱ्याचें भस्म होतें. तें सर्व रोग-नाशक आणि सिद्धी देतें. व सर्वांना प्रत्यय देणारें आहे.

४१. **रससिंदूर** : (चर्पटी) पाराभाग ८, गंधक २, नवसागर ·।।·, यांची कज्जली करून लिंबाच्या रसांत खलून वाळवावी. नंतर ती सच्छिद्र वालुका-यंत्रांत ठेवावी आणि इष्टदेवता व पांच कुमारी यांची पूजा करून चुलीवर ठेवून (चर्पटी रससिंदूर) आठ प्रहर क्रमवृद्ध अग्नि द्यावा. शीत झाल्यावर रोगोक्त अनु-पानाशीं वाल १ किंवा २ वालप्रमाणें मध पिंपळीशीं द्यावा. हा रतिकाळीं स्त्रियांना

कौतुक दाखविणारा, वीर्यस्तंभक व स्त्रियांचा मदनाशक आहे. हा सिंदूर पाऱ्यापासून झालेला आहे. हा अग्निमांद्य, राजयक्ष्मा, पांडुरोग, उदर, गुल्म, प्रमेह, भ्रम, प्लीहाज्वर, दुष्टव्रण, अर्श, ग्रहणी, भगंदर, ओकारी व त्रिदोष यांचा नाशक आहे.

४२. **रससिंदूर :** (मांडवा रससिंदूर) पारा भाग ४, गंधक ४, यांची कज्जली करून ती वडाच्या पारंब्यांच्या रसांत खलावी. आणि थाळीमध्यें घालून कच्छप यंत्र करून वालुकेमध्यें लावावें. आणि ४ प्रहर मंदाग्नि द्यावा. म्हणजे तरुण अरुणासारखा रससिंदूर होतो. हा अनुपानाच्या योगें अनेक गुण देतो. क्षय, कोड, वातपित्त, मेह, पांडू यांचा नाश करतो.

४३. **रससिंदूर :** (महासिंदूर) पारा भाग ८, गंधक ४, यांस निवडुंग व रुई यांच्या ७–७ भावना द्याव्यात. नंतर सर्पाच्या गरळाची भावना देऊन, कांचकुपींत घालून, कुपीचें तोंड बंद करून, वालुकायंत्रांत ठेवून १६ प्रहर अग्नि द्यावा. हा महासिंदूर वादवैद्यक ग्रंथांत सांगितला आहे. हा ·।।· गुंज दिला असतां क्षुधा करितो.

४४. **रससिंदूर** (नागार्जुन रससिंदूर) : पारा भाग १६, गंधक १६, हरताळ २, मनशीळ १, टांकणखार ·।।·, यांचा कपिकच्छलता मुळ्यांच्या रसांत ३ दिवस खल करून काचकुपींत भरून १६ प्रहर अग्नि द्यावा. याप्रमाणें ७ वेळ पचन करावें. हा २ गुंजा मध-पिंपळीशीं दिला असतां ११ क्षय, १३ सन्निपात, ८० वात, लता १, भगंदर, महाव्याधी निवारण करितो. हा ३ महिने सेवन केला असतां क्षुद्र रोगाचें निवारण होतें. तसेंच असाध्य रोगहि शांत होतात. याला **पथ्य–** दूध व साळीचा भात.

४५. **नवग्रहरसायन :** गौरीपाषाण भाग १, मनशीळ १, हिंगूळ १, गंधक १, पारा १, हरताळ १, मोरचूद १, सोमल १, कलखापरी १ घेऊन कारलीचे व १६ प्रहर अग्नि द्यावा. हा रस सर्व वायु, कुष्ठ, गुल्म, उदर, शूल, शीतज्वर, सान्निपात यांवर उपयोगी आहे.

४६. **रसकर्पूर सिंदूर :** पारा भाग १५, गंधक १५, रसकर्पूर ४५, यांना २४ प्रहर अग्नि द्यावा. हा रस उपदंश, कुष्ठ, व्रणनाशक, कामोद्दीतिकर, सुवर्णसम कांतिकर, बल, अग्नि वाढविणारा असा आहे.

४७. **पंचाननरस :** पारा भाग ५, गंधक ५, हरताळ ५, सोमल ५, रसकर्पूर ५, यांना १६ प्रहर अग्नि द्यावा. हा रस श्वास, कास, गुल्म, वायु इत्यादी रोगांवर आहे.

४८. **विश्वमूर्ति :** पारा भाग १, मनशीळ २, गंधक २, वीर २, हरताळ ५, यांना १६ प्रहर अग्नि द्यावा. हा विषमज्वर, नवज्वर यांवर द्यावा.

४९. **रसेंद्रचिंतामणि :** पारा भाग ८, गंधक ४, पीतसोमल ४, रसकापूर ४, यांना अग्नि १६ प्रहर द्यावा. हा सन्निपातावर द्यावा.

५०. **तारसिंदूर** : पारा भाग १०, गंधक १०, चांदी १०, प्रथम पारा शास्त्रोक्त रीतीनें शुद्ध करावा. नंतर चांदीचा रस करून त्या रसांत पारा ओतावा. नंतर गंधक मिळवावा. कज्जली झाल्यावर कुपींत भरून २४ प्रहर अग्नि द्यावा. स्वांगशीत झाल्यावर काढून घेऊन कंठस्थसिंदूर व तळाचें चांदीभस्म निराळें ठेवावें. हा अग्निदीपक, वीर्यकर, आयुष्य वाढविणारा, पुष्टिकारक, बलकर आहे. पांडू, क्षय यांचा नाशक, कांतिकारक, वृद्धांना तरुण करणारा, मंगलदायक, प्रीतिदायक, गुल्म, कफ, मेह, श्वास, प्लीहा, यकृत्, वलीपलित, क्षतक्षय, इत्यादिकांवर द्यावा. साखरेशीं घेतला असतां दाहनाशक आहे, त्रिफळ्याबरोबर घेतला असतां वातपित्त-नाश करितो. त्रिसुगंधाशीं घेतला असतां मेहाचा नाश करितो.

५१. **सुवर्णसिंदूर** : पारा भाग १०, गंधक १०, सुवर्ण २॥, प्रथम सुवर्णाचा रस करून त्यांत पारा ओतावा. नंतर गंधक मिसळून कज्जली करावी. नंतर २४ प्रहर अग्नि देऊन थंड झाल्यावर कंठस्थ रससिंदूर काढून घ्यावा आणि तळस्थ भाग घेऊन रससिंदुराशीं मिसळावा, आणि त्या रससिंदुराबरोबर गंधक देऊन पुन्हां वालुकायंत्रांत पचन करावें. घेणेचें अनुपान पूर्णचंद्रोदयाप्रमाणें क्षयावर २ गुंजा अनुपानयुक्त देणें. हा सुवर्णसिंदूर २ गुंजा, त्रिकटू व तूप यांतून घेतला असतां क्षय, अग्निमांद्य, श्वास, कास, अरुचि यांचा नाश होतो. ओजोवृद्धी होते. बलकर व पांडुनाशक आहे. अनुपानयुक्त सर्व रोगांवर देणें.

५२. **सोमनाथी ताम्र** : पारा भाग १, गंधक १, हरताळ $\frac{1}{2}$, मनशीळ $\frac{1}{2}$, हे एकत्र खलून कज्जली करावी. आणि त्या कज्जलीनें ताम्रपत्रे १ भाग घेऊन त्यांना पर्यायानें लेप करावा, आणि वालुकायंत्रांत ४ प्रहर पचन करावें. स्वांगशीत काढून घ्यावें. हें ताम्र दररोज दोन गुंजांप्रमाणें ज्या ज्या रोगांवर अनुपानाशीं द्यावें त्या रोगांचा नाश करितें. आणि परिणामशूल, उदरशूल, पांडू, ज्वर, गुल्म, प्लीहा, क्षय, मंदाग्नि, श्वास, कास, संग्रहणी यांचा नाश करितें.

५३. **नागेश्वररस** : उत्तम शिसें भाग १०, पारा १०, गंधक १०, नवसागर १०, प्रथम शिसें पातळ करून त्यांत पारा ओतावा. नंतर गंधक घालून कज्जली करून नवसागर मिसळून १२ प्रहर अग्नि द्यावा. हें भस्म शंभर हत्तींचें बल देतें. व्याधिनाश करितें. जीवित्व देतें.

५४. **राजमृगांक** : शुद्ध सुवर्ण भाग १, रससिंदूर ०॥०, ताम्र ०॥०, लोह ०॥०, वंग ०॥०, अभ्रक ०॥०, नागभस्म ०॥०, मौक्तिक भस्म २, प्रवाळभस्म २, हिऱ्याचें भस्म ०।०, सर्वांची कज्जली करून रससिंदूराचे चतुर्थांश टंकण घालून कांचकुपींत भरून मातकापड करावें. नंतर एका डेऱ्यांत मीठ भरून त्यांत ती कुपी भरून ठेवून २ प्रहर खैराचा मंदाग्नि द्यावा. स्वांगशीत झाल्यावर बारीक खलून सुंदर कुपींत भरून त्याची पूजा करावी. अनुपान तूप-मध, आणि त्रिकटु मात्रा २ गुंजा. हा रस खोकला, श्वास, मंदाग्नि, शोफ, पांडू, कफक्षय इत्यादींचा नाश करितो.

५५. **महाराजमृगांक** : शास्त्रोक्त रीतीनें गंधक व पारद यांचें मारण करावें. नंतर हिऱ्याचें भस्म करावें. मग रससिंदूर तयार करावा. त्या सिंदुरानें सुवर्णाचें भस्म करावें, त्याप्रमाणेंच रुप्याचें भस्म करून ताम्रभाग १, कांत १, नाग १, वंग १, अभ्रक १, हीं भस्में घेऊन नंतर मौक्तिक भस्म सर्व समभाग घ्यावें. आणि रससिंदूराच्या दुप्पट गंधक, आणि चतुर्थांश टंकण घालून जवाची कांजी करून तिनें ३ दिवस खलावें. आणि त्याचा गोळा करून सावलींत वाळवावें. मग तो गोळा शरावांत अगर कांचकुपींत घालून ४ प्रहर अग्नि द्यावा.

५६. **अनंतनारायण** : सिंगरूप (हिंगूळ) भाग २०, पारा १०, वीर ५, गंधक १०, याला अग्नि १६ प्रहर देणें. याचा खल लिंबाचा रस, आल्याचा रस, कारलीचा रस, बचनागाचा काढा करून त्यांत करावा. वालुकायंत्रांतून अग्नि देणें. मात्रा ·॥· गुंज; अनुपान आल्याचा रस, मध. हा रस श्वास, वायु, गुल्म यांवर चालतो.

५७. **पाशुपतास्त्र** : सौवीर भाग ६, गंधक, पारा १२, मनशीळ ६, सोनें २, हिंगूळ ६, सोमल १२, हरताळ ६, याचा खल मत्स्यपित्त, काळ्या नागाचें गरळ, घालून ७ दिवस खलून कुपींत भरून तोंड बंद करून १६ अग्नि देणें. मरणोन्मुख झालेल्या मनुष्यास त्याच्या मस्तकामध्यें शस्त्रानें कापून त्यांत भरावें. तत्काल सावध होतो. क्षयावर मोहरीप्रमाणें दिलें असतां अग्नि वाढतो. क्षुद्र रोगावर देऊं नये. ही विद्या महाप्रयासानें एका संन्याशापासून मिळाली आहे. हिचा उपयोग फार सावधानतेनें करावा. याचा उपयोग करून **पथ्य**— रोग्यास थंड पाणी, वाळ्याचें सरबत यांचा उपयोग करावा.

५८. **श्वासहेमाद्री** : मनशीळ तांब्याच्या करंड्यांत भरून वालुकायंत्रांत पचन करावें. नंतर करंड्यासुद्धां चूर्ण करून त्यास पारागंधकाची कज्जली देऊन ४ प्रहर पचन करावें. हा रस श्वासाचा नाश करितो.

५९. **उदयभास्कर** : उत्तम कृष्णाभ्रक घेऊन त्याचें शास्त्रोक्त रीतीनें धान्याभ्रक करून त्यांत अभ्रकाच्या समान पारा व गंधक घालून पांढऱ्या आघाड्याच्या रसांत खल करावा, व वालुकायंत्रांतून १२ प्रहर अग्नि द्यावा. हा २ गुंजा अनुपानासह मध–पिंपळीचें चूर्ण घालून दिला असतां पांच प्रकारचे कास दूर करितो.

६०. **अग्निकुमार** : पारा भाग २, गंधक २, यांची कज्जली करून तिचा हंसपादीच्या रसांत खल करावा. नंतर तो सुकवून कुपींत भरावा. त्यावर बचनाग भाग १ घालून कुपीचें तोंड बंद करून नंतर वालुकायंत्रांतून १२ प्रहर दीताग्नि द्यावा. स्वांगशीत झाल्यावर खलांत काढून त्यामध्यें बचनाग भाग ·॥·, मिरीं ·॥·, घालून त्यांचा खल करावा. हा रस १ गुंजप्रमाणें द्यावा. म्हणजे सन्निपात, मंदाग्नि, शूल, गुल्म, संग्रहणी, क्षय, पांडुरोग, श्वास, कास यांचा त्वरित नाश करितो.

६१. **महातालेश्वर** : हिंगूळ भाग १६, तालक ३२, गंधक ४, मनशीळ २, याला अग्नि १६ प्रहर द्यावा. याचा उपयोग श्वास, कास, हिंवज्वर यांच्यावर होतो.

६२. **तालकेश्वर :** तालक शुद्ध करून कापशीच्या फुलांच्या रसाची भावना देऊन कुपींत घालून कुपीचें तोंड बंद करून वालुकायंत्रांतून १२ प्रहर मंदाग्नि द्यावा. याचा उपयोग ज्वर, पुरुषत्वावर होतो.

६३. **ब्रह्मदिव्यमाणिक :** पारा भाग २०, मनशीळ २०, सुवर्ण २०, माणिक २०, अभ्रक ८, मौक्तिक ८, शिसें ४, गंधक ३२, याला ६ प्रहर अग्नि द्यावा. याचें प्रमाण २ वाल. यांच्या योगें अग्नि वाढतो. धातुपौष्टिक आहे. धातुक्षय, कास, श्वास इत्यादींवर उपयोग होतो.

६४. **कुपीचा मल्लेश्वर :** सोमल भाग २०, मुळ्याच्या रसांत खलून कुपींत भरून तोंड बंद करावें व वालुकायंत्रांतून ६ प्रहर अग्नि द्यावा. याचा उपयोग हिंवज्वरावर.

६५. **राजवंग :** गंधक भाग १, पारा १, कथील १, नवसागर १, याची कज्जली करून कोरफडीच्या रसांत खलावी. नंतर मोठ्या चिलमींत भरावी. मग ती चिलीम एका पितळेच्या पत्र्यावर पालथी ठेवावी. त्या चिलमीचें बारीक तोंड बंद न करितां मोठें तोंड व पत्रा यांचा गोपीचंदनानें संधिलेप करावा, व त्यावर मातकापड करावें, आणि तो पत्रा लहान चुलीवर ठेवून खालीं कोळसे भरून फुंकावें. म्हणजे सुवर्णासारखा वंगेश्वर तयार होईल.

६६. **माणिकरस :** पारा भाग १, गंधक १, सोनें १/१६, माणिक १/३२, हरताळ ४, गंधक ४, मनशीळ २, शिसें ·॥·, पारा ·॥·, ताम्र ·॥·, अभ्रक ·॥·, यांना वडाच्या पारंब्यांच्या रसांत व लिंबाच्या रसांत खलून अग्नि ४ प्रहर देणें.

६७. **माणिकरस :** पाठ नंबर २ मध्यें अग्नि १६ प्रहर देऊन सदरहू कुपी ६ वेळ पचन करावी. हा दुसरा पाठ कुष्ठावर खैराच्या काढ्यांतून द्यावा.

६८. **मल्लसिंदूर :** पारा भाग ५, सोमल १०, गंधक ५, हरताळ २॥, रौप्य १।, सोनें १० आणे भार घेऊन सर्व खलून कुपींत भरून वालुकायंत्रानें १६ प्रहर अग्नि देणें. याच्यासारखें विषमज्वरावर व जीर्णज्वरावर दुसरें औषध नाहीं.

६९. **भूपति :** पारा भाग ५, गंधक ५, सोमल ५, हीं मधांत खलून नंतर हंसपादीच्या रसांत खलून अग्नि १६ प्रहर देणें. याचा उपयोग श्वास, कास, वायु, क्षय, यांवर होतो.

७०. **तृप्तिसागर :** सोनें भाग ·।·, पारा १, गंधक २, अभ्रक ४, यांची कज्जली मोहरीच्या तेलामध्यें खलून वाळविल्यावर कुपींतून तोंड बंद करून अग्नि १२ प्रहर देणें. स्वांगशीत झाल्यावर कणेरीच्या मुळांचा रस, जवखार, सज्जीक्षार, टांकणखार, मीठ, सैंधव, बिडलोण, चित्रक, जिरें, शहाजिरें, वावडिंग हे जिन्नस समभाग घेऊन त्यांचें चूर्ण करावें. त्यांतील चूर्ण ३ मासे घेऊन त्यांत तृप्तिसागर १ मासा मिळवून तो रोग्यास देणें. यानें सन्निपात, अतिसार, संग्रहणी हे रोग बरे होतात.

७१. **भांडकर्पूर** : पारा भाग ९, तुरटी १०, मीठ ११, खड्ड १२, सैंधव १३, यांचा ४ प्रहर कांजीमध्यें खल करून वालुकायंत्रानें ४ प्रहर आंच द्यावी. तूप, दुधीचा रस यांतून गुंज १ प्रमाणें द्यावा. हा सर्व प्रकारचे वायु, सन्निपात, बाळंतरोग, इत्यादि जातींतील वायूवर द्यावा.

७२. **पीयूषसिंदूर** : शुद्ध पारा घेऊन त्याला षड्गुण गंध जारण करावें. आणि त्या पाऱ्याच्या समभाग सुवर्णभस्म, अगर सुवर्ण लोहभस्म, अभ्रक भस्म, गंधक हे मिळवून त्याला सुवर्णाचा रस, दंतीमुडी, कावळी, मद्य, माका, रुईचा चीक, चित्रक या प्रत्येकाच्या रसाची भावना द्यावी. नंतर गोळा करून तीन दिवस साळीच्या राशींत पुरून ठेवावा. नंतर त्यांतून काढून एक मासा द्यावा. हा उग्र अर्श, संग्रहणी, शूल, पांडु, क्षय, आम्लपित्त यांवर मधाशीं अगर रोगोक्त अनुपानां-तून देणें. हा ६ मासे भक्षण केल्यानें सर्व रोग व म्हातारपण नाहींसें करितो. याला आंबट पदार्थ व स्त्री वर्ज्य आहे.

७३. **वंगेश्वर चंद्रकांत** : कथील व पारा एकत्र करून कोरफडीच्या रसांत कांचेच्या कुपींत भरून पचन करावें, म्हणजे चंद्रासारखा शुभ्र व गुणानें वंगासारखा होतो. हा रस पांडुरोग, प्रमेह, दुर्बलत्व, वात, कावीळ यांचा नाश करितो.

७४. **महाकनकसुंदर** : पारा भाग १०, गंधक १०, नाग १०, कलखापरी १०, माक्षिक १०, अभ्रक १०, कांत १०, पोवळें १०, मोतीं १०, वंग १०, हरताळ १०, या सर्वांच्या समभाग सुवर्ण घालून यांचा हंसपादीच्या रसांत ३ दिवस खल करून सुकवावें. मग कुपींतून ३ दिवस अग्नि द्यावा. स्वांगशीत झाल्यावर हंसपादीच्या रसांत खल करावा. हा रस राजयक्ष्मा, श्वास, कास, पांडु, कावीळ, संग्रहणी, कृमी, सूज, उदावर्त, गुल्म, मेह, मूळव्याध, अग्निमांद्य, वांती, अरुची, आमशूल, हलीमक, तेरा सन्निपात, पित्तरोग, फेपरें, वातरोग, रक्तपित्त, प्रमेह, रक्तप्रदर, वीस प्रकारचे कफरोग, मूत्ररोग यांचा नाश करितो. आणि शरीराचा वर्ण सुवर्णासारिखा करितो. वीर्य, आयुष्य वाढवितो. हा योग कश्यपानें सांगितला आहे.

७५. **सुवर्णसिंदूर** : सुवर्ण भाग १, पारा ८, यांचा खल करून त्यांत गंधक १२ मिळवावा, व पुन्हा १ दिवस खल करून अग्नि १६ प्रहर द्यावा. हा क्षय, अंगभूत ताप, जीर्णज्वर, लहान मुलांचा खोकला, अशक्तता, इंद्रियनिर्बलत्व, व इतर सर्व रोग यांवर उपयोगी पडतो.

७६. **श्लेष्मविध्वंसन** : पारा भाग १, हरताळ १, ताम्र १, गंधक ३, यांचा कारलीच्या रसांत खल करून सुकवून कुपींत भरून तोंड बंद करावें. नंतर अग्नि ३ प्रहर द्यावा. स्वांगशीत झाल्यावर वरील औषधाच्या समभाग मिऱ्यांचें चूर्ण घालून औषधाच्या $\frac{1}{2}$ बचनाग घालून माक्याच्या रसांत खल करावा. मात्रा १ वाल द्यावी.

यानें कफ, श्वास, कास, वातरोग, शूल, विषूचिका, अग्निमांद्य, ज्वर, क्षय, संग्रहणी, अतिसार यांचा नाश होतो.

७७. **तारेश्वर** : पारा भाग १, सोनें ·।·, मनशीळ ४, सुवर्णमाक्षिक ४, हीं घेऊन अडुळसा, उसाचा रस यांत २ प्रहर खल करून कुपींत भरून वालुकायंत्रांत २ प्रहर पचवून नंतर त्यांतून २ गुंजा तारेश्वर रस, डाळिंब, त्रिफळा, त्रिकटु, या सर्वसमान गूळ घालून त्यांच्या एक तोळा चूर्णाशीं द्यावा. म्हणजे क्षतक्षय, कास, यांचा नाश होतो.

७८. **प्रतापाग्निकुमार** : पारा भाग १, ताम्रभस्म १, गंधक १, बचनाग १, सुंठ १, त्रिक्षार १, पंचलवणें १, यांचा आल्याच्या रसांत खल करून कुपींत भरून वालुकायंत्रानें मंदाग्नीनें एक दिवस पचवावें. स्वांगशीत झाल्यावर त्यांत दशांश बचनाग घालून १ गुंज आल्याच्या रसांतून सन्निपातावर द्यावा. हा सर्व वातविकार दूर करितो.

७९. **प्राणेश्वररस** : पारा १ भाग, गंधक १, अभ्रक १, बचनाग १, यांचा तुसळीच्या काढ्यांत खल करून सुकवून कुपींत घालून मुद्रा द्यावी. नंतर जिरें, चित्रक, हिंग, सज्जीखार, टंकणखार, गुग्गुळ, पंचलवणें, धावडा, डिंक, मिरें, पिंपळी, हीं सर्व पारदासमान घेऊन त्यांच्या काढ्यानें वेगवेगळ्या भावना द्याव्या. हें औषध तीव्र नवज्वरावर विड्याच्या पानांतून ५ गुंजा अगर ऊन पाण्यांतून द्यावें. त्याचप्रमाणें हा रस सन्निपातज्वर, शीतज्वर, दाहपूर्वक ज्वर, शुक्र यांवर द्यावा.

८०. **मृतसंजीवन रस** : पारा, गंधक, लोहभस्म, बचनाग, हरताळ, मुरदाडशिंग, मनशीळ, हिंगूळ, चित्रक, इंद्रवारुणि, अतिविष, त्रिकटु, सुवर्णमाक्षिक भस्म, भांग, जेपाळ, पळसफूल, अगर पळस साल, हीं औषधें समभाग घेऊन आल्याचा व भांगेचा काढा या प्रत्येकांत ३ दिवस खलावी. नंतर लिंबू व तुळशी यांच्या रसांत १ दिवस खलून कुपींतून वालुकायंत्रामध्यें दोन प्रहर पचन करावी. नंतर आल्याच्या रसामध्यें एक दिवस घोटावी. म्हणजे शंकरोक्त संजीवनी तयार होतो. तो तीन गुंजांप्रमाणें आल्याच्या रसांतून दिला असतां सन्निपातानें आसन्नमरण झालेल्या रोग्यास वांचवितो. यावर दूधभाताचें पथ्य करावें.

८१. **सुवर्णभूपति** : पारा, गंधक, अभ्रकभस्म, लोहकांतभस्म, सुवर्णभस्म, रुप्यभस्म, हीं प्रत्येकीं १ भाग, व बचनाग १ भाग घेऊन रक्त-लाजाळूच्या रसांत एक दिवस खलून कोरडें करून कांचकुपींत भरून मृदु अग्नीनें पचन करावें. पिंपळी व आल्याचा रस यांशीं चार गुंजांप्रमाणें दिलें असतां त्रिदोष, क्षय, सन्निपात, आमवात, धनुर्वात, शृंखलावात, आढ्यवात, पंगुवात, कटिवात, अग्निमांद्य, सर्वशूळ, गुल्मशूळ, उदावर्त, संग्रहणी, प्रमेह, उदर, सर्वाश्मरी, मूत्रकृच्छ्र, विद्ग्रह, भगंदर, सर्व कुष्ठें, मोठा विद्रधी, श्वास, कास, अजीर्ण, अठरा प्रकारचा ज्वर, कामला, पांडुरोग, शिरोरोग, इतर सर्व रोगांस अनुपानविशेषेंकरून नाश करील. ज्याप्रमाणें

सूर्योदय झाला असतां अंधकाराचा नाश होतो त्याप्रमाणें हा भूपतिरस सर्व रोगांचा नाश करील.

८२. **वीरसिंदूर** : पारा भाग १, वीर १, लोहचूर १, नवसागर १, घेऊन ३ दिवस खल करून काचकुपींत भरून वालुकायंत्रांतून १२ प्रहर अग्नि द्यावा. जन्मशैत्याचा नाश करितो.

८३. **क्षयकुलांतक तपसिंदूर** : हरताळ ९ भाग, प्रवाळ ४।।, हिंगूळ २।।, सोनें १।, पारा १०, गंधक १०, यांचा कोरफडीच्या रसांत, पांगेऱ्याच्या फुलांच्या रसांत, रुईच्या चिकांत खल करून वालुकायंत्रांतून अग्नि १६ प्रहर द्यावा. हा तपसिंदूर क्षयकुलांतक क्षतक्षयावर द्यावा. उत्तम गुण देतो. अनुपानयुक्त सर्व रोगांवर देणें.

८४. **अष्टधातू रसायन** : हें औषध सर्व प्रकारच्या ज्वरांवर उपयोगी पडतें. अनुपान ज्वरोक्त काढा, सन्निपात ज्वरावर उत्तम उपयोग होतो. तयार करण्याचा प्रकार—

पारा भाग १, गंधक ६, मनशीळ १, हिंगुळ १, सोमल १, हरताळ १, मुरदाडशिंग १, तुरटी १, सुवर्णकीस ·।।·, चांदीचा चूर ·।।·, प्रथम सुवर्ण व चांदीचा कीस अथवा वर्ख व पारा एकत्र करून घोटावें. एकजीव झाल्यावर त्यांत प्रथम गंधक घालून कज्जली करावी. मग बाकीचीं सर्व औषधें घालून एक दिवस चांगला खल करावा. मग वालुकायंत्रांत घालून १६ प्रहर अग्नि द्यावा. कुपीच्या कंठाशीं तयार रसायन लागेल तें घ्यावें.

८५. **सुवर्णराजवंगेश्वर** : पारा, गंधक, कथील, व नवसागर, सर्व समभाग घेऊन प्रथम कथील पातळ करावें, व त्यांत पारा घालून घोटावें. कथील खलांत ओतावें व पातळ आहे तेथपर्यंतच पारा घालून एकजीव करावा. मग गंधक घालून कज्जली करावी. शेवटीं नवसागर घालून घोटावें. वालुकायंत्रांत १६ प्रहर अग्नि देणें. १२ प्रहरांनंतर सळई घालून तळाचें औषधें सोन्याच्या रंगाचें झालें असें पाहतांच अग्नि कमी करावा. हें औषध तळाशीं तयार होतें. कंठास रक्तसिंदूर लागतो, तो निराळा काढून घेणें. पारा व कथील यांचें मिश्रण झाल्यावर तें तुरटीच्या पाण्यानें धुवावें. पाण्याचा रंग निळा होतो. तो स्वच्छ होईपर्यंत वारंवार तुरटीच्या पाण्यानें धुवावें. त्यामुळें रसायन सुवर्णाप्रमाणें पिवळें होतें. हें औषध उत्तम गुणकारी आहे. स्त्रियांचे गर्भाशयाचे विकार, व पुरुषाचे धातुविकार यानें खात्रीनें बरे होतात. अनुपान उष्णतेवर लोणी, खडीसाखर, दूध—साखर, चंदनाचें सरबत, पौष्टिक तूपसाखरेंतून घेऊन वर दूध पिणें.

८६. **रसेंद्रमल्लसिंदूर** : पारा भाग ९, सुवर्ण ·।।·, रसकापूर ९, गंधक ५।।, सोमल ४, याप्रमाणें औषधें घेऊन कज्जली करावी. तुळशीच्या रसाची एक भावना देऊन १६ प्रहर अग्नि देणें. कफक्षयावर अश्वगंधाच्या दुग्धकषायांतून देणें.

८७. **सर्वज्वरारिसिंदूर :** पारा गंधक, मौक्तिक, हिंगूळ, ताम्रभस्म, यांची कज्जली करून ४ प्रहर अग्नि देणें. सर्व ज्वरांवर उपयोगी. तसेंच प्रमेहावर चांगला गुण देतें.

८८. **काश्यपवंगेश्वर :** पारा भाग १, वंग ३, गंधक ३, कज्जली करून वालुकायंत्रांत ८ प्रहर अग्नि देणें. प्रमेह, सोमरोग, क्षय यांवर सांवरीच्या सालीच्या काढ्यांतून अगर सांवरीच्या काढ्याच्या चूर्णांतून तूप-साखरेशीं घेणें. उत्कृष्ट बलदायक आहे. तळाशीं व थोडें कंठाशीं लागतें.

८९. **अष्टावक्र रसेंद्र रस :** पारा भाग १, गंधक ·|·, नागभस्म ·|· वंग भस्म ·|·, सुवर्णभस्म ·|·, रौप्य भस्म ·|·, खर्पर भस्म ·|·, एकत्र कज्जली करून कोरफडीच्या रसाची भावना देऊन सुकल्यावर ७ मातकापडें केलेल्या कुपींत भरून, २४ प्रहर अग्नि देणें. सर्व रोगांवर उपयोगी. विशेषतः बाळंतरोग, क्षय, मधुमेह, यांवर शतावरीच्या काढ्यांतून देणें.

९०. **रसेंद्र मंगल रस :** पारा भाग ५, गंधक ५, यांच्या कज्जलीस कमळाच्या रसाची भावना देऊन ३ दिवस खल करावा. वालुकायंत्रांत १ प्रहर पचन करावा. अत्यंत पौष्टिक, वीर्यवर्धक, रसरक्तादि सर्व धातूंची वाढ करतो.

९१. **रसमाणिक्य :** शुद्ध पारा भाग १०, गंधक १०, नाग १०, मनशीळ १०, एकत्र कज्जली करून कोरफडीच्या रसांत २ दिवस खल करावा. सुकल्यावर कुपींत भरून ३ दिवस अग्नि देणें. कुपीच्या कंठाशीं माणकासारखा तेजस्वी रस लागलेला मिळेल. तो घेऊन लोणीसाखर, लोणी, मध, यांतून ·||· ते १ गुंज देणें. क्षय, कास, ज्वर, यांवर उत्कृष्ट उपयोगी.

९२. **सिद्धनागार्जुन रस :** सुवर्ण भाग १, रौप्य १, गंधक ६, जवखार १, यांची कज्जली करून लाल कमळाच्या फुलाच्या रसाच्या ३ भावना देणें. शुष्क झाल्यावर वालुकायंत्रांत ४ प्रहर अग्नि देणें. कंठस्थ रस काढून घेऊन योग्य अनुपानांतून दिल्यानें स्मृतिभ्रंश, उन्माद, अपस्मार, वातरोग, यांचा नाश होतो.

९३. **महाकनकसिंदूर :** अभ्रक, नाग, वंग, मौक्तिक, कलखापरी, सुवर्णमाक्षिक, प्रवाळ, कांतलोह, यांचीं भस्में १-१ भाग, पारा १, गंधक १, व सुवर्णभस्म ११ भाग एकत्र कज्जली करून हंसपादी लाल लाजाळूच्या रसांत ३ दिवस उत्तम खल करावा. आणि वालुकायंत्रांत मंद मध्यमाग्नीवर ३ दिवस पचन करावें. स्वांगशीत झाल्यावर तलस्थ रसायनाचें उत्तम चूर्ण करून त्यास पुनः हंसपादीच्या रसाची भावना देणें सिद्ध होय. सर्व प्रकारच्या रोगांवर उपयोगी. विशेषतः वातरोग, अपस्मार, व वृद्धावस्थेंतील सर्व विकारांवर उत्तम.

९४. **तालकसिंदूर :** सोमल, हरताळ, गंधक, प्रत्येकीं २ तोळे, पारा १२ तोळे, एकत्र कज्जली करून २ दिवस पचन करावें. विशेषतः वातविकार व कफविकारांवर उपयोगी.

९५. **माणिक्यचंद्र रस :** पारा, गंधक, मनशीळ, हरताळ, व नागभस्म, समभाग घेऊन कज्जली करून १६ प्रहर अग्नि देणें. कंठस्थ व तलस्थ रसायन एकत्र करून खल करावा. याचा उपयोग सर्व प्रकारचें प्रमेह व मधुमेहावर होतो. शतावरी, आस्कंद, भुईआंवळी, जांभळांतील बिया, उपलसरी यांच्या काढ्यांत मध घालून त्यांतून देणें. उत्कृष्ट उपयोग होतो.

□